JUL 2020

# बाणभट्ट.

पां. गो. शास्त्री पारखी.

हिं. एजन्सी, माधवबाग, मुंबई

८६७
ग २५
2 SEP 1996
२०
17 JUL 2020
11 JAN 1994

# बाणभट्ट.

हा निबंध,

पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी

श्रीहर्ष, कादंबरीसार, मित्रचंद्र, हंसिका, षड्ऋतुवर्णन, कृष्णाकुमारी, बोधामृत इ० पुस्तकांचे कर्ते,

यांनीं

अनेक इंग्रजी ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट व संस्कृत ग्रंथ यांच्या आधारानें

तयार केला.

तो

हिंद एजन्सी-बुकसेलर्स आणि पब्लिशर्स
माधवबाग-मुंबई

यांनीं

पुणें येथें गंगाधर गोविंद गोंधळेकर यांच्या " भारतभूषण " छापखान्यांत छापवून मुंबई येथें प्रसिद्ध केला.

आवृत्ति दुसरी.

शके १८३३—सन १९११.

( सर्व हक्क स्वाधीन )

किंमत १। रुपाया.

.... LIBRARY
Date......
No......
...BOR.

१

1 5 MAY 2007

' जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ।
नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ॥ "
' ते धन्यास्ते महात्मानो तेषां लोके स्थिरं यशः ।
यैर्निबद्धानि काव्यानि ये वा काव्येषु कीर्तिताः ॥ '

---

" सुभाषितं हारि विशत्यधोगला-
न्न दुर्जनस्यार्करिपोरिवामृतम् ।
तदेव धत्ते हृदयेन सज्जनो ।
हरिर्महारत्नमिवातिनिर्मलम् ॥ "

बाणभट्ट.

विद्वन्मान्य अनेकपदवीमंडित

# डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

यांच्या अंगीं असलेल्या-विद्वत्ता, रसिकता, शोधकता इत्यादि अनेक असाधारण गुणांबद्दल निबंधकारानें त्यांस हें पुस्तक परमादरानें आणि अत्यंत नम्रतेनें अर्पण केलें आहे.

विद्वानांचा नम्र सेवक,

ग्रंथकार.

Printed by G. G. Gondhalekar at his " Bharat Bhushan "
press Budhawar peth Poona, and published by
Narayan Narso ketkar for the " Hind
agency " at Madhav Bag Bombay.

15 MAY 2007

८६४
२७५१

# या पुस्तकाबद्दल थोर विद्वानांचे अभिप्राय.

Mr. Pandurang Shastri Parkhi's essay on Banabhatta is a useful production and does very great credit to the author. In the first part he has brought together all the authentic information about the poet that is to be gathered from the Harsha-Charitra and the researches of modern scholars; in the second are given choice passages from the author's works, and the third contains an abstract of the stories of the Kadambari and the Harshacharitra. Students reading Bana's works for the University Examinations will derive a good deal of benefit from the essay and the general readers will find therein correct information about one of the foremost authors in classical Sanskrit. The essay is written in an agreeable style.

Poona,
11th September
1902

( Sd. ) R. G. BHANDARKAR.
M. A. P. H. D. &c
( Late Prof. of oriental languages
Deccan College. Poona. )

---

I have read Mr. Pandurang Shastri Parkhi's essay on Banabhatta and his works. The essay contains all the available information regarding the poet, and is very instructive and interesting. The extracts from the poet's works are chosen with great judgment and the remarks made on them show good taste. The Marathi abstracts of the prose works of Banabhatta are written in such good style and pure language that when one begins to read them he does not feel inclined to stop till going to the end. As the essay is useful and attractive reading it is to be hoped that it will meet with good patronage.

Poona,
5th October
1902

( Sd. ) ABAJI. V. KATHAVATE B. A.
( Late Prof. of oriental languages,
Elphinstone College, Bombay.)

I have read portions of Pandurang Shastri's work and I am of opinion that the book will prove highly useful and entertaining to Marathi readers. His work on Banabhatta deserves the patronage of the public as he has laid under contribution the writings of distinguished foreign authors which are not accessible to ordinary students.

Poona,
7th October 1902.

( Sd. ) K. B. PATHAK. B. A.
( Prof of Sanskrit,
Deccan College, Poona. )

---

वे. शा. सं. रा. रा. पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी यांनीं लिहिलेलें बाणकवीचें चरित्र व त्यावरील निबंध मीं समग्र वाचून पाहिला आहे. बाणकवि आणि त्यास आश्रय देणारा श्रीहर्ष या दोघांच्याही संबंधानें ताम्रपट, शिलालेख, चिनी प्रवाशांचे ग्रंथ, यांतून व बाणकवीच्या सांप्रत उपलब्ध झालेल्या श्रीहर्षचरित्रांतून जी माहिती मिळण्यासारखी आहे, तेवढी सर्व पांडुरंगशास्त्री यांनीं आपल्या निबंधांत व्यवस्थित रीतीनें घातली आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं बाणकवीवरील जेव्हां निबंध लिहिला तेव्हां ही माहिती उपलब्ध नव्हती; यामुळें विष्णुशास्त्री यांच्या बाणभट्टावरील निबंधापेक्षां पांडुरंगशास्त्री यांचा हल्लींचा निबंध विद्यार्थ्यांस व वाचकांस अधिक उपयुक्त व मनोरंजक झाला आहे. हर्षचरित्रांतील नायक हाच रत्नावली, नागानंद, वगैरे नाटकांचा कर्ता आहे, हेंही हल्लींच्या निबंधांत सप्रमाण दाखविलें आहे. सारांश, बाणकवि आणि श्रीहर्ष यांच्याबद्दल जितकी माहिती मिळणें शक्य होतें. तितकी मिळवून प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे. अशा रीतीनें ह्मणजे नव्या ऐतिहासिक पद्धतीनें लिहिलेले निबंध मराठी भाषेंत फारच थोडे आहेत; व त्यांतून ज्यांचा अभ्यास जुन्या शास्त्रीलोकांच्या पद्धतीनें झालेला, अशा लोकांकडून तर मराठींत अशा प्रकारचा ग्रंथ हा पहिलाच माझे पाहण्यांत आलेला आहे. पांडुरंगशास्त्री यांनीं कादंबरीचें सार मराठींत प्रसिद्ध केलें आहे; तेव्हां त्यांचा बाणकवीच्या ग्रंथांशीं कितपत परिचय आहे हें सांगावयास नकोच. निबंधाची भाषा सरळ व सोपी असून शेवटीं बाणकवीच्या ग्रंथांतून जे उतारे दिले आहेत तेही मार्मिकपणानें निवडलेले असून त्यांपासून बाणकवीच्या लेखनशैलीचा

20 NOV 2013



वाचकांस थोडा बहुत परिचय होईल इतकेंच नव्हे, तर त्यांपासून बोध, ऐतिहासिक ज्ञान व मनोरंजनहि होण्यासारखें आहे. बाणकवीचा काल हा अर्वाचीन हिंदुस्थानच्या इतिहासांतील हिंदुलोकांच्या भरभराटीचा बहुतेक शेवटचाच काल होता, असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां तत्कालची स्थिति आणि तीहि एका मोठ्या संस्कृतकवीच्या व गद्यग्रंथकाराच्या द्वारें महाराष्ट्र वाचकांपुढें पांडुरंगशास्त्री यांनीं मांडली याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. अशा प्रकारचे मराठींत आणखी जितके ग्रंथ होतील तितकें चांगलें; परंतु तसें होणें सर्वस्वीं लोकाश्रयावर अवलंबून आहे.

पुणें.
तारीख १४ आक्टोबर १९०२.

(सही) बाळ गंगाधर टिळक.
बी. ए. एल्. एल्. बी.
( केसरीपत्राचे कर्ते. )

---

मीं रा. रा. पांडुरंगशास्त्री पारखी यांनीं बाणभट्ट कवीवर लिहिलेला निबंध वाचिला. यांत बाणभट्टाचा व त्यास उदार आश्रय देणाऱ्या श्रीहर्षराजाचा व कवीचा कालनिर्णय चिनई प्रवाशांच्या हकीकती, ताम्रपट, कोरीव लेख, व संस्कृत ग्रंथ यांच्या आधारानें पाश्चात्य ऐतिहासिक पद्धतीनें केला आहे. या पद्धतीची योजना मराठींत लिहिलेल्या ग्रंथांत अलीकडेच सुरू झाली आहे, व जुन्या पद्धतीनें पढलेल्या शास्त्र्यांत तर मला वाटतें अपूर्वच आहे.

कै. विष्णुशास्त्री यांनीं बाणभट्टावर एक निबंध लिहिला आहे, यांतील कांहीं चुका, तशाच डॉ. हॉल व प्रोफेसर वुईलसन यांच्या चुका रा. रा. पांडुरंगशास्त्री यांनीं चांगल्या दाखविल्या आहेत.

हर्षचरित्र व कादंबरी यांतील उत्तम स्थळें शास्त्रीबोवांनीं मार्मिकपणें दाखविलीं आहेत. त्यांचे पूर्वींचे गद्यात्मक व पद्यात्मक ग्रंथ मीं बहुतेक वाचले आहेत. त्यांच्या संस्कृत कविता केसरींतून मधून मधून येतात, त्यांपैकी कांहीं मीं वाचिल्या आहेत. शास्त्रीबोवांची विद्वत्ता, रसिकता, शुद्ध व प्रौढ मराठी लिहिण्याची हातोटी, मला पूर्वींपासून माहीत आहे. बाणभट्टावरील या निबंधांत हे सारे गुण सरस वठले आहेत. हा निबंध वाचून मला बरीच नवीन माहिती मिळाली व आनंदहि झाला. यास लोकांचा

उदार आश्रय मिळावा; असा हा निबंध आहे. युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देणाऱ्यांनीं हा अवश्य वाचावा. मुक्काम मुंबई, ता. २-१-०५.

( सही ) विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए.
ए. इन्स्पेक्टर, प्रांत वऱ्हाड.

---

वेदशास्त्रसंपन्न रा. रा. पांडुरंग शास्त्री पारखी-मुक्काम पुणें स्वामीचे सेवेशीः—

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष आपला 'बाणभट्ट' नांवाचा ग्रंथ आपले चिरंजिवांनीं मजकडे आणून दिला तो पोहोंचला. पुस्तक वाचून पाहतां फार उपयोगी झालें आहे असें दिसून आलें. अंतर्बाह्य कारणांवरून कालविवेचन करण्याची पद्धति मराठी ग्रंथांत अजून फार कमी आहे. तशा प्रकारचा हा ग्रंथ असलेमुळें कोणतेही काव्यग्रंथांतील अर्थगांभीर्य व रसपोष इत्यादि मार्मिक गोष्टीबरोबर थोडथोडी ऐतिहासिक दृष्टिहि वाचकांमध्यें उद्भवेल अशी आशा आहे. शिवाय कोणत्याही कवीच्या कृतीचें सर्व बाजूंनीं परिशिलन कसें करावें ह्याचें वळण आपले पुस्तकावरून वाचकांस चांगलें लागेल असें मला वाटतें.

एकंदरीनें विचार करितां कै. विष्णुशास्त्री यांच्या या कवीवरील निबंधापेक्षां आपला हा निबंध जास्ती उपयोगी आहे. कोठें कोठें मतभेद दाखवितां येईल असें विधान कोठेंही केलेलें आढळून येत नाहीं. निबंधाची भाषाहि चांगली व सुबोध आहे.

आपल्या ह्या ग्रंथास मराठी वाचकांचा चांगला आश्रय मिळेल तर अशा ग्रंथांस उत्तेजन येऊन मराठीमध्यें चांगले ग्रंथांची भर पडेल असें मला वाटतें. याप्रमाणें मराठी कवींवरही पूर्ण विवेचनाचे व विस्तृत ग्रंथ होतील तर फार उपयोग होईल असें वाटतें. कळावें लोभ असावा हे विनंति.

श्रावण शु. ३ रोज गुरुवार
गिरगांव मुंबई.

(सही) हरि महादेव भडकमकर. एम्. ए.
सं. प्रोफेसर-उइल्सन कॉलेज.
मुंबई.

---

2 SEP 1996



The essay on Banabhatta which Mr. Pandurang shastri Parkhi published in 1905 has the good fortune of getting into a second edition, a rare good fortune for a Marathi book. There are few books in Marathi literature of recent times which as pure high class literature can equal Mr. Pandurang shastri's essay on Banabhatta,...Mr. Pandurang shastri deserves great credit for the acurate and critical study and research which he has brought to bear on the subject of Banabhatta's life and works. It is a rare occurrence for a shastri of the old school to engage in critical study and analysis of evidence dealeng with ancient dynasties, and in polemical controversies with European scholars. In Marathi especially Mr. Pandurang shastri's work is the first attempt of its kind to awaken a taste and interest in archological study among pure Marathi readers. This is the best way of enriching our literature and Mr. Pandurang shastri deserves our warm thanks and hearty good wishes for his success. It is necessary that a taste for healthy reading should be caltivated among our people and Mr. Panduring shastri's book will best contribute to the development of such a taste. I earnestly hope that the response of the public will be prompt and hearty so as to afford encouragement to the shastribowa to persevere in his efforts in the production of other works of equal merit.

BOMBAY<br>30th October<br>1908 } ( Sd. ) V. K. BHATAWADEKAR, B. A.

---

11 JAN 1994

ग. वं. वाचनालय,

# अनुक्रमणिका.


१ पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.
२ दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.
३ बाणाचे पूर्वजादिक, त्यास झालेला पितृवियोग व त्याचें वसतिस्थान.
४ बाणाचें स्वच्छंदाचरण, त्याबरोबरची मंडळी व वर्तनांत सुधारणा.
५ हर्षाचा बंधु सज्जनकृष्णराज व त्याचें बाणकवीविषयीं प्रेम.
६ बाणाचें हर्षराजाकडे प्रयाण, त्याची कसोटी, हर्षाचें गुणग्राहित्व व बाणाची हर्षावर छाप.
७ बाणाचे घरीं वायुपुराणाचें कथन, व प्रसंगानें ( टिपेंत ) पुराणासंबंधानें विवेचन.
८ हर्षचरितांतील मुद्याचा मजकूर.
९ बंस्खेड येथील ताम्रपत्रलेख.
१० हर्षचरितांत कालनिर्णयाचा अभाव.
११ बुद्ध ( चरित्र टिपेंत ) बौद्ध धर्मावर हल्ले व तद्धर्मानुयायी इटसिंग, भर्तृहरि, दिवाकरमित्र, अशोक ( चरित्र—टिपेंत ).
१२ हर्षाच्या वेळीं हुएनसँगचा हिंदुस्थानांतील प्रवासकाल.
१३ बाणाच्या वर्णनाशीं हुएनसँगवर्णित बऱ्याच गोष्टींचा मेळ आणि हर्ष व बाण यांचा कालनिर्णय.
१४ या कालनिर्णयास आणखी ताम्रपट व शिलालेख यांतील प्रमाणें. ( हर्ष आणि पुलकेशी यांजमधील युद्धाचा उल्लेख. ) ( कालिदास व भारवी यांचा निर्देश. )
१५ बाणानें हर्षचरिताच्या आरंभीं वर्णिलेले पूर्वींचे कवि ( प्रसंगानें डॉ. हॉल बुलर, पिटरसन वगैरेंच्या मतांबद्दल विचार. )
१६ बाणकवि, त्याचा पुत्र, त्यांचे ग्रंथ, त्यांचे कवित्व, बोधप्रदस्थळें व त्यावेळची स्थिति इत्यादि.
१७ बाणाची थोर थोर कवींनीं केलेली प्रशंसा.
१८ बाणपुत्र पुलिंद.
१९ बाणाचें चण्डिकाशतक, त्याचा श्वशुर मयूरकवि व मातङ्गदिवाकर.
२० पार्वतीपरिणय ( अनेक कवींचीं समानार्थक पद्यें ) बाण व वामनबाण. ( कै. वि. कृ. चिपळूणकर, पंडित कृष्णमाचार्य इ.)
२१ बाणाचे अप्रसिद्ध ग्रंथ.

२२ बाण, दोघे श्रीहर्ष व त्यांचे ग्रंथ. ( कै. वि. कृ. चिपळूणकर, डॉ. वुइलसन. )
२३ हर्षाचें दानशूरत्व.
२४ धावक हा कोण ? याबद्दल व हर्षानें बाणास व बाणानें हर्षास मोठी देणगी दिली याबद्दल.
२५ बाण, मयूर व मातङ्गदिवाकर.
२६ बाणाचे वंशजास देवताप्रसाद, त्याचें कुलीनत्व, सदाचारसंपन्नत्व व असाधारण विद्वत्व.
२७ भवभूति व वाक्पतिराज.
२८ ह्या ग्रंथांतील महत्त्वाच्या गोष्टीबद्दल विचार व मालव-गौड-गुप्त हा कोण ?
२९ हर्षाची राजधानी, राजाविस्तार व त्याचा मृत्युकाल.
३० हर्षाची गौडवधसंबंधाची प्रतिज्ञा.
३१ हर्षाचें क्षत्रियत्व व राजधानी यांबद्दल विचार ( यासंबंधानें बाण व हुएनसँग यांच्यांत विरोध )
३२ भंडीच्या संबंधानें बाण व हुएनसँग ह्यांच्या वर्णनांत विरोध.
३३ राज्यवर्धन हूणावर गेला असतां मागें हर्षाला राज्यावर बसविण्याच्या खटपटीविषयीं बाण व हुएनसँग, स्मिथ इत्यादिकांच्या वर्णनांत विरोध.
३४ हर्षाच्या वयासंबंधानें बाण व डॉ. हॉल, स्मिथ इ. त्यांच्यांत मतभेद.
३५ बौद्धधर्माचा वैदिक धर्माशीं एकजीव व बाण आणि हुएनसँग ह्यांपैकीं निःपक्षपाती कोण ?
३६ यशोवर्मा, ललितादित्य, पराक्रमाच्या चळवळी व देशाचें स्वरूप.
३७ बाण व हर्ष यांच्या चरित्रांतील ध्यानांत ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी.
३८ हर्षचरितांतील संक्षिप्त कथानक.
३९ कादंबरीच्या पूर्वार्धांतील संक्षिप्त कथानक.
४० कादंबरीच्या उत्तरार्धांतील संक्षिप्त कथानक.
४१ हर्षचरित व कादंबरी यांतील कांहीं ऐतिहासिक महत्त्वाचे उतारे.
४२ बाणाच्या ग्रंथांतील चटकदार वाक्यांचे मासले.
४३ बाणाच्या ग्रंथांत असलेल्या त्या काळच्या रीतीभातींची माहिती.

# प्रस्तावना.

हा बाणभट्टावरील निबंध त्याच्या ग्रंथांत आढळून आलेल्या कांहीं प्रमाणभूत गोष्टी, चिनी प्रवाशांचे लेख, शिलालेख, ताम्रपट इत्यादिकांच्या आधारानें लिहिला आहे. अशा प्रकारचे निबंध मराठी भाषेंत अद्यापि झालेले नाहींत, असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर यांनीं कालिदासादि कविपंचकावर व दुसऱ्यांहि अनेक विषयांवर मराठींत निबंध लिहिले आहेत. ते त्यांची चतुरस्र विचारसरणी व चटकदार भाषापद्धति यांनीं मंडित आहेत, यांत कांहीं संशय नाहीं. तथापि ते निबंध त्या त्या कवींच्या पुस्तकांतील कवित्वदर्शक कांहीं गोष्टी व निबंधकाराचे त्यासंबंधाचे विचारतरंग, यांनींच प्रायः भरलेले आहेत. त्यांत ऐतिहासिक गोष्टी वगैरेकडे विशेष लक्ष दिलें असल्याचें आढळून येत नाहीं. बाणभट्टावरचा त्यांचा निबंध तर त्यांनीं हर्षचरित देखील न वाचतां लिहिला आहे! तथापि त्या पूर्वीं व त्या वेळीं दुसऱ्या कोणांकडून असे निबंध फारसे न झाल्यामुळें त्यांच्या निबंधास खरोखरीच अत्यंत महत्त्व देणें आवश्यक आहे. बाणभट्टावरचा निबंध त्यांनीं लिहिला, त्या वेळीं तितकीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें तो जसा व्हावा तसा झाला नाहीं हें मात्र खचित होय! तथापि त्यांचा निबंध बऱ्यापैकीं आहे, असें आपण गृहीत केलें तरी जसे आंब्याचे निरनिराळे बंछोड, हपूस, पायरी इत्यादिकांचे मासले कोणासहि नकोसे होत नाहींत; तर ते सर्व रसनेंद्रियास रुचणारे व आवडणारेच आहेत! त्याप्रमाणें एकाद्या विषयावर एकादें पुस्तक असून दुसरींहि आणखी बरीं पुस्तकें झालीं तरी, तीं देखील रसिक विद्वज्जनांच्या आदरास पात्र झाल्याखेरीज राहत नाहींत.

कांहीं दिवसांपूर्वीं हर्षचरित व कादंबरी यांतील अमृतरसास्वाद घेत असतां, उच्च प्रतीच्या विद्यालयांत व परीक्षेंत ह्या थोर कवीचे 'हर्षचरित' व 'कादंबरी' हे उत्तम ग्रंथ चालू असतांहि आमच्या विद्वानांपैकीं कोणाकडून ह्या कवीच्या संबंधानें इंग्रजींत किंवा मराठींत यथास्थित विवेचन कसें झालें नाहीं? म्हणून मनास मोठें नवल वाटलें! व अशा कविवर्याची आपल्या-

कडून कांहीं सेवा झाली तर करावी, असें मनांत आल्यावरून **हर्षचरित** वाचून त्यांतील कांहीं मुख्य गोष्टींचीं टिप्पणें करून ठेवलीं. हूएनस्यांग याच्या पुस्तकांतहि **बाणा**चा आश्रयदाता **श्रीहर्ष**राजा याच्या संबंधाची बरीच माहिती असल्याबद्दल समजल्यामुळें त्याच्या पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतराचे दोन्ही भाग वाचावयास मिळविले व त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचेहि उतारे करून घेतले. तशीच आणखी दुसऱ्या कांहीं इंग्रजी पुस्तकांत उपयुक्त माहिती आढळली तिचाहि संग्रह केला.शिवाय **शार्ङ्गधराची सुभाषितपद्धति, जल्हणदेवाची सूक्तिमुक्तावलि, वल्लभदेवाची सुभाषितावलि** इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथांत प्रकृतविषयोपयोगी कांहीं पद्यें आढळलीं, त्यांचाहि संग्रह केला व फुरसतीप्रमाणें निबंध लिहिण्याचा क्रम सुरू ठेवला.

हा निबंध लिहीत असतां ग्रंथिक तापानें मनुष्यहानि झाल्यामुळें व वर्षास बाहेर गांवीं चार चार पांच पांच महिने जावें लागल्यामुळें वगैरे कारणांनीं हा पुरा होण्यास बरेच दिवस लागले. पुढें हा निबंध बहुतेक तयार झाल्यावर तदभिज्ञ विद्वज्जनांस तो कसा काय वाटतो हें पहावें, असें मनांत आलें. कारण, " **आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् । बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः** " असे **कविकुलगुरूचे** सुद्धां जर उद्गार आहेत, तर मग मजसारख्या अल्पज्ञ मंदमतीची ती कथा किती! नंतर हा निबंध—अशा प्रकारच्याहि विषयांत निष्णात असलेले डॉ० **भांडारकर**, प्रो. **काथवटे**, प्रो. **पाठक** व लोकमान्य **बाळ गंगाधर टिळक** यांस दाखविला. त्यांस हा बराच पसंत पडला तेव्हां मनास बरेंच धैर्य आल्यासारखें होऊन याजकडे अधिक लक्ष देण्यास हुरूप वाटून हा तयार केला आणि छापून प्रसिद्ध करण्यास उमेद वाटली. पुढें याचें छापण्याचें काम सुरू असतांनां कोठें कांहीं उपयुक्त अल्पस्वल्प माहिती आढळली, तीहि यांत सामिल केली. **हर्षचरिता**खेरीज इतर सर्व साधनें—चिनी प्रवाशांच्या लेखांचीं भाषांतरें, **इंडियन ऍंटिकेरीचीं** पुस्तकें, **शिलालेख, ताम्रपट**, संस्कृत पुस्तकें वगैरे—येथें फक्त डॉ० **भांडारकर** यांचे येथें मात्र उपलब्ध असल्यानें, व तीहि त्यांचे येथें तेथले तेथें मात्र पहावयास मिळालीं असल्यानें, जरी ग्रंथकारानें जेथल्या तेथें मजकूर येण्याविषयीं आपल्याकडून खबरदारी घेतली आहे, तथापि यांत कदाचित् कोठें कमी-जास्त व पुढेंमागें मजकूर झाला असल्यास विद्वज्जन त्याजकडे करडी नजर

करणार नाहींत अशी आशा आहे. कांहीं काहीं ठिकाणीं तर बुद्धयाच लांबलचक पुरावे देणें भाग पडलें आहे. याबद्दलहि विद्वज्जन क्षमा करतील अशी आशा आहे.

खरोखर पाहिलें असतां अशा प्रकारचे प्रयत्न ह्मटले ह्मणजे विशेषेंकरून आमच्या पदवीधर मंडळींकडून व्हावयास पाहिजेत. कारण, इंग्लिश, संस्कृत, इतिहास, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र इत्यादिकांच्या संस्कारांनीं त्यांची बुद्धि–" **मणिराकरोद्भवः । प्रयुक्तसंस्कार इवाधिकं बभौ**"–या **कालिदास** कवीच्या वचनाप्रमाणें अनेक विद्यासंस्कारांनीं उज्वालित झालेली असते. त्यामुळें केवळ चतुरस्रच काय, पण प्रौढ व तरतरीत झालेली असते! इत्यादि कारणामुळें इंग्लिश वगैरे ग्रंथकारांनीं आमच्या इकडील ग्रंथकार, त्यांचे ग्रंथ व इतिहासादिविषय, इत्यादिकांच्या संबंधानें आपल्या पुस्तकांत कशी काय माहिती दिलेली आहे आणि ती आपल्या इकडील जुने लेख, **ताम्रपट** इत्यादिक अनेक प्रमाणभूत लेखांतील माहितीशी जमते किंवा नाहीं, याबद्दल विचार करणें तसेंच,इतरांनीं दिलेली माहिती विपर्यास केलेली असल्यास ती सप्रमाण खोडून काढून भारदस्त लेख लिहिणें,हें त्यांना जसें साधेल तसें एकांगी विद्वानास साधावयाचें नाहीं! परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, अशा प्रकारचे किंवा दुसरे महत्त्वाचे उच्चप्रतीचे ग्रंथ लिहिण्याचे प्रयत्न पदवीधरांच्या संख्येच्या मानानें पाहिलें असतां फारच थोडया लोकांकडून झालेले आहेत. वर निर्दिष्ट केलेले डॉ० **भांडारकर**, कै.**तैलंग**,**पंडित**, न्या. **रानडे** **लो. टिळक**, **वैद्य** वगैरे कांहीं विद्वज्जनांनीं मात्र इंग्रजींत असे कांहीं चागले उच्चप्रतीचे लेख लिहिले आहेत. परंतु मराठींत अनेक प्रमाणांचा मेळ घालून लिहिलेले ग्रंथ कोठें फारसे आढळण्यांत आले नाहींत. कै० **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यानीं मात्र कांहीं गोष्टींनीं अल्पकालांत आपल्या मातृभाषेची चांगलीच सेवा केली, यांत कांहीं संशय नाहीं! अशी फारच थोडया लोकांकडून झाली असेल. याप्रमाणें इतर शेंकडों पदवीधरांनींहि फुरसत करून अशा प्रकारचे प्रयत्न सुरू ठेवले असते तर आपल्या भाषेंत आजपर्यंत केवढें ज्ञानभांडार झालें असतें ! कै० **कृष्णशास्त्री चिपळूणकर**, **परशुराम तात्या गोडबोले** यांजकडून, तसेंच **हरिपंत पंडित** इ० पूर्वींच्या कांहीं

---

१ सदरहू गृहस्थांचे बरेच मार्मिक लेख 'विविधज्ञानविस्तार' या मासिक पुस्तकात पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत.

21 MAR 1990

लोकांकडूनहि मराठी भाषेची बरीच सेवा करण्यांत आली आहे, हेंहि येथें सांगणें जरूर आहे.

आतां बरीच मंडळी असा आक्षेप घेतील कीं, पूर्वींच्या ग्रंथकारांस राजेरजवाड्यांकडून उदारआश्रय मिळत असे, व त्यामुळें त्यांजकडून ग्रंथ होत असत. ही गोष्टहि कांहीं मिथ्या नाहीं. प्रसिद्ध भट्टकुळांतील वैयाकरण [१]**नागोजीभट्टानें शृंगवेरपुराधीश रामराजा** यापासून आपणास आश्रय असल्याचें **शब्देंदुशेखराच्या** आरंभीं नमूद करून ठेविलें आहे. दुसरींहि आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. जसे– **सायनमाधवास बुक्कणराजाचा, हेमाद्रीस रामदेवराव जाधव** याचा, **विज्ञानेश्वरास विक्रमादित्यराजाचा, जगन्नाथास शहाजहान**बादशहाचा चांगला आश्रय होता. फार दूर कशाला ? प्रस्तुत ग्रंथकार **बाणकवि** हाच याचें ढळढळीत उदाहरण आहे ! **बाणकवीस हर्षराजाचा** आश्रय मिळाल्यामुळें त्याजकडून ग्रंथ झाले असतील, कदाचित् ही गोष्ट खरी असली तरी सर्वच ग्रंथकार धाकट्या ( लक्ष्मी ) बाईनें आपल्याकडे घेतले आहेत असें मात्र ह्मणतां यावयाचें नाहीं ! तर तिनें त्यांची वाटणी करून मानाप्रमाणें अधिक ग्रंथकार आपल्या थोरल्या बहिणीच्या वाट्यासच दिले असल्याचें आढळतें ! ' **विद्वान् दरिद्रो यतः** ' ' **विद्वत्सु दारिद्रता** ' इत्यादि वचनें या गोष्टीची चांगली साक्ष देत आहेत! व्यक्तिविषयक उदाहरणें पाहूं गेलें असतां पुष्कळ आहेत.त्यापकीं संस्कृत कवींत **भारविकवीचें** प्रसिद्ध व ढळढळीत आहे. एके दिवशीं **भारवीच्या** घरीं उपजीवनास धान्य नव्हतें,तेव्हां त्याची स्त्री त्याजकडे जाऊन ' आज घरांत धान्य वगैरे कांहीं एक नाहीं!' असें काकुलतीनें ह्मणाली. तेव्हां **भारवीनें** '**सहसा विदधीत न क्रियामविवेकः परमापदां पदम्** ' हें श्लोकार्ध लिहून दिलें व हें रस्त्यांत नेऊन लोकांनां दाखीव, असें सांगितलें. पुढें त्याप्रमाणें तिनें केलें. तेव्हां एका धनिकानें तें श्लोकार्ध घेऊन तिला बरेंच द्रव्य दिलें.

---

१ " पातंजले महाभाष्ये कृतभूरिपरिश्रमः ।  
शिवभट्टसुतो धीमान् सतीदेव्यास्तु गर्भजः ॥  
याचकानां कल्पतरोररिकक्षहुताशनात् ।  
शृंगवेरपुराधीशात् रामतो लब्धजीविकः ॥  
नत्वा फणीशं नागेशस्तनुतेऽर्थप्रकाशकं ।  
मनोरमोमार्धदेहं लघुशब्देंदुशेखरं ॥ "

11 JAN 1944 श्रीमंत सौ. म. न. वाचनालय, सां.



ज्यानें द्रव्य देऊन हें श्लोकार्थ घेतलें, त्यानें तें आपल्या निजण्याच्या खोलींत मोठ्या अक्षरांनीं लिहून ठेवलें होतें. पुढें तो बरींच वर्षें कांहीं कामाकरितां दूर देशीं गेला होता, तो परत घरीं आल्यावर आपली स्त्री परपुरुषाशेजारीं पलंगावर निजली आहे, असें त्यांस वाटून त्या दोघांचा शिरच्छेद करावा, असें त्याच्या मनांत आलें व तो खुंटीवरची तलवार घेण्यास गेला. तों तेथें लिहिलेलें हें श्लोकार्ध त्याच्या दृष्टीस पडलें! तेव्हां तो साहसकर्मापासून परावृत्त झाला! मग त्यानें आपल्या स्त्रीस उठविलें तेव्हां ती गडबडीनें उठून हसत 'बाळ्या ऊठ ऊठ लवकर' ह्मणून आपल्या मुलास हाका मारूं लागली. त्यावेळीं ह्या श्लोकार्धानें भयंकर अनर्थ टळला ह्मणून त्यानें मोठ्या आनंदानें आणखीहि द्रव्य **भारवी**कडे पाठवून दिलें! अशी आख्यायिका आहे. यावरून **भारवी**सारख्या महाकवींचीं कांहीं कांहीं वचनें किती बहुमोल ह्मणण्यापेक्षां अमोलच आहेत असेंच ह्मणणें अधिक शोभेल! मराठी कवींतहि प्रसिद्ध **मोरोपंत**कवीचें अगदीं ताजें उदाहरण आहे. **मोरोपंतानें** उपजीवनसाधन–कर्णाश्रित लेखणी–कांहीं कारणानें खालीं ठेवल्यावर पुष्कळ संस्कृत व प्राकृत काव्यें केलीं. तीं कोणाकडून उत्तेजन मिळाल्यामुळें केलीं, असें मुळींच ह्मणतां यावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें **रघुनाथ**पंडिताचेंहि उदाहरण होय. ह्या कवीचें सुरस '**दमयंतीस्वयंवर**' तर सर्वत्र प्रसिद्धच आहे. परंतु अलीकडे त्याचीं आणखी दोन पद्यात्मक काव्यें सांपडलीं आहेत. एक '**गजेंद्रमोक्ष**' व दुसरें '**रामदासवर्णन**' पहिलें काव्य **दमयंतीस्वयंवरा**च्या खालोखाल आहे. ह्या काव्यांत **दमयंतीस्वयंवरां**तील कांहीं पद्यांतील चरणहि आढळतात. दुसरें काव्य त्यापेक्षां लहान आहे. हा कवि शके १५८२–१६३२ पर्यंत हयात होता.

पुढें दाखल केलेलें पद्य **रघुनाथ**पंडिताच्या तोंडचें त्याच्या दुःस्थितीचें दर्शक आहे.

'ह्मातारा बहु जाहलों कवणहि त्राता नसे भेटला
भाताची तजवीज हो न उदरीं भाता गमे पेटला।
हातामाजिं नसेच एक कवडी हा ताप आतां हरी
दातारा मज वाचवी सदय हो मातापिता तूं हरी'॥

---

१ ग्रंथमाला १२८, नोव्हेंबर १९०४ पहा.

ह्या त्याच्या उद्गारावरून **रघुनाथ**पंडित हा अठरा विश्वे दारिद्र्यानें पीडलेला होता, असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे ! अशीच प्रायः **मुक्तेश्वर** वगैरे इतर कवींचीहि स्थिति होय !

दुसरें, परद्वीपस्थ इंग्लिश ग्रंथकार डॉ. **जॉनसन** याचें उदाहरण पहा ! हा ग्रंथकार थोरल्या ( अक्का ) बाईच्या वाट्यास गेला होता ! यामुळें त्याची आई वारली तेव्हां तिचें और्ध्वदेहिक करण्यास त्याजवळ एक छदाम देखील नव्हता. तेव्हां त्यानें **'रासेलस'** नांवाचा ग्रंथ करून व त्याचा हक्क विकून त्या द्रव्यानें आपल्या आईचा दिवस केला ! ही गोष्ट तर आधुनिक विद्वानांत प्रसिद्धच आहे. सारांश, उपजीवनाच्या मागें धावणें, हें तर प्रायः सर्वांच्या नशीबीं लागलेंच आहे. तथापि त्यांतले त्यांत चैनींत फारसा वेळ न घालवितां आळस सोडून ' बिंदुसरो ' न्यायानें किंवा **" कणशः क्षणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत् "** या वचनास अनुसरून उद्यमपरता स्वीकारली असतां कालगतीनें मोठमोठीं कार्यें घडून येतात! हें तत्त्व नेहमीं लक्षांत ठेवून उच्चप्रतीच्या उपयुक्त ग्रंथादिकांविषयीं प्रयत्न चालू ठेवले असतां ते सिद्धीस जाणार नाहींत, असें कदापि होणार नाहीं ! असो.

**साहित्य**शास्त्रांत गद्य काव्याचे आख्यायिका व कथा असे दोन भेद सांगितले आहेत.

**गद्यं तु गदितं द्वेधा कथा चाख्यायिकेति च ।**
**कथा कल्पितवृत्तांता सत्यार्थाख्यायिका मता ॥**

अलंकारसंग्रह.

**बाणभट्टा**चे दोन्ही ग्रंथ या दोहोंचीं उदाहरणें होत. त्यानें स्वतः **हर्षचरितास ' आख्यायिका '** म्हटलें आहे. व **कादंबरीस ' कथा '** असेंहि म्हटलें आहे. तें असें:--

**करोम्याख्यायिकाम्भोधौ जिह्वाप्लवनचापलम् ।**

हर्षचरित.

**धिया निबद्धेयमतिद्वयी कथा ।**

कादंबरी.

**अग्निपुराणां**त अनेक विषयांचे निरूपण केलें आहे. त्यांत आख्यायिका आणि कथा यांचीहि लक्षणें सांगितलीं आहेत तीं अशीं:--

“ कर्तृवंशप्रशंसा स्याद्यत्र गद्येन विस्तरात् ।
कन्याहरणसंग्रामविप्रलम्भविपत्तयः ।
भवन्ति यत्र दीप्ताश्च रीतिवृत्तिप्रवृत्तयः ।
[1]उच्छ्वासैश्च परिच्छेदो यत्र सा चूर्णिकोत्तरा ।
[2]वक्त्रं चापरवक्त्रं च यत्र साख्यायिका मता ।
श्लोकैः स्ववंशं संक्षेपात्कविर्यत्र प्रशंसति ।
मुख्यस्यार्थावताराय भवेद्यत्र कथान्तरम् ।
परिच्छेदो न यत्र स्याद्भवेद्वा लम्बकैः क्वचित् !
सा कथा नाम तद्गर्भे निबध्नीयाच्चतुष्पदीम् । ”

अग्निपुराण–अध्याय ३३७–श्लोक. १३–१७.

साहित्यदर्पणांत आख्यायिकेचें व कथेचें पुढें लिहिल्याप्रमाणें लक्षण सांगितलें आहे तें असें:—

“ आख्यायिका कथावत्स्यात्कवेर्वंशानुकीर्तनम् ।
अस्यामन्यकवीनां च वृत्तं गद्यं क्वचित्क्वचित्–
कथांशानां व्यवच्छेद आश्वास इति बध्यते ।
आर्यावक्त्रापवक्त्राणां छन्दसा येन केन चित्
अन्यापदेशेनाश्वासमुखे भाव्यर्थसूचनम् ॥ ”

यथा–हर्षचरितादिः

“ कथायां सरसं वस्तु गद्यैरेव विनिर्मितम्
क्वचिदत्र भवेदार्या क्वचिद्वक्त्रापवक्त्रके
आदौ पद्यैर्नमस्कारः खलादेर्वृत्तकीर्तनम् ॥ ”

यथा–कादम्बर्यादिः

याप्रमाणें बाणकवीचीं दोन्ही काव्यें यथोक्त लक्षणांप्रमाणें आहेत. ह्या आख्यायिकाकाव्यांत हर्षराजाचें चरित ग्रथित केलें असल्यामुळें यास **हर्ष-चरित** ह्मटलें आहे व कथाकाव्यांत गंधर्वकन्या **कादंबरी** ही मुख्य नायिका असल्यामुळें तिचेंच नांव त्यास दिलें आहे. **बाणभट्टाच्या** पूर्वीचीं आख्यायिका-काव्यें प्रायः लुप्तप्राय झालीं असावीं असें वाटतें, व तीं पुढें आणखी झालीं असल्याबद्दलहि अद्यापि आढळण्यांत आलीं नाहींत.

---

१ सर्गादिवत्कथासन्धिरुच्छ्वासः ‍ २ भाविवस्तुसंसूचनाय वाग्विरच्यते तदुक्तम् ।

भोर

बाणभट्टानें पुढें लिहिलेल्या हर्षचरितांतील एका प्रास्ताविक पद्यांत पूर्वीच्या आख्यायिकाकारांस वंदन केलें आहे तें असें:—

उच्छ्वासान्तेप्यखिन्नास्ते येषां वक्त्रे सरस्वती ।
कथमाख्यायिकाकारा न ते वन्द्याः कवीश्वराः ॥

साहित्यशास्त्राचे पूर्वाचार्य भामह[1] यांच्या आख्यायिकालक्षणांपैकीं एक पद्य आढळलें तें असें:—

" वक्त्रं चापरवक्त्रं च काव्ये काव्यार्थशंसिनि ।
सत्यार्थेन सुसंबद्धे तथोच्छ्वासैः परिष्कृते ॥ "

यावरून आख्यायिकाकाव्यें हीं प्राचीन काळीं प्रचारांत होतीं, असें उघड दिसतें.

संस्कृत व्याकरणशास्त्रांतील वार्तिककार कात्यायन[2] यांच्या वार्तिकावरून तर फार प्राचीन काळीं देखील आख्यायिकाकाव्यें होतीं, असें मानण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

" तदधीते तद्वेद " ४।२।५९ ह्या पाणिनीच्या सूत्रावरच्या कात्यायनाच्या वार्तिकांत आख्यायिकेचा निर्देश केलेला आहे तो असा—" आख्यानाख्यायिकेतिहासपुराणेभ्यश्च " या वार्तिकांत आख्यान व आख्यायिका यांचें अर्थग्रहण केलेलें आहे आणि इतिहास व पुराण यांचें स्वरूप ग्रहण केलेलें आहे. बाणभट्टानेंहि कादंबरींत तारापीडराजाच्या वर्णनांत व इतर ठिकाणी " काव्यनाटकाख्यानकाख्यायिकालेख्यव्याख्यानादिक्रियानिपुणैः "—तसेंच " कदाचिदाख्यानकाख्यायिकेतिहासपुराणाकर्णनेन—" असें आख्यायिकेचे पुष्कळ ठिकाणीं निर्देश केलेले आहेत. यावरून बाणकालाच्याच नव्हे, तर कात्यायनाच्या पूर्वींहि आख्यायिकाकाव्यें होतीं. कात्यायनाचा जीवितकाल ह्या कालापूर्वीं अडीच हजार वर्षां-

---

१ भामह याचे ग्रंथ आतां सापडत नाहींत. कांहीं ग्रंथांच्या टीकांत मात्र त्याच्या ग्रंथांतून घेतलेलीं प्रमाणभूत वचनें आढळतात. असें युरोपियनांच्या लेखांत उल्लेख आहेत. परंतु वररुचीच्या सूत्रावर ' प्राकृतप्रकाश ' नांवाची प्राकृत व्याकरणाची वृत्ति आणि दुसरा ' काव्यालंकार ' असे भामहाचे दोन ग्रंथ सांप्रत उपलब्ध आहेत.

२ संस्कृत व्याकरण हें तीन महर्षींनीं केलें आहे. पाणिनीनें मूलसूत्रें केलीं आहेत, त्यांवर कात्यायनानें वार्तिकें करून पूरण केलें आहे, आणि त्यांवर पतंजलीनें महाभाष्य करून पूरण केलें आहे.

म. वं.

च्या सुमारास असावा, असें विद्वज्जनांचें मत आहे. तेव्हां आख्यायिका-काव्याचें प्राचीनत्व उघडच सिद्ध होतें. इतर काव्यांच्या ऐवजीं आख्यायिका-काव्यांचा प्रचार चालू राहता तर ऐतिहासिक गोष्टींत चांगलीच भर पडली असती, परंतु आपल्या दुर्दैवानें तसा योग घडून आला नाहीं, ही अत्यंत खेदाची गोष्ट होय ! आतां इतिहासाचें महत्त्व लक्षांत न आणणाऱ्या इतर संस्कृत कवींकडे पाहिलें असतां **बाणभट्टाच्या** **हर्षचरिताचा** आपणाला मोठाच लाभ झाला आहे यांत कांहीं संशय नाहीं. यासंबंधानें **बाणभट्टाची** योग्यता इतर संस्कृतकवींपेक्षां देखील अधिकच समजली पाहिजे. कथाकाव्य करण्याचा क्रम देखील पुढें फारसा राहिला नाहीं असें दिसतें. पद्यापेक्षां गद्यांत **बाणभट्टाचें** अप्रतिम कवित्व आढळून येतें. असें इतर कोणत्याहि कवीचें गद्यांत दिसून येत नाहीं. **बाणभट्टानें** दोन्ही प्रकारचीं गद्यकाव्यें रचून सर्व गद्यग्रंथकारांवर तान केली, यांत कांहीं संशय नाहीं. **दंडीनेंहि** '**दशकुमारचरित**' नांवाचें कथाकाव्य केलें आहे. परंतु तें **कादंबरीच्या** तोडीचें उतरलें नाहीं. **बाणभट्टानें** याशिवाय पद्यमय काव्यें व नाटकेंहि रचिलीं असल्याबद्दल आधार मिळतो. तेव्हां सर्व संस्कृतकवींत **बाणभट्टाची** योग्यता सर्व प्रकारांनीं अधिकच समजली पाहिजे. खरोखरीच पाहिलें तर **बाणकवीस** वाणी ही अगदींच वश असल्यामुळें तिचे सर्व हृदयंगम विलास त्याच्या कवितेंत सर्वत्र दृष्टीस पडत आहेत व त्यामुळें तिचे ठायीं अत्यंत मनोहरत्व आलें आहे !

**'बाणेन हृदि लग्नेन यन्मंदोपि पदक्रमः**
**प्रायः कविकुरङ्गाणां चापलं तत्र कारणम् ॥'**

**बाणाचा** कवित्वरूपी बाण एकदां हृदयांत शिरल्यानंतर कोणी कविकुरंगानें कविता करणें ह्मणजे व्यर्थ धडपड मात्र होय ! ह्या एका कवीच्या उक्तीप्रमाणें **बाणकवीपुढें** आजपर्यंत असा सरस गद्यकाव्य करणारा कोणी कवि निपजलाच नाहीं, असें ह्मटलें असतां यांत बिलकूल अत्युक्ति नाहीं! **बाणभट्टानें** बदललेला कवितेचा प्रवाह त्याच्यापुढें फारसा अव्याहत चालू न राहतां पुनः पूर्ववळणावरच गेला; ह्मणजे पुनः पद्यमय व गद्यपद्यमय ग्रंथच पूर्वीप्रमाणें चालू राहिले असावे असें ध्यानांत येतें !

**हर्षचरित** हें ऐतिहासिक असल्यामुळें आणि त्यांतील वर्णनें बऱ्याच

---

१ सुप्तिङन्तपदांचा प्रयोग (काव्य रचणें) पक्षीं पावलें टाकणें (पळणें.)

ठिकाणीं व्यवहारास व शौर्यादिरसांस अनुरूप असल्यामुळें त्यांतीलच पुष्कळ उतारे दिले आहेत. **कादंबरीचा** प्रसार पहिल्यापासूनच **हर्षचरितापेक्षां** सर्वत्र फार असल्यामुळें व तींतील उतारे **कै० वि० कृ० चिपळूणकर** यांनीं आपले निबंधांत बरेच दिले असल्यामुळें मीं ते थोडे दिले आहेत. आतां **कादंबरी** हा **बाण**कवीच्या परिपक्वदशेंतला ग्रंथ असल्यामुळें यांत प्रसाद-गुण फारच उत्तम साधला आहे. तथापि **हर्षचरितां**तील उतारे, त्या त्या ठिकाणचे प्रसंग व रस लक्षांत आणले असतां कमी प्रतीचे आहेत, असें मात्र नाहीं ! उलट ऐतिहासिकदृष्ट्या व त्या त्या रसास अनुरूप असल्या-मुळें अधिक महत्त्वाचेच आहेत यांत कांहीं संशय नाहीं !

आतां अशा प्रकारचे ग्रंथ ह्मटले ह्मणजे सहृदय विद्वानांखेरीज इतरांस ते प्रिय वाटणें कठीण तर खरेंच. तथापि हा निबंध बऱ्याच वाचकवर्गास प्रिय व्हावा ह्मणून निबंध लिहिणारानें आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला आहे. यांत त्या त्या प्रसंगास शोभणारीं अशीं सुभाषितें, पूर्वाख्यायिका, आणि **बुद्ध** व **श्रीहर्ष** ( नैषधकर्ता ) यांचीं प्रसंगानें दिलेलीं मध्यें मध्यें बोधप्रद अशी संक्षिप्त चरित्रें, तशींच **हर्षचरितां**तील व **कादंबरीं**तील चित्तवेधक संक्षिप्त कथानकें इत्यादि अनेक प्रकार यांत घातल्यानें हा निबंध सामान्य प्रतीच्या वाचकांचें देखील बरेंच मनोरंजन करील अशी आशा वाटत आहे. आतां सृष्टिकर्त्याच्या ' ज्ञानलवदुर्विदग्ध ' खाणींतलाच कोणी एकादा हिरा असल्यास साक्षात् सरस्वतीची देखील करामत त्याच्यापुढें तुच्छ ठरेल, मग मजसारख्याची तर काय कथा !

आपल्या कवीवर लहानपणींच मातृपितृवियोगाचा मोठा प्रसंग गुजरला होता, तरी न डगमगतां त्यानें ' **विपदि धैर्य** ' या वचनाप्रमाणें धैर्य धरून आपल्या पदरीं असलेल्या बऱ्याच मंडळीवर आपलें वर्चस्व राखलें, चांगला विद्याभ्यास केला, देशाटन केलें, राजेरजवाडे, पंडितजन इत्यादिकांच्या भेटी घेतल्या, आणि ज्ञान व चातुर्य संपादिलें; व शेवटीं राजाधिराज **हर्ष**राजा याची भेट घेऊन, दुर्जनांनीं आपल्या विरुद्ध केलेले प्रयत्न कुंठित केले आणि राजाचा आपल्यावरील रोष नाहींसा करून त्यावर आपली छाप बसवून त्यापासून अपार संपत्ति मिळविली, व त्याचे दरबारीं आपण सर्व पंडितांत मुख्य राहून **हर्ष**राजासहि विद्येचा लाभ करून दिला, इत्यादि गोष्टींचें वर्णन ह्या निबंधांत केलें आहे.

11 JAN 1994


ही बाणकवीची करामत पाहून भगवान् शंकराचार्य यांच्या उक्तीचें येथें स्मरण होतें:-

**दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्‌गुरोर्ज्ञानदातुः**
**स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारम् ।**
**न स्पर्शत्वं, तथापि श्रितचरणयुगे सद्‌गुरुः स्वीयशिष्ये**
**स्वीयं साम्यं विधत्ते, भवति निरुपमस्तेन वालौकिकोऽपि ॥ १ ॥**

शतश्लोकी.

ज्ञान देणाऱ्या गुरूला दृष्टांत देण्यास जगांत कोणतीहि तत्समान वस्तु नाहीं पारिसाचा दृष्टांत द्यावा, तर तो लोखंडाचें सोनें करतो इतकेंच, परंतु स्वस्वरूप [ परीस ] बनवीत ! नाहीं ! ज्ञानरूपी गुरु तर शिष्याला आपल्यासारखा [ ज्ञानी ] बनवितो ! याप्रमाणें विचार करून बाणकवीनें हर्षास आपल्यासारखें विद्वान् व कवि केलें ! 'आपणांसारखे करिती तात्काळ' अशी प्राकृत कवीची उक्तिहि याच अर्थी आहे. आतां हें वेदांतांतील वचन आहे, तथापि तें येथेंहि बरोबर लागू पडलें आहे !

ह्या पृथ्वीच्या पाठीवर पाहूं गेलें असतां हर्षराजासारखा सद्‌गुणमंडित राजा क्वचितच आढळेल. यूरोपखंडांतील सीझर, नेपोलियन इत्यादि तद्देशीय शूर राजांनीं युद्धसंबंधीं कांहीं टिप्पणें करून ठेवलीं आहेत. तर तिकडील लोक त्यांची किती तरी महती वर्णन करतात ! हर्षराजावर तर हिंमत खचविणारे मोठमोठे दुःखकारक दुर्धर प्रसंग गुजरले असतां आपल्या कविवर्याप्रमाणें आपलें धैर्य खचूं न देतां त्यानें महान् पराक्रम करून आपल्या शत्रूंचा पराभव केला, राज्याचा विस्तार केला, बाणकवीसारख्या विद्वानांच्या सहवासानें चांगलीच विद्या संपादून ग्रंथ केले व राज्योपभोगांत किंवा विषयसुखांतच गर्क न राहतां कर्णासारखें दोन्ही प्रकारचें शौर्य दाखवून दिवाकरमित्रासारख्या सत्पुरुषांच्या समागमानें परलोक जिंकण्याचेंहि साधन केलें !

याशिवाय ह्या निबंधांत ध्यानांत ठेवण्यासारख्या आणखीहि गोष्टी आहेत. हर्षाचा बांधव कृष्णराज याचें निरपेक्ष परोपकारकर्तृत्वाचें वर्णन फारच प्रशंसनीय आहे. यामुळें-

**" अपेक्षन्ते नच स्नेहं न पात्रं न दशान्तरम्**
**सदा परोपकाराय रत्नदीपाइवोत्तमाः ॥ "**

या कवीच्या उक्तीचें स्मरण होऊन कृष्णराय हा उत्तम सज्जनांच्या कोटी-

तला असल्याची खात्री होते. राज्यवर्धनाच्या चरित्रावरून नेहमीं सावध राहणेंच उचित आहे. तसेंच ' विद्वान् सर्वत्र पूज्यते ' याचें उदाहरण, प्रकृत ग्रंथांत बाणकवि तर आहेच; परंतु याचें आणाखिहि प्रसंगानें दिलेले ढळढळीत उदाहरण नैषधकर्ता श्रीहर्ष याचें फारच ठसण्यासारखें आहे. " चित्ते वचि क्रियायांच महतामेकरूपता " याचें मूर्तिमंत उदाहरण सत्पुरुष दिवाकरमित्र याच्या व हर्षाच्या आचरणांत आढळून येण्यासारखें आहे. "उदारचरितांनां तु वसुधैव कुटुंबकम्" अशी समवृत्ति, सत्यनिष्ठा, उपरति आणि अत्यंत दृढनिश्चय हीं बुद्धाचे चरितांत असल्यामुळें तो ' नरका नारयण ' झालेला आहे ! इत्यादि अनेक बोधप्रद गोष्टीहि यांत आढळून येण्यासारख्या आहेत.

ह्या निबंधाच्या वाचनानें जर वाचकांच्या मनांत ह्या कवीविषयीं अधिक आस्था उत्पन्न होऊन त्याचे ग्रंथ वाचण्याची अधिक प्रवृत्ति होईल आणि त्याच्या दुर्लभ ग्रंथांच्या शोधाचे प्रयत्न झटून सुरूं राहतील व अशा प्रकारचे अन्य कवींविषयीं निबंध लिहिण्याची देशबांधवांच्या मनांत स्फूर्ति उद्भवून तसे यत्न चालू राहातील तर हा निबंध लिहिण्याची चांगलीच सार्थकता झाली, असें हा निबंध लिहिणारा समजेल !

प्रस्तावनेच्या आरंभीं नामनिर्देश केलेल्या विद्वज्जनांनीं आपला अमोलिक वेळ खर्चून हा निबंध वाचण्याची व कांहीं ठिकाणीं योग्य सूचना करण्याची तसदी घेतली याबद्दल ग्रंथकार त्यांचा फार आभारी आहे; त्यांतहि डॉ० भांडारकर व त्यांचे चिरंजीव देवदत्त रामकृष्ण भांडारकर एम्. ए. यांनीं या संबंधाचीं अनेक पुस्तकें देण्याची व पुष्कळ प्रसंगीं वाटघाट करण्यांत आपला बहुमूल्य काळ खर्च करून साहाय्य करण्याची कृपा केली, याबद्दल ग्रंथकार त्यांचा फारच ऋणी आहे.

तसेंच रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर—मराठा पत्राचे एडिटर यांनीं हा निबंध वाचून पाहून ग्रंथकारास उत्तेजन देण्याच्या कामांत तसदी घेतली, याबद्दल ग्रंथकार त्यांचाहि आभारी आहे.

पुणें, पेठ शनिवार.
मि. फा. शु. ९ श. १८२६ } पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

[stamp]

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति काढिली त्यावेळीं अशा प्रकारचें हें पुस्तक वरच्या प्रतीच्या विद्वानाखरीज कोणी फारसें वाचणार नाहीं, तेव्हां हें खपण्यास बराच काळ पाहिजे व हें बहुतकरून एकजन्मीच पुस्तक होय, असें कित्येकांनीं भाकीत केलें होतें, परंतु ईश्वरकृपेनें तें खोटें ठरून प्रथमावृत्तीच्या सर्व ( १००० ) प्रती वर्षा दीडवर्षांतच संपल्या व त्या प्रायः हिंदुस्थानांतील सर्व भागांतून खपल्या. यावरून अशा प्रकारच्या विषयाकडेहि लोकांची अभिरुचि लागत चालली आहे असें दिसून येतें. हें खरोखरीच स्वभाषेच्या अभ्युदयाचें सुचिन्हच समजलें पाहिजे. या पुस्तकाच्या संबंधानें प्रमुख वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांनीं अग्रलेख लिहून चांगले अभिप्राय दिले आहेत व अनेक ठिकाणच्या मार्मिक विद्वज्जनांचेहि उत्तेजनपर अनुकूल अभिप्राय आले असल्यामुळें दुसरी आवृत्ति सुधारण्यास उमेद येऊन या पुस्तकांत ठिकठिकाणीं सुधारणा करून दुसऱ्या आवृत्तीकरितां पुस्तक तयार केलें. प्रथमावृत्तींत प्रतिपादित विषयांच्या समर्थनार्थ आणखीहि अधिक प्रमाणें ह्या आवृत्तींत दिलीं आहेत. यांतील विषयासंबंधानें अनेक यूरोपियन पंडिताच्या प्रसिद्ध झालेल्या लेखांबद्दल यांत साधकबाधक प्रमाणें देऊन यथामति विवेचन केलें आहे.

या आवृत्तींत आणखी बरीच माहिती सामील केली आहे. बाणकवीच्या बरोबरची मंडळी व त्याजकडे कोणतीं कोणतीं कामें सोंपविलेलीं होतीं ह्याचें वर्णन, बाणाच्या येथें वायुपुराणकथनाच्या प्रसंगानें पुराण विषयाचें विवेचन, बौद्धधर्मी अशोकराजा याचें संक्षिप्त चारित्र, बाणाच्या वेळचे, त्याच्या अगोदरचे व नंतरचे कांहीं कवि आणि त्यांचे ग्रंथ, बाणपुत्राच्या नावाचा शोध, पार्वतीपरिणयासंबंधानें अधिक विवेचन; बाण व वामनबाण; कै. वि. कृ. चिपळूणकर व पंडित कृष्णमाचार्य; बाणाचे वंशजांस देवताप्रसाद; भंडीच्या संबंधानें बाण व हुएनसँग यांच्या वर्णनांत विरोध; राज्यवर्धनानें हूणावर स्वारी केली असतां मागें हर्षाला राज्यावर बसविणाच्या खटपटीसंबंधानें बाण व हुएनसँग, स्मिथ इत्या-

पुस्तकें जपून वापरा

दिकांच्या वर्णनांत विरोध; हर्षाच्या वयासंबंधानें बाण व डॉ. हाल, स्मिथ, यांच्यांत फरक; बाणाच्या ग्रंथांतील चटकदार वाक्यांचे मासले; बाणाच्या ग्रंथावरून त्या वेळच्या रीतीभातीची वगैरे माहिती; इत्यादि प्रकरणें अधिक घातलीं असल्याचें आढळून येईल.

सर्वत्र प्रमाणभूत मानलेल्या पुणें प्रांतींच्या मराठी भाषेंतील शब्दोच्चारांत येत नसलेले अनुस्वार शब्दांवर लादण्याचें मीं बरेंच टाळलें आहे. तसेंच मराठींत येणारे संस्कृत शब्द मूळचे ह्रस्वांत आहेत कां दीर्घांत आहेत याबद्दल संस्कृतानभिज्ञ लोकांस शंका येऊं नये ह्मणून मीं ते जसेचे तसेच ठेवले आहेत. मराठींत येणारें "हि" हें मूळचें संस्कृतांतीलच अव्यय मराठींत आलें असावें अशा समजुतीनें मीं तें ह्रस्वच ठेवलें आहे. "त्यांनां" वगैरे चतुर्थीच्या अनेक वचनाच्या रूपांत "ना" हा प्रत्यय संस्कृत षष्ठीचे अनेक वचनी "नाम्" या प्रत्ययापासूनच आला आहे, असें माझें मत असल्यामुळें मीं "ना" वरचा मूळचा अनुस्वार कायम ठेवला आहे. इत्यादि कारणांनीं लेखन–पद्धतींत कांहीं ठिकाणीं मतभेद आढळून येण्यासारखा आहे.

लक्ष्मीप्राप्तीकरितां हें पुस्तक एखादा महाराज, संस्थानिक, किंवा लक्ष्मीपुत्र यांपैकीं कोणास प्रथमच अर्पण केलें असतें तर चांगला फायदा झाला असता, असें बऱ्याच लोकांच्या ह्मणण्यांत आलें, परंतु तसें न करितां मीं हें पुस्तक सरस्वतीप्रिय पुत्रासच अर्पण केलें आहे !

शेवटीं हिंदएजन्सी यांनीं येथून पुढें सर्व आवृत्तीचे हक्क आपले शिरावर घेतले असल्यामुळें आह्मास पुस्तकें छापण्याच्या कामांतून मोकळें केलें याबद्दल ग्रंथकार त्यांचा फार अभारी आहे.

प्रकृति नीट नसल्यामुळें या ग्रंथाचीं प्रुफें जितक्या दक्षतेनें तपासावयास पाहिजे होतीं तशीं तपासून झालीं नाहींत व दोषस्थलें राहिलीं याबद्दल सहृदय वाचक रागावणार नाहींत अशी आशा आहे. नजरेस आलेल्या ठळक चुका शेवटीं दिलेल्या शुद्धिपत्रांत दुरुस्त केल्या आहेत, त्याप्रमाणें दुरुस्त करून मग हा ग्रंथ वाचावा अशी सप्रेम सूचना आहे.

पुणें पेठ शनिवार
मि. का. शु. ९ श. १८३२. } पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

श्रीमंत लो. मं. वं. वाचनालय, मो

15 MAY 200



**वे. शा. सं. रा. रा. पांडुरंगशास्त्री पारखी.**

चित्रशाळा, पुणें.

21 MAR 1990

11 JAN 1991 श्रीमंत लो. शं. वं. बापनाईकर, बडोदे

# बाणभट्ट.

" प्रागल्भ्यमधिकमाप्तुं वाणी बाणो बभूवेति ! "[1]

गोवर्धन.

## बाणाचे पूर्वजादिक, त्यास झालेला पितृवियोग व त्याचें वसतिस्थान.

बाणकवि हा **भार्गव**वंशांत[2] उत्पन्न झाला. याच परमपूज्य वंशांत **च्यवन**, **दधीच**, **सारस्वत** इत्यादि तपोधन उत्पन्न झाले. साक्षात् **सरस्वतीपासून सारस्वत** हा झाला, असें **हर्षचरितांत** म्हटलें आहे. **सारस्वताचा** चुलतबंधु **वत्स** यापासून अविच्छिन्न संतति चालत आल्यामुळें या वंशास '**वात्स्यायन**' असें नांव पडलें. ह्या वंशांत बरेच महर्षि व विद्वान् उत्पन्न झाले. **बाणाचा** निपणजा **कुबेर**.[3]

---

१ अधिक प्रौढता येण्याकरितां वाणी ( सरस्वती ) बाणरूपानें झाली ! सरस्वती स्त्री असल्यामुळें तिच्यांत प्रौढता नव्हती, ती येण्याकरितां ती बाण ( पुरुष ) रूपानें उत्पन्न झाली ! ( संस्कृतांत अर्थचमत्काराकरितां ब आणि व एकच मानतात. )

२ महाभारतांत पुढीलप्रमाणें मूळचीं चारच गोत्रें सांगितलीं आहेत.

' मूलगोत्राणि चत्वारि समुत्पन्नानि भारत ।
अंगिराः कश्यपश्चैव वसिष्ठो भृगुरेवच । '

शांतिपर्व, अध्याय २९६, श्लोक १७.

३ बाणाचे पूर्वज, त्यास झालेला पितृवियोग, व त्याचें बालपणाचें स्वच्छन्दाचरण इत्यादिविषयीं हर्षचरितांत असलेला आधारः—

'एवमतिक्रामति काले प्रसवपरम्पराभिरनवरतमापतति विकाशिनि वात्स्यायनकुले, क्रमेण कुबेरनामा वैनतेय इव गुरुपक्षपाती द्विजो जन्म लेभे । तस्याभवन्नच्युतः ईशानो हरः पाशुपतश्चेति चत्वारो युगारम्भा इव ब्रह्मतेजोजन्यमानप्रजाविस्तारा नारायणबाहुदण्डा इव सच्चक्रनन्दकास्तनयाः । तत्र पाशुपतस्यैक एवाभवद्भूभार इवाचलकुलस्थितिश्चतुरुदधिगम्भीरोऽर्थपतिरिति नाम्ना समग्राग्रयजन्मचक्रचूडामणिर्महात्मा सूनुः । सोऽजनयद्भृगुं हंसं शुचिं कविं महीदत्तं धर्मं जातवेदसं चित्रभानुं त्र्यक्षमहिदत्तं विश्वरूपं चेत्येकादश रुद्रानिव सोमामृतरसशीकरच्छुरितमुखान्पवित्रान्पुत्रा-

( पुढें चालू )

याला **अच्युत**, **ईशान**, **हर** आणि **पाशुपत** असे चार पुत्र झाले. यांपैकीं **पाशुपत** हा **बाणाचा** पणजा. याचा पुत्र **अर्थपति**. याला **भृगु**, **हंस**, **शुचि**, **कवि**, **महीदत्त**, **धर्म**, **जातवेदस्**, **चित्रभानु**, **त्र्यक्ष**, **अहिदत्त**, आणि **विश्वरूप** असे अकरा पुत्र झाले. **बाणाचे** हे सर्व पूर्वज व चुलतबंधु यज्ञयागादि कर्मे करणारे मोठे कर्मठ, सर्व शास्त्रांचीं तत्त्वें जाणणारे, महाज्ञाते, निर्वैर व शांत असल्याबद्दल त्यानें बऱ्याच ठिकाणीं उल्लेख केला आहे. **चित्रभानूस बाण** हा पुत्र झाला. **बाणाच्या** आईचें नांव **राज्यदेवी** असें होतें. **बाणास गणपति**, **अधिपति**, **तारापति** व **श्यामल** असे चार चुलतबंधु होते. आणखी त्यास **चंद्रसेन** व **मातृषेण** असे पारशव (दासीपुत्र) बंधु होते. **बाणाची** आई तो अगदीं लहान असतांच वारली! तेव्हां त्याचे बापास आईप्रमाणें आपल्या मुलाचें संगोपन करावें लागलें. **बाणाचें** उपनयन व वेदाध्ययन झाल्यावर त्याचे वयाचे चवदावे वर्षीं त्याचा बापहि मरण पावला! तेव्हां त्यास फारच दुःख झालें व त्यामुळें त्याचें हृदय अगदीं जळत राहिलें! पितृमरणाचें दुःख त्यानें **कादं-**

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू ]

न् । अलभतच चित्रभानुस्तेषां मध्ये राजदेव्यभिधानायां ब्राह्मण्यां बाणमात्मजम् । स बाल एव विधेर्बलवतो वशादुपसंपन्नया व्ययुज्यत जनन्या । जातस्नेहस्तु नितरां पितैवास्य मातृतामकरोत् । अवर्धत च तेनाधिकतरमेधीयमानधृतिर्धाम्नि निजे ।

कृतोपनयनादिक्रियाकलापस्य समावृत्तस्य चतुर्दशवर्षदेशीयस्य पितापि श्रुतिस्मृतिविहितं कृत्वा द्विजजनोचितं निखिलं पुण्यजातं कालेनादशमीस्थ एवास्तमगात् । संस्थिते च पितरि महता शोकेनाभीलमनुप्राप्तो दिवानिशं दह्यमानहृदयः कथंकथमपि कतिपयान्दिवसानात्मगृह एवानैषीत् । गते च विरलतां शोके शनैःशनैरविनयनिदानतया स्वातन्त्र्यस्य, कुतूहलबहुलतया च बालभावस्य, धैर्यप्रतिपक्षतया च यौवनारम्भस्य, शैशवोचितान्यनेकानि चापलान्याचरन्नित्वरो बभूव ।'

१ कादंबरींत पाशुपत या नांवाचा मुदलींच उल्लेख नाहीं! त्यामुळें कुबेराचा पुत्र अर्थपति असा भलताच अर्थाचा अनर्थ होतो. तेव्हां यासंबंधाचें पद्य तेथें चुकून राहिलें असावें. संस्कृतगुरूंच्या [प्रोफेसरांच्या] हातून कादंबरीच्या इतक्या आवृत्ति निघाल्या असून अशी चूक कशी राहिली तें समजत नाहीं!

२ 'पितृव्यपुत्राः' असा सामान्य निर्देश आहे.

३ 'स बाल एव विधेर्बलवतो वशादुपसंपन्नया व्ययुज्यत जनन्या । जातस्नेहस्तु नितरां पितैवास्य मातृतामकरोत् ।'

४ 'संस्थितेच पितरि महता शोकेनाभीलमनुप्राप्तो दिवानिशं दह्यमानहृदयः कथंकथमपि कतिपयान् दिवसानात्मगृह एवानैषीत् ।'

बरींत शुकशावकाच्या मुखानेंहि फारच हृदयद्रावक वर्णिलें आहे. **बाणाच** गुरु **भर्वु** या नांवाचा असावा. कारण, त्यानें त्याला **कादंबरी**च्या आरंभीं नेमन केलें आहे. **शोण**नदीच्या पश्चिमेस **प्रीतिकूट** या नांवाच्या गांवीं **बाणाचें** रहाणें असे. या स्थानास **ब्राह्मणाधिवास** असेंहि म्हटलें आहे. त्या वेळच्या राजेरजवाड्यांकडून **बाणा**च्या पूर्वजांचा मोठा सन्मान राहून त्यांस बरेंच वैभव प्राप्त झालें होतें. ब्राह्मणाला पाहिजे तितकें पूर्वजार्जित द्रव्य असतां व घरीं एकसारखी विद्या शिकण्याची सोय असतां **बाण** हा विद्या संपादण्याच्या निमित्तानें समवयस्क व समानशील मंडळीबरोबर **देशाटन** करावयास निघाला. प्रवासांत त्याजबरोबर एखाद्या संस्थानिकाप्रमाणें बरीच मंडळी होती. यावरून "**विद्वान् दरिद्रो यतः**" या साधारण नियमास **बाण** हा अपवाद आढळला, असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

## बाणाचें स्वच्छंदाचरण त्या बरोबरची मंडळी व वर्तनांत सुधारणा.

**बाण** हा पूर्ववयांत स्वतंत्र झाला असल्यामुळें चैनीनें देश पाहत हिंडावें, असें वाटून तो आपल्या आप्तमित्रांबरोबर देशाटन करावयास निघाला. त्यानें आपल्याबरोबर आपल्या बरोबरीच्या मंडळींचीं नांवें **हर्षचरितांत** दिलीं आहेत.

प्रवासांत त्याजबरोबर त्याचे बंधु-**चंद्रसेन** व **मातृषेण** हे होते. देशीभाषेंत कवित्व करणारा परममित्र-**ईशान** नांवाचा कवि, त्याचे परम स्नेही-**रुद्र**

---

१ भर्वूच्या जागीं 'भर्चु' 'भच्चु' असेंहि पाठांतर आहे. कादंबरीवरच्या तीनचार टीकाकारांनीं 'भर्वु' किंवा 'भर्चु' या नांवाचा बाणाचा गुरु होता असेंच प्रतिपादिलें आहे. भर्वूच्या किंवा भर्चूच्या नांवावर थोडींशीं पद्यें आढळतात, त्यांतील एक मासल्याकरितां पुढें दिलें आहे.

> 'कामं प्रियानपि प्राणान् विमुंचन्ति मनस्विनः ।
> इच्छन्ति नत्वमित्रेभ्यो महतीमपि सत्क्रियाम् ' ॥

२ " वेदांती ग्रंथकार प्रथम आपल्या गुरूस नमस्कार करितात तसा कवींचा संप्रदाय नाहीं" असा येथें एक आक्षेप एकानें घेतला होता, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. "लौकिकं वैदिकं वापि तथाध्यात्मिकमेव च।आददीत यतो ज्ञानं तं पूर्वमभिवादयेत्॥" ज्याच्यापासून कोणतेंहि ज्ञान प्राप्त होतें त्याला अगोदर नमस्कार करावा. असा मनूनें जर स्मृतींत नियम करून ठेवला आहे तर वरच्या आक्षेपांत काय अर्थ आहे? गुरूस वंदन करणें हें विहितच आहे. असेच त्याचे दुसरेहि आक्षेप होते. त्यास सविस्तर उत्तर केसरी. ता. ३ व १० एप्रील १९०६त दिलें आहे.

11 JAN 1996

आणि **नारायण**, पंडित-**वारबाण** व **वासबाण** अक्षरकवि-(प्रास जुळविणारा?) **वेणीभारत**, प्राकृतांत काव्य करणारा-**वायुविकार**, भाट-**अनंगबाण** व **सूचिबाण**, जोगीण-**चक्रवाकिका**, विषवैद्य-**मयूरक**, तांबूल देणारा-**चंडक**, वैद्यपुत्र-**मंदारक**, पौराणिक-**सुदृष्टि**, सोनार-**चामीकर**, जवाहिऱ्या-**सिंधुषेण**, लेखक-**गोविंदक**, चितारी-**वीरवर्मा**, मातीचीं चित्रें करणारा-**कुमारदत्त**, पखवाजी-**जीमूत**, गवई-**सोमिल** व **ग्रहादित्य**, शिल्पकर्म करणारी-**कुरंगिका**, पावा वाजविणारे-**मधुकर** व **पारावत**, गाण्याचे वस्तादजी-**दर्दुरक**, हातपाय रगडणारी-**केरलिका**, नृत्य करणारा-**तांडविक**, द्यूत खेळणारा-**आखंडल**, धूर्त-**भीमक**, नट-**शिखंडक**, नृत्य करणारी-**हरिणिका**, बौद्धभिक्षु-**सुमति**, श्रमण-**वीरदेव**, गोष्टी सांगणारा-**जयसेन**, शैव-**वक्रघोण**, मंत्रसाधन करणारा-**कराल**, पातालमार्ग शोधणारा-**लोहिताक्ष**, धातुवाद ( किमया? ) जाणणारा-**विहंगम**, वाद्यभांड करणारा कुंभार-**दामोदर**, इंद्रजाल दाखविणारा गारोडी-**चकोराक्ष** आणि संन्यासी-**ताम्रचूड**. ह्या व आणखी दुसऱ्या मंडळीसह तो कौतुकानें देश पाहाण्यास व फिरण्यास निघाला.

तो ह्या मंडळीच्या संगतीनें चालत असल्यामुळें प्रथम मोठमोठ्यांच्या उपहासास पात्र झाला. तथापि पुढें लवकरच आपल्या पूर्वजांची विद्वत्ता व मान्यता हीं त्याच्या लक्षांत येऊन त्याच्या मनाचा कल बदलला व तो अनेक विद्वान् गुरूंच्या सेवेनें विद्या संपादून व मोठमोठ्या राजदरबारीं जाऊन परत घरीं आला. तेव्हां त्याच्या आप्तमित्रांनीं त्याचा मोठा आदरसत्कार केला. मग तो बालपणच्या मित्रमंडळींत परमानंदानें राहिला. त्या कालच्या आनंदास त्यानें मोक्षसुखच म्हटलें आहे![१] बालपणांतील मित्रमंडळीच्या सहवाससुखास बाणकवीनें मोक्षसुखाची उपमा दिली आहे ती किती यथार्थ आहे!

## हर्षाचा बंधु सज्जनकृष्णराज व त्याचें बाणकवीविषयीं प्रेम व निरोप वगैरे.

बाणाचें राहणें हर्षराजाच्या राज्यांतच होतें. कांहीं दुर्जनांनीं[२] अधिक उणें

१ ' ससंस्तवप्रकटितज्ञातेयैराप्तैरुत्सवादिवस इवानंदिताभ्यागमनो बालमित्रमण्डलस्य मध्यगतो मोक्षसुखमिवान्वभवत् । ' ह. च, उ. १

२ दुर्जनाच्या संबंधानें कादंबरीच्या आरंभीं बाणानें याप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

' अकारणाविष्कृतवैरदारुणादसज्जनात्कस्य भयं न जायते ।
विषं महाहेरिव यस्य दुर्वचः सुदुःसहं संनिहितं सदा मुखे ॥ '

श्रीमंत प्रो. मं. बं. पाधनाकर, मां.


व खोटेंनाटें सांगून हर्षराजाचे मनांत बाणकवीविषयीं वाईट ग्रह उत्पन्न केला होता, परंतु हर्षाचा बंधु कृष्णराजे हा सज्जन व विद्वान् यांच्या पक्षाचा असल्यामुळें त्यानें बाणकवीविषयीं हर्षराजाच्या मनांत विघ्नसंतोषी लोकांनीं भरविलेला दुर्ग्रह काढून टाकला! ठीकच आहे, कृष्णराजासारखे परोपकारी व चतुर पुरुष असतात, ते थोरांजवळ समयोचित बोलून कार्य साधून घेतात! " **कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति।** " यथाकालीं स्वामीजवळ विनंति केली असतां ती सिद्धीस जाते! ही कविकुलगुरूची उक्ति किती यथार्थ आहे! असो, कृष्णराजानें बाणास हर्षराजाचे भेटीस येण्याविषयीं जासुदाबरोबर पत्र पाठवून मोठ्या आगत्यानें बोलाविलें.

उन्हाळ्यांत[2] एके दिवशीं बाण भोजन करून दुपारीं आपल्या घरीं बसला असतां बणाचा चंद्रसेन नावाचा बंधु घाईघाईनें येऊन ह्मणाला, ' राजाधिराज हर्षराजाचा बंधु कृष्णराज याजकडून दूत आला आहे. ' तेव्हां 'त्याला लवकर घेऊन ये' असें बाणानें सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें त्याला आणून बाणास भेटविलें. तेव्हां त्यानें नमन करून बाणास एक पत्र दिलें. त्यांत ' मेखलक तोंडीं सांगतां सर्व कळून येईल. आपण कालक्षेप न करतां लवकर निघून यावें. ' असें होतें. मग मेखलकानें कृष्णराजाचा निरोप जो सांगावयाचा तोहि त्यास सांगितला. त्यांत त्याची बाणकवीविषयीं फारच कळकळ दिसून आली! तो ह्मणाला, ' एक गोत्र, एक जात, एकत्र वाढणें, एकत्र सहवास, वारंवार भेटणें, एकमेकावर प्रेम करणें, उपकार करणें, समानशील असणें, इत्यादि गोष्टी स्नेह होण्यास कारण होतात; परंतु जवळ असलेल्या बंधूप्रमाणें तुमच्यावर कारणावांचून मला प्रेम करावेंसें वाटतें! दुर्जनांनीं तुमच्या लहानपणाच्या स्वच्छंद वर्तनाबद्दल महाराजांच्या मनांत भलतेंच भरवून त्यांचें मन कलुषित केलें होतें, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

---

१ हा सावत्र किंवा चुलतबंधु असावा.

२ "तथाभूते च तस्मिन्नत्युग्रे ग्रीष्मसमये कदाचिदस्य स्वगृहावस्थितस्य भुक्तवतोऽपराह्णसमये भ्राता पारशवश्चन्द्रसेननामा प्रविश्याकथयत्।'एष खलु देवस्य चतुः समुद्राधिपतेः सकलराजचक्रचूडामणिश्रेणीशाणकोणकषणनिर्मलीकृतचरणनखमणेः सर्वचक्रवर्तिनां धौरेयस्य महाराजाधिराजपरमेश्वरश्रीहर्षदेवस्य भ्रात्रा कृष्णनाम्ना भवतामन्तिकं प्रज्ञाततमो दीर्घाध्वगः प्रहितो द्वारमध्यास्त ' इति। सोऽब्रवीत्–' आयुष्मन्, अविलंबितं प्रवेशयैनम्' इति। "

ज्याला शत्रु व मित्र नाहींत, असा जगांत कोण आहे? महाराजाकडे तरी याचा काय बोल आहे? आम्हीं या गोष्टींची पक्की चौकशी केली व तुमच्यां-साठीं राजाधिराजाजवळ विनंति करून त्यांच्या मनांतला किंतू काढून टाक-ला. पूर्ववयांत सर्वांकडून कांहीं प्रमाद घडतात, ही गोष्ट महाराजांसहि मान्य आहे, तर आतां कालक्षेप न करतां राजदर्शनास येण्याचें करावें. राजाधि-राजाचें दर्शन न घेतां निष्फल ( वांझ ) वृक्षाप्रमाणें आपल्या घरीं बंधुजनांत व्यर्थ काल घालविणें मला प्रशस्त वाटत नाहीं. परवशतेबद्दल किंवा राजाधि-राजाजवळ गेलों असतां कसें होईल? याबद्दल काळजी बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. राजसेवा कठिन तर खरीच.कारण,'**राजसेवा मनुष्याणामसि-धारावलेहनम् । पञ्चाननपरिष्वंगो व्यालीवदनचुम्बनम् ।**' असें राजसेवा कठिन असल्याचें वर्णन आहे खरें! तथापि ते राजे निराळे! ह्या राजाची सर कोणाला येणार आहे? पदरीं पुष्कळ पुण्य असल्याखेरीज ह्या राजाचा सौख्यकारक आश्रय कोणाला मिळणार आहे?[१]

पत्र घेऊन आलेल्या दूतास बाणानें '**भद्रमशेषभुवननिष्कारणबंधो-स्तत्रभवतः कृष्णस्य**' असें म्हणून निष्कारणबंधु कृष्णराजाचें कुशल विचारलें आहे व त्या सज्जनांस उद्देशूनचः—

" **अतिगंभीरे भूपे कूप इव जनस्य निरवतारस्य ।**
**दधति समीहितसिद्धिं गुणवन्तः पार्थिवा घटकाः ॥** "
" **रागिणि नलिने लक्ष्मीं दिवसो निदधाति दिनकरप्रभवाम् ।**
**अनपेक्षितगुणदोषः परोपकारः सतां व्यसनम् ॥** "

'ज्याच्यांत उतरण्यास पायऱ्या नाहींत अशा खोल व गंभीर कूपांत मनुष्याला उदक प्राप्त करून देण्यास गुण ( दोरी ) लावलेले घट जसे साधक आहेत; तसे थोर राजापर्यंत जाऊन पोहोंचण्यास ज्यांना मार्ग नाहीं, अशा लोकांचें इच्छित कार्य गुणवान् राजपुरुष हे घडवून आणतात!'

'जसा दिवस सूर्योदयानें प्रकट झालेली लक्ष्मी कमलाचें ठायीं अर्पण करतो, त्याप्रमाणें गुणदोषांकडे लक्ष न देतां परोपकार करणें सज्जनाचें

---

१ " नास्याल्पपुण्यैरवाप्येत सर्वातिशायिसुखरसप्रसूतिः पादपल्लवच्छाया "

२ सज्जनाच्या संबंधानें ' प्रायेणाकारणमित्राण्यतिकरुणार्द्राणिच सदा खलु भवन्ति सतां चेतांसि! ' असें कादंबरींतहि बाणानें हारित ऋषीच्या संबंधानें शुकशावकाच्या मुखांत घातलें आहे.

व्यसन होय.' असे उद्गार त्यानें काढले आहेत ते अगदीं यथार्थ आहेत. यापूर्वीं हर्षराजाचे दरबारीं बाणाचें येणें जाणें नव्हतें, व त्याच्या पूर्वजांचेंहि नव्हतें. तेथें त्याचा कोणाशीं परिचयहि नव्हता. ह्या वर्णनांत त्या ठिकाणीं विद्येचें फारसें कौतुकहि नाहीं! असेंहि बाणानें ह्मटलें आहे. यामुळें बाणास प्रथमतः हर्षराजाकडे जाण्यास मोठी काळजी वाटली होती. तथापि '**फलप्रतिबंधी धीमद्भिरपहरणीयः कालातिपातः**' 'व्यर्थ काल घालविणें ठीक नाहीं' या **कृष्णराजाच्या** लेखावर भिस्त देऊन व **श्रीशंकरावर** भरवसा ठेवून त्यानें जाण्याचा निश्चय केला.

## बाणाचें हर्षराजाकडे प्रयाण, त्याची कसोटी, हर्षाचें गुणग्राहित्व व बाणाची हर्षावर छाप.

हर्षराजाकडे निघण्याच्या दिवशीं **बाणानें** प्रातःस्नान व संध्यादि कर्में केल्यावर प्रथम **शंकराचें** दुग्धाभिषेकपूर्वक पूजन केलें. नंतर होमहवन करून ब्राह्मणांनां दानधर्म केला व गाईला प्रदक्षणा केली. त्याची आत **मालती** इनें त्याचें प्रस्थानमंगल केलें. त्यानें तिला व गुरुजनांना नमस्कार केले. त्यांनींहि त्याला शुभाशीर्वाद दिले. मग तो **प्रीतिकूट** गांवाहून निघून व **चंडिकवन** उल्लंघून **मल्लकूट** ह्या गांवीं गेला. तेथें त्याचा आप्त **जगत्पति** यानें **बाणाचें** चांगलें आदरातिथ्य केलें. दुसरे दिवशीं **भागीरथी** उतरून तो **यष्टिग्रहक** नांवाच्या गांवीं रात्रीं राहिला व दुसरे दिवशीं जवळच **हर्षराजाची** छावणी होती तेथें तो गेला.

त्या ठिकाणीं विश्रांति घेतल्यावर प्रहरदिवस राहिला तेव्हां तो **मेखलका**-बरोबर **हर्षराजास** भेटण्याकरितां निघाला. वाटेनें मांडलिक राजांचीं शिबिरें व बाहेरून आंत व आंतून बाहेर येणारे जाणारे हजारों हत्ती, घोडे व उंट इत्यादिकांची मौज, पहात तो चालला असतां राजाच्या छावणींत असंख्य

---

१ 'किं करोमि । अन्यथा संभावितोऽस्मि राज्ञा । निर्निमित्तबन्धुना च संदिष्टमेवं कृष्णेन । न च तत्र मे पूर्वजप्रवर्तिता प्रीतिः । न राजवल्लभपरिचयः । न विद्यातिशयकुतूहलम् । अवश्यं गंतव्यं । सर्वथा भगवान्पुरारातिर्भुवनगुरुर्गतस्य मे सर्वं सांप्रतमाचरिष्यति ' इत्यवधार्य गमनाय मतिमकरोत् ।

२ 'अभवच्चास्य जातविस्मयस्य मनसि कथमिवेदमियत्प्रमाणं प्राणिजातं जनयतां प्रजासृजां नासीन्महाभूतानां वा परिक्षयः, परमाणूनां वा परिच्छेदः कालस्य वान्तः आयुषो वा व्युपरमः आकृतीनां वा परिसमाप्तिः' इति ।

प्राणी दृष्टीस पडल्यावर **बाणास** आश्चर्य वाटून त्याच्या मनांत आलें कीं, सृष्टिकर्त्यानें इतके प्राणी निर्माण केले असतां पंचमहाभूतांचा क्षय, परमाणूंचा अभाव, कालाचा शेवट, आयुष्याचा नाश आणि आकारांचा अंत कसा झाला नाहीं?

मग **बाणा**बरोबर असलेला **मेखलक**[१] तेथील पाहरेकऱ्यांनीं ओळखिला. तेव्हां तो **बाणास** म्हणाला. आपण येथेंच थांबावें, मीं आंत वरदी देऊन येतों. असें म्हणून तो गेला व कांहीं वेळानें मुख्य चोपदारास बरोबर घेऊन आला, आणि म्हणाला; ‘हा राजाधिराजाचा मुख्य चोपदार आहे. याचें नांव **पारियात्र**.’[२] तितक्यांत तो **बाणास** मुजरा करून म्हणाला, ‘महाराज प्रसन्न आहेत व भेट घेण्यास उत्सुक आहेत, तरी दर्शनास चलावें’ तें ऐकून **बाणाला** फार आनंद वाटला. कारण ‘**स्वामी प्रसादोन्मुखः ।**’ हा ईश्वरीप्रसाद (शुभ शकुन) मानून तो त्याजबरोबर गेला. वाटेनें **हर्षा**चा बसण्याचा पर्वताएवढा **दर्पशात** नांवाचा हत्ती होता, त्याची त्यानें बराच वेळ गंमत पाहिली, मग तो **हर्ष**राजाकडे गेला. **हर्षा**ला पाहतांच **बाणास** फारच हर्ष झाला. व त्या आनंदाच्या भरांत त्याच्या मुखावाटें उद्गार निघाले ते फारच खुबीदार व मार्मिक आहेत. त्यांतील श्लेष **हर्ष**राजा हा केवळ सद्गुणांचा पुतळाच असल्याची साक्ष देत आहेत. त्या वर्णनांत त्यानें **हर्षाचें** ‘**अत्यमरं**[३]

---

१ ‘मेखलकस्तु दूरादेव द्वारपाललोकेन प्रत्यभिज्ञायमानः ‘तिष्ठतु’ तावत्क्षणमात्रमत्रैव पुण्यभागी’ इति तमभिधायाप्रतिहतः पुरः प्राविशत् ।’

२ ‘एष खलु महाप्रतीहाराणामनन्तरश्चक्षुष्यो देवस्य पारियात्रनामा दौवारिकः । समनुगृण्हात्वेनमनुरूपया प्रातिपत्या कल्याणाभिनिवेशी इति ।’ दौवारिकः समुपसृत्य कृतप्रणामो मधुरया गिरा सविनयमभाषत । आगच्छत प्रविशत दर्शनाय कृतप्रसादो देव इति ।’

३ ‘दृष्ट्वा चानुगृहीत इव निगृहीत इव साभिलाष इव तृप्त इव रोमांचामुचा मुखेन मुञ्चन्नानन्दबाष्पबिन्दून् दूरादेव विस्मयस्मेरः समचिन्तयत् । सोऽयं सुजन्मा सुगृहीतनामा, तेजसां राशिः चतुरुदधिकेदारकुटुंबी, भोक्ता ब्रह्मस्तंभफलस्य सकलादिराजचरितजयज्येष्ठमल्लो देवः परमेश्वरो हर्षः । एतेनच खलु राजन्वती पृथ्वी.

नास्य हरेरिव वृषविरोधीनि बालचरितानि । न पशुपतेरिव दक्षोद्वेगकारीण्यैश्वर्यविलसितानि । न शतक्रतोरिव गोत्रविनाशपिशुनाः प्रवादाः । न यमस्येवातिवल्लभानि दंडग्रहणानि । न वरुणस्येव निस्त्रिंशग्राहसहस्ररक्षिताः रत्नालयाः न धनदस्येव

[ पुढें चालू ]

11 JAN

राजत्वम्' 'देवत्वाहून अधिक राजपण!' वर्णिलें आहे. मग द्वारपालानें बाणकवि आल्याचें राजास कळविलें. तेव्हां 'हाच काय तो बाण?' असें हर्षराजानें ह्मटलें. यावर 'हेच ते महाराज!' असें त्यानें सांगितलें.

हर्षाचा बंधु कृष्णराज यानें आपल्याकडून राजाच्या मनांतला वाईट ग्रह काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता, तरी बाणाची भेट झाल्यावर हर्षराजा हा आपल्याजवळ बसलेल्या मालवराजपुत्राजवळ क्रोधमुद्रेनें 'हा मोठा दुर्वृत्त आहे!' असें बाणास लक्षून बोलला. तें ऐकून बाणानेंहि राजाची भीड न धरतां ह्मटलें, 'राजा, आज अज्ञानासारखें व कांहींएक लोकचरित माहीत नसल्यासारखें काय बोलतोस? लोक चमत्कारिक असतात; ते पाहिजे तें बोलतात, परंतु थोरांनीं यथार्थ असेल तेंच लक्षांत घेतलें पाहिजे. ह्या असल्या भाषणानें मला फारच वाईट वाटतें. मी कोणी असा तसा नव्हे! सर्वत्र प्रसिद्ध व अतिपवित्र अशा वात्स्यायनकुलांत जन्मलों. यथाकालीं माझे सर्व

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू ]

निष्फलाः सन्निधिलाभाः । न जिनस्येवार्थवादशून्यानि दर्शनानि । न चंद्रमस इव बहुलदोषोपहताः श्रियः । 'चित्रमिदमत्यमरं राजत्वम्'।

अपिचास्य त्यागस्यार्थिनः, प्रज्ञायाः शास्त्राणि, कवित्वस्य वाचः, सत्वस्य साहसस्थानानि, उत्साहस्य व्यापाराः कीर्तेर्दिङ्मुखानि, अनुरागस्य लोकहृदयानि, गुणगणस्य संख्या, कौशलस्य कलाः न पर्याप्तो विषयः ।'

१ 'महानयं भुजंगः' असें हर्षानें ह्मटलें. यावर बाणकवीनें 'का मे भुजंगता' असें खुबीनें उत्तर दिलें. ह्मणजे कोणता माझा दुर्वृत्तपणा ? किंवा 'का मे भुजं गता' कोणती ( स्त्री ) माझ्या हातीं आली? किंवा 'कामे भुजंगता' ह्मणजे मदनाचे ठायीं भुजंगता ह्मणजे दुर्वृत्तपणा आहे माझे ठायीं नाहीं! असे खुबीनें श्लेषचमत्कार केले.

२ देवअविज्ञातत्व इव अश्रद्दधान इव नेय इव अविदितलोकवृतान्त इव कस्मादेवमाज्ञापयासि । स्वैरिणो विचित्राश्च लोकस्य स्वभावाः प्रवादाश्च । महद्भिस्तु ययार्थदर्शिभिर्भवितव्यम् । नार्हसि मामन्यथा संभावयितुमविशिष्टमिव ब्राह्मणोऽस्मि जातः सोमपायिनां वंशे वात्स्यायनानाम् । यथाकालमुपनयनादयः कृताः संस्कराः । सम्यक्पठितः सांगो वेदः । श्रुतानि यथाशक्ति शास्त्राणि । दारपरिग्रहादभ्यागारिकोऽस्मि । का मे भुजंगता ? लोकद्वयाविरोधिभिस्तुचापलैः शैशवमशून्यमासीत् अत्रानपलापोऽस्मि अनेनैवच गृहीतविप्रतीसारमिव मे हृदयम् । इदानीं तु सुगत इव शान्तमनसि मनाविव कर्तरि वर्णाश्रमव्यवस्थानां समवर्तिनीव च साक्षाद्दंण्डभृति देवे शासति सप्ताम्बुराशिरशनामशेषद्वीपमालिनीं महीं क इवाविशङ्कः सर्वव्यसनबन्धोराविनयस्य मनसाप्यभिनयं कल्पयिष्यति ।

संस्कार होऊन मीं उपनयनानंतर सांग वेदाध्ययन व शास्त्राध्ययन केलें आहे. माझा विवाह होऊन मी गृहस्थाश्रमी झालों आहे. इहलोक व परलोक याला घातक असें मजकडून कांहींएक वर्तन घडलें नाहीं. यांत मी कांहींएक छपवीत नाहीं. सांप्रत बुद्धासारखा शांत, मनूसारखा वर्णाश्रमांची व्यवस्था करणारा, व यमधर्मासारखा तूं शास्ता असतां भलत्यासलत्या गोष्टी करण्याविषयीं कोणाच्या मनांत तरी येणार आहे? फार काय सांगावें? पशुपक्षी देखील तुला भिऊन वागतात, मग मनुष्याची काय कथा? आतां मी कसा आहें तें सहवासानें कळून येईल! यावर ' आम्हीं असें ऐकिलें ह्मणून ह्मटलें!' असें बोलून हर्षानें बाणाचा सन्मान न करतां केवळ प्रसन्नतेचें मात्र चिन्ह दाखविलें व तो उठून गेला. बाणकवीच्या अशा भाषणानें हर्षास राग आला नाहीं यावरून

" पुरुषाः सुलभा लोके सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः ॥ "

' गोड बोलणारे पुष्कळ असतात, परंतु अप्रिय व हितकर बोलणारा व ऐकणाराहि विरळा. ' ह्या आद्यकवीच्या वचनाचें स्मरण होऊन वक्ता व श्रोता हे दोघेहि स्तुतीस पात्र आहेत, असें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. ह्या वेळीं हर्षराजानें बाणकवीचा सन्मान जरी केला नाहीं, तरी किंचित् प्रसन्नमुद्रेनें आपलें प्रेम व्यक्त केलेंच.

संध्याकाळीं बाण आपल्या बिऱ्हाडीं जाण्यास निघाला तेव्हां त्यांच्या

---

१ सांगवेदाध्ययनाचें मोठें फल सांगितलें आहे:—
तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ' सायणकृतोपोद्घात.

२ भूपतिरपि ' एवमस्माभिः श्रुतम् ' इत्यभिधाय तूष्णीमेवाभवत् ।

३ " अकरोच्च चेतस्यतिदाक्षिणः खलु देवो हर्षः । यदेवमनेकबालचरितचापलोचितकौलिनकोपितोऽपि मनसा स्निह्यत्येव मयि । यद्यहमक्षिगतः स्यां न मे दर्शनेन प्रसादं कुर्यात् इच्छति तु मां गुणवन्तं । उपदिशन्ति हि विनयमनुरूपप्रतिपत्त्युपपादनेन वाचा विनापि भर्तव्यानां स्वामिनः । अपिच धिङ्मां स्वदोषान्धमानसमनादरपीडितमेवमतिगुणवति राजन्यन्यथा चान्यथाच चिन्तयन्तम् । सर्वथा करोमि तथा, यथा, यथावस्थितं जानाति मामयं कालेन । इत्येवमवधार्य चापरेद्युर्निष्क्रम्य कटकात्सुहृदां बांधवानां च भवनेषु तावदतिष्ठत् । यावदस्य स्वयमेव गृहीतस्वभावः पृथिवीपतिः प्रसादवानभूत् । अविशच्च पुनरपि नरपतिभवनम् । स्वल्पैरेवचाहोभिः परमप्रीतेन प्रसादजन्मनो मानस्य प्रेम्णो विश्रम्भस्य द्रविणस्य नर्मणः प्रभावस्य च परां कोटिमानीयत नरेन्द्रेणेति । "

नांत आलें कीं, हर्षराजा हा उदारमनाचा व दयाळु खराच ! लहानपणच्या स्वच्छंदवर्तनामुळें मजवर लोकापवाद होते तरी त्याचें मजवर प्रेम दिसलें, त्याचा मजवर खरोखरीच रोष असता तर त्यानें आपली प्रसन्नता दर्शविली नसती ! मी आपली वर्तणूक सुधारावी व अधिक गुणवान् व्हावें, असा मात्र त्याचा रोख दिसला ! आश्रितांनीं अधिक गुणवान् व्हावें, असें इच्छिणें योग्यच आहे ! थोर असतात ते न बोलतां सवरतां आश्रितजनांस कृतीनेंच सद्गुणांचें शिक्षण देतात ! धिक्कार असो मला कीं अशा गुणवान् राजाविषयीं मीं भलतीच कल्पना केली होती ! तर आतां माझें खरें स्वरूप त्याच्या ध्यानांत येईल अशी मी वर्तणूक ठेवीन. असा विचार करून तो राजशिबिरापासून निघून आपल्या आप्तांच्या घरीं जाऊन राहिला.

यानंतर थोडक्याच दिवसांत **बाण**कवीची छाप हर्षराजावर पडून संतुष्ट झालेल्या **श्रीहर्षानें बाण**कवीस सन्मान, प्रेम, वित्त, विश्वास इत्यादिकांच्या परमावधीस नेऊन पोहोंचविलें !

शरदृतूंत[१] **बाण** आपल्या घरीं आला, तेव्हां हर्षराजानें त्याचा मोठा सन्मान केला ह्मणून त्याच्या आप्तमित्रांस फारच आनंद झाला. तो वर्णन करणें खरोखरीच अशक्य आहे !

**बाण** मोठ्या आनंदानें आपल्या आप्तमित्रांसह हर्षराजाकडील व आपल्या पूर्वजांसंबंधीं गोष्टी बोलत बराच वेळ बसल्यावर त्यांच्या बरोबर भोजन करण्यास उठला. भोजन होतांच पुनः त्याची आप्तमंडळी त्याजवळ येऊन बसली.

## बाणाचे घरीं वायुपुराणाचें कथन व प्रसंगानें (टीपेंत) पुराणासंबंधानें विवेचन.

मग सुदृष्टि[२] नांवाचा पुराणिक नेहमींप्रमाणें पुराण सांगण्याकरितां आला.

---

१ शरद्वर्णन व बाणाच्या आप्तमित्रांच्या भेटीचें हुबेहूब वर्णन शेवटच्या उतान्यांत दिलें आहे तें पहा.

२ ' विनीतमार्यैच वेषं दधानः पुस्तकवाचकः सुदृष्टिराजगाम । नातिदूरवर्तिन्यां चासंद्यां निषसाद । स्थित्वाच मुहूर्तमिव तत्कालापनीतसूत्रवेष्टनमपि नखकिरणैर्मृदुमृणालसूत्रैरिव वेष्टितं पुस्तकं पुरोनिहितं शरशलाकायंत्रके निधाय, पृष्ठतः सनीडसन्निविष्टाभ्यां मधुकरपारावताभ्यां दत्ते स्थानके प्राभातिकप्रपाठकच्छेदचिन्हीकृतमन्तर-

[ पुढें चालू ]

तो सिंहासनावर बसल्यावर वंशवाद्यें वाजविणारे **मधुकर** व **पारावत** त्याजवळ येऊन बसले. मग **सुदृष्टीनें** सूत्रवेष्टन काढून व्यासपीठावर **वायुपुराणाचें** पुस्तक ठेवल्यावर सकाळीं संहिता वाचल्याची खूण काढून गायनपूर्वक **वायुपुराण** सांगितलें व **हर्षचरितासारखें** **वायुपुराण** असल्याचें वर्णन केलें.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू ]

पत्रमुत्क्षिप्य गृहीत्वाच कतिपयपत्रलघ्वीं कपाटिकां क्षालयन्निव मषीमलिमान्यक्षराणि दंतकांतिभिरर्चयन्निव सितकुसुमसूक्तिभिर्ग्रंथं मुखसन्निहितसरस्वतीनूपुररवैरिव गमकैर्मधुरैराक्षिपन्मनांसि श्रोतृणां गीत्या पवमानप्रोक्तं पुराणं पपाठ । '

१ वायुपुराणाचा उल्लेख महाभारतांतहि आढळतो.

' एतत्ते सर्वमाख्यातमतीतानागतं तथा ।
वायुप्रोक्तमनुस्मृत्य पुराणमृषिसंस्तुतम् ॥'

. म० भा० वनपर्व, अध्याय १९१ श्लोक १६

आमचे पुराणग्रंथ इसवी सनाच्या एक हजार वर्षांपुढचे आहेत, असें वुइल्सनप्रभृति युरोपिअन पंडितांनीं ठरविलें होतें. परंतु बाणकवीच्या हर्षचरिताची माहिती त्यांनां झाल्यावर हें त्यांचें वेड दूर झालें! आमचीं पुराणेंचशीं काय, जितक्या ह्मणून आमच्या जुन्या गोष्टी आहेत, तितक्या आलीकडच्या ठरतील तितक्या ठरविण्याची युरोपिअनांनां मोठी हौस वाटते. जेव्हां एकादा सबळ पुरावा सापडतो, व तो नाकारतां येत नाहीं, तेव्हां कोणतीहि गोष्ट प्राचीन असल्याबद्दल कबूल करणें त्यांनां भाग पडतें! पुराणासंबंधानें असेंच झालें होतें. बाणाच्या हर्षचरिताची माहिती जेव्हां त्यांनां झाली, तेव्हां इ० स०च्या सहाशें वर्षापूर्वींचे पुराण ग्रंथ आहेत असें ते ह्मणूं लागले! नाहींतर विष्णुपुराण हें इ०स०१०४५त रचिलें असावें असें उइल्सन साहेबासारख्यांनीं अगदीं पक्का कालनिर्णय ठरवून टाकला होता! ह्या साहेबांस पुराणांतील कित्येक शब्दांचे अर्थ न कळल्यामुळें त्यांनीं भलभलतेच अर्थाचे अनर्थ केलेले आहेत !

डा. फुल्लर, व्हिन्सेंटस्मिथ* वगैरे युरोपिअनांनीं बाणाच्या ग्रंथावरून व त्यांतील संदर्भावरून वायु, विष्णु, अग्नि, मार्कंडेय, इ. पुराणें बाणास माहीत होतीं असें आतां कबूल केलें आहे. वायुपुराणाचें वाचन व कथन तर बाणाच्या येथें त्या वेळीं चालू असल्याचा स्पष्ट पुरावाच आहे.

---

* The most systmatic record of Indian historical tradition is that preserved in the dynastic lists of the Puranas. Five out of the eighteen-works of this class, namely, the Vayu, Matsya, Vishnu, Brahmanda, and Bhagavat, contain such

( पुढें चालू )

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

lists. The Brahmanda and Bhagavata Puranas being comparativily late works, the lists in them are corrupt, imperfect and of slight value. But those in the oldest documents, the Vayu, Matsya, and Vishnu are full, and evidently based on good authorities. The latest of these works, the Vishnu, is the best known, having been completely translated into English; but in some cases its evidence is not so good as that of Vayu and Matsya. It was composed probably, in the fifth or sixth century A. D. and corresponds most closely with the theoretical defination that a Purana should deal with the fiive topics of primary creation, secondary creation, genealogies of gods and patriarchs, reigns ef various manners, and the histories of old dynasties of kings. The Vayu, seems to go back to the middle of the fourth centery A. D. and the Matsya is probably intermediate in date between it and the Vishnu. Vincent Smith's Early History of India.

ह्या उताऱ्यावरून युरोपियन पंडितांनीं वायु, मत्स्य, व विष्णु हीं पुराणें खिस्तिशकाच्या तिसऱ्या व चवथ्या शतकांत झालीं असें कबूल केलें आहे. आणखी एकादा सबळ पुरावा मिळाल्यास कदाचित् पुराणांचा काल खिस्ताच्या अभावकालांतहि जाणार नाहीं कशावरून ?

आमची पुराण वाचण्याची पद्धति बाणकालाच्या पूर्वीपासून जशी चालत आलेली आहे, तशीच प्रायः अजूनपर्यंत ही चालू आहे, व त्या कालाच्या पूर्वीहि किती अगोदरपासून चालत आलेली असेल तें सांगतां येत नाहीं. वायु, महाभारत, रामायण, इत्यादि पुराणांचे उल्लेखहि बाणाच्या ग्रंथांत केलेले आहेत.

व्यासांनीं प्रथम अठरापुराणें केलीं व नंतर महाभारत केलें असें पुढील प्रमाणावरून ठरतें.

अष्टादशपुराणानां श्रवणाद्यत्फलं लभेत् ।
तत्फलं समवाप्नोति वैष्णवो नात्र संशयः ॥
म. भा. स्व. प. अध्याय ६ श्लोक ९५.

ह्या महाभारतांतीलच प्रमाणावरून अठरा पुराणें केल्यावर महाभारत केलें असें उघड होतें.

अष्टादशपुराणानि कृत्वा सत्यवतीसुतः । भारताख्यानमखिलं चक्रे तदुपबृंहितम् ॥

[ पुढें चालू. ]

भोर

चालू असल्याचें आढळून येतें. **प्रतापवर्धन** वारल्यावर **हर्षा**स[१] दुःसह दुःख होऊन तो अत्यंत शोकाकुल होऊन बसला असतां, त्याचें दुःख निवारण करण्याकरितां **हर्षा**च्या पदरीं असलेले **पौराणिक** येऊन व त्याच्या सभोंवतीं बसून त्यांनीं पुराणांतील गोष्टींनीं त्याचें समाधान केलें असल्याचें पुढें **हर्षचरितां**तच वर्णन आहे.

**बाणा**च्या **कादंबरीं**त देखील पुराणाचें कथन व श्रवण यांचा उल्लेख आहे.—"एके दिवशीं **तारापीड**राजा अंतःपुरांत गेला असतां आपली राणी **विलासवती** ही खिन्नवदन होऊन चिंताक्रांत बसली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें खिन्नतेचें कारण तिला विचारिलें, परंतु तिजकडून कांहीं एक उत्तर मिळालें नाहीं. तेव्हां त्यानें तिच्याजवळ सर्वकाळ असलेल्या **मकरिका**नांवाच्या दासीस विचारिलें असतां तिनें त्यास सांगितलें कीं आज चतुर्दशी[२] [ शिवरात्र ] असल्यामुळें **महाकालशंकरा**च्या दर्शनास बाई-

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

ह्या मत्स्य पुराणांतील प्रत्यंतर पुराव्यावरून तर ही गोष्ट अगदीं सिद्धच होते.

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणिच ।
वंश्यानुचरितंचेति पुराणं पंचलक्षणम् ॥

वायुपुराण.

ह्या पुराणलक्षणाप्रमाणें असलेलीं आमचीं प्रसिद्ध अठरा पुराणें आणि महाभारत व रामायण यांत आमचा प्राचीन कालचा इतिहास भरलेला आहे असें असतां पुराणांत 'सर्व शिमगाच आहे!' अशाप्रकारें आमच्या पुराणांस नांवें ठेवणारे आमच्यांतच 'गोतास काळ' उत्पन्न व्हावे, हें आमचें दुर्दैव होय. आतां अत्युक्ति, अद्भुत वर्णन, फलश्रुतीचें प्रलोभन वगैरे गोष्टी यांत आहेत ही गोष्ट खरी; कांहीं पुराणांत मागाहूनहि कांहीं प्रकरणें घुसडून दिलेलीं असावीं असेंहि दिसतें. तसेंच भविष्य पुराणांतहि नवीन नवीन भरती घालून आतांच्या काळापर्यंत ऐतिहासिक वृत्त आणून ठेवलेलें आढळतें! कांहीं पुराणें व्यासाच्या शिष्य-प्रशिष्य-परंपरेनेंहि पुरीं करण्यांत आलेलीं आहेत.

१ 'देवमपि हर्षं तदवस्थं पितृशोकविव्हलीकृतं ( तं )+ + + शोकापनयन निपुणाश्च पौराणिकाः पर्यवारयन्' इ०

२ 'अद्य तु चतुर्दशीति भगवन्तं महाकालमर्चितुमितोगतया तत्र महाभारते वाच्यमाने श्रुतमपुत्राणां किल न सन्ति लोकाः शुभाः पुन्नाम्नो नरकात्त्रायत इति पुत्र

[ पुढें चालू. ]

11 JAN 194? पुस्तके (जपून) वापर

साहेब गेल्या होत्या, तेथें महाभारताचें पुराण चाललें होतें, त्यांत निपुत्रिकाला सद्गति मिळत नाहीं, असा कथाभाग निघाला होता. तो ऐकल्यापासून बाईसाहेब फारच कष्टी झाल्या आहेत. त्यांस आपलें जिणें व्यर्थ वाटत आहे. त्या कांहींएक खात नाहींत पीत नाहींत, अंगावर दागदागिने घालीत नाहींत, किती समजूत केली तरी उत्तर देत नाहींत, त्या एकसारख्या रडत बसल्या आहेत, याला काय करावें? " इत्यादि वर्णन आहे. यावरून बाणकालाच्याहि पूर्वींपासून पुराणग्रंथ व त्यांचें कथन व श्रवण चालू असल्याचें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

## हर्षचरितांतील मुद्याचा मजकूर.

**बाणाच्या** आप्तांनीं **हर्षचरित** सांगण्याविषयीं **बाणाचा** घाकटा चुलत भाऊ **श्यामल** यास खुणावलें. तेव्हां तो **बाणास** ह्मणाला 'हर्षराजानें पुष्कळ राजांस जिंकून त्यांचें कांहीं चालू दिलें नाहीं; तेव्हां अशा महापराक्रमी राजर्षीचें चरित्र सांगून हा आपला **भार्गववंश** अत्यंत पवित्र करावा. ' यावर **बाण** ह्मणाला, " स्वार्थदृष्टि असतात त्यांच्या ध्यानांत शक्याशक्य गोष्टींचा विचार येत नसतो! **हर्षचरित** केवढें तरी मोठें आहे! तें सर्व सांगणें मजकडून अशक्य आहे. तथापि तुमच्या आग्रहावरून यथामति सांगेन! आज आतां संध्याकाल झाला आहे. " असें बोलून **बाण शोणनदीवर** सायंसंध्येस गेला. दुसरे दिवशीं प्रातःसंध्यादिकर्मे आटोपल्यावर सर्व मंडळी त्याजवळ येऊन बसली. तेव्हां त्यानें **हर्षचरित** सांगण्यास आरंभ केला.

**हर्षाच्या ताम्रपत्रलेखांत हर्षचरितांत** नसलेल्या त्याच्या बऱ्याच पूर्वजांचा नामनिर्देश केलेला आहे, याकरितां तो **ताम्रपत्रलेख** या ठिकाणीं देणें आवश्यक वाटल्यावरून तो पुढें दिला आहे.

## वंस्खेड येथील ताम्रपत्रलेख.

**'एपिग्राफिया इंडिका '** (Vol.IV.September 1896) यांत हर्षानें दिलेल्या अग्रहाराबद्दल दोनहि ताम्रपत्र लेख छापले आहेत, त्यांपैकीं हा एक होय.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

इति । तच्छ्रुत्वा भवनमागत्य परिजनेन सशिरःप्रणाममभ्यर्थ्यमानापि नाहारमभिनन्दति न भूषणपरिग्रहमाचरति नोत्तरं प्रतिपद्यते केवलमविरलबाष्पबिन्दुदुर्दिनान्धकारितमुखी रोदिति । एतदाकर्ण्य देवः प्रमाणम् । इत्यभिधाय विरराम । '

बाणादिमहाकविवर्णितश्रीहर्षमहाराजानां दानपत्रम् ।

" श्रीस्स्वस्ति महानौर्हस्त्यश्वजयस्कंधावाराच्छ्रीवर्द्धमानकोट्या महाराजश्रीनरवर्द्धनस्तस्यपुत्रस्तत्पादानुध्यातःश्रीवज्रिणीदेव्यामुत्पन्नः परमादित्यभक्तो महाराजश्रीराज्यवर्द्धनस्तस्यपुत्रस्तत्पादानुध्यातः श्रीमदप्सरोदेव्यामुत्पन्नःपरमादित्यभक्तो महाराजश्रीमदादित्यवर्धनस्तस्यपुत्रस्तत्पादानुध्यातः श्रीमहासेनगुप्तादेव्यामुत्पन्नश्चतुस्समुद्रातिक्रान्तकीर्तिःप्रतापानुरागोपनतान्यराजो वर्णाश्रमव्यवस्थापनप्रवृत्तचक्र एकचक्ररथ इव प्रजानामार्तिहरःपरमादित्यभक्तःपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीप्रभाकरवर्द्धनस्तस्यपुत्रस्तत्पादानुध्यातास्सितयशःप्रतानविच्छुरितसकलभुवनमण्डलःपरिगृहीतधनदवरुणेन्द्रप्रभृतिलोकपालतेजास्सत्पथोपार्जितानेकद्रविणभूमिप्रदानसंप्रीणितार्थिहृदयोतिशयितपूर्व्वराजचरितो देव्याममलयशोमत्यां श्रीयशोमत्यामुत्पन्नःपरमसौगतस्सुगतइव परहितैकरतःपरमसौगतस्सुगतइवपरहितैकरतःपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीराज्यवर्द्धनः ।

राजानो युधि दुष्टवाजिन इव श्रीदेवगुप्तादयः
कृत्वा येन कशाप्रहारविमुखाः सर्वे समं संयताः ।
उत्खाय द्विषतो विजित्य वसुधाङ्कृत्वा प्रजानां प्रियं
प्राणानुज्झितवानरातिभवने सत्यानुरोधेन यः ॥

तस्यानुजस्तत्पादानुध्यातःपरममाहेश्वरो महेश्वरइव सर्वसत्वानुकम्पी परमभट्टारकमहाराजाधिराजश्रीहर्षआहिछत्राभुक्तावङ्गदीयवैषयिकपाश्चिमपथकसम्बद्धमर्कटसागरे समुपगतान्महासामन्तमहाराजदौस्साधसाधनिकप्रमातारराजस्थानीयकुमारामात्योपरिकविषयपतिभटचाट सेवकादीन्प्रतिवासिजानपदांश्च समाज्ञापयति विदितमस्तु यथायमुपरिलिखितग्रामस्स्वसीममापर्यन्तः सोद्रङ्गः स्वराजकुलाभाव्यप्रत्यायसमेतस्सर्वपरिहृतपरिहारो विषयादुध्दृतपिण्डःपुत्रपौत्रानुगश्चन्द्रार्कक्षितिसमकालीनो भूमिच्छिद्रन्यायेन मया पितुःपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीप्रभाकरवर्द्धनदेवस्य मातुर्भट्टारिकामहादेवीराज्ञीश्रीयशोमतीदेव्या ज्येष्ठभ्रातृपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीराज्यवर्द्धनदेवपादानाञ्च पुण्ययशोभिवृद्धये भारद्वाजसगोत्रबह्वृचच्छन्दोगसब्रह्मचारिभट्टबालचन्द्रभ-

भद्रस्वामिभ्यां प्रतिग्रहधर्मेणाग्रहारत्वेन प्रतिपादितो विदित्वा भवद्भिः समनुमन्तव्यः प्रतिवासिजानपदैरप्याज्ञाश्रवणाविधेयैर्भूत्वा यथासमनुचिततुल्यमेयभागभोगकराहिरण्यादिप्रत्याया एतयोरतोपनेयास्सेवोपस्थानञ्च करणीयमित्यपिच

अस्मत्कुलक्रममुदारमुदाहरद्भि-
रन्यैश्च दानमिदमभ्यनुमोदनीयं ।
लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचञ्चलाया
दानं फलं परयशःपरिपालनञ्च ॥
कर्मणा मनसा वाचा कर्तव्यं प्राणिभिर्हितं ।
हर्षेणैतत्समाख्यातन्धर्मार्जनमनुत्तमं ॥

दूतकोत्र महाप्रमातारमहासामन्तश्रीस्कंदगुप्तः महाक्षपटलाधिकरणाधिकृतमहासामन्तमहाराजभानसमादेशादुत्कीर्ण्णं ईश्वरेणेदमिति संवत् २० २ ( २०+२=२२ ) कार्तिकवदि.



स्वहस्तो मम राजाधिराजश्रीहर्षस्य.

'बंस्खेड' येथें हा ताम्रपट सांपडला म्हणून यास 'बंस्खेडताम्रपट' असें म्हणतात. बंस्खेड हें उत्तर हिंदुस्थानांत शहाजहानपुरापासून पंचवीस मैलांवर आहे.

---

श्रीकंठदेशांत स्थाण्वीश्वर (स्थानेश्वर किंवा ठाणेश्वर यास कुरुक्षेत्र असेंहि नांव आहे.) येथें श्रीहर्षाच्या पूर्वजांचें व त्यांच्या राजधानीचें ठिकाण होतें. तें पुढें हर्षराजानें कान्यकुब्ज ( कनोज ) येथें नेलें. त्याच्या वंशाचा मूळपुरुष पुष्पभूति नांवाचा मोठा विख्यात राजा होऊन गेला. त्याचे वंशांत

---

१ यांतील मजकूर पुढें दिलेल्या हर्षचरिताच्या गोष्टींत आहे. तथापि कोणी मुख्य निबंधच वाचतात. याकरितां आणि महत्त्वाच्या व ऐतिहासिक टिपा गोष्टींत दाखल करण्यापेक्षां मुख्य निबंधांत देणेंच ठीक, यासाठीं थोडी द्विरुक्ति झाली तरी चिंता नाहीं, असें मनांत येऊन येथें मुख्य मुद्याचा मजकूर दिला आहे.

बऱ्याच कालानंतर हर्षाचा बाप प्रभाकरवर्धन किंवा प्रतापशील हा मोठा पराक्रमी राजा झाला. हा राजा मोठा सूर्यभक्त होता. हा हूणरूपहरिणांनां सिंहासारखा, सिंधुराजाला ज्वरासारखा, गुर्जरराजांनां निद्रा येऊं न देणारा, गांधारराजरूपमत्तगजाची मस्ती जिरवणारा, लाटराजाचा उच्छेद करणारा, मालवराजाच्या लक्ष्मीरूपलतेस केवळ परशुच ! असा होता. प्रभाकराच्या स्त्रीचें नांव यशोमती असें होतें.

प्रभाकरवर्धनास सूर्याचे आराधनेनें फार दिवसांनीं दोन पुत्र व एक कन्या अशीं तीन अपत्यें झालीं. मुलांचीं नावें राज्यवर्धन व हर्ष आणि मुलीचें राज्यश्री अशीं ठेविलीं होतीं. मुलांचा मामेभाऊ भंडी यास त्याचे बापानें तो आठ वर्षांचा असतांच आपले भाचे राज्यवर्धन व हर्ष यांच्या सहवासास आणून ठेवलें होतें. भंडींतहि लहानपणापासून पराक्रमाचा अंकुर दिसत होता. प्रभाकरवर्धनानें त्यास आपल्या पुत्राप्रमाणेंच मानिलें होतें. तिघांचाहि अभ्यास बरोबरच चालत असे. पुढें ते तारुण्यांत येऊन पराक्रमाचीं कृत्यें करण्यासारखे झाले. नंतर त्यांच्या बापानें सद्गुणी मालवराजपुत्र—कुमारगुप्त व माधवगुप्त—यांस आपल्या पुत्रांच्या तैनातीस दिलें. राज्यश्री-सहि नृत्यगीतादि कला शिकविल्या होत्या. ती वयांत आली तेव्हां राजानें स्त्रीपुत्रांच्या विचारें पुष्कळ मागण्या आल्या होत्या तरी ' मौखरी ' हें कुलीन क्षत्रिय घराणें लक्षांत आणून त्या वंशांतील सद्‌गुणी ग्रहवर्मा यास आपली कन्या मोठा समारंभ करून दिली. सर्व मुलें तारुण्यांत आलेलीं पाहून राजास फार आनंद झाला. त्यांत वडील पुत्र राज्यवर्धन हा ( कवचहर ) पराक्रमाचीं कृत्यें करण्यासारखा झालेला ' विक्रमरसानुरोधिनि वयसि वर्तमानः ' पाहून प्रभाकरवर्धनानें त्यास उत्तरेकडे हूणांवर पाठविलें. हर्षहि आपले भावाबरोबर हिमालयापर्यंत गेला. तें स्थान मृगया करण्यास

---

१ हर्षाच्या बापाचें नांव प्रभाकरवर्धन व आईचें यशोमती; आजाचें नांव आदित्यवर्धन व आजीचें महासेनगुप्ता; पणजाचें नांव राज्यवर्धन, पणजीचें अप्सरादेवी; निपणजाचें नांव नरवर्धन आणि निपणजीचें वज्रिणीदेवी असें होतें. हर्षाचा बाप, आजा व पणजा हे तिघेहि सूर्यभक्त होते. परंतु हर्षाचा वडील भाऊ राज्यवर्धन हा बौद्ध होता, असें ताम्रपत्रांतील लेखावरून कळतें. हर्ष हा शिवभक्त होता हें हर्षचरितावरून व ताम्रपत्रांतील ' परममाहेश्वर ' या पदावरूनहि स्पष्ट होतें. परंतु पुढें तोहि बौद्ध झाला असावा असें लक्षांत येतें. हा मजकूर ताम्रपत्रांतून घेतला आहे.

उचित व फारच मनोवेधक वाटून हर्ष हा शिकारीकरितां तेथें राहिला असतां त्याचा पिता सन्निपातज्वरानें अत्यवस्थ असल्याबद्दल त्याला पत्र आलें; तेव्हां तो तावडतोब उपाशीतापाशी परत घरीं गेला. पतीचा व आपला वियोग होणार म्हणून हर्षाच्या आईनें अग्नींत प्रवेश केला. **राज्यवर्धन** हा हूणांस जिंकून परत आला, तेव्हां त्यास आपलीं मातापितरें वारल्याचें कळल्यामुळें फार दुःख होऊन तो विरक्त झाला आणि हर्षास राज्य संभाळण्यास सांगून त्यानें वनांत जाण्याचा निश्चय केला. **प्रभाकरवर्धन** वारल्यामुळें **मालवराजानें ग्रहवर्म्यास** मारिलें व **राज्यश्रीस** बंदिशाळेंत टाकिलें. हें समजतांच **राज्यवर्धनाची** विरक्तता जाऊन व तिच्या जागीं संतप्तता येऊन तो त्वेषानें आपल्या बरोबर **भंडी** व दहा हजार घोडेस्वार घेऊन शत्रूवर चाल करून गेला. त्यानें **मालवराजाचा** तेव्हांच पराभव केला; परंतु **गौडरराजा ( शशांक**

---

१ ‘ तथाहि तेन शशांकेन विश्वासार्थं दूतमुखेन कन्याप्रदानमुक्त्वा प्रलोभितो राज्यवर्धनः स्वगेहे सानुचरो भुञ्जान एव छद्मना व्यापादितः । ’

शशांक नांवाच्या गौडराजास राज्यवर्धनाचा उत्कर्ष सहन न होऊन त्यानें ‘ मी आपली कन्या तुह्मास देतों, ’ असें सांगून त्यास आपले घरीं मेजवानीस बोलावून कपटानें मारलें ! असें टीकेंत आहे. ह्या शंकर नांवाच्या टीकाकारास पूर्वीची बरीच माहिती असल्याचें त्याचे टीकेंतील जागजागच्या संदर्भावरून दिसतें. हूएनसँगच्या लेखांतहि याबद्दल उल्लेख आहे. तो असाः–

‘ Râjavardhan came to the throne as the elder brother and ruled with virtue. At this time the king of Karnasuvarna a Kingdon of Eastern India whose name was Sasânka frequently addressed his ministers in these words ‘ If a frontier country has a virtuous ruler, this is the unhappiness of the ( mother ) kingdom ’ On this they asked the king to a conference and murdered him ’

Huen Thsang Vol I. P. 210.

F. N. This was Sasânka Narendragupta, king of Gauda, or Bengal.

बंगाल्यांत ओरिसा उडिसा गंजम प्रांतांत सांपडलेल्या ताम्रपत्रांत ‘ महाराजाधिराज शशांक ’ याचा मांडलिक महासामन्त ( सावत ) यानें ब्राह्मणास गौप्ताद्ब ३०० [ इ. स. ६१९ ] मध्यें अग्रहार दिल्याबद्दल सांपडलेल्या ताम्रपत्रांत ‘ शशांक ’ राजाचा उल्लेख आहे. त्याच शतकांतील व त्याच देशांतील हा लेख असल्यामुळें हाच तो शशांक असावा.

11 JAN 1994

**यास–कर्णसुवर्णपुरचा राजा असेंहि नांव आहे. ) यानें विश्वासघातानें राज्य-वर्धनास मारिलें.**

---

१हूएनसँग यानें जी माहिती दिली आहे, ती फारच उत्कृष्ट आहे; असें थोर थोर विद्वानांचें मत आहे, त्यानें हर्षराजाचीहि माहिती दिली आहे. त्यांत ‘ त्यावेळीं हर्ष-राजा हा कान्यकुब्ज [ कनोज ] देशाच्या गादीवर असून उत्तर हिंदुस्थानचा मुख्य राजा होता. स्थानेश्वर हें त्याच्या राजधानीचें शहर होतें. त्याचा वडील भाऊ राज्य-वर्धन यास शत्रूंनीं विश्वासघातानें मारिलें त्यामुळें देशांत चहूंकडे बेबंदशाई सुरू झाली. तेव्हां मुख्य प्रधान भानी ( भंडी ) यानें सर्व लोकांच्या वतीनें हर्षास राज्यसूत्रें हाती घेण्याविषयीं प्रार्थना केली आहे ’ वगैरे गोष्टींसंबंधाचा आधारभूत इंग्रजी उतारा खालीं दिला आहे:—

“ The people having lost their ruler, the country became desolate. Then the great minister Poni ( Bhandi ) whose, power and reputation were high and of much weight, addressing the assembled ministers, said, “ The destiny of the nation is to be fixed to day. The old king's son is dead; the brother of the prince, however, is humane and affectionate and his disposition, heaven—conferred, is dutiful and obedient. Because he is strongly attached to his family, the people will trust in him. I propose that he assume the royal authority: let each one give his opinion on this matter, whatever he thinks. ” They were all agreed on this point and acknowledged his conspicuous qualities.

On this the chief ministers and the magistrates all exhorted him to take authority, saying, “ Let the royal prince attend! The accumulated merit and the conspicuous virtue of the former king were so illustrious as to cause his kingdom to be most happily governed. When he was followed by Râjyavardhana we thought he would end his years [ as king ]; but owing to the fault of his ministers, he was led to subject his person to the hand of his enemy, and the kingdom has suffered a great affliction; but it is the fault of your ministers. The opinion of the people as shown in their songs, proves their real submission, to your eminent qualities. Reign, then with glory over the land, conquer the enemies of your family; wash out the insult laid on

your kingdem and the deeds of your illustrious father. Great will your merit be in such a case. We pray you reject not our prayer."

The prince replied, " The government of a country is a responsible office and ever attended with difficulties. The duties of a prince require previous consideration. As for myself, I am indeed of small eminence; but as my father and brothere are no more, I reject the heritage of the crown that can bring on benefit to the people. I must attend to the opinion of the world and forget my own insufficiency. Now, therefore, on the banks of the Ganges their is a statue of Avalokitesvara Bodhisattva which has evidenced many spiritual wonders. I will go to it and ask advice ( request a response ). " Forthwith, coming to the spot where the figure of the Bodhisattva was, he remained before it fasting and praying. The Bodhisattva recognising his sincere intention ( heart ), appeared in a bodily form and inquired, " What do you seek that you are so earnest in your supplication? " The prince answered, " I have suffered under a load of affliction. My dear father, indeed, is dead, who was full of kindness; and my brother humane and gentle as he was, has been odiously murdered. In the presence of these calamities I humble myself as one of little virtue; nevertheless, the people would exalt me to the royal dignity, to fill the high place of my illustrious father. Yet I am, indeed, but ignorant and foolish. In my trouble I ask the holy direction ( of the Bodhisattve ). "

The Bodhisattve replied, " In your former existence you lived in this forest as a hermit ( a forest mendicant ), and by your earnest diligence and unremitting attention you inherited a power of religious merit which resulted in your birth as a king's son. The king of the country Karnasuvarna, has overturned the law of Buddha. Now when you succeed to royal estate, you should in the same proportion exercise

इतर राजे यांस जिंकण्याची प्रतिज्ञा केली व तसाच तो निघाला. तो राजे जिंकीत

---

towerds it the utmost love and pity. If you give your mind to compassionate the condition of the distressed and to cherish them, then before long you shall rule over the Five Indies. If you would establish your authority, attend to my instruction, and by my secret power you shall receive additional enlightenment, so that not one of your neighbours shall be able to triumph over you Ascend not the lion-throne, and call not yourself Mahârâja.

Having received these instructions, he departed and assumed the royal office. He called himself the king's son ( Kumâraràja ) his title was Silâditya. And now he commanded his ministers, saying, " The enemies of my brother are unpunished as yet, the neighbouring contries not brought to submission; while this is so my right hand shall never lift food to my mouth. Therefore do you, people and officers unite with one heart and put out your strength. " Accordingly they assembled all the soldiers of the kingdom, summoned the masters of arms ( champions or teachers of the art of fighting. ) They had a body of 5000 elephants, a body of 20000 cavalry and 50,000 foot-soldiers. He went from west to east subduing all who were not obedient; the elephants were not unharnessed nor the soldiers unbelted ( unhelmeted ). After six years he had subdued the Five Indies. Having thus enlarged his territory he increased his forces; he had 60,000 war-elephants and 100000 cavalry. After thirty years his arms reposed and he governed everywhere in peace. "

*Hiuen Tsiang. P. 210-13.*

*( Translated by S. Beal. )*

१ हर्षचरितांत हर्षानें अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, थोडक्याच दिवसांत प्रियबंधूचा घात करणाऱ्या दुष्ट वैऱ्याचा समूळ नाश करणार नाहीं तर मी अग्निकाष्टें भक्षण करीन. ( शेवटीं दिलेल्या उताऱ्यांत पहा. )

हर्षानें बंधुघातकी वैऱ्यास शासन केल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचें नाहीं, अशी प्रतिज्ञा केल्याबद्दल हुएनसँग याच्या प्रवासवृत्तांतहि मजकूर आहे तो असाः—

चालला असतां प्राग्ज्योतिष (ब्रह्मदेश किंवा आसाम) चा राजा भास्करवर्मा यानें हर्षराजाबरोबर तह करण्याकरितां त्याजकडे पुष्कळ नजराणा पाठविला. तेव्हां हा शुभ शकुन झाला असें त्यानें मानलें आहे.

हर्षाची व भंडीची वाटेनें गांठ पडली, तेव्हां दोघांनीं राज्यवर्धनाविषयीं फार शोक केला आहे. राज्यश्री ही अटकेंतून सुटून विंध्याटवींत गेली, असें भंडीच्या सांगण्यावरून समजतांच हर्षानें भंडीस 'तूं सैन्य घेऊन गौडावर जा' असें सांगून तो आपल्या बहिणीचा शोध करण्यास गेला. विंध्याटवींत हर्षाची व दिवाकरमित्र बौद्धभिक्षूची भेट झाली. हा ग्रहवर्म्याचा बालमित्र असल्याचें हर्षास माहीत होतें. तेथील अरण्यांत त्याची बहीण जीव देण्यास सिद्ध झाली होती, तिचीहि गांठ पडली. पुढें दिवाकरमित्रानें उभयतांचें सांत्वन केलें. मग राज्यश्री ही विरक्ततेनें बौद्धदीक्षा घेण्यास सिद्ध झाली असतां 'माझें कर्तव्य उरकल्यावर मी व ही बरोबरच बौद्धदीक्षा घेऊं' असें हर्षानें बौद्धगुरूस सांगितलें. त्यानेंहि त्याप्रमाणेंच आपलें अनुमोदन दिलें. दिवाकरमित्राची विद्वत्ता, दयालुता व सदाचारतत्परता वगैरे गोष्टी पाहून हर्षानें दिवाकरमित्रास कांहीं दिवस आपल्याबरोबर राहून आपल्या बहिणीचें दुःख कमी करावें म्हणून त्याची प्रार्थना केली, ती त्यानें मान्य केली. मग आपल्या बहिणीस घेऊन हर्षराजा दिवाकरमित्रासह आपल्या सैन्याचा तळ गंगातटाकीं पडला होता तिकडे गेला. या गोष्टीचेंच सविस्तर वर्णन हर्षचरितांत केलें आहे.

## हर्षचरितांत कालनिर्णयाचा अभाव.

हर्षचरितावरून पाहतां बाणकवीचे आईबाप, त्याचे इतर वंशज आप्त, मित्र, राहण्याचें ठिकाण, स्वभाव, विद्या, आचार, विचार इत्यादिकांचा आणि त्याचा आश्रयदाता श्रीहर्ष याचा व त्याचें घराण्यांतील

---

"The enemies of brother are unpunished as yet, the neighbouring countries not brought to submission; while this is so, my right hand shall never lift food to my mouth"

*Huen Thsang Vol. 1 P. 213*

१ 'भवानपि कटकमादाय प्रवर्ततां गौडाभिमुखम्'।

ह. च. उ. ७.

इतर पुरुष यांचाहि बराच इतिहास सांपडतो. बाणाचे ग्रंथांत जितकें ऐतिहासिक वृत्त सांपडतें, तितकें देखील ( राजतरंगिणीखेरीज ) इतर संस्कृत कवींच्या ग्रंथांतून सांपडत नाहीं. तेव्हां या संबंधानें बाणाची योग्यता अधिक समजली पाहिजे. परंतु आपल्या याहि कवीच्या ग्रंथांत एक मोठी उणीव आहेच. ती कोणती म्हणाल तर कालनिर्देशाची. बाणाच्या व श्री-हर्षाच्या जीवितकालाचा निर्णय त्याच्या कोणत्याच ग्रंथावरून करतां येत नाहीं, या गोष्टीच्या संबंधानें याच ठिकाणीं अशी अडचण आली आहे असें नाहीं; तर आपल्या सर्व ग्रंथांतून प्रायः अशीच शोचनीय स्थिति आढळते ! यामुळें आपली जी हानि झाली आहे, ती कधींहि भरून यावयाची नाहीं, यावरून कालनिर्देशाचें महत्त्व पूर्वकालीं समजत नव्हतें असें दिसतें. मग याचें कारण काय असेल याविषयीं कांहीं तर्क चालत नाहीं ! ज्योतिष व जैन ग्रंथांतून मात्र बहुतकरून कालनिर्देश केलेला आढळतो.

बाण व श्रीहर्ष यांच्या जीवितकालाचा निर्णय एका बौद्धधर्मी चिनीयात्रे-करूच्या माहितीवरून व दुसऱ्याहि कांहीं गोष्टींवरून करण्यांत आला आहे. तो कसा, तें अनुक्रमानें पुढें सांगण्यांत येईल. आतां अगोदर त्या कालीं बौद्धधर्माचें बरेंच प्राबल्य होतें ह्मणून त्या धर्माच्या संबंधानें थोडेंसें सांगणें जरूर आहे तें सांगतों:--

## बुद्ध, ( चरित्र-टीपेंत ) बौद्धधर्मावर हल्ले व तद्धर्मानुयायी-इट्सिंग, भर्तृहरि, दिवाकरमित्र, अशोक ( चरित्र-टीपेंत ).

बौद्धधर्माचा संस्थापक बुद्ध हा ईसवी सनाच्या पूर्वीं सहावे शतकांत होऊन गेला. याचा निर्वाणकाल-ईसवीसनाच्या पूर्वीं पांचशें त्रेचाळीस ( ५४३ ) वर्षे-झाला, असें सिलोन वगैरेकडील बौद्ध मानित आले आहेत. सुधारलेले

---

१ "कालिदासानें 'मालविकाग्निमित्रांत' जें ऐतिहासिक कथानक घेतलें तें श्री-हर्षाच्या कथानकापेक्षां ऐतिहासिकदृष्ट्या अधिक चांगलें साधलेलें आहे. त्यावरून बाणापेक्षां कालिदासाची दृष्टि अधिक चांगली होती असें दिसतें. तथापि काल-निर्णयाच्या संबंधानें दोघांचीहि अनास्था आढळून येते." असें एका आक्षेपकाचें मत आहे परंतु मला तसें वाटत नाहीं. याकरितां अभिज्ञवाचकांनीं ऐतिहासिकदृष्टीनें अधिक चांगलेपणाबद्दल दोन्ही पुस्तकें वाचून पहावीं ह्मणजे कळून येईल.

२ सिद्धार्थबुद्ध हा कोसलदेशांत ( अयोध्याप्रांतांत ) 'कपिलवस्तु' या गांवीं

८६६
२७ग

युरोपियन ग्रंथकार त्याचा काल—ईसवीसनापूर्वी चारशें सत्याहत्तर ( ४७७ ) वर्षें—मानितात.

सूर्यवंशांतल्या *शाक्यराजांच्या वंशांत उत्पन्न झाला. त्याचे बापाचें नांव शुद्धोदन, व आईचें नांव मायादेवी असें होतें. अर्कबंधु, शाक्यसिंह, शाक्यमुनि, शौद्धोदनि, मायादेवीसुत, गौतम, मारजित्, जिन, इत्यादि नांवें अमरादिकोशांत आहेत. यावरूनच विचार केला तरी बराच इतिहास लक्षांत येतो. आतां पाली भाषेंतील बौद्ध पुस्तकांवरून इंग्रजींत भाषांतरें झालीं आहेत. त्यांतील माहिती वरील माहितीशीं मिळून शिवाय आणखीहि पुष्कळ माहिती त्यांत सांपडते. बुद्धाचा बाप शुद्धोदन. याचें राज्य बरेंच मोठें होतें. तो आपल्या प्रजेस कोणत्याहि प्रकारें दुःख होऊं नये ह्मणून फार काळजी घेत असे. त्याचें राज्यांत सर्व लोक सुखी होतें व व्यापारधंदा सुरळीत चालत असे. राजास पुत्र झाला तेव्हां सर्वांस फारच आनंद झाला. ‘ हा मुलगा फार ज्ञानी होईल व याचें परमार्थाकडे लक्ष लागेल, ’ असें ज्योतिष्यांनीं सांगितलें होतें. आपल्या मुलास लहानपणापासून विद्या शिकविण्याकडे राजाचें लक्ष असे. तो विद्वान् होऊन तारुण्यांत आल्यावर त्यानें आपल्या पसंतीनें आपली स्त्री निवडावी ह्मणून शेंकडों सुंदर राजकन्या त्याच्या दृष्टीस पाडण्याची राजानें तजवीज केली होती. त्यांत. ‘ यशोधरा ’ नांवाच्या राजकन्येनें चातुर्यानें त्याचें मन आपल्याकडे वळविलें व तिजबरोबर सिद्धार्थाचा विवाह मोठ्या थाटानें झाला. आपल्या मुलानें नेहमीं आनंदांत रहावें, संसारसुखाचा उपभोग घ्यावा व राज्य करावें, असें राजाच्या मनांत असल्यामुळें मुलास उदासीनपणा येण्यास अल्प देखील कारण होऊं नये व त्याच्या दृष्टीस दुःखकारक प्रसंग पडूं नयेत ह्मणून, त्याबद्दल राजा फार काळजी घेत असे. सिद्धार्थबुद्ध याच्या पुत्राचें नांव ‘ राहूल ’ असें होतें. सिद्धार्थाचें घरीं मोठें राजवैभव असतां लहानपणापासूनच त्याचें संसारांतील लक्ष उडालें होतें. एके दिवशीं तो रथांत बसून फिरावयास गेला असतां वाटेनें जरेमुळें विरूप झालेला एक वृद्ध मनुष्य,तसाच पुढें एक दुखणाईत, व त्यानंतर एक प्रेत, असे प्रकार त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हां त्यानें आपल्या पोक्त गाडीवानास अशी यांची दशा होण्याचीं कारणें विचारलीं. तेव्हां सर्व प्राणिमात्रास अशाच दशा भोगाव्या लागतात, असें त्यानें सांगितलें. तें ऐकून सिद्धार्थास फारच वाईट वाटलें आणि त्यास राज्यादि सर्व ऐहिक सुखांचा फारच तिटकारा वाटला. एके दिवशीं तो पलंगावरील मऊ बिछान्यावर पडला असतां येथील नश्वर स्थितीकडे त्याचें लक्ष जाऊन त्यास चैन पडेनासें झालें. तेव्हां तो आपल्या बागेंत एका वृक्षाखालीं जाऊन बसला व चिंतन करूं लागला;तेव्हां

* शाकवृक्षप्रतिछन्नं वासं यस्माच चक्रिरे ।
तस्मादिक्ष्वाकुवंश्यास्ते शाक्या इति बुधैः स्मृताः ॥

सुंदरानन्दचरित.

अमरकोशाची शाक्यसिंह शब्दावरची रायमुकुटाची टीका पहा.

बुद्धानें आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्यानें वैदिकादि सर्व इतर धर्मांवर आपलें वर्चस्व करून सोडलें होतें. त्याच्यांत विलक्षण गुण होते, त्यामुळें सर्व जग अज्ञानांत बुडालें आहे असें त्यास दिसलें. मग तो बराच वेळ विचारांत गढून गेला असतां तेथें एक पुरुष त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां दोघांचा बराच वेळ संवाद झाल्यावर त्या पुरुषानें सिद्धार्थास म्हटलें, ' रोगी वैद्याकडे आपला रोग दूर करण्याकरितां गेला नाहीं तर त्यांत वैद्याकडे काय दोष आहे ? याप्रमाणें प्रपंचांतील दुःखांतून मुक्त होण्याकरितां जे उपाय आहेत ते न केले तर त्याचा बोल दुसऱ्याकडे काय आहे ? हे सिद्धार्था, तूं धर्मराज असून धर्मस्थापनेकरितां उत्पन्न झाला आहेस. ' इतकें बोलून तो पुरुष अदृश्य झाला. त्या पुरुषाच्या ह्या भाषणानें सिद्धार्थाच्या अंतःकरणांत बराच प्रकाश पडला व तो त्या विचारांत अगदीं निमग्न झाला. पुढें एके दिवशीं राजवैभव व त्यापासून प्राप्त होणारीं सर्व नश्वरसुखें सोडून जावयाचें, असा त्यानें निश्चय केला. जाते वेळीं त्याला वाटलें कीं एकदां आपल्या बालकास जवळ घेऊन मग जाण्याचें करावें. नंतर तो रात्रीं आपल्या स्त्रीच्या मंदिरांत गेला आणि पाहूं लागला तों आपली सुंदर व तरुण स्त्री मुलास पोटाशीं घेऊन निजली आहे ! तें पाहून त्याच्या मनांत आलें कीं, मीं जर या बालकास उचलून जवळ घेतलें तर ही जागी होईल. याकरितां हें उपयोगी नाहीं. मग तो विरक्त झाला होता तरी त्या दोघांकडे पाहून त्याचा कंठ दाटून येऊन त्यास गहिंवर आल्यावांचून राहिला नाहीं ! नंतर तो तें विघ्न समजून त्या मोहपाशांत न गुंततां तेथून निघून गांवाबाहेर गेला. ऐहिक सुखाचा त्याग करणें आणि परमार्थ साधण्याकरितां स्त्रीच्या सहवासांतून मुक्त होणें हाच निर्वाणास पोंचण्याचा मार्ग ! असें त्याचें मत होतें. तो प्रथम कोसलदेशांतून लोकांस उपदेश करीत करीत उरुवेला [ ह्या स्थानास *बुद्धगया असें ह्मणतात, ] ह्या ठिकाणीं गेला, तेथें जिकडे तिकडे वृक्ष, वल्ली, व स्वच्छ उदक हीं पाहून तें स्थान त्यास फारच आवडलें, तेथें एक्या पिंपळाच्या [ ज्यास बोधिवृक्ष किंवा ज्ञानवृक्ष असें ह्मटलें आहे, ] वृक्षाखालीं त्यानें पांच वर्षे तपश्चर्या केली व त्यामुळें त्याचे अंतःकरणांत ज्ञानकला प्रकट होऊन त्यास साक्षात्कार झाला व तो बोधिसत्व [ज्ञानी] झाला, नंतर तो बुद्ध-हिंसा न करणें, खरेपणानें वागणें वगैरे गोष्टींविषयीं--उपदेश करीत करीत मगध [बहार] देशांत गेला, त्याचा उपदेश ऐकणारांच्या मनावर इतका ठसला कीं, मगधदेशचा राजा व दुसरेहि पुष्कळ थोर थोर लोक त्याचे शिष्य झाले, पुढें त्याचे शिष्यसंघ जिकडे तिकडे पसरून त्यांनीं बौद्धमताचा प्रसार पुष्कळच केला, बुद्धानें काशीस वगैरे जाऊन आपल्या मताचा तेथेंहि प्रसार केला, त्यानें फिरून आपल्या आईबापांची व स्त्रीपुत्रांची भेट घेतली, परंतु पूर्वींचें नातें न धरितां त्यानें आपल्या घरीं भिक्षा मागून त्यांच्या आग्रहावरून त्यांनां इतर लोकांप्रमाणेंच उपदेश केला, पुढें बुद्धाची स्त्री व पुत्र

* बुद्धगया ही पाटणाचे दक्षिणेस आहे.

त्याचे प्रतिपक्षी ब्राह्मण यांनीं देखील परमेश्वराच्या मत्स्यादि दशावतारांतला हा एक अवतार आहे असें पुराणांतून सुद्धां वर्णिलें आहे!

सुमारें हजार पंधराशें वर्षें बौद्धधर्माची चढती कळाच होती. व त्या काळीं प्रायः सर्वत्र त्या धर्माचीच प्रवृत्ति झाली होती, असें लक्षांत येतें. कारण, त्या धर्मास उतरती कळा लागण्याचे सुमारास देखील वैदिकधर्म सोडून ब्राह्मण व राजे यांनीं बौद्धधर्म स्वीकारल्याचीं उदाहरणें हर्षचरितांत सुद्धां आढळतात. यावरून त्या काळच्या लोकांस बौद्धधर्म विशेष ग्राह्य वाटला होता यांत कांहीं संशय नाहीं. तो धर्म लोकांस विशेष प्रिय होण्याचें कारण, हिंसा न करणें, दया करणें, परोपकार करणें इत्यादि होय. हर्षचरितांतच 'करुणाकुलगृहं च भगवतः शाक्यमुनेः शासनम्' 'सकलजनोपकार-सज्जा सज्जनता जैनी' इ० त्या धर्माचीं मुख्य तत्त्वें प्रसंगानें सांगण्यांत

---

यांनीं बौद्धधर्माचाच स्वीकार केला, इत्यादि अनेक गोष्टी बौद्धग्रंथांत आहेत, बुद्धाचें निर्वाण ईसवी सनापूर्वी ५४३ वे वर्षी वैशाखशुद्धपौर्णिमेस कुशीनगर या ठिकाणीं झालें.

१ ततः कलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषाम् ।
बुद्धोनाम्नाजनसुतः कीकटेषु भविष्यति ॥

भागवत स्कन्ध १ अध्याय ३०

अग्निरुवाचः—वक्ष्ये बुद्धावतारंच पटतः शृण्वतोऽर्थदम् ।
पुरा देवासुरे युद्धे दैत्यैर्देवाः पराजिताः
रक्षरक्षेति शरणं वदन्तो जग्मुरीश्वरम् ।
मायामोहस्वरूपोऽसौ शुद्धोदनसुतोऽभवत् ॥

अग्निपुराण अध्याय १६

शंकराचार्यांनीं केलेल्या दशावतारस्तुतींत बुद्धाचें वर्णन आहे!

आतां महाभारतांत विष्णूचे अवतार सांगितले आहेत. त्यांत ऐके ठिकाणीं बुद्धाचें नांव आहे व दुसरे ठिकाणीं नाहीं. दोन्ही पाठ खालीं दिले आहेत.

भारत, शांतिपर्व, अध्याय ३३९ यांत दहा अवतार सांगितले आहेत ते असेः—

'हंसः कूर्मश्च मत्स्यश्च प्रादुर्भावाद्द्विजोत्तम ॥
वराहो नारसिंहश्च वामनो राम एवच ॥
रामो दाशरथिश्चैव सात्वतो कल्किरेवच' ॥

'हंसः कूर्मो वराहश्च नर सिंहोऽथवामनः ॥
रामो रामश्च रामश्च बुद्धः कल्कीति ते दश' ॥

असें महाभारतांत एकाच अध्यायांत दोन पाठ असल्यामुळें घोटाळा वाटतो!

आलीं आहेत. जयदेवकवीनें ' गीतगोविंदांत ' एक्या अष्टपदींत बुद्धाचें वर्णन केलें आहे.

" निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातम्—
सदयहृदय दर्शितपशुघातम् ।
केशव धृतबुद्धशरीर जय जगदीश हरे " ॥ धृ० ॥

याचें तात्पर्य असें कीं, ईश्वरा! तूं सदय होऊन बुद्धावतार धारण करून यज्ञांत पशुहिंसा सांगितली तिचा निषेध केलास !

यावरून बुद्धाचें महत्त्व किती वाढलें होतें हें लक्षांत येतें !

ख्रिस्ती शकाच्या पांचसहाशें वर्षांनंतर त्या धर्मांतच अनेक मतभेद झाल्यामुळें असो, किंवा वैदिक व जैनधर्म यांचें प्राबल्य वाढत गेल्यामुळें असो; बौद्धांस हा देश सोडून तिबेट, चीन, जपान, व सिंहलद्वीप इत्यादि ठिकाणीं जावें लागलें असावें; किंवा त्या धर्माचे उपदेशक त्या त्या देशांत जाऊन त्यांनीं तेथें तेथें त्या धर्माचा प्रसार केला असावा, असें वाटतें. सातव्या व आठव्या शतकांत तर शबरस्वामी, कुमारिलभट्ट इ० मीमांसक व शंकराचार्यप्रमुख वेदांती आणि समंतभद्र, प्रभाचंद्र, विद्यानंद व अकलंक इत्यादि जैनधर्माभिमानी थोर थोर विद्वान् उत्पन्न झाल्यामुळें आणि त्यांनीं बौद्धमतावर हल्ले केल्यामुळें व त्याचप्रमाणें तदनुयायी राजे व लोक यांनीं बौद्धांचा छळ केल्यामुळें त्यांचा इकडे बराच मोड झाला असावा. तथापि पुढें बरेच दिवस हिंदुस्थानांत तो धर्म बऱ्याच जोरानें चालू होता, यांत कांहीं संशय नाहीं.

---

१ बौद्धधममावर हल्ले सुरू होते. याबद्दल एन्शंट जागृफीतील लेखावरूनहि लक्षांत येण्यासारखें आहे.—

' We hear nothing more of Sravasti until one century after Kaushik or five centuries after Budha, when according to Hiuen Tsiang, Vikramaditya, king of Sravasti, became persecutor of Budhists and the famous Manorhita, the author of the Vibhasha Shastra being worsted in arguments by the Brahmins put himself to death.

During the reign of his successor, whose name is not given, the Brahmins were overcome by Vasubandhu, the eminent disciple of Manorhita. '

Ancient Geography of India by A. Cunningham.

हुएनत्संग याच्या प्रवासवृत्तांतहि या संबंधानें असाच साधारण उल्लेख आहे.

 11 JAN 1994

इसवी स. ६७५ च्या सुमारास बौद्धधर्मी **चिनीयात्रेकरू इट्सिंग** हा **हिंदुस्थानांत** आला होता. त्यावेळींहि इकडे बौद्धधर्म बराच प्रचलित होता. असें त्याचें वर्णनांत आहे. तो येण्याचेपूर्वीं इकडे नुक्ताच होऊन गेलेला प्रसिद्ध **भर्तृहरि** हा बौद्ध होता, असें **इट्सिंग** यानें ह्मटलें आहे. आपले विद्वान् ग्रंथकार **वाचस्पतिमिश्र** ह्यांनीं आपल्या '**तत्त्वबिंदु**' नांवाच्या ग्रंथांत **भर्तृहरीस** बाह्य ( धर्मबाह्य, बौद्ध. ) असें ह्मटलें आहे, यावरून तर उघडच झालें. फार दूर कशाला? **हर्षचरितावरून** देखील त्यावेळीं बौद्धधर्माचें बरेंच प्राबल्य असल्याचें लक्षांत येतें. **हर्षचरितां-तच हर्षानें** ह्मटलें आहे. '**मैत्रायणी**शाखेचा विद्वान् ब्राह्मण **दिवाकरमित्र** यानें तरुणपणींच वैदिकधर्म सोडून बौद्धदीक्षेचा स्वीकार केला!' "**श्रूयतेहि तत्रभवतः सुगृहीतनाम्नः स्वर्गतस्य ग्रहवर्मणो बालमित्रं मैत्रायणीयस्त्रयीं विहाय ब्राह्मणायनो विद्वानुत्पन्नसमाधिः सौगतमते युवैव काषायाणि गृहीतवानिति**" पुढें **हर्षाचा** वडील बंधु **राज्यवर्धन** हा तर बौद्धधर्मी झाला होताच, असें '**परमसौगतः**' या **ताम्रपत्रांतील** पदावरून स्पष्ट होतें. बौद्धधर्माचे अत्यंताभिमानी राजे झाले, त्यांत प्रमुखत्वानें **अशोक**[२]

---

१ भर्तृहरि यानें व्याकरणशास्त्रांत 'वाक्यपदीय' नांवाचा ग्रंथ केला आहे, भर्तृहरि हा इ.स. ६५० सांत मरण पावला, असें इट्सिंग यानें म्हटलें आहे.

२ह्या बौद्धधर्मी थोर पुरुषाचें संक्षिप्त चरित्र 'अशोकचरित','अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया' वगैरे ग्रंथांतून संगृहीत करून येथें दिलें आहे.

ग्रीसदेशाचा प्रसिद्ध योद्धा आलेक्झ्यांडर हा हिंदुस्थानावर स्वारी करून परत गेल्यावर इतर ग्रीक योद्ध्यांनीं हिंदुस्थान हस्तगत करण्याकरितां प्रयत्न केले. परंतु चंद्रगुप्तानें त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. चंद्रगुप्तानें आपली भावजय ध्रुवदेवी इची कामना करणाऱ्या शकपतीचा--तिचा वेष स्वतः आपण घेऊन--शिरच्छेद केला, असें हर्षचरितांत आहे. *चंद्रगुप्त हा बलाढ्य राजा होता. त्यानें ग्रीक राजाच्या मुलीशीं लग्न केलें होतें, त्याचें लक्ष पराक्रम करण्याकडे फार होतें. हा मौर्यवंशाचा आदि-पुरुष होय. इ० सनापूर्वीं २९७ व्या वर्षी तो मेल्यावर त्याचा पुत्र बिंदुसार गादीवर बसला. त्याला दोन मुलगे होते. थोरला सुशिमा व धाकटा अशोक. अशोक हा कुरूप व क्रूर होता, ह्मणून सर्व लोक त्याला भीत असत. त्याचा बाप बिंदुसार हा त्याच्या दुष्ट स्वभावास कंटाळला होता; ह्मणून त्यानें त्याला आपल्यापासून दूर राहण्या-करितां तक्षशिला ( पंजाब ) येथें बंड उपस्थित झालें होतें त्यावर पाठविलें, तेथील

* 'अरिपुरेच परकलत्रकामुकं कामिनीवेशगुप्तश्चंद्रगुप्तः शकपतिमशातयदिति'

ह- च- उ- ६

**राजाची गणना आहे. त्याच्या कारकीर्दीत बौद्धधर्मास फारच उत्तेजन मिळून अगदीं पराकाष्ठा झाली !**

---

लोकांनीं अशोकाचा सन्मान केला व 'येथील अधिकाऱ्यांच्या जुलमी वर्तनामुळें आह्मीं बंड केलें' असें सांगितलें. अशोकानें या गोष्टीचा बंदोबस्त केला. त्यानें तेथें असतां काश्मीरदेशावर स्वारी केली व चहूंकडे आपला दरारा बसविला.पुढें अशोकाची बदली उज्जयनी येथील सुभेदारीच्या कामावर केली. तो तिकडे जात असतां त्याचा मुक्काम वीसनगर येथें पडला असतां तेथील एका गृहस्थाच्या मुलीशीं त्यानें विवाह केला. 'न रूपमालोकयते'!असें लक्ष्मीचें वर्णन बाणानें केलें आहे तें व "स च दर्शनीयः सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति" असें भर्तृहरीनें ह्मटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे, ह्मणूनच तेथील गृहस्थास अशोकाचें कुरूप न दिसतां सुस्वरूपच दिसलें ! पुढें अशोक उज्जयनीस गेला.

इकडे तक्षशिला येथील लोकांनीं पुनः बंड केलें तें मोडण्यास बिंदुसारानें यावेळीं सुशिमास पाठविलें. मागें बिंदुसारास असाध्य व्याधि होऊन तो मरणोन्मुख झाला. सुशिमावरहि कांहीं कारणानें राजाची मर्जी खप्पा झाली होती, यामुळें गादी कोणास द्यावी ह्मणून त्यानें आपल्या प्रधानास विचारलें. प्रधानाचें व सुशिमाचेंहि बिघडलें होतें, त्यामुळें त्यानें अशोकास ती देण्याविषयीं राजाचें मन वळविलें. तथापि त्यानें असें ठरविलें कीं तूर्त अशोकानें राज्यकारभार पहावा व सुशिमा आल्यावर तो त्यास द्यावा. आपला अंतकाळ जवळ आला असें पाहून त्यानें सुशिमास बोलावून आणण्यास प्रधानास सांगितलें. परंतु त्यानें तसें न करितां अशोकासच बोलावून आणिलें! त्यास पहातांच राजाला इतका संताप आला कीं, तो लागलींच बेशुद्ध पडला. तो पुनः शुद्धीवर आला नाहीं! हा राजा इ. स. पूर्वी २७१ व्या वर्षी वारला. पुढें अशोकानें राज्य बळकाविलें. बाप वारल्याचें कळतांच सुशिमा तेथून निघाला. वाटेंतच त्याला अशोकानें राज्य बळकावलें असें समजलें. तेव्हां त्याला संताप येऊन व कांहीं सैन्य जमा करून तो अशोकावर चालून गेला. अशोक हा स्वतः शूर असून त्याच्या ताब्यांत पुष्कळ सैन्य होतें, यामुळें सुशिमाचा मोड करण्यास त्यास अडचण पडली नाहीं. अशोकानें क्रूरपणानें आपल्या बंधूंची कत्तल केली, असेंहि वर्णन आहे. "नाभिजनमीक्षते"! असें बाणानें लक्ष्मीच्या करामतीचें वर्णन केलें आहे तें खोटें नाहीं! असो,त्याच्या भावांपैकीं तिष्य हा बौद्धजती झाला, त्यावर मात्र त्यानें शस्त्र चालविलें नाहीं. बंधुवधाची गोष्ट खोटी असेंहि कित्येक ह्मणतात. अशोकानें कालिंगदेश जिंकला, तेव्हां दोन्ही पक्षांकडील एक लक्ष प्राणहानि झाली यामुळेंच त्यास क्रूरकर्माचा पश्चात्ताप झाला असेंहि कोणाचें मत आहे. त्याच्या राज्याभिषेकासंबंधानें अनेक मतभेद आहेत, तथापि तो इ० स० पूर्वी२७२व्या वर्षी सिंहासनावर बसला व इ० स० पूर्वी २४० सांत तो बौद्धजती झाला असें व्हिन्सेंट स्मिथचे इतिहासांत आहे.

## हर्षाच्या वेळीं हुएनस्यांगचा हिंदुस्थानांतील प्रवासकाल.

बौद्धधर्मी चिनीयात्रेकरू हुएनस्यांगच्या लेखावरून हर्षाच्या जीवितकालाचा निर्णय करण्यांत आला आहे.

दूरदेशीं असलेल्या बौद्धधर्मी लोकांपैकीं कांहीं लोक आपल्या पूर्वजांची

---

इ० स० पूर्वी २४९ साव्या वर्षी तो आपला गुरु उपगुप्त याजबरोबर यात्रा करण्यास गेला. त्यानें बुद्धाचें जन्मस्थान-कपिलवस्तु याचें दर्शन घेतलें. त्या ठिकाणीं त्यानें एक स्तंभ उभारून त्यावर भगवान् बुद्ध या ठिकाणीं अवतरला, असें कोरून ठेविलें आहे. ज्या बोधिवृक्षाखालीं बुद्धानें तप केलें व मार [कामरूपी] असुरावर जय मिळविला, तें गयाजवळचें स्थान व जेथें त्याचें निर्वाण झालें तें कुशीनगर इत्यादि पवित्र स्थळें उपगुप्तानें अशोकास दाखविलीं. अशोकानें जागजागीं विहार, स्तूप, धर्मशाळा व धर्मानुशासनें कोरून ठेविलीं आहेत. त्यानें आपल्या राज्यांत पशुहिंसा बंद केली व अनेक खातीं करून राज्यपद्धति व्यवस्थेशीर केली. त्यानें काठेवाड येथें गिरनार नांवाचें सरोवर करून त्याचे व इतर नद्यांचे कालवे काढून कृषिकर्मास उत्तेजन दिलें. त्यानें रस्त्यांत खांब पुरून कोस दाखविले. शेतीच्या उत्पन्नांतून तो चतुर्थांश कर घेत असे आणि उद्योगधंदा व कला यांस उत्तेजन देत असे. उपद्रव व आज्ञाभंग करणारांस तो कडक शिक्षाहि करी. पूर्वी जितका निष्ठुर, तितका पुढें तो दयाळु झाला. त्यानें दूर देशीं भिक्षु पाठवून लोकांस बौद्धधर्मोपदेश करून त्या धर्माचा फार प्रसार केला. त्यानें आपला भाऊ महींद्र व बहीण संघमित्रा यांनां धर्मप्रसाराकरितां सिंहलद्वीपांत पाठविलें. अशोकाची मुलगी चारुमती ही आपल्या बापाबरोबर नेपाळांत गेली होती, ती तिकडेच राहिली व तिनें तिकडे बौद्धधर्माचा प्रसार केला व आपला पति देवपाल याच्या स्मरणार्थ एक नगर वसवून त्याला देवपत्तन असें नांव ठेविलें. अशोक हा चक्रवर्ती राजा होता. त्यानें सुमारें ४० वर्षें राज्य केलें. ह्या मौर्यवंशांतल्या अशोकराजाची कारकीर्द इ. स. पूर्वी २७२ पासून इ. स. २३१ पर्यंत असल्याबद्दल इतिहासांत वर्णन आहे. अशोकाचा इतिहास असावा तितका उपलब्ध नाहीं, तथापि त्याच्या कोरीव लेखामुळें ऐतिहासिक माहितीस बराच उपयोग झाला आहे. अशोकवर्धनाचें वर्णन विष्णुपुराणांत आहे. ह्या मौर्यराजाचें साम्राज्य १३७ वर्षें होतें. इ. स. पूर्वी १८४ व्या वर्षी मौर्यवंशांतला शेवटचा पुरुष ×बृहद्रथमौर्य यास त्याचा सेनापति पुष्पमित्रशुंग यानें सैन्य दाखविण्याच्या मिषानें मारलें व त्याचें राज्य आपण बळकाविलें असें हर्षचरितांत आहे. वायुपुराण आणि विष्णुपुराण यांत मौर्यराजांची वंशावळ आहे. शुंगवंशोद्भवराजांनीं

× 'प्रज्ञादुर्बलं च बलदर्शनव्यपदेशदर्शिताशेषसैन्यः सेनानीरनार्यो मौर्यं बृहद्रथं पिपेष पुष्पमित्रः स्वामिनम् ।'

मूलस्थानें व पुण्यक्षेत्रें पाहण्याकरितां हिंदुस्थानांत येत असत. इ० स० ६२९ या वर्षी चिनीयात्रेकरू हुएनस्यांग हा हिंदुस्थानांत आला होता. तो प्रथमतः काश्मीराकडून प्रवास करीत इ० स० ६३३-३४ या वर्षी नालंद[1] येथें आला. त्या ठिकाणीं तो पांच सहा वर्षे राहिला होता हर्षराजाची त्यानें भेट घेतली होती व त्याच्या सहवासास तोहि कांहीं दिवस होता. इ० स०६३९-४० यांत तो दक्षिणेकडे प्रवास करण्यास गेला. सत्याश्रय-पुलकेशीराजाचीहि त्यानें भेट घेतली होती दोन वर्षे प्रवास केल्यानंतर तो इ० स० ६४३-४४ च्या सुमारास प्रयाग येथें आला. तेथें गरीब गुरीब, भिक्षु वगैरे लोकांस हर्षानें पुष्कळ दानधर्म केला. तो त्यानें प्रत्यक्ष पाहिल्याबद्दल आपले प्रवासवृत्तांत लिहिलें आहे. त्यानंतर हुएनस्यांग हा इ०स० ६४५ या वर्षी चीनदेशास परत गेला. याप्रमाणें त्यानें सुमारें १६ वर्षे हिंदुस्थानचा प्रवास केला. इतक्या कालावधींत त्यानें ११० प्रदेश पाहून व तेथील अनेक राजांच्या भेटी घेऊन त्या त्या ठिकाणच्या

---

११२ वर्षे राज्य केलें. शुंगराजांपैकीं शेवटला +देवभूतिशुंग याला त्याचा काण्व प्रधान वसुदेव यानें दासीच्या मुलीस राणीचा वेष देऊन फसवून मारलें व त्याचें राज्य बळकावलें असें बाणाच्या हर्षचरितांतहि आहे. पुष्पमित्रराजाचा मुलगा अग्निमित्र याचें कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकांत वर्णन आहे. शुंगराजांनीं ११२ वर्षे राज्य केलें. पुढें काण्व राजे झाले. त्यांनीं ४५ वर्षे राज्य केलें. नंतर आंध्रराजे व नंतर गुप्तराजे झाले. ह्या राजांनीं पांचव्या व सहाव्या शतकांत राज्य केलें. बाणकवीच्या आजापणजांस गुप्तराजांचा आश्रय होता. गुप्तांच्या वेळेस हूणराजांनीं हिंदुस्थानचें राज्य घेण्याचा प्रयत्न केला. परंतु गुप्तांनीं तो सिद्धीस जाऊं दिला नाहीं. गुप्तानंतर प्रतापवर्धन, 'राज्यवर्धन,हर्षवर्धन हे राजे झाले. प्रभाकरवर्धनानें हूणांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्याचे पुत्र राज्यवर्धन व हर्षवर्धन यांनींहि हूणादिकांवर स्वाऱ्या करून त्यांचा अगदीं मोड केला व हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापिलें. *अशोकानंतर महापराक्रमी ह्मणण्यासारखा असा हर्षराजा झाला. त्याच्या संबंधानेंच ह्या निबंधांत विवेचन केलें आहे.

१ हें बौद्धधर्मीलोकांचें स्थान गयेजवळ इशान्येस बारगांवापासून सात मैलावर आणि बुद्धगयेपासून पन्नास मैलांवर आहे.

+ ' अतिस्त्रीसंगरतमनंगपरवशं शुंगममात्यो वसुदेवो देवभूतिं दासीदुहित्रा देवीव्यञ्जनया वीतजीवितमकारयत् । '

* चंद्रगुप्त, त्याचा पुत्र बिंदुसार, त्याचा अशोकवर्धन यांचें वर्णन विष्णुपु. अ०४ यांत आहे.

लोकांच्या रीतीभाती, धर्म, आचार, पराक्रम इत्यादिकांचीं टिपणें करून घेतलीं.

**हुएनस्यांग**च्या **हिंदुस्थानां**तील प्रवासकालच्या टिपणांवरून त्याच्या शिष्यांनीं **चिनी** भाषेंत दोन ग्रंथ केले आहेत. त्यांचीं **फ्रेंच, जर्मन** वगैरे भाषेंत भाषांतरें होऊन व नंतर त्यांचीं **इंग्रजीं**तहि भाषांतरें होऊन तीं प्रसिद्ध झालीं आहेत. **हुएनस्यांगनें** जी माहिती दिली आहे, ती विद्वानांस बरीच संमत असल्याची प्रसिद्धि आहे.

## बाणाच्या वर्णनाशीं हुएनस्यांगवर्णित बऱ्याच गोष्टींचा मेळ आणि हर्ष व बाण यांचा कालनिर्णय.

**हुएनस्यांगनें** दिलेलीं नांवें,ह्मणजे **उत्तरहिंदुस्थान**चा राजा **हर्षवर्धन**,त्याचा बाप **प्रभाकरवर्धन**, भाऊ **राज्यवर्धन**, बहीण **राज्यश्री**, प्रधान **भानी**, ( यास **हर्षचरितांत भंडी** असें ह्मटलें आहे ). तो युद्धांत हस्तिसैन्याचा[1] उपयोग करीत असे, त्याचा भाऊ **राज्यवर्धन**, यास शत्रूनें विश्वासघातानें मारलें, व नंतर तो शत्रूचा सूड उगविण्याकरितां व दिग्विजय करण्याकरितां निघाला; **हर्ष** व **आसामचा** राजा **कुमारभास्करवर्मा** यांची मैत्री होती. **सत्याश्रयपुलकेशी**बरोबर **हर्षा**चा संग्राम झाला. इत्यादि प्रकारचीं नांवें व गोष्टी **हर्षचरितां**तील नांवांशीं व गोष्टींशीं जमतात. यावरून बाणकवीनें वर्णन केलेला **हर्ष** व **हुएनस्यांगनें** वर्णन केलेला **हर्षवर्धन**[2] हा एकच असें सिद्ध होतें, व सातव्या शतकांत हर्षराजा असल्याबद्दल खात्री होते.

---

१ हस्तिसैन्य बरोबर घेऊन हर्ष युद्धास जात असे, असें हर्षचरितांतील निरनिराळ्या ठिकाणच्या लेखांवरूनहि लक्षांत येतें:—

' असावकथयत् एष खलु देवस्यौपवाह्यो बाह्यं हृदयं, जात्यंतरित आत्मा, बहिश्चराः प्राणाः, विक्रमक्रीडासुहृद्दर्पशात इति यथार्थनामा वारणपतिः ' ।

' प्रभातायांच शर्वर्यां प्रातरेव प्रतीहारमादिदेश । अशेषगजसाधनाधिकृतं स्कंदगुप्तं द्रष्टुमिच्छामीति '।

' अतः शीघ्रं प्रवेश्यंतां प्रचारनिर्गतानि गजसाधनानि नक्षाम्यत्यतिस्वल्पमप्यार्यपरिभवपीडापावकः प्रयाणविलंबम् ' ।

' करेणुकयोह्यमानो दिग्विजयाय निर्जगाम महीपतिः '

२ शिलालेखांत व ताम्रपटांत हर्ष यास कोठें कोठें हर्षवर्धन असें ह्मटलें आहे; व हुएनस्यांग यानेंहि असेंच ह्मटलें आहे. परंतु हर्षचरितांत मात्र हर्ष असेंच आहे.

## या कालनिर्णयास आणखी ताम्रपट व शिलालेख यांतील प्रमाणें.
### ( हर्ष आणि पुलकेशी यांजमधील युद्धाचा उल्लेख )
### ( कालिदास व भारवी यांचा निर्देश. )

या गोष्टीच्या ( कालनिर्णयाच्या ) पुष्टीकरणार्थ आणखीहि प्रमाणें सापडलीं आहेत. **हर्ष** हा पराक्रमी राजा होता व त्यानें पुष्कळ राजे पादाक्रान्त केले होते, तथापि **नर्मदेच्या** दक्षिणेस राज्य वाढविण्याचा जेव्हां त्यानें प्रयत्न केला, तेव्हां **वातापी** उर्फ **बदामीपुरीचा चालुक्यवंशांतला** राजा दुसरा **सत्याश्रयपुलकेशी** यानें **हर्षास नर्मदेच्या** अलीकडे येऊं दिलें नाहीं अशाविषयीं आधार सापडला आहे.

ह्या **सत्याश्रयपुलकेशीच्या** वंशजांकडून अग्रहार दिल्याबद्दल जे **ताम्रपत्र**लेख देण्यांत आले-त्यांपैकीं जे सापडले आहेत. ते '**इंडिअन ऍंटिक्वेरी**' नांवाच्या पुस्तकांत छापले आहेत. त्यांत असा मजकूर आहे कीं, ' युद्ध करण्याविषयीं निष्णात असलेल्या उत्तरदेशाधिपति **हर्षवर्धनराजाचा** पराभव केल्यामुळें ज्याला परमेश्वर ह्मणूं लागले, असा पृथ्वीपति महाराजाधिराज **सत्याश्रय** ' इ०

" **समरसंसक्तसकलोत्तरापथेश्वरश्रीहर्षवर्धनपराजयोपलब्धपरमेश्वरापरनामधेयः सत्याश्रयः श्रीपृथ्वीवल्लभमहाराजाधिराजः** " इ०

[1] या व पुढील **शिलालेखांतील** वर्णनांवरून **सत्याश्रयपुलकेशी** हा शके ५३२ ह्मणजे इ०स० ६१०-११ सालीं गादीवर बसला, तो शके ५५६ ह्मणजे इ० स० ६३४ सालापर्यंत पराक्रमाचीं कृत्यें करीत होता. हें **ताम्रपत्रांतील** लेखांवरून सिद्ध होतें.

तसेंच आणखी **विजापुर** जिल्ह्यांत '**आयंहोली** ' या गांवीं **सत्याश्रयाचा** आश्रित **रविकीर्तिनामक जैनकवीनें** '**मेगूती**' ( जिनेंद्रभवन ) नांवाचें देवालय बांधिलें; त्यावेळीं शके ५५६ ह्मणजे इ० स० ६३४-३५ ह्या वर्षीं शिलेवर पद्यमय लेख कोरून उभारला आहे. त्या लेखांतील पद्यांत

---

1 Indian Antiquary Vol. VI. and VII. 1878.

२ हा शिलालेख समग्र पहाणें असल्यास प्राचीन लेख माला भाग १ किंवा पुढील पुस्तकांत पहावा. Indian Antiquary, Vol. VIII, 1879; Saka 556 ( A. D. 634-35 )

11 JAN 1994

2 SEP 1996

हा शककाल असून हर्षानें सत्याश्रयपुलकेशीवर स्वारी केली असतां त्यानें हर्षाचा पराभव केला. अशाविषयीं उल्लेख केलेला आहे.

हुएनस्यांगच्या लेखांतहि हर्षानें आपल्या सैन्याची कडेकोट तयारी करून सत्याश्रयपुलकेशीवर स्वारी केली असतां त्याच्या शूरलोकांपुढें याचें कांहीं चाललें नाहीं असा मजकूर आहेच.

वर ह्मटलेल्या शिलालेखांतील कांहीं पद्यें पुढें दिलीं आहेत, त्यांत सदरहू अर्थाचें पद्य आहे व शककालाचेंहि पद्य शेवटीं आहे; यांवरून वरील मजकूर प्रमाणभूत असल्याबद्दल खात्री होईल.

" शूरे विदुषिच विभजन्दानं मानंच युगपदेकत्र ।
अविहितयाथासंख्यः स जयति सत्याश्रयः सुचिरम् ॥

---

1 The king in consequence of his possessing these men and elephants, treats his neighbours with contempt. He is of the Kshatriya caste, and his name is Pulakeshi. His plans and undertakings are wide-spread, and his beneficent actions are felt over a great distance. His subjects obey him with perfect submission. At the present time Silâditya Maharaja has conquered the nations from east to west and carried his arm to remote districts, but the people of this country alone have not submitted to him. He has gathered troops from the five Indies, and summoned the best leaders from all countries and himself gone at the head of his army to punish and subdue these people but he has not yet conquered their troops.

Hiuen Tsiang Vol. II. P. P. 256–57.

At present the great King Silâditya (Harshavardhana) carries his victorious arms from the east to the west; he subdues distant peoples and makes the neighbouring nations fear him, but the people of this kingdom alone have not submitted. Although he be often at the head of all the troops of the five Indies, though he has summoned the bravest generals of all the kingdoms and though has marchaed himself to punish them, he has not yet been able to vanquish their opposition. From this we may judge of their warlike habits and manners."

II Ind. Ant, Vol. VII. P. 291.

प्रतापोपनता यस्य लाटमालवगुर्जराः ।
दंडोपनतसामन्तचर्यावर्या इवाभवन् ॥
अपरिमितविभूतिस्फीतसामन्तसेना-
मुकुटमणिमयूखाक्रान्तपादारविन्दः
युधि पतितगजेंद्रानीकबीभत्सभूतो-
भयविगलितहर्षो येन चाकारि हर्षः ॥
यस्यांबुधित्रयनिवारितशासनस्य
सत्याश्रयस्य परमाप्तवता प्रसादम् ।
शैलं जिनेंद्रभवनं भवनं महिम्नां
निर्मापितं मतिमता रविकीर्तिनेदम् ॥
येनायोजि न वेश्म स्थिरमर्थविधौ विवेकिना जिनवेश्म ।
स विजयतां रविकीर्तिः कविताश्रितकालिदासभारविकीर्तिः ॥
पंचाशत्सु कलौ काले षट्सु पंचशतासु च-( श० ५५६ )
समासु समतीतासु शकानामपि भूभुजाम् ॥ "

शके ५५६ ह्मणजे ( इ० स० ६३४-३५ ) ह्यावर्षी महापराक्रमी **हर्ष**-राजा याचा **सत्याश्रयानें** पराभव केल्याबद्दल वरील लेखांत **रविकीर्तीनें** उल्लेख केला आहे. ' **रविकीर्ति** ' यानें आपण त्या राजाच्या प्रेमांतले असल्याबद्दल, धर्मादिपुरुषार्थ साधण्याकरितां देवालय बांधल्याबद्दल आणि **कालिदास** व **भारवि** यांच्या समान आपण असल्याबद्दलहि त्यांत उल्लेख केला आहे.

सुमारें इ०स० ६२० त **हर्ष** व **सत्याश्रय** यांच्यांत युद्धप्रसंग घडून आला असावा, असें ठरविण्यांत आलें आहे. वरील लेखांतील शककाल आणि ' **उत्तरापथेश्वर** ' ' **हर्षवर्धन,** ' ' **हर्ष** ' इत्यादि नामनिर्देश आणि

१ यावरून ' कालिदास ' व ' भारवि ' हे ह्या कालाच्या पूर्वी होऊन गेले हें अर्थातच सिद्ध झालें.कालिदासाची प्रशंसा तर पुष्कळांनीं केलीच आहे,व बाणकवीनेंहि पुढें दिलेल्या कविप्रशंसेंत फारच चांगल्या रीतीनें केली आहे. त्रिविक्रमभट यानें ' भारवि ' व ' माघ ' यांची प्रशंसा एका पद्यांत केली आहे. ते पद्य सरस वाटल्यावरून येथें दिलें आहे.

" कृत्स्नप्रबोधकृद्वाणी भा रवेरिव भारवेः ।
माघेनेवच माघेन कम्पः कस्य न जायते ! ॥ "

**हुएनस्यांग**चा प्रवासकाल व त्यानें केलेले नामनिर्देश आणि कांहीं गोष्टींचे उल्लेख हे सर्व जमतात. यांवरून **हर्ष**राजा हा सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत होता हें सिद्ध झालें. तेव्हां आतां **हर्ष** जर सातव्या शतकांत होता, तर **बाण**-कविहि त्याच वेळेस होता हें अर्थातच सिद्ध झालें.

**बाणा**च्या ग्रंथांत **बाण** व **हर्ष** यांच्या संबंधानें बरीच माहिती आहे, परंतु कालनिर्देश नसल्यामुळें **हर्ष**राजा, आणि **बाण**, **मयूर**, वगैरे कवि केव्हां झालें, हें समजण्यास मुळींच मार्ग नव्हता, यामुळें त्यांत मोठें व्यंग राहिलें होतें. तें **हुएनस्यांग**च्या ग्रंथावरून व शिलालेखांतील उभयतांच्या संग्रामवर्णनावरून आणि कालनिर्देशावरून दूर होऊन त्यास विशेष महत्व आलें आहे यांत कांहीं संशय नाहीं.

**बाणानें हर्षचरिताच्या आरंभीं वर्णिलेले पूर्वींचे कवि.**

**( प्रसंगानें डॉ० हॉल, बुलर, पिटरसन वगैरेंच्या मतांबद्दल विचार. )**

**बाण**कवीनें हर्षचरितांत प्रारंभीं आपल्यापूर्वीं होऊन गेलेल्या कवींचें व त्यांच्या कवित्वाचें परमादरानें स्तवन करून त्यांजविषयीं आपली पूज्यबुद्धि प्रकट केली आहे. ते कवि हे होतः—

“ नमः सर्वविदे तस्मै व्यासाय कविवेधसे ।
चक्रे पुण्यं सरस्वत्या यो वर्षमिव भारतम् ॥
कवीनामगलद्दर्पो नूनं वासवदत्तया
शक्त्येव पाण्डुपुत्राणां गतया कर्णगोचरम् ॥
पदबन्धोज्वलो हारी कृतवर्णक्रमास्थितिः
भट्टारहरिचंद्रस्य गद्यबंधो नृपायते ॥
अविनाशिनमग्राम्यमकरोत्सातवाहनः
विशुद्धजातिभिः कोशं रत्नैरिव सुभाषितैः ॥
कीर्तिः प्रवरसेनस्य प्रयाता कुमुदोज्ज्वला-
सागरस्य परं पारं कपिसेनेव सेतुना ॥
सूत्रधारकृतारम्भैर्नाटकैर्बहुभूमिकैः
सपताकैर्यशो लेभे भासो देवकुलैरिव ॥
निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु-
प्रीतिर्मधुरसार्द्रासु मञ्जरीष्विव जायते ॥
समुद्दीपितकंदर्पा कृतगौरीप्रसाधना

हरलीलेव नो कस्य विस्मयाय बृहत्कथा
आढ्यराजकृतोत्साहैर्हृदयस्थैः स्मृतैरपि
जिव्हान्तःकृष्यमाणेव न कवित्वे प्रवर्तते ॥ ”

बाणकवीनें आरंभीं शंकर व पार्वती यांनां नमस्कार केल्यावर व्यासाला नमन करून त्याजबद्दल आपली पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे. त्या नंतर वाचाळ व दुसऱ्याच्या कवितेंतील मजकूर घेऊन बदलणारे चोरटे कवि यांचें वर्णन केलें आहे.

“ अन्यवर्णपरावृत्त्या बन्धचिह्ननिगूहनैः ।
अनाख्यातः सतां मध्ये कविश्चौरो विभाव्यते ॥ ”

ह. च. उ. १. पद्य ६.

दुसऱ्या कवींच्या ग्रंथांतील वर्णादिकांची फिरवाफिरव वगैरे करणारा चोरटा कवि विद्वज्जनांमध्यें असला तरी न सांगतांहि कळून येतो! असा याचा अर्थ असून हालसाहेब हे चोर नांवाच्या कवीचें वर्णन आहे असें ह्मणतात. तेव्हां हालसाहेबांनीं आपल्या नांवाप्रमाणें ह्या पद्याच्या अर्थाचे हाल मात्र केले आहेत असेंच ह्मणणें भाग आहे! बुलरसाहेबहि हालासच अनुसरले आहेत ! असो, पुढें कोठकोठल्या कवींत कोणकोणते विशेष गुण असतात, त्यांचें वर्णन केलें आहे —उत्तरेकडच्या कवींत श्लेष गुण, पश्चिमेकडच्या कवींत अर्थगौरव, दक्षिणेकडच्यांत उत्प्रेक्षाद्यलंकार, आणि गौड ( पूर्वेकडच्या ) कवींत अक्षराडंबर-शब्दालंकार-असल्याचें वर्णन केलें आहे. बाणानें व्यासाला ‘सर्वज्ञ’ व ‘कविवेधस्’ (कवींतले किंवा कवींचे ब्रह्मदेव)

---

१ह्या व्यासनमनाच्या पद्यावर पिटर्सनसाहेबांनीं असा तर्क केला आहे कीं बाणाच्या वेळीं महाभारताचें ताजें आश्चर्य ( a fresh wonder ) वाटत नव्हतें काय ? (See Intro. to Kadambari P 68) बाणाच्या वेळीं महाभारताचें अगदीं नवें आश्चर्य होतें असें मला बिलकूल वाटत नाहीं ! तर त्या काळीं त्याचें प्राचीनत्व जगजाहीर असल्याबद्दल बाणाच्याच लेखावरून ठरतें ! “ किं कवेस्तस्य काव्येन सर्ववृत्तान्तगामिनी । कथेव भारती यस्य न व्याप्नोति जगत्त्रयम् ॥ ” भारतीकथेनें जगत्त्रय व्यापलें असल्याचें बाणानेंच जर ह्मटलें आहे तर तिचें त्या कालांतहि प्राचीनत्व उघडच सिद्ध होतें. असें असून साहेबांस महाभारताचें ताजें [ नवें ] आश्चर्य कसें वाटलें तें समजत नाहीं ! सारांश साहेबांनीं मनास वाटेल तसे तर्क चालविले तरी ते विद्वत्तेंत गणले जातात !

 1 1 JAN 1955

अशीं विशेषणें योजिलीं आहेत, तीं किती समर्पक आहेत! ज्यानें आपल्या वाणीनें पुण्यकारक भारत निर्माण केलें. असाही याच पद्यांत उल्लेख आहे.

बाणानें ग्रंथारंभीं जसा व्यासाचा व इतर कांहीं कवींचा नामनिर्देश केला आहे तसा आद्यकवि वाल्मीकि याचा कां केला नाहीं, याबद्दल मनांत मोठी शंका उत्पन्न होते. बाकी बाणाच्या ग्रंथांत 'महाभारतपुराणरामायणानुरागिणा' 'रामायणमिव कपिकथासंकुलं' इत्यादि रामायणाचे अनेक ठिकाणीं उल्लेख आलेले आहेत.

पुढें बाणानें 'कवीनामगलद्दर्पो नूनं वासवदत्तया' असें वासवदत्तेचें वर्णन केलें आहे. तेव्हां कालिदासादि कवींचा गर्व नाहींसा करणारी प्रस्तुत उपलब्ध असलेली वासवदत्ता—तिच्यांतील कवित्वावरून —तशी आहे असें वाटत नाहीं. व्याकरणमहाभाष्यकार पतंजलि यांनीं ('तदधीते तद्वेद' ह्या पाणिनीच्या सूत्रावरच्या 'आख्यानाख्यायिकेतिहासपुरा-

१ भारता संबंधानें गोवर्धनाचार्यांचें पद्यहि फार सरस आहे. तें असें:—

'व्यासगिरां निर्यासं सारं विश्वस्य भारतं वंदे।
भूषणतयैव संज्ञां यदंकिता भारती वहति॥'

गोवर्धनचार्यांनीं व्यासवाणीचा सुपाक व सर्व विश्वांतील सार अशा भारतास नमन करून व्यासाच्या भारतामुळेंच भारती हें नांव धारण करण्यास सरस्वतीस मोठें भूषण वाटतें असें यांत वर्णन केलें आहे. किती खुबीदार पद्य आहे हें!

२ गोवर्धनाचार्यांनीं सप्तशतींत रामायणास आद्यस्थानीं बसविलें आहे:—

"श्रीरामायणभारतबृहत्कथानां कवीन्नमस्कुर्मः।
त्रिस्रोता इव सरसा सरस्वती स्फुरति यैर्भिन्ना॥"

या आर्येत आचार्यांनीं रामायणास श्रीपद जोडून मुख्यस्थानीं बसविलें आहे तें योग्यच आहे व आर्येतला अनुक्रमहि यथायोग्य आहे! कारण, महाभारतांतदेखील रामायणाचें सार दिलें आहे. यावरून व रामायणांतील वाल्मीकीचें पद्य महाभारतांत व्यासांनीं सात्यकीच्या तोंडीं जसेंचें तसेंच घातलें आहे यावरून रामायण हें महाभारताच्या पूर्वीचें असल्याबद्दल उघडच सिद्ध होतें.

अर्जुनानें छिन्नबाहु केलेल्या भूरिश्रव्यास सात्यकीनें युद्धांत मारिलें तेव्हां सर्व योद्धयांनीं सात्यकीचा निषेध केला असतां 'निःशस्त्र झालेल्या अभिमन्यूस अनेक वीरांनीं एकत्र होऊन कसें मारिलें?' हें उदाहरण देऊन, इंद्रजित मायावी सीतेचा वध करूं लागला, तें खरें समजून, हनुमंतानें त्याचें निवारण केलें असतां वाल्मीकीनें इंद्रजिताच्या तोंडीं घातलेला श्लोक सात्यकीनें ह्मटला आहे, तो असा:—

णेभ्यश्च या कात्यायनाच्या वार्तिकावर ) महाभाष्यांत आख्यायिका-काव्याचीं उदाहरणें 'वासवदत्ताख्यायिकामधीते वेद वा वासवदत्तिकः। सौमनोत्तरिकः । अशीं [ ठक् प्रत्ययांत ] दिलीं आहेत. यांवरून "वासवदत्ता" व "सुमनोत्तरा" हीं आख्यायिका-काव्यें पतंजलीच्याहि पूर्वीं होतीं असें लक्षांत येतें. तेव्हां हल्लींची वासवदत्ता इतकी प्राचीन ह्मणजे दोन हजार वर्षांपूर्वींची व अनेक कवींचा गर्व हरण करणारी आहे असें वाटत नाहीं. पूर्वींचीं हीं व दुसरीं आख्यायिका-काव्यें कालगतीनें हल्लीं नष्ट झालीं असावीं असें वाटतें. हल्लींची "वासवदत्ता" हें कथा-काव्य आहे. बाणानें वर्णिलेली "वासवदत्ता" ही प्राचीन आख्यायिका असली पाहिजे. प्रस्तावनेंतहि आख्यायिकेच्यासंबंधानें थोडें विवेचन केलें आहे. मालतीमाधवनाटकाच्या दुसऱ्या अंकांत 'वासवदत्ताच राज्ञे संजयाय पित्रादत्तमात्मानमुदयनाय प्रायच्छदित्यादि' असें भवभूतीनें कामंदकीच्या तोंडीं घातलें आहे. हल्लींच्या वासवदत्तेंत या संदर्भाचा मागमूसहि नाहीं! यावरून बाण, भवभूति इत्यादि प्राचीन कवींनां माहीत असलेली वासवदत्ता निराळीच असावी असें लक्षांत येतें. बाणानंतर थोड्या कालानें झालेल्या वाक्पतिराजकवीनें गौडवधकाव्यांत भास कालिदास इत्यादि कवींचा निर्देश केल्यावर हर्षचरितांतील क्रमाप्रमाणेंच "सौबंधवे बधम्मि हाइयंदे अ आनंदो ॥ सौबंधवेच बंधे हरिचंद्रेच आनंदः । " असा त्या आख्यायिकाकारांचा अनुक्रमानेंच नामनिर्देश केला आहे. तेव्हां पूर्वींच्या "वासव-

---

' अपि चायं पुरा गीतः श्लोको वाल्मीकिना भुवि । '
" न हन्तव्याः स्त्रिय इति यद्ब्रवीषि प्लवंगम " ।
' सर्वकालं मनुष्येण व्यवसायवता सता ' .
" पीडाकरममित्राणां यत्स्यात्कर्तव्यमेव तत् ॥ "

महाभा. द्रोणप. अ. १४३ श्लो. ६७—६८

" न हन्तव्यास्त्रियश्चेति यद्ब्रवीषि प्लवंगम ।
पीडाकरममित्राणां यच्च कर्तव्यमेव तत् ॥ "

वा. रा. यु. कां. अ. ८१

महाभारतांत ' सर्वकालं ' इ० हें श्लोकार्ध अधिक आहे. दोहींत थोडा पाठभेद आहे. परंतु वाल्मीकीरामायणांतला श्लोक महाभारतांत घेतला यांत कांहीं संशय नाहीं. यावरून रामायण हें महाभारताच्या पूर्वींचें असल्याबद्दल उघड होतें.

**दत्ते**" चा कर्ताहि **सुबंधु** नांवाचाच असावा. **कालिदास, बाण** इत्यादि नांवाचे अनेक नामधारी कवि झाले त्याप्रमाणें दोन **वासवदत्ता** व त्यांचे कर्ते दोन **सुबंधुहि** झाले असावे !

**पाणिनी**च्या सूत्रावरची प्राचीन टीका "**काशिका**" व **भट्टोजीदीक्षिता**ची अर्वाचीन टीका '**सिद्धांतकौमुदी**' त्यांतहि आख्यायिका काव्याचें "**वासवदत्तिकः**" हेंच उदाहरण घेतलें आहे.

प्रस्तुत उपलब्ध असलेल्या **सुबंधू**च्या **वासवदत्तेंत बाण**काव्यांतील कांहीं वाक्यें व वाक्यसमूहहि आढळून येतात. **हर्षचरितां**तल्या द्वितीय उच्छ्वासाच्या संध्याकालवर्णनांतील कांहीं भाग हल्लींच्या **वासवदत्तेंत** आढळतो. यावरून कथाकाव्यकर्ता दुसरा **सुबंधु** हा **बाणा**च्या नंतरचा असावा.'**वश्यवाणी कविचक्रवर्ती**' **बाणानें** हल्लींच्या नवीन **वासवदत्तें**तून चौर्य केलें असें कोणाच्या स्वप्नीं सुद्धां यावयाचें नाहीं ! याकरितां याबद्दल विशेष पुरावा द्यावयास नकोच. **हर्षचरितां**तील पुढील सायंकाळचें वर्णन हल्लींच्या **वासवदत्तेंत** प्रायः जसेंचें तसेंच आढळतें.

---

१सुबंधु हें नांव देखील फार प्राचीनकालापासून प्रसिद्ध आहे. ऋग्वेदांतील सर्वानुक्रमांत सुबंधु हा एक स्तोत्राचा कर्ता आहे.

२ काशिकावृत्ति ही दोघा वैयाकरणांनीं केली आहे. जयादित्यानें पहिल्या चार अध्यायांवर वृत्ति केली आहे व पुढच्या चार अध्यायांची राहिली होती, ती, पुढें वामनानें पुरी केली आहे. चिनी प्रवासी इट्सिंग यानें जयादित्याचा उल्लेख आपल्या लेखांत केला आहे. तो हिंदुस्थानांत येण्यापूर्वी सुमारें शंभर वर्षें अगोदर हा पंडित होऊन गेला होता. तेव्हां सुमारें सहाव्या शतकांत हा महावैयाकारण विद्यमान होता, असें उघड झालें.

३ 'निद्राविद्राणद्रोणकुलकलिलकुलायेषु कापेयविकलकपिकुलेष्वारामतरुषु, निर्जिगमिषति जरत्तरुकोटरकुटीकुटुम्बिनि कौशिककुले, मुनिकरसहस्रप्रकीर्णसंध्यावंदनोदबिंदुनिकर इव दंतुरयति तारापथस्थलीं स्थवीयसि तारकानिकुरंबे, अम्बराश्रयिणि शर्वरीशबरीशिखंडे, खंडपरशुकण्टकाले कवलयति बाले, ज्योतिःशेषं सांध्यमंधकारावतारे, तिमिरतर्जननिर्गतासु दहनप्रविष्टदिनकरकरशाखास्विव स्फुरन्तीषु दीपलेखासु, अररसंपुटसंक्रीडनकथितावृत्तिष्विव गोपुरेषु, शयनोपजोषजुषि जरतीकथितकथे शिशयिषमाणे शिशुजने, जरन्महिषमषीमलीमसतमसि जनितपुण्यजनप्रजागरे विजृम्भमाणे भीषणतमे तमीमुखे, मुखरितविततज्यधनुषि वर्षति शरनिकरमनवरतमशेषसंसारशेमुषीमुषि मकरध्वजे, रताकल्पारम्भशोभिनि शम्भलीभाषितभाजि भजति भूषां भुजिष्याजने, सैरन्ध्रीबध्यमानरशनाजालजल्पाकजघनासु जनीषु । इ०' ह. च. आवृ. १ पा. ८९–९० आणि वासव. कल. आ. इ. स. १८५९ पा. १६९--७०

प्राचीन काळीं वासवदत्तेची कथा फार लोकप्रिय होती. बृहत्कथेंतील वत्सराज व वासवदत्ता यांची कथा कथासरित्सागरांत व बृहत्कथामंजरींत घेतली आहे. कालिदासानेंहि मेघदूतांत 'प्रद्योतस्य प्रियदुहितरं वत्सराजोऽत्र जह्रे' इ० वासवदत्तेच्या संबंधानें वर्णन केलें आहे. मालतीमाधव रत्नावली, प्रियदर्शिका इ० नाटकांतहि वासवदत्तेचा निर्देश आहेच. यावरून ही कथा व हें नांव पूर्वीं फारच लोकप्रिय असल्याचें दिसून येतें.

पुढें बाणकवीनें हरिचंद्राच्या गद्यबंधाचा व सातवहान (हाल) याच्या सुभाषितकोशाचा (गाथासप्तशतीचा) उल्लेख केला आहे. हरिचंद्राचा गद्यबंध हल्लीं सापडत नाहीं! नंतर सेतुबंध काव्याचा कर्ता प्रवरसेन याचा व नंतर अनेक नाटकांचा कर्ता भास[1]कवि याचा उल्लेख केला आहे. परंतु भासकवीचें एकहि नाटक हल्लीं उपलब्ध नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय! असे आपले शेंकडों अमोलिक ग्रंथ नाहींतसे झाल्यामुळें आपली किती हानि झाली असेल ती परमेश्वरासच माहीत! भासाचीं नाटकें नाहींतशीं झाल्यामुळें "भासो हासः" ह्या जयदेवकवीच्या उक्तीप्रमाणें कवितारमणीचें हास्यच नाहींसें झालें. असो. भासकवीचीं थोडीं पद्यें मात्र त्याच्या नांवावर कांहीं ग्रंथांतून आढळतात. तथापि त्यावरून देखील तो कविश्रेष्ठ होता असें ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं! मासल्याकरितां त्याचें एकच पद्य पुढें दिलें आहे, त्यांत चंद्रोदय झाल्यावर चंद्रिकेचें वर्णन भ्रांतिमदालंकारांत त्यानें केलें आहे. तें पद्य हें होयः—

"कपाले मार्जारी पय इति कराँल्लेढि शशिनः
तरुच्छिद्रप्रोतान्बिसमितिकरी संकलयति।
रतांते तल्पस्थान् हरति वनिताप्यंशुकमिति
प्रभामत्तश्चंद्रो जगदिदमहो विप्लवयति"

या एका पद्यावरून देखील त्याचें सरस कवित्व असल्याचें दिसून येतें! बाणानें भासाच्या वर्णनांत "सूत्रधारकृतारंभैर्नाटकैर्बहुभूमिकैः"

---

१ कालिदासानें मालविकाग्निमित्रांत भासाचा उल्लेख केला आहे तो असाः— " पारि० मातावत्प्रथितयशसां भासकवि सौमिल्लकविमिश्रादीनां प्रबंधानतिक्रम्य वर्तमानकवेः कालिदासस्य क्रियायां बहुमानः "

असें घातलें आहे. यावरून वेबर व पिटरसनसाहेबांनीं असा तर्क केला आहे कीं हिंदूंचें ग्रीकलोकांशीं दळणवळण पडल्यावर त्यांचीं नाटकें पाहून हिंदूंनीं त्यांचें अनुकरण केलें असावें. जशी कांहीं ईश्वरानें युरोपियनांनांच कायती नाटकग्रंथ करण्याची प्रतिभा दिली आहे, इतरांनां नाहीं! असो. आमच्या साहित्यशास्त्राप्रमाणें नाटकांत सूत्रधार, विदूषक इत्यादि पात्रें अवश्य असलींच पाहिजेत ह्मणून जर नियम आहेत, तर आमचें प्राचीन साहित्यशास्त्रहि ग्रीकलोकांच्या संबधानेंच उत्पन्न झालें असें ह्मणावें लागेल! सारांश युरोपियनांनीं पाहिजेत तसे तर्क करून पांडित्य केलें तरी तें शोभतें इतकेंच! बाकी सर्वच त्यांचे तर्क ग्राह्य असतात असें नाहीं!

यानंतर कालिदासाच्या काव्याची प्रसंशा आहे, व ती यथार्थच आहे. कालिदासाचीं काव्यें सर्वत्र प्रसिद्धच आहेत. पुढें बृहत्कथेचा निर्देश केला आहे. तिचा कर्ता गुणाढ्य नांवाचा कवि होता. बृहत्कथा ह्मणून मूळ पैशाची भाषेंत लक्षश्लोकात्मक मोठा ग्रंथ होता तो नष्ट झाला आहे! त्याचीं संस्कृतांत संक्षिप्त व विस्तृत भाषांतरें—बृहत्कथामंजिरी व कथासरित्सागर—अशीं आहेत व तीं प्रसिद्धच आहेत. पहिल्याचा कर्ता क्षेमेंद्र व दुसऱ्या· चा सोमदेव होय. पुढें बाणानें आढ्यराजकवीचा निर्देश केला आहे. पण याचाहि ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाहीं!

## बाणकवि—त्याचा पुत्र, त्यांचें ग्रंथ, त्यांचें कवित्व, बोधमदस्थळें व त्यावेळची स्थिति इत्यादि.

बाण हा गद्यरचनेंत अग्रगण्य होता यांत कांहीं संशय नाहीं. त्याच्या वाणी· चा प्रवाह शरदृतूंतील गंगेच्या प्रवाहाप्रमाणें प्रसन्न व अस्खलित चाललेला असा दिसतो. त्याची भाषा प्रौढ व रसाळ आहे असें 'वश्यवाणीत्व' क्वचितच आढळेल! हर्षराजानें बाणास, 'वश्यवाणीकविचक्रवर्ती' अशी पदवी दिली ती अगदीं यथार्थ आहे.

---

१ 'भूतभाषामयीं प्राहुरद्भुतार्थां बृहत्कथाम् '। दंडी--काव्यादर्श.

२ चालुक्यराजांपैकीं दुसरा 'जगदेकमल्ल याच्या वेळेस 'दुर्गासिंह' नांवाचा कवि होता, त्यानें 'कर्नाटक पंचतंत्र' नांवाचा ग्रंथ केला आहे. त्यांत त्यानें आपल्या पूर्वीच्या महाकवींचे निर्देश केले आहेत. त्या ठिकाणीं 'अवनिधवचक्रवर्ती नरेंद्रप्रवर हर्ष ' यानें बाणास आपले पदरीं टेविलें होतें व त्यास 'वश्यवाणीकविचक्रवर्ती ' अशी पदवी दिली होती, असें त्या ग्रंथांत लिहिलें आहे. ही माहिती प्रो. पाठक यांनीं त्या पुस्तकांतून सांगितली.

**बाणकवीचे** प्रस्तुत उपलब्ध असे मोठे ग्रंथ दोनच आहेत. **हर्षचरित** व दुसरी **कादंबरी. हर्षचरित** हें **बाणकवीनें** स्वतः आपल्या व ज्याच्या पदरीं तो होता त्या **हर्षराजाच्या** घराण्यांत घडून आलेल्या कांहीं गोष्टींच्या आधारानें रचलेलें आहे. यांतील वर्णन बरेंच ऐतिहासिक असून कवित्वासहि अनुसरून आहे. **कादंबरींतील** कथानक **बृहत्कथेंतून** घेतलेलें आहे. परंतु तें केवळ आधार मात्र होय. **बृहत्कथेचें** विस्तृत भाषांतर **कथासरित्सागर** यांत देखील हें कथानक चार पानांत वर्णिलेलें आहे ( पहा क. स. सा. शक्तियशोलंबक, तरंग ३ ). चार पानांच्या आधारानें येवढा मोठा विस्तीर्ण ग्रंथ **बाणानें** केला आहे,तेव्हां यास मूळग्रंथासारखेंच महत्त्व देणें आवश्यक आहे! **तारापीडराजाच्या** सभेचें वर्णन, राघूस राणीकडे पाठविणें, **तारापीडाच्या** स्नानाचें वर्णन, राजपुत्रासह भोजन, भिल्लांच्या शिकारीचें विस्तृत वर्णन, **तारापीडानें** पुत्राच्या विद्याभ्यासाकरितां विद्यालय बांधून त्यांत **चंद्रापीडास** मित्रांसह ठेवणें, तो तेथून आल्यावर **शुकनास**प्रधानाचा लांबलचक मार्मिक असा उपदेश, यौराज्याभिषेक इत्यादि प्रकरणें पाहिलीं असतां **कादंबरी** हा ग्रंथ मूळग्रंथाप्रमाणेंच झाला असल्याची खात्री होते. **बाणानें** मूळगोष्टींत जागजागीं फेरबदल केले आहेत. **बाणपुत्रानें** तर पुढील संविधानकांत देखील बराच फरक केला आहे. प्रसन्न महानद्यांत जसे तरंगावर तरंग चालतात, तसे **कादंबरींत** व **हर्षचरितांत बाणकवीचे** व त्याच्या पुत्राचे कल्पनातरंग आढळतात. या ग्रंथास यांतील मुख्य नायिका **कादंबरी** ( गंधर्वकन्या ) इचेंच नांव दिलें आहे, व तें साहित्यशास्त्रांतील नियमास अनुसरूनच आहे.

**बाणकवीनें हर्षचरितांत** व **कादंबरींत** आणि त्याच्या पुत्रानें उत्तरार्धांत मधुरवर्णरचना, श्लेषोत्प्रेक्षादि अनेक अलंकार, हुबेहूब वर्णनें, खुबीदार संभाषणें आणि मनास थक्क करणारे शब्दार्थचमत्कार इत्यादि प्रकार इतके सुरेख घातले आहेत कीं, ते वाचीत असतां रसिक विद्वज्जन आनंदरसांत अगदीं तल्लीन होऊन जातात!

**बाण** हा लहानपणीं अनेक देश हिंडून आला असल्यामुळें व त्याची

---

१ मराठींत असा चमत्कार झाला आहे कीं कल्पित गोष्टीस अंधपरंपरेनें ‘ कादंबरी ’ हेंच नांव देण्याचा परिपाठ पडला तो पडला आहे !

निरीक्षणशक्ति तीव्र असल्यामुळें त्याच्या कवित्वांत स्वभावोक्ति, उपमा, दृष्टांत, वगैरे प्रकारांत मार्मिकता येऊन त्याचीं वर्णनें चटकदार झालीं आहेत. **हर्षचरितांत ब्रह्मदेव, सरस्वती, दुर्वास, बाणपूर्वज, बाण, पुष्पभूति, प्रतापवर्धन, यशोवती, राज्यवर्धन,** व **हर्ष** आणि **कादंबरींत वैशंपायन (राघू) जाबालि, हारित, चंद्रापीड, कपिंजल, महाश्वेता, पुंडरीक, कादंबरी** इत्यादि पात्रांचीं स्वभाववर्णनें अगदीं रेखलेलीं आढळतात! **कादंबरींत** तर प्रायः सर्वत्र प्रसादगुण फारच चांगला साधलेला आहे. **हर्षचरितांत** तितका जरी वाटत नाहीं, तरी ऐतिहासिक विषयाचें स्वरूप लक्षांत आणलें असतां पुष्कळ ठिकाणीं तो चांगलाच उठला आहे, असें ह्मणण्यास बिलकूल शंका वाटत नाहीं! आर्यलोकांच्या संस्कृत भाषेची खुबी ज्यांना पहावयाची असेल त्यांनीं **बाण**कवीचे ग्रंथ अवश्य वाचावे !

**हर्षचरितांत** वीर, करुण व अद्‌भुत हे रस बरेच असून **कादंबरींत** शृंगार व करुण हे रस ओतप्रोत भरलेले आहेत व मधून मधून अद्‌भुत रसहि बराच आहे.

गद्यांत जसें विषयप्रतिपादन होतें तसें पद्यांत होत नाहीं हें खरें, तथापि आमच्या संस्कृतकवींचे गद्यग्रंथ ह्मटले ह्मणजे निराळ्या तऱ्हेचे असून कवित्वांत पद्यग्रंथासहि मागें सारणारे असे आहेत! यांत छंदच काय ते कमी, बाकी अलंकारादि सर्व प्रकार यांत उत्तमरीतीनें साधतां येतात. कवि मात्र **बाणभट्टा**सारखा पाहिजे, व म्हणूनच गद्यग्रंथास **' गद्यमयं काव्यं कादंबर्यादि'** असें साहित्यशास्त्रांत ह्मटलें आहे. काव्यांत मनोरंजन असून सृष्टींतील अनेक गोष्टींचा वाचणाऱ्याच्या मनावर ठसा उमटणें, मध्यें मध्यें बोध असणें, ऐतिहासिक गोष्टींशीं संबंध असणें, इत्यादि प्रकार असले तर फारच चांगलें. **हर्षचरितांत** ऐतिहासिक भाग बराच असून बोध व मनोरंजनहि आहे. **कादंबरींत** तर सर्वत्र मनोरंजन असून कांहीं कांहीं भाग बोधपरहि आहेत. दोन्ही पुस्तकांत सृष्टींतील अनेक प्रकारचीं चित्रें वाचकांच्या मनांवर सुरेख उमटण्यासारखे बरेच प्रकार आहेत. **बाण**कवीच्या ह्या दोन्ही पुस्तकांच्या परिशीलनानें आर्यलोकांचें पूर्वींचें वैभव, त्यांचे पराक्रम, आचार, विचार वगैरे अनेक गोष्टी लक्षांत येण्यासारख्या आहेत.

**तारापीडराजानें** नगराबाहेर विस्तीर्ण विद्यालय बांधून त्या ठिकाणीं

अनेक विद्या व कला यांत प्रवीण असलेल्या गुरूंची योजना करून आपला एकुलता एक पुत्र **चंद्रापीड** व आपल्या प्रधानाचा पुत्र **वैशंपायन** यांस विद्याभ्यासाकरितां दहावर्षें पर्यंत तेथें ठेविलें होतें. यावरून अशा प्रकारें विद्याभ्यास करण्याची चाल पूर्वकालीं आमच्यांत होती. तसेंच जागजागीं वेद-शास्त्राध्ययनें चालू असल्याचीं अनेक वर्णनें असल्यावरून, त्या वेळीं स्व-विद्येकडे सर्वांचें चांगलें लक्ष व अभिमान असल्याचें लक्षांत येतें. '**अनेक-गुरूपार्चितपादपङ्कजः**' '**स्फुरन्महावीरसनाथमूर्तिभिः**' इ० वर्णनावरून, तसेंच हर्षराजाच्या उदार आश्रयावरून **बाण**, त्याचे पूर्वज व इतर विद्वज्जन यांस राजेरजवाड्यांकडून चांगला आश्रय मिळून त्यांची मानमान्यता योग्य रीतीनें राहत असे. यावरून पूर्वकालीं राजेरजवाडे यांजकडून विद्वज्जनांस उत्तम प्रकारचें उत्तेजन मिळत असे, असें उघड दिसतें. असें नसतें तर **बाणा**चा बाप त्याचे चवदावे वर्षीं वारला असतां त्याचें वैभव एखाद्या संस्थानिकासारखें होतें, तें कसें राहिलें असतें ?

ह्या दोन्ही पुस्तकांत कांहीं स्थळें बोधपरहि आहेत. '**हर्षचरितांत सरस्वती** हसल्यामुळें क्रोधांध झालेल्या **दुर्वासऋषीस ब्रह्मदेवानें** केलेला उपदेश, **हर्षा**चा बंधू **कृष्णराज** यांचा **बाणकवीस** धैर्योत्तेजनपर निरोप व त्यांत त्याचें दर्शविलेलें सौजन्य, परोपकारकर्तृत्व; तसाच **हर्षा**चा बाप **प्रभाकरवर्धन** यानें आपलेपाशीं सेवक कसे बाळगावे, याविषयीं आपल्या दोघां पुत्रांस केलेला उपदेश, **हर्षा**चा सेनापति **सिंहनाद** यानें **हर्षा**च्या अंगांत वीरश्री येण्यासारखें केलेलें उपदेशपर भाषण व हस्तिसैन्याचा अधिपति **स्कन्दगुप्त** यानें विश्वास ठेवून गैरसावध राहिल्यामुळें कसे कसे घात होतात याविषयीं पूर्वेतिहासांतील अनेक उदाहरणें सांगून त्यास सावध राहण्याकरितां केलेला उपदेश, **दिवाकरमित्रानें हर्षा**स व त्याचे बहिणीस झालेलें असह्य दुःख दूर होण्याकरितां केलेला उपदेश; तसाच **कादंबरींत चन्द्रापीडा**स यौवराज्याभिषेक होण्याच्या वेळेस **शुकनास**प्रधान यानें श्रीमदानें मनुष्य अंध होऊन त्याजकडून कसे कसे प्रमाद घडतात, याविषयीं केलेला विस्तीर्ण व मार्मिक उपदेश आणि **कपिंजलानें पुंडरीकास** विषयासक्तीपासून परावृत्त होण्याविषयीं केलेला उपदेश, इत्यादि स्थळें बोधपर आहेत.

त्याचप्रमाणें मरणसमयीं **प्रभाकरवर्धनानें** 'प्रजारंजनांच्या योगानेंच राजे

पुस्तके

बंधुमान् ह्मणजे साहय्यसंपन्न होतात, स्वज्ञातीच्या योगानें होत नाहींत !' '**प्रजाभिस्तु बंधुमन्तो राजानः न ज्ञातिभिः**' असा **हर्षास** उपदेश केला आहे. ह्या एका वाक्यांतच किती उदात्त तत्त्व भरलें आहे हें राज्यकर्ते व राजपुरुष यानीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे ! **हर्षचरितावरूनच** पाहिलें तरी त्यावेळीं ह्या देशांत शौर्याचीं कृत्यें करणारे पुष्कळच पुरुष असून पराक्रमाची चळवळ जिकडे तिकडे एकसारखी चालू होती; त्यामुळें देश सचेतन असल्याचें दिसत होतें !

ह्या पुस्तकांतील कांहीं कांहीं गोष्टी असंभाव्य वाटण्यासारख्या आहेत. मरणास टेकलेल्या **प्रतापवर्धनाचा हर्षास** लांबलचक उपदेश, आपल्या बहिणीचें वर्तमान ऐकण्याविषयीं उतावीळ झालेल्या **बौद्धभिक्षूचें** लांबच लांब भाषण, हीं कंटाळवाणीं व त्या प्रसंगास अनुचित अशीं वाटतात. आतां **महाभारतांत श्रीकृष्णानें** रणभूमींत **अर्जुनास** अठरा अध्याय **गीता** सांगून केलेला उपदेश इत्यादि गोष्टींवरून विचार केला असतां हीं वर्णनेंहि दोषार्ह नाहींत असें ह्मणणें भाग आहे; कारण, यांतील वर्णनें केवल इतिहासासच अनुसरून आहेत असेंच केवल नाहीं, तर तीं महाकवीच्या कवित्वांत गुरफटलीं गेलीं असल्यामुळें वर्णनाच्या भरांत विस्तृत झालीं असावीं. **श्रीकृष्णानें अर्जुनास** तरी संग्रामप्रसंगीं **भगवद्गीतेचीं** प्रमेयेंच संक्षेपानें सांगितलीं असावीं. नंतर तींच यथाकालीं विस्तृत रीतीनें विशद केलीं असावीं असें वाटतें. तथापि ह्यासंबंधानें मतभेदहि होण्याचा संभव आहे.

**हर्षचरित** देखील अपुरेंच राहिलें आहे. ह्याच्या प्रास्ताविकपद्यांत '**किं कवेस्तस्य काव्येन सर्ववृत्तान्तगामिनी । कथेव भारती यस्य न व्याप्नोति जगत्त्रयम् ॥**' व पुढें '**कस्य न द्वितीयमहाभारते भवेदस्य चरिते कुतूहलम्**' असें दोन वेळां **बाणानें** ह्मटलें आहे. यावरून त्याच्या मनांत **हर्षचरित** हा ग्रंथ **महाभारतासारखा** मोठा करावयाचा होता, असें उघड दिसतें. हल्लीं उपलब्ध असलेल्या **हर्षचरितांत हर्षाच्या** पहिल्या मोहिमेचें वर्णन देखील पुरें झालेलें नाहीं, व आठवा उच्छ्वास देखील शेवटास न जातां अपुराच राहिलेला दिसतो ! व म्हणूनच इतर उच्छ्वासांप्रमाणें आठव्या उच्छ्वासाच्या समाप्तींत त्याचें नांव देखील दिलेलें नाहीं. यामुळें तो अपूर्णतेची साक्ष देत आहे ! **हर्षचरितांत** शेवटीं

सूर्यास्त व चंद्रोदय यांचें वर्णन केलें आहे. यावरून शत्रूंचा अस्त व **हर्षाचा** उदय ध्वनित होतो व यामुळें त्यानें पुढील वर्णन तशाच कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें संक्षेपांत किंवा संपुष्टांत आणून ठेविलें असावें, असें मनांत येतें ! किंवा अस्तोदयाचा हा सहजगतीनेंच योग जमून आला असावा! पुढें शत्रूंचा अस्त व **हर्षाचा** उदय यांचा सूर्यास्त व चंद्रोदय यांच्याशीं कदाचित् काकतालीयन्यायानें योग जमून आला असावा असें वाटतें. असा प्रकार कधीं कधीं घडून येतो. **हर्षाचा** उदय व त्याच्या शत्रूंचा अस्त ( पराभव ) झाला असावा. याबद्दल पुढें विवेचन केलें आहेच.

**बाणानें** अगोदर **हर्षचरित** रचिलें व नंतर **कादंबरी** रचली असावी, असें मला प्रथम वाटलें होतें. परंतु हल्लीं विचार करितां दोन ग्रंथांपैकीं कोणता अगोदर व कोणता मागून रचला, हें निश्चितपणें ठरविणें कठिण आहे. **हर्षचरितांत बाणानें** आपल्या आतेस साक्षात् **महाश्वेता** असें ह्मटलें आहे. यावरून **कादंबरी** अगोदर रचली असल्यामुळें त्यानें तीस कदाचित् **महाश्वेता** ह्मटलें असावें, असेंहि मनांत येतें ! किंवा दोन्ही ग्रंथ त्यानें बरोबरच चालविले असावे असेंहि होणें असंभवनीय नाहीं, **बाणपुत्रास कादंबरी** पूर्ण करितां आली. परंतु त्यास **हर्षचरिता**ची ऐतिहासिक माहिती पूर्ण अवगत नसल्यामुळें ह्मणा, किंवा कालक्रीडेमुळें ह्मणा, **हर्षचरित** परिपूर्ण करितां आलें नाहीं ! ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय. दोनहि ग्रंथ **बाणकवीकडूनच** त्यानें योजल्याप्रमाणें शेवटास गेले असते, तर किती मौज व फायदा झाला असता! त्यांतहि **हर्षचरित** शेवटास गेलें असतें तर ऐतिहासिक माहिती अधिक मिळून

---

१ कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेच्या शेवटच्या अंकांच्या आरंभीं दिलेला कर्तव्यसमाप्तिसूचक श्लोक व त्यांचा अंत, यांचा जसा अकल्पित मेळ जमून आला ! तसाच हाहि प्रकार घडून आला असेल ! शेवटच्या निबंधमालेच्या अंकावरचा श्लोक हा होय.

" गाहन्तां महिषा निपानसलिलं शृङ्गैर्मुहुस्ताडितं ।
छायाबद्धकदंबकं मृगकुलं रोमन्थमभ्यस्यतु ॥
विश्रब्धं क्रियतां वराहततिभिर्मुस्ताक्षतिः पल्वले ।
विश्रामं लभतामिदं च शिथिलज्याबंधमस्मद्धनुः ॥

पुढें थोड्याच दिवसांनीं कै. विष्णुशास्त्री यांच्या आयुष्याची दोरी शिथिल होऊन त्यांचा अंत झाला !

फारच उपयोग झाला असता; परंतु मृत्यूनें त्याजवर अकालींच झडप घातल्यामुळें मोठीच हानि झाली, त्यास इलाज नाहीं ! 'कालोहि दुरतिक्रमः' कालाचें अतिक्रमण कोण करणार आहे ?

' सृजति तावदशेषगुणाकरं पुरुषरत्नमलंकरणं भुवः ।
तदनु तत्क्षणभंगि करोत्यहो अहह कष्टमपंडितता विधेः ।

भर्तृहरि.

पृथ्वीला अलंकारभूत अशा गुणवान् पुरुषास उत्पन्न करून तो रंगारूपास येऊन पोहोंचतो न पोहोंचतो तोंच मृत्यूची त्यावर झडप पडावी ! असेंच जर दैवदुर्विलसित आहे तर तेथें काय इलाज आहे ?

## बाणकवीची थोर थोर कवींनीं केलेली प्रशंसा व या संबंधानें दोन शब्द.

**बाण** हा गद्यरचनेंत प्रवीण असल्याचें आढळून येतें. त्याप्रमाणें पद्यरचनेंत असल्याचें आढळत नाहीं, असें कोणाचें मत आहे; तथापि त्याचे सर्व ग्रंथ उपलब्ध होऊन पाहण्यास सापडल्याखेरीज याविषयीं निश्चित मत ठरविणें वाजवी नाहीं. खालीं दिलेल्या थोड्या पद्यांवरूनदेखील तो पद्यरचनेंतहि निष्णात होता असें मला वाटतें.

**बाणभट्टा**ची थोर थोर संस्कृतकवींनीं मोठी प्रशंसा केली आहे, ती पुढील पद्यांत आढळून येईल—

"जाता शिखंडिनी प्राक् यथा शिखंडी तथावगच्छामि ।
प्रागल्भ्यमधिकमाप्तुं वाणी बाणो बभूवेति ॥

गोवर्धनाचार्य.

रुचिरस्वरवर्णपदा रसभाववती जगन्मनो हरति ।
तत्किं तरुणी नहि नहि वाणी बाणस्य मधुरशीलस्य ॥

धर्मदास.

केवलोऽपि स्फुरन्बाणः करोति विमदान्कवीन् ।
किं पुनः क्लृप्तसंधानपुलिंदकृतसन्निधिः ॥ धनपाल.

शश्वद्बाणद्वितीयेन नमदाकारधारिणा
धनुषेव गुणाढ्येन निःशेषो रंजितो जनः ॥

त्रिविक्रमभट्ट.

शब्दार्थयोः समो गुम्फः पांचाली रीतिरिष्यते ।
शीलाभट्टारिकावाचि बाणोक्तिषु च सा यदि ॥ कस्यापि.

श्लेषे केचन शब्दगुम्फविषये केचिद्रसे चापरेऽ-
लंकारे कतिचित्सदर्थविषये चान्ये कथावर्णने ।
आसर्वत्र गभीरधीरकविताविंध्याटवीचातुरी-
संचारी कविकुम्भिकुम्भभिदुरो बाणस्तु पंचाननः ॥

श्रीचन्द्रदेव.

अशा अनेक सहृदय थोर कवींनीं बाणकवीची तारीफ केली आहे, यावरून तो कविश्रेष्ठ असल्याबद्दल निराळें सांगावयास नकोच. आतां हर्षचरितांत व कादंबरींत क्वचित् ठिकाणीं अप्रसिद्ध शब्दांचे श्लेष, व कांहीं ठिकाणीं लांब लांब समास व वर्णनेंहि आहेत. हे प्रकार ह्मणजे मनास अगदींच कंटाळा उत्पन्न करीत नाहींत; असेंच केवळ ह्मणतां येणार नाहीं. तसेंच वर्णनाच्या भरांत कोठें कोठें असंभाव्यतेचाहि प्रकार भासतो. परंतु यांतील बऱ्याच गोष्टी कविसंप्रदायास अनुसरून असल्यामुळें त्या विशेष दूषणार्ह आहेत असें ह्मणतां येत नाहीं. साधारण व्युत्पन्नास कादंबरी ही कठिण वाटण्याचा संभव आहे; परंतु इचा जसा जसा परिचय होत जातो, तसा तसा तिचा कठिणपणा कमी होत जातो. कादंबरीच्या संविधानकांत गुंतागुंत व दूरान्वय असल्यामुळें वाचकांस घोटाळा वाटतो, असें युरोपीयनांचें मत आहे, परंतु आह्मा आर्यलोकांस तसें न वाटतां एकप्रकारची चित्ताकर्षक चमत्कृति वाटून त्याबद्दल कौतुकच वाटतें !

एका संस्कृतकवीनेंहि बाणभट्टाच्या कवितेस उद्देशून असें ह्मटलें आहेः—

“ सहर्षचरिता शश्वत्कृतकादंबरीकथा ।
बाणस्य वाण्यनार्येव स्वच्छंदं भ्रमति क्षितौ ।”

‘ राजशेखर ’

यांत ‘ अनार्या ’ हें वाणीचें उपमान केलें आहे, परंतु तें कादंबरी ( मद्य ) ह्या श्लेषाकरितां व स्वच्छंदभ्रमण याकरितां योजलें असावें. स्वच्छंदभ्रमणे हें तर बाणाच्या ( धावकाच्या ) अव्याहत गतीचें दर्शकच आहे ! असा[१] क्वचित् ठिकाणीं असें कांहीं असलें तरी—

१ ह्या विदुषीचाहि ग्रंथ कोठें उपलब्ध असल्याचें समजलें नाहीं !

" एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः "
या न्यायानें गुणबाहुल्यापुढें अल्पस्वल्प दोषांची गणना करणें अगदीं अयोग्य होणार आहे.

## बाणपुत्र–पुलिन्द.

इकडच्या लेखी व छापील प्रतींत **बाण**पुत्राचें नांव कोठें नसल्यामुळें तें इकडे लुप्त होऊन गेलें आहे. डॉ० **ब्युलर** या युरोपीयन पंडितानें **बाण**-पुत्राचें नांव '**भूषणभट्ट**' असें छापून प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. परंतु त्यास त्यानें खात्री होण्यासारखें प्रमाण दिलेलें नाहीं. **काश्मीरां**तील **जम्मु** येथील ग्रंथसंग्रहालयांत **शारदा** ( काश्मिरी ) लिपींत भूर्जपत्रांवर असलेल्या **कादंबरी**च्या प्रतींत उत्तरभागाच्या शेवटीं **बाण**पुत्राचें नांव '**भट्टपुलिन्द**' असें स्पष्ट आहे. ह्या प्रतीच्या शेवटीं शके **१५६९** ( इ. स. १६४७ ) असा लेखनकालहि दिलेला आहे. **उदेपूर व नाथद्वार** येथील ग्रंथसंग्रहांतील प्रतींतहि **बाण**पुत्राचें हेंच नांव आहे. **उदेपुर**च्या प्रतींत '**पुलिन**' असें आहे. परंतु तें **पुलिन्द**च असलें पाहिजे. या ठिकाणीं लेखकाच्या प्रमादानें ' द ' चा काना होऊन तो ' ० ' ह्या व्यंज-नास मिळाला असावा. याप्रमाणें लेखकांच्या व नांवाचें वगैरे महत्त्व न जाणणारांच्या आज्ञानामुळें कांहीं ग्रंथांच्या शेवटीं ग्रंथकारांचीं नांवें वगैरे देखील गाळून टाकलेलीं आढळतात!

दुसरे, **धनपाला**च्या **बाणपुलिन्द**–प्रशंसापर पद्याचाहि **पुलिन्द** ह्या नांवास चांगला आधार मिळतो. **सूक्तिमुक्तावलि** वगैरे ग्रंथांत आधार सापडतो तो असाः–

" केवलोपि स्फुरन्बाणः करोति विमदान्कवीन् ।
किं पुनः क्लृप्तसंधानपुलिन्दकृतसन्निधिः " ॥

" तीक्ष्णबुद्धि **बाण**कवि हाच कवींचा गर्व हरण करतो. (**कादंबरीं**तील वगैरे कवित्वानें) मग कल्पिलें आहे अनुसंधान ( उत्तरभागाचें ) ज्यानें असा पुलिन्द ( **बाणपुत्र** ) त्याजवळ असल्यावर तो कवींचा गर्व नाहींसा करील ह्मणून काय सांगावयाचें आहे ?

१ संस्कृत प्रोफेसरांनीं कादंबरी छापण्याच्या वेळीं बाणपुत्राच्या नांवाबद्दल नीट वाटाघाट करून तें द्यावयास पाहिजे होतें, परंतु तसें त्यांनीं केलें नाहीं!

दाखल ....
गोर

( पक्षीं ) तेजस्वी **बाणच** ( शर ) कवि[1] ( पक्षी वगैरे प्राणी ) यांस गर्व-रहित करतो, मग योजिलें आहे **बाण**संधान ज्यानें असा व्याध जवळ असल्यावर तो त्याचा गर्व हरण करील ह्मणून काय सांगावयाचें आहे ? ”

ह्या पद्यांतील **बाण**कविपक्षीं **पुलिन्द** शब्दाचा अर्थ काय असावा, ह्मणून जुन्या व नव्या नांवाजलेल्या संस्कृतज्ञांस मीं विचारिलें, परंतु कोणासहि त्याचा उलगडा करतां आला नाहीं. **काश्मिराकडच्या** वगैरे प्रतींत असलेलें **बाण**पुत्राचें नांव कळून आल्यामुळें वरील पद्याचा अर्थ सरळ व यथायोग्य लागून **बाण**पक्षीं अर्थाची सुसंगति चांगली जुळते व **बाण**पुत्राचें नांव **पुलिन्द**-च असल्याबद्दलहि खात्री होते.

**बाणाच्या** हातून दुर्दैवानें **कादंबरी** हा ग्रंथ शेवटास गेला नाहीं, तथापि त्यांतले त्यांत ही देखील संतोषाचीच गोष्ट समजली पाहिजे कीं **कादंबरीचा** पुढील भाग **बाण**पुत्रानें रचून पित्याच्या रचनेस शोभण्यासारखी कृति करून चांगलीच पूर्णता आणिली ! इतकी देखील दुसऱ्याच्या हातून खचित झाली नसती व असा सुंदर ग्रंथ तसाच अपुरा पडला असता. दुसऱ्याच्या कृतींत भर घालून ती बेमालूम करणें, हें तरी लहानसहान करामतीचें काम नव्हे !

उत्तरार्धाचे आरंभीं **बाण**पुत्रानें नमन केलें आहे त्यांत त्याची बरीच कुशलता दिसून येते. **शिव** आणि **पार्वती** यांची एकरूपता वर्णून त्यानें त्यांनां नमन केलें आहे. यावरून त्यांची जशी एकरूपता, तशी दोन भागांची एकाकारता केल्याचें त्यानें ध्वनित केलें आहे ! तें पद्य हें होयः—

> “ देहद्वयार्धरचनाघटितं शरीर-
> मेकं द्वयोरनुपलक्षितसंधिभेदम् ।
> वन्दे सुदुर्घटकथापरिशेषसिद्ध्यै
> सृष्टेर्गुरू गिरिसुतापरमेश्वरौ तौ ”

ज्यांच्या देहद्वयाचा संधिभेद कळून येत नाहीं, असे एकरूपी जगाचे मातापितर पार्वतीपरमेश्वर यांनां या पद्यांत **बाण**पुत्रानें नमन केलें आहे. यांत ‘**अनुपलक्षितसंधिभेदम्**’ हें शरीराचें विशेषण कवीनें मोठ्या मार्मिकपणानें घातलें आहे !

**बाणभट्टानें कादंबरी**च्या मुखानें चालू केलेलें विरहावस्थेचें भाषण

---

१ उलूक (घुबड) वाचक कविशब्द असल्याबद्दल राजनिघंटूंत आधार सांपडतो.

त्याच्या पुत्रानें त्याच नमुन्यावर पुढें चालवून पित्यानें रचलेल्या पूर्वार्धाशीं आपलें उत्तरार्ध 'अनुपलक्षितसंधिभेदम्' असेंच जमवून दिलें आहे, यांत कांहीं संशय नाहीं! तसेंच तेथें दुसरें पद्य आहे. त्यांतहि वरील अर्थाचेंच पर्यायानें समर्थन केलें आहे व तेंहि खुबीदार आहे:—

" गंगां प्रविश्य भुवि तन्मयतामुपेत्य–
स्फीताः समुद्रमितरा अपि यान्ति नद्यः।
आसिंधुगामिन पितुर्वचनप्रवाहे
क्षिप्ता कथानुघटनाय मयापि वाणी " ॥

गंगेंत इतर नद्यांचा प्रवाह मिळाला असतां तद्रूप होऊन गंगारूपानेंच समुद्रापर्यंत जातो, त्याचप्रमाणें गंगेसारख्या ( प्रसन्न व मधुर पित्याच्या ) वाणीरूप गंगेच्या प्रवाहांत मींहि आपली वाणी मिसळून दिली. अर्थात् ती तद्रूप झाली ह्मणून सांगावयास नकोच !

पित्याच्या सहवासामुळें व त्याजवळच त्यानें अध्ययन करून त्याच्या ग्रंथांचें परिशीलन केलें असल्यामुळें व शेवटच्या असाध्य अवस्थेंतहि त्यानें सांगितलेल्या माहितीप्रमाणें आणि दर्शविलेल्या दिशेप्रमाणें त्याचे पुत्रास पित्याचा अवशिष्ट ग्रंथ चांगल्या रीतीनें शेवटास नेतां आला यांत कांहीं संशय नाहीं !

" गद्ये कृतेऽपि गुरुणा तु तथाक्षराणि-
यन्निर्गतानि पितुरेव स मेऽनुभावः।
एकप्लवामृतरसास्पदचंद्रपाद–
संपर्क एव हि मृगांकमणेर्द्रवाय " ॥

जसें चंद्रकांतमण्याच्या द्रवास अमृतरसरूपी चंद्राच्या किरणांचा संपर्क कारण होय, त्याप्रमाणेंच पित्यानें केलेल्या गद्यमयग्रंथांतल्यासारखीं अक्षरें (वाणी) मजपासून निघण्यास पित्याचा प्रभाव ( संपर्क ) च कारण होय !

" बीजानि गर्भितफलानि विकासभाञ्जि
वप्त्रेव यान्युचितकर्मबलात्कृतानि
उत्कृष्टभूमिविततानि च यान्ति पोषं
तान्येव तस्य तनयेन तु संहृतानि " ॥

ज्यांच्या अंतःस्थ फलें आहेत अशीं चांगलीं बीजें सुपीक भूमींत माळ्यानें लावलीं असतां व त्यांस उदकादिक घातलें असतां तीं पोसून ग्रहण करण्यास

योग्य होतात, तशीं माझ्या पित्यानें गर्भितार्थादिकानें युक्त अशीं बीजें हर्ष-चरित' 'कादंबरी' इत्यादि सुभूमींत पेरून रसयुक्त केल्यामुळें विकास पावून चांगलीं पोसलीं गेलीं, तीं सुफलें त्याच्या पुत्रास आयतींच घेण्यास सांपडलीं ! यावरून त्यानें आपल्या बापाच्या ग्रंथांचा चांगलाच अभ्यास केला असावा असें लक्षांत येतें !

बाणपुत्रानें उत्तरार्धाच्या आरंभीं किंवा शेवटीं आपलें नांव न घालतां गुप्त ठेविलें, याचें कारण पितृभक्तीमुळें "सर्व ग्रंथ आपल्या बापाच्याच नांवानें प्रसिद्ध असावा, या उद्देशानें त्यानें आपलें नांव प्रकट न करितां बुद्ध्याच नाहींसें होऊं दिलें असावें असें वाटतें" असें कै० विष्णु कृष्ण चिपळूण-कर यांनीं आपल्या बाणभट्टाच्या निबंधांत ह्मटलें आहे; परंतु तसें असतें तर,—

"याते दिवं पितरि तद्वचसैव सार्धं
विच्छेदमाप भुवि यस्तु कथाप्रबन्धः।
दुःखं सतां तदसमाप्तिकृतं विलोक्य
प्रारब्ध एव स मया न कवित्वदर्पात्"

'माझा पिता आपल्या वाणीसह स्वर्गास गेला असतां त्याच्या कथाप्रबंधाचा विच्छेद झाला त्यामुळें विद्वज्जनास झालेलें दुःख पाहून तो पुरा करण्यास मीं आरंभ केला ! मीं आपलें कवित्व दाखविण्याकरितां केला नाहीं !' असें त्यानें ह्मटलें नसतें. आरंभींच्या पद्यांत त्यानें आपलें नांव न घालण्याचें कारण, पित्याच्या कृतीपुढें आपली कृति कांहींच नाहीं, असा विनय दाखविण्या-करितांच त्यानें असें केलें असावें असें दिसतें.

कादंबरींतील पितापुत्रांची वर्णनशैली प्रायः सारखीच जोरदार, खुबीदार व डौलदार आहे यांत कांहीं संशय नाहीं. दोघांचीं शृंगारादि वर्णनेंहि प्रायः मर्यादेस सोडून नाहींत. तथापि उत्तरभागांत बाणपुत्रानें चंद्रापीडाच्या मनोराज्यांतील काल्पनिक सुरतवर्णन केलें आहे ! हें आमच्या कविसंप्रदायास अनुसरूनच आहे ! बाणपुत्रानें 'कामातुराणां न भयं न लज्जा' याचें चित्र वैशंपायनाच्या कामातुरतेंत व महाश्वेतेचें कडक पातिव्रत्याचरण याचें चित्र तिच्या वर्तनांत चांगलें दाखविलें आहे. सारांश कादंबरी हें काव्य बाण व पुलिंद ह्यांच्या संयोगानें खरोखरीच हृदयभेदक झालें आहे यांत कांहीं संशय नाहीं !!

 11 JAN 1994

" कादंबरीरसभरेण समग्र एव ॥
मत्तो न किञ्चिदपि चेतयते जनोऽयम् "

कादंबरी ( पक्षीं–मद्य ) च्या रसानें लोक त्यांत अगदीं तन्मय होऊन जातो, त्यास मग कांहींच भान रहात नाहीं ! असें बाणपुत्रानें उत्तरार्धाच्या आरंभीं श्लेषोक्तीनें ह्मटलें आहे तें किती यथार्थ आहे !

" सुभाषितरसास्वादबद्धरोमांचकंचुकाः—
विनापि कामिनीसंगादभिज्ञाः सुखमासते " ॥

अशी एका कवीची उक्ति आहे तीहि अगदीं यथार्थ आहे ! ह्या वरील सुभाषितांत तरी बाणपुत्राच्या उक्तीचेंच पर्यायानें समर्थन केलेलें आहे. बाणकवीचीं काव्यें वाचीत असतां अभिज्ञरसिक–पुरुषांच्या अंगावर खरोखरीच रोमांचकुंचक उभे राहून ते त्या काव्यरसांत अगदीं गर्क होऊन राहतात यांत कांहीं संशय नाहीं !

## बाणाचें चंडिकाशतक, त्याचा श्वशुर मयूरकवि व मातंगदिवाकर.

'चंडिकाशतक' हें एक पद्यमय काव्य बाणकवीनें केलें आहे. यांत देवीचें स्तवन आहे. यांतील कवित्व प्रौढ व शब्दालंकारप्रचुर आहे याविषयीं अशी एक कथा प्रसिद्ध आहे कीं, बाण आणि मयूर हे दोघे कवि आप्त व मित्र असून श्रीहर्षराजाच्या पदरीं होते. मयूरकवीची मुलगी बाणास दिली होती. मयूरकवीनें एक काव्य रचून तें बाणकवीस दाखविण्याकरितां तो पहाटेस उठून गेला असतां बाण आपल्या संस्कृतज्ञ प्रियेची संस्कृत पद्यानेंच समजावणी करीत होता. तें पद्य हें होयः—

" गतप्राया रात्रिः शशिमुखि शशी शीर्यत इव
प्रदीपोयं निद्रावशमुपगतो घूर्णत इव ।
प्रणामान्तो मानस्त्यजसि न तथापि क्रुधमहो "

---

१ प्रत्येक महाकवीविषयीं अशा कांहीं दंतकथा प्रसिद्ध आहेत यावरून त्यांच्यांत कांहीं विलक्षण गुण असल्यामुळें अशा दंतकथा चालू राहतात असें वाटतें.

२ मयूरशतकाच्या मधुसूदनकृत भावबोधिनी टीकेंत पुढें लिहिल्याप्रमाणें मजकूर आहेः—

" मालवराजस्योज्जयिनीराजधानीकस्य कविजनमूर्धन्यस्य रत्नावल्याख्यनाटिकाकर्तुर्महाराजश्रीहर्षस्य सभ्यौ महाकवी पौरस्त्यौ बाणमयूरावास्ताम् । तयोर्मध्ये मयूरभट्टः श्वशुरः । बाणभट्टः कादंबरीग्रंथकर्ता तस्य जामाता " ॥

असे तीन चरण ह्मणून पुढें ह्मणणार होता, तों दारापाशीं आलेल्या मयूरकवीनें सहज विनोदानें—

' **कुचप्रत्यासत्त्या हृदयमपि ते चण्डि कठिनम्** ' ॥

असा चवथा चरण ह्मटला! तो ऐकून आपणास ह्मणावयाचा त्या अर्थाचाच यानें हा चरण ह्मणून पूरण केलें ह्मणून **बाणास** आनंद होऊन तो मनांत खजीलहि झाला! परंतु त्याच्या मानिनी स्त्रीस अत्यंत राग येऊन तिनें ' तूं कुष्टी होशील ' ह्मणून आपल्या पित्यास शाप दिला! तेव्हां त्यानें '**सूर्यशतक**' करून, सूर्यास प्रसन्न करून आपला महारोग घालविला. तें पाहून **बाणकवीनें** ईर्ष्येनें आपले पाय तोडून घेऊन '**चंडिकाशतक**' स्तोत्र करून देवीस प्रसन्न केलें व आपलें व्यंग दूर करून दाखविलें!

ह्या आख्यायिकेंत **मयूर** हा **बाणाचा** आप्त व मित्र ह्मटलेला आहे. आतां ' **मयूरक** त्याचा बालमित्र होता ' असें कै० **विष्णुशास्त्री** यांच्या निबंधांत आहे. परंतु ' **मयूरक** ' या नांवाचा त्याचा कोणी बालमित्र असल्याबद्दल **हर्षचरितांत** कोठें उल्लेख नाहीं. **बाणकवीनें** आपले मित्र, व आपणाबरोबर असलेली मंडळी यांचा नामनिर्देश केला आहे. त्यांत ' **मयूरक** ' म्हणून एक आहे, परंतु तो त्याचा मित्र ह्मटलेला नसून ' **जांगूलिको मयूरकः** ' त्याचेबरोबर असलेल्या मंडळींत ' **मयूरक** ' ह्मणून एक विषवैद्य(गारुडी) होता! तथापि **श्रीहर्षाचे** पदरीं **बाण** व **मयूर** हे दोघेहि एकाच कालीं होते, अशी प्रसिद्धि चालत आलेली आहे व ती पुढील दोन्ही पद्यांवरून तर खरीच ठरते.

" **अहो प्रभावो वाग्देव्या यन्मातङ्गदिवाकरः[२]** ।
**श्रीहर्षस्याभवत्सभ्यः समो बाणमयूरयोः** " ॥

राजशेखर.

---

१ ह्मणूनच ' आदित्यादेर्मयूरादीनामिवानर्थनिवारणम् ' असें काव्यप्रकाशांत ह्मटलें आहे.

राजशेखर यानें पुढील पद्यांत मयूरकवीच्या सूर्यशतककाव्याची प्रशंसा केली आहे व त्याप्रमाणें तें खरोखरीच प्रौढ व चांगलें आहे:—

' दर्पं कविभुजंगानां गता श्रवणगोचरम्-
विषविद्येव मायूरी मायूरी वाङ्निकृन्तति ॥ '

२ श्रीहर्षाच्या सभेंत बाण व मयूर यांच्यासमान मातंगदिवाकर हाहि एक कवि होता, ह्मणजे त्यांच्यासारखाच याचाहि मान होता. आतां मातंग याचा अर्थ चांडाल [ हलक्या जातीचा ] असा होतो व येथें कोणी हाच अर्थ घेतात!

" सचित्रवर्णविच्छित्तिहारिणोरवनीश्वरः
श्रीहर्ष इव संघट्टं चक्रे बाणमयूरयोः " ॥

नवसाहसांकचरित.

ह्या दोन्ही पद्यांवरून व त्यांतहि दुसऱ्या पद्यावरून श्रीहर्षाच्या दरबारीं **बाण** व **मयूर** यांचा संयोग झाला, असें ध्यानांत येतें. हे दोघे कवि **श्रीहर्षा**च्या येथें सभासद होते असें **मधुसूदना**च्याहि लेखांत आहे.

**पार्वतीपरिणय, (अनेक कवींचीं समानार्थक पद्यें) बाण व वामनबाण.**
**( कै. वि. कृ. चिपळूणकर; पं. कृष्णमाचार्य इ० )**

**पार्वतीपरिणय**—हें एक नाटक **बाण**कवीच्या नांवावर प्रसिद्ध आहे. ह्या नाटकाच्या आरंभीं—

" अस्ति कविसार्वभौमो वत्सान्वयजलधिसंभवो बाणः ।
नृत्यति यद्रसनायां वेधोमुखलासिका वाणी ॥ "

असें पद्य आहे. '**वत्स**' वंशांतच **बाण** उत्पन्न झाला. तेव्हां त्यानेंच हें नाटक रचलें, असें समजणें साहजिकच आहे. यावर कोणाचा असा आक्षेप आहे कीं, ह्या नाटकांत बहुतेक ठिकाणीं **कालिदासाच्या कुमार-संभवांतील** चोरून उतारे घेतले आहेत, व ह्मणून हें नाटक **बाणाचें** नसावें. मीं हीं दोन्ही काव्यें वाचलीं, परंतु मला तसें वाटलें नाहीं. आतां '**कुमारसंभव**' व '**पार्वतीपरिणय**' या दोहींतहि **तारकासुराच्या** वधाकरितां **शिव** व **पार्वती** यांजपासून कुमारसंभव ( कुमारोत्पत्ति ) हाच विषय प्रतिपाद्य असल्यामुळें **हिमालय, मेना, नारद, मदन, वसंत, रति,**

---

कदाचित् बौद्धधर्मी दिवाकरमित्र यासच धर्मबाह्य ह्मणून मातंगदिवाकर असें वैदिकधर्माभिमान्यांनीं ह्मणण्याचें ठेवलें असावें, असेंहि वाटतें. कारण, बौद्धांस ते धर्मबाह्य ह्मणत असत.

' पूर्वी मातंग या नांवाचा चांडाल होऊन गेला त्याचें नांव सर्वत्र विश्रुत होतें. त्यानें आपल्या शुद्धाचरणानें परम यश मिळविलें व त्यामुळें सर्व जातींचे लोक त्याची सेवा करीत असत असा बौद्धग्रंथ सुत्तनिपाठ यांत मजकूर आहे.

१ ह्या पद्यांत फारच खुबीदार श्लेष आहेत. ते मार्मिक संस्कृतज्ञ वाचकांच्या लक्षांत येण्यासारखे आहेत.

२ बाणानें कुमारसंभवांतील कथानकासच नाटकाचें रूप दिलें असावें, असें मलाहि पहिल्या आवृत्तीच्या वेळेस वाटलें होतें.

नंदी, शिव, आणि पार्वती व तिच्या सख्या, हींच पात्रें असणें स्वाभाविक असल्यामुळें व दोहींत तोच विषय असल्यामुळें त्या त्या पात्रांची कृति व भाषणें बरींच जमण्याचा संभव आहे. तथापि पार्वतीपरिणयांतील कल्पना, वर्णनें व भाषणें हीं कुमारसंभवाशीं सर्वांशीं जमणारीं नसून पुष्कळ ठिकाणीं निराळीं आहेत. कालिदासाच्या काव्याची तर उत्तमत्वाविषयीं सर्वत्र प्रसिद्धि आहेच; परंतु पार्वतीपरिणयांतील कवितेंतहि कांहीं कांहीं कल्पना व प्रसादगुण चांगला साधलेला आहे. मात्र दोहींत कांहीं थोड्या वाक्यांत व कोठें पद्यांत बरेंच सादृश्य जमून आलेलें आहे खरें, परंतु हा प्रकार एकच विषय असल्यामुळें जमून आला असावा असें वाटतें. जसें—

| कुमारसंभव. | पार्वतीपरिणय. |
|---|---|
| द्वन्द्वानि भावं क्रियया विवव्रुः। | द्वन्द्वानि लौल्यमभजन्त विमोहितानि। |
| संचारिणी पल्लविनी लतेव। | संचारणीव वल्ली। |
| कुले प्रसूतिः प्रथमस्य वेधसः। | जन्मान्ववाये प्रथमस्य धातुः। |
| पर्यंकबंधं निबिडं बिभेद। | शिथिलितपर्यंकबंधः। |
| स्त्रीसन्निकर्षं परिहर्तुमिच्छन्। | स्त्रीसन्निकर्षपरिजिहीर्षया। |
| अमंगलाभ्यासरतिं विचिन्त्य तम्। | अमङ्गलाचाररतिस्त्रिलोचनः। |
| अद्यप्रभृत्यवनताङ्गि तवास्मि दासः। | तपसा हि क्रुतोऽस्मि दासजनः। |
| शरीरबद्धः प्रथमाश्रमो यथा। | गृहीततनुरिव प्रथमाश्रमः। |

कांहीं ठिकाणीं अशीं थोडीं सारखीं वाक्यें जमलीं आहेत, तरी एवढ्याच वरून ह्या कवीच्या सर्व कवित्वावर पाणी सोडणें हें योग्य वाटत नाहीं! असेंच सादृश्य शोधीत बसलें तर इतर ग्रंथांत देखील तें सांपडल्याखेरीज राहत नाहीं. जसें.—

शाकुंतलांत—'साहि तत्र भवतः कुलपतेरुच्छ्वसितम्।' हर्षचरितांत-'उच्छ्वसितं सा खलु कुमारस्य'। रघुवंशांत—'चापलाय प्रचोदितः' हर्षचरितांत-'करोमि जिव्हाप्लवनचापलम्'। हर्षचरितांत—'अमीभिः किंवा पुरुषभाषितैः भुजे वीर्यं निवसति न वाचि'। उत्तररामचरितांत—'सिद्धं ह्येतद्वाचि वीर्यं द्विजानां बाह्वोर्वीर्यं यत्तु तत्क्षत्रियाणाम्' कादंबरींत—'बलवदस्वस्थशरीरा कादम्बरी'। शाकुंतलांत—'बलवदस्वस्था शकुंतला'। हर्षचरितांत—'अभिनवयौवनारम्भावष्टम्भप्रगल्भ-

दृष्टिपाततृणीकृत त्रिभुवनस्य' । उत्तररामचरितांत–'दृष्टिस्तृणीकृतजगत्त्रयसत्वसारा ' । हर्षचरितांत–'तत्कथयागमनेनापुण्यमाकृतमोविजृम्भितविरहव्यथः शून्यतां नीतो देशः'।नैषधांत–'अनायि देशः कतमस्त्वयाद्य वसंतमुक्तस्य दशां वनस्य '।

मेघदूतांतः—

त्वामालिख्य प्रणयकुपितां धातुरागैः शिलाया-
मात्मानं ते चरणपतितं यावदिच्छामि कर्तुम् ।
अस्रैस्तावन्मुहुरुपचितैर्दृष्टिरालुप्यते मे
क्रूरस्तस्मिन्नपि न सहते संगमं नौ कृतान्तः ॥

मालतीमाधवांतः—

वारंवारं तिरयति दृशोरुद्गमं बाष्पपूर-
स्तत्संकल्पोपहितजडिमस्तंभमभ्येति गात्रम् ।
सद्यः स्विद्यन्नयमविरतोत्कंपलोलांगुलीकः
पाणिर्लेखाविधिषु नितरां वर्तते किं करोमि ॥

रघुवंशांतः—

त्यजत मानमलं बत विग्रहैर्न पुनरेति गतं चतुरं वयः ।
परभृताभिरितीव निवेदिते स्मरमते रमते स्म वधूजनः ॥

माघांतः—

प्रियसखीसदृशं प्रतिबोधितः किमपि काम्यगिरा परपुष्टया ।
प्रियतमाय वपुर्गुरुमत्सरच्छिदुरयादुरयाचितमङ्गनाः ॥

अशीं आणखीहि सादृश्यदर्शक वाक्यें व पद्यें शोधीत बसलें तर सापडल्याखेरीज राहणार नाहींत. जयदेवकवीच्या वचनाप्रमाणें ' सूर्यवंशतिलक रामचंद्राच्या कीर्तिरूप रमणीच्या नृत्यकालीं चालू झालेल्या वाद्याचा प्रथम ध्वनिच केवळ असा आद्यकवि वाल्मीकि याच्या मुखरूप चंद्रमंडलांतून गळालेल्या काव्यरूप अमृतसमुद्रापासून उत्पन्न झालेलें नूतन कविमेघमंडल

---

१ " भास्वद्वंशावतंसकीर्तिरमणीरङ्गप्रसङ्गस्तन-
द्वादित्रप्रथमध्वनिर्विजयते वल्मीकजन्मा कविः
पीत्वा यद्वदनेन्दुमण्डलगलत्काव्यामृताब्धेः किम-
प्याकल्पं कविनूतनाम्बुदमयी कादम्बिनी वर्षति " ॥

जयदेव.

कल्पपर्यंत वर्षाव ( काव्यामृताचा ) करीत आहे ! ही जयदेवकवीची उक्ति किती यथार्थ आहे, यासंबंधानें अभिनवबाणभट्टानेंहि याच अर्थाचें समर्थन आपल्या पद्यांत केलें आहे ! तें असें:—

" वन्द्यः कस्य न वाल्मीकिर्यस्य वाङ्मंजरीकणान्
आदाय कवयोऽद्यापि निक्षिपन्ति स्वसूक्तिषु ॥ "

किती समर्पक पद्य आहे हें। आद्यकवीचें रामायण व व्यासाचें महाभारत यांतील बरेच प्रयोग व कल्पना कालिदासादिकांच्या काव्यांतून देखील आढळतात:—

" यदा यदाच कौसल्या दासीवच्च सखीवच
भार्यावद्भगिनीवच्च मातृवच्चोपतिष्ठति ।
सततं प्रियकामा मे प्रियपुत्रा प्रियंवदा
न मया सत्कृता देवी सत्कारार्हा कृते तव ॥ ,,

वा. रा. अयो. कां. अ. १२ श्लो. ६८–६९.

यांतील कल्पना फेरफार करून कालिदासाच्या पुढील पद्यांत ग्रथित केली आहे, असें कोणाच्या लक्षांत येणार नाहीं ?

गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ॥

रघुवंश–सर्ग. ८–श्लो. ६७.

तेव्हां आतां ह्या दोघां आद्यकवींखेरीज बाकीच्यांनीं एकमेकांचें चौर्य केलें असेंच ह्मणावें लागेल ! आणि खरोखरीच पाहिलें तर जयदेवकवीची उक्ति व ' व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् ' ही विद्वज्जनोक्ति अगदीं अयथार्थच आहे असें ह्मणतां येणार नाहीं !

अर्थसादृश्यें व समानार्थक कल्पना तर परभाषेंतील ग्रंथांतून सुद्धां सापडतात. या नाटकांत सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें असतां पुष्कळ ठिकाणीं ह्या कवीचें बरेंच कवित्व दिसून येतें !

तथापि प्रसिद्ध विद्वान् पुरुषाचा एकाद्या ग्रंथाविषयीं बरा वाईट अभिप्राय पडला ह्मणजे अर्थात् पुष्कळ लोकांचा त्याप्रमाणें ग्रह होणें साहजिकच आहे. ह्या नाटकाविषयीं असाच प्रकार झाला आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर •

---

१ निबंधमालेंत संस्कृत व इंग्लिश कवींचीं देखील जमून आलेलीं बरींच अर्थसादृश्यें दिलीं आहेत. तीं पुष्कळांस माहीत असतीलच.

 11 JAN 1944

यांनीं या नाटकाच्या संबंधानें आपला फारच कडक अभिप्राय दिला आहे. तो असाः—

" पार्वतीपरिणय म्हणून एक नाटक बाणकवीच्या नांवाचें आमच्या पाहण्यांत आहे. हें त्या विख्यात कवीनेंच रचिलें किंवा कसें, याचा लांब वाद करणें नलगे. जो यांतील एकदा अंक वाचील त्यास त्याच्या अप्रयोजकपणाचा व ग्रंथकर्त्याच्या साहसाचा चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं. बाणकवीचें नांव, व कुमारसंभवांतून अजीबात चोरलेला एकंदर मजकूर हीं यांत वजा केली असतां ग्रंथकाराचा मूर्खपणा व धाडसाची शर्थ हीच खालची निवळ बाकी ! "

हा अभिप्राय सर्वथैव योग्य आहे असें मला वाटत नाहीं. मग त्यांनीं आपल्या अभिप्रायांत लिहिल्याप्रमाणें एकादाच अंक सरासरी पाहून अभिप्राय दिला कीं काय कोण जाणे! मला तर " ग्रंथकाराचा मूर्खपणा व धाडसाची शर्थ हीच खालची निवळ बाकी " वाटली नाहीं ! आतां कुमारसंभवांतून अजीबात मजकूर चोरला, असें ह्मणण्यापेक्षां कुमारसंभवांतील मजकूर ( गोष्ट ) घेऊन त्यावर बाणकवीनें हें नाटक रचलें, असें म्हटलें असतें तर काय बिघडलें असतें ! एकाद्या ग्रंथांतील गोष्ट घेऊन तीवर नाटक वगैरे रचण्याचा परिपाठ सर्व देशांत सर्व कालीं आहे. त्याप्रमाणें हेंहि नाटक रचलें असेल ! कुमारसंभवांतील गोष्टीचें नाटकाच्या रूपानें रूपांतर करून जेथल्या तेथें पात्रें घालून त्या त्या पात्रांस शोभण्यासारखी भाषा व कृति घालणें, हें देखील कांहीं समान्य काम नव्हे. ह्या नाटकांत कोठें म्हणजे फरक केलेच नाहींत असेंहि नाहीं; कवीस योग्य वाटलें, तेथें ते केले आहेत. कुमारसंभवांत फिरत फिरत येणाऱ्या नारदानें पार्वतीस पित्याजवळ पाहून ' ही शिवाची अर्धांगी होईल ' असें सांगितलें. एवढाच काय तो नारदाचा संबंध दाखविला आहे. पार्वतीपरिणयांत नारदाचें

---

१ कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें ' कविपंचक ' एकत्र छापलें आहे, त्यांत भवभूतीच्या निबंधांत बाणकवीचे नांवावर ही टीप दिली आहे. पान ९१.

२ ' त्याच्या ' व ग्रंथकर्त्याच्या ' हीं पदें त्यांच्या लेखांत मागेंपुढें पडलीं आहेत असें वाटतें!

३ " तां नारदः कामचरः कदाचित्कन्यां किल प्रेक्ष्य पितुः समीपे ।
समादिदेशैकवधूं भवित्रीं प्रेम्णा शरीरार्धहरां हरस्य ॥"

स्वर्गातून उतरणें, मार्गातील अनेक प्रकारच्या देखाव्यांचें वर्णन करणें, **हिमालयाची** भेट होणें, त्यानें **नारदाची** थोरवी वर्णन करणें, दोघांचा बराच संवाद होणें, इत्यादि गोष्टींच्या वर्णनानें पहिला समग्र अंक भरला आहे. ह्या पहिला अंक **कुमारसंभवां**तील संविधानकाहून निराळा आहे, असें म्हणण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. दुसऱ्या अंकांत **वासंतिका** व **रंभा** ह्या दोघींचें बालभाषेंतील संभाषण बरें असून तें अधिकच आहे. तिसऱ्या अंकांत **बृहस्पति, इंद्र** व **नारद** यांच्या संभाषणांतहि कांहीं कमी-जास्त फेरफार केलेलाच आहे. चौथ्या अंकांत मुनिवेषधारी **नंदी**[१] व **जया** आणि **विजया, पार्वतीच्या** सख्या, यांचा संवाद चांगला साधला आहे व हें प्रकरण ह्या नाटकांत अधिक आहे. पांचव्या अंकांत **पार्वतीच्या** विवाह-समारंभाचें वर्णन अधिक विस्तृत आहे व **पार्वतीस** मंगलस्नानानंतर अलंकार घातले आहेत त्यावर कवींनेंहि आपले अमोलिक अनेक अलंकार चढविले आहेत! यांतील भूषणप्रकार **कुमारसंभवां**तल्यापेक्षां अधिक असून मजेदार आहे!

**कुमारसंभवांत हिमालयवर्णन,** रतीचा शोक, **पार्वतीची** परीक्षा पाहण्याकरितां बटुरूपी **शिवाचा** उपदेश इत्यादि प्रकरणें अधिक विस्तृत आहेत व तीं उत्तम आहेत. याविषयीं मतभेद नाहीं.

आतां[२] **नारदाचें** स्वर्गातून उतरण्याच्या वेळेचें वर्णन, व **शाकुन्तलां**-त **दुष्यंत** व **मातलि** यांच्या स्वर्गातून उतरण्याच्या वेळच्या संवादां-तील देखाव्याचें वर्णन, यांत कांहीं ठिकाणीं थोडें थोडें सादृश्य जमतें, असेंहि कोणाचें ह्मणणें आहे. असेंच पाहत गेलें तर, कोणत्याहि ग्रंथांत कोठें तरी कोठलें थोडें तरी सादृश्य[३] जमल्यावांचून राहत नाहीं, असें मागें

---

१ कुमारसंभवांत नंदी ह्या वसंत व मदन यांच्या आविर्भावानें उच्छृंखळ झालेल्या गणांस नाकावर बोट ठेवून दापीत आहे! एवढाच संबंध आहे. तें पद्य हें होय:—

" लतागृहद्वारगतोऽथ नंदी वामप्रकोष्ठार्पितहेमवेत्रः ।
मुखार्पितैकाङ्गुलिसंज्ञयैव माचापलायेति गणान् व्यनैषीत् ॥ "

२ कै॰ न्या. तैलंग यांचा या संबंधानें एक लेख इं॰ऍं॰त प्रसिद्ध झालेला आहे.

३ अनेकांच्या वर्णनाचा एकच विषय असला ह्मणजे कांहीं ठिकाणीं तरी सादृश्य जमल्याखेरीज राहत नाहीं. बृहद्योगवासिष्ठांतील वैराग्यप्रकरणांतील लक्ष्मी-च्या संबंधानें दोषकथन, व कादंबरींतील शुकनास प्रधानाच्या उपदेशांतील लक्ष्मी-

आद्यकवि **कालिदास, बाण, भवभूति** व **माघ** अशासारख्या थोर कवींच्या काव्यांतून सुद्धां जमून आलेल्या सादृश्यावरून वाचकांच्या ध्यानांत आल्याखेरीज राहिलें नसावें !

ह्या नाटकांत व **कुमारसंभवांत** एकच संविधानक घेतलें असल्यामुळें कांहीं वाक्यांत शब्दार्थसादृश्य जमून येण्याचा संभव असल्यामुळें तें कोठें कोठें आलें आहे खरें, तरी तेवढ्यानें कवीचें सर्व कवित्व फुकट गेलें असें ह्मणणें धाडसाचें होय ! असें क्वचित् ठिकाणीं सादृश्य जमलें असलें तरी इतर गोष्टींचाहि विचार केला पाहिजे. ह्या कवीचें कवित्व पुष्कळ ठिकाणीं निराळें असून प्रासादिक असल्यामुळें असले अल्पस्वल्प दोष अगदींच क्षम्य नसावे हें चत्मारिक आहे ! व **पार्वतीपरिणयांतील** कविता **कुमारसंभवांतील** कवितेच्या जोडीस वरच्या पायरीवर बसण्यास जरी कोणाच्या मतें योग्य नसली, तरी खालच्या पायरीवर बसण्यास तरी ती निःसंशय योग्य आहे, असें नीट लक्ष देऊन पाहणाऱ्या कोणाहि रसिकजनास वांटल्यावांचून राहणार नाहीं !

आतां " **कुमारसंभवांतून** अजीबात चोरलेला एकंदर मजकूर "(!) **पार्वतीपरिणयांत** असल्यामुळें "ग्रंथकाराचा मूर्खपणा व धाडसाची शर्थ ! हीच खालची निव्वळ बाकी!" पदरांत पडते कीं काय ? याचा विचार करूं. **कालिदासाच्या कुमारसंभवांत** व **बाणाच्या पार्वतीपरिणयांत** जो एकंदर कथानकाचा मजकूर आहे तो **शिवपुराणांतूनच** घेतला आहे. **बाणानें** **शिवपुराणांतून** न घेतां **कुमारसंभवांतूनच** घेतला आहे, असें कोणीं दुराग्रहानें ह्मटल्यास त्यास तसें सबळ प्रमाण दाखवावें लागेल. नाहींतर नुसता दुराग्रह काय उपयोगी ? असो. आतां " अजीबात मजकूर चोरला " असें ह्मटलें आहे, तर दोघांनींहि **शिवपुराणांतूनच** मजकूर चोरला आहे, यासाठीं **कै० चिपळूणकरांनीं** जी बाकी काढिली आहे ती दोघांच्याहि माथीं मारावी लागेल! याकरितां असें ह्मणणें कांहीं ठीक नाहीं. तर तसें न ह्मणतां दोघांनींहि बाहेरचे कथानक घेऊन काव्यें रचलीं, असें ह्मणणेंच योग्य वाटतें. **बाणानें**

---

च्या संबंधानें दोषकथन, यांत कोठें कोठें सादृश्य जमतें ! ह्मणून बाणभट्टानें त्या ग्रंथांतून चौर्य केलें असें कोणीं म्हटलें तर उचित होईल काय? होणार नाहीं. अशीं आणखीहि अनेक स्थळें दाखवितां येतील.

याप्रमाणें कादंबरींत देखील पूर्वीच्या एका कथानकाचा आधार घेतला आहे, तरी त्यांत त्याचे अनुपम कवित्व आढळून येतच आहे ! प्रत्येकाचें निरनिराळ्याप्रकारचें चमत्कारजनककवित्व व कल्पना असल्यावर अन्य ग्रंथांतला आधार घेतला असला तरी कोणासहि दोष देणें युक्त आहे असें मला वाटत नाहीं !

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरासारख्या सहृदय विद्वानाकडून अशा तऱ्हेचा अभिप्राय कसा देण्यांत आला हें मात्र समजत नाहीं! दोन्ही काव्यांत एकच गोष्ट व थोडी समानार्थक वाक्यें हीं दृष्टीस पडल्याबरोबर त्यांनीं हें काव्य नीट रीतीनें सर्व पाहण्याचें सोडून देऊन आपलें मत असें ठाम केलें कीं काय कोण जाणे! कुमारसंभवांतील कोठलें तरी थोडें अर्थसादृश्य ज्यांत जमलें आहे अशीं पार्वतीपरिणयांतील बरींच पद्यें व कुमारसंभवांतील पद्यें अशीं दोन्ही ताडून पाहण्याकरितां पुढें एकाखालीं एक सादर केलीं आहेत. तीं पहावीं ह्मणजे जरी कोठें एखादें दुसरें वाक्य किंवा कांहीं अर्थसादृश्य जमल्यासारखें दिसलें, तरी प्रस्तुत कवीच्या कल्पना निराळ्या व त्याहि चांगल्याप्रकारच्या असेंच आढळून येईल. ह्यांतील स्वतंत्र कवितेचे मासले व नाटकांतील कांहीं भागहि पुढें दिले आहेत. त्यावरून ह्या कवीच्या स्वतंत्र कवित्वाचा मासला कळून येईल. सारांश, दोन्ही कस सहृदयविद्वज्जनांच्या नजरेपुढें ठेवले आहेत, ते त्यांनीं योग्य रीतीनें मात्र पारखून पहावे !

पार्वतीच्या तारुण्याचें वर्णन.

कुमारसंभवः—

असंभृतं मण्डनमङ्गयष्टेरनासवाख्यं करणं मदस्य ।
कामस्य पुष्पव्यतिरिक्तमस्त्रं बाल्यात्परं साथ वयः प्रपेदे ॥

पार्वतीपरिणयः—

आसेचनकतनुश्रीरंतःकरणस्य किमपि संवननम् ।
सा खलु गिरिराजसुता संमोहनमस्त्रमेव पुष्पेषोः ॥

इन्द्राच्या सहस्र नेत्रांस अनुलक्षून दोघां कवींनीं भिन्न भिन्न रीतीनें केलेलें वर्णन.

कुमारसंभवः—

तस्मिन्मघोनस्त्रिदशान्विहाय सहस्रमक्ष्णां युगपत्पपात ।
प्रयोजनापेक्षितया प्रभूणां प्रायश्चलं गौरवमाश्रितेषु ॥

पार्वतीपरिणय:—

कैश्चिन्नेत्रैर्दलितदनुजं वज्रमालोकमानः
कैश्चित्पश्यन्नमरसुदृशां सस्मितान्याननानि
कैश्चित्सेवाविहितमनसामंजलिं वीक्षमाण-
श्चित्ते चिंतापर इव पुरो दृश्यते वासवो मे ॥

15 MAY 2007

इन्द्रास आपल्या साहाय्याची गरज लागलेली पाहून मदन त्यास म्हणतो:

कुमारसंभव:—

आज्ञापय ज्ञातविशेष पुंसां लोकेषु यत्ते करणीयमस्ति ।
अनुग्रहं संस्मरणप्रवृत्तमिच्छामि संवर्धितमाज्ञया ते ॥

पार्वतीपरिणय:—

त्रैलोक्यनाथस्य तवातिशक्तेः किमस्ति कार्यं मघवन्मयापि।
प्रकाशिताशेषदिशावकाशो दिवाकरो दीपमपेक्षते किम् ॥

इन्द्र मदनास थोरपणा देतो आहे. पार्वतीपरिणयांत इन्द्रानें मदनाचें गौरव केलें आहे तें अधिक सरस आहे.—

कुमारसंभव:—

सुराः समभ्यर्थयितार एते कार्यं त्रयाणामपि विष्टपानाम् ।
चापेन ते कर्म न चातिहिंस्रमहो बतासि स्पृहणीयवीर्यः

पार्वतीपरिणय:—

चक्रेण विष्णोरपि यद्दुरापं तरस्विना वा शतकोटिना मे ।
तत्साधयेत्पुष्पमयं त्वदस्त्रमहो भवानद्भुतबाहुवीर्यः ॥

वसंताचें प्रकट होणें:—

कुमारसंभव:—

तस्मिन्वने संयमिनां मुनीनां तपःसमाधेः प्रतिकूलवर्ती ।
संकल्पयोनेरभिमानभूतमात्मानमाधाय मधुर्जजृम्भे ॥

पार्वतीपरिणय:—

वाचालयन्नथ कुलानि वनप्रियाणां अंकूरयन्मलयमारुतकन्दलानि ।
सख्युः प्रसूनविशिखस्य भुजावलेपं संवर्धयन्मधुरजृंभत काननेषु ॥

कुमारसंभव:—



21 MAR 1990

अमूत सद्यः कुसुमान्यशोकः स्कन्धात्प्रभृत्येव सपल्लवानि ।
पादेन नापैक्षत सुन्दरीणां संपर्कमासिंजितनूपुरेण ॥

पार्वतीपरिणयः---

चूताः कोरकिता विनापि सुदृशां हस्तांबुजामर्शनात्
तत्पादांबुजताडनैरपि विना कंकेलयः पुष्पिताः ।
तत्संगीतकमन्तरेण हसिता रम्याः प्रियालद्रुमाः
मुक्त्वा तद्वदनासवं मुकुलिता गंधोत्तराः केसराः ॥

मदनानें आपलें मोहनास्त्र सोडलें त्यावेळेस शिवाची कशी अवस्था झाली तिचें वर्णन पुढील श्लोकांत आहे. पार्वतीपरिणयांत तर शिव व पार्वती ह्या दोघांचीहि कशी चलबिचल झाली तिचें वर्णन केलें आहे व तें फारच मजेदार साधलें आहे !

कुमारसंभवः—

हरस्तु किंचित्परिलुप्तधैर्यश्चन्द्रोदयारम्भ इवाम्बुराशिः ।
उमामुखे विम्बफलाधरोष्ठे व्यापारयामास विलोचनानि ॥

पार्वतीपरिणयः—

तदनु युगपदीशः पार्वतीवक्त्रपद्मे
स्मितविकसितगंडे प्राहिणोल्लोचनानि ।
पुलकिततनुरंतर्भावमावेदयंती—
दरमुदितमुखेंदुः सा च सव्रीडमस्थात् ॥

पार्वतीचें क्लेश पाहून भगवान् शंकर तीस ह्मणतो आहेः—

कुमारसंभवः—

मुनिव्रतैस्त्वामतिमात्रकर्शितां दिवाकराप्लुष्टविभूषणास्पदाम् ।
शशाङ्कलेखामिव पश्यतो दिवा सचेतसः कस्य मनो न दूयते ॥

पार्वतीपरिणयः—

क्वेदं तपः कठोरं क्वेदं सुकुमारमंगमबलायाः ।
दिवसः कुत्र घनोष्मा कुत्र कला कमलकोमला चांद्री ॥

ब्रह्मचारीवेष धारण करणारा शंकर पार्वतीची परीक्षा पहाण्याकरितां शिवाची निंदा करतो आहे—

कुमारसंभवः—

अथाह वर्णी विदितो महेश्वरस्तदर्थिनी त्वं पुनरेव वर्तसे ।
अमङ्गल्याभ्यासरतिं विचिन्त्य तं तवानुवृत्तिं न च कर्तुमुत्सहे ॥

पार्वतीपरिणयः—

जगत्त्रयीयौवनबालचंद्रिका कुलस्य रत्नं भवती क भूभृतः ।
क कृत्तिवासाः पितृकानने वसन्भुजंगमालाधरस्त्रिलोचनः ॥

पार्वतीची निष्ठा पाहून शंकर प्रसन्न होऊन म्हणतो आहे...

कुमारसंभवः—

अद्यप्रभृत्यवनताङ्गि तवास्मि दासः
क्रीतस्तपोभिरिति वादिनि चन्द्रमौलौ ।
अह्नाय सा नियमजं क्लममुत्ससर्ज
क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ॥

पार्वतीपरिणयः—

परिणाहि स्तनयुगलकुंकुमपत्रकं श्रमेन किं गिरिजे ।
तव हस्तदानचतुरस्तपसा हि क्रीतोऽयमस्मि दासजनः ॥

विवाहकाळीं अभ्यंगस्नान झाल्यावर पार्वतीनें शुभ्र वस्त्र परिधान केलें, त्यावर दोघांहि कवींच्या उपमाः—

कुमारसंभवः—

सा मङ्गलस्नानविशुद्धगात्री गृहीतपत्युद्गमनीयवस्त्रा ।
निर्वृत्तपर्जन्यजलाभिषेका प्रफुल्लकाशा वसुधेव रेजे ॥

पार्वतीपरिणयः—

मंगलमज्जनविशदा कर्पूरक्षोदपाण्डुरं क्षौमम् ।
साधत्त जलदधौता द्यौरिव शरदिन्दुचंद्रिकाच्छेदम् ॥

स्नानानंतर सख्यांनी पार्वतीच्या डोळ्यांत काजळ घातलें, त्यावर दोघांहि कवींचें भिन्नप्रकारचें वर्णनचातुर्यः—

कुमारसंभवः—

तस्याः सुजातोत्पलपत्रकान्ते प्रसाधिकाभिर्नयने निरीक्ष्य ।
न चक्षुषोः कान्तिविशेषबुद्ध्या कालाञ्जनं मङ्गलमित्युपात्तम् ॥

पार्वतीपरिणयः—

आयामिनोस्तदक्ष्णोरंजनरेखाविधिं वितन्वंत्याः ।
पाणिः प्रसाधिकायाः प्रापदपाङ्गं चिरेण विश्रम्य ॥

पार्वतीपरिणयांतील पद्यें कुमारसंभवांतील पद्यांहून अगदींच भिन्न प्रकारचीं व भिन्न कल्पनेचीं अशीं कांहीं आहेत, त्यांपैकीं थोडीं खालीं दिलीं आहेत.—

आदौ प्रेमकषायिता हरमुखव्यापारलोला शनै-
र्व्रीडाभारविघूर्णिता मुकुलिता धूमोद्गमव्याजतः ।
पत्युः संमिलिता दृशा सरभसव्यावर्तनव्याकुला
पार्वत्याः परिणीतिमंगलविधौ दृष्टिः शिवायास्तु नः ॥

ह्या पद्यांत पार्वतीचा मुग्ध शृंगार कवीनें किती खुबीनें वर्णन केला आहे !

आरादंजलिपेयमत्र विकसन्मन्दारपुष्पोत्थितं
सौरभ्यं पवनोपनीतमभितो धावन्त्यमी षट्पदाः ।
तंत्रीमण्डलमार्द्रयन्ति कणिका मन्दाकिनीपाथसा-
मप्यन्तःकरणं च मे सुमहतीमालंबते निर्वृतिम् ॥

ह्या पद्यांत नारदऋषि स्वर्गातून हिमालयावर उतरत असतां मार्गांतील देखाव्यांचें वर्णन करीत आहे, व तें चांगलें साधलें आहे !

स्वायत्तसिद्धाखिलकामनानां तत्त्वे परस्मिन्परिनिष्ठितानाम् ।
भवादृशामागमनोत्सवोऽयं न लभ्यते नूनमनाप्तपुण्यैः ॥

यांत हिमालयाकडे नारदऋषि आला असतां त्यानें नम्रपणानें त्याचा महिमा वर्णून आपल्यास धन्य मानिलें आहे !

उद्धृत्यामरदीर्घिकाजलभुवामंभोरुहाणां ततीः
स्वैरं नन्दनपादपानभिमतानामूलमुन्मूल्य नः ।
हृत्वा वांछितवस्तुदानचतुरां तामर्जुनीं दुर्जनाः
स्वर्गस्त्रैणकचग्रहं रचयितुं निःशंकमुद्युंजते ॥

यांत तारकप्रभृति दैत्यांनीं दिलेल्या उपद्रवांचें हुबेहुब वर्णन केलें आहे.

मुखरमधुपमालाचारुमौर्वीसनाथं
त्रिभुवनजययोग्यं चापमंसे दधानः ।
मुखमुदितविलासं वीक्षमाणः प्रियायाः ।
सहमधुरिह मंदं मंदमायाति कामः ॥

यांत वसंतासह येणाऱ्या मदनाचें सुरेख चित्र कवीनें दाखविलें आहे.

कायं सुगंधिविशिखः स्वदमानचापः
स्त्रीणां वशीकरणकर्मणि जागरूकः ।
कासौ ललाटनयनानलविस्फुलिंग-
वार्तावशेषितपुरत्रितयो महेशः ॥

यांत कवीनें मदनाकडून शिवाचा पराभव होणें अशक्य असल्याची चिंता दाखविली आहे.

अत्रांतरे हरमुपासितुमभ्ययासीत्
वासन्तिकप्रसवकल्पितमंडनश्रीः ।
शृंगारवीरतपसामधिदेवतेव
साकं सखीभिरवनीधरराजकन्या ॥

यांत शंकराच्या सेवेस आलेल्या पार्वतीचें कवीनें खुबीदार वर्णन केलें आहे !

आराद्पश्यदधिसंधितमोहनास्त्रं
कर्णावतंसपदकल्पितकार्मुकज्यं ।
आकुञ्चितैकपदमञ्चितपूर्वकायं
लक्षीकृताल्पवपुषं मदनं महेशः ॥

यांत मदनानें शंकरावर लक्ष्य धरलें असतां त्याच्या आकृतीचें चित्र कवीनें अगदीं हुबेहूब रेखाटलें आहे !

आधूय प्रणयं विवस्वति गते देशान्तरे पद्मिनी-
सोढुं तस्य वियोगमक्षमतया म्लायत्सरोजानना ।
सन्ध्यावल्कलिनी द्विरेफपरिषद्रुद्राक्षमालावती
तत्प्राप्तिस्पृहयेव संप्रति तपःसक्ता समालक्ष्यते ॥

या पद्यांत आपला पति सूर्य हा अस्तास गेल्यावर त्याची स्त्री पद्मिनी ही विरक्त होऊन तप करण्यास उद्युक्त झाली असल्याचें कवीनें रूपकालंकारांत फारच चांगलें वर्णन केलें आहे !

एषा चन्दनमालिका विरचिता चूतप्रवालैर्नवै-
रंम्भास्तंभपरिष्कृतेषु भवनद्वारेषु संलक्ष्यते ।
आमन्द्रध्वनयः क्वणन्ति मुरजा मूर्च्छन्ति तन्त्रीस्वनाः
सिंजानैर्मणिभूषणैस्ततस्ततो नृत्यन्ति वाराङ्गनाः ॥

उत्सर्पदागरवधूपपरम्पराभिः
प्रादुर्भवत्यभिनवो जलदागमोयं ।
उन्नद्धतोरणमणिप्रभया स्फुरन्त्या
संजायते च शतमन्युशरासनश्रीः ॥
विक्षिप्तः सरभसमेष पौरलोकै-
र्विस्फूर्जत्कनकरजःपिशंगदीप्तिः ।
प्रत्यग्रद्युमणिमयूखजालशोभा-
माधत्ते दिशिदिशि कौङ्कुमः परागः ॥

ह्या तिन्हीं पद्यांत कवीनें विवाहसमारंभाचें चांगलें वर्णन केलें आहे.

विद्युद्वल्लीवितानव्यतिकरसुषमां व्योम्नि विस्तारयन्त्यः
कान्त्या नीलोत्पलानां श्रियमिव नयनैर्दिङ्मुखे दर्शयन्त्यः ।
ज्योत्स्नालक्ष्मीं दिवापि स्मितरुचिविसरैर्विष्वगुत्पादयन्त्यः
सर्वाः स्वर्वारयोषाः सममरगणैरागताः प्रीतये नः ।

यांत अप्सरांच्या स्वाभाविक सौंदर्याचें वर्णन कवीनें केलें आहे व तें चांगलें साधलें आहे.

अंगं भूषणनिकरो भूषयतीत्येष लौकिको वादः ।
अंगानि भूषणानां कामपि सुषमामजीजनंस्तस्याः ।

यांत पार्वतीच्या अवयवांनींच तिच्या अंगावर घातलेल्या भूषणांस शोभा आणिली. असें तिच्या अप्रतिम सौंदर्याचें वर्णन केलें आहे! हीं थोडीं पद्यें **कुमारसंभवा**शीं ज्यांचा कांहीं संबंध नाहीं अशी कवीच्या स्वतःस्फूर्तीच्या कवित्वाची साक्ष देण्यास पुरे होतील !

आतां कवीच्या नाटकरचनेंतला कांहीं भाग वाचकांच्या परीक्षेकरितां दाखल केला आहे, त्यांतहि त्याचें चातुर्य, रसिकत्व, व कवित्व हीं दिसून येतात.

शंकरः पार्वतीं विलोक्यात्मगतम् ।

गीतिः

एषा विशेषरम्या विवाहवेषेण मोहनेन दृशाम् ।
प्रतिभाति मानसे मे मदनसहस्राणि कल्पयंतीव ॥

बृहस्पतिः।भो शंकर! वध्वा सहास्यां वेदिकायां प्राङ्मुखो वर्तेथाः।
शंकरः । पार्वत्या सहोपविशति । आत्मगतम् ।

गीतिः

नंदितनयनचकोरा नवनवलावण्यकौमुदीप्रसरा ।
उत्कुलयति मनो मे जलधिं सैषा कलेव चांद्रमसी ॥

बृहस्पतिः । अग्निमुपसमाधाय । शंकर त्वदीयेन पाणिना पार्वत्या पाणिमवलंबस्व ।

शंकरः । तथा करोति ।

पार्वती । पुलकोद्भेदमभिनयति ।

शंकरः । आत्मगतम् ।

गीतिः

आभाति बालिकेयं पाणिस्पर्शेन पुलकितावयवा ।
अभिनववसंतसंगादाविर्मुकुलेव बालचूतलता ।

ब्रह्मा । वधूवरौ पावकं प्रदक्षिणां कुरुतम् ।

उभौ । तथा कुरुतः ।

पार्वती । शंकरमवलोकयति ।

शंकरः । प्रत्यवलोकयति ।

पार्वती । दृष्टिं परावर्तयति ।

शंकरः । आत्मगतम् ।

गीतिः

अवलोकनाय लोला दृष्टिरियं मृगदृशो निवृत्तिमती ।
गत्वा प्रतिप्रवाहं राजति शफरी निवर्तमानेव ॥

बृहस्पतिः । पार्वत्याः पाणिना लाजांजलिं कारयति ।

पार्वती । धूमाक्रमेण वैक्लव्यं निरूपयति ।

शंकरः । आत्मगतम् ।

प्रस्विन्नगंडफलकच्युतपत्रलेखं
धूमानुषंगगलितांजनपाटलाक्षम् ।
म्लायद्वसन्तकुसुमं मुखमायताक्ष्या-
श्चित्ते ममार्पयति कामपि रागमुद्राम् ॥

बृहस्पतिः । शंकर पार्वत्याः पादकमलं पाणिभ्यामश्मानमारोपयतु भवान् ।

शंकरः । स्मयमानमुखस्तूर्ष्णीं तिष्ठति ।
कुलपर्वताः । ससंभ्रमम् । भगवन्प्रमाणभूतेन पुरोधसा यदुच्यते तदनुष्ठीयताम् ।
भूतगणाः ससंरंभम् । कुलपर्वताः कथमित्र नियम्यते त्रिभुवननियंता नीललोहितः ।
ब्रह्मा । सस्मितम् । उभौ निवार्य । सकलजननियामिका स्वतःप्रमाणभूता श्रुतिरेव सम्यगित्थमभिदधाति । तद्यथोक्तमनुष्ठीयताम् ।
शंकरः । संकुचिताभ्यां पाणिभ्यां पार्वत्याः पादकमलमश्मानमारोपयति ।
बृहस्पतिः । कर्मशेषं समापयन्वधूवरौ ब्रह्माणं प्रणमयति ।
ब्रह्मा । हस्तमुद्यम्य गीतिः

सकलजगतां सवित्रोरनन्यसामान्यमस्तु वां प्रेम ।
भुवनभयभंगदक्षो भवतु कुमारोपि तारकध्वंसी ॥

असो, हा लेख बराच लांबला खरा, परंतु यास इलाज नाहीं. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरासारख्या प्रसिद्ध विद्वान् गृहस्थाचें सर्वथैव प्रतिकूल व फारच कडक मत पडलें असल्यामुळें इतका लांब पुरावा दाखल करणें भाग पडलें !

ह्या पुस्तकांची पहिली आवृत्ती छापून प्रसिद्ध झाल्यावर सुमारें एक वर्षानें श्रीरंग येथील बालसुब्रह्मण्य यांनीं पार्वतीपरिणयाची नवीन आवृत्ती छापून प्रसिद्ध केली आहे. त्या पुस्तकाच्या आरंभीं वत्सकुलोत्पन्न पंडित अभिनवभट्टबाण कृष्णमाचार्य यांनीं संस्कृत भूमिका ( प्रस्तावना ) लिहिली आहे. तींत पार्वतीपरिणय हें प्राचीन बाणकृत नसून अभिनवबाण किंवा वामनबाण यानें केलें असावें, अशाविषयीं बरेंच प्रतिपादन करून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. हर्षचरितांत वत्सवंशांत ( बाणमात्मजम् ) बाण उत्पन्न झाल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. " बभूव वात्स्यायन वंशसंभवो " " बाण इतिव्यजायत " असें कादंबरींतहि आहे. " वत्सान्वयजलधिसंभवो बाणः " असें पार्वतीपरिणयांतहि आहे. आणि शेवटीं दाखल केलेल्या पद्यांवरून प्राचीन बाण व वामनबाण किंवा अभिनवबाण हे दोघे वत्सवंशज असून दोघेही ग्रंथकार व कवी असल्या-

 श्रीमंत स्रो. मं. पं. वाचनालय, अको

मुळें **पार्वतीपरिणय** हें कोणाचें? याविषयीं शंका उत्पन्न होणें साहजिक आहे. पंडित **कृष्णमाचार्य** यांनीं स्वोक्तीच्या समर्थनार्थ **वामनभट्टबाणाच्या शब्दरत्नाकरां**तील " **तेजोभिः पश्यते त्रिभिः** " या वाक्याचें " **तेजस्त्रयेण महता विहितेक्षणश्रीः** " ह्या **पार्वतीपरिणयां**तील वाक्याशीं समानार्थकता जमत असल्यामुळें दोन्ही पुस्तकांचा कर्ता **वामनबाणच** असावा असें एक प्रमाण दिलें आहे.

आतां **वीरनारायणचरित, शब्दरत्नाकरनिघंटु,** व **शृंगारभूषणभाण** ह्या ग्रंथांत **वामनबाण, वामनभट्टबाण, अभिनवबाण** असेच सर्वत्र कवीनें स्वनामनिर्देश केले आहेत आणि **हर्षचरितांत** व **कादंबरींत** केवल ' **बाण** ' ( **बाणभट्ट** असा देखील नाहीं ) नांवाचाच उल्लेख केलेला आहे. तसाच **पार्वतीपरिणयां**तहि आहे. **पार्वतीपरिणयां**तील **वामन** हें उपपद **वामनबाण** हा माहीत नसल्यामुळें वगैरे कारणांनीं नष्ट झालें असावें, असेंहि पंडित **कृष्णमाचार्य** यांच्या कल्पनेनें भरारी मारली आहे. परंतु हें सर्वच प्रतींतून कसें नष्ट झालें? हें मात्र नवल आहे! याकरितां हें त्यांचें ह्मणणें मला तरी युक्त वाटत नाहीं. तसेंच " **कुचयुगुलं परिणद्धं यथा यथा वृद्धिमेति तन्वंग्याः। वराचिंतात्दतमनसस्तथातथा कार्श्यमेति मे गात्रम्॥** " आणि " **आभोगशालि कुचकुड्मलमायताक्ष्याः** " इत्यादि " **वर्णनं तु पुत्रीविषयकत्वादनुचितम्** " असा पंडित कृष्णमाचार्यांनीं शेरा मारला आहे. "**पार्वतीपरिणयांत** कन्येच्या संबधानें पित्याच्या तोंडांत अशीं वाक्यें घातलीं आहेत, तशीं प्राचीन **बाण**कवीनें घातलीं नसतीं. तेव्हां हें नाटक **वामनबाण** यानें केलेलें असावें." अशीहि एक कोटी त्यांनीं स्वोक्तीच्या समर्थनार्थ लढविली आहे. परंतु ही त्यांची कोटी वरपंगी सयुक्तिक दिसली तरी मला ती तशी वाटत नाहीं. कारण. " **उद्वेगमहावर्ते पातयति पयोधरोन्नमनकाले। सरिदिव तटमनुवर्षं विवर्धमाना सुता पितरम्** " ह्या **हर्षचरितां**तील पद्यांत " **पयोधरोन्नमनकाले** " हें कन्येच्या संबधानें प्राचीन **बाण**कवीनें घातलें आहे, इतकेंच नव्हे तर " **देवि, तरुणी भूता वत्सा राज्यश्रीः** " " **हृदयमन्धकारयाति मे दिवसमिव पयोधरोन्नतिरस्याः** " असें **पार्वतीपरिणयां**तल्या प्रमाणेंच पित्याच्या तोंडांत देखील घातलें आहे. यामुळें हें " **आभोगशालि कुचकुड्मलमायताक्ष्याः** "

१०

या पार्वतीपरिणयांतील वाक्याशीं समानार्थक असून प्राचीन बाणोक्तीस पोषक व साक्षीभूतच आहे ! असें कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारखें आहे. तसेंच—

'अचिरप्रोषिते सवितरि शोकविधुरा कमलमुकुलमण्डलुधारिणी हंससितदुकूलपरिधाना मृणालधवलयज्ञोपवीता मधुकरमण्डलाक्षवलय-मुद्वहन्ती कमलिनी दिनपतिसमागमव्रतमिवाचरत् ।'

ह्या कादंबरींतील वाक्यसमूहाची व पार्वतीपरिणयांतील पुढील पद्याची बरीच समानार्थकता जमते, तें पद्य फिरून येथें देतों.

" आधूय प्रणयं विवस्वति गते देशान्तरे पद्मिनी-
सोढुं तस्य वियोगमक्षमतया म्लायत्सरोजानना
सन्ध्यावल्कलिनी द्विरेफपरिषद्रुद्राक्षमालावती
तत्प्राप्तिस्पृहयेव संप्रति तपःसक्ता समालक्ष्यते ॥ "

या ठिकाणीं दोहींतील संध्याकालचें रूपकालंकारांतील कल्पनासादृश्य बरेंच जमून आलें आहे, असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

यावरून हें नाटक प्राचीन बाणकवीचें नसेलच असें ह्मणणें बरोबर वाटत नाहीं, आणखीहि त्यांनीं कांहीं प्रमाणें ह्मणून दिलीं आहेत, परंतु त्यापासून समाधान व खात्री होत नाहीं. तेव्हां पार्वतीपरिणय हें प्राचीन बाणकवीचें आहे, किंवा अभिनवबाणकवीचें आहे, याबद्दल त्यांनीं दिलेल्या प्रमाणांवरून उलगडा होत नाहीं. आतां हें कोणाचेंहि असलें तरी त्यांत कवित्व आहे, असें मला वाटतें व तें मीं दाखविलेंच आहे. आतां कादंबरी इत्यादि ग्रंथांतल्यासारखें कवित्व यांत नाहीं हें खरें. परंतु कादंबरीसारखे वर्णनाचे विषय निराळे व नाटकाचे निराळे. नाटकांतील रचना कादंबरी-सारखी होणें शक्य नाहीं. तसेंच कोणत्याहि ग्रंथकाराच्या अनेक प्रकारच्या ग्रंथांत सर्वत्र उत्तम प्रकारची एकसारखी रचना व सुरसता उतरतेच असेंहि नाहीं. तर ती कमीजास्त प्रमाणानें असते.

फार दूरचीं प्रमाणें कशाला ! बाणाच्या हर्षचरितांत सुमारें तीसपस-तीस पद्यें आहेत. त्याच्या चंडिकाशतकांतहि शंभर पद्यें आहेत, परंतु त्यांत सर्वत्रच सारखें कवित्व कोठें आहे ! बाणाच्या कादंबरीसारखा रस-परिपाक त्याच्या हर्षचरितांत तरी सर्वत्र अगदीं तंतोतंत कोठें उतरला आहे. परकीय कवि मिल्टन याच्या 'प्यारेडाइज लॉस्ट' काव्यासारखें 'प्यारे-

पुस्तक



डाइज रिगेन ' हें काव्य तसें सरस कोठें उतरलें आहे! कदाचित् बाणाचा हा प्रथम प्रयत्नहि असेल अशीहि कल्पना केली असतां ती अयोग्य होणार नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां पार्वतीपरिणयांतील कवित्व ह्या कवीच्या इतर कवित्वाशीं अगदींच न जमण्यासारखें आहे असें मला वाटत नाहीं ! असो. आतां वामनबाण याच्या प्रत्येक ग्रंथांत—

सौभाग्यस्य निधिः श्रुतस्य वसतिर्विद्यावधूनां वरो ।
लक्ष्म्याः केलिगृहं प्रसूतिभवनं शीलस्य कीर्तेः पदम् ।
निःसामान्यविकासया कवितया जागर्ति वत्सान्वय- ।
श्रीमान्वामनभट्टबाणसुकविः साहित्यचूडामणिः ॥

शृंगारभूषणभाण.

जागर्ति वामनो बाणो वत्सवंशशिखामणिः ।

शब्दरत्नाकरनिघंटु.

जयति कविभट्टबाणे दधति कविमन्यभावमन्येपि ।
प्रद्योतयाति रवौ द्यां खद्योताख्या न किन्न कीटमणेः ।
गाथास्तथागता वो दधति वितथतां तार्किकास्तत्त्वविद्भिः
सत्रा सत्रासमाध्वं फणिभणितिजुषो वः कृतं प्रक्रियाभिः
भग्ना साहित्य सीमा * * * * वामने भट्टबाणे ।
दीव्यत्यस्मिन्कवींद्रे जहित जहित भोः कद्वदा विद्वदाख्याम् ।
अयमभिनवबाणः काव्यमत्यद्भुतार्थं ॥ ३०

वीरनारायणचरित.

अशा प्रकारच्या अहंकारोक्ति, आणि ' वामनभट्टबाणसुकवि ' ' वामनबाण ' ' कविभट्टबाण ' व अभिनवबाण ' असे नामनिर्देश यांत केलेले आहेत. तसे पार्वतीपरिणयांत नाहींत. कादंबरींतल्या व हर्षचरितांतल्याप्रमाणेंच यांत ' बाण ' असेंच आहे. तेव्हां हें नाटक प्राचीनबाणकृत नसेलच असें खात्रीनें म्हणणें मला तरी बरोबर वाटत नाहीं. कदाचित् बाणानें पूर्ववयांत पहिल्यानेंच हें नाटक रचलें असावें व त्यामुळें यास जितकी प्रौढता यावी तितकी आली नसावी असाहि संभव वाटतो.

## बाणाचे अप्रसिद्ध ग्रंथ.

या ग्रंथाशिवाय ' मुकुटताडितक ' नांवाचें एक नाटक बाणकवीच्या नांवावर असल्याबद्दल दमयन्तीचम्पूवर गुणविनयगणीच्या टीकेंत सहाव्या

उच्छ्वासांत उल्लेख केलेला आहे, व त्या नाटकाच्या टीकेंत प्रसंगानें त्यांतील एक पद्यहि दिलेलें आहे. तें असें:—

' यदाह मुकुटताडितकनाटके बाणः—

" आशाः प्रोज्झितदिग्गजा इव गुहाः प्रध्वस्तसिंहा इव।
द्रोण्यः कृत्तमहाद्रुमा इव भुवः प्रोत्खातशैला इव
बिभ्राणाः क्षयकालरिक्तसकलत्रैलोक्यकष्टां दशाम्
जाता क्षीणमहारथाः कुरुपतेर्देवस्य शून्याः सभाः "

भीष्मद्रोणासारखे अतिरथी महारथी नाहींतसे झाल्यामुळें कुरुराज **दुर्योधन** याच्या सभा कशा शून्य दिसल्या, याबद्दल **बाण**कवीनें या कवितेंत किती सरस व स्वाभाविक उपमा दिल्या आहेत, त्या पाहून सहृदयजनांस खाचितच आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. !

हें नाटक कोठें कोणाला उपलब्ध झालें असल्याचें अद्याप समजलें नाहीं. **बाण**कवीचीं व तशींच **भासादि** इतर कवींचीं आणखी अशीं किती काव्यरत्नें नष्ट झालीं असतील तीं असोत ! !

आणखी ' **सर्वचरित** ' म्हणून एक नाटक **बाण**कवीच्या नांवावर असल्याचें समजतें, परंतु तेंहि अद्याप प्रसिद्ध झाल्याचें समजलें नाहीं.

## बाण, दोघे श्रीहर्ष व त्यांचे ग्रंथ.

## ( कै. वि. कृ. चिपळूणकर व डॉ. वुइल्सन. )

एकाच नांवानें प्रसिद्ध परंतु भिन्नभिन्न असलेल्या **श्रीहर्ष**कवींचा व **बाण** व **रत्नावलि** यांचा नांवाजलेल्या विद्वानांनीं देखील मोठा घोटाळा केलेला आहे. याकरितां यासंबंधानें विवेचन करणें अत्यंत आवश्यक आहे.

' **रत्नावलि** ' या नाटकाचा कर्ता **श्रीहर्ष** आहे. तथापि त्याचा कर्ता **बाण**कविच असावा, असें कित्येकांचें मत आहे. परंतु तें चुकीचें आहे.

' **रत्नावलि** ' ही **बाण**कवीनें केली असें प्रतिपादन करणाऱ्यांच्या म्हणण्यास सबल आधार आहे असें बिलकूल दिसत नाहीं ! **श्रीहर्षां**च्या

---

१ हें नाटक लाहोर येथें राधाकृष्ण पंडित यांच्या येथील पुस्तकांच्या यादींत ' बाणकवी ' च्या नांवावर नमूद केलेलें आहे.

२ बाणानें स्ववर्णनाविषयक हर्षराजास ' हर्ष ' असेंच म्हटलें आहे. परंतु ताम्रपत्रांतील लेखांत आणि रत्नावळि वगैरे नाटकांत त्यास श्रीहर्ष असेंच म्हटलेंले आहे.

नांवावर केवळ 'रत्नावलि' एकच नसून याशिवाय **प्रियदर्शिका** व **नागानंद** अशीं एकंदर तीन नाटकें प्रसिद्ध आहेत. यांतील सारख्याच प्रस्तावनेवरून व नांदीवरून या तीनहि नाटकांचा कर्ता हाच **श्रीहर्ष** असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे पूर्वीचें पुष्कळ राजे विद्वान् व ग्रंथकार असल्याबद्दल प्रसिद्धि आहेच; त्याप्रमाणें हाहि राजा विद्वान् व ग्रंथकार होता.

श्रीहर्षाला **रत्नावलिच** तेवढी विकत घेण्याचें काय कारण पडलें होतें तें समजत नाहीं ! त्याच्या नांवावर आणखी दोन नाटकें प्रसिद्ध आहेत व त्यांजविषयीं कोणीं कोठें असे उल्लेख केलेले आढळत नाहींत. यावरून टीकाकारांचें ह्मणणें बरोबर आहेसें वाटत नाहीं. **बाणकवीस** द्रव्याचा हव्यासच असता तर त्यानें **हर्षचरित** व **कादंबरी** हे ग्रंथ विकले असते तर त्याला पुष्कळ द्रव्य मिळालें असतें! त्यांत **हर्षचरिता**बद्दल तर हर्षराजाकडून त्यास पुष्कळच धन मिळालें असतें व **रत्नावलीच्या** जागीं **हर्षचरिताची** तशी प्रसिद्धि चालू राहती. परंतु पुस्तक विकून द्रव्य संपादन करण्याइतकी **बाणकवीची** निकृष्ट स्थिति नव्हती, हें त्याच्या गृहस्थितीवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. त्यानें **रत्नावली** केली असती तरी त्यास ती विकण्याचें कांहीं एक कारण पडलें नसतें असें खचित वाटतें. कै. **विष्णूशास्त्री चिपळूणकर** यांनीं **भवभूतीच्या** निबंधांत कांहीं प्रसंगानें श्रीहर्षाच्या संबंधानें उल्लेख केला आहे तो असा:—

'वरील दोहों प्रकारचे ग्रंथ ( पद्यमय व गद्यपद्यमय ) ज्यांचे अजून प्रसिद्ध आहेत असे कवि, **कालिदासाखेरीज** आणखी दोघेच काय ते आहेत असें वाटतें. एक **श्रीहर्ष** ज्याच्या नांवानें पूर्वोक्त दोन नाटकांशिवाय अतिशयोक्तिरूपवर्णनादिदोष आणि मृदुत्वातिशयादि गुण यांनीं युक्त असें '**नैषध**' नामक विख्यात काव्य ज्याचें प्रसिद्ध आहे तो.'

पूर्वोक्त दोन नाटकें ह्मणजे **रत्नावलि** व **नागानंद** हीं होत. यांवरून श्रीहर्षाची तिसरी नाटिका **प्रियदर्शिका** ही त्यावेळीं माहीत नव्हती असें दिसतें. कै. **विष्णूशास्त्री** यांनीं '**रत्नावली**' इत्यादि नाटकांचा कर्ता व '**नैषधाचा**' कर्ता एकच असें ह्मटलें आहे ! परंतु ती चूक आहे.

तसेंच, '**वुइलसन्**' साहेबांनीं तर **नैषधचरित**काव्याचा कर्ता **श्रीहर्ष**

---

१ श्रीहर्ष The reputed author of the Naishadha-charita

याचा बाप ' **कलश** ' असें ह्मटलें आहे ! तेव्हां **श्रीहर्ष** हा अर्थात् **कलश**-संभव झाला ! हा अपूर्व शोध त्यांनीं कोठून व कसा केला हें समजत नाहीं. यावरून ह्या काव्याच्या आरंभीं किंवा शेवटीं कवीनें आपल्या आईबापांच्या नांवाचा वगैरे कोठें कांहीं नामनिर्देश केला आहे किंवा नाहीं, याचा शोध देखील साहेबांनीं केला नाहीं, असें उघड दिसतें !तसेंच तो इ. स. १११३ रांत **कलश** बापाच्यामागें गादीवर बसला व त्यानें इ. स. १११३ ते ११२५ ह्या वर्षांच्या दरम्यान ' **रत्नावली** ' हें नाटक रचलें !

आतां ' **रत्नावली** ' इत्यादि नाटकांचा कर्ता **श्रीहर्ष** हा प्राचीन असून क्षत्रिय होता, व **नैषधचरित्राचा** कर्ता **श्रीहर्ष** हा अर्वाचीन असून ब्राह्मण होता. हा **कनोज** येथील **राष्ट्रकूट** राजांपैकीं **जयचंद्र** किंवा **जयचंद्र** ह्या राजाच्या पदरीं होता. ह्या राजानें संवत् १२२५ व सवंत् १२४३ ह्मणजे इ. स. ११६९ आणि ११८७ यावर्षी **काशी** क्षेत्रीं ब्राह्मणास अग्रहार दिल्याबद्दल **ताम्रपत्रलेख** सापडले आहेत. त्यावरून **जयचंद्र** जर ह्या काळीं होता तर त्याचे पदरीं असलेला **श्रीहर्षहि** ईसवी सनाच्या बाराव्या

---

and of 7 or 8 othor works. He is generally placed in the latter half of the 12th century. Wilson says that Shri-Harsha succeeded his fathar Kalasha in 1113, and that the Ratnavali, a play ascribed to the king, must have been written by him between 1113 and 1125 the close of his reign. But the Ratnavali, must be regarded as a work of an earlier as it is largely quoted in the Dasarupa, a work of the last part of the 10th centuy.

*See Apte's Sanskrit-English Dictionary*
Appendix II.

वाहवा कशासच कांहीं मेळ नाहीं ! हें साहेबांचें सगळेंच लिहिणें चुकीचें आहे अशा बऱ्या साहेबांनीं नीट शोध न करितां वाटेल तशी विधानें दपटून द्यावीं हें केवढें धाडस होय !

१ ' निर्णयसागर ' छापखन्यांत छापलेल्या सटीक नैषधचरितकाव्याच्या आरंभीं पंडित शिवदत्त यांचीं संस्कृत प्रस्तावना पहा.
See also Indian Antiquary. Vol. I. Page 30, 297, 353, and Vol. II. Page 71.

२. प्राचीन लेखमाला भाग १ लेख २२ आणि २३ पहा.

 11 JAN 1994

शतकाच्या उतरार्धातच होता, हें उघडच झालें. त्यानें आपल्या नैषध-काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटल्या श्लोकाच्या पूर्वार्धांत आपल्या आईबापांच्या नांवाचा निर्देश केला आहे तें पूर्वार्ध असें:–

“ श्रीहर्ष कविराजराजिमुकुटालंकारहीरः सुतं-
श्रीहीरः सुषुवे जितेन्द्रियचयं मामल्लदेवी च यम् । ”

यावरून त्याच्या बापाचें नांव ‘ श्रीहीर ’ व आईचें नांव ‘मामल्लदेवी’ असें होतें. तेव्हां हा श्रीहर्ष निराळा हें उघडच झालें. या श्रीहर्षानें स्वतः आपणच कनोज येथील राजाच्या पदरीं असल्याचें ‘ नैषधचरित ’ काव्याच्या शेवटीं प्रशस्तींत म्हटलें आहे, तें असें:—

“ तांबूलद्वयमासनंच लभते यः कन्यकुब्जेश्वरात्
यः साक्षात्कुरुते समाधिषु परं ब्रह्म प्रमोदार्णवम् ।
यत्काव्यं मधुवर्षि धर्षितपरास्तर्केषु यस्योक्तयः
श्रीश्रीहर्षकवेः कृतिः कृतिमुदे तस्याभ्युदीयादियम् ॥ ”

यावरून हा श्रीहर्ष कनोज येथील राजाच्या पदरीं होता, हेंहि उघडच झालें.

श्रीहर्ष याचा पिता श्रीहीर हा जयचंद्रराजाच्या पदरीं पंडित होता. यास उदयन नांवाच्या प्रतिवादीनें राजसभेंत जिंकलें होतें. त्यामुळें तो आपल्या मनांत नेहमीं खिन्न असे. त्यानें आपला पुत्र श्रीहर्ष यास एके दिवशीं असें सांगितलें कीं “ जर तूं सत्पुत्र आहेस, तर माझा प्रतिपक्षी यास राजसभेंत जिंक. ” ही पित्याची आज्ञा त्यानें विनयपूर्वक मान्य केली. नंतर सद्गुरूपासून चिंतामणिमंत्राचा उपदेश घेऊन तो गंगातीरीं देवताराधन करावयास गेला. तेथें एक वर्षभर सतत अनुष्ठान केल्यावर त्यास देवता प्रसन्न झाली व तीपासून त्यास अभिप्रेत वर मिळाला. मग श्रीहर्षानें मोठमोठ्या पंडितांजवळ अनेक शास्त्रांचें अध्ययन करून विद्वत्ता संपादिली. नंतर त्यानें राजाच्या सांगण्यावरून ‘ नैषधचरित ’ महाकाव्य करून तें आपला स्वामी जयचंद्र यास दाखविलें. तेव्हां त्यानें काश्मीरचा राजा माधवदेव व त्याच्या पदरचे पंडित यांस तें दाखविण्यास सांगितलें. त्यावरून तो काश्मीरदेशांत

---

१. प्रथम सर्गाच्या शेवटच्या श्लोकांत त्यानें ‘ तच्चिन्तामणिमंत्रचिंतनफले शृंगारभंग्या महाकाव्ये चारुणि नैषधीयचरिते सर्गोयमादिर्गतः ॥ ” यांत ‘ चिन्तामणिमंत्रचिन्तनफले ’ असें आपल्या काव्यास विशेषण जोडिलें आहे. यावरूनहि हें लक्षांत येण्यासारखें आहे.

तेथील राजाश्रित पंडितांकडे गेला. परंतु ' **बोद्धारो मत्सरग्रस्ताः** ' या **भर्तृहरीच्या** वचनाप्रमाणें तेथील पंडित त्याचें तेज तेथें पडूं देईनात. शेवटीं त्यानें आपल्याजवळ होतें नव्हतें तें सर्व निर्वाहाकारितां विकलें. एके दिवशीं तो एका तीर्थाचे कांठीं देवालयांत रुद्राभिषेकपूर्वक पूजन करीत बसला असतां तेथें तद्देशीय हीनजाति दोन स्त्रिया पाणी भरण्याकरितां आल्या व 'मी अगोदर घागर भरीन ' ह्मणून दोघींच्या शिव्यागाळी सुरू होऊन भांडण जुंपलें. शेवटीं अंगांतून रक्त निघेपर्यंत दोघींची मारामारी झाली. पुढें हा खटला राजदरबारांत गेला. तेव्हां यास कोणी साक्षी आहे काय ? असें राजानें विचारलें. यावर ' तेथें एक ब्राह्मण देवपूजा करीत बसला आहे ' असें त्यांनीं सांगितलें. मग राजानें दूत पाठवून त्या ब्राह्मणास तेथें आणविलें व यासंबंधी हकीकत विचारिली. त्यावेळीं **श्रीहर्ष** गीर्वाणभाषेंत ह्मणाला, " ह्या दोघी स्त्रिया त्याठिकाणीं भांडत होत्या खऱ्या, परंतु यांची भाषा मला येत नसल्यामुळें अपराधी कोण हें मला सांगतां येणार नाहीं. तथापि दोघींचे शब्द मी अगदीं बरोबर उच्चारून दाखवितों. मग त्यांचा अर्थ काय होत असेल तो तुह्मी पाहून न्याय करा. नंतर राजाज्ञेवरून त्यानें दोघींचीं बोलणीं पहिल्यापासून जशींचीं तशीं **काश्मिरीभाषेंत** बोलून दाखविलीं. ती त्याची धारणाशक्ति पाहून राजा व सर्व सभासद थक्क होऊन राहिले ! पुढें राजानें त्याच्या भाषानुवादावरूनच निकाल करून अपराधी स्त्रियांस कमी जास्त प्रमाणानें शिक्षा दिली. नंतर राजानें **श्रीहर्षास** आपण कोण ? कोठील राहणार ? वगैरे प्रश्न विचारिलें. तेव्हां त्यानें आपली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून व त्याची विद्वत्ता लक्षांत आणून **माधवदेवराजानें** स्वाश्रितपंडितांचा धिक्कार करून **श्रीहर्षाचा** मोठा सन्मान केला. मग त्याची व त्याच्या **नैषधचरितकाव्याची** तेथें मोठी वाहवा झाली. आणि राजाकडून व राजपंडितांकडून त्याचा तेथें सन्मान होऊन त्यास मानपत्र मिळालें ! हें त्यानें स्वतः सतराव्या सर्गाच्या शेवटीं आपल्या काव्यास " **काश्मीरैर्महिते चतुर्दशतयीं विद्यां विदद्भिर्महाकाव्ये** " असें विशेषण दिलें आहे, यावरून ध्वनित केलें आहे.

तेथें असतांना तेथील पंडितांकडून **श्रीहर्षाची** दाद लागेना तेव्हां त्यानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

" यथा यूनस्तद्वत्परमरमणीयापि रमणी-
कुमाराणामन्तःकरणहरणं नैव कुरुते ।
मदुक्तिश्चेतश्चेन्मदयति सुधीभूय सुधियः
किमस्या नाम स्यादरसपुरुषाराधनरसैः ॥ "

पुढें **श्रीहर्षानें** आपल्या बापाचा प्रतिपक्षी **उदयन** यास **जयचंद्र**राजाच्या समक्ष भरसभेंत कुंठित करून जिंकिलें. मग तो राजाच्या पदरीं मुख्य पंडित होऊन राहिला.

**नैषधचरित** काव्याखेरीज **स्थैर्यविवरण, श्रीविजयप्रशस्ति, खंडनखंडखाद्य, गौडराजकुलप्रशस्ति, अर्णववर्णन, छंदःप्रशस्ति, शिवशक्तिसिद्धि** आणि **साहसांकचरित**. हे ग्रंथ त्यानें केले असल्याबद्दल **नैषधचरित**काव्याच्या चार, पांच, सहा, सात, नऊ, सतरा, आठरा आणि बावीस ह्यां सर्गांत-प्रदर्शित केलें आहे. परंतु यांपैकीं सांप्रत थोडेच ग्रंथ उपलब्ध असल्याचें समजतें ! **श्रीहर्षाचें नैषधचरित** काव्य मात्र लोकांत फारच प्रसिद्ध असलेल्या '**पंचमहाकाव्यांत**' गणलें जात असून त्यांत बऱ्याच कल्पना नवीन आहेत. हें काव्य प्रौढ असून यांत श्लेषादि अनेक अलंकार व ध्वन्यर्थादि चमत्कार साधले आहेत. तेराव्या सर्गांत तर **नलराजाखेरीज** इतर कोणासहि वरायाचें नाहीं, असा **दमयन्तीचा** निर्धार असल्यामुळें **इन्द्र, अग्नि, यम,** आणि **वरुण** हे **दमयन्तीची** प्राप्ति व्हावी म्हणून **नलराजाच्या** समान रूपें धारण करून विवाहमंडपांत येऊन राजमंडळींत बसले असतां **सरस्वतीनें इंद्रपर** व **नलपर** याप्रमाणें प्रत्येक लोकपाल व **नल** यांचें खुबीदार वर्णन केलें आहे. कांहीं श्लोकांत तर अनेकार्थ साधिले आहेत. या सर्गास '**पंचनली**' असें म्हणतात. तथापि या काव्यांत बऱ्याच ठिकाणीं क्लिष्टताहि आहे.

## हर्षाचें दानशूरत्व.

हर्ष हा मोठा धर्मशील राजा होता. हें **बाणाच्या** व **हूएनसँगच्याहि** वर्णनांत आहे. **बाणकवीचें** वर्णन प्रायः श्लेषादि अलंकारांत असते. ' हार-मौक्तिकांची प्रभा हर्षाच्या अंगावर पडल्यामुळें यावज्जीव सर्वस्वदान कर-

---

१ हाच श्लोक त्यानें नैषधचरित काव्याच्या शेवटीं प्रशस्तींत दिला आहे. त्यांत ' केव ' याच्या जागीं ' नैव ' व ' मदुक्तिश्चदन्तर् ' असें पाठांतरहि केलेलें आहे.

२ ' खण्डनखण्डखाद्य ' या ग्रंथांत श्रीहर्षानें आपल्या पित्याचा प्रतिस्पर्धी उदयन याच्या मताचें खंडन केलें आहे असें कळतें.

ण्याचें त्यानें हें दीक्षावल्कलच धारण केलें आहे काय ? ‘जीवितावधि-गृहीतसर्वस्वमहादानदीक्षाचीवरेणेव हारमुक्ताफलानां किरणनिकरेण-प्रावृतवक्षःस्थलम् ।’ अशी बाणानें उत्प्रेक्षा केली आहे. यावरून पृथ्वी जिंकल्यावर रघुराजाप्रमाणें त्यानें सर्वस्वदान यज्ञ केलें असें दिसतें. या एका विशेषणावरून देखील प्राचीनकालीं या देशचें वैभव कसें होतें हें लक्षांत येण्यासारखें आहे. ! बाणानें हर्षराजाच्या वर्णनांत “ नास्य धनदस्येव निष्फलाः सन्निधिलाभाः ।’ हर्षराजाचे निधि ( द्रव्यसंचय ) कुबेराच्या ( नऊ ) निधींसारखे निष्फल नाहींत, असें ह्मटलें आहे. ते सफल केव्हां होतात ? हें हर्षानेंच स्वतः शिलालेखांत सांगितलें आहे. तें असें:—

‘लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचंचलाया दानं फलं परयशः परिपालनंच–’

विद्युल्लता व जलबुद्बुद याप्रमाणें चंचल अशा लक्ष्मीचें दानधर्मकरणें व यश संपादणें—हेंच फल होय. असें त्यानें ह्मटल्याप्रमाणें आपल्या द्रव्याचा दानधर्माकडे व यश संपादण्याकडेच व्यय करून ‘वित्तस्य पात्रे व्ययः’ या वचनाप्रमाणें आपल्या राज्यसंपत्तीचें साफल्य केलें, ही खरोखरीच मोठी प्रशंसनीय गोष्ट आहे !

हूएनसँगनेंहि हर्ष हा दर पांच वर्षांनीं आपल्या खजिन्यांत जमलेल्या द्रव्याचा दानधर्म करीत असे असें ह्मटलें आहे ‘ सकलभुवनकोशश्चाग्रजन्मनां विभक्तः ’ त्यानें सर्व खजिना ब्राह्मण व श्रमण इत्यादिकांस देण्यांत

1 Silâditya's Charity—Silâditya held a solemn distribution of his royal treasures every five years. The Chinese Pilgrim Hiuen Tsiang describes, how on the plain where the Ganges and the Jumna unite their waters, near Allahabad, all the kings of the empire, and a multitude of people, feasted for seventy-five days. Silâditya brought forth the stores of his palace, and give them aways to Brahmans and Buddihsts, monks and heretics without distinction. At the end of the festival he stripped off his jewels and royal raiment, handed them to the by-standers, and like Buddha of old, put on rags of a beggar. By this ceremony the king commemorated the Great Renunciation of Buddha and also practised the highest duty laid down by the Brahmans, namely, almsgiving. (*A Brief History of the Indian* Peoples *by W. W. Hunter* P. *81.*)

11 JAN 1



येतो असें हर्षाच्या वर्णनांतहि आहे. हें त्याचें दातृत्व पाहून 'आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव ।' सज्जनांचा द्रव्यसंग्रह मेघांच्या जलसंचयासारखा परोपकाराकरितां आहे ! ह्या कविकुलगुरूच्या उक्तीचें स्मरण होतें ! इ. स. ६४४ त त्यानें गंगायमुनेच्या संगमाजवळ प्रसिद्ध पुण्यक्षेत्र प्रयाग येथें सुमारें तीन महिनेंपर्यंत सर्वजातीच्या व सर्व धर्माच्या जमलेल्या हजारो लोकांनां अन्नसंतर्पण केलें. अन्नदानाच्या शेवटीं त्यानें 'समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्' ह्या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें मनांत भेद न आणतां, ब्राह्मण, बौद्ध भिक्षु, बैरागी वगैरे जमलेल्या सर्व लोकांस आपल्या खजिन्यांतील रत्नादिक सर्व द्रव्य व मौल्यवान् वस्तु, तशींच स्वताचीं उंचीउंची वस्त्रें दान केलीं व बुद्धाप्रमाणेंच आपण निष्कांचन होऊन त्यानें स्वतः अगदीं दीनजनासारखा पोषाक धारण केला ! हर्षाचें हें औदार्य व निष्कांचनत्व पाहून 'नास्त्यदेयं महात्मनाम्' ह्या वचनाचें स्मरण होतें ! आणखी 'विश्वजित्' यज्ञामध्यें अर्थिजनाला सर्वस्व दान करून शरीरमात्रानें अवशिष्ट राहिलेल्या व कविकुलगुरूनें त्या वेळच्या स्थितींत वर्णन केलेल्या— 'शरीरमात्रेण नरेन्द्र तिष्ठन्नाभासि तीर्थप्रतिपादितर्द्धिः । अरण्यकोपात्तफलप्रसूतिः स्तम्बेन नीवार इवावशिष्टः ।' हे राजा, सत्पात्रीं सर्वसंपत्तीचा विनियोग करून शरीरानें मात्र अवशिष्ट राहिला आहेस अशा—रघुराजाप्रमाणे तो दिसला असावा ! 'तन्निम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु नराः ।' उदार पुरुष हे याचकांना सर्वस्व देण्यानें गतवैभव झाले तरी शोभतात ! हें भर्तृहरीचें वचन अगदीं यथार्थ आहे ! यावरून हर्षराजा हा कर्णासारखा केवळ रणशूरच होता असें नाहीं, तर तो त्याच्यासारखा दानशूरहि होता असें लक्षांत येतें ! हर्षानें शिव, व सूर्य यांच्या देवालयांप्रमाणें बुद्धाचेंहि देवालय बांधलें, असें ह्यूएनसँगच्या वर्णनांत आहे.

### धावक हा कोण ? याबद्दल व हर्षानें बाणास व बाणानें हर्षास मोठी देणगी दिली याबद्दल.

काव्यप्रकाशांत 'श्रीहर्षादेर्धावकादीनामिव धनम्' असें काव्यापासून द्रव्यप्राप्तिरूप फलाचें उदाहरण दिलें आहे. ह्यावरच्या एका (महेश्वर)

---

१ श्रीहर्षानें दानशूरत्वाची कृति नागानंदांत जीमूतवाहनपात्राचे आचरणांत चांगली दाखविली आहे.

टीकाकारानें '**श्रीहर्षाख्यस्य राज्ञो नाम्ना रत्नावलीं नाटिकां कृत्वा धावकाख्य कविर्बहुधनं लेभे**' याप्रमाणें **रत्नावली** नाटिकेचा नामनिर्देश अनुमानानें व पुढें तसाच इतरांनीं अंधपरंपरान्यायानें केला आहे असें वाटतें! यास याखेरीज दुसरें कांहीं प्रमाण असतें तर तें आजपर्यंत आढळल्या-खेरीज राहिलें नसतें. बाणकवीस **श्रीहर्षाचा** जसा आश्रय मिळाला तसा टीककारांच्या तर्कासहि त्याच्या पदरीं असलेल्या **धावककवीचा** आधार सापडला इतकेंच! याखेरीज दुसरा सबळ पुरावा असेल असें वाटत नाहीं. **काश्मीराकडच्या काव्यप्रकाशाच्या** प्रतींत'**श्रीहर्षादेर्बाणादीनामिव धनम्**' असाच स्पष्ट पाठ आहे. दुसरे **शितिकंठाच्या काव्यप्रकाशनिदर्शनां**तहि '**श्रीहर्षादेर्बाणादीनामिव धनम्**' असेंच आहे ज्या प्रदेशांत **काव्यप्रकाशा**-चा मूळकर्ता **मम्मट** हा उत्पन्न झाला तिकडच्या प्रतींत **धावक** नसून '**बाण**' असल्यामुळें आमच्या ह्मणण्यास चांगली बळकटी येते ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. दोन्ही ग्रंथांत **धावकाच्या** जागीं **बाणाचा** निर्देश केलेला आढळतो त्या अर्थीं **धावक** हें **बाणाचेंच** दुसरें नांव कांहीं कारणानें पडलें असावें असें वाटतें. कारण, **धावक** या नांवाचा दुसराच कोणी कवि असावा व तो **श्रीहर्षाच्या** पदरीं असावा; अशीं कल्पना चालवावी तर त्याच्या नांवावर एखादें काव्य किंवा अगदीं थोडी तरी पद्यें असल्याबद्दल कोठें तरी कोणीं उल्लेख केला असता! परंतु तो कोठेंहि कोणीं केलेला आढळत नाहीं. त्याअर्थीं **धावक** हा निराळा कवि कल्पून अशा अप्रसिद्ध कवीची व **हर्षाची** बहुधन देण्याच्या कामांत सांगड घालून देणें अगदींच अप्रशस्त, अयुक्तिक व विसंगत दिसतें! **श्रीहर्षानें बाण** हा थोर विद्वान् कवि ह्मणून त्यास आपले पदरीं बाळगलें होतें, त्या अर्थीं त्यानें त्यास कदाचित् ग्रंथ करण्यासहि साहाय्य केलें असेल, नसेलच असें आमचें ह्मणणें नाहीं! तथापि विद्वत्ता, चातुर्य इत्यादि सद्गुण त्याच्यांत होते यासाठीं त्यानें त्यालाच पुष्कळ द्रव्य दिलें असेल, असें ह्मणणेंच सयुक्तिक व योग्य दिसतें. **मम्मटभट्टानें काव्यप्रकाशांत** ग्रंथाचा मुळींच निर्देश केलेला नाहीं. तेव्हां त्यावरच्या

---

१ बाणाची ग्रंथरचनेंत विशेष गति असल्यामुळें त्याचें हें यौगिक नांव 'धावु-गतिशुद्ध्योः' ह्या धातूपासून कदाचित् पडलें असावें असें वाटतें, किंवा वाणींतील दोष धुऊन टाकणारा तो असल्यामुळें त्यास धावक ही अन्वर्थक संज्ञा प्राप्त झाली असावी.

 2 SEP 1996.

टीकाकारांच्या अंधपरंपरान्यायानें ह्मणण्यास सबळ पुरावा मिळाल्याखेरीज नुसत्या त्यांच्या टीकेंतील परंपरेनें केलेल्या निर्देशावर भरंवसा ठेवणें प्रशस्त वाटत नाहीं. भरंवसा ठेवण्यासारखा मुख्य ग्रंथ ह्मटला ह्मणजे **हर्ष**राजाच्या वेळीं असलेल्या **बाण**कवीचें **हर्षचरित** होय. त्यावरून पाहतां प्रसन्न झालेल्या **श्रीहर्षानें बाण**कवीसच सन्मान, प्रेम, विश्वास, संपत्ति इत्यादिकांच्या अगदीं परमावधीस नेऊन पोंचाविलें असेंच आढळतें ! ' **परमप्रीतेन प्रसादजन्मनो मानस्य, प्रेम्णो, विश्रंभस्य, द्रविणस्य, निर्मणः, प्रभावस्य च परां कोटिमानीयत नरेंद्रेणेति** ' यावरून द्व्यचसें काय ? तर सर्वच गोष्टी **श्रीहर्षा**कडून **बाण**कवीस प्राप्त झाल्या होत्या व ह्मणूनच त्यानें त्यास ग्रंथारंभीं ' **सकलप्रणयिमनोरथसिद्धिश्रीपर्वतोहर्षः** ' असें स्वानुभवावरून ह्मटलें आहे.

' **सारसमुच्चयाख्य** ' काव्यप्रकाशव्याख्येंत **बाण**कवीच्या संबंधानें पुढील महत्वाचा श्लोक आढळतो. त्यावरून **श्रीहर्षा**च्या दरबारीं **बाण**कवीचेंच वर्चस्व होतें व **हर्षा**नें बहुधन दिलें तें त्यासच दिलें असें लक्षांत येतें. तो श्लोक हा होयः—

' **हेम्नो भारशतानि वा मदमुचां वृन्दानि वा दन्तिनां**
**श्रीहर्षेण समर्पितानि कवये बाणाय कुत्राद्य तत् ।**
**या बाणेन तु तस्य सूक्तिनिकरैरुट्टंकिताःकीर्तय-**
**स्ताः कल्पप्रलयेऽपि यान्ति न मनाङ्‌ मन्ये परिम्लानताम्** "॥

**श्रीहर्ष**राजानें **बाण**कवीस सुवर्णभारांचीं[1] शतें दिलीं व अपरिमित गजेंद्रसंपत्ति दिली तरी ती आतां कोठें राहिली आहे ? परंतु **बाण**कवीनें त्याच्या सत्कीर्ति ( **हर्षचरितांत** वगैरे ) कोरून ठेवल्या आहेत, त्या प्रलयकालींहि नष्ट ह्मणून व्हावयाच्या नाहींत.

**रामचरित**काव्यांतहि यास प्रत्यन्तर पुरावा मिळतो तो असाः—

'**श्रीहर्षो विततार गद्यकवये बाणाय वाणीफलम्**' यावरून **बाण**कवीनें त्याचें चिरस्थायी यश कोरून ठेवून त्यास मोठी अमोलिक देणगी देऊन ठेवली ! यांत कांहीं संशय नाहीं. तसेच **धावक** हें त्याचेंच दुसरें नांव असावें असेंहि ध्यानांत येतें. आतां इतर **मयुरा**दिकवि त्यानें आपल्या पदरीं बाळगिले होते, त्याअर्थीं त्यानें त्यांस बहुधन दिलें नसेल असें नाहीं; तथापि **बाण**-

---

१ भार ह्मणजे सुमारें आठ हजार तोळे होतात.

कवीवरच श्रीहर्षाची अत्यंत मर्जी होती, व तोच त्याच्या पदरीं असलेल्या पंडितांत अग्रगण्य होता, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध होतें. सुभाषित शा० पद्धति, सूक्तिमुक्तावलि व सुभाषितावलि इ० ग्रंथांत प्रसिद्ध थोर थोर हजारों कवींचीं पद्यें देऊन त्यांच्या खालीं त्या त्या कवींचे नामनिर्देश केले आहेत. त्यांत धावकाचें नांव एखाद्या पद्याखालीं देखील आढळत नाही! तेव्हां हर्षानें बहुधन दिलेल्या धावकनांवाचा निराळा कवि मानणें हें अगदींच अप्रयोजक व युक्तिरहित वाटतें. सारांश, धावक हें बाणाचेंच कांहीं कारणानें दुसरें नांव पडलेलें असावें. तेव्हां हर्षानें बहुधन दिलें ते कविश्रेष्ठ बाणासच दिलें व यामुळेंच त्याबद्दल अनेक प्रमाणें सापडतात. तशीं दुसऱ्या कवींविषयीं आढळत नाहींत !

## बाण, मयूर, व मातंगदिवाकर.

हर्षराजास अनुलक्षून बाण, मयूर आणि मातंगदिवाकर यांनीं भिन्न भिन्न कल्पनेचीं पद्यें रचून त्यास आपापली कवित्वशक्ति दाखवून अनेक प्रसंगीं रंजविलें असावें असें दिसतें ! त्यांपैकीं प्रत्येकाचें एक एक पद्य पुढें मासल्याकरितां दिलें आहे.

आसीन्नाथ पितामही तव मही माता ततोऽनंतरम्
संप्रत्येवहि साम्बुराशिरशना जाया जयोद्भूतये ।
पूर्णे वर्षशते भविष्यति पुनः सैवानवद्या स्नुषा
युक्तं नाम समस्तशास्त्रविदुषां लोकेश्वराणामिदम् ॥

बाणभट्ट.

भूपालाःशशिभास्करान्वयभुवः के नाम नासादिता
भर्तारं पुनरेकमेव हि भुवस्त्वां देव मन्यामहे ।
येनाङ्गं परिमृश्य कुन्तलमथाकृष्य व्युदस्यायतं-
चोलं प्राप्य च मध्यदेशमधुना काञ्च्यां करः पातितः ॥

मयूरकवि.

याते शर्मं रजसि जातजलाभिषेका

---

१ धावक ह्मणून कोणी निराळा कवि असून त्यासच श्रीहर्षानें बहुधन दिलें असावें. अशाविषयीं कोणीं चांगलीं प्रमाणें दाखविल्यास आमचा याविषयीं आग्रहच आहे असें कांहीं नाहीं.

धौताम्बराः स्फुरितपांण्डुपयोधरान्ताः ।
पत्युः प्रजार्थमधुना तव पुष्पवत्यो
वाञ्छन्ति संगमभितः ककुभश्चतस्रः ॥ '

मातङ्गदिवाकर. *

पहिल्या बाणकवीच्या पद्यांत 'समस्तशास्त्रविदुषां' हें विशेषण हर्षाच्या विद्वत्तेचें दर्शक घातलें आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे ! व यांत विनोदहि खुबीदार केलेला आहे !

दुसऱ्या पद्यांत मयूरकवीनें दक्षिणेकडे कांचीपर्यंत हर्षाचा कर लांबविला आहे, परंतु सत्याश्रयपुलकेशीनें नर्मदेच्या पुढें तो जाऊं दिला नाहीं ! हें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. तथापि कवीनें कांचीपर्यंत भूपतीचा कर नेला आहे तो श्लेषानें शृंगाररसास अनुरूपच आहे ! तिसरा श्लोकहि श्लेषघटित आहे ! परंतु त्यांतील श्लेष सर्वांसच आवडतील असें वाटत नाहीं, तथापि तिघांच्याहि भिन्न भिन्न व सरस कल्पना आहेत यांत कांहीं संशय नाहीं !

## बाणाचे वंशजांस देवताप्रसाद, त्यांचें सत्कुलीनत्व, सदाचारसंपन्नत्व व असाधारण विद्वत्त्व.

दुर्वासऋषीच्या शापानें सरस्वती ही भूतलावर अवतीर्ण झाल्यावर तिनें भार्गववंशांतील दधीचास वरलें. तिच्या प्रसादानें व वरानें त्या वंशांत विद्याचारसंपन्न असेच पुरुष उत्पन्न झाले. बाणानें आपल्या पूर्वजांसंबंधानें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. ' यस्मादजायन्त वात्स्यायना नाम गृहमुनयः शमितसमस्तशास्त्रान्तरसंशीतयः उद्धाटितसमस्तग्रंथार्थग्रन्थयः कवयः वाग्मिनः अलुप्तक्रतुक्रियाः दीक्षिताः कामजितः असाधारणा द्विजातयः " बाणानें आपल्या चुलतबंधूसहि अशा

---

* वल्लभदेव याच्या सुभाषितावलींत हीं व आणखी अशा तऱ्हेचीं पद्यें सापडतात. हे तिघेहि हर्षराजाच्या पदरीं होते, तेव्हां त्यांनीं त्यास उद्देशूनच हीं पद्यें केलीं, असावीं हें उघड दिसतें.

२ 'बाणस्य चत्वारः पितामहमुखपद्मा इव वेदाभ्यासपवित्रमतयः उपाया इव सामप्रयोगलालितमुखाः, गणपतिः, अधिपतिः, तारापतिः श्यामल इति पितृव्यपुत्रा भ्रातरः, प्रसन्नवृत्तयः, गृहीतवाक्याः, कृतगुरुपदन्यासाः, न्याय्यवादिनः, सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः, लब्धसाधुशब्दा लोका इव व्याकरणेऽपि सकलपुराणराजर्षिचरिताभिज्ञाः,

दाखल नं ......
21 MAR 1990

अर्थाचींच विशेषणें योजून ते वेदशास्त्रसंपन्न महाविद्वान् व महाकवि होते असें ह्मटलें आहे.

**बाणा**चे पूर्वज व **बाण** हे शिवोपासक होते. **बाण** हर्षराजाकडे जावयास निघाला तेव्हां **श्रीशंकराचें** पूजन करून, होमहवन करून व ब्राह्मणांना दानधर्म करून निघाला आहे. दुर्जनाच्या सांगण्यावरून कलुषित झालेल्या अंतःकरणामुळें **हर्ष**राजा **बाणा**स कांहीं टोचून बोलला असतां, तें त्यास सहन न होऊन राजाची भीड न धरतां त्याचा मिथ्या ग्रह दूर करण्यास व आपली खरी योग्यता कळून येण्यास **बाणा**ला आपला वंश व आपले थोर व सदाचारी विद्वान् पूर्वज यांची व आपली स्वतःची यथार्थ महती वर्णन करणें भाग पडलें.

**बाणानें सांग**वेदाध्ययन व अनेक शास्त्राध्ययन केलें असल्याचें **हर्ष**राजास पूर्वीं स्पष्ट सांगितलेंच आहे. पूर्वकालीं अगोदर **सांग**वेदाध्ययन करून नंतर शास्त्राध्ययन करण्याचा परिपाठ होता तो **बाण**कालींहि विद्यमान होता, असें यावरून उघड होतें. **बाणा**च्या येथें वेदत्रयीचें व अनेक शास्त्रांचें अध्ययन व अध्यापन चालू असल्याबद्दल त्याच्या ग्रंथांत उल्लेख आढळतो.

धर्मशास्त्रांत **सांग**वेदाध्ययनाचें मोठें फल सांगितलें आहे.

---

महाभारतभावितात्मानः, विदितसकलेतिहासाः, महाविद्वांसः, महाकवयः, महापुरुषवृत्तान्तकुतूहलिनः, सुभाषितश्रवणरसरसायनाः, वितृष्णाः, वयसि वचसि यशसि तपसि सदसि महसि वपुषि यजुषि च प्रथमाः, पूर्वमेव कृतसंगराः, विचक्षवः, स्मितसुधाधवलितकपोलोदराः, परस्परस्य मुखानि व्यलोकयन् ।

१ या संबंधानें हर्षचरितांतील उतारा मागें बाणाच्या व हर्षाच्या भेटीच्या वेळीं दिलाच आहे.

२ " छन्दः पादौतु वेदस्य हस्तौ कल्पोऽथ पठ्यते ।
ज्योतिषामयनं चक्षुर्निरुक्तं श्रोत्रमुच्यते ॥
शिक्षा घ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम् ।
तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते " इति ॥

दुर्गाचार्यकृत निरुक्तभाष्याच्या भूमिकेंतहि वेद व वेदांगें यांचें प्रयोजन सांगितलें आहे तें असें:—

' अथ किमर्थं वेदो वेदांगानि च प्रवृत्तानि? सर्वकामप्राप्त्यादिर्मोक्षान्तः पुरुषार्थो वक्तव्य इति प्रवृत्तः । तत्परिज्ञानाय वेदाङ्गानि प्रवृत्तानि ' ।

11 JAN 19

**बाण हर्षराजाकडून परत आल्यावर त्यानें त्याचा मोठा सन्मान केला ह्मणून त्याच्या आप्तमित्रांस फारच आनंद झाला आहे. त्या आनंदभरांत आपल्या योग्यतेनुरूप व वयोनुरूप परस्परांचें नमस्कारालिंगनाशीर्वादादि प्रकार**

---

चतुर्विधपुमर्थ प्राप्त होण्याकरितां सांगवेदाध्ययन हें अवश्य सांगितलें आहे. वेदांचें परिज्ञान होण्यास वेदांगें अवश्य आहेत.

‘ षडंगवत्पुराणादीनामपि वेदार्थज्ञानोपयोगो याज्ञवल्क्येन स्मर्यते ’ ।

वेदाङ्गाप्रमाणें पुराणादिकांपासूनहि वेदार्थास उपयोग आहे, असें याज्ञवल्क्यानें ह्मटलें आहे.

“ पुराणन्यायमीमांसा धर्मशास्त्रांगमिश्रिताः ।
वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश ” ॥
‘ इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ’ ।

यांवरून वदांगें, धर्मशास्त्र व पुराणेतिहास हीं सर्व वेदार्थांचें यथार्थ ज्ञान होण्यास अवश्यक आहेत. वर सांगितल्याप्रमाणें शास्त्राभ्यासानें व विचारानें संसाराचें मूलकारण मिथ्याज्ञान नष्ट होऊन मोक्षप्राप्ति होते. बीज दग्ध झाल्यावर अंकुरोत्पत्तीचा अभाव अर्थातच होणार हें उघड आहे.

१ “ समुपलब्धभूपालसंमानातिशयपरितुष्टास्तस्य ज्ञातयः श्लाघमाना निर्ययुः । क्रमेण च कांश्चिदभिवादयमानः , कैश्चिदभिवाद्यमानः कैश्चिच्छिरसि चुम्ब्यमानः , कांश्चिन्मूर्ध्नि समाजिघ्रन् कैश्चिदालिङ्ग्यमानः, कांश्चिदालिङ्गयन्, अन्यैराशिषानुगृह्यमाणः पराननुगृण्हन् , बहुबंधुमध्यवर्ती परं मुमुदे । संभ्रान्तपरिजनोपनीतं चासनमासीनेषु गुरुषु भेजे । भजमानश्चार्घादिसत्कारं नितरां ननन्द । प्रीयमाणेन च मनसा सर्वांस्तान्पर्यपृच्छत्—‘ कच्चिदेतावतो दिवसान्सुखिनो यूयम् ? अप्रत्यूहा वा सम्यक्करणपरितोषितद्विजचक्रा क्रातवी क्रियते क्रिया ? यथावदविकलमन्त्रभाञ्जि भुञ्जते हवींषि हुतभुजः ? यथाकालमधीयते वा बटवः । प्रतिदिनमविच्छिन्नो वा वेदाभ्यासः । कच्चित्स एव चिरंतनो यज्ञविद्याकर्मण्यभियोगः , तान्येव व्याकरणे परस्परस्पर्धानुबन्धदिवसदर्शितादराणि व्याख्यानमण्डलानि, सैव वा पुरातनी परित्यक्तान्यकर्तव्या प्रमाणगोष्ठी, स एव वा मन्दीकृतेतरशास्त्ररसो मीमांसायामतिरसः । कश्चित्त एव वाभिनवसुभाषितसुधावर्षिणः काव्यालापाः ’ इति ।

अथ ते तमूचु.—‘ तात, संतोषजुषां सततसंनिहितविद्याविनोदानां वैतानवन्हिमात्रसहायानां कियन्मात्रं नः कृत्यं सुखितया सकलभुवनभुजि भुजङ्गराजदेहदीर्घे रक्षति क्षितिं क्षितिभुजो भुजे । सर्वथा सुखिन एव वयम्, विशेषेण तु त्वयि विमुक्तकौसीद्ये परमेश्वरपार्श्ववर्तिनि वेत्रासनमधितिष्ठति । सर्वे च यथाशक्ति यथाविभवं यथाकालं च संपद्यन्ते विप्रजनोचिताः क्रियाकलापाः ’ इत्येवमादिभिरालापैः स्कन्धावारवार्ताभिश्च शैशवातिक्रान्तक्रीडानुस्मरणैः पूर्वजकथाभिश्च विनोदितमनास्तैः सहसुचिरमतिष्ठत् । ”

झाल्यावर व वडील व गुरु आपआपल्या आसनांवर बसल्यावर मग **बाण** सेवकानें मांडलेल्या आसनावर बसला. नंतर **बाणानें** आपल्या घरीं चालत असलेल्या वेदशास्त्राध्ययनाची चौकशी केली. तो ह्मणाला, " आपल्या येथें चालत असलेले यज्ञ, याग योग्यरीतीनें पूर्वींप्रमाणें चालत आहेतना ? शिष्यमंडळी यथाकालीं नीटरीतीनें अध्ययन करीत आहेना ? पूर्वींप्रमाणेंच वेदाभ्यास एकसारखा चालू आहेना ? पूर्वोत्तरपक्षयुक्त व्याकरणाध्ययन तसेंच चाललें आहेना ? तशीच न्यायशास्त्राची चर्चा एकसारखी चालू आहेना ? इतर शास्त्राध्ययनाची अभिरुचि ज्यानें मंद केली आहे असा मीमांसाशास्त्राविषयीं निर्भर पूर्वींसारखाच चालू आहेना ? अमृतस्राव करणाऱ्या सुभाषित काव्यादिकांचा अभ्यासहि पूर्वींसारखाच चालला आहेना ?"

यावर पूर्वींप्रमाणेंच सर्व गोष्टी यथास्थित चालू असल्याचें गुरूंनीं सांगितलें. त्यावेळीं **बाण** हा लोकापवादांतून मुक्त होऊन **हर्षराजानें** त्याचा यथायोग्य सन्मान केला ह्मणून सर्वांनीं मोठा आनंद व्यक्त केला.

**बाणाच्या** येथें चालत असलेल्या शास्त्राध्ययनावरून व त्याच्या ग्रंथांवरून त्यानें त्यांत प्रसंगानें अनेक शास्त्रांचें व त्यावेळीं प्रचारांत असलेल्या **सांख्य, वैशेषिक, बौद्ध, जैन, चार्वाक** इत्यादि अनेक पंथांच्या तत्त्वांचे उपमालंकारांत वगैरे उल्लेख केले आहेत. यांवरून व त्यानें आपल्या पूर्वजादिकांस लावलेल्या विशेषणावरून **बाणाचे** पूर्वज, बंधू व **बाण** हे अनेक शास्त्रपारंगत असल्याचें ध्यानांत येण्यासारखें आहे. **बाणाचे** कांहीं ग्रंथ नष्ट झाले आहेत, तरी हल्लीं उपलब्ध असलेल्या त्याच्या ग्रंथांवरून देखील तो असाधारण विद्वान् व कवि होता यांत कांहीं संशय नाहीं.

## भवभूति व वाक्पतिराज.

**भवभूतिकवीचाहि** काल याच शतकांत असल्याबद्दल विद्वज्जनांनीं ठरविलें आहे. **बाणकवीनें हर्षचरितांत** कवींच्या नामावलींत येण्यासारखें त्याचें नांव असून ज्याअर्थीं आलें नाहीं, त्या अर्थीं सातव्या शतकाच्या उत्तरार्धांत ह्मणजे **बाणकवीनंतर भवभूति** हा झाला असावा. **हर्षराजाच्या** नंतर **कनोज**च्या राज्यासनावर बसलेल्या **यशोवर्मराजाच्या** पदरीं हा होता. यावरूनहि याचा कालनिर्णय करतां येतो.

---

१ डॉ॰ भांडारकर यानीं राजतरंगिणीच्या आधारें हा काल ठरविला आहे.

**भवभूति** हा **वैदर्भ** ( वऱ्हाड ) देशचा राहणारा होता. तथापि तो विद्वज्जनांस आश्रय देणाऱ्या **कान्यकुब्जदेशाच्या** राजांपैकीं **यशोवर्मराजा**च्या पदरीं होता. याबद्दल **राजतरंगिणींत** आधार आहे. तो असाः—

“ कविर्वाक्पतिराजश्रीभवभूत्यादिसेवितः—
जितो ययौ यशोवर्मा तद्गुणस्तुतिबंदिताम् ॥ ”

राजतरंगिणी—तरंग ४—श्लोक १४४

**वाक्पतिराज** व **भवभूति** यांनीं सेविलेला, **ललितादित्यानें** जिंकिलेला कवि **यशोवर्मा** हा **ललितादित्याचें** वर्णन करणारा झाला ! कित्येकांनीं **‘कविवाक्पतिराज’** इ. असा पाठ करून कवि याचा संबंध **वाक्पतिराज** व **भवभूति** यांजकडे लाविला आहे. परंतु तो ठीक नाहीं. पंडित **दुर्गाप्रसाद** यांनीं अनेक जुन्या प्रतींवरून छापलेल्या **राजतरंगिणींत** ‘ **कविर्वाक्पति** ’ इ. असाच पाठ ठेवला आहे व हाच युक्त आहे. ‘ कवि ’ याचा संबंध **यशोवर्मा** याजकडे असल्यानें ‘ **तद्गुणस्तुतिबंदिताम्** ’ या पदाकडेहि चांगलें स्वारस्य येतें ! तो कवि असल्याबद्दल **सूक्तिमुक्तावलींत** त्याच्या नांवावर असलेलीं पद्येंहि साक्ष देत आहेत. त्यांपैकीं एक पद्य जिज्ञासूंकरितां पुढें दिलें आहेः—

*“यत्वन्नेत्रसमानकांति सलिले मग्नं तदिंदीवरम् ।
मेघैरंतरितः प्रिये तव मुखच्छायानुकारी शशी ।
येऽपि त्वद्गमनानुसारिगतयस्ते राजहंसा गताः ।
त्वत्सादृश्यविनोदमात्रमपि मे दैवेन न क्षम्यते ! ॥”

राजपुत्रयशोवर्मणः

**वाक्पतिराज** यानें ‘ **गौडवध** ’ नांवाचें काव्य प्राकृत भाषेंत केलें आहे. त्यांत त्यानें आपला आश्रयदाता ‘ **यशोवर्मा** याच्या पराक्रमाचें वर्णन करून त्यानें **गौड** राजाचा वध केल्याबद्दल वर्णन केलें आहे. हा **वाक्पति** व **भवभूति** हे दोघे राजकवि **यशोवर्म्याचे** पदरीं असून दोघेहि मित्र होते. **वाक्पतिराज** यानें **भवभूतीपासून** आपल्याला पुष्कळ उपयोग झाल्याचें म्हटलें आहे. **भवभूति** कवि हा तर प्रसिद्धच आहे व करुणरस असा **भवभूतीनेंच** वर्णन करावा, याविषयीं ‘ **कारुण्यं भवभूतिरेव तनुते** ’ हें वचन प्रसिद्धच आहे.

---

*अप्पयदीक्षितांनीं प्रतीपालंकाराचें हें एक उदाहरण घेतलें आहे.

परंतु दुसरेंहि एका कवीचें भवभूतीच्या संबंधानें प्रसिद्ध नसलेलें पद्य खुबीदार आढळल्यावरून तें पुढें दिलें आहे.

' रत्नावलीपूर्वकमन्यदास्तामसीमभोगस्य वचोमयस्य ।
पयोधरस्येव हिमाद्रिजायाः परं विभूषा भवभूतिरेव ॥ '

याचें तात्पर्य असें कीं संस्कृतवाङ्मयाला रत्नावली वगैरे काव्यांनीं शोभा असली तरी भवभूतीचीं काव्यें हींच अलंकारभूत आहेत. भवभूतीचीं शृंगार-वीर—करुणरसप्रधान—नाटकें—मालतीमाधव, उत्तररामचरित व महावीरचरित, हीं सर्वत्र प्रसिद्धच आहेत. वरील कवितेंत कवीनें खुबीदार श्लेषालंकार साधला आहे !

## या ग्रंथांतील महत्त्वाच्या गोष्टीबद्दल विचार.

### मालव, गौड—गुप्त हा कोण ?

प्रतापवर्धन वारल्याचें एकतांच मालवराजानें ग्रहवर्म्यास द्वेषानें मारिलें, आणि कनोज घेऊन तेथेंच राज्यश्रीस बंदिशाळेंत टाकलें. यावरून कनोज हें ग्रहवर्म्याच्या राहण्याचें व गादीचें स्थान होतें, असें उघड झालें. बाणकवीनें याबद्दल हर्षचरित्रांत कोठें कांहींच स्पष्ट उल्लेख केलेला नाहीं ! मालवराजानें ग्रहवर्म्यास मारल्यावर कनोजचें राज्य घेतलें, परंतु पुढें राज्यवर्धनानें स्वारी करून मालवाचा नाश केल्यावर गौड—गुप्त शशांक यानें विश्वासघातानें[1] राज्यवर्धनास फसवून मारल्यावर गुप्तानें[2] कनोज घेऊन तेथें आपल्यापैकीं गुप्तसरदार नेमला असावा. यास हर्षचरितांत कुलपुत्रगुप्त[3] असेंहि ह्मटलें आहे. तो कुलीन असल्यामुळें त्यानें राजश्रीस अनाथ अबला समजून बंदीशाळेंतून सोडून दिलें, असें दिसतें.

मालवराजांपैकीं एका पक्षाचें व हर्षाच्या घराण्याचें हाडवैर पूर्वापार चालत आलें होतें, असें बाणकवीनें प्रभाकरवर्धनास ' मालवलक्ष्मीलतापरशु ' असें विशेषण दिलें आहे यावरून उघड होतें. प्रभाकरवर्धन

---

१ हेलानिर्जितमालवानीकमपि गौडाधिपेन मिथ्योपचारोपचितविश्वासं मुक्तशस्त्रमेकाकिनं विश्रब्धं स्वभवन एव भ्रातरं व्यापादितमश्रौषीत् । ह० उ० ६ पान २०८

२ देव, देवभूयं गते राज्यवर्धने गुप्तनाम्ना च गृहीते कुशस्थले ह० ह० उ० ७

३ कान्यकुब्जाद्गौडसंभ्रमं गुप्तितो गुप्तनाम्ना कुलपुत्रेण निष्कासनं निर्गतायाश्च राज्यवर्धनमरणश्रवणं श्रुत्वा चाहारनिराकरणमनाहारहातायाश्चविंध्याटवीपर्यटनखेदं जातनिर्वेदायाःपावकप्रवेशोपक्रमणं यावत्सर्वमशृणोद्व्यतिकरं परिजनतः ह०उ०८ पा०२८१.

वारल्याचें समजतांच पूर्वीचा सूड उगविण्याची संधि आलेली पाहून मालव-राजानें ग्रहवर्म्यावर स्वारी करून त्यास मारलें व अशा रीतीनें पूर्वीचा सूड उगविला! मालव व गौड या दोघांनींहि यावेळीं ग्रहवर्म्यास व राज्यवर्धनास मारण्याकरितां कट केला असावा, असें हर्षचरितांतील व इतर कांहीं लेखांवरून उघड दिसतें. गौडराजा—शशांक यानें राज्यवर्धनास मारण्याचा बेत केला होता; हें तर हुएनसँगच्या लेखावरूनहि स्पष्टच होतें.

मागें पान १६ यांत श्रीहर्षानें ब्राह्मणास अग्रहार दिल्याबद्दल ताम्रपत्रांतील लेख दिला आहे त्यांत आपला वडील बंधु राज्यवर्धन याच्या संबंधानें हर्षराजानें स्वतः त्या लेखांत त्याच्या घडून आलेल्या चरित्राचें संक्षेपानें पद्यांत वर्णन केलें आहे. तें पद्य फिरून येथेंहि देतों.

" राजानो युधि दुष्टवाजिन इव श्रीदेवगुप्तादयः
कृत्वा येन कशाप्रहारविमुखाः सर्वे समं संयताः।
उत्खाय द्विषतो विजित्य वसुधां कृत्वा प्रजानां प्रियम्
प्राणानुज्झितवानरातिभवने सत्यानुरोधेन यः "

यांत सांगितलेल्या देवगुप्तादि ( आदिशब्दानें दुसरे मालवराजे किंवा हूण इ० असावे. ) शत्रूंनां कडक शासन करून ( सत्यानुरोधानें ) विश्वासल्यामुळें त्यानें शत्रूच्या ( गौडाच्या ) घरीं प्राणत्याग केला! असें ह्मटलें आहे. ह्या वरील पद्यांत म्हटलेला देवगुप्त हाच मालव किंवा मालवराज असावा. हा माळव्याचा राजा असल्याबद्दल ( Epigra. Ind. 1,70. ) यांत आधार आहेच. गुप्त हे माळव्यांतील राजे होतेच. ह्या पद्यांत पुढें लागलींच राज्यवर्धनानें शत्रूच्या घरीं प्राणत्याग केला असें आहे. यावरून वरील पद्यांत हर्षानें बंधूच्या संबंधानें घडून आलेल्या गोष्टींचा अनुक्रमानेंच उल्लेख केला असल्याचें लक्षांत येतें. यांतील ' अरातिभवने ' ह्मणजे शत्रु गौडाच्या येथें असाच अर्थ असला पाहिजे. हाहि गुप्तांपैकींच होता. जनरल कनिंगह्याम यानें यास नरेन्द्रगुप्त असेंहि ह्मटलें आहे. पुढें पान ९९ यांत शशांकाच्या मांडलिकानें ताम्रपत्रांत शशांकाच्या गुप्तशकाचाच निर्देश केला आहे. यावरून हा गुप्तराजांपैकींच एक होता असें उघड होतें. हा पूर्वेकडचा गुप्त होता. कांहीं गुप्त माळव्यांत होते व कांहीं बंगाल्याकडे होते. हर्षाची व भंडीची वाटेनें गांठ पडली आहे

तेव्हां ' **राज्यवर्धनानें मालवराज** ( देवगुप्त ) यास तेव्हांच शासन केलें, परंतु **गौडानें** विश्वास दाखवून **राज्यवर्धनास** मारिलें ! असें सांगून **भंडीनें** पायांत बिड्या ठोकलेले ( संयत ) **मालवराजाचे** लोक वगैरे **हर्षास** दाखविले. ह्या **हर्षचरितांतील** वर्णनाशीं वरील पद्यांतील मजकुराचा बराच मेळ जुळतो, असें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येण्याजोगें आहे.

**हुएनसँग** यानें **गौडास कर्णसुवर्णपुरचा** राजा व **शशांक** असें ह्मटलें आहे, परंतु **बाणकवीनें** यास जागजागीं ' **गौड** ' असेंच ह्मणून या गुप्ताचें नांव गुप्तच ठेवलें आहे ! ' **मालव** ' **गौड** याचा प्रत्यक्ष नामनिर्देश **बाणानें** केला नाहीं यावरून—

**आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्यच ।**
**श्रेयस्कामो न गृह्णीयाज्ज्येष्ठापत्यकलत्रयोः ॥**

या धर्मशास्त्रांतील वचनांत अतिकृपण ह्मणजे नीच याचें नामग्रहण करूं नये असें असल्यामुळें त्यानें तें केलें नाहीं कीं काय कोण जाणे ! **हर्षा**-नेंहि **गौडाच्या** संबंधानें ' **नामापि गृह्णतोऽस्य पापकारिणः पापमलेन लिप्यत इव मे जिव्हा ।** ' ' ह्या पाप्याचें ( **गौडाचें** ) नामग्रहण केलें असतां पापमल माझ्या जिभेला बिलगून राहील ! ' असें तिटकाऱ्यानें ह्मटलें आहे. हा **गौडराजा** विरुद्ध पक्षापैकीं एक पुढारी होता. हा पूर्वेकडील राजा होता, असें **बाण** व **हुएनसँग** यांच्या वर्णनांत आलें आहे. **गौडाच्या** अपराधामुळेंच काय पूर्वदिशा काळीठिक्कर पडली ! ' **गौडापराधशंकिनीव श्यामतां प्रपेदे दिक् प्राची** ' असें **बाणानें** संध्याकालच्या वर्णनांत खुबीनें ध्वनित केलें आहे. या वाक्यांतील ' **गौड** ' शब्दाप्रमाणेंच जागजागीं ' **गौड** ' ' **गौड** ' असे त्यानें निर्देश केले आहेत ! तथापि श्लेषप्रिय आपल्या कवीच्या वर्णनाच्या भरांत श्लेषामध्यें एके ठिकाणीं **शशांक** पद खुबीनें पडून गेलें आहे. **हूणास** जिंकून पितृमरणानंतर **राज्यवर्धन** परत घरीं आला त्यावेळचें पुढील वर्णन आहे.

**"देवोऽपि हर्षस्तथैव स्नात्वा धरणितलनिहितकुथाप्र-सारितमूर्तिरदूर एवास्य तूष्णीमेव समवातिष्ठत। दृष्ट्वा दृष्ट्वा दूयमानमानसमग्रजन्मानं समस्फुटादिवास्य सहस्रधा हृद-यम् । औरसदर्शनं हि यौवनं शोकस्य। लोकस्य तु नर-पतिमरणदिवसादपि दारुणः स बभूव दिवसः। सर्वस्मि-**

त्रैव नगरे न केनचिदपाचि न केनाचिदस्नायि नाभोजि सर्वत्र सर्वेणारोदि । केवलमनेन क्रमेणातिचक्राम दिवसः। स च प्रत्यग्रत्वष्टृटंकतष्टतनुरिव वहद्बहलरुधिररस-मांसच्छविरपरपारावारपयसि ममज्ज माञ्जिष्ठारुणोऽरुण-सारथिः । मुकुलायमानकमलिनीकोपविकलं चकाण चञ्चरीककुलं कमलसरासि । सविधाविरहव्याधिविधुर-वधूवाध्यमानं बबन्ध बंधाविव विबुद्धबन्धूकभासि भास्वति सास्रां दृशं चक्रवाकचक्रवालम् । संचरन्त्याः समधुकररवं कैरवाकरं कलहंसरमणीरमणीयं माणिक्यकाञ्चीकिङ्किणीजालमिवाचकाण श्रियः । प्रकटकलंकमुदीयमानमकाशताकाशे शशाङ्कमण्डलम् । ”

यांत **प्रतापवर्धन** वारल्यावर **राज्यवर्धन** हा मोहिमेवरून आला तेव्हां तो **हर्ष** आणि इतर आप्तमित्र व प्रजा अत्यंत दुःखित झाल्याचा प्रसंग कवीनें वर्णन केला आहे व त्याला लागूनच सूर्यास्ताचें वर्णन केलेलें आहे. सूर्य अस्तास गेल्यामुळें भ्रमर व चक्रवाकपक्षी करुणस्वरानें ओरडूं लागले आणि शशांकमंडल प्रकाशित झालें ! असें वर्णन केलें आहे यावरून सूर्यास्ताच्या जागीं **प्रतापवर्धनाचा** अस्त, आणि भ्रमर व चक्रवाक यांच्या अरवण्याच्या जागीं त्यांच्या आप्तादिकांचा आक्रोश, हे कवीनें ध्वनित केले असावे असें लक्षांत येतें. तसेंच **शशांक** ( चंद्र व **गौड** ) यांचें मंडल प्रकाशित ( पक्षीं आनंदित ) झालें ! असेंहि कवीनें ध्वनित केलें आहे. प्रबलशत्रु ( **प्रतापवर्धन** ) वारल्यामुळें **गौड–शशांक** यास अत्यंत आनंद होणें हें साहजिकच आहे !

मार्गे एके ठिकाणीं **बाणानें** सूर्यवाचकशब्दानें **प्रतापवर्धन** याचें ग्रहण केल्याबद्दल स्पष्ट उल्लेखहि आहे. तो असाः–

**“अत्रैव चांतरे भवनकमलिनीपालः कोकमाश्वासयन्नपरवक्त्रमुच्चैरपतत् ।**

---

१ ध्वन्यर्थाची उत्तम काव्यांत गणना केली असल्याबद्दल विद्वज्जनास सांगावयास नकोच !

*विहग कुरु दृढं मनः स्वयं, त्यज शुचमास्व विवेकवर्त्मनि ।
सह कमलसरोजिनीश्रिया श्रयति सुमेरुशिरो विरोचनः ।

तच्चाकर्ण्य वाङ्निमित्तज्ञः पितरि सुतरां जीविताशां शिथिलीचकार।

ही गृहकमलिनीपालाची चक्रवाकपक्ष्यास उद्देशून उक्ति आहे. ती प्रस्तुतांकुरालंकारांत आहे. " सूर्यकमलिनीश्रीसह अस्तास चालला आहे, याकरितां मन घट्ट कर, शोक सोड, व विचार कर ! हें ऐकून हर्ष पित्याच्या जीविताशेविषयीं निराश झाला ! " असें वर्णन आहे ! यांत कमलिनीपालानें चक्रवाक पक्ष्यास संबोधून जरी ह्मटलें आहे, तरी हर्षास त्याच्या जननीसह त्याचा पिता परलोकास चालल्याचें सूचक वर्णन केलें आहे. विरोचन (सूर्य) शब्दानें येथें प्रतापी प्रतापवर्धन याचेंहि ग्रहण केलें आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. यावरून पूर्वीं दाखल केलेल्या उताऱ्यांत सूर्यवाचक शब्दानें प्रतापवर्धन वगैरे घेण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

सेनापति सिंहनाद याच्या उपदेशांत पुढील श्लेषोक्ति आहे. तीवरून प्रतापवर्धन व गौड ( शशांक ) यांचें पूर्वीपासून हाडवैर होतें असें लक्षांत येतें.

" देव देवभुयं गते नरेन्द्रे दुष्टगौडभुजङ्गजग्धजीविते च राज्यवर्धने वृत्तेऽस्मिन्महाप्रलये धरणिधारणायाधुना त्वं शेषः । समाश्वासय अशरणाःप्रजाः । क्ष्मापतीनां शिरःसु शरत्सवितेव ललाटंतपान्प्रयच्छ पादन्यासान् ' इ० ।

यांत नरेन्द्र ( प्रतापवर्धन, विषवैद्य ) परलोकवासी झाल्यामुळें दुष्ट गौडभुजंगानें ( शशांकानें ) राज्यवर्धनाला ग्रासून टाकल्यामुळें पृथ्वी धारण करण्यास तूंच शेष ( शेषसर्प व अवशिष्ट ) आहेस! असें सिंहनादानें श्लेषोक्तीनें ह्मटलें आहे. यावरून त्या वेळीं प्रतापवर्धनापुढें गौडादिकांचें कांहीं चालत नव्हतें व तो वारल्याबरोबर राज्यवर्धन व हर्ष यांस अल्प-

---

* आपल्या कवीचे ग्रंथ हे शब्दार्थालंकारांनीं भरलेलें भांडार असल्याचें प्रायः सर्वांस माहीत आहेच. त्यानें या ठिकाणीं प्रस्तुतांकुरालंकार घालून एका प्रस्तुत गोष्टीवरून दुसरी प्रस्तुत गोष्ट लक्षांत यावी, अशी योजना केली आहे.

' यत्र प्रस्तुतेन वर्ण्यमानेनाभिमतमन्यत्प्रस्तुतं द्योत्यते तत्र प्रस्तुतांकुरः ' । असें या अलंकाराचें लक्षण सांगितलें आहे.

वर्यी पाहून मालव व गौड यांनां त्यांचा सूड उगविण्यास संधि सापडली ! यांतील श्लेष तरी किती खुबीदार आहे !

प्रभाकरवर्धनानें राज्यवर्धन व हर्ष यांच्या सहवासास मालवराजपुत्र कुमारगुप्त व माधवगुप्त या दोघांस ठेवलें होतें व त्यांच्या सद्गुणांची त्यानें त्यांजवळ फारच प्रशंसा केली होती. तसेंच हस्तिसैन्याचा अधिपति स्कंदगुप्त यानें राज्यवर्धनाच्या उदाहरणावरून 'आपलेया देशाचाराप्रमाणें सर्वत्र विश्वास ठेवणें ठीक नाहीं, असें ह्मणून हर्षानें सावध रहावें ह्मणून इतिहासांतील अनेक उदाहरणें सांगून त्यास मोठ्या कळकळीनें उपदेश केला आहे आणि मग तो हस्तिसैन्य सज्ज करण्यास व हर्षाबरोबर युद्धास जाण्याची तयारी करण्यास निघून गेला आहे.

हर्ष हा विंध्यारण्यांत दिवाकरमित्राकडे गेला, त्यावेळीं माधवगुप्ताच्या खांद्यावर हात टाकून गेला आहे ! यावरून मालवराजांत ( गुप्तराजांत ) दोन पक्ष होते. एक पक्ष हर्षास अनुकूल होता व दुसरा प्रतिकूल होता असें उघड दिसतें.

गुप्तराजे हे बाणकवीच्या पूर्वजांचा मोठा सन्मान ठेवीत होते असें 'अनेकगुप्तार्चितपादपंकजः' या विशेषणावरून उघड दिसतें. बाणकवीनें

---

१यतः सर्वैर्दोषाभिषंगैरसंगतौ बहुधोपधाभिः परीक्षितौ शुचीं विनीतौ विक्रान्तावभिरूपौ मालवराजपुत्रौ भ्रातरौ भुजाविव मे शरीरादव्यक्तौ कुमारगुप्तमाधवगुप्तावस्माभिर्भवतोरनुचरत्वार्थमिमौ निर्दिष्टौ । अनयोरुपरि भवद्भयामपि नान्यपरिजनसमवृत्तिभ्यां भवितव्यम् ।

२ तदियमात्मदेशाचारोचिता स्वभावसरलहृदयजा त्यज्यतां सर्वविश्वासिता ।

३ततो नरपतेरभवदन्मनस्यदूरवर्तिना खलु भवितव्यं भदन्तेनेति।अवतीर्यच गिरिसरिति समुपस्पृश्य युगपद्विश्रामसमयसमुन्मुक्तहेपाघोषबधिरीकृताटवीगहनामस्मिन्नेव प्रदेशे स्थापयित्वा वाजिसेनामवलंब्यच तपस्विजनदर्शनोचितं विनयं हृदयेन दक्षिणेनच हस्तेन माधवगुप्तमंसे विरलैरेव राजभिरनुगम्यमानश्चरणाभ्यामेव प्रावर्त्तत गन्तुम् ह०च०पा०२६४.

गया जिल्ह्यांत अफसड ऊर्फ जाफरपूर येथें शिलालेख सापडला आहे त्यावरून माधवगुप्त यासहि हर्षानें मांडलिक राजा केलें असल्याचें कळतें. यांत हर्षाच्या नांवाचा उल्लेख आहे. पान५-६ यांत छापलेल्या ताम्रपत्रांत हर्षाचा हस्ति सेनापति स्कन्दगुप्त यास महासामंत ह्मटलें आहे. यावरून हर्षराजानें आपल्या आश्रयानें असलेल्या गुप्तांस मांडलिक राजे केलें होतें असें लक्षांत येतें.

या सर्व राजांचे कालनिर्देश, स्थलनिर्देश आणि विशेष नांवें हीं आपल्या ग्रंथांत दिलीं नाहींत त्यामुळें मोठा घोटाळा झाला आहे ! हा घोटाळा केवळ याच ठिकाणीं झाला आहे असें नाहीं, तर आमच्या सर्व कवींच्या ग्रंथांत असाच किंवा यापेक्षांहि अधिक ब्रह्मघोटाळा दृष्टीस पडतो ! **बाणकवीनें** आपला व आपला आश्रयदाता हर्षराजा याचा बराच इतिहास तरी दिलेला आहे ! इतरांच्या ग्रंथांत तर एका नांवाखेरीज दुसरें कांहींच नसतें व तेंहि कधीं कधीं अज्ञानी लेखक लिहिण्याचें टाळतात !

## हर्षाची राजधानी, राज्यविस्तार व त्याचा मृत्युकाल.

हर्षाची राजधानी प्रथम **स्थानेश्वर** व नंतर **कनोज** ही होती. **राज्यवर्धनानें मालवराजास** मारल्यानंतर हर्षानें त्याचें **माळव्यातील** राज्य खालसा केलें असावें. पुढें त्यानें प्रसिद्ध क्षेत्र **उज्जयिनी** येथेंहि राजधानीचें ठिकाण केल्याचें लक्षांत येतें. **मयूरशतकाच्या मधुसूदनकृत भावबोधिनी** टीकेंत " **मालवराजस्योज्जयिनीराजधानीकस्य कविजनमूर्धन्यस्य रत्नावल्याख्यनाटिकाकर्तुर्महाराजश्रीहर्षस्य** " असें आहे. यावरून **उज्जयिनी** हेंहि त्याच्या राजधानीचें ठिकाण होतें असें लक्षांत येतें.

हर्षराजाच्या राज्याचा विस्तार-उत्तरेस **हिमालयापर्यंत**, दक्षिणेस **नर्मदेपर्यंत**, पश्चिमेस **पंजाबपर्यंत**, व पूर्वेस **बंगालपर्यंत** होता. हर्षानें सुमारें ४० वर्षें राज्य केलें व तो. ई. स. ६४८–५० या कालावधींत वारला. **हर्ष** हा **शककर्ता** राजा झाला. त्याचा शक कांहीं कालपर्यंत **उत्तरहिंदुस्थानांत** चालू होता याबद्दल **शिलालेखांत** पुरावा मिळतो.

## हर्षाची गौड ( शशांक ) वध संबंधाची प्रतिज्ञा.

हर्षानें **गौडराजावर** स्वारी करून त्याचा समूल उच्छेद करण्याकरितां व पृथ्वींतील राजे जिंकण्याकरितां मोठ्या आवेशानें प्रतिज्ञा केली ती शेवटास गेल्याबद्दल **बाण** व **हुएनसँग** यांपैकीं कोणींच विशेष रीतीनें वर्णन केलें नाहीं. **हुएनसँग** यानें हर्षानें आपले शत्रु जिंकून त्यांस आपल्या ताब्यात आणलें व त्याचीं पराक्रमाचीं कृत्यें ३०–३५ वर्षांपेक्षां अधिक कालपर्यंत चाललीं होतीं; असें सामान्यरीतीनें म्हटलें आहे.

---

१ जनरल कनिंगह्याम याच्या ' एनशंट्‌ जाग्रफी आफ इंडिया ' यावरून व हुएनसँगच्या लेखावरूनहि हा काळ ठरतो.

हर्षचरितांत तर अगदीं शेवटीं हर्षानें दिवाकरमित्रास म्हटलें आहे, ' मीं क्रोधाधीन होऊन कपटानें बंधूचा घात करणाऱ्या वैऱ्याचा नाश करण्याकरितां प्रतिज्ञा केली आहे, ती पुरी होईपर्यंत आपण कृपा करून मजबरोबर राहून माझ्या बिचाऱ्या बहिणीचें धर्मकथांनीं व उपदेशपर भाषणांनीं सांत्वन करावें ' अशी त्याची प्रार्थना करून त्यासह तो आपलें सैन्य गंगातीरीं तळ देऊन राहिलें होतें तिकडे गेला.

बाणकवि हा पहिल्यानें हर्षाकडे गेला तेव्हां तो गंगा उतरून ' मणितार ' नांवाच्या ठिकाणाजवळ हर्षराजाच्या सैन्याचा तळ पडला होता, तेथें त्यास भेटावयास गेला. तेथें हजारों हत्ति, घोडे व सैनिक यांनीं गजबजलेल्या त्या ठिकाणीं शेंकडों मांडलिक राजांनीं सेवा केलेल्या "दर्शनाशया दिवसं नयद्भिर्भुजनिर्जितैः शत्रुसामंतैः संमतादासेव्यमानम्" अशा हर्षराजाला बाणानें पाहिलें. यावरून मुख्य छावणी गंगेच्या कांठीं ठेवून शत्रूवर स्वाऱ्या करून तो त्या ठिकाणीं परत येत असे, असें दिसतें. बाणकवीनें हर्षाचें चरित्र त्याची भेट होण्याच्या पूर्वीं जें घडून आलें तितकेंच वर्णिलेलें आहे असें वाटतें. बाकी त्याच्या मनांत हा ग्रंथ मोठा करावयाचा होता यांत संशय नाहीं. हर्षचरिताची येथपर्यंत अशा रीतीनें समाप्ति झाली असल्यामुळें, व गौडवधसंबंधाचें बाणाचें वर्णन नसल्यामुळें वाचकांची जिज्ञासा तशीच अतृप्त राहिली ! हर्षानें तर ' मी थोड्या दिवसांतच गौडरहित पृथ्वी करणार नाहीं तर प्रज्वलित अग्नींत उडी टाकीन ' अशी दुर्धर प्रतिज्ञा केली असल्याचें वर्णन आहे.[१]

'एपिग्राफिआ इंडिका ' ( Vol. VI P. 143. ) यांत शैलोद्भव घराण्यांतील महाराजाधिराज—शशांक याचा मांडलिक महासामंत माधवराज याच्या वंशजानें अग्रहार दिल्याबद्दल ताम्रपटांतील लेख छापला आहे. त्यांत " ओम् स्वस्ति चतुरुदधिसलिलवीचिमेखलानिलीनायां सद्वीपगिरिपत्तनवत्यां वसुंधरायां गौप्ताब्दे वर्षशतत्रये वर्तमाने महाराजश्रीशशांकराजे शासति " इ० असें म्हटलें आहे. गौप्ताब्द ३०० म्हणजे इ० स० ६१९ होतात. ह्यावर्षीं शशांकराजा

---

१यदि परिगणितैरेव वासरैः ❀ निर्गौडां न करोमि मेदिनीं ततस्तनूनपाति पीतसर्पिषि पतंग इव पातकी पातयाम्यात्मानम् (पान २१७).

जिवंत असून राज्य करीत होता असें उघड होतें. आतां **राज्यवर्धन** ह्याचा मृत्यु ( युरोपियनांच्या ह्मणण्याप्रमाणें ) इ० स० ६०६ मध्यें घडून आला व त्याच किंवा पुढच्या वर्षी **हर्षा**नें राज्यसूत्रें हातीं घेतलीं. ह्यावरून ह्या दानपत्राचे वेळेस **हर्षा**च्या प्रतिज्ञेस तेरा वर्षांचा काल लोटला होता. ह्यावरून **हर्षा**नें केलेली प्रतिज्ञा त्याचे हातून तडीस गेली नाहीं, असें वाटणें साहजिक आहे. परंतु ती शेवटास गेल्याखेरीज राहिली नसावी. आतां **शशांक** हा दांतीं तृण धरून हर्षास शरण आल्यामुळें त्यानें त्यास जीवदान दिलें असल्यास न कळे! कारण **'अत्र शेषभोगिमण्डलस्योपरि क्षमा कृता'** यांतील द्व्यर्थांत कांहीं राजांवर त्यानें क्षमा केली, असें **हर्षचरितां**त आहे. **हर्षा**नें स्ववधोद्यत मनुष्यावर देखील दया केल्याबद्दल **हुएनसँग**च्या लेखांत वर्णन आहे. ह्यावरून **'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । लोकोत्तराणां चेतांसि कोहि विज्ञातुमर्हति ॥'** वज्राहून कठोर व फुलाहून मृदुल अशीं थोरांची मनें असतात! तेव्हां काय सांगावें? कदाचित् असाहि प्रकार घडला असल्यास देव जाणे! **हुएनसँग**च्या लेखांत हर्षानें पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत जे उन्मत्त राजे होते त्यांनां जिंकून आपल्या ताब्यांत आणलें, असें ह्मटलें आहे. ह्यामुळें व आपल्या बंधूचा घात करणाऱ्या **गौडा**चा सूड उगविण्या-चाच **हर्षा**चा मुख्य उद्देश असल्यामुळें आणि त्याकरितांच तो प्रतिज्ञा करून प्रचंड सैन्यासह बाहेर पडला असल्याकारणानें त्यानें **गौडा**स अगदीं 'त्राहि त्राहि' करून सोडलें असावेंच असें अगदीं उघड दिसतें! **हुएनसँग**च्या लेखाप्रमाणें **हर्षा**चें तीस पस्तीस वर्षेपर्यंत जर राजे जिंकण्याचें व देश काबीज करण्याचें काम चाललें होतें तर मुख्य शत्रुच त्याचे हातून अचानक कसा सुटेल? **स्मिथ**च्या इतिहासांत इ० स० ६१९ पर्यंत **शशांक**राजानें[1] टिकाव धरला. परंतु पुढें त्याचें राज्य हर्षानें घेतलें असावें असें आहे. या ह्मणण्यास त्यानें ह्या **शिलालेखा**चाच आधार दिला आहे व **रंगामति** नांवाची त्याची राजधानी होती, ती **मुर्शिदाबादे**च्या दक्षिणेस बारा मैलांवर होती असेंहि ह्मटलें आहे.

बाणानें हर्षराजाचें "**भुजनिर्जितैः शत्रुसामंतैः समंतादासेव्यमा-**

---

१ हा शशांकराजा शैव असून बौद्धधर्माचा तिरस्कार करणारा होता. यानें बौद्धगया येथील प्राचीन बोधि [ पिंपळाचा वृक्ष ] समूल खणून टाकला व पाटलीपुत्र येथील बुद्धाच्या पादुका फोडून टाकल्या. पुढें अशोकाच्या वंशांतला मगधदेशचा राजा पूरणवर्मा यानें बोधिवृक्षाचें त्याठिकाणीं पुनः नवीन आरोपण केलें.

म. ग्रं. ... MAY 2007

नम् " असें वर्णन केलें आहेच. यावरून बाणाची भेट झाली तेव्हां हर्षानें कांहीं शत्रु जिंकून ताब्यांत आणले होते, व आणखी बाकी राहिलेले शत्रु जिंकण्याचें कामहि चालू होतेंच असें म्हटलें आहे., आतां प्रतिज्ञात कृत्यें शेवटास न्यावयाचीं म्हणजे त्यांत मुख्य गौडवध व पृथ्वींतील उद्धट राजे जिंकणें, हींच होत. असें हर्षचरित व हुएनसँगचा लेख यांवरून सहज लक्षांत येतें. तेव्हां हर्षानें आपले शत्रु जिंकिले असें मानण्यास तर कांहींच हरकत नाहीं. तथापि बाणाकडून पुढील गौडवधादिक पराक्रमाचें विशेष वर्णन तसेंच अपरिहार्यकारणामुळें राहून गेलें.

## हर्षाचें क्षत्रियत्व व राजधानी यांबद्दल विचार. यासंबंधानें बाण व हुएनसँग इत्यादिकांत विरोध.

बाणभट्टानें हर्ष हा पृथु, नल, दिलीप, इत्यादि राजांसारख्या पुष्पभूति—राजाच्या वंशांत उत्पन्न झाला असें म्हटलें आहे व राजन्,[1] देव, पार्थिव, भूभृत्, नृप इत्यादि क्षत्रियवाचक शब्द त्यास व त्याचे पूर्वजांस लावलेले आहेत. तसेंच हर्षाचे आईस बाणानें 'महाभूभृत्कुलोद्गता' असें विशेषण योजलें आहे. ह्या त्याच्या लेखावरून हे क्षत्रियराजे असल्याबद्दल कोणास शंका येण्याचें कारण नाहीं. तथापि हुएनसँग यानें यांस 'वैश्य' असें म्हटलें आहे. परंतु तें तसें नसून 'बैस' असेंच असावें असें वाटतें. क्षत्रिय रजपूत राजांत 'बैस' म्हणून एक जात असल्याबद्दल आधार आहे. त्या जातींपैकींच हे असल्यामुळें हुएनसँगनें यांस 'बैस' (वैश्य) राजे असें म्हटलें असावें. 'वर्धन'[2] हें वैश्यजातीस लावतात असें कै० शंकर पांडुरंग पंडित याचें म्हणणें आहे, परंतु तें बराबर नाहीं. यादवराजांत

---

१ आमच्या एक दोन टीकाकारांनीं या ठिकाणीं असे आक्षेप घेतले आहेत कीं, राजन् वगैरे शब्द क्षत्रियवाचक नसून ते पाहिजे त्या राजास लावतात. परंतु तसेंच केवल नाहीं. "एकविंशतिकृत्वः कृत्तवंशमुत्खातवान्राजन्यकं परशुरामः।" ह०च. उ० ६. परशुरामानें एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केली. महाभारतादिकांत हे शब्द क्षत्रियवाचक असल्याचें आढळतें. तथापि हे शब्द पाहिजे त्या राज्यकर्त्यास लावण्याचाहि प्रघात चालू आहे, नाहीं असेंच नाहीं.

२ रा० ब०शं० पां० पंडित यांच्या गौडवधकाव्याच्या प्रस्तावनेंत 'वर्धन' हें वैश्यास लावतात असें म्हटलें आहे. परंतु यास कांहीं प्रमाण नाहीं. हुएनसंगनें म्हटलेल्या 'बैस' [ वैश्य ! ] यरून हें म्हटलेलें असावें असें वाटतें.

'**विष्णुवर्धन**' नांवाचा एक राजा होता. यास '**यादवकुलांबरद्युमणि**' असें ह्मटलें आहे. तसेंच **चालुक्य** क्षत्रियघराण्यांत **विष्णुवर्धनें** नांवाचे बरेच क्षत्रियराजे झालेले आहेत. असें ताम्रपट व शिलालेख यावरून समजतें. तेव्हां '**वर्धन**' हें क्षत्रियांस लावतात असें उघड झालें. यावरून पंडितांचें लिहिणें चुकीचें असावें. **हर्षाच्या** घराण्याचा थोर क्षत्रिय घराण्याशीं शरीर-संबंध घडल्याचे आधार सापडतात. यावरून व **बाणाच्या** एकंदर वर्णनाच्या झोकावरून हे वैश्यराजे असावे, असें ह्मणण्यास बरीच शंका वाटते. कारण **ग्रहवर्मा** हा थोर क्षत्रियघराण्यांतला असल्याबद्दल व त्याला **हर्षाची** बहीण दिली असल्याबद्दल वर्णन आहे. "**प्रायेणच सत्स्वप्यन्येषु वरगुणेष्वभि-जनमेवानुरुध्यन्ते धीमन्तः । धरणीधराणांच मूर्ध्नि स्थितो माहेश्वरः पादन्यास इव सकलभुवननमस्कृतो मौखरीवंशः**" अशी **बाणकवीनें** या राजघराण्याची थोरवी **प्रभाकरवर्धनाच्या** मुखानें वर्णिली आहे. **वलभी-**[३]**चा ध्रुवसेन** हा **हर्षाचा** नातजावई होता व तो क्षत्रिय होता आणि **यशोवर्मा** हा ( **ग्रहवर्म्याचा** वंशज ) पुढें **हर्षा** नंतर **कनोजच्या** गादीवर बसला आहे, तो चंद्रवंशांतला राजा असल्याबद्दल **वाक्पतिराजकवीनें गौडवधकाव्यांत** वर्णन केलें आहे. तसेंच '**गोरोचनापिञ्जरितवपुषि समभिव्यज्यमानसहज क्षात्रतेजसीव**' **हर्षाच्या** अंगास गोरोचन लावल्यामुळें गौरतेजस्वीपणा दिसत होता, यामुळें हें त्याच्याबरोबर ( स्वतःसिद्ध ) क्षत्रियतेजच प्रकट झालें आहे काय! अशी **बाणानें** उत्प्रेक्षा केली आहे! यावरून तो क्षत्रिय असल्यामुळेंच त्याच्या अंगावर स्वतःसिद्ध क्षत्रियतेज प्रकट झालें काय! असें **बाणाच्या** वर्णनांत आलें आहे. तसेंच '**वर्म**' हें क्षत्रियासच लावतात. यासाठीं आणखी कांहीं तसेंच प्रमाण सापडल्याखेरीज हे वैश्य राजे होते

---

१ लुईस राईस साहेबानें ह्मैसूरकडील शिलालेख छापले आहेत ते पहा.

२ प्राचीन लेखमाला भाग १ पहा.

३ The present king ( Valabhi ) is of the Ksatriya cast as they all are. He is the nephew of Silâdityaraja of Mâlava and son-in-law of son of Silâditya the present King of Kanya-kubja. Hiuen Tsiang-Vol II. P. 267.

४ 'शर्मवद्ब्राह्मणस्योक्तं वर्मेति क्षत्रसंयुतम्
गुप्तदासात्मकं नाम प्रशस्तं वैश्यशूद्रयोः '॥

विष्णुपुराण.

असें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. कदाचित् तसेंच प्रमाण मिळून खरोखरीच हे वैश्य राजे होते असें निश्चितपणें ठरल्यास राजपुतान्यांतील रजपूतराजे व दिल्लीचे यवनराजे यांचे जसे शरीरसंबंध घडले, त्याप्रमाणें हाहि प्रकार घडला, असें मानावें लागेल! परंतु इतक्या प्रमाणास रद्द करणारीं सबळ प्रमाणें आढळतील असें वाटत नाहीं!

हुएनसंग यानें प्रतापवर्धन, राज्यवर्धन व हर्ष या तिघांनीं कनोजचें राज्य केलें, व या तिघांसहि कनोजचे राजे असें ह्मटलें आहे. परंतु हर्ष-चरितावरून या तिघांच्या वेळेस दिल्लीजवळ सरस्वतीनदीच्या कांठीं स्थाने-श्वर येथेंच यांची गादी होती. हर्षाची आई ही तिचा पति असन्नमरण झाला असतां स्थानेश्वर येथील सरस्वती नदीवरच अग्निप्रवेश करण्याकरितां चालत गेली व त्याचे बापासहि तेथेंच दहन करण्यास नेलें. इत्यादि गोष्टींवरून या तिघांचे राज्यासन स्थानेश्वर येथेंच होतें. राज्यवर्धनाच्या मृत्यूनंतर पुढें बऱ्याच वर्षांनीं हर्षानें राजे जिंकून राज्य-विस्तार केल्यावर कनोज येथें राजधानीचें ठिकाण केलें असावें. यावरून हुएनसँगवर्णित सर्वगोष्टी अगदीं बिनचूक आहेत असेंच मानणें बरोबर वाटत नाहीं!

## भंडीच्या संबंधानें बाण व हुएनसँग यांच्या वर्णनांत विरोध.

हर्षचरितांत राज्यवर्धनाचा खून केल्याचें वर्तमान हर्षास समजतांच त्यास फार दुःख व संताप झाला आहे. तेव्हां सिंहनादनामक सेनापति जवळ होता त्यानें हर्षाचें समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे, व त्याच्या अंगीं वीरश्री चढण्यासारखें भाषण करून शत्रूंचा नाश करण्याकरितां त्याला उत्तेजन दिलें आहे. तेव्हां त्याचें भाषण हर्षास मान्य होऊन तो लागलींच युद्ध करण्यास निघाला आहे. हूएनसँगचे चरित्रांत ‘ भानी ’ हा मुख्य प्रधान होता असें आहे. राज्यवर्धनाचा शत्रूनें घात केल्यावर भानीनें सभा

---

‘ शर्मा देवश्च विप्रस्य वर्मा त्राता च भूभुजः
भूतिर्दत्तश्च वैश्यस्य दासः शूद्रस्य कारयेत्’ ॥

यमस्मृतिः

१ मि० जुलेन यानें हुएनसंगच्या पुस्तकाच्या केलेल्या भाषांतरांत असा मजकूर आहे.

२ हल्लीं या प्रदेशास पंजाब इलाखा ह्मणतात.

भरवून **हर्षानें** राज्यसूत्रें आपल्या हातीं घ्यावीं ह्मणून लोकांस संबोधून भाषण केलें आहे; व राज्याधिकार स्वीकारण्याविषयीं **हर्षाची** प्रार्थना केली आहे. तसेंच **हर्ष** हा **बोधिसत्वाची** प्रार्थना करून राज्य चालवूं लागला आहे व नंतर तो शत्रूचा नाश करण्याकरितां निघाला असल्याचें वर्णन आहे. आतां अशा प्रकारचा वृत्तांत **हर्षचरितां**त जरी नाहीं, तरी **भंडी** हा प्रधानासारखा असणें हें अगदींच असंभाव्य आहे असें नाहीं. कारण, तो **हर्षाचा** मामेभाऊच होता. **प्रभाकरानें** यास लहानपणापासून आपल्या दोघां मुलांप्रमाणेंच मानिलें होतें, व तो सैन्य घेऊन युद्धास वगैरेहि जात असेच. **हर्षाचा** भाऊ **राज्यवर्धन** हा शत्रूवर चालून गेला, तेव्हां त्यानें दहाहजार घोडेस्वारांनिशीं **भंडीस** आपल्या कुमकेस नेलें होतें. पुढें आपल्या बंधूचा घात झाल्याचें समजल्यावर **हर्ष** जेव्हां शत्रूवर चालून गेला, तेव्हां त्याची व **राज्यवर्धनाबरोबर** गेलेल्या **भंडीची** वाटेनें गांठ पडली आहे त्या वेळीं दोघांनीं **राज्यवर्धनाविषयीं** शोक केला असल्याचें वर्णन **हर्षचरितां**त आहे. असा याठिकाणीं परस्परांत विरोध आढळतो. यामुळें **हुएनसँगची** माहिती बरोबर वाटत नाहीं.

**हर्ष** हा आपला बंधु वारल्यावर राज्याधिकार स्वीकारण्याच्या वेळेस **बुद्ध** देवतेचें अनुमोदन घेण्याकरितां गेला होता, असें **हुएनसँगच्या** लेखांत आहे. परंतु **हर्षचरितावरून** पाहतां तो त्या वेळीं **बौद्धधर्मी** झाला नसून **वैदिकधर्माचेंच** आचरण करणारा होता, कारण, तो शत्रूचा सूड उगविण्याकरितां घरून निघाला तेव्हां **शिवपूजन** करून व ब्राह्मणांनां दानधर्म करून निघाला आहे. पुढें जेव्हां **दिवाकरमित्राची** व **हर्षाची** भेट झाली, तेव्हां त्याचे मनांत त्या धर्माचें बीजारोपण झालें असावें असें दिसतें. या गोष्टींतहि परस्पर विरोध वाटतो. तथापि त्यावेळीं **वैदिक** व **बौद्ध** धर्म यांचा अति निकट संबंध झाला असल्यामुळें अशी गोष्ट होणें केवळ असंभाव्य नाहीं. जसें मुसलमानी धर्माचें प्राबल्य झाल्यापासून आमचे लोक त्याच्या देवाचें दर्शन घेतात, त्यास नवस करितात व भजतात, त्याचप्रमाणें हेंहि झालें असावें असें मानण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

## राज्यवर्धन हूणांवर गेला असतां मागें हर्षाला राज्यावर बसविण्याच्या खटपटीविषयीं बाण, हुएनसँग व स्मिथ इत्यादिकांच्या वर्णनांत विरोध.

**हर्षाचा** बाप वारला तेव्हां त्याचा थोरला मुलगा **राज्यवर्धन** उत्तरेकडील

हूणांबरोबर युद्ध करण्याकरितां गेला होता. त्या वेळीं पाठीमागें हर्षास राज्यासनावर बसविण्याच्या खटपटी चालू होत्या; परंतु राज्यवर्धन विजयी होऊन परत आल्यामुळें त्या सर्व फसल्या व इ. स. ६०६ त तो गादीवर बसला, असें व्हिन्सेंट स्मिथ याच्या लेखांत आहे. स्मिथनें हें तरी हुएन-सँगच्या वगैरे आधारानेंच लिहिलें असावें. आतां हर्षचरितांवरून पाहतां हूणांस जिंकून राज्यवर्धन परत घरीं आला तेव्हां त्याला लढाईंत बाणाच्या जखमा लागल्या होत्या व त्यांवर पट्टया बांधलेल्या होत्या. त्यामुळें जवळ येऊन पोहोंचलेल्या राज्यलक्ष्मीच्या कटाक्षांनींच त्याचें शरीर व्याप्त झालें आहे काय ! अशी बाणकवीनें त्यावर उत्प्रेक्षा केलेली आहे. बापाच्या पश्चात् राज्यासनावर बसण्याचा वडील मुलाचा हक्क खराच, परंतु तो परत आल्यावर राज्यासनावर बसण्यास त्याला मुदलींच सवड मिळाली नाहीं. यामुळें स्मिथचे इतिहासांतील मजकुराचा हर्षचरितांतील मजकुराशीं मुदलींच मेळ जमत नाहीं. बाणाच्या वर्णनावरून असें सूचित होतें कीं राज्यलक्ष्मीनें तो हक्कदार असल्यामुळें त्याजकडे कटाक्ष फेंकले—ह्मणजे तो हक्कदार असल्याचें दाखविलें, इतकेंच, व तें युक्तच आहे. यावरून इतकेंच अनुमान करितां येईल कीं. प्रतापवर्धन वारल्यावर राज्यवर्धन मोहिमेवर

---

१"Rajyavardhan while thus pleasantly employed, Harsha, who was then a lad fifteen years of age, received news that his father lay dangerously ill with a violent fever. He returned to the capital with all speed, where he found the King in a hopeless condition. The disease quickly ran its course, and all was over long before the elder son, who had been victorious in his campaign, could return to claim his birthright. There are indications that a party at court inclined to favour the succession of the younger prince; but all intrigues were frustrated by the return of Rajyavardhan, who ascended the throne in due course. He had hardly seated himself when newes arrived which compelled him again to take the field."

Early history of India by V.A. Smith chapter VIII P.283.

२ ' हूणनिर्जयसमरशरव्रणबद्धपट्टकैर्दीर्घधवलैः समासन्नराज्यलक्ष्मीकटाक्षपातैरिव शबलीकृतकायम् ' । ह. च. १९६.

असताना प्रधानादिक मुत्सद्दी त्याच्या नांवानेंच राज्यकारभार चालवीत असतील, हें उघडच आहे. परंतु त्याच्या मागें हर्षास गादीवर बसविण्याच्या खटपटी चालू होत्या. हें तर अगदींच चुकीचें आहे व हर्ष इ. स. ६०५ च्या अक्टोबरांतच गादीवर बसला यासहि आधार म्हणून दिले आहेत, ते अनुमानानेंच जुळविलेले असावे असें दिसतें. वडील बंधूच्या पश्चात् आपणास राज्यावर बसविण्याविषयीं चाललेल्या खटपटी हर्षास पसंत असत्या तर त्यानें वडील बंधु लौकर घरीं येण्याकरितां त्याजकडे घाईनें स्वार[१] पाठविले होते, ते पाठविले नसते. **राज्यवर्धन** शत्रूस जिंकून घरीं परत आल्यावर पितृविरहानें विरक्त होऊन हातांतील शस्त्र टाकून देऊन "हें राज्य तूं संभाळ, मी तप करण्याकरितां वनांत जाणार !" असें सांगून तो तयार झाला आहे. ती त्याची आज्ञा ऐकून हर्षास मोठा अचंबा वाटला आहे व फार दुःख झालें आहे. त्यानें आपल्या मनांत अनेक तर्क[३] करून शेवटीं प्रियबंधूची राज्य चालविण्याविषयींची आज्ञा मला योग्य वाटत नाहीं, याकरितां आपणहि ह्याच मार्गास अनुसरावें असा निश्चय केला. **राज्यवर्धनाच्या** मागें राज्य मिळण्याच्या खटपटी हर्षास मान्य असत्या तर तो राज्य सोडून भावाच्या मागोमाग अरण्यांत जाण्यास सिद्ध झाला नसता ! यासंबंधानें **हर्षचरितां**तील लेख वाचला असतां उभय बंधूंच्या संवादांतील खरें भ्रातृप्रेम कळून येऊन **हुएनसँग, स्मिथ** वगैरेंचें ह्मणणें सर्वथैव खोटें, अशी खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं !

---

१ 'तत्र च त्वरमाणो भ्रातुरागमनार्थमुपर्युपरि क्षिप्रपातिनो दीर्घाध्वगान्प्रजविनश्चोष्ट्रपालान्प्राहिणोत्' ह. च. उ. ५ पान १७८.

२ अथ तच्छ्रुत्वा निशितशिखेन शूलेनेवाहतः प्रविदीर्णहृदयो देवो हर्षः समचिंतयत् । ह. च. उ. ६.

३ अपि चार्ये तपोवनं गते जिजीविषुः को हि नाम महीं मनसा पिध्यायेत् । × × किंवा ममानेन वृथा बहुधा विकल्पितेन । तूष्णीमेवार्यमनुगमिष्यामि । गुरुवचनातिक्रमकृतंच किल्बिषमेतत्तपोवने तप एवापास्यति इत्यवधार्य प्रथमतरं गतस्तपोवनमधोमुखस्तूष्णीमेवातिष्ठत । ह. च. उ. ६.

हर्षचरित उच्छ्वास ६ या ठिकाणचे अशा प्रकारचे दुसरे मागचे पुढचे हर्षाचे तर्क वितर्क व मनांतील खरे उद्गार पाहिले असतां याविषयीं खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.

## [illegible] वयाच्या संबंधानें बाण व डॉ. हाल, स्मिथ इ. यांच्यांत मतभेद.

इसवी सन ६३७ त हुएनसँगची व हर्षाची भेट झाल्यावर आज तीस वर्षें हर्ष लढाया करीत आहे, असें त्यानें ह्मटलें आहे. वरील सनांत तीस वजा केले असतां ६०७ हा हर्षाचा शककाल ठरविण्यांत आला आहे. हुएनसँग हा इ. स. ६३९-६४०त नालंद येथील बौद्धमठांत असतांना त्याला कोणीं भविष्यवाद्यानें सांगितलें होतें कीं शिलादित्य ( हर्ष ) राजा हा सुमारें १० वर्षांनीं मरणार आहे, व त्याप्रमाणें गोष्ट घडून आल्यावरून सुमारें ६४८–५०हा त्याचा अंतकाल ठरविण्यांत आला आहे. इ. स. ६०७त हर्ष गादीवर बसला व त्या वेळेस त्याचें वय १५वर्षांचें असल्याबद्दल व्हिन्सेन्ट स्मिथ वगैरेच्या इतिहासांत आहे, परंतु यांत चूक असावी असें वाटतें.

हर्षचरितांत चवथ्या उच्छ्वासांत हर्षाचा जन्मकाल दिला आहे. परंतु त्यावरून बरोबर काल समजणें अशक्य आहे. ज्येष्ठवद्य द्वादशीस प्रदोष कालानंतर कृत्तिका नक्षत्रावर हर्ष जन्मला, त्या वेळीं सर्व ग्रह उच्चीचे होते. याप्रमाणें सर्व उच्चीचे ग्रह मांधात्याच्या जन्मकाळीं मात्र होते असे तारक नांवाच्या विद्वान् ज्योतिष्यानें प्रभाकरवर्धनास सांगितलें आहे. परंतु सर्वच ग्रह एके कालीं उच्चीचे येत नसतात, असें ज्योतिःशास्त्रज्ञ ह्मणतात. मग उच्चीचे ह्मणजे शुभ असा अर्थ असेल तर कोण जाणे! बाणानें दिलेल्या वर्णनावरून त्याचा नक्की काल समजणें कठिण आहे. यांत एखाद्या शकाचा निर्देश असता तर या कालाचा माग काढण्यास ठीक झालें असतें. परंतु तसें यांत नाहीं.

राज्यश्रीच्या वेळेस राणी यशोवती गरोदर असतां राज्यवर्धनास सहावें वर्ष चालू होतें. व हर्ष दाईचीं बोटें धरून पांचसहा पावलें टाकूं लागला होता, ह्मणजे सुमारें वर्षादीडवर्षाचा असावा, व राज्यवर्धन हर्षापेक्षां पांचवर्षांनीं वडील होता. राज्यश्रीच्या जन्माच्या वेळेसचें यशोवतीच्या

---

१ 'मृगपतिपोत इव रक्षिपुरुषशस्त्रपंजरमध्यगते, धात्रीकरांगुलीलग्ने,पञ्चषाणि पदानि प्रयच्छति हर्षे,षष्ठं वर्षमवतरतिच राज्यवर्धने,देवी यशोवती गर्भेणाधत्त नारायणमूर्तिरिव वसुधां देवीं राज्यश्रियम् । '

२ सर्वभूभृदभ्यर्थितां गौरीमिव मेना ( यशोवती ) प्रसूतवती दुहितरम् । अस्मिन्नेव तु काले देव्या यशोवत्या भ्राता सुतमष्टवर्षदेशीयमुद्धूयगानकुटिल-

भावानें आपला मुलगा **भंडी** यास **राज्यवर्धन** व **हर्ष** यांच्या सहवासास आणून ठेवलें. तेव्हां तो आठ वर्षांपेक्षां थोडा कमी (अष्टवर्षदेशीयम्) होता.

गर्भधारणापासून प्रसूतिकाल नऊ महिन्यांचा असल्याबद्दल प्रसिद्धच आहे. तेव्हां **राज्यश्रीच्या** जन्मकालीं **राज्यवर्धनाचेंहि** वय ७ वर्षांचें असावें, व **हर्षाचें** दोन वर्षांचें तरी असावें. यावरून **राज्यवर्धन** व **भंडी** हे जवळ जवळ सारख्या वयाचे होते असें लक्षांत येतें. पुढें **राज्यवर्धन** व **हर्ष** हे दोघेहि तारुण्यांत आल्याचें व त्यामुळें त्यांच्या मांड्या, भुज व छाती इत्यादि अवयव चांगले भरल्याचें वर्णन आहे. त्यावेळीं **राज्यवर्धन** सुमारें २१ वर्षांच्या वयाचा असावा व **हर्षहि** **बाणानेंच** वर्णिलेल्या तारुण्याच्या आरंभकालाप्रमाणें निदान १६।१७वर्षांचा असावा. यापेक्षां कमी वयास तारुण्य कसें ह्मणतां येईल? **प्रतापवर्धनानें** त्याचवेळीं **मालवराजाचे** दोन पुत्र **कुमार** व **माधव** हे सर्व प्रकारें कसोटीस उतरल्यामुळें आपल्या मुलांची खबरदारी घेण्याकरितां त्यांस त्यांच्या स्वाधीन केलें. यांपैकीं वडील भाऊ **कुमारगुप्त** हा त्यावेळीं १८वर्षांचा व **माधवगुप्त** हा सुमारें **हर्षाच्या** बरोबरीचा ह्मणजे सुमारें १६।१७ वर्षांचा असावा. हे दोघे बरोबरीचे होते ह्मणूनच **हर्ष** जेव्हां पुढें घोड्यावरून उतरून **दिवाकरमित्राकडे** मर्यादेनें पायीं चालत गेला, त्यावेळेस **माधवगुप्ताच्या** खांद्यावर उजवा हात टाकून गेला असल्याचें वर्णन आहे!

---

काकपक्षशिखंडकं खंडपरशुहुंकाराग्निधूमलेखानुबद्धमूर्धानं मकरध्वजमिव पुनर्जातं एकेनेंद्रनीलकुंडलांशुश्यामलितेन शरीरार्धेनेतरेणचत्रिकंटकमुक्ताफलालोकधवलितेन संपृक्तावतारमिव हरिहरयोर्दर्शयंतं, पीनप्रकोष्ठप्रतिष्ठितपुष्पलोहवलयं, परशुराममिव क्षत्रक्षपणक्षीणपरशुपाशचिन्हितं बालतां गतं कंठसूत्रग्रथितभंगुरप्रवालांकुरं हिरण्यकशिपुमिवोरःकाठिण्यखंडितनरसिंहनखरखंडं गृहीतजन्मांतरं शैशवेऽपि सावष्टंभं बीजमिव वीर्यद्रुमस्य, भंडिनामानमनुचरं कुमारयोरर्पितवान्।

१ बाणानें कादंबरींत तारुण्याचा आरंभ १६ व्या वर्षीच वर्णिला आहे.—

एवंच क्रमेण समारूढयौवनारंभं + अधीताशेषविद्यं चावगम्यानुमोदितमाचार्यैश्चंद्रापीडमानेतु राजा बलाधिकृतं बलाहकमाहूय बहुतुरगबलपदातिपरिवृतमतिप्रशस्तेहनि प्राहिणोत्।

" अयमत्रभवतो दशमो वत्सरो विद्याग्रहमधिवसतः। प्रविष्टोसि षष्ठमनुभवन्वर्षम्। एवं संपिंडितेनामुना षोडशेन प्रवर्धसे "

२ अस्मिन्नेव प्रदेशे स्थापयित्वा वाजिसेनामवलंब्यच तपस्विजनदर्शनोचितं विनयं

ह्या इतक्या कालाच्या अवधींत **राज्यश्री**हि नृत्यगीतादि कला शिकून त्यांत प्रवीण झाली व पुढें ती तारुण्यावस्थेंत आली असल्याचें वर्णन आहे. तेव्हां पुष्कळ राजांकडून तिला मागण्या आल्या, तथापि मनाजोगता वर न मिळाल्यामुळें **प्रभाकर** हा चिंताग्रस्त राहिला. पुढें त्यानें **मौखरी**वंशांतील **गृहवर्मा** हा वर निश्चित केल्याचें, व विवाहाविधीनें त्यास आपली तरुण कन्या दिल्याचें आणि विवाहानंतर तो कांहीं दिवसांनीं आपल्या तरुणस्त्री-सह स्वराजधानीस गेल्याचें वर्णन आहे.

स्त्री वयांत येण्यास त्यावेळीं निदान सोळा सतरा वर्षांचें वय तरी असलें पाहिजे. हल्लींच्या काळची गोष्ट निराळी! हल्लीं तेराव्या चवदाव्या वर्षींहि स्त्रियांना आईपण येतें! हल्लींसारखी स्थिति शें दोनशें वर्षांपूर्वीं देखील नव्हती, असें वृद्ध वृद्ध मनुष्यांच्या सांगण्यांत येतें. मग **राज्यश्री**चा काळ ह्मणजे तेराशें चवदाशें वर्षांपूर्वींची गोष्ट होय. प्राचीनकालीं तर मनुष्याचें तारुण्य व आयुष्य हीं फारच पुढें जात होतीं असें इतिहास सांगत आहे. तेव्हां **राज्यश्री**चें वय तारुण्यावस्थेंत १६ वर्षांचें धरलें तरी **हर्षा**चें निदान **१८** वर्षांचें व **राज्यवर्धना**चें २३ वर्षांचें असलें पाहिजे.

पुढें **प्रभाकरा**नें **राज्यवर्धन** हा "**कवचहर**" कवच धारण करण्या-सारखा-पराक्रम करण्यासारखा-पूर्ण वयांत आलेला ह्मणजे सुमारें २३।२४ वर्षांचा झालेला पाहून त्याला **हूणां**वर पाठविलें. तेव्हां हर्ष आपल्या भावा-बरोबर **हिमालया**पर्यंत गेला व तेथेंच तो मृगया करीत कांहीं काळ राहिला असतां त्याचा बाप विषमज्वरानें अत्यवस्थ असल्याचें त्याला पत्र आल्यावरून तो मोठ्या तातडीनें उपाशी परत **स्थानेश्वरा**स गेला. राजवाड्यांत गेल्यावर **हर्षा**नें सर्व वैद्य एकत्र जमवून त्यांनां पित्याच्या प्रकृतीबद्दल विचा-रिलें असतां त्यांनीं त्यास धैर्य धारण करण्यास सांगितलें. ह्या वैद्यलोकांत पित्यानें पुत्राप्रमाणें मानलेला बंधूसमान, वैद्यशास्त्रपारंगत अश्रु ढाळणारा **रसायन** नांवाचा तरुण वैद्यकुमार होता, त्यास **हर्षा**नें विचारिलें, "**सखे रसायन* कथय तथ्यं यद्यसाध्यिव पश्यसि**" हा **रसायन** वैद्यकुमार

---

हृदयन, दक्षिणेनच हस्तेन माधवगुप्तमंसे, विरलैरेव राजभिरनुगम्यमानश्चरणाभ्यामेव प्रावर्तत गंतुम् ।

*तेषां तु भिषजां मध्ये युवाष्टादशवर्षदेशीयस्तस्मिन्नेव राजकुले कुलक्रमागतो गतः पारमष्टांगस्यायुर्वेदस्य भूभुजा सुतनिर्विशेषं लालितः प्रकृत्यैवातिपटीयस्या प्रज्ञया यथा-

१८ वर्षांचा असल्याचें तेथें ह्मटलें आहे, व त्याला **हर्षानें 'सख्या रसायना,'** असें ह्मटलें आहे. यावरून तो **हर्षाचा** समानवयस्कच असावा, व **हर्ष**हि यावेळेस सुमारें त्याच्या इतक्या वयाचाच असावा. बाप वारल्यावर पुढें **राज्यवर्धन** हा **हूणांस** जिंकून परत आल्यावर पितृदुःखानें व्याकुळ असतां एकाएकी भगिनीभर्ता **गृहवर्मा** यास शत्रूनें मारिल्याचें वर्तमान आलें. तेव्हां पहिलें दुःख एकीकडे ठेवून तो मोठ्या क्रोधानें व आवेशानें **मालव**-राजावर चालून गेला, व तिकडे त्याचा विश्वासघातानें वध झाला. तेव्हां पुढें **हर्ष** गादीवर बसण्याचा योग आला असला पाहिजे. यावेळीं **हर्षाचें** वय सुमारें १९ वर्षांचें तरी असलें पाहिजे. यावरून **हॉल, स्मिथ,** वगैरे युरोपियनांचे वयाच्या संबंधाचे तर्क व प्रमाणें बरोबर आहेतसें वाटत नाहीं!

**हर्ष** गादीवर बसला तेव्हां १५ वर्षांचा होता असें **स्मिथचें** ह्मणणें आहे. **राज्यवर्धन हूणांवर** चालून गेला तेव्हां तो "**कवचहर**" ह्मणजे वयांत आलेला—ह्मणजे २१ वर्षांचा होता असें **हॉलच्या** ह्मणण्यावरून **स्मिथनें** ठरविलें आहे. परंतु **हर्षचरितावरून** पाहतां **राज्यवर्धन हूणांवर** जाण्या-पूर्वींच दोघे बंधु तारुण्यांत आल्याचें वर्णन आहे. त्यांत **राज्यवर्धन २३** वर्षांचा तरी असावा. याविषयीं मागें विवेचन केलेंच आहे. पुढें तो '**कवच-हर**' ह्मणजे कवच धारण करणारा—पूर्ण तारुण्यांत आलेला—युद्ध करण्यास समर्थ—झाला आहे. असें त्याच्या बापास वाटल्यावरून त्यानें त्याला **हूणां**-बरोबर युद्ध करण्यास पाठविलें. यावेळीं **राज्यवर्धन २४** वर्षांचा व **हर्ष** १९ वर्षांचा तरी असला पाहिजे असें लक्षांत येतें.

तेव्हां **राज्यवर्धन २१** वर्षांचा व **हर्ष** १५ वर्षांचा असावा, या-विषयीं **हॉल** व **स्मिथ** साहेब या दोघांचाहि तर्क व प्रमाणें चुकीचीं असावीं असें ध्यानांत येतें!

## बौद्धधर्माचा वैदिक धर्माशीं एकजीव आणि बाण व हुएनसँग यांपैकीं निःपक्षपाती कोण?

**दिवाकरमित्र** हा ब्राह्मण व **राज्यवर्धन** व **हर्ष** हे राजे होते. त्यांनीं

---

वद्भिज्ञाता व्याधिस्वरूपाणां रसायनोनाम वैद्यकुमारः सास्रस्तूष्णीमधोमुखोऽभूत्। पृष्टश्च राजसूनुना—" सखे रसायन, कथय तथ्यं यद्यसाध्विव पश्यसि " इति। सोऽ-ब्रवीत्—" देव श्वःप्रभाते यथावस्थितमावेदयितास्मि इति।

 11 JAN 1994

बौद्धधर्म स्वीकारल्याबद्दल हर्षचरितांत वगैरे आधार आहेतच. बौद्धधर्म हा एकसारखा फार दिवस चालत आल्यामुळें तो वैदिकधर्मांत अगदीं मिसळून गेला होता. दोहींचा अगदीं एकजीवच झाला होता असें ह्मटलें तरी चालेल. हर्षराजा हा **बाण**, **मयूर** इत्यादि ब्राह्मणविद्वानांचा जसा सन्मान करीत होता, त्याप्रमाणें त्यानें बौद्धधर्मी **दिवाकरमित्र** व **हुएनसँग** वगैरेंचाहि सन्मान केलेला आहे. **बाण** जेव्हां हर्षाच्या भेटीस गेला तेव्हां तेथें हर्षासभोंवतीं अनेकधर्मपंथांचे लोक होते त्यांत बौद्धहि होतेच. " **जैनेरार्हतैः पाशुपतैः पाराशरिभिर्वर्णिभिश्च × × उपास्यमानम्** ।" असें हर्षाचे वर्णनांत आहे. बौद्धयति **दिवाकरमित्र** याच्या वर्णनांतहि " **वीतरागैरार्हतैर्मस्कारिभिः × × औपनिषदैः पौराणिकैर्धर्मशास्त्रिभिः × ×** ", इत्यादिकानीं युक्त असें आहेच. हर्षानें आपल्या आदित्यभक्तपित्याप्रमाणें सौगतबंधूसहि पुण्यप्राप्ति होण्याकरितां ब्राह्मणांस दान दिल्याबद्दल **ताम्रपटांत** आहेच. खुद्द **बाणाच्या** बरोबर असलेल्या मित्रमंडळींत देखील **वीरदेव** नांवाचा बौद्धभिक्षु होताच. **बाणाच्या** कल्पनासृष्टींतल्या **कादंबरींत** **चंद्रापीडाच्या** आईच्या वर्णनांतहि " **काषायरक्तांबरधारिणीभिर्जरत्प्रव्रजिताभिर्विनोद्यमानां** " असें आहेच. ब्राह्मण ह्मणून वर्णिलेल्या **शुकनास**प्रधानाच्या वर्णनांतहि " **शाक्यमुनिशासनपथधौरेयै रक्तपटैः पाशुपतैर्द्विजैश्च दिवानिशमासेव्यमानम्** ।" यांतहि बौद्धादिक व ब्राह्मण हे ब्राह्मण **शुकनास**प्रधानाच्या सभेंत एके ठिकाणीं असल्याचें वर्णन आहेच. कल्पिलेली नायिका **कादंबरी** इच्या वर्णनांतहि " **ददर्शच + + + + + + पठंतीभिर्भगवतस्त्र्यंबकस्यांबिकायाः कार्तिकेयस्य विष्टरश्रवसो जिनस्यार्यावलोकितेश्वरस्यार्हतो विरिंचस्य पुण्याः स्तुतीरुपास्यमानाम्** " इत्यादि [का० २०८–२०९] असें आहे. **कादंबरीच्या** जवळहि बौद्धजोगिणी वगैरे असल्याचें वर्णन आहेच. फार काय कल्पिलेल्या **कादंबरींत** देखील तत्कालीन बौद्ध संघट्टनामुळेंच कीं काय **बाणाच्याकडून** बौद्धांच्या संबंधाचें वर्णन आल्याखेरीज राहिलें नाहीं !

एकंदरींत सातव्या शतकांत तरी वैदिक व बौद्ध इत्यादि पंथांतल्या लोकांत विरोध असल्याचें **बाणाच्या** वर्णनावरून तरी दिसत नाहीं.

याच शतकांतील **भवभूतीच्या** वर्णनांतहि हाच प्रकार आढळून येतो.

**मालतीमाधवनाटकांत** बौद्धजतीण **कामंदकी** व वैदिकधर्मी **देवरात** व **भूरिवसु** यांचा व तिचा फार स्नेह होता. ते एका गुरूजवळ विद्याभ्यास करीत होते व ते एकमेकांचें हित साधण्याकरितां झटत होते अशाबद्दल स्पष्ट वर्णन आहे. या शतकांत त्यावेळीं शैवपंथ व मंत्र, तंत्र, वशीकरण इत्यादिकांचा प्रचारहि फार होता, असें **हर्षचरितां**तील **भैरवाचार्य, कादंबरीं**तील वृद्धद्रविड व **मालतीमाधवां**तील **अघोरघंट** यांच्या वर्तनावरून ध्यानांत येतें. तसेंच **बाणाच्या** दोन्ही ग्रंथांतील बौद्धांच्या संबंधानें वर दिलेल्या प्रमाणांत शैवादिक पंथांचे जागजागीं उल्लेख आहेतच. **दिवाकरमित्रानें** बौद्धदीक्षा घेऊन एकांतीं अरण्यवास स्वीकारला होता यावरून, व हर्षाची विधवाबहीण ही वैतागानें बौद्धदीक्षा घेण्यास सिद्ध झाली होती व बऱ्याच स्त्रिया हीच दीक्षा घेतलेल्या होत्या. यांवरून हा पंथ निवृत्तिमार्गास अनुकूल असल्याबद्दल त्या कालीं पुष्कळांची खात्री झाली होती, असें लक्षांत येतें. त्या कालीं ब्राह्मणविद्वान्कवि देखील आपल्या ग्रंथांत बौद्ध धर्मांतील तत्त्वांच्याच उपमा वगैरे देत असत. **बाणानेंच** '**सुगत इव शांतमनसि**' आणखी '**जिनधर्मेणेव जीवानुकंपिना**' अशा दोन्ही ग्रंथांत जागजागीं उपमा वगैरे दिलेल्या आहेत ! इत्यादि अनेक गोष्टींवरून त्या कालीं बौद्धधर्म किती दृढमूल झाला होता हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

या वर्णनावरून दुसरें असें लक्षांत येतें कीं, **बाण** हा वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणग्रंथकार असून त्याच्या अंतःकरणांत बौद्धधर्माचा द्वेष कोठेंहि दिसून येत नाहीं. स्वधर्माचाच पक्षपात त्याच्या मनांत असता तर त्यानें बौद्धांची महती व वर्णनें आपल्या ग्रंथांत घातलीं नसतीं; परंतु तसें कोठें दिसत नाहीं. **हुएनसँग** हा **बाणासारखा** निःपक्षपाती दिसत नाहीं. तो स्व ( बौद्ध ) धर्माची महती गाणारा व ब्राह्मणादि वैदिकधर्मी लोकांस ( heretic ) म्हणून त्यांची जागजागीं निंदा करणारा दिसतो. तसाच तो धर्मभोळाहि दिसतो. त्यामुळें बौद्धधर्मसंबंधीं अद्भुत गोष्टींबद्दल विचार न करितां त्या सर्व खऱ्याच समजतो. **हर्ष बोधिसत्वाकडे** गेल्यावर त्याचें दर्शन व त्याजबरोबर संभाषण वगैरे अद्भुत गोष्टी त्याच्या पुस्तकांत आहेत व त्या खऱ्या आहेत असें तो समजतो. **बाणाच्या** व त्याच्या वर्णनांत बरेच फरकहि दिसतात.

**हुएनसँग**च्या लेखांत ब्राह्मणांनीं **हर्षा**स मारण्याकरितां मारेकरी तयार केला व त्यामुळें ५०० ब्राह्मणांस **हर्षा**नें हद्दपार केलें वगैरे गोष्टी आहेत; परंतु त्या विश्वासार्ह वाटत नाहींत. तसें असतें तर **बाण, मयूर** इत्यादि ब्राह्मण-कवींनां त्यानें इतके अंतरंग व विश्वासपात्र केले नसतें. आतां **बाणा**च्या ग्रंथांतहि अद्भुत वर्णनें आहेत; परंतु तीं कविसंप्रदायास अनुसरून आहेत. त्यांत कोणाच्या निंदा नाहींत. **बाण** हा **हर्षा**च्यांच देशांत व त्याचेच पदरीं असल्यामुळें, व त्याचा स्वभाव दुराग्रही नसल्यामुळें त्याचे लेख जितके विश्वासार्ह वाटतात, तितके **हुएनसँग**चे वाटत नाहींत. **हुएनसँग** यानें ह्या देशांत बौद्धयात्रा करीत असतां जीं टिप्पणें करून ठेविलीं होतीं, त्या-वरून त्याच्या शिष्यांनीं मागून त्याच्या टिप्पणांत अधिकउणा मजकूर घालून त्यांस **चिनी**भाषेंत ग्रंथांचें स्वरूप देण्यांत आलें. पुढें त्या ग्रंथांच्या आधारानें **फ्रेंच, जर्मन,** व **इंग्लिश** भाषेंत त्यांचीं भाषांतरें झालीं! त्यांतहि अधिक-उणा प्रकार झाला असेलच. अशीं अनेक रूपांतरें होत गेल्यामुळें या ग्रंथांतून कांहीं ठिकाणीं चुका होण्याचा संभव आहे, व त्याप्रमाणें कांहीं चुका मागें दाखविल्याहि आहेत. **बाणा**च्या ग्रंथाचीं तशीं रूपान्तरें झालीं नसल्यामुळें त्यांतील गोष्टी अधिक विश्वासार्ह वाटतात.

### यशोवर्मा, ललितादित्य, पराक्रमाच्या चळवळी व देशाचें स्वरूप.

**हर्षा**चे मृत्यूनंतर **कनोज**ची राज्यक्रांति होऊन तेथील गादी **मौखरी**वंशाकडे गेली असावी, असें **गौडवध**काव्याच्या[1] प्रस्तावनेंत रा.ब. **शंकर पांडुरंग पंडित** यांनीं ह्मटलें आहे व त्यास ज० **कानिंगह्याम** ह्याच्या लेखाचाहि तेथें आधार दिला आहे. **हर्षा**च्या पश्चात् त्याची धाकटी बहीण **राजश्री** ही राहिली असावी व **कनोज**ची गादी **राजश्री**च्या ह्मणजे—**मौखरी**घराण्याच्या ताब्यांत गेली असावी; किंवा इतकी क्लिष्टकल्पना करण्यापेक्षां मूळची **कनोज** येथील गादी **मौखरी**घराण्याचीच होती ती बलाढ्य **हर्षा**चे पश्चात् त्या घराण्याकडे पुनः गेली असावी, हेंच ठीक दिसतें !

**हर्षा**नंतर सातव्या शतकाच्या उत्तरार्धांत **यशोवर्मा** हा **कनोज** येथील राज्यासनावर बसला. हा **ग्रहवर्म्या**चा जवळचा बांधव असावा. **यशोवर्मा** हा चंद्रवंशांतला होता असें **वाक्पति**कवीनें **गौडवध**काव्यांत ह्मटलें आहे. **यशोवर्म्या**नें **गौड**प्रमुखराजे जिंकून पराक्रमाचीं कृत्यें केलीं. तीं **गौडवध**-

---

१ हें काव्य प्राकृत भाषेंत आहे. त्या भाषेंत यास 'गौडवहो' असें नांव आहे.

काव्यांत वर्णिलेलीं आहेत. बाणकवीप्रमाणें वाक्पतीनेंहि गौडवधकाव्यांत यास ' गौड असेंच ह्मटलें आहे. कोठें ' पूर्वेकडचा राजा ' आणि कोठें ' मगधाधिप ' असेंहि ह्मटलें आहे. यावरून हर्षानें जिंकलेला व जीवदान दिलेला हाच तो गौड असावा कीं काय असा एक तर्क मनांत उभा राहतो! सातंव्या शतकाच्या सर्व पूर्वार्धीत हर्ष हा कनोज येथील गादीवर होता. आणि उत्तरार्धांत कांहीं कालानंतर यशोवर्मा हा त्याच ठिकाणीं त्याचे गादी-वर बसला. ह्या संधीसच दबून राहिलेल्या गौडानें पुन्हां कांहीं कुरापत काढण्याचा संभव आहे. व ह्मणूनच यशोवर्म्यासहि त्यावर स्वारी करणें भाग पडलें असावें. यशोवर्म्यानें गौडावर स्वारी करण्याचें व त्याला ठार मारण्याचें त्याच्या कारकिर्दींत दुसरें कांहीं मोठें कारण घडून आल्याबद्दल वाक्पतीनें आपल्या काव्यांत कोठें लिहिलें नाहीं. असें जर आहे, तर यास पूर्वींचेंच कारण असावें, असें मानण्यास काय हरकत आहे? यशोवर्मा हा ग्रहवर्म्याच्या घराण्यांतला होता, तेव्हां तो राजश्रीचा आप्त ह्मणून निराळें सांगावयास नकोच. तिच्या संबंधामुळें जर तो गादीवर बसला असला तर त्यामुळेंहि गौडाचा सूड उगवण्यास अधिकच भर पडून त्यानें त्याजवर स्वारी केली असावी. किंवा पूर्वींच्या गौडाचाच हा कोणी वंशज असावा, असाहि संभव आहे.

यशोवर्म्याच्या पदरीं वाक्पति, भवभूति इत्यादि कवि होते, हें मागें सांगितलेंच आहे. यशोवर्मा हाहि हर्षाप्रमाणेंच पराक्रमी आणि विद्याव्यसनीं होता. व त्याप्रमाणें तो कविहि असल्याबद्दल मागें लिहिलेंच आहे. त्याच्या नांवावर प्रसिद्ध असें रामाभ्युदय नांवाचें काव्य आहे, असा शोध लागला आहे व इतर कवींनीं आपल्या ग्रंथांतून त्याच्या नांवानें घेतलेलीं कांहीं पद्येंहि सापडतात. याबद्दल पूर्वीं लिहिलेंच आहे. यशोवर्मा हा इ. स. ६७५ ते ७२५ पर्यंत कनोजच्या गादीवर होता.

ह्या शतकाच्या पूर्वार्धांत उत्तरहिंदुस्थानांत महापराक्रमी, विद्याव्यसनी व उदारधी असा हर्ष व दक्षिणेंत सत्याश्रयपुलकेशी हे मोठे राजे झाले. त्यावेळीं हूणादि राजे या देशांत आपला शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत होते, परंतु हर्षाच्या पूर्वजांनीं व हर्षानें लढाया करून त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्यावेळीं ह्या देशांतील राजे परस्परांची राज्यें घेण्याकरितां युद्धें करीत असत. तथापि देशांतले देशांत संपत्ति राहत असल्यामुळें हा देश

धनधान्यसमृद्ध होता, त्यामुळें लोक निष्काळजी व सुखी असून सर्वत्र जिवंतपणा दिसत होता !

काश्मीरचा राजा ललितादित्य यानें यशोवर्म्याबरोबर युद्ध करून त्यास जिंकिलें. हा ललितादित्य इ. स. ६९५ ते ७३२ पर्यंत काश्मिरच्या गादीवर होता. एकंदरींत त्याकाळीं देशांत फार तरतरी होती व त्यामुळें जिकडे तिकडे पराक्रमाच्या चळवळी चालू असल्यानें देशाचें स्वरूप आतांप्रमाणें शांत न दिसतां निराळेंच जोमदार व सचेतन दिसत असावें असें लक्षांत येतें !

## बाण व हर्ष यांच्या चरित्रांतील ध्यानांत ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी.

बाण हा अगदीं लहान असतांच त्याची आई वारली व त्याच्या चवदावें वर्षी त्याचा बापहि वारला, त्यामुळें त्याजवर मोठाच प्रसंग गुजरला. तथापि त्यानें आपलें धैर्य खचूं न देतां आपला विद्याभ्यासादिकक्रम चालू ठेविला होता. तो स्वतंत्र झाला असतां आणि त्याचे घरीं सरदारीथाटाचें बरेंच वैभव असतां त्यास भुलून चैनींतच न बसतां पूर्ववयांत त्याचा उपहास होत असे तरी, त्यानें थोर थोर विद्वान् गुरूंकडे जाऊन उत्तम शास्त्राध्ययन केलें. आणि देशाटन करून व थोर पुरुषांच्या भेटी घेऊन सत्कीर्ति संपादन केली. पुढें बाणकवीच्या विद्वत्तेची कीर्ति हर्षराजाच्या दरबारापर्यंतहि गेली. ठीकच आहे. गुणवानांत खरोखरीच चांगले गुण असले तर ते त्याच्या अगोदरच पुढें धांव घेतात !

“ गुणाः कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सताम् ।
केतकीगन्धमाघ्राय स्वयमायान्ति षट्पदाः ”

ही एका कवीची उक्ति अगदीं यथार्थ आहे. परंतु दुर्जनांस सुजनांच्या गुणांचा उत्कर्ष सहन न होऊन ते त्यांची दुष्कीर्ति होण्यासाठीं प्रयत्न करतात, व त्यांतच मोठा आनंद मानतात ! असें बऱ्याच ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतें. त्याप्रमाणें कांहीं दुर्जनांनीं आपल्या स्वभावास अनुसरून बाणकवीविषयीं हर्षराजाचें मन कलुषित करून टाकलें होतें. या अनुभवावरूनच कीं काय त्यानें “ अकारणाविष्कृतवैरदारुणादसज्जनात्कस्य भयं न जायते ” ‘ कारणावांचून वैर करणाऱ्या दुर्जनापासून कोणाला भय होत नाहीं ’ ? असें म्हटलें आहे तें ठीकच; परंतु जगन्नियंत्या परमेश्वरानें अशी योजना करून

ठेविली आहे कीं, जेथें दुर्जन असतात तेथें बहुतकरून सज्जनांचाहि योग करून ठेवलेला असतो; यामुळेंच जगाची रहाटी सुरळीत चालली आहे! **हर्षाचा** बांधव **कृष्णराज** हा सज्जन व विद्वान् यांचा पक्षपाती होता त्यास ह्या गोष्टीबद्दल फार वाईट वाटत असे. त्यानें **हर्षराजाजवळ** बाणकवी-च्या विद्वत्तेची थोरवी वर्णून व अनेक गोष्टी सांगून त्याच्या मनांतला रोष काढून टाकला! ठीकच आहे.

" अतिकुपिताअपि सुजना योगेन मृदूभवन्ति नतु नीचाः ।
हेम्नः कठिणस्यापि द्रवणोपायोऽस्ति न तृणादेः ॥ "

थोर मनाचे पुरुष फार रागावले असले, तरी त्यांस नीट समजून सांगि-तलें असतां त्यांच्या अंतःकरणास द्रव सुटतो; परंतु अधम पुरुषांच्या मनास तो सुटत नाहीं! जसें सुवर्ण द्रवतें परंतु तृण, काष्ठ इत्यादि द्रवत नाहीं. याप्रमाणें **कृष्णरायाच्या** भाषणानें राजाच्या मनांला निष्ठुरपणा जाऊन त्यास दयेचा पाझर फुटला! मग **कृष्णराजानें बाणकवीस** मोठ्या अगत्यानें व आग्रहानें राजाच्या भेटीस येण्याविषयीं बोलाविलें. ही त्याची परोपकार-बुद्धि व आपणावर निष्कारण प्रेम पाहूनच त्यानें " **अनपेक्षितगुणदोषः परोपकारः सतां व्यसनम् ।** " असें **कृष्णराजास** अनुलक्षुन ह्मटलें आहे तें बरोबर आहे. असो. अशा थोर राजाकडे जाण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें व त्याच्या स्वभावाचें मान माहीत नसल्यामुळें **बाणकवीस** त्यावेळीं **हर्षराजाकडे** जाण्याचा विचार पडला होता. परंतु **कृष्ण-राजाच्या** प्रोत्साहनावर भिस्त ठेवून व धैर्य धरून तो **हर्षराजाकडे** गेला. पहिल्या भेटीसच **हर्षराजा** हा आपल्या भावी थोर कवीच्या धैर्याची परीक्षा पहावी म्हणूनच कीं काय झणझणून बोलला असतां **बाण-कवीनें** राजाची भीड न धरतां 'जशास तसें' या न्यायास अनुसरून सत्यास न सोडतां गंभीरपणानें सणसणीत उत्तर दिलें. त्यामुळें राजा आपल्या मनांत बराच चपापला व रागास न येतां प्रसन्नतेचेंच चिन्ह दाखवून उठून गेला. यावरून '**अप्रियस्यच पथ्यस्य वक्ता श्रोताच दुर्लभः**' । या वचना-प्रमाणें क्वचितच योग घडून येतो! त्यांतून तो अशा मोठ्या ठिकाणीं जमून आल्याचें पाहून मागें दाखल केलेल्या पद्यांतील अर्थाचा येथेंहि पुनरुच्चार केल्याखेरीज राहवलें नाहीं! पुढें **बाणकवीनें** आपल्या विद्वत्तेनें व चातुर्यानें **हर्षराजावर** आपली चांगलीच छाप बसविली! व आपल्यास आश्रय देणारा

हर्षराजा यास उत्तम विद्याव्यसनाची गोडी लावून दिली, असें म्हणण्यास बिलकूल शंका वाटत नाहीं. कारण, हर्षाकडे जाण्याच्या वेळेस **बाणानेंच** ' हर्षराजाच्या येथें मोठ्या विद्वत्तेचें कांहीं कौतुक नाहीं ! ' ( **न च तत्र विद्यातिशयकुतूहलम्** ) असें म्हटलें आहे. **बाणकवीच्या** सद्गुणांविषयीं हर्षराजाची पक्की खात्री झाल्यामुळेंच त्यानें त्याचा सन्मान करून व अपार संपत्ति देऊन त्यास उच्चपदास चढविलें. " * **राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा !** " ही लोकांत असंभाव्य मानलेली गोष्ट घडवून आणून **बाणकवीनें** ती स्वतः-च्या उदाहरणानें सर्वांच्या निदर्शनास आणून दिली ! यावरून **बाणकवी**-ची कर्तव्यदक्षता व योग्यता फारच मोठी होती, असें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे ! **बाणकवि** हा **हर्षराजाचा** विश्वासपात्र, अत्यंत प्रिय, सर्व पंडितांत मुख्य, व धनकनकसंपन्न झाला होता, तरी त्यानें **हर्षराजाच्या** येथें ऐषआरामांतच गर्क न राहतां अमूल्य ग्रंथ रचण्यांत आपल्या आयुष्याची सार्थकता केली. **हर्षराजानेंहि** केवळ राजवैभवांतच किंवा शौर्यादि कर्में करून राज्यविस्ताराच्या हव्यासांतच किंवा ऐहिक सुखांतच एकसारखें गढून न राहतां सत्पुरुष **दिवाकरमित्रादिकांच्या** संगतीनें ' **लक्ष्मीं तृणाय मन्यन्ते तद्द्वारेण नमंत्यपि** ' या वचनाप्रमाणें नम्रपणा धारण करून दानधर्माकडे व लोकोपयोगी मार्ग, धर्मशाळा, मठ, विद्यामंदिरें बांधण्याकडे बहुतेक लक्ष्मीचा व्यय केला. हें **प्रयाग** येथील त्याच्या दानधर्मावरूनहि उघड होत आहे.

" **लक्ष्म्यास्तडित्सलिलबुद्बुदचंचलाया-**
**दानं फलं परयशः परिपालनं च** " ॥
" **कर्मणा मनसा वाचा कर्तव्यं प्राणिनेहितम्** ।
हर्षेणैतत्समाख्यातं धर्मार्जनमनुत्तमम् । "

**हर्षराजानें** शिलालेखांत स्वतः म्हटल्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवलें. यावरून ' **चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता** ' ह्या तिहींचीहि सांगड **हर्षराजाप्रमाणें** जगांत क्वचित्‌च आढळून येते !

याप्रमाणें हर्षराजावर अनेक दुःखकारक प्रसंग कोसळले होते, तरी त्यानें संकटकालीं धैर्य न सोडतां महापराक्रम करून व **बाणादि** कवींच्या संगतीनें

---

* हें संपूर्ण सुभाषित पद्य याप्रमाणें आहे:—

काके शौचं द्यूतकारेषु सत्यं सर्पे क्षान्तिः स्त्रीषु कामोपशान्तिः ।
क्लीबे धैर्यं मद्यपे तत्त्वचिन्ता राजा मित्रं केन दृष्टं श्रुतं वा ॥

विद्वत्ता संपादून तसाच ग्रंथरचना करण्याचाहि अभ्यास करून ‘ हर्षो हर्षः ’ ह्या जयदेव कवीच्या उक्तीप्रमाणें तो कवितेच्या हर्षस्थानीं राहून चांगल्या कवींत गणनीय झाला !

विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।
यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ प्रकृतिसिद्धमिदंहि महात्मनाम् ॥

याप्रमाणें थोर पुरुषांची स्वभावसिद्ध सर्वलक्षणें हर्षराजाचे ठायीं असल्याबद्दल आढळून येतें. हर्षराजा व बाणकवि या दोघांचा समागम सुवर्ण आणि रत्न यांच्या संयोगाप्रमाणें जमून येऊन परस्परांच्या संगतीचा परस्परांस अत्यंत उपयोग झाला !

“ किंवा परेण बहुना परिजल्पितेन
संसर्ग एव महतां महते फलाय । ”

ही विद्वज्जनोक्ति येथें उभयतांसहि अगदीं बरोबर लागू पडली ! अशा विद्यादि सद्गुणविशिष्टांची थोरवी किती जरी वर्णन केली तरी ती सर्वथैव अनिर्वचिनीय आहे, असें पंडितवर्य जगन्नाथराय यांनीं देखील ह्मटलें आहे:—

“ अन्या जगद्धितमयी मनसः प्रवृत्ति-
रन्यैव कापि रचना वचनावलीनाम् ।
लोकोत्तरा च कृतिराकृतिरार्तहृद्या
विद्यावतां सकलमेव गिरां दवीयः ” ॥

सारांश, थोर पुरुषांच्या सर्वच गोष्टी साकल्येंकरून कळणें अशक्य आहे !

# हर्षचरित्रांतील संक्षिप्त कथानक.

कोणे एके काळीं ब्रह्मदेव सत्यलोकीं इंद्रादिदेवांसह ब्रह्मज्ञानपर गोष्टी सांगत बसला होता. त्या ठिकाणीं मनु, दक्षप्रजापति, वसिष्ठ व विश्वामित्र इत्यादि ऋषि त्याचें स्तवन करीत होते. कोणी अनेक विषयांवर वाद करीत होते. त्यांत अत्रिऋषीचा पुत्र दुर्वासऋषि यानें मंदपालऋषीबरोबर वाद करीत असतां क्रोधांध होऊन सामगायनांत चूक केली. तेव्हां शापभीतीस्तव सर्वांनीं मौन धारण केलें, परंतु सरस्वतीस हसूं आवरलें नाहीं. तें पाहून दुर्वासऋषींस फार राग आला आणि कमंडलूंतील उदक हातांत घेऊन "तुला विद्येचा मोठा गर्व झाला आहे नाहीं? तर तो मी आतां नाहींसा करतों पहा!" असें ह्मणून "तूं या लोकापासून मनुष्यलोकीं पतन पावशील" असा त्यानें तीस शाप दिला. तें पाहून सावित्रीस राग येऊन तीहि उठून क्रोधावेशानें ह्मणाली, "हे कोपिष्टा तापसाधमा! तूं आपल्या चुकीबद्दल सर्व देवर्षींनीं वन्द्य अशा सरस्वतीस शाप दिलास काय?" असें बोलून तीहि त्यास प्रतिशाप देण्यास तयार झाली. परंतु सरस्वतीनेंच तिचें निवारण केलें. मग ब्रह्मदेवानें सर्वांचें निवारण करून दुर्वासऋषीस ह्मटलें. "साधुजनांनीं सेवन केलेला हा मार्ग नव्हे. विकारवशता सर्ववृत्तींना मलिन करते. उदक व अग्नि हे एकत्र राहूं शकत नाहींत, त्याप्रमाणेंच धर्म व क्रोध यांचीहि गोष्ट आहे. तपश्चर्येचें मूळ क्षमा होय. कोपाधीन राहणारा अंधच समजावयाचा. रोषानें गढूळ झालेल्या वृत्तीस कर्तव्याकर्तव्य कोठून कळणार? शांतीचा स्वीकार केल्याखेरीज हजारों वर्षें तप केलें तरी काय उपयोग?" मग तो सरस्वतीस ह्मणाला, "वत्से सरस्वती! तूं खिन्न होऊं नकोस, ही सावित्री तुजबरोबर मनुष्यलोकीं येऊन तुला करमणूक करील. तेथें पुत्रमुख दृष्टीस पडेपर्यंत तुझें राहणें होईल. मग तूं शापदोषापासून मुक्त होऊन सत्यलोकीं परत येशील." असें बोलून ब्रह्मदेव उठून गेला.

नंतर दुःखित झालेल्या सरस्वतीस पाहून सावित्री ह्मणाली, "गुणी व सज्जन यांचे ठिकाणीं देखील दुर्दैवाचे खेळ चालतात! याकरतां आतां

शोक करूं नकोस. कोणत्या पुण्यप्रदेशाचे ठायीं तुला राहण्यास आवडतें तें सांग, म्हणजे त्या ठिकाणीं आपण जाऊं" ती म्हणाली, "भूलोकाची माहिती तुला आहे, याकरितां, कोणतें स्थान आपल्यास राहण्यास योग्य असेल त्या ठिकाणीं जाण्याचें करूं" मग ब्रह्मदेवास नमस्कार करून व सर्वांस विचारून पुसून ती सावित्रीबरोबर निघाली. आकाशांतून उतरत असतां ज्याच्या तटावर वृक्षादिकांची फारच शोभा आहे व ज्याचा स्वच्छ प्रवाह फारच मनोहर वाहतो आहे अशा 'हिरण्यबाहु' (याला शोण असेंहि म्हणतात) नदास पाहून "हें स्थळ मला आवडतें!" असें सरस्वती म्हणाली. तेव्हां शोणनदाच्या पश्चिमतीरावर उतरून व एक सुंदर लतामंडप पाहून तेथें त्या दोघीजणी राहिल्या. तेथें असतां झाडांचीं फुलें तोडावीं, शोणनदावर स्नान करावें, स्वतः स्थापन केलेल्या वालुकामय शिवलिंगाचें पूजन करावें व कंदमूल फलें भक्षण करून शोणनदाचें मधुर उदक प्राशन करावें, याप्रमाणें त्या कालक्रमणा करीत असत.

एके दिवशीं प्रहरदिवसाचे सुमारास उत्तरदिशेकडून कांहीं गलबला सरस्वतीचे कानीं आला. तेव्हां ती तिकडे पाहूं लागली तों घोड्यांचें खिंकाळणें तिच्या कानीं पडलें व धुळीचा लोटहि तिचे दृष्टीस पडला. तेव्हां ती कौतुकानें तिकडे पाहत उभी राहिली असतां, ज्याच्याबरोबर पायदळ व घोडेस्वार आहेत असा, ज्याच्या दोन्ही बाजूंस दोन सेवक चौऱ्या वारीत आहेत असा, दृष्टीस आनंद देणारा व दुसरा केवल मदनच, असा आठरा वर्षांचा तरुण पुरुष घोड्यावर बसून येत आहे, व त्याचेबरोबर वृद्ध परंतु शरीरानें बळकट व नम्र असा दुसरा एक पुरुष आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. त्याच वेळेस त्या तरुण पुरुषास त्याच्या सेवकांकडून या ठिकाणीं दोन सुंदर कन्या राहतात, असें समजलें. तेव्हां त्यास मोठें कौतुक वाटून तो ज्या ठिकाणीं त्या राहत होत्या, त्या ठिकाणीं जाण्याकरितां घोड्यावरून उतरला व सेवकांस दूर राहण्यास सांगून आपल्याबरोबर त्या वृद्ध मनुष्यास घेऊन फार नम्रतेनें तो त्या ठिकाणीं गेला. तेव्हां त्या दोघींनीं त्यास पल्लवासन बसावयास देऊन त्याचें आदरातिथ्य केलें. मग सावित्री त्या वृद्धपुरुषास म्हणाली—"कुलीन स्त्रियांनीं परपुरुषाची विचारपूस करणें हें मर्यादेस सोडून आहे खरें, तथापि हा दिव्यपुरुष कोण? हें ऐकण्याविषयीं आम्हांस फारच उत्कंठा वाटत आहे!"

तो ह्मणाला, " हा तरुणपुरुष, महामुनि **च्यवन** याचा—**शर्यातिराजाची** कन्या **सुकन्या** इजपासून झालेला—पुत्र होय. हा भृगुवंशाचा तिलक व **च्यवनऋषीचा** जीव कीं प्राण आहे! ह्याचें नांव **दधीच**. **सुकन्या** गरोदर असतां तिचे दिवस भरत आले तेव्हां तिचे बापानें तिला आपले घरीं आणिलें. तेथें ती प्रसूत होऊन तिला हा पुत्र झाला. पुढें कांहीं दिवस गेल्यावर **शर्यातीनें सुकन्येस** आपले पतीचे घरीं पोंहचतें केलें व आपले नातवास परमस्नेहानें आपलेपाशीं ठेवून घेऊन त्यास अनेक विद्यांत प्रवीण केलें. सांप्रत हा तारुण्यांत आल्यामुळें याच्या पितरांस पुत्रसुखाचा अनुभव मिळावा, ह्मणून यास त्यांजकडे पाठविलें आहे ! " नंतर त्यानें आपलीहि थोडी हकीकत सांगितली. तो ह्मणाला " राजा **शर्याति** याचा मी सेवक आहें. माझें नांव **विकुक्षी**. मला राजानें यांच्या (**दधीचाच्या**) सेवेस अर्पिलें आहे. यांस **च्यवनऋषीच्या** आश्रमीं पोहोंचविण्याची मला धन्याची आज्ञा आहे. **च्यवनाचा** आश्रम **शोणनदाच्या** पलीकडे जवळच आहे. " नंतर **विकुक्षीनें सावित्रीस** आपण कोण, कोठून आलां, येथें राहण्याचें प्रयोजन काय ? हें सांगण्याची विनंति केली. परंतु **सावित्रीनें** " आमचा वृत्तांत पुढें कधीं कळून येईल. आपण कांहीं काल येथें घालविण्याचें करावें. सहवासानें स्नेह वाढतो " असें ह्मटलें. मग **दधीच विकुक्षीस** ह्मणाला, " आणखी कधीं त्या सांगण्याची कृपा करतील. ऊठ आतां, पित्याच्या भेटीस जाऊं " मग ते त्यांस विचारून घोड्यावर बसून चालते झाले. त्या दिवसापासून **सरस्वती** व **दधीच** या दोघांचें प्रेम एकमेकांवर जडलें. **सरस्वतीस** तर तो दृष्टीस पडल्यापासून अगदीं चैन पडेनासें झालें. पुढें **विकुक्षी** परत जात असतां त्या ठिकाणीं येऊन त्या दोघींस ह्मणाला, " **दधीचास** तुमचा विसर पडला नाहीं. त्याची स्वतःची अवस्था तुह्मांस कळविण्याकरितां **मालती** नांवाच्या दासीस तो तुह्मांकडे लवकरच पाठविणार आहे " असें सांगून तो गेला. दुसरे दिवशीं **मालती** त्या ठिकाणीं आली.

मग **सावित्री शोणनदावर** स्नानास गेल्यावर तिनें **सरस्वतीस दधीचाची** अवस्था सांगितली. तेव्हां ती ह्मणाली, ' मीं सर्वस्वीं आपले प्राण **दधीचास** अर्पण केले आहेत, यांत काय तें समजावें ! ' मग तिचा हेतु जाणून **मालती** लागलींच **दधीचाकडे** गेली. आणि तिची अवस्था सांगून त्यास तेथें घेऊन आली. ते दोघे एकांतसुख भोगीत असतां कांहीं काळानें

**सरस्वतीस** पुत्र झाला. तेव्हां तिनें त्यास “ सर्व विद्यांचें ज्ञान तुला प्राप्त होईल.’ असा वर दिला. पुढें **ब्रह्मदेवाच्या** आज्ञेप्रमाणें **सरस्वती सावित्री**-सह स्वर्गलोकास गेली. तेव्हां **दधीचास** तिच्या विरहाचें असह्य दुःख होऊन तो अत्यंत विरक्त झाला. नंतर त्यानें आपली भावजय **अक्षमाला** ईस आपल्या मुलाचें पालनपोषण करण्यास सांगून तो तप करण्याकरितां वनांत गेला. ज्या दिवशीं **सरस्वतीस** पुत्र झाला, त्याच दिवशीं **अक्षमाले**-साहि पुत्र झाला. **सरस्वतीच्या** पुत्राचें नांव ‘ **सारस्वत** ’ व **अक्षमालेच्या** पुत्राचें नांव ‘ **वत्स** ’ असें ठेविलें होतें. **अक्षमालेनें** दोघां मुलांचेंहि सम-भावानें लालनपालन केलें. **सारस्वत** यानें **वत्सास** मातेच्या कृपेनें आपणास अवगत झालेल्या सर्व विद्या शिकवून त्यास ‘**प्रीतिकूट**’ या गांवीं ठेवून आपण तप करण्यास गेला. हा **वत्स** पुढें एका मोठ्या वंशाचा आदिपुरुष झाला, व याच **वात्स्यायन** कुलांत **बाण**कवि उत्पन्न झाला. अशी कथा **हर्षचरितांतील** **वात्स्यायनवंशवर्णन** नांवाच्या प्रथमोच्छ्वासांत आहे.

**बाणाचा** निपणजा **कुबेर** हा वेदविद्येंत मोठा प्रवीण होता. **गुप्तवंशां**-तील राजे त्याचा मोठा सन्मान ठेवीत असत. त्याला चार पुत्र होते. त्यांत **पाशुपत** नांवाचा एक पुत्र होता, तो फारच विद्वान् होता. हा **बाणाचा** पणजा होय. याचा पुत्र **अर्थपति**. हाहि मोठा विद्वान् होता. यानें पुष्कळ शिष्य तयार केले व यज्ञयागादि कर्में करून मोठी कीर्ति संपादिली. **अर्थपतीस** **भृगुप्रमुख** अकरा पुत्र होते, त्यांत **चित्रभानु** हा विद्येच्या तेजानें प्रतिसूर्या-सारखा होता. त्याला **बाण** हा पुत्र झाला. **बाणाच्या** आईचें नांव **राज्य-देवी** असें होतें. ती तो लहान असतांच वारली. यामुळें त्याच्या बापास त्याचें संगोपन करावें लागलें. त्याचा बापहि त्याचे वयाचे चवदावे वर्षी वारला. **शोणनदीचे** पश्चिमेस **प्रीतिकूट** या गांवीं **बाणाचें** राहणें असे. **बाण** हा लहानपणीं स्वच्छंदी होता, असें त्याच्या चारित्र्यावरून दिसतें! त्याचे आईबाप लहानपणींच निवर्तले होते यामुळें व पुढें त्याच्या अंगीं विद्या व तारुण्य यांचा प्रादुर्भाव झाल्यामुळें त्याच्या स्वच्छंदवृत्तीस अधिकच उत्तेजन मिळून त्यानें आपल्या आप्तमित्रांसह देशाटन केलें. प्रथम तो मोठमोठ्यांच्या उपहासास पात्र झाला. परंतु पुढें विद्वान् गुरूंच्या सह-वासानें व मोठमोठ्या राजदरबारीं फिरून आल्यानें तो मोठमोठ्या राजांच्याहि सन्मानास पात्र झाला.

11 JAN 1994 ग्रंथालय लो. मं. प. वाचनालय, मं



एके दिवशीं बाण आपल्या आप्तमित्रांसह बसला असतां बाणाचा बांधव चंन्द्रसेन येऊन म्हणाला, ' हर्षराजाचा बंधु कृष्णराज याजकडून दूत आला आहे. ' तो म्हणाला, ' त्याला लवकर घेऊन ये. ' मग दूत दृष्टीस पडतांच बाण त्यास म्हणाला,अकारणबंधु कृष्णराज खुशाल आहेना? त्यानें ' होय ' म्हणून व नमन करून एक पत्र बाणास दिलें. तें पाहतां, ' उशीर न करतां लवकर निघून यावें, इतर गोष्टी मेखलकतोंडीं सांगतां कळून येतील.' असें त्यांत होतें. मग त्यानें सेवकादिकांस दूर करून मेखलकास तोंडीं निरोप विचारला. तो म्हणाला, " स्नेह होण्यास कुल, शील वय इत्यादि पुष्कळ कारणें लागतात. परंतु तुमची माझी भेट नसतांहि तुमचे विषयीं माझे मनांत प्रेम उत्पन्न झालें आहे ! आतां तुमचा उत्कर्ष सहन न करणाऱ्या दुर्जनांनीं महाराजांच्या मनांत भलतेंच भरवून दिलें आहे. तथापि मला सर्व खरें समजलें आहे.ह्मणून राजाजवळ तुमच्या भेटीची गोष्ट काढून लहान वयांत प्रायः सर्वांकडून प्रमाद घडतात असें सांगीतलें. ही गोष्ट महाराजासहि कबूल आहे. हा राजा इतर राजासारखा नाहीं, हा फार थोर व गुणग्राही आहे. याकरितां व्यर्थ घरांत बसून न राहतां लवकर येण्याचें करावें. राजाकडे येण्यास मनांत कांहीं भीति बाळगावयास नको ! " हें ऐकल्यावर बाणानें चंद्रसेनास मेखलकाची भोजनाची वगैरे सर्व व्यवस्था ठेवण्यास सांगितलें. संध्याकाल झाला तेव्हां बाण शोणनदावर संध्या करून आपल्या शय्येवर जाऊन पडला आणि चिंतन करूं लागला. तो ह्मणाला, " राजाचा तर मजविषयीं भलताच ग्रह झाला आहे. अकारणबंधु कृष्णराज यानें तर मला फारच अगत्यानें बोलावलें आहे. तेथें माझा कोणाशीं परिचय नाहीं,व विद्येचें मोटेंसें कौतुकहि नाहीं. तथापि कृष्णरायाच्या लेखास मान देऊन अवश्य जाण्याचें करावें. भगवान् शंकर सर्व यथास्थित करील ! " असें ह्मणून त्यानें जाण्याचा निश्चय केला. मग बाणानें मोठ्या पहाटेसच उठून स्नान-संध्यादि कर्मे केलीं व मंगलकारक सूक्तें ह्मणून व शंकराचें परम भक्तीनें अभिषेकपूर्वक पूजन करून ब्राह्मणांस दानधर्म केला. त्याची आत मालती इनें गमनकालीं ह्याचें प्रयाणमंगल करून बाणास शुभप्रद आशीर्वाद दिले. मग बाण कुलदेवतांनां नमस्कार करून प्रीतिकूट गांवापासून निघाला, तों चंडिकावनाचें आक्रमण करून मल्लकूट या गावीं गेला. तेथें बाणाचा परममित्र जगत्पति यानें त्याचें चांगलें आदरातिथ्य

केलें. दुसरे दिवशीं भागीरथी उतरून तो यष्टिगृहक नांवाच्या गांवीं जाऊन राहिला. मग तेथून मांडलिकराजे हत्ती, घोडे, पायदळ, इत्यादिकांनीं गजबजून गेलेली अशीं अजिरवतीनदीच्या काठीं 'मणितार' नांवाच्या ठिकाणाजवळ हर्षराजाची छावणी होती तेथें तो गेला. नंतर स्नानोपाहारादि कर्में आटोपून मेखलकाबरोबर–हर्षराजाच्या भेटीकरितां आलेल्या मांडलिक राजांचे हत्ती, घोडे, वगैरेंची आणि दुसरी अनेक प्रकारची शोभा व चमत्कार पाहत पाहत तो चालला.

तेथील असंख्य हस्त्यश्वादि प्राणी पाहिल्यावर बाणाच्या मनांत आलें, ब्रह्मदेवानें इतके प्राणी उत्पन्न केले असतां पंचमहाभूतांचा क्षय कसा झाला नाहीं ! या प्रकारें अचंबा करीत तो चालला असतां पुढें राजद्वारापाशीं येतांच द्वारपालांनीं मेखलकास ओळखिलें. मग 'क्षणमात्र आपण येथेंच बसावें' असें बाणास सांगून मेखलक आंत गेला, आणि एका पुरुषासमागमें येऊन ह्मणाला "हा महाराजाचा मुख्य द्वारपाल पारियात्र होय." मग तो पुढें होऊन बाणास नमन करून ह्मणाला—"चला, महाराज संतोषानें आपली भेट घेण्यास तयार आहेत !' तें ऐकून बाणास मोठा आनंद वाटला. मग त्याजबरोबर निघून वाटेनें अश्वशालेंतील सुंदर अश्व पहात पहात चालला असतां पुढें मोठ्या पर्वताएवढा हर्षराजाचा बसावयाचा हत्ती त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां तो द्वारपालास ह्मणाला 'कांहीं प्रतिबंध नसल्यास हा गजेंद्र पाहण्याचें मला मोठें कौतुक वाटतें आहे !' 'पाहण्यास काय प्रतिबंध आहे ?' असें ह्मणून द्वारपालानें त्यास तो गजेंद्र दाखविला. बाणानें बराच वेळ त्याची मौज पाहिल्यावर द्वारपाल बाणास ह्मणाला, 'आणाखी कधीं हा गजेंद्र फिरून पाहतां येईल, आतां अगोदर महाराजांच्या भेटीस चलावें.' मग बाण तेथून निघून ज्याठिकाणीं हर्षराजा इतर राजपुत्रांसह बसला होता त्या ठिकाणीं गेला. हर्षास पाहिल्यावर बाणास मोठा आनंद झाला. तेव्हां बाणकवि आल्याचें द्वारपालानें राजास कळविलें. बाणानेंहि राजास आशीर्वाद केला. प्रथमतः हर्षानें त्याजविषयीं आपली अनादरबुद्धि दाखविल्यासारखें केलें. तेव्हां बाण राजाकडे पाहून धैर्यानें ह्मणाला? 'दुसऱ्याच्या सांगण्यावरून अज्ञान्याप्रमाणें मजविषयीं भलतीच शंका धरूं नये. प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावा' इत्यादि त्याचें भाषण ऐकल्यावर हर्षराजानें प्रसन्नतेचेंच चिन्ह दाखवून सूर्यास्ताची वेळ झाली ह्मणून तो उठून गेला.

तेव्हां **बाण**हि आपल्या बिऱ्हाडीं गेला. तो आपल्या मनांत ह्मणाला, **हर्ष**-राजा उदार स्वभावाचा खरा ! जरी लोकांच्या सांगण्यावरून त्याचा मज-विषयीं वाईट ग्रह झाला होता, तथापि सांप्रत त्याचें मजवर प्रेम दिसून आलें. धिक्कार असो मला कीं, मीं असल्या गुणवान् व दयाळू राजाविषयीं भलतीच कल्पना मनांत आणली होती ! तर आतां राजास माझी पूर्ण योग्यता कळून येईल असें मी करीन. पुढें लवकरच राजास **बाण**कवीची योग्यता कळून येऊन त्यानें त्याचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य केलें व द्रव्या-दिक देऊन मोठा सन्मान केला.

**बाण**कवि हा कांहीं दिवस **हर्ष**राजाजवळ राहिला. पुढें शरदृतूचे दिवस आले तेव्हां तो आपले आप्तमित्रांस भेटण्याकरितां आपले गांवीं गेला. **हर्ष**राजानें **बाणा**चा मोठा सन्मान केल्यामुळें त्याच्या आप्तांस त्याची फार धन्यता वाटून ते त्यास प्रेमानें भेटले. **बाणा**नें गुरुजनांस वंदन करून सर्वांस कुशल विचारलें. परस्परांच्या भेटी व भाषणें झाल्यावर दोन प्रहरीं ते सर्व भोजना-करितां उठून गेले. भोजनानंतर कांहीं वेळानें सर्व आप्तमंडळी त्याच्या सभों-वती येऊन बसली. पुढें पुस्तक वाचणारा **सुदृष्टि** हा पुराण वाचण्याकरितां त्या ठिकाणीं व्यासपीठावर येऊन बसला, व तंतुवाद्यें वाजविणारे **मधुकर** व **पारावत** हेहि सुस्वर वाद्यें वाजविण्याकरितां तेथें येऊन बसले. मग मधुर गायनयुक्त **वायुपुराण** झाल्यावर **हर्ष**राजाचें चरित्र ऐकण्याची उत्कंठा अस-ल्यामुळें **बाणा**च्या चुलतबंधूंनीं सर्वांत धाकटा व **बाणा**चा अत्यंत प्रिय अशा **श्यामल**ास खूण केली ! तेव्हां तो नम्रतेनें **बाणा**स ह्मणाला, ' **पुरूरवा, नहूष, ययाति** इत्यादि राजांहूनहि अधिक अशा **हर्ष**राजाचें चरित्र आह्मांस सांगण्याची कृपा करावी.' 'तेव्हां **हर्ष**चरित्र फार मोठें आहे ! तें सर्व सांगण्यास कोण समर्थ आहे ? तथापि सांगतां येईल तितकें सांगेन. ' असें ह्मणून संध्याकाळची वेळ झाल्यामुळें **बाण** **शोण**नदावर संध्या कराव-यास गेला. दुसरे दिवशीं प्रातःकालीं स्नानसंध्यादि कर्में अटोपल्यावर **बाण** बसला असतां त्याचे आप्तमित्र त्याचेजवळ येऊन बसले. **बाणा**नें त्यांचा अभिप्राय जाणून **हर्षचरित** सांगण्यास आरंभ केला.

तो ह्मणाला,—सर्व समृद्धीनें पूर्ण असा **श्रीकंठ**नांवाचा देश आहे, त्यांत **स्थाण्वीश्वर** नांवाचा प्रदेश आहे. त्या ठिकाणीं सर्व गुणांनीं संपूर्ण असा **पुष्पभूति** नांवाचा राजा होऊन गेला. तो मोठा शिवभक्त असे. सर्व

मांडलिक राजे त्याला करभार देऊन त्याच्या सेवेंत तत्पर असत. त्याचे प्रधान व आप्तमित्र हे सर्व त्याचे आज्ञेंत असत. तो मुलाप्रमाणें सर्वप्रजेचें पालन करून सर्वांनां आनंद देत असे.

यात्रमाणें तो राजा राज्य करीत असतां एकदां महाशैव असा **भैरवाचार्य** नांवाचा सिद्ध पुरुष आपले राज्यांत आला आहे असें त्यानें ऐकिलें. तेंव्हांपासून त्याचें दर्शन केंव्हां होईल असें राजास झालें होतें. एके दिवशीं सायंकाळचे वेळेस एक द्वारपालिका येऊन राजास ह्मणाली, " महाराज एक भिक्षु बाहेर आला आहे आणि **भैरवाचार्यां**च्या आज्ञेवरून मी भेटीकरितां आलों आहे. " असें सांगतो आहे. मग राजाची आज्ञा होतांच ती त्यास घेऊन आली. राजानें त्या भिक्षूचा आदरसत्कार करून त्यास आसनाव र बसविलें व ' **भैरवाचार्य** कोठें आहेत ' ह्मणून विचारलें. तो म्हणाला, " **सरस्वती**नदीच्या काठच्या अरण्यांत ते एका देवालयांत आहेत. त्यांनीं राजास शुभ आशीर्वाद सांगितले आहेत. " असें बोलून झोळींतून पांच रुप्याचीं कमळें काढून प्रसाद म्हणून राजास दिलीं. राजानें ' गुरूंचा हा मजवर मोठ च अनुग्रह झाला. ' असें ह्मणून तीं परमभक्तीनें ग्रहण केलीं. नंतर ' उद्यां मी गुरूंच्या दर्शनास येईन ' इत्यादि भाषण करून त्यास निरोप दिला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं आपलेबरोबर थोडे लोक घेऊन राजा **भैरवाचार्यां**च्या दर्शनास गेला. मग घोड्यावरून उतरून तो नम्रपणानें शिष्यानें दाखविलेल्या बिल्ववाटिकेंत गेला. त्याठिकाणीं भिक्षुसमुदायाच्या मध्यभागीं सारविलेल्या स्वच्छ भूमीवर व्याघ्राजिनावर बसलेले, भस्म व रुद्राक्षमाला ज्यांनीं धारण केल्या आहेत असे, महातेजस्वी **भैरवाचार्य** त्याच्या दृष्टीस पडले. राजानें नम्रतेनें जवळ जाऊन नमस्कार केल्यावर **भैरवाचार्यां**नीं त्यास आशीर्वाद देऊन व आदरातिथ्य करून बसावयास सांगितलें. मग उभयतांचें कांहीं वेळ भाषण होऊन राजा आपले घरीं गेला. दुसरे दिवशीं **भैरवाचार्य** राजाच्या भेटीस गेले. तेंव्हां राजानें मोठ्या गौरवानें त्यांचा सत्कार व पूजन केलें आणि " हा देह व सर्व राज्यलक्ष्मी या चरणांस अर्पण केली आहे " असें ह्मटलें. ते ह्मणाले, "राजा, हें वैभव कोणीकडे व अरण्यांत वाढलेले आह्मीं कोणीकडे? तुझ्यासारखेच या वैभवास योग्य आहेत. असो, आमच्या आज्ञेनें तूंच राज्य चालवावें. याप्रमाणें कांहीं वेळ भाषण करून राजास पांच रौप्यकमळें प्रसाद ह्मणून अर्पण करून

ते गेले. पुढें एके दिवशीं भैरवाचार्यांचा शिष्य येऊन कांहीं वेळ भाषण करून ह्मणाला, आचार्यांनीं सांगितलें आहे कीं, “ आमचा शिष्य पातालस्वामी यानें ब्रह्मराक्षसाचा पराभव करून त्याचा ‘अट्टहास’ नामक खड्ग हरण केला आहे; तो तुझ्या हातांत राहण्यास योग्य आहे ह्मणून तुजकडे पाठविला आहे. तर त्याचें ग्रहण करावें. राजा ह्मणाला दुसऱ्याची वस्तु ग्रहण करावयाची नाहीं, असा माझा निश्चय तर खराच, तथापि गुरूची आज्ञा मला अमान्य करतां येत नाहीं. ” मग राजास आशीर्वाद देऊन तो परत गेला. तो खड्ग पाहतांच सर्व पृथ्वीचें राज्य हस्तगत झाल्यासारखें राजास वाटलें !

पुढें कांहीं दिवस गेल्यावर भैरवाचार्य राजाकडे येऊन ह्मणाले “कल्पोक्त महाकालनामक मंत्राचा कोटि जप करून मीं साधन केलें आहे. त्याची समाप्ति करणें मात्र साहाय्यावांचून राहिलें आहे. टिट्टिभनामक यति, पातालस्वामी व कर्णतालनामक द्रविड, असे तिघे माझे शिष्य मला साहाय्य करण्यास सिद्ध आहेत. आणखी एकाचें साहाय्य पाहिजे आहे, याकरितां तें तूं केलेंस तर कार्यसिद्धि होईल. ” राजा ह्मणाला, “ फार बरें आहे ! आपण मजकडून सेवा करून घेण्याचा प्रसंग आणला हा मजवर मोठाच अनुग्रह केला. फार चांगली गोष्ट झाली. मी आपल्या सेवेस सिद्ध आहें ! ” राजाच्या भाषणानें भैरवाचार्यांस मोठा आनंद झाला. मग ते ह्मणाले “ कृष्णपक्षांतील चतुर्दशीच्या रात्रीं स्मशानांतील शून्य देवालयांत शस्त्रयुक्त होऊन तूं आमच्या साहाय्यास यावें. ” असें ह्मणून ते गेले. पुढें तो दिवस आला तेव्हां राजानें शैवदीक्षा धारण करून त्या खड्गाचें पूजन केलें आणि रात्रीं कोणास न कळूं देतां तो स्मशानांत गेला. त्या ठिकाणीं गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें तिघेजण तयार असलेले राजाच्या दृष्टीस पडले. राजानें त्यांस नांवें विचारल्यावर त्यांनीं आपापलीं नांवें सांगितलीं. मग ते ज्या ठिकाणीं भैरवाचार्य साधन करीत होते त्या ठिकाणीं गेले आणि संकेताप्रमाणें पूर्वदिशेकडे पातालस्वामी, उत्तरेकडे कर्णताल, पश्चिमेकडे टिट्टिभ व दक्षिणेकडे राजा; याप्रमाणें सज्ज होऊन ते उभे राहिले. कांहीं वेळानें त्या ठिकाणीं भयंकर आरोळ्या, एकाएकीं ज्वाला होणें, वगैरे प्रकार होऊं लागले. दोन प्रहर रात्रीं एकाएकीं मोठा आवाज होऊन पृथ्वी दुभंग झाली व तींतून एक मोठा काळपुरुष बाहेर पडला आणि तो सर्वांचा

तिरस्कार करून हसून ह्मणाला, "अरे विद्याधरीचें साधन करणाऱ्या, काय हा विद्येचा तुला गर्व ! व काय तुला साहाय्याचा अभिमान ! अरे मला बळी दिल्याखेरीज तूं कर्म करीत आहेस, तर तें तुझें कोठून सिद्धीस जाणार ! ह्या क्षेत्राचा स्वामी मी श्रीकंठनांवाचा नाग आहें. माझ्या नांवानेंच हा देश प्रसिद्ध आहे, माझी इतकी शक्ति आहे कीं, मी ग्रहांचीदेखील गति कुंठित करीन. मग दुसरें तर काय ? हा बिचारा राजाहि तुमच्याकरितां मृत्युमुखीं पडण्यास आला आहे ! तर आतां मूर्ख राजासह सर्वजण आपल्या धाडसाचें फळ भोगा !" असें बोलून त्यानें हस्तप्रहारानें तिघाजणांस खालीं पाडलें. तेव्हां राजा त्यास ह्मणाला, 'अरे काका, हातांत शस्त्र घेऊन युद्धास उभा रहा. तुझ्या हातांत शस्त्र नसल्यामुळें माझा हात तुजवर चालत नाहीं.' तो ह्मणाला, 'हः शस्त्र काय करायाचें आहे ? चल ये, हातांनींच तुझा चुराडा करून टाकतों ?' असें बोलून त्यानें मोठ्यानें दंड थोपटून दिशा दणाणून दिल्या ! तेव्हां राजाहि खड्ग टाकून देऊन बाहुयुद्धास उभा राहिला. मग दोघांचें फारच भयंकर युद्ध झालें. दोघेहि रक्तानें न्हाल्यासारखे झाले. शेवटीं राजानें त्या नागास पाडून त्याचा पराभव केला. इतक्यांत एकाएकीं चंद्रिकेसारखें तेज पडलें व त्यामध्यें एक अपूर्व स्त्री राजाच्या दृष्टीस पडली ! मग तो तीस ह्मणाला, 'तूं कोण आहेस ?' ती ह्मणाली, 'मी साक्षात् लक्ष्मी आहें. तुझें विलक्षण शौर्य पाहून मी प्रसन्न झालें आहें, याकरितां वर माग ' तो ह्मणाला, 'मला कांहीं नको, माझ्या गुरूला साधनाची सिद्धि मिळावी ह्मणजे झालें ' तें ऐकून ती ह्मणाली, 'राजा ! तूं मोठा थोर आहेस, तुझें कल्याण होईल. व तुझ्या वंशांत थोर पुरुष उत्पन्न होतील.' इतकें बोलून ती गुप्त झाली. इकडे भैरवाचार्यास सिद्धि मिळाली. ते विमानांत बसून व राजास आशीर्वाद देऊन स्वर्गलोकीं गेले. श्रीकंठनागहि राजाच्या पराक्रमानें लज्जित होऊन त्यास शरण गेला. तेव्हां राजानें त्यास आश्वासन देऊन स्वस्थानीं जाण्यास सांगितलें. नंतर राजा त्या तिघां गुरुबंधूंस बरोबर घेऊन आपल्या राजधानीस गेला. त्यानें त्याचा चांगला सत्कार करून त्यास आपले घरीं ठेवून घेतलें. कांहीं दिवस गेल्यावर टिट्टिभ तप करण्याकरितां वनांत गेला. पातालस्वामी व कर्णताल हे राजाच्या शौर्यानें संतुष्ट होऊन त्याजबरोबर शौर्याचीं कृत्यें करीत व राजलक्ष्मीचा उपभोग घेत आनंदांत राहिले.

पुढें पुष्पभूतिराजापसून पुष्कळ प्रसिद्ध राजे त्या वंशांत उत्पन्न झाले. त्या सर्वांत प्रतापशाली असा **प्रभाकरवर्द्धन** राजा झाला. त्या राजाची **यशोवती** नांवाची राणी होती. राजा मोठा सूर्यभक्त होता. तो संततीकरितां अर्घ्यप्रदान व **आदित्यहृदय** स्तोत्राचा नेहमीं जप करीत असे. कांहीं काळ गेल्यावर ग्रीष्मऋतूचे रात्रीं राजा व राणी चंद्रिकेनें रमणीय व शीतल अशा गच्चीवर निजलीं असतां, एके दिवशीं पहाटेच्या वेळेस राणी दचकून " महाराज माझें रक्षण करा ! " असें ह्मणत उठली, तें ऐकून राजा गडबडीनें उठला व ' देवी, भीऊं नकोस ! हा मी तुझ्या जवळच आहें. ' असें ह्मणून खड्ग उपसून चहूंकडे पाहूं लागला तों भयाचें कांहींएक कारण दिसलें नाहीं. मग तो राणीस विचारूं लागला असतां ती ह्मणाली, 'मला असें स्वप्न पडलें कीं, एक कन्येसह दोन महातेजस्वी कुमार वस्त्रालंकारांनीं व शस्त्रास्त्रांनीं युक्त असे माझ्या उदरांत शिरले, व त्यामुळें मी ओरडलें ' राजा ह्मणाला, " प्रिये आनंदाच्या वेळेस तूं उगीच भ्यालीस. भगवान् **सूर्यनारायण** आपल्यावर प्रसन्न झाला. त्याच्या कृपेनें आपल्यास तीन अपत्यांचा लाभ होणार, हें खचीत समज. तें ऐकून **यशोवती**च्या आनंदास पारावार नाहींसा झाला. पुढें लवकरच कांहीं कालाच्या अंतरानें त्यांस दोन पुत्र व एक कन्या अशीं तीन अपत्यें झालीं. त्यांनीं वडील पुत्राचें **राज्यवर्धन**, व धाकट्याचें **हर्ष**, आणि कन्येचें **राज्यश्री**, अशीं नांवें ठेवलीं. पुत्रजन्मकालीं राजानें मोठाले उत्सव करून पुष्कळ दानधर्म केला. पुढें राजपुत्र अमळ मोठे झाले, तेव्हां त्यांजबरोबर राहण्याकरितां देवी **यशोवती**च्या भावानें आपला बुद्धिमान् भंडी नांवाचा मुलगा आणून ठेवला. त्याजवरहि राजानें आपल्या पुत्रप्रमाणेंच प्रेम ठेवलें. नंतर त्या तिघांकडूनहि राजानें धनुर्वेदादिकांचा अभ्यास करविला. पुढें ते तिघे तारुण्यांत येऊन मोठे पराक्रम करण्यासारखे झाले.

एके दिवशीं भोजनानंतर राजानें दोघां पुत्रांस जवळ बोलावून ह्मटलें, ' राजाला चांगलें सेवक मिळणें फार कठिण आहे. वाईट लोक मनोरंजन करून राजास फसवितात ! व त्यामुळें सर्वस्वीं नाश होतो. याकरितां तुमच्या सेवेकरितां व सहवासाकरितां **मालव**राजाचे पुत्र दोघे बंधू **कुमारगुप्त** व **माधवगुप्त** यांची योजना केली आहे. ते कुलीन, पापभीरु व पराक्रमी आहेत. त्यांची परीक्षा मीं पुष्कळ वेळां पाहिली आहे. तर त्यांस हे आपलेच आहेत असें समजा. '

असें बोलून राजानें सेवकांकडून त्या दोघांस बोलावून आणिलें व त्यांस पुत्रांच्या बरोबर राहण्यास सांगितलें. राज्यवर्धन व हर्ष यांनीहि पित्याची आज्ञा शिरसा मान्य केली.

राज्यश्री ही नृत्यगीतादि सकलकलांमध्यें प्रवीण झाली. एके दिवशीं राजा आपल्या वाड्याच्या खिडकींत बसला असतां एका पुरुषानें ह्मटलेली आर्या त्यानें ऐकिली. तींतील तात्पर्य असें होतें कीं, " कन्या तरुण झाली असतां, नदी जशी तटास, तशी ती पित्याच्या अंतःकरणास पीडा करते !" हें ऐकल्यावर राजानें सेवकास दूर जावयास सांगून तो राणीस ह्मणाला, " आपली कन्या तरुण झाली आहे, यामुळें मला मोठी काळजी वाटत आहे ! याकरितां पुष्कळ राजांच्या मागण्या जरी आल्या आहेत, तरी कुलशीलाचा विचार केला असतां थोर ' मौखरी ' कुलांतील अवंतीवर्म्याचा थोरला पुत्र ग्रहवर्मा याला ती द्यावी, असें मीं मनांत आणिलें आहे ! याकरितां तुझ्या मनास कसें काय येतें ! ती ह्मणाली, मुलांनां वाढविण्यासवरण्याचें काम बायकांकडे असतें.परंतु मुलगी देण्याचा विचार करणें हें पुरुषांकडे आहे ! माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं,यावज्जीव आपल्याला तिची काळजी नसावी,असें सुस्थळ असावें." मग राजानें आपल्या दोघां पुत्रांस बोलावून त्यांसहि आपला विचार कळविला. नंतर सुमुहूर्त पाहून आप्तमित्रांसह ग्रहवर्म्यास समारंभानें आणून राजानें आपल्या कन्येचा विवाह मोठ्या थाटानें केला. नंतर राजा व राणी यांनीं आपले जावयास कांहीं दिवस आग्रहानें आपले घरीं राहून घेतलें. श्वशुरगृहीं असतां ग्रहवर्म्याचा काळ फारच आनंदांत गेला ! नंतर कांहीं दिवसांनीं ग्रहवर्मा राज्यश्रीस बरोबर घेऊन आपल्या राजधानीस ( कनोज येथें ) गेला.

पुढें कांहीं दिवसांनीं प्रभाकरवर्द्धन यानें आपला वडील पुत्र राज्यवर्द्धन यास बोलावून आणून त्यास उत्तरेकडील हूणलोकांवर स्वारी करण्यास सांगितलें. व त्याजबरोबर प्रधान, मांडलिक राजे आणि सैन्य देऊन त्यास शत्रूवर पाठविलें. आपले भावाबरोबर हर्षहि कांहीं मुक्कामांपर्यंत त्यास पोहचविण्यास गेला. पुढें हिमालयपर्वत आला तेव्हां अनेक प्रकारचे वन्य पशु पाहून, हें स्थान मृगया करण्यास फारच रमणीय आहे असें हर्षास वाटून, त्यानें तेथें मुक्काम करून कांहीं काळ मृगया करण्यांत घालविला. राज्यवर्धन हा शत्रूचा पराभव करण्याकरितां पुढें गेला. एके रात्रीं पहाटेच्या प्रहरीं हर्षानें स्वप्नांत असें

पाहिलें कीं, भोंवतालच्या अरण्यास वणवा लागला आहे व त्यांत एक सिंह दग्ध होत आहे! हें पाहून सिंहीनें आपलीं मुलें टाकून वणव्यांत उडी टाकली! तें पाहून हर्षाच्या मनांत आलें, स्नेहपाश किती बळकट असतात पहा! व त्यामुळें पशु देखील आपल्या जिवाकडे पहात नाहींत! मग तो जागा झाल्यावरहि कांहीं अपशकून त्याचे दृष्टीस पडले. त्यामुळें त्याचे अंतःकरणांत चिंता उत्पन्न झाली.

दोनप्रहरच्या वेळेस तो चिंताक्रांत बसला असतां,घाईघाईनें येत असलेला, उन्हामुळें व चिंतेमुळें काळा ठिक्कर पडलेला,श्रमामुळें धापा टाकीत येत असलेला कुरंगकनांवाचा सेवक त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें धावत येऊन व प्रणाम करून हर्षापुढें एक पत्र टाकलें, तें वाचून हर्ष घाबरून ह्मणाला, "कुरंगका, ताताच्या प्रकृतीस असें काय झालें आहे?" तो दुःखाचा सुस्कारा टाकून ह्मणाला, "महाराजांनां विषमज्वर झाला आहे, असें ह्मणतात." तें ऐकतांच हर्षाचे पोटांत धस्स झालें. मग पित्यास आराम पडावा, ह्मणून पुष्कळ दानधर्म करून भोजन न करतां तसाच तो घोड्यावर बसून त्यास भरधाव फेकीत चालता झाला. त्याच्या बरोबरचे सेवकहि पाठीमागून गडबडीनें धावत गेले. मग कोठेंहि विसावा न घेतां तो घोडा फेकीत चालला असतां संध्याकाळ झाला तेव्हां भंडीप्रमुख सरदारांनीं आहार करण्याकरितां विनंति केली तरी कांहीं एक न खातां तसाच सर्व रात्रभर चालून तो दुसरे दिवशीं दोनप्रहरीं आपले राजधानीस (स्थानेश्वर येथें) येऊन पोहचला. त्याठिकाणीं त्याला सर्व उत्साहरहित दिसलें! राजवाड्यापाशीं येऊन तो घोड्यावरून उतरला व आंत शिरला, तों त्यास सुषेणनांवाचा वैद्य भेटला. तेव्हां हर्षानें त्यास विचारलें "ताताच्या प्रकृतीस कांहीं आराम आहे काय?" तो ह्मणाला "अद्याप कांहीं नाहीं, आपली भेट झाल्यावर कांहीं आराम पडला तर पडेल!" मग राजवाड्यांत गेल्यावर पित्यास आराम पडावा ह्मणून ज्याठिकाणीं जप, होम, देवपूजन औषधक्रिया, वगैरे प्रकार चालले होते त्या ठिकाणाकडून जेथें आपला पिता विव्हळत पडला होता,त्या ठिकाणीं तो गेला. पित्याची अवस्था पाहून हर्षाचें धैर्य अगदीं खचून गेलें. आपला प्रियपुत्र आल्याचें राजास कळतांच तो " 'ये' 'ये' बाळा!" असें ह्मणून त्यास दृढालिंगन करण्यास उत्कंठित झाला. हर्षानें परम नम्रतेनें पित्यास व मातेस नमस्कार करून तो त्यांच्या जवळ जाऊन बसला. मग पापणीस पापणी न

21 MAR 1990

लावतां पुष्कळ वेळ **हर्षास** पाहून व त्याच्या अंगावर हात फिरवून राजा ह्मणाला, " बाळा ! तूं इतका कृश कशानें झालास ? " तेव्हां **भंडी** जवळ होता तो ह्मणाला: " महाराज, आपल्या प्रकृतीचें वर्तमान समजल्यापासून त्यांनीं अन्नग्रहण देखील केलें नाहीं ! " राजा ह्मणाला, " बाळा ! तूं पितृभक्त आहेस ! तुझ्यासारखे पुरुष जगामध्यें फारच थोडे ! तुजवर माझे पंचप्राण अवलंबून आहेत, याकरितां तूं लवकरच जेव, ह्मणजे मीहि पथ्याचें घेईन. " असें पित्याचें ममतेचें भाषण ऐकतांच **हर्षास** फारच गहिंवर आला. नंतर तो पित्याच्या आग्रहावरून उपहार करण्यास गेला. त्यानें थोडेंसें अन्न ग्रहण केलें, परंतु त्यास चैन पडेना. मग त्यानें सर्व वैद्यांस बोलावून आणून पित्याच्या प्रकृतीविषयीं विचारलें. तेव्हां ते धैर्य देऊन ह्मणाले " आपण अगदीं धैर्य सोडूं नका. कांहीं दिवस गेले ह्मणजे महाराजांनां आराम पडेल!" त्यांतच राजपुत्राबरोबर वाढलेला व वैद्यशास्त्रांत निष्णात झालेला **रसायन** नांवाचा वैद्यपुत्र होता, तो तोंड खालीं घालून बसलेला होता. त्यास पाहून **हर्ष** ह्मणाला, ' **रसायना,** तुला तातांच्या प्रकृतीचें मान कसें दिसतें ' तो ह्मणाला ' उद्यां सकाळीं मी काय तें सांगेन! '

इकडे राजा सर्व रात्रभर ज्वरदाहानें तळमळत पडला होता. **रसायन** व इतर वैद्य यांनीं आपलेकडून पुष्कळ उपाय केले, परंतु त्याचा दाह कमी झाला नाहीं. पित्याची अवस्था पाहून **हर्षास** फारच वाईट वाटलें व ती रात्र त्यानें मोठ्या दुःखानें घालविली. प्रातःकाल होतांच त्यानें आपल्या भावाकडे सांडणी स्वार पाठविले. इतक्यांत ' **रसायन** ! " **रसायन** ! ' असें चहूंकडे लोक ओरडूं लागले ! तेव्हां शोधाअंतीं **हर्षास** असें कळून आलें कीं, ज्यानें मुलाप्रमाणें आपलें पालन केलें व ज्याच्या अन्नावर आपला देह वाढला त्याचा प्राण चालला असतां आपला कांहींच उपयोग झाला नाहीं, असें वाटून त्यानें अग्नींत प्रवेश केला ! तेव्हां **हर्षास** अतिशयच दुःख वाटलें. तो ह्मणाला, "मज हतभाग्यासारखा **रसायन** हा पित्याचें दुःख पाहण्यास राहिला नाहीं! धन्य त्याची! बरें पण मला तरी वांचून काय करायाचें आहे ? अद्यापि हें हृदय फुटून त्याचे तुकडे कसे होत नाहींत ?" असें बोलून तो अत्यंत शोक करूं लागला ! तेव्हां जवळचे लोकहि त्याबरोबर शोक करूं लागले. इतक्यांत देवी **यशोवती** ही पतीच्या अगोदरच परलोकास जाण्यास सिद्ध झाली, ह्मणून चहूंकडून मोठा आक्रोश ऐकूं आला! तेव्हां

तर हर्षाचें दुःख अगदीं अनावर झालें. मग तो ज्या ठिकाणीं आपली आई होती, त्या ठिकाणीं गेला व तिचे पायांवर मस्तक ठेवून ह्मणाला, आई, तूंहि मला हतभाग्याला सोडून कशी चाललीस! तर असें करूं नकोस! प्रसन्न हो व मजवर दया कर ! तें ऐकून यशोवतीस फारच अवघड वाटलें आणि तीस आपल्या वडील पुत्राची व सासरीं गेलेल्या कन्येची आठवण होऊन तिनें पुष्कळ शोक केला. मग तिनें हर्षास जवळ घेऊन त्याचे डोळे पुसले व कष्टानें दुःखाचा वेग दाबून ती त्यास ह्मणाली, ‘ बाळा, हर्षा, तूं यावेळीं मला आड येऊं नकोस ! तुझा पिता परलोकीं गेल्यावर माझी मागें राहण्याची काय शोभा बरें ! याकरितां मी अविधवा असतांनाच परलोकीं जातें, वीरकन्या, वीरपत्नी, वीरमाता मी असतां मला मरणाचें भय कसचें ? याकरितां बाळा मला विघ्न करूं नकोस !’ अशा तिच्या भाषणानें हर्ष अगदीं घाबरून गेला. त्यास कांहीं सुचेनासें झालें व तो खालीं मान घालून बसला. मग यशोवतीनें पुत्रास आलिंगन करून व त्याच्या मस्तकाचें अवघ्राण करून ती अंतःपुरांत गेली. व तिनें आपल्या अलंकारादिकांचा दानधर्म केला. तेथून ती सरस्वतीनदीवर गेली. तेथें गेल्यावर तिनें अग्नि प्रज्वलित करून व त्याचें पूजन करून त्यांत प्रवेश केला !

मातृमरणानें हर्षास अतिशय दुःख झालें, तें किती ह्मणून सांगावें ! मग तो तसाच दुःख आवरून आपल्या पित्याजवळ जाऊन बसला. पित्याची फारच कठिण अवस्था पाहून हर्षास दुःख आवरेनासें झालें व तो मोठ्यानें रडत बसला. नंतर कांहीं वेळानें राजा शुद्धीवर येऊन हर्षास ह्मणाला, “ बाळा तुझ्यासारख्या धीरांनीं प्रसंगास सादर असलें पाहिजे ! धैर्य धर, राज्यलक्ष्मीचा उपभोग घे, शौर्याचीं कृत्यें कर, इहलोकच्या व परलोकच्या अशा सुखाचीं साधनें कर. असें धैर्य सोडूं नकोस.” इतकें बोलून राजानें डोळे मिटले ते पुनः उघडले नाहींत ! तेव्हां राजवाड्यांत जिकडे तिकडे एकसारखा आक्रोश चालू होता तो अधिकच वाढला. नंतर शवशिबिका आणून तिजवर राजाचें प्रेत घातलें. मग हर्ष, मांडलिक राजे, आप्त, मित्र प्रधान व इतर लोक यांसह शवशिबिकेबरोबर सरस्वती नदीवर गेला व त्यानें पित्याच्या कलेवराचें यथाविधि दहन केलें आणि सर्व क्रिया यथाशास्त्र केल्या. पुढें हर्षाचा बराच काळ अत्यंत दुःखांत गेला. त्याच्या पदरचे पंडित, पुरा-

णिक व इतर सज्जन यांनीं आपल्याकडून ग्रंथांतील व इतिहासांतील गोष्टी सांगून हर्षाचा शोक कमी होण्याविषयीं आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला.

पुढें राज्यवर्धन परत घरीं आला, तेव्हां दोघां भावांनीं मातापित्यां-विषयीं फारच शोक केला. मग राज्यवर्धन दुःखावेशानें हर्षास ह्मणाला, " बाबा हर्षा ! तूं लहानपणापासूनच आपल्या सद्गुणांनीं सर्वांचें अंतःकरण हरण केलें आहेस, याकरतां तूंच सिंहासनावर बसून राज्य चालीव. मी तर अरण्यांत राहून व पवित्र तीर्थोदकांचीं स्नानें करून काळ घालविणार ! याकरतां मला आतां या शस्त्रास्त्रांचा संबंध नको ! " असें ह्मणून त्यानें आपले हातांतील खड्ग टाकून दिला ! तें पाहून शूलप्रहारानें विदीर्णहृदय झाल्यासारखें हर्षास झालें व त्याच्या मनांत अनेक कल्पना उभ्या राहिल्या! तो ह्मणाला, " कोणीं दुष्टानें माझ्या भावाच्या मनांत भलतेंच भरवून दिलें कीं काय कोण जाणे ! किंवा माझी परीक्षा पाहण्याकरतां तर तो असें करीत नसेलना ? किंवा माझ्या तोंडांतून भलताच शब्द तर निघाला नसेल ना ? अथवा सर्व वंशाचा नाश करण्याकरितां तर दुर्दैवानें हा खेळ मांडला नसेल ना ? किंवा ताताच्या अभावामुळें निर्भय झालेल्या कलिकालाची तर ही क्रीडा नसेलना ? याप्रमाणें एकामागून एक अनेक कल्पना त्याच्या मनांत आल्या. मग त्यानें असा निश्चय केला कीं, प्रियबंधु जर सर्व सोडून वनांत जात आहे तर मला तरी येथें राहून काय करावयाचें आहे ? " असें ह्मणून तो खालीं तोंड घालून बसला.

मग आज्ञेप्रमाणें सेवकांनीं मोठ्या दुःखानें वल्कलें आणून राज्यवर्धना-पुढें ठेविलीं, तेव्हां आप्त, मित्र, स्त्रिया व सेवक यांनीं रडून आक्रांत केला व सर्व लोक त्याजबरोबर अरण्यांत जावयास सिद्ध झाले !

इतक्यांत शोकानें विव्हल झालेला राज्यश्रीच्या जवळ असणारा संवादक नामक सेवक सभेंत आला व आपलें अंग भूमीवर टाकून देऊन मोठ्यानें आक्रोश करूं लागला. तें पाहून राज्यवर्धन व हर्ष दोघेहि घाबरे झाले व त्याचे जवळ जाऊन ह्मणाले: " अरे सांग लवकर सांग. पितृमरणानें निर्भय झालेलं दुर्दैव आम्हांस अधिकाधिक दुःख देण्यास जसें पाठीस लागलें आहेसें दिसतें ! " मग संवादक मोठ्यानें रडत सांगूं लागला. " महाराज वारल्याचें वर्तमान समजतांच दुष्ट मालवराजानें ग्रहवर्म्यास मारिलें, आणि राजपुत्री राज्यश्री इच्या पायांत बिड्या घालून कान्यकुब्ज ( कनोज )

 2 SEP 1996

येथें तीस बंदिशाळेंत टाकलें ! या आपल्या देशावर स्वारी करण्याचाहि त्याचा विचार आहे ! "

हें ऐकतांच **राज्यवर्धनास** ती गोष्ट सहन झाली नाहीं व असा आपला कधींच अपमान झाला नाहीं ह्मणून त्यास फार राग आला व त्याच्या अंगांत शौर्याचा आवेश चढून त्यानें पुनः हातांत खड्ग घेतला ! मग तो आपल्या प्रियबंधूस ह्मणाला, " **हर्षा** ! आपलें कुल, आप्तमित्र व सेवक या सर्वांस तूं संभाळ. दुष्ट **मालवराजाचा** नाश करण्याकरितां मी हा असाच निघालों. दुष्टांचा समूळ उच्छेद करणें हीच माझी आतां तपश्चर्या ! जसा हरणानें सिंहाचा आयाळ धरून पराभव करावा, किंवा वासरानें वाघास कोंडावें किंवा बेडकानें सापाच्या तोंडांत मारावी ! याप्रमाणें हा **पुष्पभूतिवंशाचा** अपमान झाला ! तर आतां सर्व मांडलिक राजे व सैन्य तुजजवळच असूं दे. एकटा **भंडी** मात्र दहा हजार घोडेस्वारांसह मजबरोबर आला म्हणजे झालें. " असें बोलून त्यानें प्रयाणवाद्यें वाजविण्यास सांगितलें. त्यावेळीं **हर्ष** अत्यंत दुःखित होऊन आपले भावास ह्मणालाः " मी बरोबर आलों म्हणून काय चिंता आहे ? मी लहान आहें असें आपणांस वाटत असेल तर माझें संरक्षण होण्यास मी आपले जवळच पाहिजे ! घरीं सुखांत राहा, असें आपलें ह्मणणें असेल तर तें सुख आपलें बरोबरच जात आहे ! दोघांचें काय कारण आहे ? असें आपण ह्मणाल तर मलाच एकट्याला आज्ञा करावी ! " ह्याप्रमाणें भावाचें भाषण ऐकून **राज्यवर्धन** ह्मणाला, " **हर्षा**, या प्रसंगीं तुला पाठवून मीं घरीं राहणें योग्य नाहीं. हरणाला मारणें सिंहाला कांहीं कठिण आहे काय ! तूं आतां घरीं राहून सर्व राज्याचें रक्षण कर. मला या दुष्टाच्या नरडीचा घोट घेऊं दे. पराक्रमाचे प्रसंग पुढें पुष्कळ आहेत. कुलपर्वताला देखील हालविणाऱ्या वाऱ्याला कापूस उडाविणें कठिण आहे काय? पुढें दिग्विजयाच्या वेळेस तूं पराक्रम करून दाखीव, परंतु आतां मला जाऊं दे ! " असें ह्मणून तो तत्काळ निघून गेला. वडील बंधू गेल्यावर **हर्षास** फारच अवघड वाटलें. त्यास वाईट स्वप्नें पडूं लागलीं त्यामुळें त्याच्या मनांत अनेक शंका उभ्या राहिल्या. ' प्रियबंधूचें कल्याण असो, ' असें तो चिंतूं लागला.

एके दिवशीं प्रातःकाळीं नित्याप्रमाणें स्नानादिकृत्यें आटोपल्यावर **हर्ष** सभास्थानीं येऊन बसला असतां खिन्न मुद्रेनें अश्रु ढाळीत **राज्यवर्धनाचा**

कुंतलकनांवाचा सेवक त्याचे दृष्टीस पडला. त्यास विचारल्यावर फार शोक करून त्यानें सांगितलें कीं, " राज्यवर्धनानें मालवराजास तेव्हांच जिंकिलें; परंतु गौडराजानें कपटानें अगत्य दाखवून राज्यवर्धनास आपले घरीं नेलें व विश्वासघातानें कत्तल करून मारलें ! " याप्रमाणें समजतांच हर्षाचें दुःख काय विचारावें ! क्रोधानें त्याच्या अंगाची फारच आग झाली. तो ह्मणाला, " काय दुष्टानें घात केला पहा ! असा दुष्ट कोणत्या योनींत किंवा नरकांत जाईल तो जावो ! पुढें आपला परिणाम कसा होईल हें त्या दुष्टानें मनांत आणिलें नाहीं आं ! तो अधम माझ्यापुढें कोठें जाणार आहे !" याप्रमाणें हर्ष आपल्याशीं बोलत आहे तों सिंहनादनामक सेनापतीनें जवळ येऊन विनंति केली कीं, " महाराज, झाली गोष्ट ती फारच वाईट झालीं हें खरें ! परंतु तिला आतां उपाय काय ? दुष्ट गौडराजाची ती किती बिशाद ! त्याचा उच्छेद करण्यास काय उशीर आहे ? हल्लीं आपल्या कुळावर काळ कोपला आहे एवढें मात्र खरें ! याकरितां धैर्य धरावें. सर्व लोक घाबरून गेले आहेत त्यांस धैर्य द्यावें. नंतर अधम गौडाच्या नाशाविषयीं व पृथ्वी जिंकण्याविषयीं प्रतिज्ञा करून हातांत शस्त्र धारण करावें. शत्रूच्या रक्तप्राशनावांचून भीमाची जशी शांति झाली नाहीं, क्षत्रियरक्तांत स्नान केल्याखेरीज परशुरामाचें जसें समाधान झालें नाहीं, त्याप्रमाणेंच शत्रूचें रक्तचंदन अंगास लागल्याशिवाय आपलाहि दाह शांत होणार नाहीं ! " असें बोलून तो उगीच राहिला. हर्ष ह्मणाला, " तूं ह्मणतोस त्याप्रमाणें झाल्याखेरीज शांति होणार नाहीं खरींच ! आतां क्रोधामुळें माझ्या अंतःकरणांत शोकालाहि अवकाश राहिला नाहीं. तर मी आतां अशी प्रतिज्ञा करितों कीं, अल्पकाळांतच गौडविरहित पृथ्वी करणार नाहीं तर प्रज्वलित अग्नींत पतंगाप्रमाणें मी उडी टाकीन !" मग दिग्विजय करण्याचा निश्चय करून सर्व राजांनां करभार देण्याविषयीं किंवा युद्धास तयार असण्याविषयीं पत्रें लिहिण्यास आज्ञा केली. नंतर तो उठून आपले मंदिरांत गेला. प्रियबंधूच्या दुःखानें रात्रीं त्यास झोप आली नाहीं. प्रातःकाल होतांच हस्तिसैन्याचा अधिपति स्कंदगुप्त यास लवकर घेऊन येण्यास सेवकास आज्ञा केली. त्याप्रमाणें तो आल्यावर हर्ष त्यास ह्मणाला, " प्रियबंधूचें वर्तमान व पुढें माझें कर्तव्य हें तुझ्या ऐकण्यांत आलें असेलच; याकरितां हस्तिसैन्य लवकर सज्ज करून आणावें. " तो म्हणाला, " स्वामीची आज्ञा मला मान्य आहे व आपलें कर्तव्यहि योग्यच आहे. परंतु

11 JAN 1994

थोडी विनंति करतों ती ऐकावी. आर्य राज्यवर्धनाच्या परिणामावरून दुष्टांचे स्वभाव कसे असतात, हें आपल्या लक्षांत आलें असेलच. विश्वासानें असे पुष्कळांचे घात होतात व झाले आहेत. कोणाकोणाचे कसकसे घात झाले, यांविषयीं त्यानें इतिहासांतील पुष्कळच उदाहरणें सांगितलीं. नंतर तो सैन्याची तयारी करण्यास गेला.

हर्ष शत्रूवर स्वारी करण्याकरितां सिद्ध झाल्यावर प्रयाणकालीं तो शिव-पूजन करून व पुष्कळ दानधर्म करून निघाला.तो दिग्विजय करीत चालला असतां प्रथमतःच प्राग्ज्योतिष ( ब्रम्हदेश किंवा असाम ) च्या कुमारराजाकडून हंसवेगनांवाच्या सेवकाबरोबर आश्चर्यकारक रत्नखचित छत्राचा नजराणा हर्षास आला. तो शुभशकुन समजून हर्षानें त्याचें ग्रहण केलें व हंसवेगास त्यानें उत्तम वस्त्रालंकार दिले. रात्रीं राजे लोकांबरोबर थोडावेळ बोलून ते गेल्यावर हर्ष हंसवेगास ह्मणाला, काय तुझ्या स्वामी-चा निरोप असेल तो सांग. तो ह्मणालाः—आमचा राजा कुमार-भास्कर-वर्मा हा भगदत्ताच्या वंशांत उत्पन्न झाला आहे. त्याचा असा संकल्प आहे कीं, शंकराखेरीज दुसरे कोणास मस्तक नम्र करावयाचें नाहीं ! तर हा निश्चय सर्व पृथ्वी जिंकण्यानें अथवा मृत्यूनें किंवा महाराजासारख्या महा-पराक्रमी मित्रानें शेवटास जाणार आहे. याकरितां महाराजांच्या विचारास येत असल्यास कुबेराचा शिवाशीं, दशरथाचा इंद्राशीं, किंवा अर्जुनाचा कृष्णाशीं, जसा योग जमला; तसा हा योग होईल.आपल्याशीं स्नेह व्हावा अशी आमच्या स्वामीची उत्कट इच्छा आहे, तर आपल्या ध्यानांत कसें काय येतें, त्याप्रमाणें आज्ञा व्हावी. यावर हर्ष ह्मणाला–" हंसवेगा, अशा परोक्ष प्रीति करणाऱ्या कुलीन कुमाराबरोबर कोण स्नेह करणार नाहीं ? तुझ्या स्वामीची जशी इच्छा आहे तशीच माझीहि आहे. " असें बोलून हर्षानें हंसवेगाबरोबर परत नजराणा देऊन त्यास निरोप दिला.

पुढें हर्ष शत्रूवर आवेशानें जात असतां मार्गानें एके दिवशीं राज्यवर्धना-नें जिंकलेल्या मालवराजाची संपत्ति घेऊन भंडी येत आहे असें त्यास समजलें. त्याबरोबर त्यास बंधुचें स्मरण होऊन तो सर्व व्यापार सोडून व एकीकडे जाऊन दुःखित होऊन–भंडीची वाट पहात बसला. पुढें थोड्याच वेळानें भंडी त्या ठिकाणीं येऊन हर्षाच्या भेटीस गेला. तेव्हां शोकाग्नीनें दग्ध झाल्यामुळें काळा ठिक्कर पडलेला, दुर्योधनाच्या मरणानें खिन्न झालेल्या

अश्वत्थाम्यासारखा तो हर्षाच्या दृष्टीस पडला ! त्या वेळीं दोघांनीहि राज्यवर्धनाविषयीं फार शोक केला. मग कांहीं वेळानें भंडीनें हर्षास घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. हर्षानें मोठ्या उत्कंठेनें आपल्या बहिणीचें वर्तमान विचारलें तेव्हां भंडीनें सांगितलें कीं, "राज्यवर्धनाचा अंत झाल्यावर गुप्तानें कान्यकुब्ज घेतलें. त्या गडबडींत राज्यश्री बंदींतून सुटून आपल्या परिवारासह विन्ध्यारण्यांत गेली. तिच्या शोधाकरितां मीं पुष्कळ लोक पाठविले आहेत, परंतु अद्यापि कांहीं शोध नाहीं !" याप्रमाणें त्याचें भाषण ऐकून हर्षास आपल्या बहिणीविषयीं फार वाईट वाटलें आणि तो ह्मणाला ' दुसरे जाऊन काय उपयोग ? मी स्वतः तिच्या शोधाकरितां जातों. तूं हें सैन्य घेऊन गौडाचा सूड उगविण्याकरितां पुढें हो. ' असें बोलून हर्ष उठला. नंतर त्यानें स्नान करून भंडीबरोबर उपहार केला, व त्याजबरोबर बोलण्यांत तो सर्व दिवस घालविला. दुसरे दिवशीं भंडीनें हर्षास विनंति केली कीं, "राज्यवर्धनाच्या पराक्रमानें हस्तगत झालेली मालवराजाची संपत्ति अवलोकन करावी." असें म्हणून त्यानें हत्ती, घोडे, स्त्रियांच्या अंगावरील अत्युत्तम अलंकार, व छत्रचामरादि अनेक वस्तु त्यास दाखविल्या.

दुसरे दिवशीं हर्ष आपल्या बहिणीच्या शोधाकरितां कांहीं लोक बरोबर घेऊन विन्ध्याटवींत शिरला व तिचा शोध करीत हिंडूं लागला. एके दिवशीं तेथील मांडलिक राजाचा पुत्र व्याघ्रकेतु हा एक्या तरुण भिल्लाला घेऊन हर्षराजाजवळ आला आणि म्हणाला, " महाराज आपल्या भिल्लसेनापतीचा हा भाचा आहे. याचें नांव निर्घात. याला ह्या अरण्यांतील प्रत्येक पानाची देखील माहिती आहे. याकरितां याला जी काय आज्ञा करावयाची असेल ती करावी." नंतर निर्घातानें हर्षास पशुपक्ष्यांची भेट अर्पण करून नमन केलें. तेव्हां हर्ष त्यास ह्मणाला, " तुझें व तुझ्या मंडळीचें या अरण्यांत नेहमीं फिरणें आहे, याकरितां एकादी राजघराण्यांतली स्त्री कोणाच्या दृष्टीस पडल्याबद्दल कांहीं वर्तमान समजलें आहे का ?" तो हात जोडून ह्मणाला, ' महाराज, येथें हरणी सुद्धां संचार करण्यास भितात, मग बायको माणूस तर कोठून येणार ? तथापि महाराजांची आज्ञा असेल तर सर्व कामधंदा सोडून आह्मी शोध करीत हिंडतों. येथून एक कोसावर नदीच्या कांठीं झाडींत दिवाकरमित्र नांवाचा साधु पुष्कळ शिष्यमंडळीसह राहतो, त्याला

कदाचित् त्याच्या शिष्याकडून कांहीं शोध लागला असेल तर कोण जाणे!' तें ऐकून हर्ष आपल्या मनांत ह्मणाला ग्रहवर्म्याचा बालमित्र मैत्रायणी-शाखेचा ब्राह्मण तारुण्यांतच बुद्धदीक्षेचा स्वीकार करून तपश्चर्येस गेल्याबद्दल ऐकिलें होतें खरें! मग त्याच्या भेटीविषयीं हर्षास फारच उत्कंठा वाटून तो त्यास ह्मणाला, "तें ठिकाण कोठें आहे तें आह्मांस दाखीव बरें?" असें ह्मणून तो त्याजबरोबर चालूं लागला. पुढें नदी आली तेव्हां हर्षास वाटलें कीं, तें ठिकाण आतां येथून जवळच असावें, याकरितां सैन्य येथेंच ठेवून आपणच पुढें जावें. असा विचार करून व विनीत वेष धारण करून माधवगुप्तासमवेत थोडके लोक बरोबर घेऊन तो त्या ठिकाणीं गेला.

तेथें त्यानें अनेक शास्त्रार्थांचें प्रतिपादन करणाऱ्या अशा दिवाकरमित्रास पाहिलें. मग हर्षानें पुढें होऊन दिवाकरमित्रास नमस्कार केला. त्याच्या आकृतीवरून हा कोणी थोर पुरुष असावा असें दिवाकरमित्रास वाटून त्यानें त्याचा सन्मान करून बसावयास आसन देवविलें. तथापि त्यावर न बसतां हर्ष नम्रतेनें भूमीवरच बसला. राजास पाहतांच दिवाकरमित्रास वाटलें, ज्यांच्या उदरीं असलें रत्न निर्माण झालें, ते धन्य होत. हा केवळ पुण्याचा राशि व सद्गुणांचा पुतळाच भासतो आहे! मग तो राजास ह्मणाला, "तुमच्या आगमनानें आह्मास फार आनंद झाला. परंतु तुह्मास अशा प्रदेशीं येण्याचें कोणतें कारण पडलें असावें बरें?" हर्ष ह्मणाला. "आपल्या सत्कारानें व मधुर भाषणानें मी कृतकृत्य झालों. माझें येथें येण्याचें कारण असें आहे कीं, माझ्या दुर्दैवानें माझे बरेच आप्त अल्पकालांत नष्ट झाले. माझ्या धाकट्या बहिणीच्या पतीचा दुष्ट शत्रूनें प्राणघात केल्यामुळें ती त्यापासून भीऊन या महारण्यांत पळून आली, असें समजल्यावरून तिच्या शोधाकरितां मी ह्या वनांत आलों आहे; परंतु तिचा अद्यापि कोठें शोध लागत नाहीं. याकरतां जर आपणास एखाद्या स्त्रीची वार्ता कोणाच्या मुखानें कळली असल्यास सांगण्याची कृपा करावी!" असें राजाचें दीन भाषण ऐकून दिवाकरमित्रास फार वाईट वाटलें आणि तो ह्मणाला "आह्मास अद्यापपर्यंत तर कोणाकडून हें वर्तमान समजलें नाहीं!" याप्रमाणें बोलणें चाललें होतें तों इतक्यांत एक शिष्य गडबडीनें येऊन दिवाकरमित्रास ह्मणाला, "गुरुजी! एक तरुण स्त्री अतिदुःखानें त्रस्त झाल्यामुळें अग्नींत प्रवेश करीत आहे! याकरितां आपण तेथपर्यंत येण्याचें श्रम घेऊन व गरीब

बापडीस दोन गोष्टी सांगून तिचा जीव वांचविण्याचें श्रेय घ्यावें. कीटकादिकांचा जीव रक्षण करण्याविषयीं देखील गुरुजींचें लक्ष असतें !"

हें वर्तमान ऐकतांच हर्षास वाटलें कीं, ही आपली बहीणच असावी. मग तो त्या बौद्धशिष्यास ह्मणाला, "ती स्त्री कोठून आली? तिच्या दुःखाचें कारण काय ? वगैरे कांहीं कळलें असल्यास सांगावें." तो ह्मणाला, मी गुरुजींचें वंदन करून नदीतीरानें चाललों असतां एकाएकीं रोदनाचा शब्द माझ्या कानीं पडला. त्याबरोबर मी तिकडे पाहूं लागलों तों कांहीं स्त्रिया जिच्याबरोबर आहेत अशी, रानांतील दगड, कांटे, व कुसळें टोंचल्यामुळें जिच्या अंगावर ओरखडे उमटले आहेत व जागजागीं रक्त निघालें आहे अशी, व रडून रडून जिचे डोळे लाल होऊन सुजले आहेत अशी, अत्यंत दीन झालेली स्त्री माझ्या दृष्टीस पडली ! तेव्हां ह्या स्त्रीस आपण काय विचारावें व कसें विचारावें असें माझ्या मनांत येत आहे तों त्यांपैकीं एक स्त्री मजजवळ येऊन व माझ्या पायां पडून ह्मणाली, " महाराज ! ही आमची स्वामिनी आईबापांच्या, पतीच्या व बंधूच्या मरणानें विरक्त होऊन व दुष्ट शत्रूंच्या जाचास त्रासून आपला जीव देण्यास सिद्ध झाली आहे ! आपण बौद्धभिक्षु आहां. सर्व प्राण्यांवर दया करणें हेंच बौद्धदीक्षेचें मुख्य तत्त्व आहे. भगवान् बुद्ध यानेंहि दया करणें हाच परम धर्म सांगितला आहे. प्राणरक्षणाहून दुसरा उत्तम धर्म नाहीं, याकरितां कृपा करून आमच्या स्वामिनीस दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून तिचें शांतवन करावें. " यावर मीं ह्मटलें, " थोडा वेळ आपल्या स्वामिनीस आवरून धर, मजपेक्षां माझे गुरु आले असतां अधिक उपयोग होईल. ते फारच थोर व समर्थ आहेत. ते येथून जवळच राहतात. याकरितां मी त्यांना घेऊन येतों; ह्मणजे ते शास्त्रांतील, पुराणांतील व इतिहासांतील अनेक बोधपर वचनें सांगून तिचें सांत्वन करतील. यावर ती मला नमन करून व हात जोडून ह्मणाली, 'जा तर लवकर, आणि त्यांना घेऊन या ' मग मी त्वरेनें इकडे आलों ! "

असें त्याचें भाषण ऐकतांच ही आपलीच बहीण असावी असें हर्षास वाटलें आणि तो दुःखित होऊन बौद्धगुरूस ह्मणाला, "गुरुमहाराज! एकंदर हकीकतीवरून ही माझीच बहीण असावी.याकरितां मजबरोबर लवकर येण्याची कृपा करावी !"मग तो त्या भिक्षूस ह्मणाला,'मला लौकर तें स्थळ दाखविण्याचें करावें. तेव्हां दिवाकरमित्रहि आपल्या शिष्यांसह राजाबरोबर निघा-

ला. मग ते चालले असतां 'आमच्या स्वामिनीचें कोणी रक्षण कराहो !' याप्रमाणें स्त्रीजनाचे अनेक प्रकारचे प्रलाप त्यांच्या कानीं पडले व पुढें घाईनें जाऊन पाहूं लागले, तों सर्व स्त्रिया जीव देण्यास तयार झालेल्या आहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तें पाहून सर्वजण फारच घाबरले. पुढें **हर्षानें** अग्निप्रवेशास उद्युक्त झालेल्या आपल्या बहिणीस ओळखिलें व धावत जाऊन तिला आवरून धरिलें ! अशा वेळीं एकाएकीं प्रियबंधूच्या स्पर्शानें अमृतानें सिंचन केल्याप्रमाणें **राज्यश्रीस** वाटलें. तिनें लागलींच आपल्या भावास ओळखून त्याच्या गळ्यास मिठी मारिली ! मग त्या दोघांनीं फार वेळ शोक केला. त्या वेळीं झालेल्या भाषणावरून **दिवाकरमित्रास** हा **हर्षराजा** आहे असें समजलें. मग त्यानें आपल्या शिष्यांकडून उदक आणून **हर्षास** तोंड धुण्यास दिलें. **हर्षानें** पहिल्यानें आपल्या बहिणीचें तोंड धुऊन मग आपलें धुतलें. नंतर **हर्ष** आपल्या बहिणीस ह्मणाला, "हे साधु तुझ्या पतीचे बालमित्र व माझे गुरु आहेत " अशा रीतीनें पतीचें स्मरण होतांच **राज्यश्रीस** हुंदका येऊन रडूं कोसळलें. **दिवाकरमित्र** व **हर्ष** यांचीहि तशीच अवस्था झाली. नंतर **दिवाकरमित्र हर्षास** ह्मणाला, " आतां कोठवर शोक करितां? तो कितीहि केला तरी थोडाच संपणार आहे. ? तुह्मां दोघांस फारच दुःख व श्रम झाले आहेत, यासाठीं अगोदर स्नान करून फलाहार करा." मग **दिवाकरमित्राच्या** आग्रहावरून **हर्षानें** आपल्या भगिनीस स्नान घातलें व आपणहि केलें. नंतर तिजकडून मोठ्या प्रयासानें उपहार करवून आपणहि केला. पुढें आपल्या बहिणीचें हृदयद्रावक सर्व वर्तमान **हर्षानें** ऐकलें. तें ऐकतांच **हर्षास** अतिशय दुःख झालें. मग **दिवाकरमित्रानें** त्यांजवळ बसून अनेक बोधपर वचनांनीं त्यांचें समाधान केलें.

तो दिवस गेल्यावर **दिवाकरमित्र हर्षाजवळ** बसून ह्मणाला. " राजा, मला एक गोष्ट सांगावयाची आहे. कोणे एके वेळीं चंद्र उदयास आल्यावर त्यानें आपलें प्रतिबिंब समुद्रोदकांत पाहिलें. तें पाहतांच त्यास आपल्या प्रियेच्या मुखचंद्राचें स्मरण होऊन विरहोत्कंठेमुळें त्याचे नेत्रांतून अश्रुबिन्दु गळाले ! ते समुद्रांतील शिंपांच्या उदरांत शिरून त्यांचीं त्यांत सुंदर मौक्तिकें बनलीं ! तीं मौक्तिकें पुढें पाताळीं **वासुकीस** मिळालीं. त्यानें त्यांची एकपदरी कंठी करून तीस '**मंदाकिनी**' असें नांव ठेविलें ! ती औषधीनाथ चन्द्र याजपासून झाल्यामुळें विषादिदाहाचें शमन करणारी असल्या-

कारणानें **वासुकी** तीस आपल्या कंठांत धारण करीत असे. पुढें नागांनीं **नागार्जुनास** पाताळीं नेलें त्या वेळीं त्यानीं ती त्यास दिली. **नागार्जुनानें** ती **सातवाहनराजास** दिली व ती आतां परंपरेनें आमचेकडे आली आहे. ती धारण करण्यास तुजपेक्षां योग्य असा दुसरा कोण भेटणार आहे ? या करितां ती मी आतां तुला अर्पण करितों. तिचा तूं स्वीकार कर. " असें ह्मणून त्यानें ती त्याच्या गळ्यांत घातली ! त्यावेळीं त्या ठिकाणीं चंद्रिकेसारखा प्रकाश पडला, त्यामुळें हर्षास फार आश्चर्य वाटलें ! हर्ष ह्मणाला, गुरुजीच्या सद्गुणांस मीं आपलें शरीर अर्पण केलें आहे. याकरितां वेणें न घेणें हें कांहींच माझे स्वाधीन राहिलें नाहीं ! या देहाचे धनी गुरुजी आहेत.

पुढें एके दिवशीं **राज्यश्रीनें** आपल्या सखीजवळ कांहीं गोष्ट सांगून तीस **हर्षाकडे** पाठविलें. ती **हर्षाजवळ** येऊन ह्मणाली, " आपली भगिनी आपल्या समक्ष कधीं मोठ्यानें बोलली सुद्धां नाहीं,मग दुसरी गोष्ट तर काय! परंतु दुर्दैवानें तिच्या सर्व गुणांचें मातेरें केलें ! स्त्रियांनां पति किंवा संतति यांचा आधार वाटतो ! परंतु ज्यांनां दोन्ही नाहींत, त्यांनां आपलें जीवित व्यर्थ वाटतें ? आपल्या भेटीमुळें **राज्यश्रीचा** मरणाचा निश्चय रहित झाला. तर आतां आपल्या बहिणीचें असें ह्मणणें आहे कीं मला बौद्धदीक्षा घेण्यास आज्ञा मिळावी. " तें ऐकून **हर्ष** उगीच चिंताक्रांत बसला.मग **दिवाकरमित्र** **राज्यश्रीस** उद्देशून ह्मणाले, अनेक गोष्टी पाहून व ऐकून ज्यांचीं अंतःकरणें कठिण झालीं असतात, त्यांनां देखील प्रियजनाचा वियोग कठिण वाटतो. मग तुजसारख्या अबलेच्या कोमल अंतःकरणास तो दुःसह वाटतो आहे यांत काय नवल आहे ! प्रियविरह हा केवळ अग्निच आहे, किंवा यास क्षयरोग ह्मटलें तरी चालेल; अथवा हें एक प्रकारचें प्रखर विषच ह्मटलें तरी शोभेल, किंवा यास साक्षात् काळ ह्मटलें तरी चिंता नाहीं ! याच्या तावडींत सांपडलेल्या मनुष्यास सौख्य कसचें ! परंतु जन्ममरणें, व सुखदुःखें हीं मनुष्याच्या मागें नेहमीं आहेत, तीं सर्व डोळे झांकून सहन केलीं पाहिजेत. तीं टाळण्यास कोण समर्थ आहे ? हा तुझा वडील बंधू तुला पूज्य आहे. तो सांगेल त्याप्रमाणें तूं वागावेंस हें योग्य आहे. "

नंतर **हर्ष** **दिवाकरमित्रास** ह्मणाला, "अशा प्रसंगीं आपलें दर्शन आह्मांस झालें, हें आमचें मोठेंच भाग्य होय. असे पुण्याचे आधारस्तंभ आहेत, ह्मणून

हें जग चाललें आहे! असो, आपल्यास माझी अशी विनंति आहे कीं, क्रोधाच्या आवेशांत शत्रुनाशाविषयीं मी सर्वांसमक्ष प्रतिज्ञा केली आहे ती सिद्धीस नेली पाहिजे. तरी, ही माझी बहीण मजजवळच रहावी व आपण कांहीं दिवस माझ्या समागमें राहून धार्मिक कथा व साधुपुरुषांचीं चरित्रें व उपदेशाच्या गोष्टी सांगून हिचें दुःख कमी होईल अशी कृपा करावी. दुसऱ्यावर अनुग्रह करणें, हा सत्पुरुषांचा स्वभावच आहे. दधीचऋषीनें परोपकारार्थ जीविताची देखील परवा न करतां आपल्या शरीरांतील अस्थि काढून दिले. साक्षात् बौद्धानें सिंही प्रसूत होऊन आपलीं अर्भकें खाऊं लागली तेव्हां आपल्या शरीराचें मांस देऊन बालकावर दया केली. गुरुजीस सर्व माहीत आहेच! आपणापुढें मीं काय सांगावयाचें आहे? तेव्हां प्रार्थना ह्मणून इतकीच कीं, आपल्या सहवासानें व बोधानें माझ्या भगिनीचें दुःख कमी व्हावें व तिनें कांहीं काळ मजबरोबर घालवावा, अशी माझी इच्छा आहे. माझीं कर्तव्यें उरकल्यावर ती व मी दोघेहि बौद्धदीक्षेचा स्वीकार करूं." यावर दिवाकरमित्र ह्मणाला, "हर्षा, तुझ्या सद्गुणांनीं आमचे अंतःरणाचें आकर्षण केलें आहे, याकरितां वारंवार सांगण्याचें कारणच राहिलें नाहीं!" मग ती रात्र त्या ठिकाणीं घालविल्यावर हर्षानें निर्घातास वस्त्र व भूषणें देऊन निरोप दिला. नंतर तेथून निघून तो गंगातीरीं आपलें सैन्य तळ देऊन राहिलें होतें तिकडे तो दिवाकरमित्रास बरोबर घेऊन आपल्या भगिनीसह गेला. तेथें आप्तमित्रांस राज्यश्रीच्या संबंधाच्या गोष्टी सांगत असतां सूर्यास्त झाला व नंतर चंद्रोदय झाला!

1 5 MAY 2007

# कादंबरीच्या पूर्वार्धांतील संक्षिप्त कथानक.

मालवदेशांत विदिशा नांवाची राजधानी होती. तेथें पूर्वी शूद्रकराजा राज्य करीत असे. तो सार्वभौम असल्यामुळें सर्व राजे त्याच्या आज्ञेंत असत. तो गुणवान् असल्यामुळें सर्वांस अत्यंत प्रिय असे. त्याचा सर्वत्र मोठा दरारा असे. त्याच्या राज्यांत सर्व लोक आपापल्या धर्मानें वागत असत व कोठें अन्याय होत नसे. त्याचे प्रधान नीतिज्ञ व राजनिष्ठ असत.

राजाचें लक्ष नेहमीं पराक्रमाचीं कृत्यें करण्याकडे व शरीरसंपत्ति राखण्याकडे असल्यामुळें तो विषयासक्त न राहतां राज्यकारभारांत व अनेक सत्कृत्यें करण्यांत आपला वेळ घालवीत असे.

एके दिवशीं शूद्रकराजा सभेंत बसला असतां, एक द्वारपालिका राजाजवळ येऊन ह्मणाली, " महाराज, एक चांडालकन्या सुंदर राघू घेऊन बाहेर आली आहे. तिची अशी विनंति आहे कीं महाराजाजवळ अनेक रत्नें आहेत, त्यांत हेंहि एक रत्न असावें ! " तेव्हां राजास उत्कंठा वाटून त्यानें तीस तिला घेऊन येण्यास सांगितलें. मग आज्ञेप्रमाणें ती चांडालकन्या मंडपांत आली. तिजबरोबर एक ह्मातारा व राघूचा पिंजरा हातांत घेतलेला एक मुलगा होता.

तिचें स्वरूप पाहून राजाच्या मनांत आलें, कायहो हा ब्रह्मदेवाचा वेडेपणा ! त्यानें पहा भलत्याच ठिकाणीं असें सौंदर्य उत्पन्न केलें ! मग त्या सर्वांनीं लवून प्रणाम केल्यावर तो वृद्ध मनुष्य राघूचा पिंजरा राजापुढें ठेवून ह्मणाला, महाराज, हा पक्षी एक अमूल्य रत्न आहे. ह्मणून आमच्या धन्याची मुलगी हें आपणांस अर्पण करण्याकरितां येथें आली आहे. हा रावा सर्व भाषा जाणतो. याचें नांव वैशंपायन. इतक्यांत त्या राव्यानें आपला उजवा पाय वर करून " राजा ! तुझा जयजयकार असो " असें ह्मटलें. तें ऐकून राजास मोठें आश्चर्य वाटलें. इतक्यांत दोन प्रहरचा चौघडा वाजूं लागल्यामुळे राजा स्नानास उठला, त्याबरोबर सर्व उठले. राजानें त्या चांडालकन्येस विश्रांति घेण्यास सांगून त्या राघूची खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था ठेवण्यास दासीस सांगितलें. मग राजानें स्नान

[illegible] वाचनालय, [illegible]

करून धौत वस्त्रें धारण केलीं. नंतर संध्या, तर्पण व देवपूजा करून त्यानें होमशाळेंत जाऊन होम केला. मग केशरी गंध लावून अंगावर भूषणें घातलीं व नंतर शालजोडी पांघरून तो राजपुत्रांबरोबर भोजन करण्यास गेला. भोजन झाल्यावर तो दिवाणखान्यांत गेला. तेथें तांबूल घेऊन हस्तिदंती पलंगावर सुंदर बिछाना घातला होता त्यावर जाऊन बसला.

राजाला राघूचें कौतुक वाटल्यामुळें त्यानें त्यास तेथें आणण्यास सांगितलें त्याप्रमाणें त्यास तेथें आणल्यावर राजा ह्मणाला, " तुला आवडतात ते पदार्थ खावयास मिळाले का ? " तो ह्मणाला, " महाराज ! आपले येथें काय कमी आहे ? मला राणीसाहेबांनीं पुष्कळ पदार्थ खावयास दिले. ते सर्व मला अमृतासारखे लागले. " मग राजा ह्मणाला, आह्मांस तुझें सर्व वर्तमान ऐकण्याची फार उत्कंठा वाटत आहे. याकरितां तें सांग.

मग तो राघू ह्मणाला, महाराज, माझें वृत्त फार मोठें आहे, तथापि आपणास जर कौतुक वाटत आहे तर तें सांगतों ऐकावें.—

"या पृथ्वींत अतिविस्तीर्ण असें **विंध्यारण्य** आहे. त्यांत झाडाझुडपांची अतिशय दाटी आहे व मधून मधून फलझाडें, फुलझाडें व वेली यांची फारच गर्दी आहे. कंदमूलफळें भक्षण करण्याकरितां अनेक पशुपक्ष्यांचे समुदाय त्या ठिकाणीं दृष्टीस पडतात. त्याच **विंध्यारण्यांत दंडकारण्य** नांवाचा एक भाग आहे. त्यांत **अगस्तिऋषीचा** आश्रम आहे. भगवान् **रामचंद्र** हे पूर्वीं त्या ठिकाणीं राहिले होते. त्या आश्रमाजवळ **पंपा**नावाचें सरोवर आहे. त्यांत अनेक प्रकारचीं कमलें प्रफुल्लित असतात व त्यांवर भ्रमरांचे थवे गुंजारव करीत फिरतात. हंसपक्षी पुष्परस प्राशन करून उन्मत्त होऊन शब्द करीत हिंडतात. सरोवरावरून जलतुषार व सुगंध घेऊन मंदमंद वारा वाहत असतो. सरोवराच्या कांठीं ऋषिजन स्नानसंध्या करीत बसतात.

त्या सरोवराजवळ एक **शिंशिपावृक्ष** आहे. तो वृक्ष फार मोठा असल्यामुळें त्याच्या संधींत व भेगांत निर्भय जागा समजून, अनेक प्रदेशांतून हजारों राघू येऊन राहत असत. तो वृक्ष जुनाट असल्यामुळें त्यास थोडीं पानें होतीं, तथापि त्यांवर राघू बसत असल्यामुळें हिरव्या पानांनीं तो गचच भरलाच आहे काय असा दिसत असे ! ते राघू रात्रीं आपल्या घरट्यांत राहून दिवसां भक्ष्य मिळण्याकरितां बाहेर जात असत व भक्ष्य आणून

आपल्या पिलांस खाऊं घालीत आणि रात्र झाली कीं, त्यांस आपल्या पंखांनीं झाकून सुखानें काळ घालवीत.

त्याच वृक्षावर माझीं वृद्ध मातापितरें राहत असत. त्यांस मी फार दिवसांनीं मुलगा झालों. माझ्या जन्मकाळीं माझी माता प्रसववेदनेनें पीडित होऊन परलोकास गेली. तेव्हां माझा पिता सर्व दुःख गिळून फारच काळजानें माझें लालनपालन करी. जरेमुळें माझ्या बापास चांगलें उडतां येत नसे. त्यामुळें दुसऱ्या पक्ष्यांचे घरट्यांतून खालीं पडलेले धान्याचे व फळाचे तुकडे वेंचून आणून तो मला खावयास देई व त्यांतून जें उरे त्यानें तो आपलें उपजीवन करी.

एके दिवशीं पहाटेस आकाश तांबडें झालें होतें. चंद्र निस्तेज होऊन क्षितिजाखालीं चालला होता. पुढें पुढें आकाश स्वच्छ होऊन त्यांतील नक्षत्रें-हि क्रमाक्रमानें दिसतनाशीं होत गेलीं. पशु व पक्षी हे इकडे तिकडे हिंडूं फिरूं लागले. वृक्षांवरील पुष्पें गळूं लागल्यामुळें ते सूर्यास पुष्पांजलिच अर्पण करीत आहेत काय असें दिसूं लागलें! मुनिजन स्नानसंध्या करून होमहवन करूं लागल्यामुळें धुरांचे लोट आकाशांत जाऊं लागले. मंद व शीतल असा वारा वाहूं लागला. भ्रमर गुंजारव करीत फिरूं लागले. पंपासरोवरांतील पक्ष्यांचे शब्द सुरू झाले. सूर्योदय होऊन चांगला प्रकाश पडला. तेव्हां त्या वृक्षावरील राघू भक्ष्य मिळविण्याकरितां उडून गेले. त्यांचीं पिलें आपापल्या घरट्यांत दबून बसल्यामुळें तो वृक्ष शून्य भासूं लागला. मी व माझा बाप आपल्या घरट्यांत बसलों होतों. मला नुकतेच पंख फुटूं लागले होते, त्यामुळें उडण्याचें सामर्थ्य आलें नव्हतें!

अशा वेळीं एकाएकीं मोठा गलबला ऐकूं आला. वनांतील सर्व प्राणी घाबरून आपापले शब्द करीत धावत पळत सुटले. इतक्यांत मृगया करण्याकरितां आलेले भिल्ल पशुपक्ष्यांचा संहार करीत येत आहेत असें दिसलें. त्यांच्या बरोबरच्या शिकारी कुत्र्यांनीं कोणाचे कान, कोणाचे पाय, इत्यादि अवयव तोडल्यामुळें घाबरलेलीं हरणें दीन स्वरानें हिकडून तिकडे धावत पळत सुटलीं. त्यावेळीं पशुपक्ष्यांच्या शब्दांनीं तें ठिकाण अगदीं गजबजून गेलें!

पुढें कांहीं वेळानें ती गडबड कमी झाली. तेव्हां बाहेर डोकावून पहावें म्हणून मी बापाच्या पंखांतून निघून घाबऱ्या घाबऱ्यानें पाहूं लागलों तों, यम-

दूतांसारखा भिल्ललोकांचा समुदाय माझे दृष्टीस पडला. त्यांच्या मध्यभागीं त्यांचा मुख्य नायक होता. तो अगदीं तारुण्याच्या भरांत होता. त्याचा देह काळा कुळकुळीत व इतका बळकट होता कीं, हा लोखंडाचा पुतळाच आहे कीं काय असें भासत होतें! त्याच्या अंगावर घर्माचे बिंदु व मारलेल्या पशूंचे रक्तबिंदु दिसत होते. त्याची मुद्रा रागीट दिसत होती. त्याच्यामागून त्याचे शिकारी कुत्रे धावत येत होते. त्याच्या सभोंवतीं भिल्ललोकांची गर्दी होती. त्यांच्यापैकीं कोणाच्या हातांत वनगाईचीं पुच्छें, कोणाच्या हत्तीचे दांत, कोणाच्या सिंहाचीं व वाघाचीं कातडीं, कोणाच्या मांस, कोणाच्या मोराचीं पिसें; अशा अनेक वस्तु होत्या !

याप्रमाणें त्या लोकांस पाहिल्यावर माझ्या मनांत आलें कीं, कायहो या लोकांचें जिणें आणि आचरण! याप्रमाणें मनांत येत आहे तों तो भिल्लांचा नायक विश्रांतिकरितां त्याच शाल्मलीवृक्षाखालीं आला. मग सेवकानें आणून दिलेलें उदक प्राशन करून व कांहीं वेळ विश्रांति घेऊन तो परिवारासह निघून गेला.

त्यांच्यापैकींच एक म्हातारा भिल्ल मागें राहिला होता. त्याला त्या दिवशीं मांस मिळालें नव्हतें, म्हणून ते सर्व निघून गेल्यावर तो त्या शाल्मली-वृक्षाकडे टक लावून पाहूं लागला. त्या वेळीं तो आपल्या नेत्रांनीं आमचीं आयुष्यें पितोच आहे काय असें वाटलें ! मग तो वृक्ष अत्युच्च होता तरी त्यावर पायऱ्यांनीं चढावें याप्रमाणें तो सहज चढला. आणि जशीं काय त्या झाडाचीं फळेंच तोडतो आहे काय ? अशा रीतीनें चहूंकडचीं घरट्यांत असलेलीं राघूंचीं पिलें काढून व त्यांच्या माना मुरगाळून त्यांनां तो खालीं टाकून देऊं लागला ! तें पाहून माझा बाप भयानें थरथर कांपूं लागला. पुढें काय करावें हें त्यास सुचेनासें झालें. मग ममतेमुळें मला पंखांच्या आंत झाकून तो पोटाशीं घट्ट धरून बसला. इतक्यांत तो दुष्ट काळ आमच्या घर-ट्याजवळ येऊन त्यानें कृष्णसर्पासारखा आपला हात आमच्या घरट्यांत घातला! त्यावेळीं माझ्या बापानें गोंगाट करून त्याच्या हातास चोंचीनें प्रहार केले. तरी त्या अधमानें त्यास न सोडतां घरट्याबाहेर काढून मारलें व त्यास खालीं टाकून दिलें ! माझ्या आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळें त्याजबरोबर मी पानांच्या ढिगावर पडलों. त्यामुळें मला इजा झाली नाहीं. जोंपर्यंत तो दुष्ट खालीं आला नाहीं तोंपर्यंत प्राण वांचवावे असें माझ्या मनांत

येऊन मी हळूच सरकत सरकत कांहीं अंतरावर गेलों. प्रिय पित्याची ती अवस्था पाहून प्राणत्याग करण्यासच योग्य, असा तो समय असतां तितका समज नसल्यामुळें मी घाबरून तेथें एक तमालवृक्ष होता त्याच्या बुंध्यांत जाऊन दडून बसलों ! तेव्हां दुसऱ्या पित्याच्या मांडीवरच येऊन बसलों असें मला वाटलें ! पुढें तो भिल्ल खालीं उतरून व मारून टाकलेलीं पिलें गोळा करून धावत धावत निघून गेला. पितृमरणदुःखानें व उंचून पडल्यामुळें माझें सर्वांग कांपत होतें. घसा कोरडा पडल्यामुळें आतां जीव जातोसें वाटत होतें. गवताची काडी हालली तरी तो दुष्ट फिरून आला कीं काय असें मला भासत होतें. मग पाणी पिऊन तहान भागवावी ह्मणून अनुमानानें सरोवराकडे मी चालूं लागलों. चालण्याची सवय नसल्यामुळें वारंवार तोंडघशीं पडूं लागलों. नाकातोंडांत व डोळ्यांत माती शिरून जीव घाबरा होऊं लागला. त्यावेळीं माझ्या मनांत आलें कीं, किती जरी हाल झाले तरी प्राण्यास जीविताशा सुटत नाहीं ! माझा प्रियपिता परलोकास गेला तरी मी आपल्या जीवाचें रक्षण करीत आहें! धिक्कार असो मला! पुढें पाणी पाहत चाललों तों सरोवर बरेंच दूर असावें असें वाटलें. दोन प्रहर झाल्यामुळें सूर्य जसा काय ठिणग्यांचा वर्षावच करीत आहे असें वाटलें! मला चालवेनासें होऊन डोळ्यांपुढें अंधारी येऊन दुष्टदैव एकदाचें मरण देईल तर बरें असें वाटूं लागलें !

त्याच वनांत **जाबालि** नांवाचे महर्षि राहत होते. त्यांचा पुत्र **हारीत** हा शिष्यांसह त्या मार्गानें स्नानास चालला होता. सत्पुरुषांचीं मनें कारण नसतांहि दयार्द्र असतात ! माझी तशी अवस्था पाहून **हारीत**ऋषीस दया येऊन तो ह्मणाला ' अरे, हें राघूचें पिलू येथें पडलें आहे, याला आपली मान देखील सावरून धरतां येत नाहीं. तर याच्यांत थोडी धुगधुगी आहे तोंपर्यंत यास पाण्याजवळ तरी घेऊन जाऊं ! ' असें बोलून त्यानें मला सरोवराजवळ नेलें. माझी हालचाल त्याच्या दृष्टीस न पडल्यामुळें तो फारच घाबरा झाला व त्यानें उदकाचे थोडे थेंब माझ्या तोंडांत सोडले ! त्यामुळें मी सावध झालों, तेव्हां त्यास बरें वाटलें. मग त्यानें मला थंड छायेंत ठेविलें व आपण स्नानास गेला. सर्व कर्मे आटोपल्यावर तो मला घेऊन तपोवनाकडे गेला. तेथें एक रमणीय आश्रम माझ्या दृष्टीस पडला. त्या आश्रमासभोंवतीं पुष्कळ फळझाडें व फुलझाडें होतीं. आश्रमांत व बाहेर

 11 JAN 1994

ऋषिजन दिसत होते. कांहीं शिष्य समिधा, फुलें व दर्भ घेऊन येत होते. कोणी वेदशास्त्रांचे पाठ ह्मणत होते. होमहवनांच्या धुराचे लोट आकाशांत चालले होते. आश्रमाजवळ स्वच्छ उदकाचीं सरोवरें होतीं. त्यांत अनेक कमलें प्रफुल्लित झाल्यामुळें त्या ठिकाणीं ग्रह व नक्षत्रें स्नान करण्याकरितांच आलीं आहेत काय असें भासत होतें! आश्रमापुढें तृणधान्यें वाळत होतीं. वेदशास्त्रांचे पाठ ऐकून राघू व सारिका तसेच शब्द उच्चारीत होते! हरिणी निर्भयपणानें मुनिबालकांस चाटीत होत्या!

त्या आश्रमाच्या मध्यभागीं अशोकवृक्ष होता. त्याच्याखालीं जाबालि नांवाचे महर्षि बसले होते. त्यांच्या मस्तकावर शुभ्र व लांब लांब जटा लोंबत होत्या. खांद्यावर शुभ्र यज्ञोपवीत होतें, उजव्या हातांत स्वच्छ स्फटिकमण्यांची माळ फिरत होती. अशा महर्षींला पाहून हें स्थान धन्य आहे असें मला वाटलें! त्या ऋषीच्या सामर्थ्यानें तें अरण्य अगदीं निर्वैरसें दिसत होतें!

हारीतऋषीनें मला ह्याच अशोकवृक्षाच्या छायेंत एका बाजूस आणून ठेवलें व तो आपल्या पित्याजवळ दर्भासनावर बसला. "हा शुकबालक कोठून आणला?" असें सर्व ऋषींनीं विचारल्यावर त्यानें त्यांस वर्तमान सांगितलें. मग जाबालि मजकडे पाहून "हा आपल्या दुर्वर्तनाचें फळ भोगीत आहे!" असें म्हणाले! तें ऐकून सर्व ऋषि उत्कंठित होऊन म्हणाले "भगवन्, असें यानें पूर्वजन्मीं काय केलें! व हा कोण होता! हें ऐकण्याची आह्मांला फार उत्कंठा वाटत आहे, याकरितां कृपा करून सांगावें." ते म्हणाले "आतां स्नानाची वेळ झाली आहे, याकरितां सर्व कर्में आटोपल्यावर मग मी याचें चरित्र सांगेन" असें ह्मणून सर्व मंडळीसह जाबालि उठले.

पुढें सायंसंध्यादि कर्में आटोपल्यावर हारीतऋषि मला घेऊन ज्या ठिकाणीं आपला पिता बसला होता त्या ठिकाणीं गेला. सर्व ऋषिहि त्या ठिकाणीं येऊन बसले. त्यावेळीं जिकडे तिकडे स्वच्छ चंद्रिका पडल्यामुळें तें स्थान फारच रमणीय दिसत होतें! मग सर्वांची उत्कंठा पाहून जाबालिऋषींनीं माझें पूर्ववृत्त सांगण्यास आरंभ केला.!

ते ह्मणाले,—"अवंतीदेशांत उज्जयिनी नांवाची एक अत्युत्तम नगरी आहे. भगवान् महाकाल शंकर याचें तेथें स्वयंभू स्थान आहे. तेथील

देवालयाचे कळस सोन्याचे आहेत. त्यांवर शुभ्र ध्वज उभारलेले असून ते वायूच्या योगानें हालत असल्यामुळें, ज्यांच्यावर **गंगे**चे प्रवाह चालले आहेत, अशीं हीं **हिमालया**चीं शिखरेंच आहेत काय असें भासतें ! ठिकठिकाणीं शुभ्र मंदिरें असून तीं केळी, नारळी, यांनीं शोभायमान दिसतात. त्या **उज्जयिनी**नगरीस लागून **शिप्रा**नदी वाहते. तिच्या प्रवाहाच्या लाटा उंच उंच उसळत असल्यामुळें **महाकाला**च्या मस्तकावर बसलेल्या **गंगे**स पाहून ईर्षेनें तरंगरूप भुवया वाकड्या करून आकाशापर्यंत ती उचंबळतेच आहे काय असें दिसतें ! भगवान् **महाकाल कैलास**पर्वत सोडून तेथें वास करतो आहे, तेव्हां तेथील महिमा किती सांगावा !

त्या नगरींत **भगीरथा**दि राजांसारखा महापराक्रमी **तारापीड** नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याची संपत्ति पाहून **विष्णू**चें वक्षःस्थल सोडून साक्षात् **लक्ष्मी** येथेंच वास करीत आहे असें वाटत होतें ! पृथ्वींतील सर्व राजे पराजित झाल्यामुळें हात जोडून त्याच्या पदकमलावर आपले मुकुट वाकवीत असत. त्या राजाचा **शुकनास** नांवाचा प्रधान होता. तो मोठा बुद्धिमान् व राज्यकारभारांत दक्ष असे. त्यानें सर्वत्र दूत ठेविले होते, त्यामुळें कोठें थोडीशी जरी हालचाल झाली तरी ती त्याला कळल्याखेरीज राहत नसे. जिकडे तिकडे स्वस्थता केल्यामुळें राजाला कांहीं काळजी उरली नव्हती. प्रजा शांततेच्या सुखांत असली ह्मणजे राजाला मोठें भूषण असतें ! तो राजा प्रसंगविशेषीं लोकांच्या भेटी घेऊन त्यांचें ह्मणणें ऐकत असे व सिंहासनावर बसून राज्यकारभारहि पहात असे.

**शुकनास**प्रधानानें इतकी उत्तम राज्याची व्यवस्था ठेविली होती कीं त्यामुळें लोकांची प्रीति त्याजवर फारच जडली होती.

राजाचा तारुण्यसुखांत बराच काळ गेला होता तरी संततीचें सुख त्याचे दृष्टीस पडलें नव्हतें, त्यामुळें त्याला सर्व गोष्टींचा तिट्कारा वाटूं लागला ! त्याची **विलासवती** नांवाची एक पट्टराणी होती. एके दिवशीं तो तिच्या मंदिरांत गेला असतां तेथें दासी उभ्या आहेत, वृद्ध स्त्रिया तिचें शांतवन करीत आहेत, व तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहत असल्यामुळें तिचें लुगडें भिजलें आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें ! राजास पाहतांच ती उठून उभी राहिली. राजानें तिला खालीं बसवून आपणहि बसला. तेव्हां तिची ती सशोक मुद्रा पाहून राजा घाबरा झाला. मग आपल्या हातानें तिचे डोळे

 श्रीमंत सौ. मं. पं. बापनाळकर,

पुसून तो ह्मणाला. " प्रिये तूं कशाकरतां शोक करितेस ? मजकडून किंवा कोणाकडून कांहीं अपराध झाला असल्यास सांग. फार काय, हें माझें जीवित तुझ्या हातीं आहे! " असें राजाचें भाषण ऐकून **मकरिका** नांवाची दासी ह्मणाली, " महाराज, आपणाकडून किंवा दुसरे कोणाकडून राणीसाहेबांचा अपराध कोठून होणार ? या दुःखाचें कारण असें आहे कीं, इतके दिवस झाले तरी आपणांस संतति नाहीं, तेव्हां आपलें जीवित व्यर्थ आहे, असें त्यांना वाटतें आहे ! आज महाशिवरात्रीचा दिवस असल्यामुळें राणीसाहेब **महाकालाच्या** दर्शनाकरितां गेल्या होत्या. तेथें **महाभारत** चाललें होतें त्यांत असें निघालें कीं, 'ज्याला पुत्र नाहीं त्याला उत्तम गति नाहीं !' हें ऐकल्यापासून तर त्या फारच कष्टी झाल्या आहेत. आह्मीं किती जरी त्यांची समजूत केली तरी त्या खात नाहींत, पीत नाहींत व कांहीं विचारलें तर नीट सांगत नाहींत ! "

असें तिचें भाषण ऐकून राजा फार दुःखित झाला व मोठ्यानें सुस्कारा टाकून ह्मणाला, " ज्या गोष्टी आपल्या स्वाधीन नाहींत त्याला काय उपाय? आपण किती जरी रडत बसलों तरी काय उपयोग? पुत्रसुख आपल्या नशिबींच नसलें तर त्याला काय करावयाचें ? पूर्वजन्मीं आपण तसें पुण्य केलें नसेल ह्मणून त्याचें असें फळ आपणांला मिळालें ! जसें द्यावें तसें घ्यावें ! अपत्य नसल्यामुळें रात्रंदिवस मलाहि चैन पडत नाहीं. माझें जीवित व राज्य हीं मला अगदीं निष्फल वाटत आहेत. परंतु करायाचें काय ? तर प्रिये ! शोक सोडून दे, धैर्य धर, आणि दानधर्म करीत जा ! " याप्रमाणें सांगून त्यानें तिचे डोळे पुसले व तिचें सांत्वन करून तो आपल्या मंदिरांत गेला.

**विलासवती** ही त्या दिवसापासून देवधर्म करीत काळ घालवूं लागली. पुढें एके दिवशीं पहाटेच्या वेळीं **विलासवतीच्या** मुखांत चंद्र प्रवेश करीत आहे ! असें राजानें स्वप्नांत पाहिलें. मग तें स्वप्न त्यानें **शुकनासास** सांगितलें. तो ह्मणाला, " महाराज ! यावरून थोडक्याच दिवसांत पुत्रमुख आपल्या दृष्टीस पडणार! मलाहि आज असें स्वप्न पडलें कीं, एक दिव्याकृति ब्राह्मण येऊन त्यानें एक कमल माझ्या स्त्रीस दिलें. अशीं सुचिन्हें दृष्टीस पडलीं तेव्हां आपणास पुत्रप्राप्ति खचित होणार ! " मग राजा **विलासवतीकडे** गेला व त्यानें तिला तें स्वप्न सांगून आनंदित केलें.

कांहीं दिवसांनीं राणीस गर्भ राहून ती केतकीसारखी शुभ्र दिसूं लागली! राणीच्या दासींत अति चतुर अशी **कुलवर्धना** नांवाची दासी होती. तिच्या दृष्टीस तीं चिन्हें पडतांच ती राजाकडे गेली व मोठया आनंदानें तिनें त्यास तें वर्तमान सांगितलें! तेव्हां राजास फारच आनंद झाला. मग तो हास्यमुद्रेनें **शुकनासाच्या** मुखाकडे पाहूं लागला. **शुकनासानें** राजाचें व **कुलवर्धनेचें** मुख प्रफुल्लित पाहूनच आपले मनांत ताडिलें. मग तो राजाजवळ गेला व स्वप्न खरें झालें ना? असें ह्मणाला. तें ऐकून राजा हसत ह्मणाला, "कुलवर्धनेनें सांगितलेलें वर्तमान खरें असेल तर स्वप्न खरेंच ह्मणावयाचें!" मग राजानें आपले अंगावरील अलंकार तिला बक्षीस दिले व तो घाईनें **विलासवतीचे** मंदिराकडे गेला. तें मंदिर अनेक पदार्थांनीं सुरक्षित केलें होतें व नवीन चुना दिल्यामुळें पांढरें शुभ्र दिसत होतें. **विलासवतीच्या** पलंगा-भोंवतीं वृद्ध व जाणत्या स्त्रिया बसल्या होत्या.

राजाची स्वारी दृष्टीस पडतांच **विलासवती** मोठया प्रयासानें उठावयास लागली. तेव्हां राजा ह्मणाला, प्रिये पुरें कर, आतां उठूं नको! असें ह्मणून तो त्याच पलंगावर जाऊन बसला व ह्मणाला, "**कुलवर्धनेनें** आनंदाचें वर्तमान सांगितलें तें खरेंचना!" तेव्हां ती लाजून खालीं तोंड घालून बसली राजा पुनःपुनः विचारूं लागला तेव्हां ती ह्मणाली, "मला उगीच मेले वारंवार लाजवावयाचें हें काय!" तेव्हां आपली स्त्री गरोदर आहे अशी राजाची खात्री होऊन त्यास फार आनंद झाला मग तो त्या दिवशीं **विलास-वतीच्या** मंदिरांतच राहिला. पुढें तिला डोहळे लागले ते सर्व राजानें पुरविलें व त्यामुळें तिचें अंतःकरण फारच संतुष्ट राहिलें. नऊ महिने पुरे होऊन प्रसूतीची वेळ जवळ आली, तेव्हां ज्योतिषी बरोबर वेळ समजण्याच्या तयारीस लागले. पुढें उत्तम दिवशीं **विलासवतीस** पुत्र झाला. तेव्हां जिकडे तिकडे आनंदाची गडबड उडाली. त्यावेळीं बाळबाळंतिणीच्या सुरक्षित-पणाकरितां तेथें अनेक उपाय योजले होते. राजानें मोठ्या घाईनें सूतिका-गृहांत जाऊन आपल्या प्रियेनें मांडावर घेतलेल्या पुत्राचें मुखकमल मोठया आनंदानें फार वेळ पाहिलें व आपणास कृतकृत्य मानलें! **शुकनासासहि** फार आनंद झाला. त्यानेंहि राजपुत्रास पाहून त्याचे अंगावर सार्वभौमत्वाचीं लक्षणें दिसत आहेत असें राजास सांगितलें.

इतक्यांत **मंगल** नांवाचा पुरुष त्या ठिकाणीं धावत आला व राजास

म्हणाला महाराज " आपण धन्य आहां! आपले प्रधान **शुकनास** यांनांहि पुत्र झाला!" तें ऐकून सर्वांस आनंदाचें भरतें आलें. मग राजा **शुकनासा**-बरोबर त्याचे घरीं गेला व तेथें त्यानें मोठा आनंदोत्सव करविला. राजानें मोठ्या थाटानें षष्ठीजागर केला व दहावे दिवशीं मोठा दानधर्म केला. त्यानें आपल्या पुत्राचें **चंद्रापीड** असें नांव ठेविलें व **शुकनासानें** आपल्या पुत्राचें **वैशंपायन** असें ठेवलें.

ते मुलगे थोडे मोठे झाल्यावर **तारापीडानें** आपल्या पुत्राचें लक्ष विद्ये-कडे लागावें म्हणून नगराबाहेर शिप्रानदीचे कांठीं विद्यालय बांधविलें व त्या ठिकाणीं विद्वान् गुरूंची योजना करून **चंद्रापीड** व **वैशंपायन** यांस तेथें नेऊन ठेविलें. तेथें गुरुपुत्रांखेरीज फारसे दुसरे लोक नव्हते. पुढें **चंद्रापीड** हा अल्पकाळांतच विद्या व कला यांत प्रवीण झाला, त्यामुळें त्याच्या गुरूंस फार धन्यता वाटली. **वैशंपायन**हि तसाच विद्या व कला यांत निष्णात झाला व आपल्या सद्गुणांमुळें तो **चंद्रापीडाचें** विश्वासस्थान झाला.

**चंद्रापीडाचा** विद्याभ्यास पुरा होऊन तो तारुण्यांत आला, असें पाहून गुरूंनीं त्यास घरीं जाण्यास सांगितलें. राजानें चांगला दिवस पाहून **बला-हक** सेनापतीस **चंद्रापीडास** घरीं घेऊन येण्यास सांगितलें. तो राजपुत्र व सैन्य यांसह विद्यामंदिरांत गेला व त्यानें **चंद्रापीडास** राजाची आज्ञा कळविली. मग बसण्याकरितां आणलेल्या **इंद्रायुध** अश्वाची समुद्रापासून उत्पत्ति सांगून " हा अश्व **पारसीक**देशच्या राजानें महाराजास नजर केला " असें सांगितलें. **चंद्रापीडानें** त्या अश्वास आंत आणण्यास सांगितलें. त्यास पाहून **चंद्रापीडास** फारच आश्चर्य वाटून सर्व पृथ्वींत माझ्या पित्याचें ऐश्वर्य सर्वांपेक्षां मोठें असें त्यास वाटलें. तो म्हणाला,—" समुद्रानें हा अश्व न दाखवितां भलताच अश्व दाखवून खरोखरच **इंद्रास** फसविलें! याची आकृति व तेज फारच अलौकिक असल्यामुळें हा कोणी देवांश असावा असें वाटतें!"

मग आपल्या गुरूंस नमन करून व विचारून तो अश्वावर बसला. त्यावेळीं त्यास सर्व त्रैलोक्य अगदीं अल्पसें वाटून तो बाहेर आला व तेथें आलेल्या सर्व राजपुत्रांचे व सैनिकांचे मुजरे घेऊन त्यानें त्यांस आनंदित केलें. नंतर तो तेथून निघून नगरांत गेला. तेथें **चंद्रापीडास** पाहण्याकरितां मोठी गर्दी जमली होती. **वैशंपायन**हि घोड्यावर बसून त्याजबरोबर चलला होता. त्यास पाहून आपण मोठे पुण्यवान् व धन्य आहों असें लोकांस वाटलें. **चंद्रापीडरूपानें**

हा साक्षात् **नारायणच** अवतरला आहे असें त्यांनां वाटून त्यांनीं त्यास नमस्कार केले नगरांतील खिडक्यांचीं दारें भराभर उघडल्यामुळें त्यास पाहण्याकरितां नगरानें आपले डोळेच उघडले काय असें वाटलें! सर्व स्त्रिया आपापलीं कामें टाकून **चंद्रापीडास** पाहण्याकरितां आल्यामुळें सर्व शहर नारीमय व लावण्यमय असें दिसूं लागलें! स्त्रियांनीं **चंद्रापीडाच्या** अंगावर लाह्या व फुलें उधळलीं! मग तो राजवाड्यापाशीं आल्यावर घोड्यावरून खालीं उतरला. पुढें तो **वैशंपायनाचा** हात धरून राजवाड्यांत चालला तेव्हां **बलाहक** सेनापति त्याच्या-पुढें चालला होता. त्याठिकाणीं अनेक हत्ती, घोडे, शिपाई, कारकून, न्यायाधीश, मांडलिक राजे व शस्त्रास्त्रांचीं ठिकाणें यांस पहात पहात ज्या ठिकाणीं आपला पिता होता तेथें तो गेला. **चंद्रापीड** व **वैशंपायन** यांनीं नमन केल्यावर राजानें त्यांस आलिंगन करून आपल्याजवळ बसविलें. राजानें कुशल विचारल्यावर " तुझी माता तुझी फार वाट पहात आहे, याकरितां तिला अगोदर भेट. " असें पित्याचें भाषण ऐकून तो **वैशंपायना**-सह आपल्या आईकडे गेला व तिला नमस्कार करून उभा राहिला.

**विलासवतीनें** **चंद्रापीडास** जवळ घेऊन त्याच्या अंगावर हात फिरवून ह्मणाली, " बाळा, तुझा पिता खरोखरच फार निष्ठुर आहे ह्मणूनच त्यानें तुला इतके दिवस दूर ठेविलें ! तुझें धैर्यहि मोठेंच ह्मणावयाचें, कीं तूं खेळ-ण्यासवरण्याचें सोडून विद्याभ्यासांतच गढून राहिलास ! असो. तूं विद्येनें भूषित जसा दृष्टीस पडलास, तसाच तुला साजणाऱ्या स्त्रीनें युक्त केव्हां दृष्टीस पडशील कोण जाणे ! " असें आईचें भाषण ऐकून **चंद्रापीडास** हसूं आलें. मग तो **वैशंपायनासह** **शुकनास** प्रधानाकडे गेला. मग दोघांनीं नमस्कर केल्यावर **शुकनासानें** त्यांस आलिंगन दिलें व जवळ बसविलें. मग त्यानें वस्त्रालंकरांनीं **चंद्रापीडाचा** सन्मान करून मोठा आनंद प्रदर्शित केला. तेथून ते दोघे **मनोरमाबाई** ( प्रधानस्त्री ) कडे गेले व तिला भेटून **चंद्रापीड** आपल्या मंदिरांत गेला.

**चंद्रापीड** दररोज आपल्या पित्याकडे जाऊन त्यानें सांगितलेल्या गोष्टी लक्षांत ठेवित असे. तो **वैशंपायन** व इतर राजपुत्र यांजबरोबर अनेक शास्त्रीयविषयांची चर्चा करी व व्यायाम व मृगया करण्यासहि जात असे.

एके दिवशीं सकाळींच **कैलास**नांवाचा चोपदार एक सुंदर कन्या बरोबर घेऊन **चंद्रापीडाकडे** आला आणि ह्मणाला. " राणीसाहेबांनीं सांगि-

तलें आहे कीं, महाराजांनीं कुलूतराजास जिंकलें, तेव्हां त्याची ही कन्या बंदी केलेल्या लोकांत सांपडली. ही अनाथ समजून मीं हिचें मुलीप्रमाणें पालन पोषण केलें. ही तुझी सेवा करण्यास योग्य समजून तिला तुजकडे पाठविलें आहे, तर तूं हिचें चांगलें संगोपन करावेंस." असें सांगून तो गेला. त्या दिवसापासून पत्रलेखा नेहमीं चंद्रापीडाच्या सेवेंत तत्पर राहिली.

पुढें कांहीं दिवसांनीं चंद्रापीडास यौवराज्याभिषेक करावा, असें राजाच्या मनांत येऊन त्यानें सेवकांस अभिषेकाची तयारी करण्यास आज्ञा केली. त्यावेळीं चंद्रापीड शुकनास प्रधानाच्या भेटीस गेला असतां त्यानें त्यास उपदेश केला आहे. तो ह्मणालाः—"बाबा चंद्रापीडा! तूं चांगलें शास्त्राध्ययन केलें आहेस, तेव्हां तुला उपदेश करण्यासारखें कांहीं राहिलें आहे असें नाहीं. तथापि मला थोडेंसें सांगणें अवश्य आहे.

संपत्ति, तारुण्य, सौंदर्य आणि अधिकार यांपैकीं एक देखील मनुष्यास उन्मत्त करतें! मग सर्वच एके ठिकाणीं जमल्यावर काय विचारावें? याकरितां सावध रहा. तूं सुज्ञ आहेस, तेव्हां तुला फार सांगणें नको. तुझा पिता तुला यौवराज्याभिषेक करणार आहे, ह्या उत्सवाचा तूं अनुभव घे; राज्यकारभार नीट चालीव व शत्रूंस नम्र कर. प्रतापानें प्रकाशित होण्याचा हा तुझा समय आहे." इत्यादि उपदेश ऐकून चंद्रापीडास आनंद वाटला व तो शुकनासास विचारून आपले मंदिरीं गेला.

पुढें अभिषेकाचा सुदिन प्राप्त झाला, तेव्हां सर्व तयारी झाली. राजानें अनेक पुण्यतीर्थें आणवून व तीं मंत्रपूत करवून पुत्रास यौवराज्याभिषेक करविला. अभिषेक होतांच जशी एकादी लता एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर चढून जाते, त्याप्रमाणें तारापीडास न सोडतां राज्यलक्ष्मीनें चंद्रापीडावरहि आक्रमण केलें!

चंद्रापीडाची शरीरसंपत्ति अगोदरच उत्तम, त्यांत राज्यलक्ष्मीच्या कांतीनें त्यावर विशेषच शोभा दिसूं लागली! सिंहासनावर बसल्यावर त्यानें जमलेल्या सर्व लोकांचा सन्मान करून त्यांनां संतुष्ट केलें. इतक्यांत दिग्विजयास निघण्याचा चौघडा वाजूं लागला. तेव्हां चंद्रापीड सिंहासनावरून उठला. त्यावेळीं सर्वांनीं जयजयकार केला. मग चंद्रापीड राजपुत्रांसह बाहेर पडला.

तेथें उत्तम शृंगारलेल्या हत्तीवर पत्रलेखा अगोदरच जाऊन बसली होती, त्या हत्तिणीवर चंद्रापीड बसून नगराबाहेर गेला. चंद्रापीडाच्या

मुकुटावरील माणकांचे किरण सभोंवतीं पसरल्यामुळें जशी काय सर्व जगांतील राजलक्ष्मी त्याजकडे येत असल्यामुळेच तिच्या पायाचा हा अलिता भूमीस लागला आहे काय असें भासत होतें ! बाहेर तर पुष्कळच मांडलिक राजे व सैनिक उभे होते. सेनापतीनें सर्वांचीं नांवें सांगितल्यावर ते त्यास प्रणाम करून त्याजबरोबर चालूं लागले. हाजारों हत्ती, घोडे, व पायदळ चालत असल्यामुळें हा समुद्राचा लोटच चालला आहे असें भासत होतें. **वैशंपायन**हि हत्तिणीवर बसून **चंद्रापीडा**बरोबर चालला होता. चतुरंग सैन्यानें पृथ्वी अगदीं गजबजून गेल्यामुळें आणि छत्रें, ध्वज, व भाले यांनीं आकाश व्याप्त झाल्यामुळें तेथें विलक्षण शोभा दिसत होती. धूळ तर इतकी उडाली होती कीं, तीमुळें सूर्यबिंब अगदींच निस्तेज दिसूं लागलें! तेव्हां सैन्याचा भार सहन न झाल्यामुळें पृथ्वी **ब्रह्मदेवास** शरणच जात आहे काय असें भासलें ! मग **वैशंपायन चंद्रापीडास** ह्मणाला. ‘ ह्या अपरिमित सैन्यामुळें पृथ्वीस खरोखरच **कौरव** व **पांडव** यांच्या सैन्याची आठवण होत असेल ! ’ याप्रमाणें ते बोलत चालले. पुढें उतरण्याचें ठिकाण येतांच त्या ठिकाणीं सैन्यासह ते उतरले.

दुसरे दिवशीं चंद्रपीडाची स्वारी पुढें चालली. दररोज नवीन नवीन राजे त्यास येऊन भेटूं लागल्यामुळें त्याचें सैन्य फारच वाढत चाललें. मग शत्रूंचा पराभव करीत व करभार घेत, तो पृथ्वी जिंकीत चालला. त्यानें तीन वर्षांत बहुतेक पृथ्वी जिंकली. मग आपलें सैन्य फारच थकलें होतें ह्मणून तो विश्रांतीकरितां **कैलास**पर्वताजवळ तळ देऊन राहिला.

एके दिवशीं **चंद्रापीड इंद्रायुधावर** बसून मृगया करीत असतां तेथील पर्वताच्या शिखरावरून खालीं उतरलेलें एक किन्नरांचें जोडपें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यास त्याचें मोठें कौतुक वाटून तो त्याचे मागें लागला. मग त्याचा पाठलाग करीत चालला असतां तें भिऊन पर्वतावर चढून एकाएकीं दिसेनासें झालें ! तेव्हां तो इकडे तिकडे पाहूं लागला तों आपण कोणीकडे आलों हें त्यास कांहींच कळेना. मग तो आपल्याशीं बोलूं लागला. तो ह्मणाला—“ काय पहा मीं किती वेडेपणा केला हा ! पृथ्वी जिंकिण्याचें काम पुरें न करतां आपले लोक सोडून मी मृगयेच्या नादानें कोणीकडे येऊन पडलों ! येथें कोणी मनुष्य दिसत नसल्यामुळें **सुवर्णपुर**चा रस्ता तरी कोणास पुसावा ? **सुवर्णपुर** हें उत्तरदेशाच्या सीमेवर आहे, याकरितां आतां

तिकडे जावें हें बरें. " इतक्यांत त्याचे मनांत आलें कीं, ऐन दोन प्रहर भरले असल्यामुळें ऊन फारच कडक पडलें आहे, व इंद्रायुधहि फार थकला आहे, याकरितां यास कांहीं वेळ चरूं द्यावें व पाणी पाजावें आणि आपणहि स्नान करून उदक प्राशन करावें. नंतर ऊन कमी झालें ह्मणजे परत जावें. असा विचार करून तो उदकाचा शोध करीत अच्छोदसरोवराकडे गेला.

तें सरोवर फारच विस्तीर्ण असून सुगंधि व शीतल जलानें परिपूर्ण भरलें होतें. त्यांत अनेक कमलें प्रफुल्लित झालीं होतीं व त्यांवर भ्रमर गुंजारव करीत फिरत होते. अनेक वृक्ष व लता यांनीं त्या सरोवराचे आसमंताद्भागचा प्रदेश अगदीं हिरवागार दिसत होता. अनेक प्रकारचे पक्षी त्या ठिकाणीं विहार करीत होते. असें सरोवर पाहतांच चंद्रापीडाचे सर्व श्रम दूर झाले. मग तो आपल्या मनांत ह्मणाला, किन्नराचे मागें लागल्यामुळें हें सरोवर माझ्या दृष्टीस पडलें, व त्यामुळें झालेल्या इतक्या श्रमाचें सार्थक्य झालें. ह्या सरोवराचें उदकहि किती गोड आहे ह्मणून सांगावें ! असें अमृततुल्य उदक असतां ब्रह्मदेवानें आणखी अमृत कशाकरितां उत्पन्न केलें कोण जाणे ! मग त्या सरोवराचे दक्षिणतीरावर जाऊन त्यानें घोड्याचें खोगीर काढलें. मग घोड्यानें जमिनीवर लोळून हिरवें गवत खाल्ल्यावर त्यानें त्यास पाणी पाजलें; व आपणहि स्नान करून उदक प्राशन केलें. मग तो एका लतामंडपाखालीं शिलातलावर स्वस्थ पडला असतां इतक्यांत उत्तरेकडून गायनाचा सूर त्याचे कानीं आला. तेव्हां अशा शून्य अरण्यांत गायनाचा सूर कोठला? ह्मणून त्यास फारच नवल वाटलें. आणि हा सूर कोठून येतो आहे हें पहावें, या हेतूनें तो इंद्रायुधावर बसून त्या दिशेकडे चालूं लागला. पुढें नादलुब्ध हरणें धावत चाललीं होतीं, त्यामुळें तीं त्यास वाटच दाखवीत चाललीं आहेत कीं काय असें भासत होतें ! वाटेनें अनेक प्रकारच्या पुष्पांचा मधुर सुवास सुटला होता. भ्रमर गुंजारव करीत फिरत होते. शीतल व सुगंध वायु वाहत असल्यामुळें मनास फार आनंद होत होता. हारीत, कोकिल, चकोर इत्यादि पक्ष्यांचे मधुर शब्द ऐकूं येत होते. शेकडों राघू व वानर झाडांवरून फळें खात बसले होते. मयूरांचे थव्यांचे थवे दृष्टीस पडत होते. अशा प्रकारची तो शोभा पहात चालला असतां एक शुभ्र देवालय त्याचे दृष्टीस पडलें. त्या ठिकाणीं केतकीचीं बनें प्रफुल्लित झालीं होतीं. त्यांतील परागानें चंद्रापीडाचें अंग शुभ्र झाल्यामुळें शंकराच्या दर्शनाकरितां हा भस्म लावूनच

चालला आहे असें भासलें ! मग तो घोड्यावरून उतरून देवालयांत गेला. त्या ठिकाणीं महादेवाचें लिंग त्याचे दृष्टीस पडलें. त्याच्या समोर शंकराची आराधना करीत असलेली एक प्रौढ कन्या त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां शंकरास प्रसन्न करण्याकरितां ही रतिच तप करीत आहे कीं काय असें त्यास वाटलें ! तिची मूर्ति शिवलिंगांत प्रतिबिंबित झाल्यामुळें ही शिवसारूप्यच पावली काय असें वाटत होतें ! ती तारुण्यभरांत होती तरी निर्विकार दिसत होती. ती वीणा वाजवीत शिवगुणानुवर्णन करीत होती, त्यामुळें ही साक्षात् गंधर्वविद्याच शंकराची आराधना करीत आहे असें भासत होतें !

चंद्रापीडानें शंकरास नमन केल्यावर तो विस्मय पावून आपल्या मनांत ह्मणाला, काय ज्या कधीं स्वप्नीं सुद्धां आल्या नाहींत अशा अतर्क्य गोष्टी पहा कशा जमून आल्या त्या ! तर आतां ही दिव्य स्त्री जर गुप्त होणार नाहीं तर ‘ तूं कोण व या वयांत अशी वृत्ति धारण करण्याचें कारण काय?’ असें मी तिला विचारीन. मग, तो तिचें गाणें संपण्याची वाट पहात उभा राहिला. कांहीं वेळानें गाणें संपून तिनें महादेवास नमस्कार करून प्रार्थना केली, व ती तेथून उठून मंडपांत आली, तों तेथें तो तिच्या दृष्टीस पडला. मग ती त्यास ह्मणाली, अशा थोर पुरुषाचें इकडे येणें कशाकरितां झालें असेल तें असो ! तर आतां उठावें व मजबरोबर येऊन अतिथिसत्कार स्वीकारावा. तेव्हां चंद्रापीडानें अतिनम्रतेनें तिच्या ह्मणण्याचा स्वीकार केला व तो तिच्या मागून लीनतेनें चालला. पुढें कांहीं अंतरावर एक गुहा त्याचे दृष्टीस पडली. तिच्या पुढें वृक्ष व लता यांची फार दाटी होती. स्वच्छ उदकाचे प्रवाह गुहेजवळ पडत असल्यामुळें ती बर्फानें आच्छादित झाल्यासारखी दिसत होती. त्या कन्येनें गुहेंत जाऊन आपली वीणा ठेवली. मग द्रोणानें झऱ्यांतील उदक घेऊन ती चंद्रापीडास अर्घ्य अर्पण करण्यास आली. तेव्हां तो ह्मणाला, “ एवढा सत्कार कशाला पाहिजे ? आपल्यासारख्याच्या दर्शनानेंच मी धन्य आहें. ” असें त्यानें ह्मटलें तरी तिनें त्याचें पूजन केलें. त्यानेंहि नम्रपणानें त्याचा स्वीकार केला. चंद्रापीडाचें आदरातिथ्य केल्यावर ती जवळच दुसऱ्या शिलेवर बसली. थोडें भाषण झाल्यावर तिनें हातांत भिक्षापात्र घेऊन फलवृक्षांकडे जातांच आपोआप पडत असलेल्या फळांनीं तिचें भिक्षापात्र भरलें ! मग तीं फळें तिनें त्यास परमादरानें अर्पण केलीं. तें पाहून चंद्रापीडाच्या मनांत आलें कीं तपःसामर्थ्यास

दुष्प्राप ह्मणून कांहींच नाहीं ! पहा, अचेतन वृक्ष देखील हिला फळें अर्पण करितात ! मग तीं मधुर फळें भक्षण करून व उदक प्राशन करून तो पुनः शिळेवर जाऊन बसला. त्या कन्येनें फलाहार करून ती तेथें दुसऱ्या शिलेवर येऊन बसली. मग तो तीस ह्मणाला " आपण अनुग्रह केल्यामुळें मला विचारावेंसें वाटत आहे, तर कांहीं हरकत नसेल तर आपला सर्व वृत्तांत सांगण्याची कृपा करावी. देव, ऋषि, गंधर्व यांपैकीं कोणत्या कुळास भगवतीनें भूषित केलें आहे? तारुण्यांत अशा विरक्ततेचें कारण काय?" असें त्याचें भाषण ऐकतांच तिच्या नेत्रावाटें अश्रूचे लोट वाहूं लागले. तें पाहून चंद्रापीडाच्या मनांत आलें, काय कर्मभोगानें कोणासच सोडलें नाहीं ! मग ती मोठ्यानें सुस्कारा टाकून ह्मणाली, " महाराज ! मज मंदभागिनीचें वर्तमान ऐकण्याची आपणास इच्छा आहे तर सांगतें ऐकावें:—

देवलोकीं अप्सरांचीं चवदा कुळें आहेत. दक्षप्रजापतीच्या मुलींत मुनि व अरिष्टा अशा दोन कन्या होत्या. मुनीला चित्रसेनादि पुत्र झाल्यावर सोळावा चित्ररथ झाला. पुढें इंद्राचें व त्याचें मित्रत्व होऊन त्यास सर्व गंधर्वाधिपत्य मिळालें. त्याचें राहण्याचें ठिकाण येथून जवळच हेमकूटपर्वतावर आहे. दुसरी कन्या अरिष्टा. हिला सात पुत्र झाले. त्यांत वडील पुत्र हंस होय. त्याला चित्ररथानें दुसऱ्या कुळाच्या राज्यपदीं बसविलें. तोहि तेथेंच राहतो. चंद्रकुळापासून उत्पन्न झालेल्या अप्सरांच्या कुळांत गौरी नांवाची कन्या उत्पन्न झाली. तिचा हंसानें स्वीकार केला. मदनाच्या योगानें जशी रति, त्याप्रमाणें हंसाच्या योगानें ती फारच आनंद पावली. त्या थोर स्त्रीपुरुषांच्या पोटीं हजारो दुःखें भोगणारी मी एकटी करंटी कारटी उत्पन्न झालें ! माझ्या पित्यास दुसरें मूल नसल्यामुळें माझ्या जन्मकाळीं त्यानें मोठा उत्सव केला व माझें महाश्वेता असें नाव ठेविलें. पुढें सुखदुःखाचें खरें स्वरूप ज्यांत समजत नाहीं असें लहानपण जाऊन तारुण्यावस्था प्राप्त झाली.

नंतर वसंतऋतूच्या दिवसांत एके दिवशीं मी आपल्या आईबरोबर ह्याच अच्छोदसरोवरावर स्नानाकरितां आलें. त्या वेळीं सरोवरांतील कमलें प्रफुल्लित झाल्यामुळें ह्या ठिकाणीं फारच शोभा दिसत होती ! जिकडे तिकडे मोहोर आल्यामुळें आंब्याचीं झाडें अगदीं वांकलीं होतीं. जागजागीं फुलांचे ढीग पडले होते ! अनेक सुवासिक पुष्पें प्रफुल्लित झालीं होतीं व त्यांचे पराग

पडले होते; त्यांत राजहंस पक्षी क्रीडा करीत होते. मंद, सुगंध व शीतल वायु वाहत होता. अशी अपूर्व शोभा पाहून माझें मन मोहित झालें व मी आपल्या सखीसह ह्या वनांत आनंदानें हिंडूं लागलें. पुढें एकाएकी वायूच्या झुळकेबरोबर फारच मनोहर सुवास आला. त्या सुगंधापुढें सर्व सुवास मला तुच्छ वाटले. मी डोळे मिटून मोठ्या आनंदानें तो सुवास घेत उभी राहिलें व तो कोठून आला ह्मणून शोध करूं लागलें. तों भ्रमरीप्रमाणें आकर्षिलेली अशी मी इकडे तिकडे पाहूं लागलें, तों ह्याच सरोवरावर मित्रासह स्नाना-करितां आलेला एक दिव्याकृति तरुण ऋषिकुमार माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां हा मूर्तिमंत **वसंतच** आहे, कां हा मित्रास भेटण्याकरितां **मदनच** आला आहे, असा तो मला दिसला! त्याच्या कर्णावर एक पुष्पगुच्छ होता. पूर्वी कधीं न पाहिलेला असा तो पुष्पगुच्छ पाहून, जो मनोहर सुवास आला तो ह्याचाच असें मला वाटलें. त्या ऋषिकुमारास पाहिल्यावर 'अति-सौंदर्य निर्माण करणाऱ्या विधात्याचें किती तरी हें कौशल्य! सर्व त्रैलोक्यांत सुंदर जो **मदन** त्यालाहि मागें सारणारा असा हा पुतळा त्यानें उत्पन्न केला आहे!" याप्रमाणें माझ्या मनांत येत आहे तों पुष्पसरानें पराधीन झालेल्या भ्रमरीप्रमाणें तारुण्यांत उत्पन्न झालेल्या **मदन**विकारानें मला पराधीन केलें! त्या कुमाराकडे मी पहात असतां जसें काय दृष्टीनें त्याचें प्राशनच करतें आहें, किंवा त्याच्या शरीरांत प्रवेशच करतें आहें, अथवा हृदयांत मला जागा द्यावी ह्मणून त्याची प्रार्थनाच करतें आहें, अशी माझी स्थिति झाली. तेव्हां काय हें कुलीन कुमारीस कलंक लावणारें नीच कर्म मीं आरंभिलें आहे असें जाणत असूनहि मी आपल्या स्वाधीन राहिलें नाहीं! आणि जशी काय इंद्रियांनीं पुढें ओढीत नेलेली व **मदनानें** मागून लोटलेली अशी मी पुढें गेलें! माझ्या सर्वांगास डवडव घाम सुटला व त्यानें जशी काय माझी लज्जा धुऊनच टाकली! तेव्हां माझ्या मनांत आलें, ऋषिकुमारावर प्रीति बसविणाऱ्या **कामदेवानें** हें कांहीं बरें केलें नाहीं! किंवा बायकांची जातच वेडी ह्मणावयाची! तिला कोठें प्रीति करावी आणि कोठें न करावी हें कांहींच समजत नाहीं! हें कडकडीत तप कोणीकडे आणि ह्या **मदनाच्या** चेष्टा कोणीकडे; याच्या दृष्टीस माझे हे ढंग पडले तर हा मला शापून भस्म करून टाकील! तर आतां जोंपर्यंत मी शुद्धीवर आहें, तोंपर्यंत येथून झट्दिशीं निघून जावें हें बरें! नंतर असें मनांत आलें कीं,

ऋषि हे वंद्य आहेत. याकरितां त्यांस वंदन केल्याखेरीज जाणें हेंहि योग्य नाहीं. मग मीं पुढें होऊन त्यास नमस्कार केला. त्या वेळीं मदनाच्या अमोघ सामर्थ्यानें त्याचीहि वृत्ति चंचल झालेली दिसली! त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले! त्याच्या हातांतील स्फटिकांची माळ थरथर कापूं लागली, व तो एकसारखा टक लावून मजकडे पाहूं लागला! तेव्हां तर माझी जी अवस्था झाली ती तर सांगतां येत नाहीं. मग त्याजबरोबर त्याचा एक मित्र होता त्याजवळ मी गेलें आणि त्यास नमस्कार करून ह्मणालें, महाराज! ह्या आपल्या मित्राचें नांव काय ? व याच्या कानावर पुष्पगुच्छ आहे हा कोणत्या वृक्षाचा आहे ? याचा सुगंध फारच अप्रातिम आहे !

तो ह्मणाला, " तुला या गोष्टीचें काय करावयाचें आहे ? तथापि तुला मोठें कौतुक वाटत आहे तर सांगतों ऐक.—देवलोकीं श्वेतकेतुऋषि आहेत. ते एके दिवशीं स्नान करण्याकरितां गंगेवर गेले असतां कमलवनांत राहणाऱ्या लक्ष्मीनें त्यांस पाहिलें. त्याबरोबर तिला कामविकार होऊन एक कुमार उत्पन्न झाला. तो तिनें त्या ऋषीस अर्पण करून याचें पालन करावें असें ह्मटलें. तेव्हां ऋषीनें दिव्य दृष्टीनें सर्व लक्षांत आणून कमलवनांत त्याची उत्पत्ति झाल्यामुळें त्याचें पुंडरीक असें नांव ठेविलें. व त्याजकडून विद्याभ्यास करविला. तोच हा पुंडरीक ! आतां याच्या कर्णावर जो पुष्पगुच्छ आहे तो कल्पवृक्षाचा आहे. नंतर आह्मी नंदनवनाजवळून ह्या सरोवराकडे येत असतां मार्गांत वसंतलक्ष्मीसह नंदनवनदेवता त्या ठिकाणीं फिरत होती. तिनें हा पुष्पगुच्छ आणून माझ्या मित्रास ह्मटलें, अतिसुंदर अशा या रूपास हा पुष्पगुच्छ अनुरूप आहे; याकरितां याचा स्वीकार करावा ! अशी आपल्या रूपाची स्तुति ऐकून हा लज्जित होऊन तसाच पुढें चालला. तेव्हां मीं यास ह्मटलें, सख्या, हा पुष्पगुच्छ घेण्यास काय दोष आहे ? मग मीं तिच्यापासून तो घेऊन याच्या कानावर ठेवला ! "

याप्रमाणें आमचें बोलणें चाललें असतां तो ऋषिकुमार हासून ह्मणाला, " हे कौतुकवति ! तुला या पुष्पगुच्छाचें मोठें कौतुक वाटत असेल तर हा घे तुला. " असें ह्मणून त्यानें तो माझ्या कानावर ठेवला. त्याचा हस्तस्पर्श होतांच माझी जी अवस्था झाली ती सांगतां येत नाहीं ! माझ्या गालाच्या स्पर्शसुखानें त्याचीहि तशीच अवस्था होऊन लज्जेबरोबर त्याची रुद्राक्षमाळाहि गळून पडत आहे तों मीं मध्येंच तिला झेलून आपले गळ्यांत

घातली ! हें त्याला समजलें सुद्धां नाहीं ! इतक्यांत माझी दासी येऊन मला ह्मणाली, " आईसाहेबांचें अंगधुणें होऊन घरीं जावयाची वेळ झाली, याकरितां लवकर चला. " अशा तिच्या भाषणानें ऋषिकुमाराच्या लावण्यामृतांत गढलेली मी आपली दृष्टि बळेंच काढून स्नानास जाण्यास निघालें! तेव्हां त्या ऋषिकुमाराचें अगदींच धैर्य गळालें, तें पाहून त्याचा मित्र ह्मणाला,"अज्ञान जनांच्या मार्गानें जाणें तुला योग्य नाहीं. अरे ! तें तुझें ज्ञान, तो तुझा निग्रह, तो गुरूंचा उपदेश, हें सर्वच कसें फुकट गेलें ! अरे ! तुला नकळत ही मुलगी तुझी माळ व तिजबरोबर तुझें मनहि घेऊन चालली, हें तुला समजलें सुद्धां नाहीं आं ? अजून तरी तें आवरून धर. " असें भाषण ऐकून तो सलज्ज होऊन ह्मणाला," कपिंजला ! तूं भलतीच काय कल्पना करतोस! या उनाड मुलीचा दांडगेपणा मी कधीं सहन करणार आहे काय ? " मग बळेंच रागावल्यासारखें करून तो ह्मणाला," हे उद्धटमुली ! माझी माळ दिल्याखेरीज येथून जाशील तर खबरदार ! " मग मी गडबडीनें आपल्या गळ्यांतील मोत्यांची माळ काढून " ही घ्या आपली माळ ! " असें ह्मणून त्याचे गळ्यांत घातली व मी तेथून निघून गेलें; तरी माझें सर्व लक्ष त्याजकडे लागलें होतेंच. घरीं गेल्यावर मला कांहीं सुचेनासें झालें. मग हें कोणाला सांगावें ! कोण याचा परिहार करील? अशी मला चिंता पडली. मग मी एकटीच खिडकींत बसून ज्या दिशेकडे तो ऋषिकुमार दृष्टीस पडला होता तिकडे वेड्यासारखी पहात बसलें !

माझी दासी तरलिका बऱ्याच वेळानें माझ्या मागून आली. ती माझी अवस्था पाहून ह्मणाली, बाईसाहेब! तुम्हाला एक गोष्ट सांगतें ती ऐका,—तो ऋषिकुमार आपल्या सोबत्याची नजर चुकवून माझ्या मागें आला आणि त्यानें मला तुमचें नांव,ठिकाण वगैरे सर्व विचारलें.मीहि सर्व त्यास सांगितलें. मग तो म्हणाला, ' मीं तुला एखादी गोष्ट सांगितली तर ती तूं करशील?' मीं म्हटलें ' होय महाराज ! आपल्यासारख्यांचें दर्शन देखील दुर्लभ, मग आज्ञा तर कोठली ? याकरितां आपण मनांत किंतू न आणतां खुशाल सांगावें ! ' मग त्यानें तमालपत्रांचा रस काढून वल्कलाच्या पट्टीवर कांहीं मजकूर लिहून मजजवळ देऊन म्हणाला, ' तुझी यजमानीन एकांतीं असतां ही पत्रिका तूं तिला दे. ' असें तरलिकेचें भाषण ऐकतांच मला मोठाच आनंद झाला. व ती पत्रिका घेऊन पाहूं लागलें तों तींत " माझे पंचप्राण

तूं हिरावून नेलेस ! " अशा अर्थाची आर्या लिहिलेली होती. ती पाहून मी मदनविकारानें अधिकच वेडयासारखी झालें. व मजपेक्षां माझी दासी तरलिका ही धन्य आहे ! असें समजून तिजबरोबर त्या ऋषिकुमाराच्या गोष्टी बोलत बसलें !

पुढें संध्याकाळच्या वेळेस माझी एक दासी येऊन मला म्हणाली, "बाईसाहेब एक ऋषिकुमार दारापाशीं येऊन उभा आहे व रुद्राक्षमाला मागण्याकरितां आलों आहें असें सांगतो आहे. " हें ऐकतांच तोच ऋषिकुमार आला ! असें मला वाटून मला फारच आनंद झाला व मीं त्याला लवकर घेऊन येण्यास सांगून उत्कंठेनें वाट पहात बसलें ! इतक्यांत अत्यंत खिन्न झालेला त्याचा मित्र माझे दृष्टीस पडला. मग मीं त्यास नमस्कार करून आसनावर बसविलें. तेव्हां तो साशंक झालेला पाहून मीं प्रार्थना केली, "महाराज, आपणास जें काय बोलावयाचें असेल तें खुशाल बोलावें, मनांत शंका धरूं नये." मग तो सुस्कारा टाकून म्हणाला, "काय सांगावें ! कंदमूलफलें खाऊन शांतपणानें तपश्चर्येंत काळ घालविणें कोणीकडे, आणि विषयोपभोगानें मलिन अशी कुवासना कोणीकडे ? परंतु दैवानें पहा काय विटंबना मांडिली आहे ती ! परंतु यास उपाय नाहीं ! मित्राचें प्राणरक्षण होण्याकरितां सांगणें भाग आहे. तूं तेथून निघून आल्यावर माझ्या मित्राची जी दुर्दशा झाली ती सांगतां येत नाहीं. मीं त्याला रागें भरून पाहिलें, पुष्कळ उपदेश करून पाहिले, सर्व उपाय केले. परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं कामपीडेनें त्याची प्राणांतक अवस्था पाहून तुजकडे आलों आहे. तर अशा प्रसंगास व अशा प्रेमास जें उचित तें तूं करावें. अधिक सांगण्यास मला कांहीं सुचत नाहीं ! " असें बोलून तो माझ्या तोंडाकडे पहात बसला.

असें त्याचें भाषण ऐकून मी आनंदरसांत बुडाल्यासारखी झालें व मदनानें हा मजवर मोठाच अनुग्रह केला असें मी समजलें !

इतक्यांत एक दासी येऊन ह्मणाली " आपली प्रकृति नीट नसल्याचें समजल्यामुळें राणीसाहेब आपल्या समाचारास येत आहेत. " असें तिचें भाषण ऐकतांच कपिंजल उठला व " माझ्या मित्राचें रक्षण कर, सूर्यास्ताची वेळ झाली, मी आतां जातों. " असें बोलून माझ्या उत्तराची वाट न पाहतां तो गडबडीनें निघून गेला.

मग माझी आई येऊन व कांहीं वेळ मजजवळ बसून माझा समाचार

घेऊन निघून गेली. ती काय बोलली तिकडे माझें मुळींच लक्ष नव्हतें. नंतर संध्याकाळ झाला तेव्हां मी तरलिकेस ह्मटलें. " तरलिके, माझें हृदय फारच व्याकुळ झालें आहे. तर अशा वेळेस मीं काय करावें तें मला सांग तरी बाई ! कपिंजलानें काय सांगितलें तें तूं ऐकिलेंसच, तर आतां मर्यादा, कुल, शील, यांकडे लक्ष देऊन येथेंच रहावें तर ऋषिवधाचें पाप माझ्या माथीं बसेल, " असें बोलत आहे तों इतक्यांत चंद्रोदय झाला. त्यामुळें नवज्वरानें तप्त झालेल्यावर जसा अंगारवर्षाव, तसा मेला हा चंद्र मला वाटूं लागला ! मला मूर्च्छा येऊन मी तरलिकेच्या मांडीवर पडलें असतां मी मदनाच्या हातांतच सांपडलें आहें असें मला वाटलें ! माझी तशी अवस्था पाहून तरलिका फारच घाबरली. मग तिनें चंदनाची उटी तयार करून माझ्या अंगास लावली व ती ताडाच्या पंख्यानें वारा घालीत बसली. मग मी सावध झालें असें पाहून तरलिका माझ्या पायां पडून ह्मणाली, " बाईसाहेब ! आतां कोठवर लज्जा व मर्यादा धरतां ? मला आज्ञा करा ह्मणजे तुमचे वल्लभास मी घेऊन येतें. किंवा तुह्मीच त्याजकडे चला ! " मीं ह्मटलें " बाई तरलिके ! लज्जा व मर्यादा यांना नाहींसें करणारा हा मेला मदन-मित्र चंद्र मला प्रियाकडे किंवा मृत्यूकडे नेण्याकरितां आलाच आहे. तर चल बाई ! जीव आहे तोंपर्यंत मजकरितां दुःख भोगणाऱ्या प्रियजनास भेटूं तरी एकदांचें ! " असें बोलून मी मोठ्या कष्टानें उभी राहिलें, व जाण्यास तयार झालें. इतक्यांत माझा उजवा डोळा लवला. तेव्हां माझ्या मनांत धस्स झालें आणि मी अधिकच घाबरलें !

मग मी बरोबर सुगंधिपुष्पें, तांबूल व उटीचें साहित्य घेऊन तरलिके-बरोबर चाललें. माझ्या गळ्यांत रुद्राक्षमाला होती ती तशीच होती व काना-वर पुष्पगुच्छ होता तोहि तसाच होता. मी आपल्या अंगावरून तांबडे वस्त्र गुंडाळून कोणासहि दिसूं न देतां आपल्या मंदिरांतून निघून प्रमदवनाच्या दारानें बाहेर पडलें आणि झपाट्यानें चाललें तरलिकेवांचून दुसरें कोणी मजबरोबर नाहीं, असें पाहून मीं आपल्या मनांत ह्मटलें, " प्रियाकडे उत्कंठेनें जाणाऱ्या स्त्रीस सेवकांचें कांहीं प्रयोजन लागत नाहीं ! या वेळेस दुसरेच सेवक बरोबर असतात ! जसा काय मेला मदन सज्ज होऊन मजपुढें चालतच आहे! तसाच हा मेला चंद्रहि आपल्या करानें ( हस्तानें )

माझा हात धरून जसा काय मला प्रियाकडे नेतच आहे ! उत्कंठा दासी ही मजबरोबर चालतच आहे, असें वाटलें ! ”

मग तरलिकेबरोबर बोलत त्या स्थळाजवळ गेलें, तों दुरून रोदनाचा स्वर माझ्या कानीं पडला. पूर्वी माझा डोळा लवला होताच; त्यामुळें माझ्या पोटांत अधिकच धडकी भरली. तशीच लगबगीनें पुढें गेलें तों रोदनयुक्त करुणस्वर माझे कानीं पडला. तो असा—“ हाय हाय ! मी सर्वस्वी बुडालों ! अरे दुरात्म्या मदनपिशाचा ! हें काय तूं केलें ? अगे दुष्टे महाश्वेते ! असें यानें तुझें काय केलें होतें ? अरे दुष्टा चंद्रा ! तूं आतां कृतार्थ झालास ! अरे सख्या पुंडरीका ! माझी वाट तरी पहा ! आतां तुझें मजविषयींचें प्रेम कोठें गेलें ? ” अशा प्रकारचा कपिंजलाचा विलाप माझ्या कानीं पडला.

तो ऐकून माझ्या जिवांत जीव नाहींसा होऊन मीं मोठ्यानें किंकाळी फोडली. मग जसें काय कोणीं मला उचलूनच नेत आहे, अशा रीतीनें मी धावत धावत त्या ठिकाणीं गेलें. तों त्या ठिकाणीं पुष्पशय्येवर निश्चेष्ट पडलेला पुंडरीक माझ्या पापिणीच्या दृष्टीस पडला !

त्या वेळीं माझ्या डोळ्यापुढें अंधारी येऊन पाताळांत पडल्यासारखें मला झालें ! आणि मी आलें कोणीकडे व हें आहे काय ? हें मला कांहींच समजेनासें झालें. माझे प्राण त्या वेळेसच निघून जावे, परंतु तसें कोठून होणार ! पुढें कांहीं वेळानें मूर्छा गेल्यावर अग्नींत पडल्यासारखें मला झालें. माझा प्रिय गेला आणि मी कशी जीवंत राहिलें ? हा नाथा मला एकटीला टाकून तुह्मी कसे गेलां ! ह्या तरलिकेला पुसून पहा बरें ! एकच दिवस पण सहस्रयुगांसारखा मीं घालविला ! तर प्रसन्न व्हा, आणि एकवेळ तरी मजशीं बोलून माझे मनोरथ परिपूर्ण करा. मी तुमच्यावर अनुरक्त झालेली अनाथ दासी आहें, याकरितां मजवर दया करा ! हाय हाय मी मंदभागिनी सर्वस्वीं बुडालें ! याप्रमाणें भूतसंचार झाल्यासारखी होऊन मीं पुष्कळ विलाप केला. माझ्या डोळ्यावाटें पाण्याचे लोट चालल्या. मुळें माझेंच पाणी होतें कीं काय असें मला वाटलें. मग पुंडरीकाच्या शरीरास हालवून ह्मणालें, ‘ नाथा तुह्मी मोठे निर्दय आहां हो ! इतका मी शोक करीत आहें तरी तुह्मांस माझी कांहींच कशी दया येत नाहीं ? ’ त्याच्या गळ्यांत मोत्याची माळ पाहून मी ह्मटलें, ‘ कायगे मुक्तावलि ! तूं मोठी

चांडाळीण आहेस ! माझी तूं जवळ असतां मी येईपर्यंत याचे प्राण कसे राखले नाहींस ? कपिंजला ! प्रसन्न व्हा, आणि पुंडरीक जीवंत होईल असें करा.' असें बोलून पटापट त्याच्या पायां पडूं लागलें.

याप्रमाणें अतिदुःखकारक वर्तमान सांगत असतां महाश्वेतेस मूर्छा आली. तेव्हां चंद्रापीडानें वारा घालून तीस सावध केलें. मग तो म्हणाला, "म्यां पाप्यानें तुमचा दुःखाग्नि पेटविला, याकरितां आतां सांगण्याचें पुरें करावें. आतां मला तें ऐकवत नाहीं !"

ती ह्मणाली, "महाराज ! त्या भयंकर रात्रीं देखील जी राहिली, तिला आतां काय व्हावयाचें आहे ? जें सांगितलें, त्याहून अधिक कष्टकारक असें सांगण्याचें तरी काय उरलें आहे ? आतां हें भारभूत शरीर राखून ठेवण्यास काय कारण झालें तें सांगतें ऐकावें." त्या समयीं मीं मरणाचा निश्चय करून तरलिकेस म्हटलें, बाई तरलिके, आतां रडूं तरी कोठवर ? काष्ठें आणून चिता तयार कर; प्राणनाथाच्या मागून मला लवकर गेलें पाहिजे ! इतक्यांत चंद्रमंडळांतून एक पुरुष उतरला आणि पुंडरीकास उचलून घेऊन चालला, त्या वेळीं तो ह्मणाला, "वत्से महाश्वेते, तूं प्राण सोडूं नकोस, फिरून तुझा याच्याशीं समागम होईल." असें आश्वासन देऊन तो आकाशांत गेला. तेव्हां मी चकित होऊन वेड्यासारखी झालें व हें आहे तरी काय ? असें कपिंजलास विचारूं लागलें.

कपिंजल तर मला उत्तर न देतां गडबडीनें उठला व कंबर बांधीत 'अरे दुष्टा, माझ्या मित्राला घेऊन कोठें चाललास ?' असें ह्मणत तोहि आकाशांत उडून गेला.

असा प्रकार घडल्यानंतर पुढें काय करावें आणि काय न करावें, याविषयीं मला सुचेनासें झालें. मग मीं तरलिकेस ह्मटलें, 'तरलिके, तुला तरी हें समजलें काय ?' तरलिका थरथर कांपत ह्मणाली, "बाईसाहेब! मला पापिणीला हें कोठून समजणार ? परंतु हें मोठें आश्चर्य झालें खरें ! तो पुरुष तर देवासारखा दिसत होता, तो खोटें कशाला बोलेल ? कपिंजलऋषि त्याचे मागोमाग गेला आहेच; तो परत आल्यावर आपणास सर्व वर्तमान कळेल, तोंपर्यंत जीव धारण करावा." असें बोलून ती पटांपटां माझ्या पायां पडूं लागली. मला तिचें बोलणें खरें वाटलें त्यामुळें व कपिंजल परत येऊन सर्व सांगेल या आशेनें मीं प्राणत्याग केला नाहीं. नंतर

प्रातःकाल झाला, तेव्हां येथेंच तप करीत काळ घालवावा, असा विचार मनांत आला. मग आईबाप आप्तमित्र या सर्वांचा त्याग करून येथेंच शंकराची आराधना करीत राहिलें.

दुसरे दिवशीं माझे आईबाप माझा शोध करीत येथें आले व त्यांनीं मीं घरीं चलावें ह्मणून पराकाष्ठा केली. कांहीं दिवस ते येथें राहिले व शेवटीं निराश होऊन परत गेले." इतकें बोलून ती पुनः खिन्न होऊन बसली.

मग तो ह्मणाला, "जी स्वाधीनची गोष्ट नाहीं तिला काय करावयाचें? आपण आपल्या प्रियाकरितां आप्तमित्र, सर्व ऐश्वर्य व सुख, यांचाहि त्याग केला, हें काय थोडें झालें? दुःख सहन होत नाहीं ह्मणून प्राणत्याग करणें हें कांहीं उचित नाहीं. आशानें कांहीं धर्म होत नाहीं, किंवा प्रिय आप्तांची भेट होत नाहीं. आत्मघात करण्याचे पातकानें मात्र तो प्राणी बद्ध होतो. जिवंत राहिल्यानें मृताच्या उद्देशानें जलांजलि, पिंडदान वगैरे सत्कर्में तरी घडतात. पहा, शंकरानें मदन दग्ध केला असतां रतीनें प्राणत्याग केला नाहीं. पांडुराजाची स्त्री कुंती हिनेंहि प्राणत्याग केला नाहीं. अभिमन्यूची स्त्री उत्तरा हिनेंहि तसें केलें नाहीं. अशीं अनेक उदाहरणें आहेत. त्यांत आपणास प्रिय समागमाची आशा मुळींच नाहीं, असें नाहीं. त्या दिव्यपुरुषास उगीच मिथ्या बोलण्याचें काय कारण?" इत्यादि बोलून चंद्रपीडानें महाश्वेतेचें सांत्वन केलें!

संध्याकाळ झाला तेव्हां महाश्वेता जपादि कर्में करण्यास गेली. चंद्रापीडहि संध्योपासनादि कर्में करण्यास झऱ्यावर गेला. कांहीं वेळानें पुन्हां ते दोघे आपापल्या जाग्यावर येऊन बसले.

महाश्वेतेच्या वृत्तांतावरून चंद्रापीडाच्या मनांत आलें कीं, मदन मोठा दुर्धर आहे. त्याच्या तडाक्यांत सांपडलेले थोर थोर देखील जिवास मुकतात!

मग तो महाश्वेतेस ह्मणाला, "आपल्या दुःखाची भागीदारीण तरलिका कोठें आहे?" ती ह्मणाली, "महाराज! चित्ररथगंधर्वाविषयीं मागें मीं सांगितलेंच आहे. त्या चित्ररथाची स्त्री मदिरा होय. त्या दोघांनां अतिसुंदर अशी एक कन्या आहे. तिचें नांव कादंबरी. ती आपल्या आई-बापांची व सर्व गंधर्वांची फार लाडकी आहे. लहानपणापासून माझें तिजवर व तिचें मजवर फार प्रेम आहे! आह्मां दोघींनां एकमेकींवांचून क्षणभर देखील करमत नसे. पुढें माझें असें दुःखकारक वर्तमान कादंबरीस समजतांच

तिनें निश्चय केला कीं **महाश्वेता** दुःखी आहे तोंपर्यंत मला विवाह करावयाचा नाहीं, माझा पिता बळेंच मला कोणास देईल तर मी आपला जीव ठेवणार नाहीं ! " हा कन्येचा निश्चय ऐकून आईबापांस मोठीच काळजी पडली. मग त्यांनीं मला निरोप पाठविला कीं, " **महाश्वेते** ! तुझ्या दुःखानें आह्मी अगोदरच दुःखी आहों, आणि त्यांत आणखी दुसरें असें संकट प्राप्त झालें आहे. याकरितां तूं कसेंहि करून **कादंबरी**ची समजूत घालून आह्मांस या संकटांतून सोडीव. " नंतर मीं **तरलिकेस कादंबरी**कडे पाठविलें आणि असा निरोप पाठविला कीं, ' प्रियसखि ! दुःखित असलेल्या पितरांस तूं कां आणखी दुःख देतेस? मीं जीवंत रहावें अशी तुझी इच्छा असेल तर वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वाग. "

इतक्यांत चंद्रोदय झाला, तेव्हां **महाश्वेता** आपल्या शय्येवर जाऊन पडली. **चंद्रापीड**हि आपल्या ठिकाणीं चाकित होऊन राहिला.

पुढें पहाट झाली. मग **महाश्वेता** उठून नित्यकर्म करीत बसली होती, तों गंधर्वकुमार **केयुरक** यासह **तरलिका** परत आली. तीस पाहून **महाश्वेता** ह्मणाली," **तरलिके, कादंबरी** खुशाल आहे ना? माझा निरोप तिला सांगितलाना ?" ती ह्मणाली, " त्या खुशाल आहेत व निरोपहि सांगितला. परंतु त्यांनीं तुह्मांस उलट निरोप सांगितला आहे, तो हा **केयुरक** सांगेल. " मग तो ह्मणाला " देवि **कादंबरी**ची अशी विनंति आहे कीं, हा जो निरोप पाठविला तो वडिलांचें मन राखण्याकरितां, कां माझी परीक्षा पाहण्याकरितां आहे? तूंच पहा, आपलीं माणसें दुःखी असल्यावर मग सुखाचे प्रकार कोठून सुचणार ? याकरितां फिरून असा निरोप पाठवूं नको. तूं एकटी वनांत आहेस असें नाहीं, तर माझे पंचप्राणहि तुजबरोबरच आहेत!" असें बोलून तो उगाच बसला. मग ती त्यास ह्मणाली " तूं आतां जा, मी स्वतःच तिच्या भेटीकरितां येणार आहें. तो गेल्यावर ती **चंद्रापीडास** ह्मणाली, " महाराज, मी आतां **कादंबरी**कडे जात आहें, तर आपणहि मजबरोबर चलावें, अशी माझी इच्छा आहे. आपण मजबरोबर आलां असतां अत्यंत रमणीय असा गंधर्वलोक आपल्या पाहण्यांत येईल, व माझ्या **कादंबरी**ची सहज भेट होईल. तर आपणांस जर श्रम वाटत नसतील, किंवा कांहीं मोठें कार्य नसेल तर माझ्या ह्मणण्यास मान द्यावा. '

**चंद्रापीडानें** तिचें ह्मणणें मान्य करून तो तिजबरोबर **हेमकूटपर्वताची**

 15 MAY 2001

गंधर्वलोकाची व चित्ररथगंधर्वाच्या राजवाड्याची शोभा पहात पहात सात चौक ओलांडून कन्यान्तःपुरांत गेला. त्या ठिकाणीं सुंदर तरुणास्त्रियांची लावण्यप्रभा जिकडे तिकडे दिसत असल्यामुळें येथें चंद्रमंडळें उगवून अमृताची वृष्टिच होत आहे असें त्यास वाटलें ! त्यांचे साहजिक विलास व हावभाव दिसत असल्यामुळें शृंगारमय, सौंदर्यमय व रतिमय असें तें अंतःपुर त्यास भासलें !

तो त्या अंतःपुरांतून चालला असतां अनेक प्रकारचीं कामें करीत असलेल्या कादंबरीच्या दासी त्याच्या दृष्टीस पडल्या. पुढें गेल्यानंतर ज्या ठिकाणीं पुष्कळ दासी उभ्या होत्या असा कादंबरीचा बसावयाचा श्रीमंडप त्याचे दृष्टीस पडला. त्या मंडपाच्या मध्याभागीं पलंगावर बसलेली कादंबरी त्याचे दृष्टीस पडली ! तिचें सौंदर्य फारच अप्रतिम होतें. त्या ठिकाणच्या भिंतींवरून अनेक प्रकारचीं चित्रें काढलेलीं होतीं, त्यामुळें सर्व त्रैलोक्यांतील लोक तिला पाहण्याकरितांच आले आहेत असें दिसत होतें. तिचे सर्वावयव रेखलेले असून त्यांवर उत्तम वस्त्रालंकार असल्यामुळें फारच रमणीय शोभा दिसत होती. केयूरकानें सांगितल्यावरून ती त्याजवळ चंद्रापीडाची विचारपूस करीत होती.

कादंबरी दृष्टीस पडल्यामुळें चंद्रोदयानें समुद्रोदक जसें उचंबळतें त्याप्रमाणें चंद्रापीडाच्या अंतःकरणाची स्थिति झाली. त्यास असें वाटलें कीं ब्रह्मदेवानें माझ्या सर्वांगास डोळे केले असते तर फार चांगलें झालें असतें ! माझ्या नेत्रांनीं पूर्वजन्मीं खचित मोठे पुण्य केलें होतें, म्हणून ही सुंदरी माझ्या दृष्टीस पडली ! इतक्यांत कादंबरीचीहि दृष्टि चंद्रापीडाकडे गेली व केयूरकानें वर्णन केलेला पुरुष हाच, असें तिला वाटलें. तो दृष्टीस पडतांच तिच्या अंगावर रोमांच व अंतःकरणांत लज्जा हीं उत्पन्न झालीं !

मग महाश्वेता व कादंबरी या दोघींनीं एकमेकींस आलिंगन करून कुशल विचारलें. नंतर महाश्वेता कादंबरीस हळूच म्हणाली, " भरतखंडांत तारापीड म्हणून सार्वभौम राजा आहे, त्याचा हा पुत्र आहे. याचें नांव चंद्रापीड. दिग्विजय करीत फिरत असतां हा या प्रदेशाकडे आला आहे. याची भेट झाल्यापासून मला हा आप्तासारखा वाटत आहे. ब्रह्मदेवानें सर्व सद्गुणांचा पुतळा असा हा निर्माण केला आहे. याच्या परिचयानें



11 JAN 1994

माझ्या सांगण्याची सत्यता तुलाहि कळून येईल. तर अशा पुरुषाचें दर्शन झालें असतां उगीच लाज धरून बसूं नकोस! परकीयपणा सोडून याच्याशीं मोकळेपणानें वाग." मग कादंबरीनें सलज्ज होऊन चंद्रापीडाचें स्वागत केलें. तो सिंहासनावर बसला. महाश्वेतेसह कादंबरी आपल्या पलंगावर बसली, मग दोघींचीं कांहीं वेळ भाषणें झालीं. तेव्हां महाश्वेतेविषयीं आपल्यास फारच दुःख होत असल्याचें कादंबरीनें दर्शविलें. कांहीं वेळ गेल्यावर महाश्वेता ह्मणाली. "प्रियसखी, अगोदर आपल्या घरीं आलेल्या पाहुण्यांचा आदरसत्कार केला पाहिजे, याकरितां पाहुण्यास तांबूल दे." तेव्हां ती लाजून ह्मणाली, "माझा यांच्याशीं परिचय नसल्यामुळें मला लाज वाटते." मग महाश्वेतेनें आग्रहानें तिजकडून त्यास तांबूल देवविला. त्यावेळीं तिच्या अंगास घर्म व कंप सुटला व विडा देतांना जसें कांहीं तिनें आपलें जीवितच त्याचे स्वाधीन केलें !

इतक्यांत एक सेवक येऊन महाश्वेतेस ह्मणाला, "देव चित्ररथ व देवी मदिरा यांनीं आपणास भेटीकरितां बोलाविलें आहे." जातांना ती कादंबरीस ह्मणाली, "पाहुण्यानें कोठें राहावें याची तजवीज अगोदर कर. ती ह्मणाली, "त्यांनां जेथें बरें वाटेल तेथें त्यांनीं रहावें." महाश्वेता ह्मणाली, "क्रीडापर्वतावरील आरसेमहालांत त्यांनां राहण्यास सांगावें." मग केयूरकानें दाखविलेल्या मार्गानें चंद्रापीड तिकडे गेला. त्या ठिकाणीं करमणूकीकरितां कादंबरीनें गायनकला जाणणाऱ्या गंधर्वकन्या पाठविल्या. व ती आपल्या शय्येवर जाऊन सचिंत पडली. कांहीं वेळानें ती शुद्धीवर आल्यासारखी होऊन आपल्याशीं ह्मणाली, "कुल, शील, मर्यादा, या सर्वांचा विचार न करतां हें मीं काय केलें ? परक्याकडे मीं आपल्या मनाची प्रवृत्ति अशी कशी केली ! महाश्वेता व सख्या ह्या तरी मला काय ह्मणत असतील ?

महाश्वेतेचें दुःख पाहून मीं तशी प्रतिज्ञा केली ! केयूरकाबरोबर तसाच निरोप पाठविला आणि हें मीं काय केलें ? त्याचें मन मजवर कितपत आहे याची तरी पुरी परीक्षा मीं केली ? ज्याला कधीं पाहिलें नाहीं, व ज्याचें नांव सुद्धां ऐकिलें नाहीं, त्या चंद्रापीडाला मजसमोर कोणीं आणिलें? दुष्ट दैवानें, कां मेल्या मदनानें, कां माझ्या पूर्व पातकानें ? त्याचें दर्शन होण्याचाच मेला उशीर कीं त्याबरोबर जसें काय मेल्या मदनानें, मला

बांधून त्याच्या स्वाधीन केलें ! असो. जें झालें तें झालें. परंतु आतां मला त्याचा संबंध नको. असा क्षणभर तिनें निर्धार केला, परंतु तिच्यानें फार वेळ तसें राहवलें नाहीं. तेव्हां ती आपल्या मंदिराच्या खिडकीतून त्याजकडे पाहत उभी राहिली !

इकडे चंद्रापीड त्या आरसेमहालांत जाऊन बैठकीवर बसला. त्याच्या मनोरंजनाकरितां केयूरक व गंधर्वकन्या गात व वाद्यें वाजवीत बसल्या. परंतु चंद्रापीडाचें अंतःकरण कादंबरीकडेच लागून राहिलें होतें. तो आपल्या मनांत ह्मणाला, गंधर्वकन्येचे हे कां साहजिक विलास ह्मणावे, कां प्रसन्न झालेल्या मदनानें मजकारितां हे प्रकार तिजकडून करविले असावे, विषयसुखेच्छा अनेक कल्पना करून मनुष्यास फसविते हें मात्र खरें ! तारुण्यांत मदनविकार उत्पन्न होऊन विचार नाहींसा होतो व अल्प असलें तरी मोठें दिसतें ! व जी वस्तु प्राप्त होण्यासारखी नसते, तिजविषयीं देखील आशा उत्पन्न होते ! मग तो प्रमदवनाची शोभा पाहण्याकरितां क्रीडापर्वता-वर गेला.

इकडे कादंबरीचें लक्ष चंद्रापीडाकडे असल्यामुळें तो दृष्टीस पडतांच कांहीं निमित्त करून ती गच्चीवर गेली व त्याजकडे पहात बसली !

मग महाश्वेता आल्याचें दासीनें कळविल्यावर ती संकटानें खालीं उतरली. पुढें सर्वांनीं स्नान व उपहार केले.

नंतर हिरव्यागार लतामंडपाच्या खालीं चंद्रापीड बसला असतां एका-एकीं शुभ्र प्रकाश त्याचे दृष्टीस पडला. तों इतक्यांत शुभ्रवस्त्रें, हार, तुरे व गजरे घेऊन कादंबरीची सखी मदलेखा, केयूरक, व तमालिका यांसह स्वच्छ पात्रांत शुभ्र मौक्तिक हार घेऊन येत असलेली त्याचे दृष्टीस पडली. मग शुभ्र तेजाची वृष्टि करणारा तो हार दृष्टीस पडतांच त्याच्या मनांत आलें कीं, दृष्टीस दिपविणारा जो प्रकाश पडला तो याचाच ! नंतर मदलेखा जवळ येतांच त्यानें तिचा सत्कार केला. मदलेखेनें चंद्रापीडाच्या अंगास उटी लावून व वस्त्रें अर्पण करून पुष्पांचे हार घातले व तो मौक्तिकहार हातांत घेऊन ह्मणाली " महाराज, आपली अतिमनोहर आकृति पाहिल्यावर कोणाचें मन आसक्त होणार नाहीं ? माझ्या प्रियसखीचें असें ह्मणणें आहे कीं, ज्यांनीं येथें येऊन दर्शन दिलें व जीविताचें साफल्य केलें, त्यांचें मी कोणत्या रीतीनें उतराई व्हावें ? माझी सखी ह्या हाराच्या मिषानें आपले

प्राण आपणास अर्पण करीत आहे व तसें केल्याबद्दल तिला पश्चात्ताप होणार नाहीं अशी आशा बाळगीत आहे ! " असें बोलून तिनें तो हार त्याचे गळ्यांत घातला !

चंद्रापीड सानंद होऊन ह्मणालाः—" मदलेखे ! तूं मोठी चतुर आहेस ! दुसऱ्याकडून एखादी वस्तु कशी घेववावी हें चातुर्य तुझ्यांत फारच आहे ! प्रेमळ व उदारांतःकरणाच्या कादंबरीचा अनुग्रह कोणास वश करणार नाहीं ? " अशा प्रकारें कांहीं वेळ बोलून त्यानें तीस निरोप दिला.

पुढें सूर्यास्त होऊन रात्र पडली. नंतर चंद्रोदय होऊन जिकडे तिकडे प्रकाश पडला. तेव्हां केयूरकानें येऊन सांगितलें कीं, " महाश्वेतेच्या आज्ञेवरून देवी कादंबरी आपल्या भेटीस आली आहे. " तेव्हां चंद्रापीड उठून उभा राहिला व पाहूं लागला तों शुभ्र वस्त्र परिधान केलेली, मौक्तिक हार घातलेली व चंदनाची उटी लावलेली अशी चंद्रोदयदेवताच येत आहे असें त्यास भासलें ! मग मदलेखेसहित ती त्या ठिकाणीं येऊन कांहीं अंतरावर नम्रतेनें बसली. त्याप्रमाणें चंद्रापीडहि मर्यादेनें तिच्याजवळ बसला. मग चंद्रापीड ह्मणाला, " केवळ अवलोकनानें आपणास धन्य मानणारा असा हा जन असतां त्याजवर एवढा अनुग्रह कशाला पाहिजे होता ? आपल्या प्रेमानें बद्ध झालेला हा देह आतां आपल्या स्वाधीन नाहीं ! " असें भाषण झाल्यानंतर मदलेखेनें उज्जयनीकडील कांहीं विचापूस केली. मग कांहीं वेळ थोडेंसें बोलणें झाल्यावर बराच वेळ झाल्यामुळें संकोचानें कादंबरी तेथून उठून आपल्या मंदिरीं गेली.

इकडे चंद्रापीडहि शय्येवर चिंतन करीत पडला. त्यास कशी ती झोंप आली नाहीं व शेवटीं रात्र जाऊन प्रातःकाल झाला. मग चंद्रापीड उठला व नित्य कर्में केल्यावर महाश्वेतेस व कादंबरीस विचारून जावें, असा विचार करून केयूरकासह तो त्यांजकडे गेला. तेथें आसनावर बसल्यावर चंद्रापीडाची परत जावयाची इच्छा व कादंबरीविषयीं प्रीति हीं लक्षांत आणून महाश्वेता कादंबरीस ह्मणाली, " प्रियसखि, यांनां परत गेलें पाहिजे. त्यांजबरोबरचे लोक त्यांचा शोध करीत हिंडत असतील, याकरितां यांस अनुमोदन द्यावें. तुम्ही दूर होत आहां तरी चंद्र व कुमुदिनी यांप्रमाणें तुमचें एकमेकांवर सदोदित प्रेम राहो ! "

मग चंद्रापीड तेथून जावयास निघाला तेव्हां कादंबरी आपल्या

नेत्रांनीं त्याचें स्वरूप हृदयांत सांठवीतच आहे असें दिसलें! मग केयूरकानें आणलेल्या घोड्यावर बसून तो चालू लागला. तो आच्छोदसरोवराजवळ आला,तों आपला शोध करीत आलेले आपले लोक त्याचे दृष्टीस पडले, चंद्रापीड दृष्टीस पडतांच सर्वांस आनंद झाला. मग तो वैशंपायन व पत्रलेखा व इतर लोक यांजबरोबर महाश्वेता, कादंबरी व गंधर्वलोक यांजविषयीं बोलत बसला.

दुसरे दिवशीं चंद्रापीड सभेंत बसला असतां केयूरक त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां चंद्रापीडानें त्याचा सत्कार करून त्यास जवळ बसविलें व कादंबरी व महाश्वेता यांचें कुशल विचारलें. तो म्हणाला, " महाश्वेतेचा आपणास असा निरोप आहे कीं, आपण जवळ होतां तेव्हां आपले गुण चंद्रासारखे शीतल वाटले. व तो दिवस अत्यंत आनंदाचा वाटला. तसा आणखी सुदिन यावा अशी आमची प्रार्थना आहे." मग केयूरकानें मौक्तिकहार मागें राहिला होता तो तांबूलासह चंद्रापीडास अर्पण केला.

मग इंद्रायुधावर बसून पत्रलेखेसह चंद्रापीड केयूरकाबरोबर गंधर्वलोकीं जाऊन कादंबरीच्या मंदिरांत गेला कादंबरीचा शोध करीत तो पुष्करणीजवळ हिरण्यागार कमलिनींनीं सुशोभित अशा हिमगृहांत गेला. तेव्हां त्यास हें हिमालयाचें हृदयच आहे काय असें वाटलें ! त्या ठिकाणीं अंगास उटी लावून शीतोपचार करीत बसलेल्या दासींसह पुष्पशय्येवर पडलेली कादंबरी त्याच्या दृष्टीस पडली. विरहतापानें ती बरीच अस्वस्थ दिसत होती. मग केयूरकानें " चंद्रापीडाच्या प्रीतींतली दासी ही पत्रलेखा आली आहे," असें कादंबरीस सांगितलें. पत्रलेखेस पाहून तिच्या सौंदर्याबद्दल कादंबरीस मोठें आश्चर्य वाटलें. मग तिनें तिला आपले जवळ बसविलें. कादंबरीची तशी अवस्था पाहून चंद्रापीड मनांत म्हणाला, ' माझें मन फार वेडें आहे, अजूनहि ह्याची खात्री होत नाहीं. ' मग तो उघड म्हणाला, " कोणत्या कारणानें देवीची अशी अवस्था झाली आहे ? ती पाहून मला फार वाईट वाटतें!" कादंबरीस या बोलण्याचें हृद्गत समजलें,तथापि बालस्वभावामुळें सलज्ज होऊन ती खालीं तोंड घालून बसली. तेव्हां मदलेखा म्हणाली, "देवीची अवस्था महाराजास सर्व सांगतच आहे,निराळें सांगावयास नको !" मग महाश्वेतेबरोबर कांहीं वेळ बोलून बराच वेळ झाल्यामुळें तो दोघींस विचारून जावयास निघाला.

चंद्रापीड घोड्यावर बसत आहे तों केयूरक येऊन म्हणाला, महाराज !

देवीच्या मनांत ' पत्रलेखेनें तरी कांहीं दिवस येथें राहावें, ' असें आहे. तें ऐकून पत्रलेखेस धन्य समजून त्यानें तीस तेथें रहावयास सांगितलें व आपण निघून सैन्याजवळ येतो तों पित्याकडून आलेला जासूद त्याचे दृष्टीस पडला. त्यास तो कुशल विचारूं लागला तों त्यानें प्रणाम करून पत्र दिलें.

तें वाचून पाहतां त्यांत ' फार दिवस झाल्यामुळें तुझ्या भेटीची फार उत्कंठा वाटत आहे, याकरितां पत्रदर्शनीं निघून यावें,' असा मजकूर होता. मग तो पित्याची आज्ञा मान्य करून घोड्यावर बसला होता तसाच निघाला. जाते वेळीं मेघनादास ह्मणाला. " तूं मागून पत्रलेखेस घेऊन ये. तिला पोंहचविण्याकरितां केयूरक येईल, त्याजबरोबर देवी कादंबरीस माझी विनंति कळवावी कीं,' कपटस्नेह दाखवून मी गेलों ! ' असें देवीस वाटण्याचा संभव आहे, परंतु पित्याची आज्ञा मला मोडतां येत नाहीं. तथापि असें खात्रीनें सांगतों कीं, फिरून देवींचें दर्शन घेतल्याखेरीज मी राहणार नाहीं. तसाच महाश्वेतेसहि माझा आदरपूर्वक नमस्कार कळवावा. " नंतर तो वैशंपायनास ह्मणाला, " सर्व सैन्याचा बंदोबस्त ठेऊन सर्वांस सांभाळून घेऊन ये. मी पुढें जातों. "

कादंबरीच्या विरहानें चंद्रापीडाच्या मनाची स्थिति नीट नव्हती, तरी तो सेवकास उज्जयनीकडील वर्तमान विचारीत चालला होता. मग घोर अरण्यें व गांवें यांचें अतिक्रमण करीत सायंकाळीं तो एका चंडिकेच्या देवालयाजवळ येऊन पोहचला व तेथें विश्रांति घेण्याचा त्यानें विचार केला. मग तो घोड्यावरून उतरून देवींचे दर्शनास गेला. त्या ठिकाणीं दर्शन घेतल्यावर एक देवीभक्त द्रविड ब्राह्मण त्याचे दृष्टीस पडला. त्याच्या विक्षिप्तपणाची चंद्रापीडास बरीच करमणूक झाली. त्यानें त्यास पुष्कळ द्रव्य दिलें. मग तो आपल्या उतरण्याचे जागीं गेला. त्यास तेथें खाणें पिणें वगैरे कांहींएक गोड लागलें नाहीं. त्याचें लक्ष कादंबरीकडे गेल्यामुळें त्यास अगदीं चैन पडेनासें झालें, व त्या चिंतनांतच सर्व रात्र संपली.

प्रातःकाळ होतांच तो तेथून तातडीनें निघून उज्जयनीस येऊन पोहोंचला. त्यास पाहतांच राजास व सर्वांस फार आनंद झाला. मग त्यानें " वैशंपायन मागून सैन्यासमागमें येत आहे. " असें पित्यास सांगितलें. तेथें आल्यावर त्यास कादंबरीच्या विरहामुळें करमेनासें झालें व तिजकडील वर्तमान ऐकण्याविषयीं तो अगदीं वाट पहात बसला.

 1 1 JAN 1994.

कांहीं दिवसांनीं मेघनाद पत्रलेखेस घेऊन आला. तेव्हां चंद्रापीडास फारच आनंद झाला. नंतर त्यानें ' मी आल्यावर मागें कसें काय वर्तमान झालें ' असें पत्रलेखेस विचारलें. तेव्हां ती ह्मणाली, आपण निघून आल्यावर कादंबरीला आपल्या विरहाचें फारच दुःख झालें. तें किती म्हणून सांगावें ? ती मला म्हणाली, " मला तुजपेक्षां दुसरें कोणी प्रिय वाटत नाहीं. याकरितां तुला एक वेळ आपलें दुःख सांगावें, आणि हा मेला जीव द्यावा, म्हणजे एकदांचें दुःख संपलें! चंद्रापीडावर माझे पंचप्राण असतां त्यानें निघून जावें, हेंच का थोराचें थोरपण! वाडवडील व सख्या ह्या माझें यांच्याशीं प्रेमाचें वर्तन पाहून मला काय म्हणत असतील ? तर आतां प्राणत्यागरूप प्रायश्चित्त घेऊन मला लागलेला व्यर्थ कलंक धुऊन टाकावा म्हणजे झालें !"

मग मीं म्हटलें, " आमच्या महाराजांनी असें काय केलें ? " ती म्हणाली, " तें आतां किती सांगूं ? स्वप्नांत, जळीं, स्थळीं काष्ठीं, पाषाणीं जिकडे पहावें तिकडे मला तो दिसतो आहे व माझ्या अंगास स्पर्श करतोसा भासतो आहे ! व त्यामुळें मला चैन पडेनासें झालें आहे ! " मीं ह्मटलें, " याचा दोष आमच्या महाराजाकडे काय आहे ? हा सगळा मेल्या मदनाचा खेळ आहे ! " ती ह्मणाली, " पत्रलेखे, त्या मेल्या मदनानें माझे पंचप्राण त्या राजकुमाराकडे लावले आहेत याला कसें करूं ? त्यामुळें मला कोणासच तोंड दाखवूं नये असें झालें आहे व माझा जीव मला नकोसा वाटतो आहे. " मीं म्हटलें, ' बाई ! तुम्ही असें भलतें सलतें काय बोलतां ? ज्यावेळीं कामदेव पित्याप्रमाणें तरुण कन्येस तिच्या प्रियाच्या स्वाधीन करितो, त्यावेळीं कोणाचीच गरज लागत नाहीं ! स्वयंवरविधीनें किती कन्यांनीं आपण होऊन वर वरले नाहींत ? तर असा भलताच विचार मनांत आणूं नका. मला आज्ञा करा, ह्मणजे मी तुमच्या वल्लभास घेऊन येतें. ' असें भाषण ऐकतांच तिला फार आनंद झाला. आणि ती लाजून ह्मणाली, " प्रियसखि ! तुझी मजवर मोठी प्रीति आहे व तूंच माझी खरी सखी आहेस ! तुजजवळ मीं आतां निरोप काय सांगावा ? मजमध्यें एवढा प्रौढपणा कोठला ! ज्या आपण होऊन निरोप पाठवितात किंवा उठून जातात, त्या दांडग्या व निर्लज्ज होत. याकरितां असें साहस माझ्या हातून होणें नाहीं. निरोप पाठविण्याकरितां जें जें मी मनांत आणतें, तें तें मला बरोबर वाटत नाहीं! याकरितां मला कांहींच मेलें सुचत नाहीं !"

# उत्तरार्धांतील संक्षिप्त कथानक.

" पत्रलेखे, या राजपुत्राची व माझी आतां कसची गांठ पडते ? त्याला इकडे येण्याला आतां अधिक तें काय आहे ? त्याच्या भेटीच्या दिवशीं संध्याकाळच्या वेळीं जिकडे तिकडे प्रफुल्लित झालेल्या पुष्पांवरून मंद व शितल व सुगंध वायु वाहत होता. पूर्णचंद्र गगनमंडलास सुशोभित करीत होता. मौक्तिकाशिलेवर चंदनाचा रस शिंपडल्यामुळें त्याचे बिंदु दिसत होते, त्यामुळें चंद्रकरांच्या स्पर्शानें तिच्या अंगावर रोमांचच उभे राहिले आहेत काय असें भासत होतें ! अशा वेळीं क्रीडापर्वतावरील हिमगृहांत मौक्तिक-शिलेवरच्या शय्येवर तळमळत पडलेली व त्यावेळीं चंद्रापीडानें पाहिलेली तीच ही हतभाग्य कादंबरी !

तो येथें फार वेळ होता तरी ह्या मेल्या डोळयांनीं त्यास पोटभर पाहिलें सुद्धां नाहीं, ह्याचा बोल दुसऱ्या कोणाकडे लावावयाचा आहे ? पण हें बघ, पत्रलेखे ! मला आतां त्याचें कांहीच वाटत नाही. मला दैवानें आतां निराळाच एक हृदयवासी कुमार अर्पण केला आहे. तो कोणाला दिसाव-याचा नाहीं, कधीं सोडून जावयाचा नाहीं. जिकडे जावें तिकडे तो आपला आहेच! तर आतां त्या अज्ञजनास फसविणाऱ्या व सोडून जाणाऱ्या कुमाराची गोष्ट कशाला पाहिजे ! " असें बोलतांनां तिच्या डोळयांतून अश्रु वाहूं लागले व ती जागचे जागीं डोळे मिटून तटस्थ राहिली !

असें तिचें भाषण ऐकून माझ्या मनांत आलें कीं, " विरहिणी स्त्रियांस हृदयवासी कुमाराची चांगलीच करमणूक होते ! त्याच्या समागमापासून कधीं कन्याधर्म दूषित व्हावयाचा नाहीं, कांहीं नाहीं ! त्याजबरोबर विलास केल्याबद्दल कोणास मागमूसहि समजावयाचा नाहीं, तेव्हां हें साधन बरें आहे ! ' असें माझ्या मनांत घोळत होतें, तों कादंबरीचें अनुरक्त हृदयच काय असें आरक्त झालेलें सूर्यबिंब दिसेनासें झालें.

त्यावेळीं सुगंधि तैलानें पूर्ण अशा दीपिका घेऊन दासी तिच्या सभोंवतीं येऊन उभ्या राहिल्या. तेव्हां ज्योतींचीं प्रतिबिंबें तिच्या लावण्यांत बिंबल्या-मुळें जशी काय मदनानें सोडलेले बाणच ही धारण करते आहे असें

भासलें ! मग मीं तिची प्रार्थना केली कीं, ‘ देवि ! रागाचा झपाटा आवर. ही मी आतां चंद्रापीडास घेऊन आलेंच समज ! ’ याप्रमाणें आपलें नांव ऐकतांच तिनें झट्दिशीं डोळे उघडले व मला म्हणाली, “ पत्रलेखे, खरोखरच तुजकडे पाहून मीं जीवित धारण केलें आहे. तर आतां तुझ्या मनांत त्याला आणावें असें असेल तर जा लवकर. ’ असें म्हणून वस्त्रभूषणें देऊन तिनें मला निरोप दिला. “ तर महाराज देवीच्या स्नेहामुळें मला बोलल्यावांचून राहवत नाहीं. अशा देवीस महाराजांनीं अंतर दिलें हें दयाळूपणास अनुसरूनच केलेंना ? ” असा पत्रलेखेनें दोष दिल्यामुळें चंद्रापीडास कादंबरीचें स्मरण होऊन तिच्या विरहाचें फारच दुःख वाटलें. मग तो म्हणाला, “ पत्रलेखे, अशी सुंदर गंधर्वकन्या पूर्वीं मीं कधीं न पाहिल्यामुळें तिच्या अंगीं ह्या साहजिक शृंगारचेष्टा असतील असें वाटून मी फसलों ! पाहणें, लाजणें, वगैरे प्रकार तर असोत, परंतु चिरकाल तिच्या गळ्यांत असल्यामुळें धन्य असा हा रत्नांचा हार मज हतभाग्याच्या गळ्यांत घालून तिनें काय बरें व्यक्त केलें नाहीं ? परंतु ही सर्व चूक दुर्दैवानें मजकडून घडवून आणविली ! तर आतां देवी मला कठोरहृदय म्हणणार नाहीं अशाविषयीं मी यत्न करीन. ”

इतक्यांत एक दासी येऊन चंद्रापीडास म्हणाली, “ महाराज, राणीसाहेबांनीं सांगितलें आहे कीं, पत्रलेखा आल्याचें मीं ऐकिलें. याकरितां तिला बरोबर घेऊन तूं लवकर माझ्या भेटीस ये. ”

तें ऐकून चंद्रापीड मनांत म्हणाला, इकडे क्षणभर मी दृष्टीस पडलों नाहीं तर आईस दुःख वाटतें. तिकडे पत्रलेखेच्या मुखानें देवीचें प्रेम मला बोलावतें ! इकडे आईचे पंचप्राण माझे ठिकाणीं आहेत व माझे प्रियेचे ठिकाणीं आहेत ! आईबापांनां सोडून तर जाववत नाहीं, व दुष्ट मदन तर येथें चैन पडूं देत नाहीं ! जन्मभूमि तर सोडावीशी वाटत नाहीं व प्रियतमा तर दूर रहाविशी वाटत नाहीं !

याप्रमाणें चिंतन करीत पत्रलेखेसह तो आपल्या आईकडे गेला. तेथें विलासवतीनें पुष्कळ कोडकौतुक केलें व त्यामुळें त्यांस कांहींसें बरें वाटून तो त्या दिवशीं तेथेंच राहिला. संध्याकाळीं तो शय्येवर जाऊन निजला असतां चैन पडेना. त्याचें मन कादंबरीकडे जाऊन तिचें सौंदर्य बघण्यांत तल्लीन झाल्यामुळें त्यास दुसरें कांहींएक दिसेनासें झालें. तिच्या मुखचन्द्रा-

कडे त्याची दृष्टि असल्यामुळें त्यास चंद्रबिंब अगदीं तुच्छसें वाटूं लागलें ! तिचें मधुर भाषण कानीं पडलें होतें, त्यामुळें त्या ठिकाणीं सुभाषित, गीत, वाद्यध्वनि हे गोड लागेनासे झाले ! अशा विरहावस्थेंत त्यानें थोडे दिवस युगाप्रमाणें घालविले.

एके दिवशीं चंद्रापीड विरहावस्थेनें पीडित होऊन नगराबाहेर शिप्रा-नदीकडे फिरावयास गेला असतां पुष्कळ लोक घोड्यावर बसून कार्तिक-स्वामीचे देवळाकडे येत आहेत असें त्यानें पाहिलें. मग तो नदी उतरून देवळा-जवळ जाऊन बसला. नंतर तो येणाऱ्या मनुष्याकडे पहात असतां पत्रलेखेस जवळ बोलावून ह्मणाला, "ज्याच्या डोक्यावर मयूरपिच्छांची छत्री आहे तो केयूरकच येत आहे, असें वाटतें " असें बोलत आहे तों चंद्रापीड तेथें आल्याचें समजल्यामुळें पायीं येत असलेला, ज्याचा आकार अगदीं बदलून गेला आहे असा, व ज्याचें तोंड उतरून गेल्यामुळें कादंबरीची अवस्था कशी असावी हें सांगतच आहे असा केयूरक त्याचे दृष्टीस पडला ! मग त्यानें नमस्कार केल्यावर चंद्रापीडानें त्यास आलिंगन देऊन कुशल प्रश्न विचारले. व लागलींच तयार असलेल्या हत्तिणीवर केयुरक व पत्रलेखा यांसह बसून तो जलदीनें घरीं गेला. नंतर कांहीं वेळानें तो वल्लभो-द्यानांत गेला. तेथें पत्रलेखेखेरीज इतर सेवकांस दूर करून केयूरका-स जवळ बोलावून म्हणाला, " केयूरका, देवी कादंबरी व महाश्वेता यांचा मला काय निरोप आहे तो सांग बरें." केयूरक म्हणाला, "महाराज, मजजवळ कांहीं एक निरोप सांगितला नाहीं, परंतु देवी मला ह्मणाली, तुमच्यासारखे सेवक जवळ असून मीं अशी दशा भोगावी ना ? निघा येथून ! तुम्ही कोणी मला तोंड दाखवूं नका! तेव्हां देवीनें जरी कांहीं सांगितलें नाहीं तरी महाराजाकडे मी जावें असें तिच्या मनांत आहे, असें समजून ती दुःखित असल्यामुळें तिला न विचारितां आलों आहें. तर महाराजांनीं तेथपर्यंत येण्याची कृपा केली तरच देवीचें जीवित राहण्याची आशा आहे. तिचा मदनाग्नि कशानेंहि शांत होत नाहीं ! त्याच्या शान्त्यर्थ जों जों उपाय करावे तों तों तो अधिकच भडकत आहे ! बागेंत, जलमंदिरांत, चंद्रिकेंत कोठेंहि तिला चैन पडत नाहीं ! फार काय सांगावें ! मदनपीडा सोसतां सोसतां ती अगदीं थकली ! तिला उपदेश करतां करतां सख्यांचीं भाषणें सरलीं ! पुष्पशय्या करतां करतां बागांतील फुलेंहि संपलीं व औषधें

11 1 JAN 1994 ( १५७ ) JAN 1994

देतां देतां तीहि निरुपयोगी झाली ! आतां तिच्या प्राणधारणाला मात्र म्हटली म्हणजे काय ती आपल्या संबंधाचीच गोष्ट ! फार काय? तिची मूर्छा जाण्यास झाला तर, आपलें नांवच कायतो उपाय. बाकी सर्व व्यर्थ ! ”

असें केयूरक सांगत असतां चंद्रापीडाचें भान नाहींसें झालें व त्यामुळें हा तिचें ध्यानच करीत आहे काय असें वाटलें ! मग तो ह्मणाला, “ मी निर्दय समजून देवीनें तुजबरोबर निरोप देखील पाठविला नाहीं ! देवी फारच मर्यादशील पडली, त्याला मीं काय करावें ! चंद्रप्रकाश पडल्यावर पाझर सोडणें हें चन्द्रकांताच्या स्वाधीन आहे. परंतु चंद्रिका पाडणें हें नाहीं! वसंतलक्ष्मीनें वृक्षास आलिंगन केलें तरच अंकुरोद्भव होणार आहे, नाहीं तर नाहीं ! तर यांत देवीचाच अपराध ! मी जवळ असतां तिनें लज्जा धारण करून आपली अशी अवस्था करून घेतली ! तिच्या व माझ्या नशिबींच असें दुःख भोगावयाचें होतें. अघटित घटना घडवून आणण्याविषयीं पंडित अशा दैवानें हा योग बुध्याच असा आणला असें वाटतें ! नाहींतर किन्नरांच्या जोडप्यामागें लागण्यापासून देवीच्या विरहापर्यंत अनेक गोष्टी कशाला घडून आल्या असत्या !” याप्रमाणें तो बोलत असतां संध्याकाळ झाला. तेव्हां सकलजगाचें जणूं शुभ्रवस्त्रच, अमृतानें भरलेला जणूं रुप्याचा कलशच ! असा चंद्र उदयास आला. त्या वेळीं चंद्रापीड केयुरकासह बालोद्यानांत जाऊन जिला चंद्रोदयानें पाझर फुटले आहेत, अशा चंद्रकांत शिलेवर जाऊन बसला. मग तो त्यास ह्मणाला, केयूरका, मी जाईपर्यंत देवी आपलें जीवित धारण करीलना? ” तो ह्मणाला, “ कंठांत आलेले प्राण आपल्या समागमाच्या इच्छेनेंच तिनें अद्यापपर्यंत धारण केले आहेत, याकरितां आपण लवकर गेला तरच ठीक आहे. ” मग त्यानें केयूरकास विश्रांति घेण्यास सांगून आपण तेथेंच चिंतन करीत पडला. तो आपल्या मनांत ह्मणाला, “ आईबापांस न कळवितां जावें तर मग समाधान कोठलें? ज्यानें सर्व राज्य माझ्या स्वाधीन केलें त्या पित्यास न विचारतां गेलों तर त्यानें हजारों लोकांनिशीं मला पहात हिंडावें असें होईल. बरें, पित्याला तरी मजखेरीज दुसरें कोण आहे? बरें विचारून जावें तर त्यांनां काय सांगावें? देवी कादंबरीवर माझें प्रेम जडलें आहे व त्यामुळें मी तिकडे जात आहें ! असें अमर्यादपणानें कसें सांगवेल? या वेळीं माझा मित्र वैशंपायनहि जवळ नाहीं, तर आतां कोणाला विचारावें? ” याप्रमाणें चिंतन करतां करतां रात्र संपली.

प्रातःकाळ झाला तेव्हां दशपुरीपर्यंत सैन्य आलें आहे असें वर्तमान समजलें. तेव्हां चंद्रापीडास मोठा आनंद झाला व थोर दैवानें मजवर मोठा अनुग्रह केला असें त्यास वाटलें. इतक्यांत केयूरक आला, त्यास तो ह्मणाला " केयूरका, वैशंपायन आला ! " तो ह्मणाला, " वाः फार चांगलें झालें! वसंतऋतूच्या मागोमाग पल्लवांकुर येणार ह्मणून जसें निश्चित्त, तसें हल्लींच्या स्थितीवरून महाराजांचें आगमन लौकर होणारच असें ध्यानांत येतें! वैशंपायन येऊन आपली तयारी होण्यास बराच वेळ पाहिजे. देवीची अवस्था महाराजांस कळविलीच आहे, तर आतां लवकर जाऊन देवीस आनंदाची बातमी सांगतों, ह्मणजे तिला आशा लागून जीविताचें रक्षण करावेंसें वाटेल !"

अशा त्याच्या भाषणानें चंद्रापीडासहि आनंद वाटला. " मग पत्रलेखेस तूं आपल्या बरोबर ने ह्मणजे देवीस भरंवसा वाटेल " असें तो ह्मणाला. मग त्यानें मेघनादास बोलावून आणिलें आणि सांगितलें, " ज्या ठिकाणाहून पत्रलेखेस तूं आणिलें, त्या ठिकाणीं केयूरकासह तिला नेऊन पोहोंचीव. " तेव्हां तो 'आज्ञा' ह्मणून तयारी करण्यास गेला. मग केयूरक व पत्रलेखा यांजपाशीं पुष्कळ निरोप सांगून " जसें हें जग मला शून्य भासणार नाहीं, असें देवीस जपा ! " असें सांगून त्यानें संकटानें त्यांनां निरोप दिला.

मग पत्रलेखा व केयूरक हे कादंबरीजवळ सुखरूप पोहोंचतीलना? असें चिंतन करीत तो बसला. मग वैशंपायनास सामोरें जावें असें मनांत येऊन तो आपले पित्याकडे गेला. त्या ठिकाणीं शुकनासप्रधानासह आपला पिता बसला होता, त्यास नमस्कार करून तो खालीं बसला. तेव्हां तारापीडानें मोठ्या प्रेमानें त्यास आपल्याजवळ बसविलें व त्याच्या सर्वांगावरून हात फिरवून ह्मटलें,—" शुकनासा ! चंद्रापीडाकडे पाहिलें कां? चंद्रावर जशी कलंकलक्ष्मी, तशी मदनदीपाची काजळीच, अशी ही रोमपंक्ति बालकाच्या मुखावर दिसत आहे! विवाह करण्यास हा योग्य झाला आहे असें ही कळवीत आहे! याकरितां देवीचा विचार घेऊन सुनमुख दृष्टीस पाडून आनंद करा! "

शुकनास ह्मणाला, " चंद्रापीडानें सर्व विद्या व कला ह्या हस्तगत केलेल्या आहेत, प्रजेला वश केलें आहे, दिक्सुंदरींचें करग्रहण केलें आहे, राजलक्ष्मीस कुटुंबवत्सल केलें आहे, तेव्हां यानें वरिलें नाहीं असें काय

आहे ? " असें भाषण ऐकून चंद्रापीड मनांत ह्मणाला, " प्रियासमागमाचें चिंतन करीत असतां सहजगत्या वडिलांचेंहि भाषण त्याच विषयावर निघालें! अंधकारांत प्रवेश करणाऱ्यावर जसा प्रकाश, किंवा मरणोन्मुखावर जशी अमृतवृष्टि तसा हा योग जमला ! तर आतां कादंबरीच्या भेटीस जाण्यास वैशंपायनाचाच कायतो उशीर आहे ! "

इतक्यांत तारापीड उठला व शुकनास आणि चंद्रापीड यांसह विलासवतीच्या मंदिरांत गेला. मग तो तीस ह्मणाला, " देवि, हें पहा, बालकाचे मुखावर तारुण्यलक्षण ( मिशी ) दिसत आहे. तारुण्यांतलि विलास पुरविण्यास ही मूर्तिमंत आज्ञाच प्रगट झाली आहे ! सुनमुख दृष्टीस पडावें म्हणून तुला कांहींच कशी घाई वाटत नाहीं ! तूं तर वरमाय ! तुला तर अगोदर हौस पाहिजे ! " असें विनोदपर भाषण करीत तो कांहीं वेळ तेथें राहून भोजन करण्यास गेला. तितक्यांत चंद्रापीडानें वैशंपायनास सामोरें जाण्याकरितां पित्याची आज्ञा घेतली. त्या दिवशीं चंद्रापीड आईच्या घरींच जेवला. रात्रीं निद्रा करण्याकरितां तो गेला असतां दोन प्रहर रात्र उलटली तरी त्यास झोंप आली नाहीं.

पुढें चंद्रोदय होऊन जिकडे तिकडे प्रकाश पडला, तेव्हां त्याचे अंतःकरणास अधिकच उत्साह वाटला व प्रयाणसूचक वाद्यें वाजविण्यास त्यानें सांगितलें. त्याबरोबर सर्व सैनिक तयार होऊन राजवाड्यापुढें येऊन उभे राहिले. चंद्रापीडहि सज्ज होऊन इंद्रायुधावर बसून त्या ठिकाणीं आला. मग तो तेथून निघून व शिप्रानदी ओलांडून दशपुरास जाणाऱ्या मार्गानें घोडा फेंकीत तो चालला असतां पहाटेपर्यंत बारा कोस गेला.

पुढें अरुणोदय होऊन प्रकाश पडला. पक्षी झाडांवरून उडूं लागले. श्वापदेंहि रानांत पळूं लागलीं. सूर्योदय होऊन चांगला प्रकाश पडला. तेव्हां बऱ्याच अंतरावर मोठें सैन्य उतरलें आहेसें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ' आतां मी एकाएकी वैशंपायनास जाऊन भेटेन, ' ह्मणून त्यास मोठा आनंद होऊन व इंद्रायुधास दवडीत तो एकटाच सैन्यांचा मोठा तळ पडला होता तेथें गेला. तेथील लोक उतरण्याच्या गडबडींत होते तों तो तेथें जाऊन ' वैशंपायन कोठें आहे ? ' ह्मणून विचारूं लागला. तेथील लोक चिंताक्रांत असून उतरण्याच्या गडबडींत असल्यामुळें चंद्रापीडास कोणीं ओळखिलें नाहीं, व " बाबा ! येथें कोठला वैशंपायन ! " असें

ह्मणाले. तें ऐकून तो फारच घाबरला व वेड्यासारखा इकडे तिकडे धावूं लागला. याप्रमाणें फिरत असतां इंद्रायुध व चंद्रापीड यांस ओळखून कांहीं राजे व सैनिक त्याजवळ धावत आले. ते उदास मुद्रेनें अश्रु ढाळीत चंद्रापीडास नमस्कार करूं लागले. तेव्हां " वैशंपायन कोठें आहे तें अगोदर सांगा ! " असें तो त्यांस घाईनें विचारूं लागला. तेव्हां " महाराजांनीं या झाडाखालीं थोडा वेळ बसावें ह्मणजे आह्मीं सर्व सांगतों, " असें ते ह्मणाले. असें त्यांचें भाषण ऐकून तो फारच घाबरला व त्यास मूर्च्छा आली. तेव्हां राजेलोकांनीं त्यास सावरून धरिलें. मग तो सावध झाल्यावर वैशंपायन दृष्टीस न पडल्यामुळें मी आहें कोठें, हें आहे काय ? मी सावध आहें कां गैरसावध आहें, हें त्यास कांहींच समजेना ! वैशंपायनाची धडगत दिसत नाहीं, असें समजून तो भ्रमिष्टासारखा झाला. " आई, बाप, व आर्य शुकनास यांस आतां हें तोंड तरी कसें दाखवावें ? वैशंपायनावर कांहीं अपरिहार्य प्रसंग येऊन गुदरला, किंवा असाध्य रोगानें त्याला पछाडलें ? काय झालें तरी काय ? " मग सर्वांनीं विनंति करून ह्मटलें, महाराज, 'वैशंपायन खुशाल आहे.' हें ऐकून तो ह्मणाला, "मजवांचून तो कधीं असा एकटा राहावयाचा नाहीं, असें असून तुमच्याबरोबर कां आला नाहीं ? "

ते ह्मणाले, " महाराज, आपण निघून आल्यावर दुसरे दिवशीं तेथून निघण्याचें ठरलें. सर्व तयारी झाली. तेव्हां वैशंपायन ह्मणाला, "अतिपुण्यकारक अशा आच्छोदसरोवरांत स्नान करून व शिवलिंगाचें दर्शन घेऊन निघण्याचें करूं. असें ह्मणून तो स्नानास गेला. तो सरोवराच्या कांठचा अतिरमणीय प्रदेश पहात चालला असतां वसंत ऋतूचें विश्रांतिस्थानच, असा एक सुंदर हिरवागार लतामंडप त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां बंधु, पुत्र किंवा इष्टमित्र यांची फार दिवस भेट अंतरली ह्मणजे जसें होतें, तसें त्याला झालें; आणि स्तंभासारखा किंवा चित्रासारखा पापणीस पापणी न लावतां त्या मंडपाकडेच पहात तो उभा राहिला. पुढें त्याचें अंग त्याला सावरून धरण्याचें न होऊन तो खालीं बसला. आणि ध्यानस्थासारखा चिंतन करीत व डोळ्यांतून अश्रु ढाळीत खालीं मान घालून बसला. मग आह्मीं त्यास ह्मटलें, " दर्शनीय पदार्थांचें परमावधीभूत, असें हें स्थान त्वां पाहिलें, तर चल आतां आपण स्नान करून येथून निघण्याचें करूं. " आह्मीं असें ह्मटलें तरी जसें कांहीं त्याला आमचें भाषण मुळींच ऐकूं गेलें नाहीं, अशा रीतीनें तो त्या

मंडपाकडेच टक लावून अश्रु ढाळीत बसला! मग पुष्कळदां आह्मीं आग्रह केल्यावर तो ह्मणाला, " हें स्थान सोडून मी तर कधीं येणार नाहीं, तुह्मी आपलें सैन्य घेऊन जा कसें! " असें त्याचें उत्तर ऐकून, यास खचित वैराग्य उत्पन्न झालें, असें आह्मांस वाटलें. मग आह्मीं त्यास म्हटलें चंद्रा-पीडास सोडून तुला येथें राहणें योग्य आहे काय ? व तुला सोडून जाणें आह्मास तरी योग्य आहे ? आम्ही गेलों तर राजा, प्रधान व चंद्रापीड हे आह्माला काय ह्मणतील ? तर असा हेका न करतां आमच्याबरोबर चल. तेव्हां तो साश्चर्य मुद्रा करून ह्मणाला,"चंद्रापीडाकडे येण्याविषयीं तुह्मी मला बोध करतां याचें मला मोठें नवल वाटतें! त्याच्यावांचून मला क्षणभर देखील दुसरीकडे राहवत नव्हतें, हें तुह्मांस माहीत आहेच. परंतु हल्लीं मी आपल्या स्वाधीन राहिलों नाहीं. माझी आणि कोणाची तरी चूकामूक झाल्यासारखें मला वाटतें, परंतु तें काय तें मला सांगतां मात्र येत नाहीं. येथून दुसरीकडे मला एक पाऊल सुद्धां टाकावेसें वाटत नाहीं. बळेंच तुह्मी मला न्याल तर माझे प्राण राहतीलसें वाटत नाहीं, मी अभागी आतां चंद्रापीडाच्या दर्शनसुखास मात्र अंतरलों! मला येथून कोठेंहि जावेंसें वाटत नाहीं, एवढें मात्र खरें; परंतु याचें कारण मला माहीत असेल तर चंद्रापीडाचीच शपथ! असें बोलून तो तेथून उठला व अनेक वृक्षतलें, लतागृहें व देवालयें पहात, जशी कांहीं त्या ठिकाणीं हरवलेली एकादी वस्तु शोधीत, हिंडूं लागला. पुढें दोन -प्रहर भरले. तेव्हां आह्मीं भोजनाविषयीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां तो म्हणाला, " मला प्रार्थना ती कशाला ? माझे प्राण चंद्रापीडास प्रिय आहेत, त्याअर्थीं मला ते राखले पाहिजेत. त्याच्या भेटीचीच मला इच्छा आहे, मृत्यूची नाहीं ! " असें बोलून त्यानें उठून स्नान केलें व कंदमूलफळें भक्षण केलीं. आज नाहीं उद्यां तरी हा शुद्धीवर येईल म्हणून आम्हीं तीन दिवस वाट पाहिली. शेवटीं निरुपायामुळें त्याचा कांहीं परिवार त्याजवळ ठेवून निघून आलों.

हें ऐकून दुःख व आश्चर्य यांनीं युक्त होऊन चंद्रापीड ह्मणाला, " वैशं-पायनाला वनवासांत राहण्याचें काय कारण झालें असावें बरें ? माझ्या-कडून तसें कांहीं झाल्याचें मला तर आठवत नाहीं. माझ्याप्रमाणेंच त्याचाहि मानमरातब आहे. वडील माणसांस दुःख देणारा व त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करणाराहि तो नाहीं, वनवासांत राहण्याचा त्याचा हा काळहि नाहीं.

संसारसुखाचा त्यानें अद्यापि कांहींएक अनुभव घेतला नाहीं. तसेंच अद्यापि कांहीं पुण्यकर्म केलें नाहीं व कीर्तिहि मिळविली नाहीं. असें असून त्यानें असें कसें केलें ? हें कांहींच समजत नाहीं. " याप्रमाणें चिंतन करीत तो बराच वेळ त्या ठिकाणीं बसला. मग राजेलोकांस स्वस्थानीं जावयास सांगून आपणास राहण्याकरितां तयार केलेल्या ठिकाणीं तो गेला. तेथें गेल्यावर आपणाकरितां अनेक सुखोपभोगाचे पदार्थ तयार केले होते तिकडे कांहींच लक्ष न देतां तो चिंताक्रांतच राहिला. तो आपल्या मनांत ह्मणाला, "वडिलांस न विचारितां या ठिकाणांहूनच **वैशंपायना**कडे मी गेलों तर मींहि त्याचेंच अनुकरण केलेंसें होईल. वडिलांस विचारून त्याला आणण्याकरितां जाण्याचें केलें तर माझें कोणी निवारण करणारा आहे असें नाहीं. **कादंबरी**ची भेट कशी होते ? म्हणून एकसारखी काळजी वाहणाऱ्या मजवर त्यानें हा मोठा उपकारच केला ह्मणावयाचा. आतां जेथें **वैशंपायन** तेथेंच **कादंबरी** ! तेव्हां तिजकडे जाण्याला हें एक निमित्त बरें उपस्थित झालें!"

पुढें दुपारची कडक उष्णता भासूं लागली म्हणून ती वेळ घालविण्याकरितां सरोवराच्या कांठीं जागा तयार केली होती तिकडे तो गेला. ऊन्ह उतरल्यावर तो तेथून निघून पहिल्या ठिकाणीं आला. तेथें जमलेल्या राजेलोकांबरोबर **वैशंपायना**च्या गोष्टी बोलत तो बसला. रात्र झाली तेव्हां सर्व लोकांस 'आतां तुह्मीं निघून **उज्जयनी**स जावें,' असें सांगून तो निद्रा करण्याकरितां गेला, परंतु त्यास झोंप आली नाहीं. मग तो दोन प्रहर रात्र उलटल्यावर तेथून निघून उजाडण्याच्या सुमारास **उज्जयनी**स येऊन पोहोंचला.

तेथें पाहतों तों पुष्कळ नगरवासी लोक **उज्जयनीं**तून बाहेर पडून शोक करीत उभे आहेत, व **वैशंपायना**चें वर्तमान विचारीत आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या मनांत आलें, इतर लोकांची जर अशी स्थिति, तर ज्यांनीं **वैशंपायना**ला मांडीवर खेळविलें, त्यांची काय अवस्था असेल ? तर आतां वडील माणसास मीं आपलें तोंड तरी कसें दाखवावें ? अशी चिंता करीत, व कोणाकडे न पाहतां व न बोलतां तो राजवाड्याजवळ येऊन उतरला. तेथें त्यास आपले मातापितर प्रधानाच्या घरीं गेले आहेत, असें समजलें. तेव्हां तोहि तिकडेच गेला. प्रधानाचे वाड्याजवळ जातांच **मनोरमे**चा शोक त्याचे कानीं पडला व आपली आई तिचें समाधान करीत

आहे असें त्यास समजलें. तेव्हां त्यांनां आपलें तोंड कसें दाखवावें, असें होऊन त्यानें खालीं तोंड घातलें व शुकनासासह खवळलेल्या आपल्या पित्यास त्यानें दुरूनच नमस्कार केला. तेव्हां तारापीड ह्मणाला, "वत्सा! आपल्या प्राणापेक्षां देखील तुझी वैशंपायनावर अधिक प्रीति आहे असें मी समजतों. असें असतां वैशंपायनाची अशी वृत्ति होण्यास काय कारण झालें असावें बरें? त्यांत तुझा कांहीं दोष असावा असें मला वाटतें." असें तारापीड बोलत असतां शुकनास संतापून ह्मणाला, "महाराज, युवराजाकडून अशी गोष्ट कधीं होणार नाहीं. तोच कारटा मातृपितृघातकी, मित्रद्रोही व कृतघ्न पडला, त्याला चंद्रापीडानें काय करावें? महाराजांनीं व देवीनें ज्याला मांडीवर खेळविलें,पुत्राप्रमाणें ज्याचें लालन पालन केलें,त्या मूर्खानें असें कसें करावें? याचा दोष चंद्रापीडाकडे काय आहे? चंद्रापीडावांचून मी कसा राहतों, महाराज मला काय ह्मणतील, आईबापांनां मी एकुलताएक, त्यांचा जीव कायतो मजवरच, इत्यादि गोष्टी त्या दुष्टाच्या कशा लक्षांत आल्या नाहींत? पशुपक्षी देखील उपकार जाणतात! ते देखील मातापितरांवर प्रीति करितात! हा लोक व परलोक गमावणाऱ्या कारटयानें पहा काय केलें तें! असला दुष्ट नीचयोनींत गेला असता तर बरें झालें असतें!"

राजा ह्मणाला, "शुकनासा, तुह्माला बोध करणें हें पेटलेल्या अग्नीस दीपानें प्रदीप्त करण्यासारखेंच आहे. विद्वान् व बहुश्रुत मनुष्य असला तरी त्याला प्रसंगीं विचार राहत नाहीं. तारुण्यांत मनुष्यांकडून असे प्रमाद घडतात. तुह्मीं क्रोधाधीन होऊन बालकावर आग पाखडली, हें ठीक केलें नाहीं. वडिलांचे आशीर्वाद व शाप हे दोन्ही अनुभवास येतात. आपल्या हातानें झाड लाविलें असतां त्यावर देखील ममता उत्पन्न होते, मग आपल्या अपत्याविषयीं तर काय सांगावें! वैशंपायनानें असें कां केलें, याचें खरें कारण आपणांस समजलें नाहीं. याकरितां त्याचेपूर्वींच त्यास दोष देणें ठीक नाहीं. तर आतां त्यास आणण्याची तजवीज करावी ह्मणजे कायतें कळेल."

पित्यानें दोष दिल्यामुळें चंद्रापीड आपल्या मनांत फारच दुःखी झाला व शुकनासास ह्मणाला, 'माझ्या दोषामुळें वैशंपायन आला नाहीं, असें मात्र नाहीं. तथापि पित्यानेंच मजवर दोषारोप केला आहे त्या अर्थी इतर लोकहि करतीलच. यासाठीं वैशंपायनास आणण्याकरितां मला वडिलांकडून परवानगी

देववावी. मजवांचून तो येणारहि नाहीं व त्याचा विरहहि मला सहन होणार नाहीं. आपलें पत्र मला तसेंच निघून येण्याविषयीं आलें ह्मणून मी पुढें आलों. मागून तो सैन्य घेऊन येईल असें मला वाटलें. मी जन्मापासून क्षणभर तरी त्याजवांचून कधीं राहिलों आहे?' मग **शुकनास तारापीडा**कडे पाहून " युवराज **वैशंपायना**कडे जाण्याची आज्ञा मागत आहे ' असें ह्मणाला. तेव्हां **तारापीड** साचिंत होऊन ह्मणाला, " **शुकनासा,** चंद्र जसा चंद्रिकेनें शोभतो, तसें वधूसहित बालकास पहावें असें मनांत होतें, परंतु वर्षाऋतूप्रमाणें आशा मलिन करणारा असा हा काळ प्राप्त झाला आहे ! असो, हा गेल्यावांचून तो येणार नाहीं हें खरेंच. याकरितां चांगला मुहूर्त पाहून यास पाठविण्याचें करावें." मग त्यानें **चंद्रापीडास** जवळ घेतलें व त्याच्या अंगावरून हात फिरवून ह्मटलें, 'बाळा! **मनोरमे**सह तुझी आई आंत आहे, तिला जाऊन भेट.' असें बोलून तो दुःखानें आपले मंदिरीं गेला.

मग **चंद्रापीड** आपले आईकडे गेला, तेथें **मनोरमा**बाईहि होती. तिचें सांत्वन करून तो ह्मणाला, **वैशंपायना**ला घेऊन येण्याविषयीं मला पित्याची आज्ञा झाली आहे; याकरितां तुमची आज्ञा मागण्याकरितां मी आलों आहे. ती ह्मणाली, ' बाळा दूर जाण्याच्या गोष्टींनें माझें समाधान करतोस काय? तो एक आह्माला सोडून गेला व तूंहि जातों ह्मणतोस, तर असें करूं नको-स, तुझ्या एकटयाच्या योगानेंच आह्मी दोघीहि पुत्रवती राहूं.' मग **विला-सवती** ह्मणाली, ' प्रियासखि, तूं ह्मणतेस तें खरेंच. परंतु **वैशंपायना**-वांचून याला तरी येथें कसें बरें राहवेल? तर याला मोडा घालूं नकोस.'मग **चंद्रापीड** त्यांजबरोबर कांहीं वेळ बोलून आपले मंदिराकडे गेला. नंतर त्यानें मुहूर्ताची वाट न पाहतां जाण्याची तयारी केली.

नंतर तो आपल्या आईस विचारण्याकरितां गेला. त्यास पाहून विरह-दुःखानें व्याकुळ झालेली **विलासवती** ह्मणाली, 'बाळा पहिल्यानें तूं गेलास तेव्हां आतांसारखें मला दुःख वाटलें नाहीं. हल्लीं माझा जीव व्याकुळ होऊन तो निघून जातो कीं काय असें वाटतें. कितिहि आवरतें पण रडणें आवरत नाहीं. काय माझ्या पापिणीच्या दृष्टीस पडावयाचें आहे तें समजत नाहीं. यावेळीं तुझें निवारणहि मला करतां येत नाहीं; परंतु मनास तर तुला जाऊं द्यावेंसें वाटत नाहीं ! याकरितां माझी ही अवस्था मनांत आणून

पूर्वीं जसा कशाच्या नादीं लागून फार दिवस राहिलास, तसें आतां करूं नकोस. हें मी तुला काकुलतीनें सांगतें ! ' तो ह्मणाला, " आई ! त्यावेळीं दिग्विजयाकरतां गेलों होतों, ह्मणून फार दिवस लागले. आतां काय तें वैशंपायनाला आणण्याचेंच काम. तर तूं कांहीं चिंता करूं नकोस. " मग विलासवतीनें मोठ्या कष्टानें त्यास आज्ञा दिली. नंतर तो पित्याकडे गेला. 'युवराज आले आहेत' असें द्वारपालानें सांगितल्यावर तारापीड आपल्या शयनावर उठून बसला. मग चंद्रापीडानें नमस्कार केल्यावर त्यास जवळ बसवून तारापीड ह्मणाला, " बाळा, पित्यानें दोषारोप केला ह्मणून मनांत दुःख बाळगूं नकोस, तूं सद्गुणी आहेस अशी माझी खात्री झाल्यामुळें हें सर्व राज्य तुझ्या स्वाधीन केलें आहे. याकरितां सर्व प्रजेचें मनोरंजन करण्यास तुला झटलें पाहिजे. आह्मीं आजपर्यंत कोणाची अवमर्यादा केली नाहीं. इंद्रियांस वश होऊन उपहास करून घेतला नाहीं. अधिकारमदानें पाहिजे तें करून परलोक बुडविला नाहीं. कीर्तीस जपलों, देवलोकीं दुर्लभ अशीं सुखें भोगलीं; तूं जन्मास आल्यामुळें कृतार्थहि झालों. आतां इतकेंच मनांत होतें कीं, तुझा विवाहसमारंभ पहावा आणि सर्व राज्यभार तुजवर सोंपवून वनांत जाऊन राहिलेलें आयुष्य ईश्वरभजनांत घालवावें. परंतु हें मध्येंच विघ्न आलें. वैशंपायनाला कां अशी बुद्धि व्हावी ? तेव्हां इच्छा पूर्ण होते कीं नाहीं कोण जाणे ! तर बाळकाला सांगणें इतकेंच कीं, माझा मनोरथ जागचेजागींच नाहींसा होईल असें मात्र करूं नकोस. लौकर परत ये. " असें बोलून त्यानें मोठ्या दुःखानें त्यास आज्ञा दिली. मग तो शुकनासप्रधानाकडे गेला. व त्यास विचारून ज्या ठिकाणीं इंद्रायुध उभा होता तिकडे तो गेला. त्या ठिकाणीं पाहतो तों इंद्रायुध मागें सरत होता, व रडके स्वर काढीत होता. आपले कान खालीं पाडून खिन्न दिसत होता. तें पाहून चंद्रापीडाच्या मनांत आलें कीं, हें दुश्चिन्ह समजून कोणी आपलें निवारण करील, तर आतां येथें न थांबतां झट्दिशीं निघून जावें. असा विचार करून वैशंपायन व कादंबरी यांच्या भेटीच्या अत्युत्कंठेनें इंद्रायुधावर बसून तो नगराबाहेर निघून गेला.

शिप्रानदीवर ज्या ठिकाणाहून युवराजाची स्वारी जावयाची होती, त्या ठिकाणीं प्रस्थानमंगलाची तयारी केली होती. परंतु युवराजाची स्वारी परभारेंच गेली असें कळतांच राजे व सैनिक चंद्रापीडाच्या मागें धावत गेले.

वाटेनें केव्हां तेथें पोहोंचेन असें चंद्रापीडास झालें होतें. त्याच्या मनांत हजारों कल्पना चालू होत्या. तो मनांत ह्मणाला "मी तेथें गेल्यावर वैशंपायनाच्या मागून जाऊन त्यास घट्ट धरीन व लज्जेनें तो एकीकडे जाऊं लागला तर, 'आतां कोठें जातोस ?' ह्मणून त्याच्या मनांतलें वेड काढून टाकीन व त्याला ताब्यावर आणीन. नंतर महाश्वेतेस भेटेन. मग तिला घेऊन कादंबरीकडे जाईन. मी दृष्टीस पडतांच हर्षित झालेल्या तिच्या सख्या "बाईसाहेब! बक्षिस द्या अगोदर!" असें ह्मणतील. "खरेंच कां येणें झालें? किती दूर आहेत!" असें उत्कंठेनें व घाईघाईनें ती विचारीत असतां मी तिच्या दृष्टीस पडेन! मग काय विचारावें! ती सानंद व सलज्ज होऊन पदर सावरीत उभी राहील! अत्यानंदामुळें तिच्या नेत्रांतून अश्रु चालल्यामुळें मदनाग्नीला शेवटली जलांजलिच देत आहे काय अशी ती दिसेल! तेव्हां दर्शनीय वस्तूची परमावधि पाहिल्यामुळें मी आपल्यास कृतार्थ मानीन! महाश्वेता मग आमचा विवाहसमारंभ करील; मग देवालाहि दुर्लभ अशा सुखाचा मी उपभोग घेईन! कादंबरीचा मजवर पक्का भरंवसा बसला ह्मणजे मदलेखेबरोबर वैशंपायनाच्या लग्नाचा घाट जमवीन व त्यालाहि सुखांत लोटीन!" याप्रमाणें तो मनोराज्यांत गर्क होऊन मार्ग क्रमीत चालला होता.

मार्गांत पर्जन्य सुरू झाल्यामुळें त्याची व त्याजबरोबरच्या लोकांची फार दुर्दशा झाली. सर्वांनां जीवन देणारा असा पर्जन्यकाळ होता तरी तो त्यास मृत्यु देणारा भासला. तथापि तो कोठें न थांबतां मोठ्या कष्टानें मार्ग क्रमीत चालला होता. परत येणारा मेघनाद त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्यास तो वैशंपायनाचें वर्तमान विचारूं लागला. तो ह्मणाला, "मला त्याविषयीं कांहीं माहिती नाहीं. अच्छोदसरोवराचे अलीकडे तीन चार मजला पत्रलेखा व केयूरक यांनीं 'पर्जन्यकाळ येऊन पोहोंचला आहे त्या अर्थी घरचीं माणसें महाराजास आतां येऊं देणार नाहींत, याकरतां तूं आतां येथूनच परत जा. आम्ही आतां पोहोंचल्यासारखेच आहोंत.' असें मला आग्रहानें सांगितल्यामुळें मी तसाच परतलों." हें ऐकून चंद्रापीड कष्टी होऊन पुढें तसाच मार्ग क्रमीत अच्छोदसरोवराजवळ येऊन पोहोंचला.

त्या वेळीं तें सरोवर गढूळ पाण्यानें भरून गेलें होतें व त्यांतील कमलें नष्ट झाल्यामुळें तें विशोभित दिसत होतें. हंस व चकोरादि पक्षी त्या

ठिकाणीं नसल्यामुळें तें अगदीं भयाण दिसत होतें! तेंच अतिसुंदर अच्छोद-सरोवर परंतु सांप्रत तें अगदीं शोभारहित व भेसूर असें त्यास दिसलें.

मग त्यानें आपल्या लोकांस वैशंपायनाचा सावधागिरीनें शोध करण्यास सांगितलें व आपणहि त्याचा शोध करीत हिंडूं लागला. त्यानें तेथील लता-गृहें, देवळें व इतर ठिकाणें शोधिलीं, परंतु कोठें त्याचा पत्ता लागला नाहीं. मग त्याच्या मनांत आलें कीं, मी येणार असें पत्रलेखेकडून त्यास कळून तो कोठें तरी दुसरीकडे निघून गेला असावा. तर आतां काय करावें ! हें तोंड आतां आईबापांनां कसें दाखवावें? आतां तर माझे हात-पाय अगदींच मोडल्यासारखे झाले. मोठ्या आशेनें धरून ठेवलेले प्राण आतां जाऊं पहात आहेत ! शिव शिव ! मित्रदर्शन नाहीं ! व प्रियदर्शनहि नाहीं ! आतां बरीक मी सर्वस्वीं बुडालों ! मग त्याचे मनांत आलें महाश्वेता येथून जवळच रहाते, तर तिला कांहीं माहित असल्यास पुसावें. असा विचार करून आपले सैन्यास तेथेंच तळ देण्यास सांगून तो तसाच महाश्वेतेकडे गेला. तेथें पाहतो तों, गुहेजवळच्या शिलातलावर खिन्न होऊन बसलेली महाश्वेता त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्याला वाटलें, देवी कादंबरी खुशाल असेलना ! नाहीं तर मला पाहिल्यावर ही अशी कधीं बसली नसती ! मग तो तिच्याजवळ गेला आणि तरलिका जवळ होती तिला ह्मणाला, भगवती महाश्वेता अशी खिन्न कां बसली आहे ? ' तेव्हां ती महाश्वेतेच्या तोंडाकडे पहात उगीच उभी राहिली. मग दुःखानें सद्गदित झालेली महाश्वेता ह्मणाली, " महाराज ! ही चांडाळीण काय काय कळाविणार नाहीं ? पूर्वीं स्वतःचें दुःख कळाविलें व आतां फिरून महाराजांच्या जिवास अपाय करणारी मी आणखी दुःखकारक वर्तमान सांगण्यास बसलेंच आहे. असो उपाय नाहीं ! आपण गेल्यावर मला वाटलें मीं आईबापांचे मनोरथ पूर्ण केले नाहींत ! व प्रियसमागमानें सुखी अशी कादंबरीहि पाहिली नाहीं ! ह्मणून मला फार वाईट वाटून कादंबरीचे स्नेहपाश तोडून येथें येऊन उदासीन वृत्तीनें राहिलें. पुढें एके दिवशीं वयानें व रूपानें महाराजासारखाच, चंचलदृष्टीनें कांहीं हरवलेली वस्तु पहात आहे असा, ओळख नसून परिचितासारखा व उन्मत्तासारखा असा एक तरुण ब्राह्मण मजजवळ येऊन ह्मणाला, ' हे सुतनु ! तूं आपल्या अशा सुंदर तनूची मजसारख्याच्या समागमानें सार्थकता कां करीत नाहींस ? कुरूप

असतात ते देखील सुखें भोगून धन्य होतात ! तूं जर खुशाल तप करतेस तर मग मदन कशाला धनुष्यबाण धारण करतो ? हा चंद्रहि कशाला उगवतो! व वसंत ऋतुहि कशाला प्रकट होतो कोण जाणे !' प्रिय पुंडरीकाच्या विरहानें मी विरक्त व दुःखी असल्यामुळें मला त्याचें असें बोलणें आवडलें नाहीं. मी तेथून उठून दुसरीकडे निघून गेलें. आणि तरलिकेस ह्मणालें 'हा तरुण ब्राह्मण कोण आहेग? याच्या बोलण्याचालण्याचा कांहीं निराळाच भाव दिसतो आहे. याकरितां तो फिरून येथें येणार नाहीं असें कर. नाहीं तर त्याचा नाश होईल. ' मग त्यास येथून घालवून दिलें तरी दुष्ट मदनाच्या ललिनें अथवा होणार तें चुकत नसल्यामुळें त्यानें आपला दुराग्रह सोडला नाहीं. एके दिवशीं बरीच रात्र झाली होती, जिकडे तिकडे स्वच्छ चंद्रिका पसरली होती. मला झोंप न आल्यामुळें मी ह्याच शिळेवर येऊन बसलें होतें. प्रिय पुंडरीकाकडे लक्ष जाऊन सिद्ध पुरुषाचें भाषण कसें खोटें झालें ! असे विचार माझ्या मनांत चालू होते. अशा वेळेस तो तरुण पुरुष माझ्या आलिंगनाच्या व्यर्थ आशेनें हात पसरून मजजवळ आला आणि ह्मणाला 'हे चंद्रमुखी ! मदन व त्याचा सखा हा चंद्र मला मारण्याकरितां आले आहेत, तर माझें रक्षण कर. तुझ्या स्वाधीनच काय तें माझें जीवित आहे !'

असें त्याचें भाषण ऐकून क्रोधानें माझें देहभान नाहींसें झालें आणि ' हत् तुझें कपाळ फुटलें मेल्या ! तुझी वाचा बंद कां झाली नाहीं व तुझ्या जिभेचे हजारो तुकडे कां झाले नाहींत ! पशुपक्ष्याप्रमाणें कामुकपणा मात्र तूं जाणतोस, दुसरें कांहीं नाहीं ! ज्या दुष्ट दैवानें राघूप्रमाणें तुला बोलण्यास मात्र शिकविलें त्यानें तुला त्या योनींत घातलें ह्मणजे तुझ्या बोलण्याचा कोणाला राग तरी येणार नाहीं. तर आतां तुझ्या दुष्कर्माचें फळ तुला भोगावयास लावतें बघ !' असें ह्मणून चंद्रास हात जोडून ह्मणालें 'भगवन्! पुंडरीकाखेरीज माझें मन दुसरीकडे कोठें गेलें नाहीं, हें खरें असेल तर हा मेला दुष्ट शुकयोनींत जावो ! असें मी ह्मणत आहें तों तो धाडकन् भूतलावर निश्चेष्ट पडला ! तो गतप्राण होतांच त्याचे सेवक रडूं लागले व त्यांच्या बोलण्यांत आल्यावरून तो महाराजांचा मित्र होता असें समजलें ! ' इतकें बोलून ती खालीं तोंड घालून रडत बसली.

तें ऐकतांच चंद्रापीड घाबरा झाला व तो तीस ह्मणाला, ' भगवति ! तूं आपल्याकडून यत्न केलास, तथापि या पाप्यास देवीच्या समागमाचें सुख

मिळालें नाहीं, तर तें जन्मांतरीं तरी मिळो ! ' असें बोलतां बोलतां त्यानें आपले डोळे फाडले व त्याचें हृदयहि दुभंग झालें. इतक्यांत **तरलिका** धावत जाऊन चंद्रापीडास धरून ह्मणाली, ' देवि, महाराजाकडे बघ. यांची अवस्था फार कठिण दिसते ! यांचा श्वासोच्छ्वास बंद झाला व डोळयांच्या बाहुल्या आंत गेल्या!' असें ह्मणून ती मोठ्यानें रडूं लागली. **महाश्वेता**हि त्याची ती अवस्था पाहून निश्चेष्ट पडली. त्यावेळीं चंद्रापीडाबरोबर आलेल्या लोकांनीं तर रडून रडून आक्रांत केला !

इकडे चंद्रापीड आल्याची बातमी **कादंबरीस** समजतांच ती फार उतावीळ झाली. मग ' महाश्वेतेच्या भेटीस जातें ' असें तिनें आईबापांस सांगून व घाईघाईनें शृंगारवेष करून व सानंद होऊन **मदलेखा** व **पत्रलेखा** यांसह ती महाश्वेतेच्या आश्रमाजवळ येऊन पोहोंचली. तेथें येऊन पहाते, तों चंद्रविरहित जशी रात्र, तशी प्राणानें विरहित चंद्रापीडाची तनु तिच्या दृष्टीस पडली. तेव्हां दुःखावेशानें भूमीवर पडणाऱ्या **कादंबरीस मदलेखेनें** मोठ्यानें आक्रोश करीत धरून ठेविलें. **कादंबरीचा** हात सुटून **पत्रलेखा**हिं भूतलावर निश्चेष्ट पडली. मग **कादंबरी** सावध झाल्यावर **मदलेखा** तिच्या पायां पडून ह्मणाली, ' प्रियसखि, दुःखानें तुझें हृदय फुटलेंसें दिसतें. तुझ्या दुःखास पारावार नाहीं हें खरें, परंतु तुझ्यावांचून मातृपितृकुळें नष्ट होतील हें लक्षांत आण. ' मग ती ह्मणाली, ' वेडे ! प्रियकराची अवस्था पाहिल्याबरोबर ज्याचे तुकडे झाले नाहींत, असें मेलें वज्रापेक्षां कठोर हें हृदय कोठून फुटणार ? वांचण्यापासून जिला सुख वटत असेल तिला आप्तमित्रांची आशा. मला त्यांचा काय उपयोग ? माझ्या हातीं आतां प्रियतमाचें शरीर सापडलें आहे. हा लाभ का लहान आहे ? तर आतां सहगमनानें सर्व दुःखाचा मी शेवट करतें ! स्वर्गास चाललेल्या प्रियतमाच्या मागोमाग जाण्याची आनंदाची वेळ आली असतां रडूं तरी कशाला ? माझ्या वल्लभानें येथें मजकरितां येऊन जीवित सोडलें असतां मीं जीवंत राहावें काय ? तूं व इतर सख्यांनीं ज्याला शीतलोपचार केले असतां जें मदनाच्या दाहानें तसेंच राहिलें तें शरीर प्रियतमाच्या आलिंगनामृतानें आतां शीत करतें ! ' मग ती **मदलेखेचे** हात हिसकून देऊन **महाश्वेतेजवळ** गेली आणि तिच्या गळ्यास मिठी मारून ह्मणाली, 'प्रियसखि, तुला प्रियसमागमाची आशा आहे तीमुळें तुला दुःसह दुःख

सोसवतें, मला पापिणीला तर आशाच नाहीं, तेव्हां तें कोठून सोसणार? तर आतां जन्मांतरीं तरी प्रियसखीचा समागम व्हावा असें मी इच्छितें!' मग ती चंद्रपीडाजवळ गेली आणि त्याच्या पायांवर आपलें मस्तक ठेवून त्याचे पाय आपल्या मांडीवर घेऊन बसली.

कादंबरीचा हस्तस्पर्श होतांच चंद्रापीडाचें शरीर तेजस्वी दिसूं लागलें व त्यापासून चंद्रासारखें तेज निघून आकाशांत गेलें व त्याबरोबर अशी आकाशवाणी झाली कीं, "वत्से महाश्वेते, पुंडरीकाचें शरीर माझ्या लोकीं अमृतरूपी माझ्या तेजानें सचेतन होत आहे. चंद्रापीडाचें शरीर हें माझेंच अविनाशी रूप आहे, कादंबरीच्या स्पर्शानें तें जीवंत होईल. याकरितां शाप संपेपर्यंत त्याचें नीट रक्षण करावें. कादंबरीचा व याचा लवकरच समागम होईल."

तें ऐकून पत्रलेखेवांचून सर्वांना मोठाच चमत्कार वाटला. पत्रलेखा तर त्या तेजाच्या शीतलस्पर्शानें सावध होऊन भूतसंचार झाल्यासारखी होऊन इंद्रायुधास धरून त्यासुद्धां तिनें आच्छोदसरोवरांत उडी टाकली. त्याच वेळेस त्यांतून एक तपस्वीकुमार निघाला, व महाश्वेतेजवळ जाऊन ह्मणाला, "मला ओळखिलें कां!" तेव्हां ती गडबडीनें उठली आणि त्यास नमस्कार करून ह्मणाली, "भगवन् कपिंजला! प्रिय पुंडरीकाचें काय वर्तमान आहे?"

तो ह्मणाला, "ज्यावेळीं पुंडरीकाचें शरीर घेऊन तो दिव्य पुरुष आकाशांत चालला, त्यावेळीं मी त्याचे मागोमाग गेलों. पुढें तो चंद्रलोकीं गेला तेथें मला पाहून तो ह्मणाला, 'कपिंजला, मी चंद्र आहें, समजलास? मी सर्व जगावर अनुग्रह करण्याकरितां प्रकाशलों असतां मदनपीडेनें व्याकुळ होऊन यानें प्राण सोडला.' त्यावेळीं यानें मला शाप दिला कीं, 'हे दुष्ट-चंद्रा! माझ्या प्राणप्रियेबरोबर समागमसुख होण्यापूर्वीं तूं माझें प्राणहरण केलेंस, त्या अर्थीं तूंहि मनुष्यलोकीं उत्पन्न होऊन मजसारखाच जन्मोजन्मीं दुःखानुभव घेशील.' असा त्याचा शाप ऐकून मला राग आला व मींहि त्यास उलट शाप दिला कीं, "तूंहि मजबरोबरच समदुःखी होशील." नंतर महाश्वेतेचा व याचा संबंध जडला आहे असें लक्षांत आलें. वत्सा, महाश्वेता तर मजपासून उत्पन्न झालेल्या गंधर्वकुलांत जन्मली, व तिनें यास वरिलें आहे. यासाठीं मला याजबरोबर मनुष्यलोकीं दोनवेळ जन्म घेतलें

पाहिजे. तर तूं आतां जा व श्वेतकेतूस सर्व वर्तमान सांग. याच्या शरीराचा नाश न व्हावा ह्मणून यास मीं येथें आणून ठेविलें आहे."

मग तेथून निघून मी श्वेतकेतूकडे जात असतां मार्गांत एका देवाचें अतिक्रमण केल्यामुळें तो रागावून ह्मणाला, "मूर्खा! तूं इकडे तिकडे न पाहतां घोड्यासारखा दवडत चालला आहेस त्या अर्थी तूं अश्व होशील" तें ऐकून मीं त्याची पुष्कळ प्रार्थना केली तरी "शाप भोगल्यावांचून सुटावयाचा नाहीं. तथापि अश्वयोनींत तुझा व तुझ्या मित्राचा निकट संबंध राहील. उज्जयनींत तारापीड राजा पुत्राकरितां अनुष्ठानें करीत आहे, त्याचे घरीं चंद्र उत्पन्न होईल. व त्याचाच प्रधान शुकनास याचे घरीं पुंडरीक जन्म घेईल व तूं चंद्रापीडाचें वाहन होशील." मग मी लागलीच समुद्रांत पडलों व अश्व होऊन बाहेर निघालों. त्या योनींतहि मला ज्ञान राहिलें होतें. तुजवर अनुराग धरून जवळ आला असतां न समजून तूं ज्यास शाप दिलास, तो पुंडरीकाचाच अवतार होय!"

हें ऐकतांच महाश्वेतेस फारच दुःख झालें व तिनें अतिशय शोक केला. मग कपिंजल, ह्मणाला, "तुझा यांत काय दोष आहे? शापामुळें अशा गोष्टी घडून आल्या. चंद्राची वाणी तूं ऐकिलीच आहेस, तर आतां व्यर्थ शोक करूं नकोस." मग ती ह्मणाली, 'कपिंजला, पत्रलेखेची काय वाट झाली?' तो ह्मणाला, 'सरोवरांत उडी टाकल्यावर तिचें काय झालें व चंद्रापीड व वैशंपायन यांचें जन्म कोठें झालें, हें समजण्याकरितां मी आतां सर्वज्ञ श्वेतकेतूकडे जातों.' असें ह्मणून तो आकाशांत गेला. मग कादंबरी महाश्वेतेस ह्मणाली—'देवानें तुझ्यासारखेंच मला समदुःखी केलें तर आतां मीं पुढें काय करावें?' ती ह्मणाली 'प्रियसमागमाची आशा जें करूं देईल तें करावें! चंद्रापीड हा साक्षात् चंद्राचा अवतार आहे, याकरितां त्याची सेवा करावी ह्मणजे तो प्रसन्न होईल.' मग तिनें त्याच्या शरीराकडे लक्षपूर्वक पाहिलें तों त्यावर प्रेतकळा न दिसतां सर्वावयवांवर टवटवी व तजेला दिसूं लागला. तो तिनें सर्वांस दाखविला, तेव्हां सर्वांची खात्री झाली. मग वर्षाऋतूचे सर्व दिवस तिनें त्याजवळ राहून व सेवा करून घालविले. नंतर चंद्रापीडाबरोबरच्या राजेलोकांचें व सर्व सैनिकांचें तिनें समाधान करून सांत्वन केलें.

पुढें कादंबरीनें पत्रलेखेस पाठवून आपल्या मातापितरांस घडलेला प्रकार कळवून आनंदयुक्त केलें.

तारापीड राजाकडून चंद्रापीडाच्या शोधाकरितां लोक आले, त्यांनीं तेथील सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिल्यावर मेघनादानें कादंबरीच्या संमतीनें चंद्रापीडाची बालसेवक 'त्वरितक' यास त्या लोकांबरोबर देऊन त्यास परत पाठविलें. ते उज्जयनीस येऊन पोहोंचल्यावर त्यांच्या तोंडानें चंद्रापीड व वैशंपायन यांचें वर्तमान ऐकून तारापीड, विलासवती, शुकनास व मनोरमा व इतर आप्तमित्र हे चंद्रापीडास पहाण्याकरितां महाश्वेतेच्या आश्रमीं आले. तेथें आल्यावर त्यांनीं पुष्कळ शोक केला. मग चंद्रापीडाच्या जिवंत होण्याविषयीं त्यांस बरीच आशा वाटून ते तेथेंच राहिले."

याप्रमाणें कथानक सांगून जाबालिऋषि ह्मणाले, 'असा कामलुब्ध पुंडरीक स्वतःच्या अविचारानें देवलोकापासून भ्रष्ट होऊन शुकनासाचा पुत्र झाला. व येथेंहि पित्याच्या व महाश्वेतेच्या शापानें शुकयोनींत उत्पन्न झाला.'

याप्रमाणें जाबालि बोलत असतां, मीं [ राघु शूद्रकराजास ह्मणतो आहे] जागा झाल्यासारखा झालों. मागील सर्व गोष्टींचें मला स्मरण झालें. मनुष्याप्रमाणें मला वाणी फुटली व सर्व विद्या जिव्हाग्रावर स्फुरण पावूं लागल्या. जाबालीच्या पुढें मला आपल्या कामुकपणाबद्दल अतिशय लाज वाटून मी आपल्या जागीं चोरट्यासारखा झालों. मग जाबालीस विनंति केली. भगवन् आपल्या कृपेनें मला ज्ञान प्राप्त झालें. पूर्वींच्या बांधवांची आठवण होऊन त्यांच्या विरहाचें मला दुःख वाटूं लागलें आहे. चंद्रापीडाच्या स्मरणानें माझेंहि हृदय फुटतेच कीं काय असे मला झाले आहे. तर चंद्रापीडाचें जन्म कोठें झालें तें सांगावें, ह्मणजे तेथें जाऊन त्याच्या सहवासानें तरी मी आपला काळ सुखांत घालवीन.'

तेव्हां ते ह्मणाले, "मूर्खा ! तूं फार उतावळा आहेस. तुला पंख फुटून तूं हिंडूं फिरूं तर लाग, मग विचार." नंतर ते ह्मणाले 'पुरे आतां, गोष्टीच्या नादानें सर्व रात्र संपली तरी ती समजली नाहीं. आतां स्नानाची वेळ झाली आहे.' असें ह्मणून ते उठले. मग हारीतानें मला आपल्या पर्णशाळेंत नेऊन ठेवलें व तोहि स्नानास गेला.

तो गेल्यावर मला कृतकर्माचा मोठा पश्चात्ताप झाला. पूर्वींच्या प्रियबांधवांचा सहवास कसा होईल व तो न झाला तर जगून तरी काय करायाचें

आहे ! अशा विवंचनेंत मी असतां हारीत येऊन ह्मणाला, 'वैशंपायना, तूं नशिबाचा थोर आहेस, श्वेतकेतूकडून कपिंजल तुजकडे आला आहे.' तें ऐकतांच मी उतावीळ होऊन तो कोठें आहे ? म्हणून विचारीत होतों तों तो माझ्या दृष्टीस पडला. मग मीं त्यास म्हटलें, ' सख्या कपिंजला ! दोन्ही जन्मांत तुझी भेट अंतरली, त्यामुळें तुला किती कडकडून भेटूं व किती उपचार करूं ! असें मला झालें आहे.' असें मी ह्मणत होतों तों त्यानेंच मला उचलून व उराशीं घट्ट धरून पुष्कळ शोक केला. मी त्यास ह्मटलें, ' सख्या कपिंजला ! मजसारख्या कामाधीन होणाऱ्या पाप्यानें शोक करावा. तुजसारख्या कामक्रोधादि जिंकणाऱ्यानें तो करणें योग्य नाहीं! मग त्याला मीं सर्वांचें कुशल विचारिलें, तेव्हां त्यानें तें सांगितलें.' याप्रमाणें त्याजबरोबर बोलत बसलों असतां मला आपल्या पक्षिजातीचें भान देखील राहिलें नाहीं ! दोनप्रहरची वेळ झाली होती ह्मणून हारीतानें कपिंजला-कडून फलाहार करविला. नंतर तो मला ह्मणाला, " तूं शापांतून मुक्त व्हावें ह्मणून भगवान् श्वेतकेतु अनुष्ठान करीत आहेत.त्यांनीं तुला सांगितलें आहे कीं, ' हें अनुष्ठान संपेपर्यंत तूं येथेंच रहावेंस. ' मजकडेहि त्यांनीं कांहीं काम सोंपविलें आहे. तर आतां मी जातों.' असें ह्मणून मला व हरीताला आलिंगन करून तो निघून गेला.

पुढें कांहीं दिवसांनीं मला पंख फुटून चांगलें उडतां येऊं लागलें. तेव्हां माझ्या मनांत आलें कीं, महाश्वेता तर तीच आहे, चंद्रापीड तेथेंच जीवंत होणार आहे. हें सर्व मला समजलें असून आतां येथें काळ कशाकरितां घालवावा ? महाश्वेतेजवळ जाऊन राहिलों असता मला सुख तरी वाटेल !

असें मनांत येऊन एके दिवशीं सकाळीं सहल करीत असतां उत्तरादिशे-कडे भरारी मारीत चाललों! उडण्याचा फारसा अभ्यास नसल्यामुळें कांहीं वेळानें श्रमामुळें तहान लागून घशाला कोरड पडली. पंख दमून निर्बल झाले. मग विश्रांति घेण्याकरतां स्थळ पहात चाललों असतां एका सरोवराच्या कांठीं दाट झाडी दृष्टीस पडली. तेथें उतरून गर्द छायेंत बसलों. नंतर गोड फळें खाऊन व तेथील थंडगार उदक प्राशून भूक व तहान भागविली. मग मार्गश्रमानें ठणकत असलेल्या अंगास विश्रांति देण्याकरितां झाडावर चढून दाट छायेंत बसलों असतां मला गाढ झोंप लागली. कांहीं वेळानें जागा झालों आणि पाहूं लागलों तों आपण जाळ्यात सांपडलों आहों व पुढें एक भयंकर

पुरुष उभा आहे, असें दृष्टीस पडलें ! तेव्हां मला जीविताची निराशा वाटून मीं त्यास ह्मटलें, " बाबा तूं कोण ? तूं कशाकरितां मला धरिलेंस ? प्रियजनाच्या भेटीकरितां मला फार दूर जावयाचें असल्यामुळें मला क्षणभर देखील उशीर नकोसा वाटत आहे. याकरितां मला लवकर सोडशील तर मोठे उपकार होतील! " तो ह्मणाला, " अरे मी जातीचा चांडाळ आहें. माझा धनी सर्वचांडाळांचा राजा येथून जवळच राहतो. त्याला एक सुंदर मुलगी आहे, ती पूर्ववयांत असल्यामुळें अर्थात् तिला चमत्कारिक वस्तूंचें मोठें कौतुक वाटत आहे. तिला कोणीं सांगितलें कीं, जाबालिऋषीच्या आश्रमांत एक उत्तम रावा आहे. व तो सर्व कला जाणतो आहे. हें समजतांच तिनें तुला धरण्याकरितां मजसारखे पुष्कळ लोक पाठविले आहेत. माझें नशीब थोर ह्मणून तूं मला सापडलास ? तर आतां मी तुला तिजकडे नेतों. मग ती तुला सोडो किंवा ठेवो ! "

तें ऐकून वज्रानें ताडित झाल्यासारखा होऊन मी मनांत ह्मणालों, काय ह्या मंदभाग्याच्या कर्माचा परिणाम पहा ? सर्वांनां वंद्य असा मी मुनि असून चांडाळाच्या हातीं पडावें, त्यांचा सहवास घडावा, त्यांच्या अन्नानें शरीर पोसावें व त्यांच्या मुलाचें खेळणें व्हावें! अरेरे ! दुरात्म्या पुंडरीका! तुझ्या जन्माला धिक्कार असो ! असा बहुत प्रकारें शोक करून दीनवाणीनें पुनः त्यास ह्मटलें, ' बाबा ! मी पूर्वजन्मीचा मुनि आहें.याकरितां मला सोड, ह्मणजे तुला मोठें पुण्य लागेल. दुसऱ्या कोणाला ही गोष्ट अद्याप माहीत नाहीं, मग सोडायाला काय हरकत आहे ?' असें ह्मणून मी त्याच्या पायां पडलों. मग तो ह्मणाला, ' वेड्या ! चांगलें वाईट कर्म सर्वसाक्षी देव पाहत नाहीं काय ? याकरितां मी तसें करणार नाहीं. मला धन्याची आज्ञा मान्य आहे. ! ' असें बोलून तो मला घेऊन चांडाळाच्या वसतींत गेला.

तेथें पाहिलें तों अतिशय घाणेरडें, केवळ दुःखांचें माहेरघरच व पापकर्माचा बाजारच असें तें स्थान त्याच्या दृष्टीस पडलें !

त्या वेळीं माझ्या मनांत आलें कीं, ती चाडाळकन्या मजवर दया करून मला सोडून देईल काय ? असें माझें पुण्य उभें राहील ? असें मी मनोराज्य करीत होतों तों त्यानें मला तिजपाशीं नेलें व नमन करून " हा पहा मला सापडला ! " असें ह्मणून मला तिला दाखविलें. तेव्हां तिला फारच आनंद झाला व ' शाबास चांगलें केलें ! ' असें ती त्यास ह्मणाली. मग मला तिनें

हातांत घेऊन " अरे कारट्या ! बरा सापडलास, आतां कोठें जातोस ? तुझा सर्व स्वछंदीपणा मी काढून टाकतें ! " असें ह्मटलें. इतक्यांत चांडाळांच्या मुलांनीं ओल्या गोचर्माचा पिंजरा आणला. त्याची अतिशय दुर्गंधि चालली होती. त्यांत तिनें मला घालून त्याचें व महाश्वेतेस भेटण्याच्या आशेचें द्वार बंद केलें ! " आतां येथें खुशाल रहा ! " असें बोलून ती स्वस्थ बसली ! याप्रमाणें मी मोठ्या संकटांत पडलों असतां माझ्या मनांत आलें कीं, हिला आपलें सर्व वर्तमान सांगून सोडून देण्याविषयीं विनंति केली तर, जो मधुरभाषणाचा गुण मला बद्ध करण्यास कारण झाला, तोच अधिक व्यक्त केल्यासारखें होईल. कारण, मी चांगलें बोलतों; म्हणून तिनें मला धरण्याचा प्रयत्न केला आहे. बरें मौन धरून उगीच बसावें तर ही रागावून अधिकच माझे हाल करील कीं काय कोण जाणे ! कारण, जात पडली निर्दय ! मग काय होईल तें होवो, परंतु चांडाळाबरोबर भाषण ह्मणून करावयाचें नाहीं, असा मीं निश्चय केला व मनांत खिन्न होऊन ह्मटलें, ' काय पहा ! देवलोकापासून भ्रष्ट झालों ? मनुष्यलोकीं ब्राह्मण झालों, ब्राह्मणत्वास मुकून पक्ष्याच्या योनींत जन्मलों आणि शेवटीं चांडाळाच्या हातीं सापडलों ! हा सर्व कामाधीन होण्याचा परिणाम!' मग मीं सर्व इंद्रियांचें नियमन करून मुक्याचें व्रत घेतलें ! तिनें मीं बोलावें ह्मणून ताडण केलें तरी मी बोललों नाहीं; व खाण्याचे पदार्थ आणले तरी त्यांस शिवलों नाहीं. दुसरे दिवशींहि मीं तसेंच केलें ! तेव्हां त्या चांडाळकन्येस वाईट वाटलें, मग तिनें कांहीं फळें मजपुढें टाकलीं, त्यांसहि मी शिवत नाहीं असें पाहून ती मला ह्मणाली, "पशुपक्ष्यांनां भक्ष्याभक्ष्याचा विचार करण्याचें काय कारण आहे ? तूं कोणी पूर्वजाति स्मरणारा असशील तर, पक्षीजातींत आहेस तोंपर्यंत याचा विचार करण्याचें काय कारण आहे ? उत्तम जन्म प्राप्त होऊन तूं असें कर्म केलेंस कीं, ज्याच्या योगानें अशा नीच योनींत उत्पन्न झालास. तर आतां विचार कसचा करतोस? भक्ष्याभक्ष्याचा शास्त्रार्थ पाळणारांनां देखील विपत्तिकालीं प्राणधारणास अभक्ष्य चालतें.–मग तुला काय झालें ? त्यांत फळें खावयास तर कांहींच हरकत नाहीं ! " असें तिचें सशास्त्र व प्रौढ भाषण ऐकून मीं निग्रह सोडून दिला. आणि तीं फळें खाल्लीं !

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं सकाळीं मीं डोळे उघडून पाहूं लागलों तों मी सुवर्णाच्या पिंजऱ्यांत आहें असें दिसलें व ती चांडाळ-

वसतिहि देवनगरीसारखी दिसली ! तेव्हां मला मोठा चमत्कार वाटला. मग मौन सोडून तिला विचारावें, असें जो माझ्या मनांत घोळत होतें, तों ती चांडाळकन्या मला घेऊन महाराजाकडे आली. तर ही कोण व हिनें मला पिंजऱ्यांत घालून येथें कशाकरितां आणिलें ह्या गोष्टी समजण्याविषयीं महाराजाप्रमाणें मलाहि मोठें कौतुक वाटत आहे ! "

तें ऐकून शूद्रकराजास अधिकच चमत्कार वाटला आणि त्यानें चांडाळ-कन्येस बोलावून आणण्यास सांगितलें. ती आली तेव्हां तिच्या तेजानें शूद्रकराजा देखील निस्तेज पडल्यासारखा झाला ! मग ती ह्मणाली, " हे चंद्रावतारी राजा ! ह्या शुकाचा व तूं आपला पूर्वीचा सर्व वृत्तांत ऐकिलास. हा पक्षिजातींत असतांहि कामांध होऊन व पित्राज्ञेचें उल्लंघन करून आपल्या प्रियेकडे चालला होता, हेंहि त्याच्याच मुखानें तुला समजलें ! तर ह्या मूर्खाची जननी मी लक्ष्मी होय ! हा जाबालीच्या आश्रमांतून उडून जाऊं लागला, तेव्हां याच्या पित्यानें दिव्यदृष्टीनें पाहून मला सांगितलें, ' दुराचरणी प्राणी पश्चात्तापावांचून शुद्धीवर येत नाहीं, तर हें आरंभिलेलें कर्म शेवटास जाईपर्यंत तूं मनुष्यलोकीं जाऊन त्याला धरून ठेव. व जसा त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप होईल असें कर. ' तेव्हां ऋषीच्या आज्ञे-प्रमाणें हा कारटा वाटेवर यावा ह्मणून मीं याप्रमाणें केलें ! हल्लीं तें कर्म आटोपलें. आतां तुमचे दोघांचेहि शाप बरोबर संपले. यामुळें तुम्ही दोघेहि ह्या शरीराचा त्याग करून इष्टजनांच्या समागमाचा चिरकाल सुखानुभव घ्याल ! " इतकें बोलून ती आकाशांत गेली !

याप्रमाणें शूद्रकराजानें लक्ष्मीचें भाषण ऐकतांच त्याला पूर्वजन्मींचा सर्व वृत्तांत आठवला. मग तो वैशंपायनास ह्मणाला, " आपणा उभयतां-च्याहि शापांचा शेवट बरोबरच झाला, हें चांगलें झालें. "

त्याच वेळेस वसंतऋतु प्रकट झाला, त्यानें विरहीजनांस फारच पराधीन केलें ! राजा व शुक यांनांहि त्यानें अत्यंत व्याकुळ केलें !

इकडे कादंबरीहि कामसंतप्त झाली. कामदेवाचा उत्सवकाल प्राप्त झाला तेव्हां तिनें एके दिवशीं संध्याकाळीं स्नान करून कामदेवाचें पूजन केलें व चंद्रापीडास सुगंधि द्रव्य लावून स्नान घातलें. कस्तूरीमिश्रित चंदनाची त्याच्या सर्वांगास उटी लावली व गळ्यांत पुष्पांचे हार घातले. नंतर उत्कंठेनें त्याजकडे पहात ती बसली. शेवटीं मदनपीडेनें व्याकुळ होऊन तिनें

चंद्रापीडास दृढालिंगन केलें! त्यामुळें अमृतसिंचन केल्यासारखें त्याचें शरीर होऊन त्यास जीवकला प्राप्त झाली. मग तो कादंबरीस ह्मणाला, "हे भीरु ! भय सोड. तुझ्या अमृतस्पर्शानेंच मी जीवंत झालों ! तूं अमृतापासून उत्पन्न झालेल्या अप्सराच्या कुळांत उत्पन्न झालीस. याची तुला आठवण नाहीं काय ? हें माझें शरीर अविनाशी आहे, कादंबरीच्या स्पर्शानें तें सचेतन होईल या भाषणाचें तुला स्मरण नाहीं काय ? आतां इतके दिवस तुझ्या हस्तस्पर्शानें मी जीवंत झालों नाहीं, याचें कारण शापदोष होय. आतां तो शाप संपला. तुझी प्रियसखी महाश्वेता इच्या प्रियवल्लभाचाहि शाप संपला ! तुझ्या विरहानें पीडित अशा शूद्रक राजदेहाचा मीं आतांच त्याग केला."

इतक्यांत वैशंपायनरूपी पुंडरीक शुकशरीराचा त्याग करून कपिंजलासह तेथें आला. तेव्हां कादंबरी धावत गेली आणि तिनें पुंडरीक आल्याचें आनंदकारक वर्तमान महाश्वेतेस सांगितलें, इतक्यांत तोहि तेथें आला. तेव्हां चंद्रापीड, पुंडरीक, ( वैशंपायन ) कादंबरी व महाश्वेता आणि त्यांचे मातापितर यांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. व ते सर्व वांछित सुखांत निमग्न राहिले !

पुढें कादंबरीनें एकांतीं "पत्रलेखेची काय वाट झाली ?" ह्मणून चंद्रापीडास विचारिलें असतां " ती माझी ( चंद्राची ) प्रिया रोहिणी होय. तिला माझा विरह सहन न होऊन माझ्या सहवासाकरितां तिनें यालोकीं जन्म घेतलें होतें, ती आतां चंद्रलोकीं गेली." असें त्यानें सांगितलें.

---

11 1 JAN 1994

# हर्षचरित व कादंबरी यांतील कांहीं ऐतिहासिक महत्त्वाचे उतारे.

हर्षचरित आणि कादंबरी ह्या बाणकवीच्या दोन गद्यग्रंथांचीच फार प्रसिद्धि आहे, याकरितां त्यांतील बरेच महत्त्वाचे उतारे पुढें दिले आहेत. त्यांतून हर्षचरित हें ऐतिहासिक गोष्टीच्या आधारानें रचलें असल्यामुळें त्यांतील उतारे अधिक दिले आहेत.

ब्रह्मसभेंत दुर्वासऋषीनें सामगायनांत चूक केल्यामुळें सरस्वतीस हसूं आवरलें नाहीं, त्यामुळें रागावून सभासदांनीं निवारण केलें असतांहि दुर्वासऋषीनें सरस्वतीस शाप दिला. तेव्हां ब्रह्मदेवानें त्याचा धिक्कार करून क्रोधाधीन होणें योग्य नाहीं, अशाविषयीं त्यास उपदेश केला आहे तो ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

‘ब्रह्मन् न खलु साधुसेवितोऽयं पन्थाः येनासि प्रवृत्तः । निहन्त्येष परस्तात् । उद्दामप्रसृतेन्द्रियाश्वसमुत्थापितं हि रजः कलुषयति दृष्टिमनक्षजिताम् । कियद्दूरं वा चक्षुरीक्षते । विशुद्धया हि धिया पश्यन्ति कृतबुद्धयः सर्वानर्थानसतः सतो वा । निसर्गविरोधिनी चेयं पयःपावकयोरिव धर्मक्रोधयोरेकत्र वृत्तिः । आलोकमपहाय कथं तमसि निमज्जसि । क्षमा हि मूलं सर्वतपसाम् । परदोषदर्शनदक्षा दृष्टिरिव कुपिता बुद्धिर्न त आत्मरागदोषं पश्यति । क्व महातपोभारवैवधिकता क्व पुरोभागित्वम् । अतिरोषणश्चक्षुष्मानन्ध एव जनः । नहि कोपकलुषिता विमृश्यति मतिः कर्तव्यमकर्तव्यं वा ।’ इ०

सरस्वती ही दुर्वासाच्या शापामुळें स्वर्गांतून भूतलावर उतरत असतां शोणनद तिच्या दृष्टीस पडला, त्याचें बाणानें अनेक उत्प्रेक्षाघटित वर्णन केलें आहे. या शोणनदाच्या काठींच राहण्यास सरस्वतीस आवडलें. बाणाचें राहण्याचें ठिकाणहि शोणनदाच्या काठींच असल्यामुळें अर्थात् त्याचा त्याविषयीं आदर असणें साहाजिकच आहे !

‘ अपश्यच्चाम्बरतलस्थितैव हारमिव वरुणस्य । अमृतनिर्झरमिव चन्द्राचलस्य । शशिमणिनिष्यन्दमिव विन्ध्यस्य । कर्पूरद्रुमद्रवप्रवाह-

मिव दण्डकारण्यस्य । लावण्यरसप्रस्रवणमिव दिशाम् । स्फटिकशिलापट्टशयनमिवाम्बरश्रियाः स्वच्छशिशिरसुरसवारिपूर्णं भगवतः पितामहस्यापत्यं हिरण्यवाहनामानं महानदम् । यं जनाः शोण इति कथयन्ति । दृष्ट्वा च तं रामणीयकहृतहृदया तस्यैव तीरे वासमरचयत् । उवाच च सावित्रीम् । सखि मधुरमयूरविरुतयः कुसुमपांशुपटलसिकतिलतरुतलाः परिमलमत्तमधुपवेणीवीणारणितरमणीया रमयन्ति मांमन्दीकृतमन्दाकिनीद्युतयोऽस्य महानदस्योपकण्ठभूमयः । पक्षपाति च हृदयमत्रैव स्थातुं म इति । अभिनन्दितवचना च तथेति तया तस्य पश्चिमे तीरे समवातरत् ।'

बाणभट्टानें आपल्या पूज्य पूर्वजांचीं नांवें पुढील लेखांत दिलीं आहेत. बाणाची आई राज्यदेवी ही बाण लहान असतांच वारली. तेव्हां त्याचा बाप चित्रभानु यास बाणाचें संगोपन करावें लागलें हाहि मजकूर यांत आहे.

' तेषु चैवमुत्पद्यमानेषु संसरति संसारे, यात्सु युगेषु अवतीर्णे कलौ, वहत्सु वत्सरेषु, व्रजत्सु वासरेषु, अतिक्रामति च काले, प्रसवपरम्पराभिरनवरतमापतति विकाशिनि वात्स्यायनकुले, क्रमेण कुबेरनामा वैनतेय इव गुरुपक्षपाती द्विजो जन्म लेभे । तस्याभवन्नच्युतः ईशानो हरः पाशुपतश्चेति चत्वारो युगारम्भा इव ब्रह्मतेजोजन्य मानप्रजाविस्तारा नारायणबाहुदण्डा इव सच्चक्रनन्दकास्तनयाः । तत्र पाशुपतस्यैक एवाभवद्भूभार इवाचलकुलस्थितिश्चतुरुदधिगम्भीरोऽर्थपतिरिति नाम्ना समग्राग्रयजन्मचक्रचूडामणिर्महात्मा सूनुः । सोऽजनयद्भृगुं हंसं शुचिं कविं महीदत्तं धर्मं जातवेदसं चित्रभानुं लक्ष्महिदत्तं विश्वरूपं चेत्येकादश रुद्रानिव सोमामृतरसशीकरच्छुरितमुखान्पवित्रान्पुत्रान् । अलभत च चित्रभानुस्तेषां मध्ये राजदेव्यभिधानायां ब्राह्मण्यां बाणमात्मजम् । स बाल एव विधेर्बलवतो वशादुपसंपन्नया व्ययुज्यत जनन्या । जातस्नेहस्तु नितरां पितैवास्य मातृतामकरोत् । अवर्धत च तेनाधिकतरमेधीयमानधृतिर्धाम्नि निजे । '

बाणाचें देशाटन, विद्वत्समागम, राजदरबारीं फिरून येणें वगैरे.

बाणकवीनें पूर्ववयांत देशाटन केलें. विद्वान् गुरुजनांनीं विभूषित अशा

विद्यालयांत जाऊन व गुरुसेवा करून चांगली विद्या संपादन केली. गुणिजनांच्या सहवासानें चातुर्य संपादन केलें थोर थोर राजांच्या भेटी घेऊन प्रतिष्ठा मिळविली व आपल्या विद्याचारसंपन्न घराण्यास साजेशी उत्तम विद्या संपादून आपल्या आप्तमित्रांत येऊन त्यांसह तो विद्यानंदांत निमग्न राहिला. मित्रमंडळींतील सुखास त्यानें मोक्षसुखच ह्मटलें आहे! तें यथार्थ आहे.

'अथ शनैः शनैरत्युदारव्यवहृतिमनोहन्ति बृहन्ति राजकुलानि वीक्षमाणः, निरवद्यविद्याविद्योतितानि च गुरुकुलानि सेवमानः,महार्हालापगम्भीरगुणवद्गोष्ठीश्चोपतिष्ठमानः,स्वभावगम्भीरधीधनानि विदग्धमण्डलानि च गाहमानः, पुनरपि तामेव वैपश्चितीमात्मवंशोचितां प्रकृतिमभजत्। महतश्च कालात्तामेव भूयो वात्स्यायनवंशाश्रयामात्मनो जन्मभुवं ब्राह्मणाधिवासमगमत्। तत्र च चिरदर्शनादभिनवीभूतस्नेहसद्भावैः ससंस्तवप्रकटितज्ञातेयैराप्तैरुत्सवदिवस इवानन्दिताभ्यागमनो बालमित्रमण्डलस्य मध्यगतो मोक्षसुखमिवान्वभवत्।'

हर्षाचा बंधु परमसज्जन व विद्वानांच्या पक्षाचा कृष्ण यानें परिचय नसतांहि बाणास हर्षराजाच्या भेटीस येण्यास आप्तप्रमाणें मोठ्या अगत्यानें पत्र व निरोप पाठविला, त्यांत त्याची खरोखरीच विद्वज्जनाविषयीं फारच कळकळ दिसून येते!

'अवधृतलेखार्थश्च समुत्सारितपरिजनः संदेशं पृष्टवान्। मेखलकस्त्ववादीत्– 'एवमाह मेधाविनं स्वामी—जानात्येव मान्यः यथैकगोत्रता वा, समानजातिता वा, समं संवर्धनं वा, एकदेशनिवासो वा, दर्शनाभ्यासो वा, परस्परानुरागश्रवणं वा, परोक्षोपकारणं वा, समानशीलता वा, स्नेहस्य हेतवः। त्वयि तु विना कारणेनादृष्टेऽपि प्रत्यासन्ने बन्धाविव बद्धपक्षपातं किमपि स्निह्यति मे हृदयम् दूरस्थेऽपीन्दोरिव कुमुदाकरे। भवन्तमन्तरेणान्यथा चान्यथा चायं चक्रवर्ती दुर्जनैर्ग्राहित आसीत्। न च तत्तथा। न सन्त्येव ते येषां सतामपि सतां न विद्यन्ते मित्रोदासीनशत्रवः। शिशुचापलापराचीनचेतोवृत्तितया च भवतः केनचिदसहिष्णुना यत्किंचिदसदृशमुदीरितम्। इतरो लोकस्तथैव तद्गृण्हाति वक्ति च। सलिलानीव गतागतिकानि लोलानि खलु भवन्त्यविवेकिनां मनांसि। बहुमुखश्रवणानिश्चलीकृतनिश्चयः किं करोतु पृथिवीपतिः। तत्वान्वेषिभिश्चास्माभिर्दूरस्थितोऽपि

प्रत्यक्षीकृतोऽसि । विज्ञप्तश्चक्रवर्ती त्वदर्थम्—यथा प्रायेण प्रथमे वयसि सर्वस्यैव चापलैः शैशवमपराधीति । तथेति च प्रतिपन्नं स्वामिना । अतो भवता राजकुलमकृतकालक्षेपमागन्तव्यम् । अवकेशीवादृष्टपरमेश्वरो बन्धुमध्यमधिवसन्नासि मे बहुमतः । न च सेवावैषम्यविषादिना वा परमेश्वरोपसर्पणभीरुणा भवता भवितव्यम् ।'

असा अपरिचितावर उपकार करणारा पुरुष क्वचितच आढळेल ! म्हणूनच अकारणबंधु कृष्ण याच्या साधुत्वाविषयीं बाणभट्टानें कृतज्ञतापूर्वक पद्यांतहि वर्णन केलें आहे. तीं दोन पद्यें निबंधांत दिलींच आहेत.

कादंबरीवरून पाहतां मुख्यत्वेंकरून शृंगार व करुण ह्या दोन रसांचीच बाणकवीस आवड आहे असें वाटलें होतें. परंतु हर्षचरितावरून पाहतां वीररसाविषयींहि त्याचा तसाच अभिनिवेश असल्याचें ध्यानांत येतें व त्या रसांप्रमाणेंच त्यानें केलेलीं वीररसाचींहि वर्णनें चांगलीं साधलीं आहेत. प्रभाकरवर्धन याच्या पराक्रमाचें वर्णन बाणभट्टानें केलें आहे त्यांत उत्प्रेक्षा व वीररस हे चांगले साधले आहेत.

' तेषु चैवमुत्पद्यमानेषु क्रमेणोदपादि हूणहरिणकेसरी सिन्धुराजज्वरो गुर्जरप्रजागरो गान्धाराधिपगन्धद्विपकूटपाकलो लाटपाटवपाटच्चरो मालवलक्ष्मीलतापरशुः प्रतापशील इति प्रथितापरनामा प्रभाकरवर्धनो नाम राजाधिराजः ।' इ०

प्रभाकरवर्धनाच्या पराक्रमाचें अन्यरीतीनें वर्णनः—

'यस्यच वह्निमयो हृदयेषु जलमयो लोचनपुटेषु मारुतमयो निःश्वसितेषु क्षमामयोऽङ्गेषु आकाशमयः शून्यतायां पञ्चमहाभूतमयो मूर्त इवादृश्यत निहतप्रतिसामन्तान्तःपुरेषु प्रतापः ।'

बाणकवीनें प्रभाकरवर्धनाची स्त्री यशोवती इचें सतीत्व, पतिछन्दानुवर्तन इत्यादि सद्गुणांचें व त्यांतच तिच्या सौंदर्याचेंहि खुबीदार वर्णन केलें आहे.—

" तस्य च जन्मान्तरऽपि सती पार्वतीव शंकरस्य, गृहीत परहृदया लक्ष्मीरिव लोकगुरोः, स्फुरत्तरलतारका रोहिणीव कलावतः, सर्वजनजननी बुद्धिरिव प्रजापतेः, महाभूभृत्कुलोद्गता गङ्गेव वाहिनीनायकस्य, मानसानुवर्तनचतुरा हंसीव राजहंसस्य, सकललोकार्चितचरणा त्रयीव धर्मस्य, दिवानिशममुक्तपार्श्वस्थितिररुन्धतीव महामुनेः,

हंसमयीव गतिषु,परपुष्टमयीवालापेषु,चक्रवाकमयीव पतिप्रेम्णि, यशोवती नाम महादेवी प्राणानां प्रणयस्य विस्रम्भस्य धर्मस्य सुखस्य च भूमिरभूत् । "

यशोवती ही राज्यवर्धनाच्या वेळेस प्रथम गरोदर असतां त्यावेळचें बाणानें केलेलें वर्णनः—

" ततः समतिक्रान्ते कस्मिंश्चित्कालांशे देव्यां च यशोवत्यां देवो राज्यवर्धनः प्रथममेव संबभूव गर्भे । गर्भस्थितस्यैव च यस्य यशसेव पाण्डुतामादत्त जननी । गुणगौरवक्लान्तेव गात्रमुद्वोढुं न शशाक । कान्तिविसरामृतरसतृप्तेवाहारं प्रति पराङ्मुखीबभूव । शनैः शनैरुपचीयमानगर्भभरालसा च गुरुभिर्वारितापि वन्दनाय कथमपि सखीभिर्हस्तावलम्बेनानीयत । विश्राम्यन्ती सालभंजिकेव समीपगतस्तम्भभित्तिष्वलक्ष्यत " । इ०

ती हर्षाच्या वेळीं गरोदर असतां त्यावेळच्या तशाच स्थितीचें परंतु निराळ्या तऱ्हेचें वर्णन.—वर्षाऋतूच्या अखेरीचेंहि यांत थोडक्यांत वर्णन आहे.

" अथान्यस्मिन्नतिक्रान्ते कस्मिंश्चित्काले कन्दलिनि कुड्मलितकदम्बतरौ तोक्मतृणस्तम्बे स्तम्भिततामरसे विकासितचातकचेतसि मूकमानसौकसि नभसि देव्या देवक्या इव चक्रपाणिर्यशोवत्या हृदये गर्भे च सममेव संबभूव हर्षः । शनैः शनैश्चास्याः सर्वप्रजापुण्यैरिव परिगृहीता भूयोऽप्यापाण्डुतामङ्गयष्टिर्जगाम । गर्भारम्भेण श्यामायमानचारुचूचुकचूलिकौ चक्रवर्तिनः पातुं मुद्रिताविव पयोधरकलशौ बभार । स्तन्यार्थमाननिहिता दुग्धनदीव दीर्घस्निग्धधवला माधुर्यमधत्त दृष्टिः । सकलमंगलगणाधिष्ठितगात्रगरिम्णेव गतिरमन्दायत । " इ०

यशोवती ही राज्यश्रीस प्रसवली त्या वेळचें वर्णनः—

ह्या पुढील उताऱ्यांत बाणकवीनें फारच समर्पक उपमा दिल्या आहेत.

' पूर्णेषु च प्रसवदिवसेषु दीर्घरक्तनालनेत्रामुत्पलिनीमिव सरसी, हंसमधुरस्वरां शरदमिव प्रावृट्, कुसुमसुकुमारावयवां वनराजिमिव मधुश्रीः,महाकनकावदातां वसुधारामिव द्यौः, प्रभावर्षिणीं रत्नजातिमिव वेला, सकलजननयनानन्दकारिणीं चन्द्रलेखामिव प्रतिपत्, सहस्रनेत्रदर्शनयोग्यां जयन्तीमिव शची, सर्वभूभृदभ्यर्थितां गौरीमिव मेना, प्रसूतवती दुहितरम् । यया द्वयोः सुतयोरुपरि स्तनयोरिवैकावलीलतया नितरामराजत । '

### राजकन्येस नृत्यगीतादि शिकविण्याची व ती तारुण्यांत आल्यावर विवाह करण्याची चाल.

पुढील उताऱ्यावरून त्या वेळीं राजकन्यांनीं नृत्यगीतादि कला शिकविण्याची चाल होती व राजे लोकांत तरी मुलींनीं तारुण्य प्राप्त झाल्याखेरीज विवाह करीत नसत असें दिसतें. यांत 'पयोधरोन्नति' सारखे श्लेष पित्याच्या मुखांत नीट दिसत नाहींत हें खरें, तथापि हे बुद्धिपुरःसर नसून आपला कवि हा प्राधान्येंकरून श्लेषप्रिय असल्यामुळें वर्णनाच्या भरांत त्याच्या मुखांतून सहजगत्या हे निघून गेलेले दिसतात. तसेंच '**केनापि कृता धर्म्या नाभिमता मे स्थितिरियम्**' हें व पुढचें वाक्य यां दोहींतहि '**अर्थोहि कन्या परकीय एव**' ह्या **कालिदासाच्या** ह्मणण्याप्रमाणें प्रौढ विचार दिसत नाहीं! असो, क्वचित् स्थळीं असें आढळलें तरी इतर सर्व वर्णन व्यवहारास अनुसरून आहे व तें चांगलें साधलें आहे.

"**अथ राज्यश्रीरपि नृत्यगीतादिषु विदग्धासु सखीषु सकलासु कलासु च प्रतिदिनमुपचीयमानपरिचया शनैः शनैरवर्धत । परिमितैरेव दिवसैर्यौवनमारुरोह । निपेतुरेकस्यां तस्यां शरा इव लक्ष्यभुवि भूभुजां सर्वेषां दृष्टयः । दूतप्रेषणादिभिश्च तां ययाचिरे राजानः ।**

**कदाचित्तु राजान्तःपुरप्रासादस्थितो बाह्यकक्ष्यावस्थितेन पुरुषेण स्वप्रस्तावागतां गीयमानामार्यामश्रृणोत् ।**

**'उद्वेगमहावर्ते पातयति पयोधरोन्नमनकाले ।**
**सरिदिव तटमनुवर्षं विवर्धमाना सुता पितरम्'**

**तां च श्रुत्वा पार्श्वस्थितां महादेवीमुत्सारितपरिजनो जगाद 'देवि तरुणीभूता वत्सा राज्यश्रीः । एतदीया गुणवत्तेव क्षणमपि हृदयान्नापयाति मे चिन्ता । यौवनारम्भ एव च कन्यकानामिन्धनीभवन्ति पितरः संतापानलस्य । हृदयमन्धकारयति मे दिवसमिव पयोधरोन्नतिरस्याः । केनापि कृता धर्म्या नाभिमता मे स्थितिरियं । यदङ्गसंभूतान्यङ्कलालितान्यपरित्याज्यान्यपत्यकान्यकाकाण्ड एवागत्यासंस्तुतैर्नीयन्ते**"

### कुलशील पाहून शरीरसंबंध करण्याची चाल.

कुलशील पाहून शरीरसंबंध करण्याच्या संबंधानें **प्रतापवर्धनानें यशोवतीस** आपलें मत कळवून तिची याबद्दल संमति विचारली असतां तिनें

सद्गदित होऊन मुलीस चांगलें स्थळ मिळून तिची जन्मपर्यंत काळजी नसावी. असें ह्मटलें आहे! राजानें आपला पुत्र राज्यवर्धन व हर्ष यांसहि हा मजकूर कळवून सत्कुलीन ग्रहवर्मा यास कन्या देण्याचा निश्चय केला हें सर्व लोकरीतीस अनुसरूनच आहे.

" तथापि गृहगतैरनुगन्तव्या एव लोकवृत्तयः। प्रायेण च सत्स्वप्यन्येषु वरगुणेष्वभिजनमेवानुरुन्धयन्ते धीमन्तः । धरणीधराणां च मूर्ध्नि स्थितो माहेश्वरः पादन्यास इव सकलभूवननमस्कृतो मौखरी वंशः। तत्रापि तिलकभूतस्यावन्तिवर्मणः सुनुरग्रजो ग्रहवर्मा नाम ग्रहपातिरिव गां गतः पितुरन्यूनो गुणैरेनां प्रार्थयते। यदि भवत्या अपि मतिरनुमन्यते ततस्तस्मै दातुमिच्छामि इत्युक्तवति भर्तरि दुहितृस्नेहकातरतरहृदया साश्रुलोचना महादेवी प्रत्युवाच–' आर्यपुत्र संवर्धनमात्रोपयोगिन्यो धात्रीनिर्विशेषा भवन्ति खलु मातरः कन्यकानाम् । दाने तु प्रमाणमासां पितरः। केवलं कृपाकृतविशेषःसुदूरेण तनयस्नेहादतिरिच्यते दुहितृस्नेहः। यथा न यावज्जीवमावयोरार्तिता प्रतिपद्यते तथार्यपुत्र एव जानाति । इति '

राजा तु जातनिश्चयो दुहितृदानं प्रति समाहूय सुतावपि विदितार्थावकार्षीत् । "

जावयाविषयीं सासऱ्याची आदरबुद्धि.

जावयाविषयीं सासऱ्याच्या मनांत साहजिकच आदरबुद्धि कशी असतें याविषयीं बाणकवीनें प्रतापवर्धनाच्या आचरणांत दाखविलेला अनुभव पुढील उताऱ्यांत कळून येण्यासरखा आहे.

" राजा तु तमुपद्वारमागतं चरणाभ्यामेव राजाचक्रानुगम्यमानः ससुतः प्रत्युज्जगाम। अवतीर्णं च तं कृतनमस्कारं मन्मथमिव माधवः प्रसरितभुजो गाढमालिलिङ्ग । यथाक्रमं परिष्वक्तराज्यवर्धनहर्षं च हस्ते गृहीत्वाभ्यन्तरं निन्ये। स्वनिर्विशेपासनदानादिनचैनमुपचारेणोपचचार ।"

मुलीच्या लग्नांत आईबापांची धांदल कशी उडते व त्यावेळीं त्यांच्यांत कसा उत्साह असतो, हें आपल्या कवीनें थोडक्यांत राज्यश्रीची आई यशोवती व बाप प्रभाकरवर्धन यांच्या कृतींत दर्शविलें आहे. व यांतील शब्दालंकाररचनाहि किती मजेदार घातली आहे!

" देवी तु यशोवती विवाहोत्सवपर्याकुलहृदया हृदयेन भर्तरि,

कुतूहलेन जामातरि, स्नेहेन दुहितरि, उपचारेण निमंत्रितस्त्रीषु, आदेशेन परिजने, शरीरेण संचरणे, चक्षुषा कृताकृतप्रत्यवेक्षणेषु, आनन्देन महोत्सवे, एकापि बहुधा विभक्तेवाभवत् । भूपतिरप्युपर्युपरि विसर्जितोष्ट्रवामीजनितजामातृजोषः सत्यप्याज्ञासंपादनदक्षे मुखेक्षणपरे परिजने समं पुत्राभ्यां दुहितृस्नेहविक्लवः सर्वं स्वयमेवाकरोत् ।"

शरीरसंबंधानें दोन्ही वंशांचा संयोग, व जावयाविषयीं पूज्यबुद्धि.

लग्नाच्या वेळीं प्रतापवर्धनाचा गंभीर नांवाचा उपाध्याय हा गृहवर्म्यास ह्मणाला, राज्यश्रीनें तुम्हास वरल्यामुळें चंद्रसूर्यवंशाप्रमाणें पुष्पभूति व मुखर-वंश यांचा चांगला संयोग केला. यांत पुढें जावयास उद्देशून कौस्तुभमाणि व शशि यांची बाणानें किती समर्पक उपमा दिली आहे !

"न चिराच्च गम्भीरनामा नृपतेः प्रणयी विद्वान्द्विजन्मा ग्रहवर्माणमुवाच–'तात, त्वां प्राप्य चिरात्खलु राजश्रिया घटितौ तेजोमयौ सकलजगद्गीयमानबुधकर्णानन्दकारिगुणगणौ सोमसूर्यवंशाविव पुष्पभूतिमुखरवंशौ । प्रथममेव कौस्तुभमाणिरिव गुणैः स्थितोऽसि हृदये देवस्य । इदानीं तु शशीव शिरसा परमेश्वरेणासि वोढव्यो जात' इति।"

ग्रहवर्मा श्वशुरगृहीं असतां त्याचा सत्कार व त्याचें सासूस जावयाचें कौतुक !

विवाह झाल्यावर ग्रहवर्मा श्वशुरगृहीं असतां रोज नव्या नव्या उपचारांनीं श्वशुरगृहीं त्याचें चांगलें आदरातिथ्य होत होतें तें ठीकच ! तो आपल्या सुस्वभावानें विशेषेंकरून सासूच्या अंतःकरणांत अमृतवर्षावच करीत असल्याचें बाणकवीनें वर्णिलें आहे. जावयाविषयीं सासूस किती कौतुक व प्रेम वाटत असतें, हा लोकांतील अनुभव यांत बाणानें थोडक्यांत दाखविला आहे.

"स्थित्वा च श्वशुरकुले शीलेनामृतमिव श्वश्रूहृदये वर्षन्नभिनवाभिनवोपचारैरपुनरुक्तान्यानन्दमयानि दशदिनानि स्थित्वा दत्वा राजदौवारिकामिव राजकुले रणरणकं यौतकनिवेदितानीव शम्बलान्यादाय हृदयानि सर्वलोकस्य कथं कथमपि विसर्जितो नृपेण वध्वा सह स्वदेशमगमदिति ।"

राज्यवर्धन व हर्ष यांच्या सहवासास भंडीचें आगमन.

यशोवतीच्या भावानें आपला मुलगा भंडी यास राज्यवर्धन व हर्ष

11 JAN 1994

यांच्या सहवासास आणून ठेवलें आहे. भंडीच्या वर्णनांतहि वीररसाचा आवेश चांगला दिसून येतो व चैत्र, वैशाख जसे मलयवायूनें युक्त व्हावे त्याप्रमाणें भंडीच्या योगानें उभय बंधू शोभूं लागले ! असें यांत आहे. किती समर्पक उपमालंकार आहे हा ! प्रतापवर्धनानें त्यास तिसऱ्या पुत्राप्रमाणेंच मानिलें आहे. राज्यवर्धन व हर्ष यांच्या तारुण्याचेंहि यांत वर्णन आहे.

अस्मिन्नेव तु काले देव्या यशोवत्या भ्राता सुतमष्टवर्षदेशीयमुद्धूयमानकुटिलकाकपक्षकशिखण्डं, खण्डपरशुहुंकाराग्निधूमलेखानुबद्धमूर्धानं मकरध्वजमिव पुनर्जातम्, एकेनेन्द्रनीलकुण्डलांशुश्यामलितेन शरीरार्धेनेतरेण च त्रिकण्टकमुक्ताफलालोकधवलितेन संपृक्तावतारमिव हरिहरयोर्दर्शयन्तं, पीनप्रकोष्ठप्रतिष्ठितपुष्पलोहवलयं, परशुराममिव क्षत्रक्षपणक्षीणपरशुपाशचिन्हितं बालतां गतं, कण्ठसूत्रग्रथितभङ्गुरप्रवालाङ्कुरं, हिरण्यकशिपुमिवोरःकाठिन्यखंण्डितनरसिंहनखरखण्डं गृहीतजन्मान्तरं शैशवेऽपि सावष्टम्भं बीजमिव वीर्यद्रुमस्य भण्डिनामानमनुचरं कुमारयोरर्पितवान् ।

अवनिपतेस्तु तस्योपरि पुत्रयोस्तृतीयस्य नेत्रयोरिवेश्वरस्य तुल्यं दर्शनमासीत् । राजपुत्रावपि सकलजीवलोकहृदयानन्ददायिनौ तेन प्रकृतिदक्षिणेन मधुमाधवाविव मलयमारुतेनोपेतौ नितरां रेजतुः । क्रमेण चापरेणेव भ्रात्रा प्रजानन्देन सह वर्धमानौ यौवनमवतेरतुः । स्थिरोरुस्तम्भौ च पृथुप्रकोष्ठौ दीर्घभुजार्गलौ विकटोरःकवाटौ प्रांशुसालाभिरामौ महानगरसंनिवेशाविव सर्वलोकाश्रयक्षमौ बभूवतुः ।'

राज्यवर्धन व हर्ष यांच्यांत तारुण्याविर्भाव.

राज्यवर्धन व हर्ष हे दोवे बंधु तारुण्यावस्थेंत आले असतां कवीनें त्याचें वर्णन केलें आहे तें वाचून हे मूर्तिमंत वीररसाचे अवतारच अवतरले आहेत. काय ! असें वाटतें ! यांतील उपमा व प्रयोगरचना तरी किती प्रौढ व खुबीदार आहे !

" अथ चन्द्रसूर्याविव स्फुरज्ज्योत्स्नायशःप्रतापाक्रान्तभुवनावभिरामदुर्निरीक्ष्यौ । अग्निमारुताविव समभिव्यक्ततेजोबलावेकीभूतौ । शिलाकठिनकायबन्धौ हिमवद्विन्ध्याविवाचलौ । महावृषाविव कृतयुगयोग्यौ । अरुणगरुडाविव हरिवाहनविभक्तशरीरौ । इन्द्रोपेन्द्राविव

नागेन्द्रगतौ । कर्णार्जुनाविव कुण्डलकिरीटधरौ। पूर्वापरदिग्भागाविव सर्वतेजस्विनामुदयास्तमयसंपादनसमर्थौ । अमान्ताविवातिमानेनासन्न-वेलार्गलनिरोधसंकटे कुकुटीरके तेजः पराङ्मुखीं छायामपि जुगुप्समानौ । स्वात्मप्रतिबिम्बेनापि पादनखलग्नेन लज्जमानौ । शिरोरुहाणामपि भङ्गेन दुःखमवतिष्ठमानौ । चूडामणिसंक्रान्तेनापि द्वितीयेनातपत्रेणापत्रपमाणौ । भगवति षण्मुखेऽपि स्वामिशब्देनासुखायमानश्रवणौ । दर्पणदृष्टेनापि प्रतिपुरुषेण दूयमाननयनौ । संध्याञ्जलिघटनेष्वपि शूलायमानोत्तमाङ्गौ । जलधरधृतेनापि धनुषा दोदूयमानहृदयौ । आलेख्यक्षितिपतिभिरप्यप्रणमद्भिः संतप्यमानचरणौ । परिमितमण्डलसंतुष्टं तेजः सवितुरप्यबहुमन्यमानौ । भूभृदपहृतलक्ष्मीकं सागरमप्युपहसन्तौ । बलवन्तमकृतविग्रहं मारुतमपि निन्दतौ । हिमवतोऽपि चमरीबालव्यजनवीजितेन दह्यमानौ । जलधीनामपि शङ्खैः खिद्यमानौ । चतुःसमुद्राधिपतिमपरं प्रचेतसमप्यसहमानौ । अनपहृतच्छत्रानपि विच्छायानवनिपालान्कुर्वाणौ । साधुष्वप्यसेवितप्रसन्नौ । मुखेन मधु क्षरन्तौ । दुष्टराजवंश्यानूष्मणा दूरस्थितानपि म्लानिमानयन्तौ । अनुदिवसं शस्त्राभ्यासश्यामिकाकलङ्कितमशेषराजकप्रतापाग्निनिर्वपणमलिनमिव करतलमुद्वहन्तौ । योग्यकालेषु धीरैर्धनुर्ध्वनिभिरभ्यर्णोपभोगादिग्वधूभिरिवालपन्तौ।राज्यवर्धन इति हर्ष इति सर्वस्यामेव पृथिव्यामाविर्भूतशब्दप्रादुर्भावौ । स्वल्पीयसैव कालेन द्वीपान्तरेष्वपि प्रकाशतां जग्मतुः ।”

राज्यवर्धनाची हूणावर स्वारी.

आपला पुत्र राज्यवर्धन हा तारुण्यावस्थेंत आलेला पाहून प्रतापवर्धनानें त्यास हूणावर स्वारी करण्यास पाठविलें. त्यावेळीं हर्षहि आपल्या भावाबरोबर हिमालयापर्यंत गेला व तें स्थान मृगया करण्यास फारच उत्तम असल्याचें पाहून तो तेथें मृगया करण्यास राहिला.

“अथ कदाचिद्राजा राज्यवर्धनं कवचहरमाहूय हूणान्हन्तुं हरिणानिव हरिर्हरिणेशकिशोरमपरिमितबलानुयातं चिरंतनैरमात्यैरनुरक्तैश्च महासामन्तैः कृत्वा साभिसरमुत्तरापथं प्रहिणोत् ।

प्रयान्तं च तं देवो हर्षः कतिचित्प्रयाणकानि तुरङ्गैरनुवव्राज । प्रविष्टे च कैलासप्रभाभासिनीं ककुभं भ्रातरि वर्तमानो नवे वयसि

विक्रमरसानुरोधिनि केसरिशरभशार्दूलवराहबहुलेषु तुषारशैलोपकण्ठे- षूत्कण्ठमानवनदेवताकटाक्षांशुशारितशरीरकान्तिः क्रीडन्मृगयां मृग- लोचनः कतिपयान्यहानि बहिरेव व्यलम्बत । चकार चाकर्णान्ता- कृष्टकार्मुकनिर्गतभासुरभल्लवर्षी स्वल्पीयोभिरेव दिवसैर्निःश्वापदा- न्यरण्यानि ।"

संध्याकालचें पुढील वर्णन फारच स्वाभाविक व मजेदार साधलें आहे.

"बाणोऽपि निर्गत्य–धौतारकूटकोमलातपत्विषि निर्वाति वासरे । अस्ताचलकूटकिरीटे । निचुलमञ्जरीभासि तेजांसि मुञ्चति वियन्मुचि मरीचिम् । अतिरोमन्थमन्थरकुरङ्गकुटुम्बकाध्यास्यमानम्रादिष्ठगोष्ठीनपृ- ष्ठास्वरण्यस्थलीषु । शोकाकुलकोककामिनीकूजितकरुणासु तरङ्गिणी- तटीषु । वासविटपोपविष्टवाचाटचटकचक्रवालेष्वालवालावर्जितसेकज- लकुटेषु निष्कुटेषु । दिवसविहृतिप्रत्यागतं प्रस्नुतस्तनं स्तनंधये धयति धेनुवर्गमुद्गतक्षीरं क्षुधिततर्णकव्राते क्रमेण चास्तधराधरधातुधुनीपूरप्ला- वित इव लोहितायमानमहासि मज्जति संध्यासिन्धुपानपात्रे पातङ्गे मण्डले । कमण्डलुजलशुचिशयचरणेषु चैत्यप्रणतिपरेषु पाराशरिषु । यज्ञपात्रपवित्रपाणौ प्रकीर्णबर्हिष्युत्तेजासि जातवेदसि । हवींषि वषट्कुर्वति यायजूकजने । निद्राविद्राणद्रोणकुलकलिलकुलायेषु । कापेयाविकलकपिकुलेष्वारामतरुषु । निर्जिगमिषति जरत्तरुको- टरकुटीकुटुम्बिनि कौशिककुले । मुनिकरसहस्रप्रकीर्णसंध्यावन्द- नोदबिन्दुनिकर इव दन्तुरयति तारापथस्थलीं स्थवीयसि तारका- निकुरम्बे । अम्बराश्रयिणि शर्वरीशबरीशिखण्डे खण्डपरशुकण्ठकाले कवलयति बाले ज्योतिःशेषं सांध्यमन्धकारावतारे । तिमिरतर्जनानि- र्गतासु दहनप्रविष्टदिनकरकरशाखास्विव स्फुरन्तीषु दीपलेखासु । अररसंपुटसंक्रीडनकथितावृत्तिष्विव गोपुरेषु । शयनोपजोषजुषि जर- तीकथितकथे शिशयिषमाणे शिशुजने । जरन्महिषमषीमलीमसतमसि। जनितपुण्यजनप्रजागरे विजृम्भमाणे भीषणतमे तमीमुखे । मुखरितवि- ततज्यधनुषि वर्षति शरनिकरमनवरतमशेषसंसारशेमुषीमुषि मकरध्व- जे । रताकल्पारम्भशोभिनि शम्भलीभाषितभाजि भजति भूषां भुजिष्या- जने । सैरन्ध्रीबध्यमानरशनाजालजघनासु जनीषु । वशिक- विशिखाविहारिणीष्वनन्यजानुप्लवासु प्रचलितास्वभिसारिकासु । विर-

लीभवति वरटानां वेशन्तशायिनीनां मञ्जुनि मञ्जीरशिञ्जितजड जल्पिते। निद्राविद्राणद्राघीयसि द्रावयतीवच विरहिहृदयानि सारसरसिते। भाविवासरबीजाङ्कुरनिकर इव च विकीर्यमाणे जगति प्रदीपप्रकरे निवासस्थानमगात्।"

ह्या उताऱ्यावरून सृष्टिसौंदर्याचें स्वाभाविक वर्णन करण्यांत देखील आपल्या कवीचें नैपुण्य व चातुर्य दिसून येतें.

पुढील शरदृतूंतील सृष्टिसौंदर्याचें नैसर्गिक वर्णन व बाणाचें परत घरीं येणं.

"अथ कदाचिद्विरलितवलाहके, चातकातङ्ककारिणि, क्वणत्कादम्बे, दर्दुरद्विषि, मयूरमदमुषि, हंसपथिकसार्थसर्वातिथौ, धौतासिनिभनभसि, भास्वरभास्वति, शुचिशशिनि, तरुणतारागणे, गलत्सुनासीरशरासने, सीदत्सौदामनीदाम्नि, दामोदरनिद्राद्रुहि, द्रुतवैदूर्यवर्णार्णसि, घूर्णमानमिहिकालघुमेघमोघमघवति, निमीलन्नीपे, निष्कुसुमकुटजे, निर्मुकुलकन्दले, कोमलकमले, मधुस्यन्दीन्दीवरे, कल्हाराल्हादिनि, शेफालिकाशीतलीकृतनिशे, यूथिकामोदिनि, मोदमानकुमुदावदातदशदिशि, सप्तच्छदधूलिधूसरितसमीरे, स्तबकितबन्धुरबन्धूकाबध्यमानाकाण्डसंध्ये, नीराजितवाजिनि, उद्दामदन्तिनि, दर्पक्षीवोक्षके, क्षीयमाणपंकचक्रवाले, बालपुलिनपल्लवितसिन्धुरोधसि, परिणामश्यानश्यामाके, जनितप्रियङ्गुमञ्जरीरजसि, कठोरितत्रपुसत्वचि, कुसुमस्मेरशरे, शरत्समयारम्भे राज्ञः समीपाद्बाणो बन्धून्द्रष्टुं पुनरपि तं ब्राह्मणाधिवासमगात्।"

राज्यवर्धन हा पित्राज्ञेप्रमाणें हूणराजांस जिंकून परत आला तेव्हां त्यास मातापितर वारल्याचें समजल्यामुळें असह्य दुःख होऊन विरक्तता प्राप्त झाली व शस्त्रत्याग करून तो वनांत जाण्यास सिद्ध झाला. इतक्यात त्याची बहीण राज्यश्री इचा सेवक संवादक येऊन त्यानें मालवराजानें ग्रहवर्म्यास मारलें व राज्यश्रीस बंदिशाळेंत टाकिलें. हें ऐकून राज्यवर्धनाची विरक्तता जाऊन त्याचें अंगांत चढलेलें स्फुरण व त्यास अनुसरून त्याचें भाषण.

"सहसैव प्रविश्य शोकविक्लवः प्रक्षारितनयनसलिलो राज्यश्रियः परिचारकः संवादको नाम प्रज्ञाततमो विमुक्ताक्रंदः सदस्यात्मानमपातयत्।

अथ संभ्रान्तो भ्रात्रा सह स्वयं देवो राज्यवर्धनस्तं पर्यपृच्छत्—

' भद्र, भण भण। किमस्मद्व्यसनव्यवसायवर्धनबद्धधृतिः, अवनिपतिमरणमुदितमतिः, अधृतिकरपरमधिकतरमितः समुपनयति विधिः ' इति। स कथं कथमप्यकथयत्— ' देव, पिशाचानामिव नीचात्मनां चरितानि छिद्रप्रहारीणि प्रायशो भवन्ति। यतो यस्मिन्नहन्यवनिपतिरुपरत इत्यभूद्वार्ता तस्मिन्नेव देवो ग्रहवर्मा दुरात्मना मालवराजेन जीवलोकमात्मनः सुकृतेन सह त्याजितः। भर्तृदारिकापि राज्यश्रीः कालायसनिगडयुगलचुम्बितचरणा चौराङ्गनेव संयता कान्यकुब्जे कारायां निक्षिप्ता। किं वदन्ती च यथा किलानायकं साधनं मत्वा जिघृक्षुः स दुर्मतिरेतामपि भुवमाजिगमिषति।' इति विज्ञापिते प्रभुः प्रभवतीति।"

असा अनुपेक्षणीय व असह्य पराभव पाहून राज्यवर्धनाची विरक्तता जाऊन व त्याच्या अंगांत अत्यंत क्रोधावेश चढला, व यास अनुसरून त्याच्या मुखावाटें निघालेलें सावेश भाषण पुढील उताऱ्यांत दिसून येणारें आहे. यांतील शेवटचे दृष्टांत फारच मार्मिक आहेत.

"ततश्च तादृशमनुपेक्षणीयमसंभावितमाकस्मिकमपरं व्यतिकरमाकर्ण्याश्रुतपूर्वत्वात्परिभवस्य। परपरिभवासहिष्णुतया च स्वभावस्य। दर्पबहुलतया च नवयौवनस्य। वीरक्षेत्रसंभवत्वाच्च जन्मनः। कृपाभूमिभूतायाश्च स्वसुः स्नेहात्स तादृशोऽपि बद्धमूलोऽप्यत्यन्तगुरुरेकपद एवास्य ननाश शोकावेगः। विवेश च सहसा केसरीव गिरिगुहागृहं गम्भीरं हृदयं भयंकरः कोपावेगः। केशिनिषूदनशङ्काकुलकालियकुलभङ्गुरभ्रूभङ्गतरङ्गिणी श्यामायमाना यमस्वसेव प्रथीयसि ललाटपट्टे भीषणा भ्रुकुटिरुदभिद्यत। दर्पात्परामृशन्नखकिरणसलिलनिर्झरैः समरभारसंभावनाभिषेकमिव चकार दिङ्नागकुम्भकूटाविकटस्य बहुशिखरकोषस्य वामः पाणिपल्लवः। संगलत्स्वेदसलिलपूरितोदरो निर्मूलं मालवोन्मूलनाय गृहीतकेश इव दुर्मदश्रीकचग्रहोत्कण्ठयेव च कम्पमानः पुनरपि समुत्ससर्प भीषणं कृपाणं पाणिरपरः। शस्त्रग्रहणमुदितराजलक्ष्मीक्रियमाणदिष्टवृद्धिविधुतसिन्दूरधूलिरिव कपिलः कपोलयोरदृश्यत रोषरागः। समासन्नसकलमहीपालचूडामणिचक्राक्रमणजाताहंकार इव च समारुरोह वाममूरुदण्डमुत्तानितश्चरणो दक्षिणः। निष्ठुराङ्गुष्ठकषणनिष्ठ्यूतधूमलेखो

निर्वीरोर्वीकरणाय विमुक्तशिख इव लिलेख मणिकुट्टिममितरः पादपद्मः । दर्पस्फुटितसरसव्रणोच्छलितरुधिरच्छटावसेकैः शोकविषप्रसुप्तं प्रबोधयन्निव पराक्रममनुजमवादीत्—'आयुष्मन्, इदं राजकुलम् । अमी बान्धवाः । परिजनोऽयम् । इयं भूमिः । भूपतिभुजपरिघपालिताश्चैताः प्रजाः । गतोऽहमद्यैव मालवराजकुलप्रलयाय । इदमेव तावद्वल्कलग्रहणमिदमेव तपः शोकापगमोपायश्चायमेव यदत्यन्ताविनीतारिनिग्रहः । सोऽयं कुरङ्गकैः कचग्रहः केसरिणः । भेकैः करपातः कालसर्पस्य । वत्सकैर्बन्दिग्रहो व्याघ्रस्य । अलगर्दैर्गलग्रहो गरुडस्य । दारुभिर्दाहादेशो दहनस्य । तिमिरैस्तिरस्कारो रवेः । यो मालवैः परिभवः पुष्पभूतिवंशस्य । अन्तरितस्तापो मे महियसा मन्युना । तिष्ठन्तु सर्व एव राजानः करिणश्च त्वयैव सार्धम् । अयमेको भण्डिरयुतमात्रेण तुरङ्गमाणामनुयातु माम् ।' इत्यभिधाय चानन्तरमेव प्रयाणपटहमादिदेश ।"

युद्धास जाण्यासंबंधानें उभयबंधूंचें समयोचित व सप्रेम भाषण.

"तं च तथा समादिशन्तमाकर्ण्य जामिजामातृवृत्तांतविज्ञानप्रकोपाधानदूयमाने मनसि निवर्तनादेशेन दूरप्ररूढप्रणयपीड इव प्रोवाच देवो हर्षः—' कमिव दोषं पश्यत्यार्यो ममानुगमनेन । यदि बाल इति नितरां तर्हि न त्याज्योऽस्मि । रक्षणीय इति भवद्भुजपञ्जरं रक्षास्थानम् । अशक्त इति क्व परीक्षितोऽस्मि । संवर्धनीय इति वियोगस्तनूकरोति । अक्लेशसह इति स्त्रीपक्षे निक्षिप्तोऽस्मि । सुखमनुभवत्विति त्वयैव सह तत्प्रयाति । महानध्वनः क्लेश इति विरहोऽविषह्यतरः । कलत्रं रक्षत्विति श्रीस्ते निस्त्रिंशेऽधिवसति । पृष्ठतस्तिष्ठत्विति तिष्ठत्येव प्रतापः । राजकमनधिष्ठितमिति तत्सुबद्धमार्यगुणैः । न बाह्यः सहायो महत इति व्यतिरिक्तमिव मां गणयति । प्रलघुपरिकरः प्रयामीति पादरजसि कोऽतिभारः । द्वयोर्गमनमसांप्रतमिति मामनुग्रहाण गमनाज्ञया । कातरो भ्रातृस्नेह इति सदृशो दोषः । का चेयमात्मंभरिता भुजस्य ते यदेकाकी क्षीरोदफेनपटलपाण्डुरममृतामिव यशः पिपासति । अवाञ्चितपूर्वोऽस्मि प्रसादेषु । तत्प्रसीदत्वार्यो नयतु मामपि' इत्यभिधाय क्षितितलविनिहितमौलिः पादयोरपतत् ।"

राज्यवर्धनाचें हर्षाबरोबर उत्तेजनपर व भ्रातृस्नेहास अनुरूप असे सावेश व सदृष्टांत वीररसास अनुरूप असें भाषण:—

"तमुत्थाप्य पुनरग्रजो जगाद–'तात, किमेवमतिमहारम्भपरिग्रहणेन गरिमाणमारोप्यते बलादतिलघीयानप्यहितः । हरिणार्थमतिहेपणः सिंहसंभारः । तृणानामुपरि कति कवचयन्त्याशुशुक्षणयः। अपि च तवाष्टादशद्वीपाष्टमङ्गलकमालिनी मेदिन्यस्त्येव विक्रमस्य विषयः।नहि कुलशैलनिवहवाहिनो वायवः संनह्यन्त्यतितरले तूलराशौ । न सुमेरुवप्रप्रणयप्रगल्भा वा दिक्करिणः परिणमन्त्यणीयासि वल्मीके । ग्रहीष्यसि सकलपृथ्वीपतिप्रलयोत्पातमहाधूमकेतुं मांधातेव चारुचामीकरपत्रलतालंकाराङ्ककायं कार्मुकं ककुभां विजये। मम तु दुर्निवारायामस्यां विपक्षक्षपणक्षुधि क्षुभितायां क्षम्यतामयमेकाकिनः कोपकवल एकः । तिष्ठतु भवान्।' इत्यभिधाय च तस्मिन्नेव वासरे निर्जगामाभ्यमित्रम्।"

पिता, बंधु, भागिनीभर्ता व भगिनी यांच्या विपन्नावस्थेमुळें हर्षाची आप्तांतून चुकल्यासारखी झालेली अवस्था !

'अथ तथागते भ्रातरि,उपरते च पितरि, प्रोषितजीविते च जामातरि, मृतायां च मातरि, संयतायां च स्वसरि, स्वयूथभ्रष्ट इव वन्यः करी देवो हर्षः कथं कथमप्येकाकी कालं तमनैषीत् ।'

गौडराजानें राज्यवर्धनाचा विश्वासानें घात केला. हें ऐकतांच त्याला आलेल्या क्रोधापुढें बंधुविरहदुःखाचें-कांहींएक न चालून हर्षाच्या अंगांत विरश्रीचा व क्रोधाचा आवेश चढला असल्याचें यांत वर्णन आहे.

"तस्माच्च हेलानिर्जितमालवानीकमपि गौडाधिपेन मिथ्योपचारोपचितविश्वासं मुक्तशस्त्रमेकाकिनं विश्रब्धं स्वभवन एव भ्रातरं व्यापादितमश्रौषीत् ।

श्रुत्वा च महातेजस्वी प्रचण्डकोपपावकप्रसरपरिचीयमानशोकावेगः सहसैव प्रजज्वाल। ततश्चामर्षविधुतशिरःशीर्यमाणशिखामणिशकलाङ्गारकितमिव रोषाग्निमुद्वमन्ननवरतस्फुरितेन पिबन्निव सर्वतेजस्विनामायूंषि रोषनिर्भुग्नेन दशनच्छदेन लोहितायमानलोचनालोकविक्षेपैर्दिग्दाहानिव दर्शयन्रोषानलेनाप्यसह्यसहजशौर्योष्मदहनदह्यमानेनेव विरतन्यमानस्वेदसलिलशीकरासारदुर्दिनः, स्वावयवैरप्यदृष्टपूर्वप्रकोपभीतैरिव कम्पमानैरुपेतः हर इव कृतभैरवाकारः, हरिरिव प्रकटितनरसिंहरूपः,

सूर्यकान्तशैल इव अपरतेजःप्रसरदर्शनप्रज्वलितः, क्षयदिवस इवोदितद्वादशदिनकरदुर्निरीक्ष्यमूर्तिः, महोत्पातमारुत इव सकलभूभृत्कम्पकारी, विन्ध्य इव विवर्धमानविग्रहोत्सेधः, महाशीविष इव दुर्नरेन्द्राभिभवरोषितः, पारीक्षित इव सर्वभोगिदहनोद्यतः, वृकोदर इव रिपुरुधिरतृषितः, सुरगज इव प्रतिपक्षवारणप्रधावितः, पूर्वागम इव पौरुषस्य, उन्माद इव मदस्य, आवेग इवावलेपस्य, तारुण्यावतार इव तेजसः, सर्वोद्योग इव दर्पस्य, युगागम इव यौवनोष्मणः, राज्याभिषेक इव रणरसस्य, नीराजनदिवस इवासहिष्णुतायाः, परां भीषणतामयासीत्।"

सेनापति सिंहनाद याचा आपला स्वामी हर्षराजा याशीं शौर्यरसभरित उपदेश, त्यावर हर्षाचें वीरोचित सावेश उत्तर, त्याची शत्रुनाशाविषयीं प्रतिज्ञा व सर्व राजेलोकांस युद्धास किंवा शरण येण्यास सिद्ध असण्याविषयीं लिहिण्यास सांगितलेली पत्रिका:—

"सीमान्तदृश्वा शस्त्रग्रामस्य, निर्वोढा प्रौढवादानाम्, संस्तम्भयिता भग्नानाम्, पारगः प्रतिज्ञायाः, मर्मज्ञो महाविग्रहाणाम्, आघोषणापटहः समरार्थिनाम्, संनिधावेव समुपाविष्टः सिंहनादनामा स्वरेणैव दुन्दुभिघोषगम्भीरेण सुभटानां समररसमानयन्विज्ञापितवान्—'देव, न क्वचित्कृताश्रयया मलिनया मलिनतराः कोकिलया काका इव कापुरुषा हतलक्ष्म्या विप्रलभ्यमानमात्मानं न चेतयन्ते। श्रियो हि दोषान्धतादयः कामला विकाराः। छत्रच्छायान्तारितरवयो विस्मरन्त्यन्यं तेजस्विनं जडधियः। किं वा करोतु वराकः येनातिभीरुतया नित्यपराङ्मुखेन न तु दृष्टान्येव सर्वातिशायिशौर्यातिशयश्वयथुकपिलकपोलपुलकपल्लवितकोपानलानि कुपितानां तेजस्विनां मुखानि। नासौ तपस्वी जानात्येवं यथाभिचारा इव विप्रकृताः सद्यः सकलकुलप्रलयमुपहरन्ति मनस्विनः। जलेऽपि ज्वलन्ति ताडितास्तेजस्विनः। सकलवीरगोष्ठीबाह्यस्य तस्यैवेदमुचितमनुत्तारनिरयनिपातनिपुणं कर्म। मनस्विनां हि प्रधनप्रधानधने धनुषि ध्रियमाणे सति च कमलाकलहंसीकेलिकुवलयकानने कृपाणे कृपणोपायाः पयोधिमथनप्रभृतयोऽपि श्रीसमुत्थानस्य किं पुनरीदृशाः। येषां च धाता धरित्रीं त्रातुं नियुक्ताः स्वयमसमर्था इव कुलिशकर्कशभुजपरिघप्रहरणहेतोरुद्गिरन्ति गिरयोऽपि लोहानि ते कथमिव बाहुशालिनो

मनसापि विमलयशोबान्धवा ध्यायेयुरकार्यम्। सर्वग्रहाभिभवभास्वराणां हि सुभटकराणामग्रतो दिग्ग्रहणे पङ्गवः पतङ्गकराः। महामहिषशृङ्गतरङ्गभङ्गभङ्गुरभीषणान्तराला लोकप्रवादमात्रेण दक्षिणाशा परमार्थतो भटभ्रुकुटिरधिवासो यमस्य । चित्रं च यदुन्मुक्तसिंहनादानां सहसा साहसरसरोमाञ्चकण्टकनिकरेण सह न निर्यान्ति सटाः शूराणां रणेषु। द्वयमेव च चतुःसागरसंभूतस्य भूतिसंभारस्य भाजनं प्रतिपक्षदाहि दारुणं वडवामुखं वा महापुरुषहृदयं वा।तेजस्विनःसकलाननवाप्य पयोराशिसहजस्य कुतो निवृत्तिरूष्मणः। वृथा विततविपुलफणाभारो भुजङ्गानां भर्ता बिभर्ति यो भोगेन मृत्पिण्डमेव केवलम् । अप्रतिहतशासनाक्रान्त्युपभोगसुखरसं तु रसाया दिक्कुञ्जरकरभारभास्वरप्रकोष्ठा वीरबाहव एव जानन्ति। रविरिवोन्मुखपद्माकरगृहीतपादपल्लवः सुखेनाखण्डिततेजा दिवसान्नयति शूरः । कातरस्य तु शशिन इव हरिणहृदयस्य पाण्डुरपृष्ठस्य कुतो द्विरात्रमपि निश्चला लक्ष्मीः । अपरिमितयशःप्रकरवर्षी विकासी वीररसः । पुरःप्रवृत्तप्रतापप्रहताः पन्थानः पौरुषस्य । शब्दविद्रुतद्विषन्ति भवन्ति द्वाराणि दर्पस्य । शस्त्रालोकप्रकाशिताः शून्या दिशः शौर्यस्य । रिपुरुधिरशीकरासारेण भूरिव श्रीरप्यनुरज्यते । बहुनरपतिमुकुटमणिशिलाशाणकोणकषणेन चरणनखराजिरिव राजताप्युज्ज्वलीभवति । अनवरतशस्त्राभ्यसेन करतलानीव रिपुमुखानि श्यामीभवन्ति । विविधव्रणबद्धपट्टकशतैः शरीरमिव यशोऽपि धवलीभवति । कवचिषु रिपूरःकवाटेषु पात्यमानाः पावकशिखामिव श्रियमपि वमन्ति निष्ठुरा निस्त्रिंशप्रहाराः । यश्चाहितहतस्वजनो मनस्विजनो द्विषद्योषिदुरस्ताडनेन कथयति हृदयदुःखम् । परुषासिलतानिपातपवनेनोच्छ्वसिति। निरुच्छ्वसितशत्रुशरीराश्रुधारापातेन रोदिति । विपक्षवनिताचक्षुषा ददाति जलं स श्रेयान्नेतरः। न च स्वप्नदृष्टनष्टेष्विव क्षणिकेषु शरीरेषु निबध्नन्ति बन्धुबुद्धिं प्रबुद्धाः। स्थायिनि यशसि शरीरधीर्वीराणाम् । अनवरतप्रज्वलिततेजःप्रसरभास्वरस्वभावं च मणिप्रदीपमिव कलुषः कज्जलमलो न स्पृशत्येव तेजस्विनं शोकः। स त्वं सत्ववतामग्रणीःप्राग्रहरः प्राज्ञानां प्रथमः समर्थानां प्रष्ठोऽभिजातानामग्रेसरस्तेजस्विनामादिरसहिष्णूनाम् । एताश्च सततसंनिहितधूमाय-

श्रीमंत लो. मं. मं. वाचनालय



मानकोपाश्रयः सुलभासिधारातोयतृप्तयो विकटबाहुवनच्छायोपगूढा धीरताया निवासशिशिरभूमयः स्वायत्ताः सुभटानामुरःकवाटभित्तयः यतः । किं गौडाधिपेनैकेन । तथा कुरु यथा नान्योऽपि कश्चिदाचरत्येवं भूयः। सर्वोर्वीश्रद्धाकामुकानामलीकविजिगीषूणां संचारय चामराण्यन्तः पुरपुरंध्रिनिःश्वसितैः। उच्छिन्धि रुधिर गन्धान्ध गृध्रमण्डलच्छादनैश्छत्रच्छायाव्यसनानि । अपाकुरु कदुष्णशोणितोदकस्वेदैः कुलक्ष्मीकुलटाकटाक्षचक्षूरागरोगान्‌उपशमय निशितशरशिरावेधैरकार्यशौर्यश्वयथून् । उन्मूलय लोहनिगडापीडमालामलमहौषधैः पादपीठदोहददुर्ललितपादपटुमान्द्यानि ।क्षपय तीक्षाज्ञाक्षरक्षारपातैर्जयशब्दश्रवणकर्णकण्डूः। अपनय चरणनखमरीचिचन्दनचर्चाललाटलेपैरनमितस्तिमितमस्तकस्तम्भविकारान् । उद्धर करदानसंदेशसंदेशैर्द्रविणदर्पोष्मायमाणदुःशीललीलाशल्यानि । भिन्धि मणिपादपीठदीधितिप्रदीपिकाभिः शुष्कसुभटाटोपभ्रुकुटिबन्धान्धकारान् । जय चरणलङ्घनलाघवगलितशिरोगौरवारोग्यैर्मिथ्याभिमानमहासंनिपातान् । प्रदय सततसेवाञ्जलिमुकुलितकरसंपुटोष्मभिरिष्वसनगुणकिणकार्कश्यानि । येनैव ते गतः पिता पितामहः प्रपितामहो वा तमेव मा हासीस्त्रिभुवनस्पृहणीयं पन्थानम् । अपहाय कुपुरुषोचितां शुचं प्रतिपद्यस्व कूलक्रमागतां केसरीव कुरङ्गीं राज्यलक्ष्मीम् । देव, देवभूयं गते नरेन्द्रे दुष्टगौडभुजङ्गजग्धजीविते च राज्यवर्धने वृत्तेऽस्मिन्महाप्रलये धरणीधारणायाधुना त्वं शेषः।समाश्वासय अशरणाः प्रजाः। क्ष्मापतीनां शिरःसु शरत्सवितेव ललाटंतपान्प्रयच्छ पादन्यासान् ।अहितानामभिनवसेवादीक्षादुःखसंतप्तश्वासधूममण्डलैर्नखंपचैः प्रचलितचूडामणिचक्रवालबालातपैश्चायाहि कल्माषपादताम् अपि च हते पितर्येकाकी तपस्वी मृगैः सह संवर्धितः सहजब्राह्मण्यमार्दवसुकुमारमनाः कृतनिश्चयश्चण्डचापवनाटनिटांकारनादनिर्मदीकृतदिग्गजं गुञ्जज्ज्याजालजनितजगज्ज्वरं समग्रमुद्यतमेकविंशतिकृत्वः कृत्तवंशमुत्खातवान्राजन्यकं परशुरामः। किं पुनर्नैसर्गिकक्कायकार्कश्यकुलिशायमानमानसो मानिनां मूर्धन्यो देवः । तदद्यैव कृतप्रतिज्ञो गृहाण गौडाधमजीवितध्वस्तये जीवितसंकलनाकुलकालकाण्डदण्डयात्राचिह्नध्वजं धनुः । न ह्ययमरातिरक्तचन्दनचर्चाशिशिरोपचारमन्तरेण शाम्यति परिभवानलपच्यमानदेहस्य देवस्य दुःखदाहज्वरः सुदारुणः।

निकारसंतापशान्त्युपायपरीक्षये हि हिडिम्बाचुम्बनास्वादितमिव रिपुरुधिरामृतममन्दरोपायमपायि पवनात्मजेन । जामदग्न्येन च शाम्यन्मन्युशिखिशिखासंज्वरसुखायमानस्पर्शशीतलेषु क्षत्रियक्षतजह्रदेष्वस्नायि।' इत्युक्त्वा व्यरंसीत् ।"

हस्तिसैन्याधिपति स्कन्दगुप्त याचें धैर्योत्तेजक ऐतिहासिक उदाहरणासह भाषण.

हर्षानें गजसेनापति स्कन्दगुप्त यास सैन्य सज्ज करून येण्याविषयीं आज्ञा केली असतां तो येऊन नम्रतेनें प्रणाम करून बसल्यावर "प्रिय बंधूचें सर्व वर्तमान तुम्हांस कळलें असेलच, तर आतां सैन्य सज्ज करून निघण्यास विलंब करूं नये" असें हर्षानें म्हटल्यावर, स्कन्दगुप्तानें थोडी विनंति ऐकावी म्हणून हर्षाच्या कर्तव्यास आपली अनुकूलता दाखवून प्रार्थना केली कीं, सर्पादि कीटकांस देखील अपमान सहन होत नाहीं, तर महाराजासारख्या तेजस्वि पुरुषाला तो कोठून सहन होणार ? तथापि विनंति इतकीच कीं, "कोणावरहि विश्वास ठेवणें उपयोगी नाहीं. विश्वास ठेविल्यानें असेच पुष्कळांचे घात झाले आहेत." असें म्हणून त्यानें पूर्वींचीं पुष्कळ उदाहरणें सांगितलीं आहेत. या ठिकाणीं बाणभट्टानें आपलें इतिहासाचें बरेंच ज्ञान प्रकट केलें आहे.

"प्रभातायांच शर्वर्यां प्रातरेव प्रतीहारमादिदेशाशेष गजसाधनाधिकृतं स्कन्दगुप्तं द्रष्टुमिच्छामीति ।

स्कन्दगुप्तो विवेश राजकुलम् । दूरादेव चोभयकरकमलावलम्बितं स्पृशन्मौलिना महीतलं नमस्कारमकरोत् ।

उपविष्टं नातिनिकटे तं तदा जगाद देवो हर्षः—'श्रुतो विस्तर एवास्यार्यव्यतिकरस्यास्मच्चिकीर्षितस्य च । अतः शीघ्रं प्रवेश्यन्तां प्रचारनिर्गतानि गजसाधनानि । न क्षाम्यत्यतिस्वल्पमाप्यार्यपरिभवपीडापावकः प्रयाणविलम्बम् ।' इत्येवमभिहितश्च प्रणम्य व्यज्ञापयत्। 'कृतमवधारयतु स्वामी समादिष्टं किंतु स्वल्पं विज्ञाप्यमस्ति भर्तृभक्तेः। तदाकर्णयतु देवः । देवेन हि पुष्पभूतिवंशसंभूतस्याजात्यस्य सहजस्य तेजसो दिक्करिकरप्रलम्बस्य बाहुयुगलस्यासाधारणस्य च सोदरस्नेहस्य सर्वं सदृशमुपक्रान्तम्।काकोदराभिधानाः कृपणाः कृमयोऽपि न मृष्यन्ति विकारं किमुत भवादृशास्तेजसां राशयः।केवलं देवराज्यवर्धनोदन्तेन कियदपि दृष्टमेव देवेन दुर्जनदौरात्म्यम् । ईदृशाः खलु लोकस्य

भावाः प्रतिग्रामं प्रतिनगरं प्रतिदेशं प्रतिद्वीपं प्रतिदिशं च भिन्नावेशा-श्चाकाराश्चाहाराश्च व्यवहाराश्च जनपदानाम्। तदियमात्मदेशाचारो-चिता स्वभावसरलहृदयजा त्यज्यतां सर्वविश्वासिता। प्रमाददोषाभि षङ्गेषु श्रुतबहुवार्त एव प्रतिदिनं देवः। यथा नागकुलजन्मनः सारि-काश्रावितमन्त्रस्यासीन्नाशो नागसेनस्य पद्मावत्याम्। शुकश्रुतरहस्य-स्य च श्रीरशीर्यत श्रुतवर्मणः श्रावस्त्याम्। स्वप्नायमानस्य च मन्त्रभे-दोऽभून्मृत्यवे मृत्तिकावत्यां सुवर्णचूडस्य। चूडामणिलग्नलेखप्रतिबि-म्बवाचिताक्षरा च चारुचामीकरचामरग्राहिणी यमतां ययौ यवनेश्व-रस्य। लोभबहुलं च बहुलनिशि निधानमुत्खनन्तमुत्खातखङ्गप्रमाथि-नी ममन्य माथुरं बृहद्रथं विदूरथवरूथिनी। नागवनविहारशीलं च मायामातङ्गगाङ्गान्निर्गता महासेनसैनिका वत्सपतिं न्ययंसिषुः। अतिदयितलास्यस्य च शैलूषमध्यमध्यास्य मूर्धानमसिलतया मृणा-लमिवालुनादग्निमित्रात्मजस्य सुमित्रस्य मित्रदेवः। प्रियतन्त्रीवाद्यस्या-लाबुवीणाभ्यन्तरशुषिरनिहितनिशिततरवारयो गान्धर्वच्छात्रच्छद्मानः चिच्छिदुरश्मकेश्वरस्य शरभस्य शिरो रिपुपुरुषाः। प्रज्ञादुर्बलंच बल-दर्शनव्यपदेशदर्शिताशेषसैन्यः सेनानीरनार्यो मौर्यं बृहद्रथं पिपेष पुष्पमित्रः स्वामिनम्। आश्चर्यकुतूहली च चण्डीपतिर्दण्डोपनतयवन-निर्मितेन नभस्तलयायिना यन्त्रयानेनानीयत क्वापि। काकवर्णः शैशुना-गिश्च नगरोपकण्ठे कण्ठे निचकृते निस्त्रिंशेन। अतिस्त्रीसङ्गरतमनङ्गपरवशं शुङ्गममात्यो वसुदेवो देवभूतिं दासीदुहित्रा देवीव्यञ्जनया वीतजीवि-तमकारयत्। असुरविवरव्यसनिनं चापजन्हुरपरिमितरमणीमणिनूपुरझ-णझणाह्लादरम्यया मागधं गोधनगिरिसुरुङ्गया स्वविषयं मेकलाधिप-मन्त्रिणः। महाकालमहे च महामांसविक्रयवादवातूलं वेतालस्तालज-ङ्घो जघान जघन्यजं प्रद्योतस्य पौणिकिं कुमारं कुमारसेनम्। रसायनरसाभिनिवेशिनश्च वैद्यव्यञ्जनाः सुबहुपुरुषान्तरप्रकाशितौष-धगुणा गणपतेर्विदेहराजसुतस्य राजयक्ष्माणमजनयन्। स्त्रीविश्वा-सिनश्च महादेवीगृहगूढभित्तिभागभ्राता भद्रसेनस्याभवन्मृत्यवे कालि-ङ्गस्य वीरसेनः। मातृशयनीयतूलिकातलनिषण्णश्च तनयोऽन्यं तनय-मभिषेक्तुकामस्य दध्रस्य करूपाधिपतेरभवन्मृत्यवे। उत्सारकरुचिं च रहसि ससचिवमेव दूरीचकार चकोरनाथं शूद्रकदूतश्चन्द्रकेतुं

जीवितात् । मृगयासक्तस्य च मथ्नतो गण्डकानुद्दण्डनड्वलनलवनिलीनाश्च चम्पाधिपचमूचरभटाश्चामुण्डीपतेराचेमुः प्राणान्पुष्करस्य । बन्दिरागपरं च परप्रयुक्ता जयशब्दमुखरमुखा मल्ला मौखरिं मूर्खं क्षत्रवर्माणमुदखनन् । अरिपुरे च परकलत्रकामुकं कामिनीवेशगुप्तश्च चन्द्रगुप्तः शकपतिमशातयदिति । प्रमत्तानां प्रमदाकृताः प्रमादाः श्रुतिविषयमागता एव देवस्य । यथा मधुमोदितं मधुरकसंलिप्तैर्लाजैः सुप्रभा पुत्रराज्यार्थं महासेनं काशिराजं जघान । व्याजजनितकंदर्पदर्पा च दर्पणेन क्षुरधारापर्यन्तेनायोध्याधिपतिं परंतपं रत्नवती जारूथम् । विषचूर्णचुम्बितमकरन्देन च कर्णेन्दीवरेण देवकी देवरानुरक्ता देवसेनं सौह्मयम् । योगपरागविरसवर्षिणा च मणिनूपुरेण वल्लभा सपत्नीरुषा वैरन्त्यं रन्तिदेवम् । वेणीनिगूढेन च शस्त्रेण बिन्दुमती वृष्णिं विदूरथम् । रसदिग्धमध्येन च मेखलामणिना हंसवती सौवीरं वीरसेनम् । अदृश्या गदलिप्तवदना च विषवारुणीगण्डूषपायनेन पौरवी पौरवेश्वरं सोमकम् ।' इत्युक्त्वा विरराम स्वाम्यादेशसंपादनाय च निर्जगाम ।''

हर्ष शत्रूवर चाल करून जात असतां राज्यवर्धनाच्या बरोबर गेलेल्या भंडीची व त्याची वाटेनें गांठ पडली त्या वेळचे हुबेहूब वर्णन यांत केलें आहे. यांत भंडी व हर्ष यांचें परस्परांबद्दल प्रेम, राज्यवर्धनानें मालवाचा सूड उगवून त्याची हरण केलेली संपत्ति भंडीनें हर्षास दाखविली. इत्यादि गोष्टीचा उल्लेखहि यांत आहे.

" कदाचित्तु राज्यवर्धनभुजबलोपार्जितमशेषं मालवराजसाधनमादायागतं समीप एवावासितं लेखहारकाद्भण्डिमश्रृणोत् । श्रुत्वा चाभिनवीभूतभ्रातृशोकहुताशनः कातरहृदयो बभूव मूर्च्छान्धकारमिव विवेशातिष्ठच्च समुत्सृष्टसकलव्यापारः प्रतीहारनिवारणनिभृतनिःशब्दपरिजने निजमन्दिरे सराजकपरिवारस्तदागमनमुदीक्षमाणो मुहूर्तम् ।

अथ भण्डिरेकेनैव वाजिना कतिपयकुलपुत्रपरिवृतो मलिनवासा रिपुशरशल्यपूरितेन, निखातबहुलोहकीलकपरिकररक्षित स्फुटनेनेव हृदयेन, हृदयलग्नैः स्वामिसत्कृतैरिव श्मश्रुभिः, शुचं समुपदर्शयन्दूरीकृतव्यायामशिथिलभुजदण्डदोलायमानमंगलवलयैकशेषालंकृति-

रनादरोपयुक्तताम्बूलविरलरागेण शोकदहनदह्यमानस्य हृदयस्याङ्गारेणेव, दीर्घनिःश्वासवेगनिर्गतेनाधरेण शुष्यता स्वामिविरहविधृतजीवितापराधवैलक्ष्यादिव, बाष्पवारिपटलेन पटेनेव प्रावृतवदनः, विशन्निव दुर्बलीभूतैः स्वाङ्गमपत्रपयाङ्गैः वमन्निव च व्यर्थीभूतभुजोष्माणमायतैर्निश्वसितैः, पातकीव, अपराधीव, द्रोहीव, मुषित इव, छलित इव, यूथपतिपतनविषण्ण इव, वेगदण्डवारणः, सूर्यास्तमयनिःश्रीक इव, कमलाकरः, दुर्योधननिधनदुर्मना इव, द्रोणिरपहृतरत्न इव सागरो राजद्वारमाजगाम। अवतीर्य च तुरङ्गामादवनतमुखो विवेश राजमन्दिरम्। दूरादेव च विमुक्ताक्रन्दः पपात पादयोः।

अवनिपतिरपि दृष्ट्वा तमुत्थाय विरलैः पदैः प्रत्युद्गम्योत्थाप्य च गाढमुपगूह्य कण्ठे करुणमतिचिरं रुरोद। शिथिलीभूतमन्युवेगश्च पुरेव पुनरागत्य निजासने निषसाद। प्रथमप्रक्षालितमुखे च भण्डी मुखमक्षालयत्। समतिक्रान्ते च कियत्यापि काले भ्रातृमरणवृत्तान्तमप्राक्षीत्। अथाकथयच्च यथावृत्तमखिलं भण्डिः। अथ नरपतिस्तमुवाच 'राज्यश्रीव्यतिकरः कः' इति। स पुनरवादीत् 'देव, देवभूयं गते देवे राज्यवर्धने गुप्तनाम्ना च गृहीते कुशस्थले देवी राज्यश्रीः परिभ्रश्य बन्धनाद्विन्ध्याटवीं सपरिवारा प्रविष्टेति लोकतो वार्तामशृणवम्। अन्वेष्टारस्तु तां प्रति प्रभूताः प्रहिता जना नाद्यापि निवर्तन्ते' इति। तच्चाकर्ण्य भूपतिरब्रवीत्—'किमन्यैरनुपदिभिः यत्र सा तत्र परित्यक्तान्यकृत्यः स्वयमहं यास्यामि। भवानपि कटकमादाय प्रवर्ततां गौडाभिमुखम्।' इत्युक्त्वा चोत्थाय स्नानभुवमगात्। कारित शोकश्मश्रुवपनकर्मणा च प्रतीहारभवनस्नातेन, शारीरकवसनकुसुमाङ्गरागालंकारप्रेषणप्रकटितप्रसादेन, भण्डिना सार्धमभुक्त निनाय च तेनैव सह वासरम्।

अथापरेद्युरुपस्येव भण्डिर्भूपालमुपसृत्य व्यज्ञापयत्—'पश्यतु देवः श्रीराज्यवर्धनभुजबलार्जितं साधनं सपरिबर्हं मालवराज्यस्य' इति। नरपतिना स 'एवं क्रियताम्' इत्यभ्यनुज्ञातो दर्शयांबभूव। तद्यथा अनवरतगलितमदमदिरामोदमुखरमधुकरजूटजटिलकरटपट्टपङ्किलगण्डान् गण्डशैलानिव जङ्गमान्, गम्भीरगर्जितरवाञ्जलधरानिव महीमवतीर्णानुत्फुल्लसप्तच्छदवनामोदमुचः, शरद्दिवसानिव पुञ्जीभूतान्,

अनेकसहस्रसंख्यान्कारिणः, चारुचामीकरचित्रचामरमण्डलमनोहरांश्च हरिणरंहसो हरीन्, बालातपविसरवार्षिणां च किरणैरनेकेन्द्रायुधीकृतदशदिशामलंकाराणां विशेषान्, विस्मयकृतः स्मरोन्मादितमालवीकुचपरिमलदुर्ललितांश्च निजज्योत्स्नापूरप्लावितादिगन्तानपि तारान् हारान्, उडुपातिपादसंचयशुचीनि निजयशांसीव वालव्यजनानि, जातरूपमयनालं च निवासपुण्डरीकमिव श्रियः श्वेतातपत्रम्, अप्सरस इव बहुसमररससाहसानुरागावतीर्णा वारविलासिनीः, सिंहासनशयनासंदिप्रभृतीनि राज्योपकरणानि, कालायसनिगडनिश्चलीकृतचरणयुगलं च सकलं मालवराजलोकमशेषांश्च ससंख्यालेख्यपत्रान्, सालंकारापीडपीडान्, कोषकलशान्। अथालोच्य तत्सर्वमवनिपालः स्वीकर्तुं यथाधिकारमादिक्षदध्यक्षान्। अन्यस्मिंश्चाहनि हयैः स्वसारमन्वेष्टुमुच्चचाल विन्ध्याटवीमवाप च परिमितैरेव प्रयाणकैस्ताम्।"

बाणानें वर्णिलेलें पिता व पुत्र यांचें परास्परांविषयीं प्रेम.

हर्षाचा बाप प्रभाकरवर्धन हा विषमज्वरानें अत्यवस्थ असल्याचें हर्षास कळतांच तो हिमालयांत मृगया करण्याकरितां राहिला होता, तो उपाशी तापाशी मोठ्या तातडीनें आला, त्या वेळीं पिता व पुत्र यांचें परस्परांविषयींचें प्रेम कसें असतें तें बाणकवीनें चांगल्या रीतीनें दाखविलें आहे.

"अवनिपातिस्तु दूरादेव दृष्ट्वातिदयितं तनयं तदवस्थोऽपि निर्भरस्नेहावर्जितः प्रधावमानो मनसा प्रसार्य भुजावेह्येहीत्याह्वयञ्छरीरार्धेन शयनादुदगात्। ससंभ्रममुपसृतं चैनं विनयावनम्रमुन्नमय्य बलादुरसि निवेश्य, विशन्निव प्रेम्णा निशाकरमण्डलमध्यम्, मज्जन्निवामृतमये महासरसि, स्नान्निव महति हरिचन्दनरसप्रस्रवणे अभिषिच्यमान इव तुषाराद्रिद्रवेण, पीडयन्नङ्गैरङ्गानि, कपोलेन कपोलमवघट्टयन्निमीलयन्पक्ष्माग्रग्रथिताजस्रविस्राविणी विलोचने विस्मृतज्वरसंज्वरः सुचिरमालिलिङ्ग। कथं कथमपि चिराद्विमुक्तमुपसृत्य कृतनमस्कारं प्रणतजननीकमुपागतमासीनं च शयनान्तिके पिबन्निव विगतनिमेषनिश्चलेन चक्षुषा व्यलोकयत्। पस्पर्श च पुनः पुनर्वेपथुमता पाणितलेन क्षयक्षामकण्ठश्च कृच्छ्रादिवावादीत्–'वत्स, कृशोऽसि' इति। भण्डिस्त्वकथयत्–' देव, तृतीयमहः कृताहारस्यस्याद्य ' इति।"

तसेंच पुत्राविषयी मातेचें प्रेम कसें असतें याविषयीं बाणपुत्रानें कादंबरीच्या उत्तरार्धात दाखविलें आहे.

बाणपुत्र यानें वर्णिलेलें माता व पुत्र यांचें परस्परांविषयीं प्रेम.

चन्द्रापीड हा वैशंपायनास आणण्याकरितां फिरून दूर जाऊं लागला असतां त्याची आई विलासवती हीस पुत्रविरह असह्य वाटून तिचें त्यास ह्मणणें, व चंद्रापीडाची आपल्या आईस सप्रेम विनंति. यांत उभयतांचें प्रेमहि कवीनें दाखविलें आहे.

"तात युज्यते ह्यङ्कलालितस्य गर्भरूपस्य प्रथमगमने गरीयसी हृदयपीडा । मम पुनर्नेदृशी प्रथमगमनेऽपि ते पीडा समुत्पन्ना यादृशी तव गमनेनाधुना । दीर्यत इव मे हृदयम् । समुत्पाट्यन्त इव मर्माणि उत्क्वथ्यत इव शरीरम् । उत्प्लवत इव चेतः । विघटन्त इव सन्धिबन्धनानि । निर्यान्तीव प्राणाः । न किञ्चित्समादधाति धीः । सर्वमेव शून्यं पश्यामि । न पारयाम्यात्मानमिव हृदयं धारयितुम् । धृतोऽपि बलादागच्छति बाष्पोत्पीडः । मुहुर्मुहुः समाहितापि मङ्गलसंपादनाय ते न चलति मतिः । न जानाम्येव किमुत्पश्यामीति । किं निमित्तं चेयमीदृशी हृदयपीडेत्येतदपि न वेद्मि । किं बहुभ्यो दिवसेभ्यः कथमप्यागतो मे वत्सो झटित्येव पुनर्गच्छतीति । किं वैशंपायनवियोगादुद्विग्नस्य गमनमेकाकिनस्ते समुत्प्रेक्ष्येति । न पुनर्वैशंपायनवृत्तान्तादात्मन एव दुःखिततयेति । न चैवंविधया पीडया वैशंपायनानयनाय गच्छतस्ते गमनं निवारयितुं पारयति वाणी । हृदयं पुनर्नेच्छत्येव त्वदीयं गमनम् । तदीदृशीं मे पीडां विज्ञाय यथा पुरा स्थितं न तथा क्वचिदासङ्गमावध्यातिदीर्घकालमायुष्मता स्थातव्यम् । अस्य चार्थस्य कृते साञ्जलिबन्धेन शिरसाभ्यर्थये वत्सम् । इत्यादिशन्तीं स्वमातरं सुदूरं प्रसारितावनम्रमूर्तिश्चन्द्रापीडो व्यजिज्ञपत् । अम्ब, तदा दिग्विजयप्रसंगात्स्थितम् । अधुना पुनरयमेव कालक्षेपो यावत्तमुद्देशं परापतामि । तत्पुनश्चिरागमनकृता न भावनीया मनागपि हृदये पीडा त्वया । इत्येवं विज्ञप्ता चन्द्रापीडेन संनिरुध्य बाष्पवेगान्कथंकथमपि संस्तभ्यात्मानं निर्वर्तितगमनमङ्गला गलता प्रस्रवेण सिञ्चन्ती शिरसि चोपाघ्राय गाढं सुचिरमालिङ्ग्य गच्छाद्भिरिव प्राणैः कृच्छ्रान्मुमोच तं माता ।"

यांत पुत्राचा विनय व त्याचें मातेविषयीं प्रेम हींहि कवीनें यथायोग्य दाखविलीं आहेत!

यावरून व दुसऱ्या अनेक गोष्टींवरून आपल्या कवीस मनुष्यादिकांच्या नानाविध मनोवृत्तींची चांगली पारख होती असें लक्षांत येतें.

चंद्रापीडाचा दहा वर्षेंपर्यंत विद्याभ्यास झाल्यावर त्यास त्याचा बाप तारापीड यानें विद्यालयांतून घरीं आणिल्यावर त्यास यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें. तेव्हां तो प्रधान शुकनास याचे भेटीकारितां गेला असतां त्यानें लक्ष्मीच्या अंगीं अनेक दोष असतात, याकरितां त्यांपासून सावध राहण्याकरितां त्यास प्रौढ व गंभीर असा फारच मोठा उपदेश केला आहे. त्यांतील कांहीं भाग येथें घेतला आहे. यांत अनेक श्लेषादि अलंकारहि आहेत. हे प्रकार तर आपल्या कवीस अगदींच साहजिक साधले आहेत व कोणत्याहि विषयावर प्रौढ व खुबीरदार वर्णन करणें आपल्या कवीस करतलामलकवत् साधलें आहे. व ह्मणूनच विद्वान् व गुणज्ञ हर्षराजानें त्यास " वश्यवाणिकविचक्रवर्ती " अशी पदवी दिली होती ती ठीकच!

"विरला हि तेषा ( राज्ञां ) मुपदेष्टारः। प्रतिशब्दक इव राजवचनमनुगच्छति जनो भयात्। उद्दामदर्पश्वयथुस्थगितश्रवणविवराश्चोपदिश्यमानमपि ते न शृण्वन्ति। शृण्वन्तोपि च गजनिमीलितेनावधीरयन्तः खेदयन्ति हितोपदेशदायिनो गुरून् अहंकारदाहज्वरमूर्छान्धकारिता विह्वला हि राजप्रकृतिः। अलीकाभिमानोन्मादकारीणि धनानि। राज्यविषविकारतन्द्रप्रदा राजलक्ष्मीः।

—" आलोकयतु तावत् कल्याणाभिनिवेशी लक्ष्मीमेव प्रथमम्। इयं हि सुभटखड्गमण्डलोत्पलवनविभ्रमभ्रमरी लक्ष्मीः। क्षीरसागरात्पारिजातपल्लवेभ्यो रागम्। इंदुशकलादेकांतवक्रताम्। उच्चैःश्रवसश्चंचलताम्। कालकूटान्मोहनशक्तिम्। मदिराया मदम्। कौस्तुभमणेरतिनैष्ठुर्यम्। इत्येतानि सहवासपरिचयवशाद्विरहविनोदचिह्नानि गृहीत्वेवोद्गता। न ह्येवंविधमपरमपरिचितमिह जगति किंचिदस्ति। यथेयमनार्या। लब्धापि खलु दुःखेन परिपाल्यते। दृढगुणपाशसंदाननिष्पन्दीकृतापि अपक्रामति। उद्दामदर्पभटसहस्रोल्लासिलतापंजरविधृतापि अपक्रामति। मदजलदुर्दिनांधकारगजघटितघनघटाटोपपरिपालिताऽपि प्रपलायते। न परिचयं रक्षति नाभिजनमीक्षते न

रूपमालोकयते न कुलक्रममनुवर्तते न शीलं पश्यति न वैदग्ध्यं गणयति न श्रुतमाकर्णयति न धर्ममनुरुध्यते न त्यागमाद्रियते न विशेषज्ञतां विचारयति नाचारं पालयति न सत्यमनुबुध्यते न लक्षणं प्रमाणीकरोति गंधर्वनगरलेखेव पश्यत एव नश्यति। आद्याप्यारूढमंदरपरिवर्तावर्तभ्रांतिजनितसंस्कारेव परिभ्रमति। कमलिनीसंचरणव्यतिकरलग्ननलिननालकंटकक्षतेव न क्वचिन्निर्भरमाबध्नाति पदम्। अतिप्रयत्नविधृताऽपि परमेश्वरगृहेषु विविधगन्धगजगण्डमधुपानमत्तेव परिस्खलति। पारुष्यमिवोपशिक्षितुमसिधारासु निवसति। विश्वरूपत्वमिव ग्रहीतुमाश्रिता नारायणमूर्तिम्। अप्रत्ययबहुला च दिवसांतकमलमिव समुपचितमूलदण्डकोषमण्डलमपि मुञ्चति भूभुजम्। लतेव विटपकानध्यारोहति। गंगेव वसुजनन्यपि तरंगबुद्बुदचंचला। दिवसकरगतिरिव प्रकटितविविधसंक्रांतिः पातालगुहेव तमोबहुला। हिडिंबेव भीमसाहसैकहार्यहृदया। प्रावृडिव अचिरद्युतिकारिणी। दुष्टपिशाचीव दर्शितानेकपुरुषोच्छ्राया। स्वल्पसत्वमुन्मत्तीकरोति। सरस्वतीपरिगृहीतमीर्षयेव नालिङ्गति जनम्। गुणवंतमपवित्रमिव न स्पृशति। उदारसत्वममंगलमिव न बहु मन्यते। सुजनमनिमित्तमिव न पश्यति अभिजातमहिमिव लंघयति। शूरं कंटकमिव परिहरति। दातारं दुःस्वप्नमिव न स्मरति। विनीतं पातकिनमिव नोपसर्पति। मनस्विनमुन्मत्तमिवोपहसति। परस्पराविरुद्धं च इंद्रजालमिव दर्शयंती प्रकटयति जगति निजं चरितम्। तथाहि। सततमुष्माणमारोपयंत्यपि जाड्यमुपजनयति। उन्नतिमादधानापि नीचस्वभावतामाविष्करोति। तोयराशिसंभवापि तृष्णां संवर्द्धयति। ईश्वरतां दधानाप्यशिवप्रकृतित्वमातनोति। बालोपचयमाहरंत्यपि लाघिमानमापादयति। अमृतसहोदराऽपि कटुविपाका। विग्रहवत्यपि अप्रत्यक्षदर्शना। पुरुषोत्तमरताऽपि खलजनप्रिया। रेणुमयीव स्वच्छमपि कलुषीकरोति। ”

महाश्वेता व पुंडरीक यांची दृष्टादृष्ट व त्यामुळें झालेली उभयतांची अवस्था.

चंद्रापीड व महाश्वेता यांची भेट झाल्यावर त्यानें तिला पूर्ववृत्तांत विचारला; तेव्हां तिनें तो त्याला दुःखानें सांगितला आहे. ती म्हणाली—महाराज! याच अच्छोदसरोवरावर मी आपल्या आईबरोबर स्नानाकरितां आलें होतें.

तेव्हां वसंतऋतु असल्यामुळें येथली शोभा पाहत मी हिंडत असतां सर्व सुवासांस मागें सारणारा असा सुगंध एकाएकीं आला. तो कोठून आला ह्मणून मी त्या वनांत इकडे तिकडे पहात होतें तों केवळ मदनाचा पुतळाच असा एक ऋषिकुमार आपल्या एका मित्रासह फिरत असलेला माझ्या दृष्टीस पडला. आणि त्याच्या कर्णावर सुंदर पुष्पमंजिरीहि दृष्टीस पडली. ती पाहातांच, हा जो मधुर सुवास येत आहे तो हिचाच, असें मीं जाणलें. त्या कुमारास पाहिल्याबरोबर मला कांहींच सुचेनासें झालें ! त्याचीहि अवस्था तशीच झाल्यासारखी दिसली ! मग मीं त्याजवळ जाऊन त्याच्या मित्रास विचारलें कीं, हा मदनमूर्ति कोण ? व ही पुष्पमंजिरी कोणत्या वृक्षाची ? यावर त्यानें सर्व गोष्ट मला सांगितली. तेव्हां तो सुंदर ऋषिकुमार ह्मणाला, " हे सुंदरी ! तुला ह्या पुष्पमंजिरीची हौस वाटत असेल तर ही घे पाहिजे तर ! " असें ह्मणून त्यानें ती माझे कानावर ठेवली. त्या वेळीं त्याच्या हस्तस्पर्शानें माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले व माझ्या गालाच्या स्पर्शानें त्याचेंहि देहभान नाहींसें झालें आणि त्याच्या हातांतली रुद्राक्षमाळा गळून पडली ! हा शृंगाररसाचा प्रसंग आपल्या कवीनें फारच खुबीनें वर्णन केला आहे.

"इत्युक्तवति तस्मिन्स तपोधनयुवा किंचिदुपदर्शितस्मितो मामवादीत् । अयि कुतूहलिनि, किमनेन प्रश्नायासेन ? यदि रुचिः सुरभिपरिमला गृह्यतामियत् । इत्युक्त्वा समुपसृत्यात्मीयाच्छ्रवणादपनीय कलैरलिकुलक्वणितैः प्रारब्धरतिसमागमप्रार्थनामिव मदीये श्रवणपुटे तामकरोत् । मम तु तत्करतलस्पर्शलोभेन तत्क्षणमपरमिव पारिजातकुसुममवतंसस्थाने पुलकमासीत् । स च मत्कपोलस्पर्शसुखेन तरलीकृतांगुलिजालकात्करतलादक्षमालां लज्जया सह गलितामपि नाज्ञासीत् । अथाहं तामसंप्राप्तामेव भूतलमक्षमालां गृहीत्वा सलीलं तद्भुजपाशसंदानितकण्ठग्रहसुखमिवानुभवन्ती दर्शितापूर्वहारलतालीलां कण्ठाभरणतामनयम् ।

इत्थंभूते च व्यतिकरे छत्रग्राहिणी मामवोचत् । भर्तृदारिके, स्नाता देवी । प्रत्यासीदति गृहगमनकालः । तत्क्रियतां मज्जनविधिरिति । अहं तु तेन तस्या वचनेन नवग्रहा करिणीव प्रथमाङ्कुशपातेनानिच्छया कथंकथमपि समाकृष्यमाणा तन्मुखलावण्यामृतपङ्कमग्नामिव कपोलपुलककण्टकजालकलग्नामिव मदनशरशलाकाकीलितामिव

सौभाग्यगुणस्यूतामिवातिकृच्छ्रेण दृष्टिमाकृष्य स्नातुमुदचलम्। उच्चलितायां च मयि द्वितीयो मुनिदारकस्तथाविधं तस्य धैर्यस्खलितमालोक्य किंचित्प्रकटितप्रणयकोप इवाबादीत्।

सखे पुण्डरीक, नैतदनुरूपं भवतः। क्षुद्रजनक्षुण्ण एष मार्गः। धैर्यधना हि साधवः। किं यः कश्चित्प्राकृत इव विक्लवीभवन्तमात्मानं न रुणत्सि। कुतस्तवापूर्वोयमाद्येन्द्रियोपप्लवो येनास्येवं कृतः। क्व ते तद्धैर्यम्। कासाविन्द्रियजयः। क्व तद्वशित्वं चेतसः। क्व सा प्रशान्तिः। क्व तत्कुलक्रमागतं ब्रह्मचर्यम्। क्व सा सर्वविषयनिरुत्सुकता। क्व ते गुरूपदेशाः। क्व तानि श्रुतानि। क्व ता वैराग्यबुद्धयः। क्व तदुपभोगविद्वेषित्वम्। क्व सा सुखपराङ्मुखता। क्वासौ तपस्यभिनिवेशः। क्व सा भोगानामुपर्यरुचिः। क्व तद्यौवनानुशासनम्। सर्वथा निष्फला प्रज्ञा। निर्गुणो धर्मशास्त्राभ्यासः। निरर्थकः संस्कारः। निरुपकारको गुरूपदेशविवेकः। निष्प्रयोजना प्रबुद्धता। निष्कारणं ज्ञानम्। यदत्र भवादृशा अपि रागाभिषङ्गैः कलुषीक्रियन्ते प्रमादैश्चाभिभूयन्ते। कथं करतलाद्गलितामपहृतामक्षमालामपि न लक्षयसि। अहो विगतचेतनत्वम्। अपहृता नामेयम्। इदमपि तावदपह्रियमाणमनयानार्यया निवार्यतां हृदयम्।

इत्येवमभिधीयमानश्च तेन किंचिदुपजातलज्ज इव प्रत्यवादीत्। सखे कपिञ्जल किं मामन्यथा संभावयसि। नाहमेवमस्या दुर्विनीतकन्यकाया मर्षयाम्यक्षमालाग्रहणापराधमिमम्। इत्यभिधायालीककोपक्रान्तेन प्रयत्नविरचितभीषणभ्रुकुटिभूषणेन चुम्बनाभिलाषस्फुरिताधरेण मुखेन्दुना मामवदत्। चञ्चले प्रदेशादस्मादिमामक्षमालामदत्त्वा पदात्पदमपि न गन्तव्यमिति। तच्च श्रुत्वाहमात्मकंठादुन्मुच्य मकरध्वजलास्यारम्भलीलापुष्पाञ्जलिमेकावलीं भगवन्गृह्यतामक्षमालेति मन्मुखासक्तदृष्टेः शून्यहृदयस्यास्य प्रसारिते पाणौ निधाय स्वेदसलिलस्नातापि पुनः स्नातुमवातरम्। उत्थाय च कथमपि प्रयत्नेन निम्नगेव प्रतीपं नीयमाना सखीजनेन बलादम्बया सह तमेव चिन्तयन्ती स्वभवनमयासिषम्।"

यांत कामिजनांच्या परस्पर भेटीचा प्रसंग, वियोग होण्याच्या वेळची स्थिति, अशा वेळीं उपदेशाची व्यर्थता, मिथ्या कोप, देहभान नाहींसें होणें,

इत्यादि अनेक मनोवृत्ति कवीनें अगदीं हुबेहूब दाखविल्या आहेत ! हें प्रकरण फारच मोठें आहे. यांत शृंगार व करुण हे रस अगदीं ओथंबलेले असून सरळ परंतु वजनदार व सुंदर अशा भाषेंत चांगल्या रीतीनें दाखविले आहेत. यांत प्रसादगुण तर फारच चांगला साधला आहे.

पूर्वजन्मीचा स्मरणाभास. ' मनो हि तजन्मान्तरसंगतिज्ञम् '

हाच पुण्डरीक शापानें दुसऱ्या जन्मीं वैशंपायन होऊन चंद्रापीडाबरोबर ह्याच अच्छोदसरोवरावर कर्मधर्मसंयोगानें आला असतां त्यास हें स्थान व महाश्वेता यांचा पूर्वपरिचितासारखा भास होऊन वेड लागल्यासारखें झालें आहे ! ह्या वेळचा प्रसंग बाणपुत्र यानें कादंबरीच्या उत्तरार्धांत असाच हृदयद्रावक वर्णिला आहे. त्यांतील कांहीं भाग मासल्याकरितां खालीं दिला आहे. हा प्रसंग वाचला ह्मणजे ' मनो हि जन्मान्तरसंगतिज्ञम् ' ह्या महाकवीच्या वचनाची यथार्थताच वाटते ! व ' रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्पर्युत्सुकी भवति यत्सुखितोऽपि जन्तुः । तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि ' । ह्या कविकुलगुरूच्या उक्तीचेंहि स्मरण होतें !

"अन्यस्मिन्नहन्याहतायां प्रयाणभेर्यां सज्जीक्रियमाणे साधने प्रातरेवास्मान् वैशंपायनोऽभ्यधात् । अतिपुण्यं ह्यच्छोदसरः पुराणे श्रूयते । तदस्मिन्स्नात्वा प्रणम्य चास्यैव तीरभाजि सिद्धायतने भगवंतं भवानीप्रभुं महेश्वरं शशांकशकलशेखरं व्रजामः । दिव्यजनसेविता केन कदा पुनः स्वप्नेऽपि भूमिरियमालोकितेत्याभिधाय । चरणाभ्यामेवाच्छोदसरस्तीरमयासीत् ।

तत्र चातिरम्यतयैव सर्वतो दत्तदृष्टिः संचरन्नमरकामिनीश्रोत्रशिखरारोहणप्रणयोचितैस्तरंगानिलाहतिविलोलवृत्तिभिः किसलयैरविरलकुसुममकरंदलोभपुञ्जितानां च मत्तमधुलिहां मञ्जुना सिञ्जितरवेण दूरादाह्वयन्तमिव मरकतमणिश्यामया प्रभयानुलिंपन्तमिव समं दशदिग्भागानदत्तदिवसकरकिरणप्रवेशतया दिवाप्यन्तर्निशीथिनीमिव बिभ्राणं चिरपरिचितैरपि मेघोद्गमाशङ्कया मुहुर्मुहुरुन्मुक्तमधुरकेकारवैर्वनशिखण्डिभिरुत्कन्धरैरवलोक्यमानं पदमिव जलदकालस्य प्रतिपक्षमिव सर्वसंतापानां निजावासमिव जडिम्नः निर्गममार्गमिव सुरभिमासस्य आश्रयमिव मकरध्वजस्य उत्कण्ठाविनोदस्थानमिव रतेःआ-

स्पदमिव सर्वरमणीयानां अनवरतचलितसुरभिशीतलाच्छोदसरस्तरङ्गमारुताभिवीजिताभ्यन्तरशिलातलमन्यतमं तटलतामण्डपमद्राक्षीत् ।

दृष्ट्वा च तमतिचिरान्तरितदर्शनं भ्रातरमिव तनयमिव सुहृदमिव चानन्यदृष्टिर्विस्मितनिमेषेण चक्षुषा विलोकयन् स्तम्भित इव लिखित इवोत्कीर्ण इव पुस्तमय इव सुचिरमूर्ध्व एव स्थित्वापारयन्निवाङ्गानि धारयितुमाक्रम्यमाण इव मूर्च्छयोन्मुच्यमान इवेन्द्रियैर्झटित्युन्मुक्ताङ्गः समुपविश्य भूमौ किमप्यन्तरात्मना स्मरन्निवानुध्यायन्निव निर्विकारवदनो गलितलोचनपयोधारासंतानस्तूष्णीमधोमुखस्तस्थौ । तथावस्थितं तमवलोक्यास्माकमुदपादि चेतसि चिन्ता येन केनचिदपह्रियन्त एव रसिकहृदयाः परिणामधीरमतयोऽपि किं पुनः कुतूहलास्पदे प्रथमे वयसि वर्तमानाः । तस्मान्नियतमियमस्येमामतिमनोहरां भूमिमालोक्य भावयतो हृदयविकृतिरीदृशीजातेति । न चिराच्च तमेवमवदाम वयम् । दृष्टो दर्शनीयानामवधिरेषः । तदुत्तिष्ठ संप्रति निर्वर्तयामः स्नानविधिम् । अतिमहती वेला जाता । सज्जीभूतं साधनम् । प्रयाणाभिमुखः सकलः स्कन्धावारस्त्वां प्रतिपालयन्नास्ते किमद्यापि विलंबितेनेति सत्वेवमुक्तोप्यस्माभिरश्रुतास्मदालाप इव जड इव मूक इव अशिक्षित इव वक्तुं न किञ्चिदपि प्रत्युत्तरमदात् । तमेव केवलमानिमेषपक्ष्मणा निश्चलस्तब्धतारकेण संततास्रुस्रोतसा लिखितेनेव चक्षुषा लतामण्डपमालोकितवान् । ” इ.

पुण्डरीकाचा बाणभट्टानें व वैशंपायनाचा त्याच्या पुत्रानें शृंगार व करुणरसाचा प्रसंग वर्णन केला आहे. त्यांत पिता व पुत्र यांची सारखीच करामत दिसून येते ! हीं दोन्हीहि विस्तृत वर्णनें मूलग्रंथांत अवश्य पहावीं.

बौद्धभिक्षु दिवाकरमित्र याचें वर्णन व यांत अनेक शास्त्रें व पंथ यांची बौद्ध मतास सहानुभूति.

हर्षानें बौद्धभिक्षु दिवाकरमित्र यास पाहिलें त्या वेळचें त्याचें हें पुढील वर्णन आहे. ह्यावरून दिवाकरमित्राची थोर विद्वत्ता, तपःसामर्थ्य व शमादि गुण यांसंबंधानें फारच मोठी योग्यता होती. त्या वेळीं अनेक पंथ अस्तित्वांत होते व बौद्ध धर्माविषयीं इतरांची सहानुभूति असल्याचेंहि दिसून येतें.

“अथ तेषां तरूणां मध्ये नानादेशीयैः स्थानास्थानेषु स्थाणूनाश्रितैः शिलातलेषूपविष्टैर्लताभवनान्यध्यावसद्भिररण्यानीनिकुञ्जेषु निली-

नैर्विटपच्छायासु निषण्णैस्तरुमूलानि निषेवमाणैर्वीतरागैरार्हतैर्मस्करिभिः श्वेतपटैः पाण्डुरिभिर्भिक्षुभिर्भागवतैर्वर्णिभिः केशलुञ्चनैः कापिलैर्जैनैर्लौकायतिकैः काणादैरौपनिषदैरैश्वरकारणिकैः कारंधमिभिर्धर्मशास्त्रिभिः पौराणिकैः साप्ततन्तवैः शाब्दैः पाञ्चरात्रिकैरन्यैश्च स्वान्स्वान्सिद्धान्ताञ्शृण्वद्भिरभियुक्तैश्चिन्तयद्भिश्च प्रत्युच्चरद्भिश्च संशयानैश्च निश्चिन्वाद्भिश्च व्युत्पादयद्भिश्च विवदमानैश्चाभ्यस्यद्भिश्च व्याचक्षाणैश्च शिष्यतां प्रतिपन्नैर्दूरादेवावेद्यमानम् । अतिविनीतैः कपिभिरपि चैत्यकर्म कुर्वाणैस्त्रिसरणपरैः परमोपासकैः शुकैरपि शाक्यशासनकुशलैः कोशं समुपदिशद्भिः शिक्षापदोपदेशोपशमशालिनीभिः शारिकाभिरपि धर्मदेशनां दर्शयन्तीभिः अनवरतश्रवणगृहीतालोकैः कौशिकैरपि बोधिसत्वजातकानि जपद्भिः-र्जातसौगतशीलशीतलस्वभावैः शार्दूलैरप्यमांसाशिभिरुपास्यमानम् । आसनोपान्तोपविष्टविस्रब्धानेककेसरिशावकतया मुनिपरमेश्वरमकृत्रिम इव सिंहासने निषण्णं । उपशममिव पिबद्भिर्वनहरिणैर्जिव्हालताभिरुपलिह्यमानपादपल्लवम् । वामकरतलनिविष्टेन नीवारमश्नता पारावतपोतेन कर्णोत्पलेनेव प्रियां मैत्रीं प्रसादयन्तम् । इतर करकिसलय नखमयूखलेखाभिर्जनितजनव्यामोहमुद्ग्रीवम् मयूरं मरकतमणिकरकमिव वारिधाराभिः पूरयन्तम् । इतस्ततः पिपीलकश्रेणीनां श्यामाकतण्डुलकणान्स्वयमेव किरन्तम् । अरुणेन चीवरपटलेन म्रदीयसा संवीतम् । बहलबालातपानुलिप्तमिव पौरन्दरं दिग्भागमुल्लिखितपद्मरागप्रभाप्रतिमया रक्तावदातया देहप्रभया पाटलीकृतानां काषायग्रहणमिव दिशामप्युपदिशन्तम् । अनौद्धत्यादधोमुखेन मन्दमुकुलितकुमुदाकरेण स्निग्धधवलप्रसन्नेन चक्षुषा जनक्षुण्णक्षुद्रजन्तुजीवनार्थममृतमिव वर्षन्तम् । सर्वशास्त्राक्षरपरमाणुभिरिव निर्मितम् । परमसौगतमप्यवलोकितेश्वरम् । अस्खलितमपि तपसि लग्नम् । आलोकमिव यथावस्थितसकलपदार्थप्रकाशकम् । दर्शनार्थिनां सुगतस्याप्यभिगमनीयमिव' धर्मस्याप्याराधनीयमिव। प्रसादस्यापि प्रसादनीयमिव। मानस्यापि माननीयमिव । वन्द्यत्वस्यापि वन्दनीयमिव । जन्म जमस्य । नेमिं नियमस्य । तत्त्वं तपसः । शरीरं शौचस्य । कोशं कुशलस्य। वेश्म विश्वासस्य । सद्वृत्तं सद्वृत्ततायाः । दाक्ष्यं दाक्षिण्यस्य । पारं परानुकम्पायाः ।

निर्वृत्तिं सुखस्य। मध्यमे वयसि वर्तमानं दिवाकरमित्रमद्राक्षीत्। अतिप्रशान्तगम्भीराकारारोपितबहुमानश्च सादरं दूरादेव शिरसा मनसा वचसा च ववन्दे"।

यांत त्या वेळीं प्रचारांत असलेलीं अनेक शास्त्रें व पंथ कवीनें दाखविले आहेत.

दिवाकरमित्राच्या सौजन्याविषयीं हर्षाच्या मुखांतून फारच कळवळ्याचे उद्गार निघालेले आहेत !

"राजात्वचिन्तयत् 'अलोहः खलु संयमनपाशः सौजन्यमभिजातानाम्। स्थाने खलु तत्र भवान् गुणनुरागी ग्रहवर्मा बहुशो वर्णितवानस्य गुणान्' इति।"

राज्यश्रीच्या अनुकंपनीय स्थितीनें सत्पुरुष दिवाकरमित्रास गहिंवर.

हर्ष व त्याची बहीण राज्यश्री यांची भेट होऊन कांहीं वेळानें उभयतांचा शोक कमी झाल्यावर हर्षानें आपल्या बहिणीस दिवाकरमित्रास वंदन करण्यास सांगितलें; त्या वेळीं तिची स्थिति पाहून शमादिसंपन्न, विचारी व विद्वान् असा दिवाकरमित्र असतां त्यालाहि शोक आवरला नाहीं. मग इतर अज्ञाजनास तो आवरत नाहीं याचें काय नवल आहे !

"ततो नरेन्द्रो मन्दमन्दमब्रवीत्स्वसारम्–'वत्से वन्दस्वात्रभवन्तं भदन्तं एष ते भर्तुर्हृदयं द्वितीयमस्माकं च गुरुरिति'। राजवचनात्तु राजदुहितरि पतिपरिचयश्रवणोद्भूतेन पुनरानीतनेत्राम्भसि नमन्त्यामाचार्यः प्रयत्नरक्षितागतबाष्पाम्भः संभारभज्यमानधैर्यार्द्रलोचनः किंचित्परावृत्तनयनो दीर्घं निशश्वास। स्थित्वा च क्षणमेकं प्रदर्शितप्रश्रयो मृदुवादी मधुरया वाचा व्याजहार–'कल्याणराशेऽलं रुदित्वातिचिरम्। राजलोको नाद्यापि रोदनान्निवर्तते। क्रियतामवश्यकरणीयः स्नानविधिः स्नात्वा च गम्यतां तामेव भूयो भुवम्'।"

पतिमरणामुळें स्त्रीचे निराशेचे उद्गार.

पतिमरणानें तर कुलीन व दीन विधवांच्या तोंडावाटें कसे निराशेचे उद्गार निघतात, हें बाणभट्टानें पुढील लेखांत थोडक्यांतच पण मार्मिकपणानें दाखविलें आहे.

"लब्धविश्रम्भा राजश्रीस्ताम्बूलवाहिनीं पत्रलतामाहूयोपांशु किमपि कर्णमूले शनैरादिदेश। दर्शितविनया च पत्रलता पार्थिवं

व्यज्ञापयत् । ' देव, देवी विज्ञापयति । न स्मराम्यार्यस्य पुरः कदाचिदुच्चैर्वचनमपि कुतो विज्ञापनम् । इयं हि शुचामसह्यता व्यापारयन्ती हतदैवदत्तादेशा शिथिलयति विनयम् । अबलानां हि पतिरपत्यं वावलम्बनम् । उभयविकलानां तु दुःखानलेन्धनायमानं प्राणितमशालीनत्वमेव केवलम् । आर्यागमनेन च कृतोऽपि प्रतिहतो मरणप्रयत्नः । अतः काषायग्रहणाभ्यनुज्ञयानुगृह्यतामयमपुण्यभाजनं जन ' इति जनाधिपस्तु तदाकर्ण्य तूष्णीमेवावतिष्ठत । "

यावर दिवाकरमित्र म्हणालेः-बौद्धदीक्षा ही सर्व मनोज्वर नाहींशी करणारी आहे खरीच, परंतु सध्यां तुझ्या भावाच्या मनांत नाहीं तर त्याच्या इच्छेप्रमाणेंच वागावें. तुझा वडील भाऊ तुला सांगेल तसेंच ऐकावें, तो राजा असून तुला पित्यासमान व पूज्य आहे. याकरितां त्याच्या इच्छेप्रमाणेंच वागणें योग्य आहे. अशा अर्थाचा पुढील लेख आहे.

" अपि च दूरगतेऽपि हि शोके नन्विदानीमपेक्षणीय एवायं ज्येष्ठः पितृकल्पो भ्राता भवत्या गुरुः । इतरथा को न बहु मन्येत कल्याणरूपमीदृशं संकल्पमत्रभवत्याः काषायग्रहणकृतम् । अखिलमनोज्वरप्रशमनकारणं हि भगवती प्रव्रज्या । ज्यायः खल्विदं पदमात्मवताम् । महाभागस्तु भिनत्ति मनोरथमधुना । यदयमादिशति तदेवानुष्ठेयम् । यदि भ्रातेति यदि ज्येष्ठ इति यदि वत्सल इति यदि गुणवानिति यदि राजेति सर्वथा स्थातव्यमस्य नियोग इत्युक्त्वा व्यरंसीत् । "

भीर

भोर

## बाणाच्या ग्रंथांतील नानाविध चमत्कारवाक्यांचे मासले.

स्वभावोक्ति, लोकोक्ति व प्रचारांतील अनुभविक गोष्टी यांच्या संबंधानें हर्षचरितांत प्रसंगानुसार वाक्यें आढळलीं त्यांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत.

“विशुद्ध्याहि धिया पश्यन्ति कृतबुद्धयः सर्वानर्थानसतः सतो वा ।
सहजस्नेहपाशग्रन्थिबंधनाश्च बांधवभूता दुस्त्यजा जन्मभूमयः ।
लोके हि लोहेभ्यः कठिणतराः खलु स्नेहपाशाः ।
भर्तृचित्तानुवर्तिन्यश्चानुजीविनां प्रवृत्तयः ।
अतिरोषणश्चक्षुष्मानन्ध एव जनः ।
न हि कोपकलुषिता विमृशति मतिः कर्तव्यमकर्तव्यं वा ।
सर्वमक्षिणी निमील्य सोढव्यं मूढेन मर्त्यधर्मणा ।
अलोहः खलु संयमनपाशः सौजन्यमभिजातानाम् ।
दारयति दारुणः क्रकचपात इव हृदयं संस्तुतजनविरहः
सर्वथा लूतातन्तुछटाछिद्रुरास्तुच्छाः प्रीतयः प्राणिनाम् ।
प्रायशश्च जनस्य जनयति सुहृदपि दृष्टो भृशमाश्वासनम् ।
तथापि गृहगतैरनुगंतव्या एत लोकवृत्तयः ।
नास्ति जीवितादन्यदभिमततरं इह जगति जन्तूनाम् ।
निसर्गस्वैरिणी स्वरुच्यनुरोधिनीच भवति हि महतां मतिः ।
अबलानां हि पतिरपत्यं वावलंबनम् । उभयविकलानां तु दुःखानलेन्धनायमानंच प्राणितमशालीनत्वमेव केवलम् ।
केवलं कृपाकृतविशेषः सुदूरेण तनयस्नेहादतिरिच्यते दुहितृस्नेहः । ” इ०

आपल्या कवीच्या ग्रंथांत श्लेषप्रचुरता प्रायः सर्वत्र आढळून येते. त्यांत कांहीं कांहीं श्लेष फारच खुबीदार असल्याचें आढळून येतें जसें:—

‘ मूर्च्छामिव मनोहारिणीम् । धरणीधारणायाधुना त्वं शेषः । नूनं नानेन मूढेन मधुरस्वादलुब्धेन मधिवार्यजीवितमाकर्षता भावी दृष्टः शिलीमुखसंपातोपद्रवः । संपत्कणिकामपि प्राप्य तुलेव लघुप्रकृतिरुन्नतिमायाति । न ह्ययमरातिरक्तचन्दनचर्चाशिशिरोपचार-



21 MAR 1990

मन्तरेण शाम्यति परिभवानलपच्यमानदेहस्य देवस्य दुःखदाहज्वरः सुदारुणः ।'

परंतु कचित्ठिकाणचे श्लेष मनास प्रशस्त वाटत नाहींत.

कादंबरींत-

'पुष्पवत्यपि पवित्रा ।
स्तनस्पर्शोहोमधेनुषु न कामिनीषु ।
निष्फलपुष्पदर्शनमंतःपुरमभूत् । '

कवि हे आपल्या वर्णनचातुर्यानें वाचकांच्या दृष्टीपुढें सृष्टींतील देखाव्यांचीं हुबेहूब चित्रें उभीं करतात. तशीं चितार्‍यांस देखील यावयाचीं नाहींत! मासल्याकरितां पुढें थोडीं उदाहरणें दिलीं आहेत. व यांत खुबीदार शृंगाररसहि भरलेला आहे.

"आकाशकमलिनीमिव स्वच्छाम्बरदृश्यमानमृणालकोमलोरुमूलाम्। अन्तः प्रविष्ट चन्द्रापीडस्पर्शलोभेनैव निपपात हृदये हस्तः स एव स्तनावरणव्याजो बभूव ।

संभ्रमच्युतोत्तरीयका हारकिरणानुरासि कर्तुमिच्छन्ती ।

मद्विलोकिता च धवलेन स्मिता लोकेन दुकूलेनैव लज्जयात्मानमावृणोति ।

अथाव्यक्तस्मितच्छुरितकपोलाधरलोचना लज्जया दशनांशुजालकव्याजेनांशुकेनेव मुखमाच्छादयन्ती । '

पहिल्या विशेषणांत तर पाश्चात्य व तदनुयायी यांच्या टेबलांवर विद्यमान असणार्‍या संभावित प्रतिमांची हुबेहूब अनुकृति उमटलेली आहे! फरक इतकाच कीं येथें वस्त्राचा आड पडदा तरी आहे! पाश्चात्यांच्या चित्रांत तर तो बराच वर व एकीकडे सारलेला असतो! बाकीच्यांत स्तनावरण करणें, लाजून पदर घेणें, वगैरे प्रकारच्या शृंगार चेष्टा कवीनें दर्शविल्या आहेत, त्या शृंगाररसास अनुरूपच आहेत!

---

# बाणकवीच्या पद्यांचे मासले.

आतां बाणकवीच्या पद्यरचनेचा मासला पुढें दाखल केला आहे.

**सुभाषितशार्ङ्गधरपद्धति**, जल्हणदेवाची **सूक्तिमुक्तावलि** व **वल्लभदेवाची सुभाषितावली** या सर्वांत मिळून **बाणभट्टाच्या** नांवावर निरनिराळ्या रसांतलीं सुमारें तीस चाळीस पद्यें आढळतात. त्यांतील सात आठ पद्यें **हर्षचरितांतलीं**, तीन चार **कादंबरींतलीं** आणि दोन तीन **चंडिकाशतकांतलीं** आहेत. बाकीचीं त्याच्या कोणत्या ग्रंथांतलीं आहेत हें समजत नाहीं. यावरून त्याचे आणखी ग्रंथ असलेच पाहिजेत. असें उघड दिसतें. परंतु ते अद्याप उपलब्ध नाहींत व पुढेंहि ते उपलब्ध होतील किंवा नाहींत, याविषयीं देखील निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं! **बाणभट्ट** हा केवळ गद्यरचनेंतच प्रवीण होता असें नाहीं, तर तो पद्यरचनेंतहि होता, याकरितां पुढें त्याच्या अनेक ग्रंथांतलीं कांहीं पद्यें दिलीं आहेत, त्यावरून या गोष्टीची यथार्थता लक्षांत येईल. तथापि संपूर्ण ग्रंथ वाचण्यांत आला ह्मणजे जसा त्या त्या रसांचा अनुभविक परिपाक वाचकांच्या अंतःकरणांत उतरतो, तसा मधलेंच एकादें दुसरें पद्य वाचून उतरत नाहीं! पुढील पद्यांत वाचकांस अनेक प्रसंगांतील अनेक प्रकारचे थोडे थोडे रस ग्रहण करण्यास सापडतील, व त्यामुळें बाणाच्या पद्यरचनेच्या मासल्याचा बराच आस्वाद घेण्यास सापडेल! तशीच कवीच्या भाषाप्रवाहाची सर्वत्र सारखीच प्रौढता असते असेंच केवळ ह्मणतां येणार नाहीं, हेंहि लक्षांत येईल! आणि त्याचे श्रृंगार, वीर करुण इत्यादि रसांवर अनेक ग्रंथ असावे अशाबद्दलहि खात्री होईल. पुढें दिलेल्या पद्यांत कांहीं कांहीं पद्यें फारच सरस असल्याबद्दल व तीं अनेक ठिकाणचीं असल्याबद्दल सहृदय विद्वानांच्या लक्षांत येईल.

"×हरकण्ठग्रहानन्दमीलिताक्षीं नमाम्युमाम्
कालकूटविषस्पर्शजातमूर्छागमामिव ।

---

× पहिलीं पांच पद्यें हर्षचरित्रांतील आहेत, यांतील तिसरें पद्य काव्यप्रकाशांत मम्मटभट्टानें स्वभावोक्तिअलंकाराचे उदाहरणाकरितां घेतलें आहे,

अरुण इव पुरःसरो रवेः पवन इवातिजवो जलागमम् ।
शुभमशुभमथापि वा नृणां कथयति पूर्तनिदर्शनोदयः ।
पश्चादङ्घ्री प्रसार्य त्रिकनतिविततं द्राघयित्वाङ्गमुच्चै-
रासज्याभुग्नकण्ठो मुखमुरसि सटां धूलिधूम्रां विधूय ।
घासग्रासाभिलाषादनवरतचलत्प्रोथतुण्डस्तुरङ्गो ।
मन्दं शब्दायमानो विलिखति शयनादुत्थितः क्ष्मां खुरेण ॥
*विश्रब्धघातदोषः स्ववधाय खलस्य वीरकोपकरः ।
नवतरुभङ्गध्वनिरिव हरिनिद्रातस्करः करिणः ।
नियतिर्विधाय पुंसां प्रथमं सुखमुपरि दारुणं दुःखं ।
कृत्वालोकं तरला तडिदिव वज्रं निपातयति ।
×कटु क्वणन्तो मलदायकाः खलास्तुदन्त्यलं बन्धनशृङ्खला इव ।
मनस्तु साधुध्वनिभिः पदे पदे हरन्ति सन्तो मणिनूपुरा इव ।
*निद्राणे रुद्रवृन्दे सवितरि तरले वज्रिणि ध्वस्तवज्रे ।
जाताशंके शशांके विरमति मरुति त्यक्तवैरे कुबेरे ।
वैकुण्ठे कुण्ठितास्त्रे महिषमतिरुषं पौरुषोपघ्ननिघ्नं ।
निर्विघ्नं निघ्नती वः शमयतु दुरितं भूरिभावा भवानी ।"

ऋतूंच्या स्वाभाविक वर्णनाबद्दल बाणकवीच्या नांवावर कांहीं पद्यें आढळतात. त्यांतील तीनच ऋतूंच्या वर्णनांचीं पद्यें खालीं दिलीं आहेत.

"* सर्वाशारुधि दग्धवीरुधि सदा सारङ्गबद्धक्रुधि ।
क्षामक्ष्मारुहि मन्दमुन्मधुलिहि स्वच्छन्दकुन्दद्रुहि ।
शुष्यत्स्रोतसि तप्तभूरिरजसि ज्वालायमानार्णसि ।
ज्येष्ठे मासि खरार्कतेजसि कथं पान्थ व्रजन्जीवसि ।
नृत्यद्बर्हिपि दर्दुरारवपुषि प्रक्षीणपान्थायुषि ।

---

* हें पद्य कुवलयानंदांत अर्थांतरन्यासालंकाराचे उदाहरणाकरितां घेतलें आहे,

× हें पद्य कादंबरींतलें आहे. ह्या एका पद्यांतच दुर्जन व सज्जन यांचें स्वाभाविक वर्णन समर्पक उपमा देऊन केलें आहे.

* हें पद्य चण्डिकाशतकांतलें आहे. हें सरस्वतीकण्ठाभरणांत भोजराजानें वर्णानुप्रासाचें उदाहरण घेतलें आहे.

* सरस्वतीकण्ठाभरणांत भोजराजानें हें यमकच्छायानुकारी चित्र व शब्दार्थालंकारसंकर यांचें उदाहरण घेतलें आहे.

श्वोतद्विमुषि चन्द्ररुङ्मुषि सखे हंसद्विषि प्रावृषि ।
मामुश्वोच्चकुचाग्रसंततपतद्बाष्पाकुलां बालिकाम्
काले कालकरालनीलजलदव्यालुप्तभास्वत्त्विषि ॥
बभूव गाढसंतापा मृणालवलयोज्ज्वला ।
उल्केव चन्दनापांडुघनस्तनवती शरत् ॥
अन्योन्याहतिदन्तनादमुखरं प्रव्हं मुखं कुर्वता ।
नेत्रे साश्रुकणे निमील्य पुलकव्यासंगि कण्डूयता ।
हा हा हेति सुनिष्ठुरं विवदता बाहू प्रसार्य क्षणम्
पुण्याग्निः पथिकेन पीयत इव ज्वालाहतमश्रुणा ॥
द्वारं गृहस्य पिहितं शयनस्य पार्श्वे-
वन्हिर्ज्वलत्युपरि तूलपटो गरीयान् ।
अङ्केऽनुकूलमनुरागवशात्कलत्रम्-
नित्यं करोति किमसौ स्वपतस्तुषारः ।"

आणखी निरनिराळ्या प्रसंगींचीं पद्यें त्याच्या नांवावर आहेत. त्यापैकीं कांहीं पुढें दिलीं आहेत.

"मृत्युः शरीरगोप्तारं वसुरक्षं वसुंधरा ।
दुश्चारिणीव हसति स्वपतिं पुत्रलालनात् ॥
दुःखानि संदिशन्त्यास्तस्याः कण्ठं मुहुर्मुहुर्बाष्पः
स्वल्पावशेषजीवितनिर्वाणभियैव निरुणद्धि ॥
वियोगिनी चंदनपङ्कपाण्डुर्मृणालिकाहारनिबद्धजीवा ।
बाला चलाम्भःकणदन्तुरेषु हंसीव शिश्ये नलिनीदलेषु ॥
पततु तवोरसि सततं दयिताधम्मिल्लमल्लिकानिकरः ।
रतिरसरभसकचग्रहलुलितालकवल्लरीगलितः ॥
सन्मार्गे तावदास्ते प्रभवति पुरुषस्तावदेवेन्द्रियाणां ।
लज्जां तावद्विधत्ते विनयमपि समालंबते तावदेव ।
भ्रूचापाकृष्टमुक्ताः श्रवणपथजुषो नीलपक्ष्माण एते-
यावल्लीलावतीनां हृदि न धृतिमुषो दृष्टिबाणाः पतन्ति ॥
नाधन्यानां निवासं विदधति गिरयः शेखरीभूतचन्द्राः ।
शृङ्गैर्ज्योत्स्नाप्रवाहैर्द्रुतमिव तुहिनं दिङ्मुखेषु क्षिपन्तः ।
येषामुच्चैस्तरूणामविहतगतिना वायुना कम्पिताना-

माकाशे विप्रकीर्णः कुसुमचय इवाभाति ताराग्रहौघः ॥
स्वेच्छारम्यं लुठित्वा पितुरुरसि चिताभस्मधूलीसिताङ्गो ।
गङ्गावारिण्यगाधे झटिति पृथुजटाजूटतो दत्तझंपः ।
सद्यः सीत्कारकारी जलजडिभरणदन्तपङ्क्तिर्गुहो वः
कम्पी पायादपायाज्ज्वलितशिखिशिखे चक्षुषि न्यस्तहस्तः ॥
घ्रात्वा श्रोणीमजाया विततमभिमुखं नाससंकोचभंगम् ।
स्थित्वा सूर्यं निरीक्ष्य प्रविकसितसटो घट्टयन्क्ष्मां खुरेण ।
ल्लोल्लोकारान्प्रकुर्वन्मणिशकलनिभं चालयन्नेत्रयुग्मं ।
छागश्चाटूननेकांश्चतुर इव विटो मन्मथान्धः करोति ॥
*वक्त्राम्भोजं सरस्वत्याधिवसति सदा शोण एवाधरस्ते ।
बाहुः काकुत्स्थवीर्यस्मृतिकरणपटुर्दक्षिणस्ते समुद्रः ।
वाहिन्यः पार्श्वमेताः सुचिरपरिचिता नैवमुञ्चत्यभीक्ष्णं ।
स्वच्छेऽन्तर्मानसेऽस्मिन्कथमवनिपते तेऽम्बुपानाभिलाषः ॥ ”

बाणभट्ट.

हा श्लोकहि हर्षराजास उद्देशूनच बाणकवीनें केला आहेसें वाटतें. यांतील श्लेषहि खुबीदार आहेत.

समस्यापूरणाचेंहि एक उदाहरण बाणभट्टाच्या नांवावर सुभाषित-शार्ङ्गधरपद्धतींत आढळलें, तें असें--

‘ दामोदरकराघातविव्हलीकृतचेतसा ।
दृष्टं चाणूरमल्लेन शतचन्द्रं नभस्तलम् । ’

ह्या अनेक प्रसंगींच्या त्याच्या नांवावर ग्रंथकारांनीं दाखल केलेल्या पद्यां-वरून त्याचे आणखी गद्यपद्यमय ( नाटकें इ० ) व पद्यमय ग्रंथ असले पाहिजेत, असें खात्रीनें वाटतें. इतक्या कवितेवरून देखील पद्यरचनेंत त्याची बरीच निपुणता असल्याचें लक्ष्यांत येण्याजोगें आहे.

याप्रमाणें निबंधांतील विषयांचें यथामति विवेचन केलें आहे. तथापि “ सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु ” अशी विद्वज्जनांस प्रार्थना करून हा निबंध पुरा करतों.

---

* हर्षराजाचे मुखांत नित्य सरस्वतीवास असल्याबद्दल या पद्यांतहि बाणानें उल्लेख केला आहे. शिवाय अर्थांतराकरितां नदी हा अर्थ श्लेषानें आहेच !

# त्या काळच्या चालीरीती वगैरे.

**बाणाच्या ग्रंथांत** जी त्या काळच्या रीतीभातीची वगैरे माहिती आढळते ती खालीं दिली आहेः--

त्याकाळीं जिकडे तिकडे वेदशास्त्रादिकांचीं अध्ययनें चालू होतीं व **श्रौत, स्मार्त, सांख्य, योग, पुराणें, बौद्ध, जैन, पाशुपत, चार्वाक** इत्यादि पंथ चालू असल्याचें आढळतें. वेदाभ्यासानें पवित्रता येते अशी समजूत होती. **कादंबरी, सरस्वती** इत्यादि स्त्रियांच्या वर्णनांत भस्म, त्रिपुंड व ब्रह्मसूत्र यांचें वर्णन आढळतें. अग्निहोत्र, रुद्राक्षधारण, व मुद्राबंध, स्फाटिककुंडलें यांचेंहि वर्णन आहे. संध्योपासना व तृतीयवसनावर (मोठ्यानें) वेदपठण करण्याची चाल होती. तिलतर्पण व पितृपिंडयज्ञ होत होतें. ग्रहणकालीं सूतक ( विटाळ ) धरण्याची चाल होती. बौद्धधर्माचा प्रचार बराच होता. व्यायाम करून शरीर सुदृढ राखण्याची चाल होती. व्यायामशाळाहि होत्या. सरदार घोड्यावर बसून जात असतां डोक्यावर छत्र असून दोन्ही बाजूंस चवऱ्या वारीत सेवक धावत चालत असल्याबद्दल आढळतें. स्त्रियांनां लज्जा हेंच भूषण असून त्या होऊन पुरुषांशीं बोलणें दांडगेपणा समजत असत ! मुलगी प्रथम गरोदर असतां तिला प्रसूतीकरितां माहेरीं आणीत असत. **चिनीवस्त्रांची** प्रसिद्धि फार होती. तीं वस्त्रें सापाच्या कातीसारखीं हलकीं असत. यज्ञांत पुरोडाशाकरितां साळ्याच्या तांदुळांचा उपयोग करीत असत. पुष्कळ ब्राह्मण श्रौतस्मार्त यज्ञायाग करणारे, निर्मत्सर व सदाचारसंपन्न असल्याचें आढळतें. शिष्य गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करीत असत. राजे व त्यांच्या सेवकांत चोळणा वालण्याचाहि प्रचार होता. सेवकांनीं पत्रें कपाळावर बांधून जाण्याची व येण्याची रीत असे, व त्याप्रमाणें तीं दृष्टीस पडलीं नाहींत तर अपघात समजत. शिवपूजन, दुग्धाभिषेक, रुद्रैकादशी बिल्वार्पण, मंत्रपूजा, संहिता, जप वगैरे असल्याचें व मंत्र, तंत्र, जारण, मारण, वशीकरण वगैरे असल्याचेंहि लक्षांत येतें. स्वामीचा कोप शांत व्हावा म्हणून खड्ग गळ्यांत बांधून जाण्याची चाल असावी असें वाटतें. बौद्ध, विप्र, संन्यासी व ब्रह्मचारी हे राजाच्या येथें व सत्पुरुषाच्या आश्रमांत वास

करीत असल्याचें आढळतें. घोड्यांस लगाम व खोगीर असत. नक्षत्रमाला होत्या. राजाजवळ सेवेकरितां वारविलासिनी ( वेश्या ) असत. राजेलोकांत गोरोचनाचा तिलक व त्याचीच अंगास उटी लावण्याची चाल होती; व वस्त्राच्या दोन्ही बाजूंस कांठाला गोरोचनेचे वेल, पक्षी वगैरे काढीत असल्याचें आढळतें. यावरून त्या वेळीं रेशमादिकांचे कांठ वस्त्रास घालण्याची सुधारणा झाली नव्हती असें दिसतें ! अंगास तेल व आंवळकठी लावण्याची चाल होती. तांबूलसेवनाचा व तांबूल देण्याचाहि फार शिष्टाचार होता. व्यासपीठावर पुस्तक ठेवून त्या कालापासून आतांपर्यंत पुराण सांगण्याची चाल होती तशीच आहे. सांगवेदाचें अध्ययनहि पुष्कळ होतें. शेणानें सारवण्याची चाल होती. मंतरलेले दोरे, लोखंडाचें कडें हातांत घालणें, वगैरे तांत्रिक प्रकार होते. पायांत खडावा घालण्याची चाल होती. प्रसाद व भेट ह्मणून श्रीफळ ( नारळ ? ) देण्याची रीत होती. भूत, प्रेत, वेताळ, शकुन यांवर विश्वास होता. गुग्गुलधूप लावण्याची चाल असे. सूर्योपासना, अर्घ्यप्रदान, **आदित्यहृदयाचा** पाठ, वगैरे होते. मुलांच्या व मात्रिकांच्या डोक्यांत बाधा होऊं नये ह्मणून पांढऱ्या मोहऱ्या ठेवण्याची चाल होती. मुलांच्या गळ्यांत सुवर्णघटित वाघनखें घालण्याची रीत होती. लग्नाचे वेळीं उखळ, मुसळ, जातें यांस रंग लावून अलंकृत करण्याची चाल होती. हळदीचीं वगैरे पांच बोटें जमिनीवर रांगोळीसारखीं उमटविण्याचा प्रघात होता. विवाहांत **इंद्रायणी**देवतेचें पूजन होतें. 'बहुलें' होतें. शिडीवर चढून कुंचलीनें चुना देण्याचा प्रघात होता. ज्योतिषी यांनीं लग्नघटिका ठेवण्याची चाल होती. लग्नांत सोनार बाहेरच्या देवडीवर अलंकार घडवीत बसत असल्याचें आढळून येतें. चित्रें काढणें मातीचीं चित्रें करून मांडणें, आम्रादिकांचे पल्लव टांगणें, सुवासिनीस्त्रियांनीं वधूवरांचीं नांवें घेऊन गाणीं ह्मणणें गळ्यांतील ग्रंथियुक्त सूत्र रंगविणें, कलश रंगविणें, वैवाहिक कंकण रंगविणें, मुंडावळ घालणें वगैरे, व छत, झालर, मंगल वाद्यें हीं सर्व त्या वेळीं होतीं. लग्नांत विडे वांटणें व सुवासिक द्रव्यें देण्याचा परिपाठ होता. आनंदोत्सवांत अश्लील रास ह्मणत असत. राजस्त्रिया आनंदभरांत नाचत असत. सुवासिनी सिंदुराची टिकली ( सिंदूर-कुंकुम ! ) कपाळीं लावीत असत. रेशमी वस्त्रें, श्वासोच्छ्वासानें उडण्या इतकीं तलम होतीं. रंगविलेल्या वस्त्रानें वधूनें आपणास झाकून घेण्याची चाल होती. अष्टांग आयुर्वेदाचें अध्ययन

होत असे. पतिमरणापूर्वी राजस्त्रियांमध्यें विरहदुःख टाळण्याकरितां आपणांस दग्ध करून घेण्याची चाल होती. याविषयीं हर्षाच्या आईचेंच उदाहरण आहे. शोकानें हृदयताडन करण्याची रीत राजाच्या येथें दिसून येते. आनंदोत्सवाचे वेळीं सिंदूर ( गुलाल ? ) उधळण्याची व हत्तीच्या गंडस्थळावर तो घालण्याची चाल होती. विधवा ह्या शुभ्र वस्त्रें नेसत असल्याचें आढळतें. आकाशांत संचार करण्यासारखें साधन ( विमान ) होतें. प्रयाणकालीं वेदपठण करण्याची चाल होती. जितके कोस राजाची स्वारी जावयाची असेल तितके वेळ प्रयाणाच्या पूर्वी नौबदीवर ठोके मारण्याची चाल होती व यावरून हर्षाच्या राज्यांत कोस वगैरे समजण्याचें साधन होतें असें दिसतें. प्रयाणकालीं नौबत, शंख व कर्णा वाजवीत असत. सैन्यांत व्यूहरचना होती. सुभाषित पुस्तकें नजर करण्याची रीत होती. कारण ब्रह्मदेशच्या राजानें हर्षास केलेल्या नजराण्यांत सुभाषित पुस्तकें नजर केल्याचा उल्लेख आहे. बाणाच्या घरीं श्रौत, व्याकरण, तर्क (न्याय), मीमांसा, साहित्यशास्त्र, काव्यें यांचे अभ्यास सतत चालू असल्याचें वर्णन आहे. वेद अपौरुषेय आहेत असें त्या वेळींहि मानीत असत. टोणग्याचे पाठीवर बसून गाणें गात गुराखी गुरें राखीत असल्याचें आढळतें. मनोरथ पूर्ण व्हावे ह्मणून राजस्त्रिया स्वतः देवळें सारविण्याचें व देवास बळी देण्याकरितां स्वतः तांदूळ कांडीत असल्याचें व पुष्पमाला गुंफित असल्याचें वर्णन आहे. घोर मंत्रसाधनाकरितां व्याघ्राजिनावर बसून जप करण्याची व अनेक औषधें अंगावर धारण करण्याची चाल असे. योगपट्ट धारण करीत असत व पादुका घालीत असत. मांत्रिक प्रकार चालले असतां गुग्गुळ, धूप पेटविण्याची व पांढऱ्या मोहऱ्या फेंकण्याची चाल होती. खड्गास तेल लावून साफ करण्याचा, पर्वकालीं व युद्धास निघते वेळीं त्याचें पूजन करण्याचा प्रघात होता. धनुष्य. बाण, खड्ग, भाला, व हत्ती, घोडे यांचा युद्धांत उपयोग करीत असत. जुने आवळे, म्हाळुंग, द्राक्षें, डाळिंबें वगैरे शोषनाशक फळें दुखणाइतास बेतानें देण्याचा प्रघात होता. शोक दूर होण्याकरितां पुराणिकांनीं वगैरे उदाहरणें सांगून उपदेश करण्याची चाल होती. ब्राह्मणांनां गोप्रदानें, भूमिदानें, सुवर्णदानें वगैरे देण्याचा परिपाठ होता. मृताच्या उद्देशानें वस्त्रें, पात्रें, शस्त्रें, छत्रें, इ० अनेक दानें व त्यानें वापरलेल्या वस्तू देण्याची, तीर्थांत अस्थि टाकण्याची व राजा वगैरे थोर पुरुषांच्या दहनस्थलीं चुना, पाषाण इत्यादिकांनीं बांधून स्मारक करण्याची

चाल होती. लवकर बातमी पोंहचविण्याकरितां सांडणीस्वाराबरोबर जरूरीची पत्रें पाठविण्याचा प्रघात होता. पाटील, कुलकर्णी होते. ओवाळून टाकण्याची चाल होती. शकुनावर भरवसा होता. नवस होते. आख्यानें, अख्यायिका, इतिहास, व पुराणें यांचा उल्लेख आढळतो. राजाजवळ परंपरागत आलेले विद्वान्, नीतिज्ञ, व निष्कपटी असे प्रधानादिक असत. दासीच्या हातांत खड्ग असल्याचें आढळतें. "जयजयकार असो" "नजर रखो" असा म्हणण्याचा व अवधान देण्याविषयीं सुचविण्याचा परिपाठ असे. चक्रवर्ती राजाजवळ प्रेमळ, विद्यासंपन्न, जीवास जीव देणारे, व इंगित जाणणारे मांडलिक राजे असत. इतिहास, पुराणें वाचणाऱ्या स्त्रियाहि असल्याचें आढळतें. स्त्रियांनीं पायांस अळता लावण्याची चाल असे. स्नान करण्याकरितां त्यावेळीं पिपासारखें किंवा नौकेसारखें पात्र असल्याचें आढळतें. चांडालादिकांस स्पर्श न करण्याचा व दूर असूं देण्याचा प्रघात होता. द्रव्य व्याजीं लावण्याची पद्धत होती. कस्तुरी, कापुर, केशर यांची उटी लावण्याची चाल होती. राजे लोकांत विडी ओढण्याची चाल होती ! स्त्रियांनीं अगरूची व कस्तुरीची काळी टिकली लावण्याची रीत होती. राजपुरुष व स्त्रिया यांजबरोबर तांबूलाचा करंडा बाळगणारी परिचारिका असे. चिगारी धरण्याची चाल होती. चवऱ्या ढाळणें, तैलादिक लावणें, स्नान घालणें, अंग रगडणें इत्यादि कामें राजाच्या येथें वेश्या करीत असल्याचें वर्णन आढळतें. देवतेस रक्तानें स्नान घालण्याचा हीनजातींत प्रघात होतासें दिसतें. '**मषीमलिनान्यक्षराणि,**' यावरून शाई होती. प्राणायाम, अघमर्षणें करीत असत. विधवा भूषणें घालीत नसत. जागजागीं अग्निहोत्रें व श्रौताचे पाठ चालू असत. शिव, सूर्य, देवी, यांच्या आराधनेचा प्रचार फार होता. विष्णु, ब्रह्मदेव, यांच्या पूजेचाहि उल्लेख आहे. चतुर्मुखशिवाचें वर्णन आढळतें. रुद्राक्षमाला, रुद्राक्षवलयें घालण्याचा प्रघात होता. पुत्र पित्याची मर्यादा राखीत असत. सूर्यास रक्तचंदन व रक्तकमलें व कण्हेरीचीं पुष्पें वाहण्याचा धार्मिक प्रघात होता. जन्मांतराची कल्पना होती. ऋषी पांघरण्याकरितां कृष्णाजिनें घेत. दैवावर भरवसा होता. गुरु, देव, व साधु यांची भक्ति केली असतां फलप्राप्ति होते अशी भावना होती. भागीरथीतीर्थयात्रा करण्याची चाल होती. पुत्रावांचून राज्यादिक निष्फळ अशी समजूत होती. स्वधर्माचरणानें

कल्याण होतें असा भरवसा होता. व्रतें व उपोषणें करण्याचा पाठ असे, व त्यावेळीं स्त्रियांनीं शुभ्र पातळें नेसण्याची चाल होती. संततीकरितां अनेक मांत्रिक उपचार करण्याचीहि चाल होती. वेळ समजण्याकरितां वाळूचीं किंवा पाण्याचीं गळणारीं यंत्रें होतीं. किंवा छाया मोजून वेळ निश्चित करीत असत. संततीकरितां अश्वत्थादिक पवित्र वृक्षांची पूजा करून, प्रदक्षिणा घालण्याची चालहि त्या वेळेपासून आतांपर्यंत चालू आहे. अपूप इत्यादि पक्कान्नें व मांसादिकांचा देवतांना बळी देणें, काकपक्ष्यांनां दध्योदनाचा बली अर्पण करणें, चवाठ्यावर बळी ठेवणें, स्वप्नांचीं फलें विचारणें इत्यादि अनेक चाली त्यावेळीं असल्याचें वर्णन आढळून येतें. बाळंतिणीच्या गृहांत दाराच्या दोन बाजूंस कलश ठेवण्याची, त्या ठिकाणीं बाहुल्या व पल्लव टांगण्याची, नांगर व मुसळ ठेवण्याची, शुभ्र पुष्पांनीं मिश्रित अशा दूर्वांच्या माळा टांगण्याची, व्याघ्रचर्म व घंटा टांकण्याची, हळदीनें पिवळें केलेलें वस्त्र नेसवून षष्ठी देवीची प्रतिमा ठेवण्याची, व षष्ठीजागरण करण्याची चाल होती. हातांत शक्ति घेतलेल्या स्वामी कार्तिकाची मूर्ति, व तांबड्या रंगानें सूर्य, चंद्र काढण्याची चाल असून तेथें सुवासिनी स्त्रिया असण्याची चाल होती. तसेंच बाळंतिणीजवळ वृद्ध स्त्रिया बसून मंगलगीतें ह्मणण्याची चाल होती. बाळंतिणीच्या दाराजवळ गंध लावलेले व पुष्पांच्या माळा घातलेले बोकड बांधून ठेवण्याची चाल होती, घृतामिश्रित सर्पाच्या कातीं व मेंढ्यांच्या शिंगांचें चूर्ण यांचा धूप करण्याची, विस्तवांत निंबाचे डाहळे जाळण्याची, ब्राह्मण शांतिपाठ ह्मणून शांत्युदक शिंपडण्याची, भिंतीवर काढलेल्या मातृदेवतांची पूजा करण्याची, व बलिदानें देण्याची, विष्णुसहस्रनामाचा एकसारखा पाठ चालू ठेवण्याची वगैरे चाली होत्या. तसेंच पाय धुवून व अग्निस्पर्श करून सूतिकागृहांत प्रवेश करण्याची चाल होती. मंगलकार्यांत आंब्याचे व अशोकाचे पल्लव टांगण्याचा प्रचार होता. कंकोल, जायफळ, कापूर, लवंगा यांच्या माळा करून टांगण्याचा प्रचार होता. पुत्रजन्मादि आनंदाच्या वेळेस बक्षीस देण्याची, व बलात्कारानें बक्षीस घेण्याची चाल असल्याचें दिसतें. षष्ठीपूजन व षष्ठीजागर करीत असत. मृदंग, कर्णा, शंख, चौघडा, इ० मंगलवाद्यें वाजत असल्याची चाल असे. राजपुत्राकरितां निराळें विद्यालय बांधून स्वतंत्र गुरु नेमून राजपुत्र, व गुरुपुत्र यांच्या विद्याभ्यासाची तजवीज केलेली आढळते. तेलंगी, द्रविड,

व सिंहलद्वीपांतले लोकहि सेवेकरितां इकडे असत. वेताच्या खुर्च्यासारखीं आसनें असल्याचें दिसतें. ' **विचित्रवर्णकंबलः** ' गालिचे होते. न्यायाधिकारी, व कारकून होते. " **बलभद्रमिव कादंबरीरसविशेषवर्णनाकुलम्** ' यावरून त्या वेळीं या **कादंबरी**प्रमाणें दुसऱ्या कादंबऱ्या किंवा कथा होत्या, असें दिसतें. स्त्रियांप्रमाणें अनेक पंथी पुरुषहि एकत्र बसत असल्याचें आढळतें. उन्हांत वगैरे परिश्रम केल्यानंतर कमलतंतु चोखण्याचें वर्णन आढळतें. ताडाचे पंखे होते. **गणपती**चाहि उल्लेख **बाणा**च्या दोन्ही ग्रंथांत व **हर्षा**च्या ग्रंथांत आहे. **महाश्वेता** ब्रह्मासन व ब्रह्मसूत्र घालून अघमर्षण करीत असल्याचें वर्णन आहे. अतिथींचे पाय धुण्याची व आदरसत्कार करण्याची चाल होती. चित्रें काढण्याकरितां कुंचली असे. कारंजीं असल्याचें आढळतें. वस्त्रभूषणें व तांबूल देऊन सत्कार करण्याची चाल होती. वस्त्रें भट्टींत घालीत असल्याचें आढळतें. बायकांच्या हातांत मंगलवलयें ( बांगड्या ) असत. देव, ऋषि, पितर यांचें ऋण असल्याची समजूत होती. पति आला असतां स्त्रियांनीं उठून उभें राहण्याची चाल होती. सूनमुख पाहण्याचें कौतुक होतें. मृत्तिका, काष्ठें, पाषाण यांच्या प्रतिमेचें पूजन होत असल्याचें आढळतें. पाणी पाजण्याकरितां पुत्र असावा अशी समजूत होती. वसंतांत ( शिमग्यांत ) बाजेवर वृद्धस्त्री व पुरुष यांचा विवाह करून थट्टा करण्याचे वगैरे बिभत्स प्रकारहि असल्याचें आढळतें ! ' **वीणामुकररुहव्यापारान्** ' यावरून सतार, सारमंडलासारखीं वाद्यें होतीं. गांवाला जातांना वडिलांस नमस्कार करण्याची व त्यांचा आशीर्वाद घेण्याची, तसेंच गुरू व वडील बसल्यानंतर थोडें दूर बसण्याची व आशीर्वाद सांगण्याची चाल होती. देवतांस पुष्पें अर्पण करण्याची चाल होती. मंगलकार्यांत सुवासिनींची गर्दी असल्याचें वर्णन आढळतें. राजांच्या येथें सुगंधि तेलांचा दीप लावण्याची व लग्न लागण्याच्या पूर्वी वधूवरांकडून कांहीं गमतीचे प्रकार करविण्याचीहि चाल आढळते; ह्या प्रसंगीं आप्तमित्रांच्या स्त्रिया मात्र असल्याचें दिसून येतें. या ठिकाणास ' कौतुकगृह ' असें म्हटलें आहे. राजाच्या येथें नृत्य, गीत, वाद्यवादन, वगैरे प्रकार होते. राजाजवळ शिरोरक्षणाकरितां खड्गधारी सज्ज असे. राजा दमून आला असतां पत्न्यांनीं वारा घालण्याची चाल होती. आनंदोत्सवांत मद्यानें धुंद होऊन चांभार जोरानें नगारे वाजवीत असल्याचें आढळतें. दौंडी पिटवि-

या पुस्तके जपून वापरा



ण्याचा प्रघात होता. मोहोर बंद करण्याचें माहित होतें. हत्तींच्या कानांवर शंखांच्या माळा भूषणासारख्या घालीत असत. कार्यांत श्रीफळें घेऊन जाण्याचा प्रघात होता. जाणत्या मुलांनां निजविण्याच्या वेळेस वृद्ध स्त्रिया गोष्टी सांगत असल्याचा प्रचार होता. लोहचुंबकाची माहिती होती. दोन पाय, दोन गुडघे व मस्तक अशा पंचांगांनीं नमस्कार करण्याचा प्रघात होता. संहिता, पदें, क्रम ह्मणण्याचा पाठ होता. क्षयकालीं बारा सूर्य उगवत असल्याचें वर्णन आढळतें. महानवमी ( आश्वीन शु० ९ ) च्या दिवशीं टोणगे मारण्याची चाल असावी. व ती दशमीस ह्मणजे दसऱ्याच्या दिवशीं चालू झाली असें दिसतें. वाघ धरण्याकरितां सापळे होते. मोरांच्या पिसांची छत्री असल्याचें आढळतें. गुरू, देव, साधू यांचें आराधन केलें असतां मनोरथ पूर्ण होतात अशी समसूत होती. हस्तिदंती राजमंदिरें असल्याचें वर्णन आहे. स्त्रियांच्या गालावर वेलबुट्टी काढीत असत. राजांच्या येथें कुब्ज वामन षंढ हे नौकर असल्याबद्दल, अनेक पशुपक्षी संग्रहास असल्याबद्दल, तसेंच गंधी तांबोळी हे संग्रहास असल्याबद्दल आढळतें. त्यावेळीं **भगवद्गीता महाभारतांत** असल्याचा उल्लेख आढळतो. परकीय लोक काष्ठ तोडण्याकरितां आले असतां कुऱ्हाडी हिसकून घेण्याची आणि खांद्यावर कुऱ्हाडी टाकून न्याहारी बांधून रानांत जाण्याची चाल होती. दुखणें जाण्याकरितां दानधर्म करण्याचा प्रघात होता. प्रयाणकालीं व दिवसवेळा दाखविण्याकरितां शंखनाद करण्याचा प्रचार होता. शिंकीं टांगून त्यांवर पदार्थ ठेवण्याची चाल होती. रहाटगाडगें होतें. पुत्रजन्मोत्सवाच्या वेळीं बंदिवानांस सोडण्याची, बाळंतविडे नेण्याची व मंत्रघोषानें भूतबाधा घालविण्याची चाल होती. दुखणाइताकरितां पाणी कढवून सच्छिद्रपात्रांतून गाळीत असल्याचें आढळतें. पतीसमोर—विशेषेंकरून लग्नांत—वधूनें खालीं मान घालून बसण्याचें व वस्त्रानें तोंड झाकण्याचें आढळतें. उपाध्याय शांत्युदक शिंपडीत असल्याचें, जावयाचा आदरसत्कार करीत असल्याचें, बोहल्यावर सुपांत शमी, समिधा, लाह्या, दर्भ, ठेवीत असल्याचें आढळतें. वधूवरांच्या शयन—मंदिरांत मंगलदीप, अशोकवृक्ष, व त्याखालीं धनुष्यबाण धारण करणारा मदन काढीत असत. आचमन करून दानधर्म करण्याची चाल होती. दुखणाइताच्या खोलीचीं दारें बंद करण्याची चाल होती. हरिणांनीं भ्यावें, ह्मणून तृणादिकांचे पुरुष करून शेतांत बसवीत असल्याचें आढळतें. राजेलोक

स्वारींत गवतांचीं व झाडांच्या फांद्यांचीं मंदिरें उभारीत व वस्त्रांची पालें देत असत. राजकन्यांनां नृत्यगीत व लेखन इत्यादिक शिकविण्याची चाल होती, व त्या तारुण्यांत आल्यावर लग्न करण्याची चाल होती. मुलांनां व इतर कांहीं जातींनां झुलपें होतीं. ब्राह्मणांच्या येथें यज्ञ चालू असतां शूर लोक व राजे हजर असत. काव्यादिकांनीं मनोरंजन करीत असत. चंदनाची उटी व त्यावर केशराचे ठिपके देत असत. तालीमजोड्या, मल्लखांब इत्यादि साहित्यें होतीं. केरल व मालव देशच्या स्त्रियांचे गाल मद्यानें आरक्त असल्याचें आढळतें तांबडे पीतांबर होते. कुत्र्यांच्या गळ्यांत कवड्यांच्या माळा असत.

८६४
गा २७
15 MAY 2007

समाप्त.

2 JAN 1985
श्री सो गं. पं.
वाचनालय, भोर

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ५ अभिप्राय | ७ | acurate | accurate |
| ,, | ११ | dealeng | dealing |
| ,, | १५ | archological | archiological |
| ,, | १६ | caltivated | cultivated |
| ४ प्रस्तावना | १८ | त्यापकीं | त्यापैकीं |
| १२ | ५ | वचि | वाचि |
| ,, | ७ | उदारचरितांनां | उदारचरितानां |
| ,, | २१ | वाटघाट | वाटावाट |
| ३ मुख्य ग्रंथ | १ | बाणाच | बाणाचा |

१२-१३ यांत व्हिन्सेंट स्मिथ याच्या ग्रंथांतील इंग्रजी उतारा दिला आहे त्याच्या पुढें " आमची पुराण वाचण्याची पद्धती " इ० जो मजकूर आहे तो जी वायुपुराणावर मूळ टीप आहे त्यांतील आहे असें समजावें.

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| १३ | १४ | manners | manorchs |
| ,, | १६ | centery | century |
| २१ | ९ | I reject | I can not reject |
| २२ | २ | towerds | towards |
| ३५ | ३२ | marchaed | marched |
| ४७ | २१ | सर्ववृत्तान्तगामिनी | सर्ववृत्तांतगामिनी |
| ५० | २६ | स्वच्छंदभ्रमणें | स्वच्छंदभ्रमण |
| ५३ | ७ | आसिंधुगामिान | आसिंधुगामिनि |
| ६१ | ५ | एकदा | एकादा |
| ७५ | १ | रिगेन | रिगेन्ड |
| ७८ | १५ | othor | other |
| ८२ | २५ | give | gave |
| ९२ | १२ | एकतांच | ऐकतांच |
| १०५ | २८ | newes | news |
| ११७ | ३ | विद्वतेचें | विद्वत्तेचें |
| १५२ | २६ | मांडावर | मांडीवर |
| १७२ | १८ | विचापूस | विचारपूस |
| १४० | १४ | मात्रिकांच्या | मांत्रिकांच्या |

20 NOV 2013